म. ग्रं. सं. ठाणें
विषय जीवंधर
सं. क्र. ८६६

REFBK-000843

मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन ४६ वें

# संस्कृत काव्याचे पञ्चप्राण

## रघु, कुमार, किरात, माघ व नैषध हीं

## संस्कृत पञ्चमहाकाव्यें.

'महाकाव्यें' यावरील तात्त्विक, तंत्रविषयक व विस्तृत निबंधासह

लेखक :

डॉ. प्रो. केशव नारायण वाटवे,

एम्. ए., पीएच्. डी.

मराठी व संस्कृत यांचे प्राध्यापक व 'रसविमर्श'कार,

स. प. कॉलेज्, पुणें २

REFBK-000684

किंमत ६ रुपये

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
१९६/८५ टिळक रोड, पुणें २.

मुद्रक :
लक्ष्मण नारायण चापेकर,
आर्य संस्कृति मुद्रणालय,
१९८/१७ सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणें २.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

मुखपृष्ठ-चित्रकार दीनानाथ दलाल.
चित्र छपाई राजगुरु प्रेस, पुणें २.

प्रथमावृत्ति १ जुलै १९८७.

# थोडेंसें प्रास्ताविक—

संस्कृत पंचमहाकाव्यांचें प्रस्तुत विवेचन मराठी वाचकांना अनेक दृष्टींनीं मोठें अगत्याचें वाटेल. संस्कृत विद्या ही सर्वच देशी भाषांचा एक मोठा वडिलोपार्जित ठेवा होय; व तो त्यांस वारसाहक्कानें मिळाला आहे. त्यांतल्यात्यांत रामायण-महाभारत-भागवताश्रय संस्कृत महाकाव्यें म्हणजे गेल्या दोन हजार वर्षांतील भारतीय जीवनाच्या विविध अंगांचें ललित शब्दचित्र आहे. त्यांत प्राचीन भारतीय संस्कृति खास भारतीय कलात्मकतेनें नटलेली आहे. राजकारण, समाजकारण, ऐहिक व पारलौकिक धर्म, लोकव्यवहार, विद्याकला इत्यादींची प्राचीन आदर्श मांडणी यांतच आढळते; व भारतीय काव्यकलेची भव्यता व उंची तर यामध्यें शिगेला पोंचली आहे. त्यामुळें इतिहाससंशोधक, संस्कृति व समाज या विषयांचे अभ्यासी, राजकारणी व वाङ्मयटीकाकार इत्यादि मंडळींना हीं काव्यें म्हणजे सूक्ष्म निरीक्षणाची एक अमोल खाणच आहे. निव्वळ काव्यलोलुपांना तर कालिदासादि कवींचीं हीं महाकाव्यें काव्यामृतपानाची नंदनवनभूमि वाटते. भारत-भागवत-रामायण ही त्रयी व हें महाकाव्यपंचक म्हणजे मराठी भाषेच्या घडणींतील आठ घटक धातू आहेत.

पण या मूळ संस्कृत काव्याचा आस्वाद निव्वळ मराठी वाचकाना भाषेच्या आडपडद्यामुळें मुळींच घेतां येत नाहीं. सामान्य संस्कृतज्ञांना सुद्धा तो अर्धामुर्धाच मिळतो. फार काय, अगदीं उत्तम संस्कृतज्ञ झाला तरी तो सुद्धां या सर्व पंचमहाकाव्यांचें आमूलाग्र अवलोकन करतोच असें नाहीं. आठ साडेआठ हजार श्लोकांच्या सूक्ष्म निरीक्षणाकडे केवळ रसिकतेच्या पोटीं कोणी सहजासहजीं वळत नाहीं. अशा सर्व मंडळींसाठीं मी हें वाढप्याचें काम करीत आहें. पण मीं सुद्धां हें काम केवळ स्वयंस्फूर्तीनें अंगिकारलें नाहीं. याला खरी प्रेरणा आमचे प्रकाशक रा. मनोहरपंत केळकर यांची आहे. चागलें वाङ्मय वाचकांना उपलब्ध करून देण्याची त्यांची इच्छा हीच या प्रकाशनाच्या बुडाशीं आहे. प्रथम त्यांच्याच विनंतीवरून मीं पंचमहाकाव्यांच्या कथा त्यांच्या 'वाङ्मयशोभे'त लिहिल्या. एकदोन रसग्रहणेंहि तेथेंच प्रसिद्ध केलीं. तीं वाचून अनेक मंडळींनीं समक्ष व पत्रद्वारें सदर विषयाचें संपूर्ण विवेचन पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याची आग्रहाची विनंति मला केली. प्रकाशकांच्या मूळ इच्छेला मिळालेल्या या वाचकांच्या प्रोत्साहक दुजोऱ्याचें फळ म्हणजे हा ग्रंथ होय.

प्रकृत विषयाच्या विवेचनांत मला अनेक ग्रंथांचा व कांहीं व्यासंगी मित्रांशीं केलेल्या चर्चेचा उपयोग झाला आहे. त्यांतल्याल्यांत आमच्या कॉलेजांतील इंग्रजीचे विद्वान् प्राध्यापक श्री. सत्तेगिरी याच्या साहाय्याचा स्वतंत्र उल्लेख केला पाहिजे. या सर्वांच्या मी ऋणी आहें.

पांचगणींनजीक असलेल्या दांडेघर या गांवीं 'कुटीर' नांवाचा एक बंगला आहे. त्यांत उन्हाळ्याचे सुट्टीमध्यें मीं या ग्रंथाचा बराचसा भाग लिहिला. या निसर्गरम्य व शीतल निवासस्थानाचा लाभ मला या ग्रंथाचे वेळींच केवळ नव्हे तर गेलीं अठरा एकोणीस वर्षें अव्याहतपणें ऐन उन्हाळ्यात झाला आहे. याचें सर्व श्रेय या रम्य निवासाचे धनी व माझे रसिक स्नेही श्रीमंत बाळासाहेब साठे (इनामदार, वाई) यांच्या सौजन्यास व विद्याप्रियतेस आहे. श्रीयुत तात्यासाहेब केळकरांच्या 'टिळकचरित्रा'चें कांहीं लेखनहि याच निवासांत झालें आहे. इजा-बिजा-तिजा या समजाप्रमाणें एका तिसऱ्या ग्रंथाच्या लेखनाला हें स्थान प्रेरक होवो असें इच्छितों !

योगकुञ्ज, चिमणबाग,
टिळक रोड, पुणें २.
२५।६।४७.

के. ना. वाटवे.

---

## कांहीं महत्त्वाच्या चुकांचें शुद्धिपत्र

| पृ. ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ३७–१४ | पुत्त्र (ही चूक अनेक स्थळीं आहे) | पुत्र |
| ४९–१६ | महत्मनाम् | महात्मनाम् |
| ६८–६ | अजानें | रघूनें |
| १०७–११ | व्याक्तिक्रमः | व्यतिक्रमः |
| ,, १६ | क्षत्त्र | क्षत्र |
| ,, २९ | प्राणिपात | प्राणिपात |
| ११५–५ | पणतू | पणजोबा |
| १९८–१५ | °चिन्तो | °चिन्ता |

# अनुक्रमणिका.


**महाकाव्यें आणि महाकवी** (प्रास्ताविक निबंध) पृ. १ ते ९६.

विवेचनाची भूमिका—चर्चेचे विषय—१—'आर्ष' व 'विदग्ध' या संज्ञा—२—विदग्ध महाकाव्यांचा उगम आणि आधार—२-८—रामायण ३-४, महाभारत ५-६, —पुराणें ६, धार्मिक चरित्रकथा ७, अर्वाचीन इतिहास— ८— आर्ष महाकाव्यें— 'आर्षां'चा अर्थ ९, —ॲरिस्टॉटलचें महाकाव्यलक्षण ९, एपिक् म्हणजे काय ? १०, 'विदग्धा'च्या अर्थछटा ११, —आमचे सुत व शाहीर—Bards १२, पुराणें १३, आर्षकाव्यांची सामग्री १४, आर्षकाव्यांचा एकसूत्रीपणा १५, वीरयुग (Heroic age) १६, तत्कालीन जीवन १७, संघकाव्य १८, आर्षकाव्यांचीं पुनरावर्तनें व पुनरावृत्त आर्षकाव्यमंडलें (epic cycles) १९, आर्षकाव्यें पहिलीं व शेवटचींहि २०-२४. व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम् २३, आर्षकाव्यांचे विषय २४ २५, आर्षकाव्यांचें मोठेपण २६-२८, विदग्ध महाकाव्यें—नव्या युगाचा अवतार २९, जुनें तें सोनें ३०, नव्या चौकटींत जुनीं चित्रें ३१, वास्तव आदर्श केलें ३२, सत्य अद्भुतांत सामील ३३, कालिदासपूर्व महाकाव्यें ३३-३४, हिंदुस्तानचा व्हर्जिल ३४-३५, कालिदासाची कामगिरी ३५-३६, प्रतीकमार्ग symbolism ३६, काव्यहेतूचा पुढील विकास ३७, आमच्याकडे काय झालें ? ३८, कालिदास 'कविकुलगुरु' कां ? ३८-३९, कालाचा कवींवर परिणाम ३९, राजाश्रय ४०, धर्माश्रय ४१, विदग्धकाव्यें व शृंगार ४१, युद्धाचें बदललेलें क्षेत्र ४२, प्रसंग व प्रतीक ४३, महाकवींची वस्तुनिष्ठा व आत्मनिष्ठा ४४-४५, विदग्ध काव्यांचीं लक्षणें ४६-४८, त्यांतील अपुरेपणा ४८, खण्डकव्यें, अद्भुतरम्य व विडम्बनात्मक महाकाव्यें ४९, विदग्ध महाकाव्यांची सजावट—तिचीं बारा स्थानें—श्रुति ५०, स्मृति ५१, पुराणें ५२, अर्थशास्त्र ५४, नाट्यशास्त्र ५५, कामशास्त्र ५५-५६, —महाकाव्यशैली (epic style) ५७ ६३, —महाकाव्याच्या सांगातीं व नंतर—भारवीपूर्वी ६३, माघानंतर ६४, ऱ्हासकाल ६५, संमिश्र महाकाव्यें ६६ ६७, होमर, व्हर्जिल, कॅमोइन्स, टॅसो व मिल्टन् या कविपंचकानंतर ६८, महाकवि कोण ? ६९, आमचे ऋषिकवी व होमर ७० ७१, विदग्ध कवींचीं वैशिष्ट्यें ७२, महाकाव्यांचा देशीं अवतार—महानुभावी महाकाव्यें— 'शिशुपालवध' व 'रुक्मिणिस्वयंवर ७३-७५, भागवतपंथी

काव्यें ७६, नाथांचें 'रुक्मिणीस्वयंवर' ७७, आख्यानकविता व खण्डकाव्यें ७८-७९, सामराजाचें 'रुक्मिणीहरण' ८०, भाषान्तरात्मक महाकाव्यें ८१, कुंटे-'राजा शिवाजी ... वर- 'यशवंतराव' महाकाव्य ८२, महाकवि सावरकर ८३, दोन रामायणी महाकाव्यें ८४, महाकाव्याचे मोहरे व छटा ८५, गुजराथी महाकाव्यें ८७, हिंदी महाकाव्यें ८८, बंगाली महाकाव्यें ८९, कानडी महाकाव्यें ९०, महाकाव्याचें भवितव्य ९१, काव्यकलेचें स्वातंत्र्य-ब्रॅड्ले ९१, अनिष्पत्तीची कारणमीमासा-वा. म. जोशी व इतर ९३, लोकनेते नायक ९५, निर्मितीची शक्यता ९५, महाकवीच्या आगमनाची खात्री ९६, आधारभूत ग्रंथ ९६.

## संस्कृत काव्याचे पञ्चप्राण (मूळ ग्रंथ).

### (१) कालिदासाचें 'कुमारसंभव' पृ १-५३.

१ कविपरिचय—पृ. १ ते ९. आपल्याकडील ऐतिहासिक दृष्टीचा अभाव-दोन विचारणीय मतें इ. पूर्व ५७ व इ. स. ३८०-४१३- काहीं मनोरंजक दंतकथा- जगांतील रसिकांनीं केलेलें कालिदासाचें कौतुक-कालिदासाचें आत्मचरित्र-त्याच्या काव्यकृती.

२ कुमारसंभव-कथासार—पृ. ९ ते ३१.

३ कुमारसंभव-रसग्रहण—पृ. ३२ ते ४५. इतिहास, पुराणें व महाकाव्यें-त्यागाची कल्पना-३३-आर्यसंस्कृतीचा आदर्श-३४-काहीं स्वभावचित्रें-पार्वती, शंकर-३५-३७-सृष्टिकाव्य-काहीं दोष-३८-कुमारसंभव पूर्ण का अपूर्ण ?-४०-४१-पुराणें व कालिदास-४२-रस-निर्मिति-४३- पहिलें महाकाव्य हेंच ४५.

४ कुमारसंभव-सुभाषितें—पृ ४५ ते ५३.

### (२) कालिदासाचा 'रघुवंश'—पृ. ५४ ते १११.

१ रघुवंश-कथासार—पृ. ५४ ते ८८.

२ रघुवंश-रसग्रहण—पृ. ८८ ते १०६. कुमार-रघु-साम्यविरोध-८८-कुमार प्रथमचा का रघु ?-८९-९२-रघुवंश हेंच काव्यनाम कां ? ९२, रघुवंशाचा आधार कोणता ?-९३-९६-रामायण-पुराणें-९३-पद्मपुराण आणि कालिदास-९४-रघुवंशातील स्वकालीन छटा-९७-९९

-तत्कालीन संस्कृतीचें काव्यमय रूपान्तर-१००-कलेसाठीं कला का हेतू-साठीं ?-१०१-स्वतंत्र सौंदर्य-साक्षात्कार-१०२-अनेक नायक-१०२-रसनिर्मिति-स्वभावलेखन-१०४-संवादचातुर्य-१०५-शैली-१०६.

३ रघुवंश-सुभाषितें—पृ. १०७ ते १११.

(३) भारवीचें 'किरातार्जुनीय'—पृ. ११२ ते १७३.

१ कविपरिचय—पृ. ११२ ते ११९. 'अवन्तिसुंदरीकथा' व भारवीचा कालनिर्णय-भारवि व माघ-मनोरंजक आख्यायिका-भारवीची प्रशंसा-त्याची शैली-त्याची विद्वत्ता.

२ किरातार्जुनीय-कथासार—पृ. १२० ते १४९.

३ किरातार्जुनीय-रसग्रहण—पृ. १५० ते १६९. मारव्याच्या कथांची सजावट भिन्न कां ?-१५०-कवीचें व्यक्तिमत्त्व-१५१-भारवीचें प्रतिपाद्य-निवृत्तीची अकालीं झडप-१५२-५५-मोक्ष व इतर पुरुषार्थ-१५१-कर्मयोग-१५४-भारवीनें दिलेली कलाटणी-१५५-प्रवृत्तिमार्गाचें समर्थन-१५६-निवृत्तीनें येणारी मरगळ मोडून काढली-१५७-मोक्ष ही अडचण आहे-१५८-मानीपणा म्हणजेच मनुष्यत्व-१५९-तपांतहि तेजस्विता-१६०-परतंत्र राष्ट्रांना भारवीचा संदेश-१६२-मानी भारवि-एका उपपत्तीचा विचार-१६३-कवि आणि ऋषि-१६४-स्वभावरेखा-१६५-कल्पना-१६६-कांहीं दोष-१६७-शैली-१६८-१६९.

४ किरातार्जुनीय-सुभाषितें—पृ १६९ ते १७२.

(४) माघाचें 'शिशुपालवध'—पृ. १७३ ते २२९.

१ कविपरिचय—१७३-१८०. माघाचें खानदानीचें घराणें-१७३-त्याची विद्वत्ता-१७४-राजाचा पाहुणचार-१७५-त्याचें दारिद्र्य व औदार्य-१७६-माघबद्दलचें पंडितांचें अत्युक्त मत-१७९-८०.

२ शिशुपालवध-कथासार—पृ. १८० ते २०३.

३ शिशुपालवध-रसग्रहण—२०३-२२६. माघाच्या काव्याचे आधार—भारत-भागवत व इतर पुराणें-२०३ २०४-भागवताचा काल व माघकाल-२०५-कोण कोणाचा आधार घेतो ?-२०६-भारवीचें अनुकरण-२०७-कालिदासाचें अनुकरण-२०८-परानुकरण हाच प्रेरक हेतु-

-२०९-जोडीला परस्पर्धा-२१०-प्राचीन पंडितात माघाची वाहवा-२११-माघापुढें मारवि फिका पडतो ?-२१२-मत डांक्याचें का हृदयाचें ?-२१३-व्यक्तिमत्त्व म्हणजे काय ?-२१३-१४-माघात व्यक्तिमत्त्वाचा अभाव-२१४-स्वकालाशीं समरसता नाहीं-२१५-१६-माघकाव्यांत माघ नाहीं !-२१७-मिल्टन्-२१८-देवायांचून देव्हारा-२१९-कल्पनाप्रधान निसर्गवर्णनें -२२०-उसना शृंगार-२२१- कांहीं वैचक चांगलीं स्थळें-२२२-भावकवि व महाकवि-२२३-माघ हा शास्त्रकवि-२२४-स्त्रीपात्र नाहीं-२२५-महाकाव्याचा अपकर्ष-२२६.

४ शिशुपालवध-सुभाषितें—पृ. २२६ ते २२९.

(५) श्रीहर्षाचें 'नैषधीय चरित' —पृ. २३० ते ३०४.

१ कविपरिचय—पृ. २३० ते २३९. श्रीहर्षाचा आत्मपर वृत्तान्त -२३०-जयचंद व पृथ्वीराजकलह -२३१-श्रीहर्षाची विद्वत्ता-२३२-त्याचा जबर आत्मविश्वास-२३३-काव्याच्या कठिणपणाची फोल तक्रार-२३५-त्याचा जीवनवृत्तान्त-२३७-विलक्षण धारणाशक्ति-२३८-मम्मट आणि श्रीहर्ष-२३९.

२ नैषधीयचरित-कथासार—पृ. २४० ते २७४.

३ नैषधीयचरित-रसग्रहण—पृ. २७५ ते २९९. प्रेमाचा शाश्वत त्रिकोण-२७५-अद्भुत प्रेमकथा-२७६-श्रीहर्षकालीन स्वयंवर व कलि-२७७-नैषधाचें वैशिष्ट्य-२७८-स्वतंत्र बाणा-२७८-मानसिक पृथक्करण-२७९-मनोविश्लेषण-२८०-शास्त्रांचे उल्लेख-२८०-८१-प्रचंड विस्तार-२८२-इतिहास व महाकाव्य-२८२-हंसाला मानव बनविला-२८३-८५-नायक नल हा आदर्श गृहस्थ-राजर्षि-२८६-धीरललित नायक-२८७-महाभारताचा नल व श्रीहर्षाचा नल-२८८-८९-अद्वैत-मत-२८९-विनोदी वृत्ति-२९०-थोडी हिणकस अभिरुचि-२९१-कथानकरचना-२९२-नैषधीयचरित पूर्ण की अपूर्ण ? -२९३-९४-कांहीं स्वभावरेखा-२९५-भाषाशैली-२९६-अमृतपाक-कल्पनाशक्ति-२९६-९७-श्रीहर्ष व माघ-तुलना-२९८-९९.

४ नैषधीयचरित-सुभाषितें—पृ. २९९ ते ३०२. उपसंहार-३०४.

# महाकाव्यें आणि महाकवी.

( तात्त्विक आणि तंत्रविषयक विवेचन. )

## ( १ ) विवेचनाची भूमिका.

**चर्चेचे विषय.**

'संस्कृत काव्याचे पंचप्राण' या सोबतच्या प्रबंधांत सुप्रसिद्ध व सर्वमान्य अशा संस्कृत पंचमहाकाव्यांचें एकेकशः निरीक्षण केलें त्यांत 'रघु', 'कुमार', 'किरात', 'शिशुपालवध' व 'नैषधीयचरित' यांचे व्यक्तिगत विशेष सागत असतां महाकवी व महाकाव्यें यांबद्दल थोडें थोडें विवेचन प्रसंगपरत्वें आधूनमधून येऊन गेलेलें आहें. पण 'महाकाव्य' या विशिष्ट काव्यप्रकाराची ऐतिहासिक व तात्त्विक बैठक समजावून घेतल्यावांचून त्यांच्या स्वरूपाची नीटशी ओळख होणार नाहीं. म्हणून या निबंधांत या काव्यप्रकाराच्या वाढीचा इतिहास प्रथम निवेदिला पाहिजे. सदर काव्यांचा उगम कोठून झाला ? त्यांचा आधार कोणता ? रामायण-महाभारतांशीं या काव्यांचा संबंध कोणत्या प्रकारचा ? रामायण-महाभारत हींहि महाकाव्यें च मानलीं जातात. असें आहे तर तीं जुनीं महाकाव्यें व हीं नवीं महाकाव्यें यांत फरक काय व तो कां पडला ? दोहोंचीं वेगळालीं स्वरूपें कोणतीं ? दोहींचीं तंत्रें कोणतीं ? उद्देश कोणते ? महाकवी कोणास म्हणावें ? ह्या नव्या काव्यांचा ह्रास केव्हां, कां व कसा झाला ? देशी वाङ्मयावर यांचे कोणते परिणाम झाले ? संस्कृतानंतरच्या प्राकृत व देशी भाषांत यांचे नवे अवतार कोणते व कशा स्वरूपाचे झाले ? इंग्रजी अमदानीनंतर आजतागायत महाकाव्यरचनेचे प्रमुख प्रयत्न किती झाले ? व शेवटीं आधुनिक कालाच्या प्रवृत्ती ध्यानांत घेतां ह्या रचनाप्रकाराचें भवितव्य काय आहे ? इत्यादि ऐतिहासिक, तंत्रविषयक व तात्त्विक प्रश्नांची चर्चा केली पाहिजे. व ती करतांना पाश्चात्य महाकाव्यांच्या तुलनात्मक विचाराचा धागा मध्यें गुंफला पाहिजे. तरच पंचमहाकाव्यांचें विवेचन सर्वांगपरिपूर्ण होईल.

## एक महत्त्वाचा भेद.

महाकाव्याचें हें ऐतिहासिक, तात्त्विक व तंत्रविषयक विवेचन अधिक स्पष्ट व्हावें यासाठीं रामायण महाभारतांसारख्या जुन्या व रघुवंश-किरात-नैषधादि नव्या महाकाव्यांना परस्परांतील भेद दर्शविणाऱ्या दोन वेगवेगळ्या संज्ञा देणें अत्यंत आवश्यक आहे. या काव्यप्रकाराला नुसतें 'महाकाव्य' किंवा Epic असें संबोधून चालणार नाहीं. साहित्यदर्पणांत ( ६.३२५ ) रामायण-महाभारतांना 'आर्ष महाकाव्य' हें मोठें यथार्थ नांव देण्यांत आलें आहे. त्यामुळें या जुन्या काव्यांचें प्राथम्य, प्राचीनता, पावित्र्य व सहजस्फूर्तत्व इत्यादि लक्षणें उत्तम व्यक्त होतात. पण तेथें रघु-किरातादि नव्या काव्यांस मात्र नुसतेंच 'महाकाव्यें' म्हटलें आहे. त्या दोहोंमधील भेद दाखवणारें विशेषण भामहापासून 'साहित्यदर्पण'कारापर्यंत कोणींच योजलेलें नाहीं. म्हणून या नव्या प्राचीनोपजीवी काव्यांचें वेगळें रूप स्पष्ट व्हावें याकरतां तेथें त्यास 'विदग्ध' हें विशेषण लाविलें आहे. 'विदग्ध महाकाव्य' म्हणजे उत्तरकालीन संस्कृतीच्या बदलत्या ओघांत व भिन्न परिस्थितींत पूर्वीच्याच काव्यांच्या आधारें विशिष्ट हेतूनें आणि जाणिवेनें रचलेलें, चातुर्य आणि विद्वत्ता यांनीं नटलेलें, कलामंडित व तंत्रबद्ध महाकाव्य. इंग्रजी टीकाकारांनीं सुद्धां याच अर्थी 'ईलियड', 'ओडेसी' व 'बेओऊल्फ'सारख्या आर्ष महाकाव्यांना Authentic व 'एनीड', 'पॅरेडाइज् लॉस्ट'सारख्या विदग्ध महाकाव्यांना Literary Epics अशा वेगळ्या संज्ञा वापरल्या आहेत. पुढील विवेचन वाचतांना हा भेद वाचकांनीं अवश्य ध्यानीं घ्यावा.

## ( २ ) विदग्ध महाकाव्यांचा उगम आणि आधार.

### विदग्ध महाकाव्यांची गंगोत्री.

आदिकवी वाल्मीकीचें आर्ष महाकाव्य 'रामायण' हेंच विदग्ध महाकाव्यांचें उगमस्थान होय. 'काव्य' या नांवाला साजेल अशी आकर्षक, सुसूत्र, संघटित, दीर्घ आणि भव्य अशी रामायण हीच पहिली कथा आहे. ऋग्वेद आणि ब्राह्मणग्रंथ यांच्या काळापासून आपल्याकडे गाथा,

नाराशंसी, इतिहास, यमसभीय, इन्द्रजननीय, आख्यानें, कथा आणि पुराणें होतीं. पण तीं केवळ घडलेला प्रसंग साधेपणानें सांगणारीं होतीं. तीं फुटकळ, विस्कळित, त्रुटित व लहान होतीं. त्यांत नुसती कथा होती पण कथनकौशल्य नव्हतें. त्यांत सरस कथनाला योग्य असें एकच वृत्त नव्हतें. भावनांचीं चित्रणें आणि स्थलांचीं वर्णनें नव्हतीं. वाल्मीकीनें रामचरित्र मध्यवर्ती करून त्याच्याशीं इतर गौण आख्यानोपाख्यानांची सुंदर गुंफण केली आहे. आणि राम व सीता यांच्या चारित्र्याचा उदात्त ठसा मनावर उमटेल अशा रीतीनें त्याचें वेधक कथन केलें आहे. रसवाही, नियमित आणि प्रसादपूर्ण असें एकच अनुष्टुभ् सर्वत्र वापरलें आहे. हल्लीं उपलब्ध असलेल्या रामायणांत प्रत्येक सर्गाच्या अंतीं (व क्वचित् मध्येंहि) असलेले प्रदीर्घ वृत्तांतील श्लोक व 'सर्ग' हें काण्डांच्या भागांना दिलेलें नांव प्राक्षिप्त आहे असें संशोधकांचें मत आहे. पुढील कालांतल्या महाकाव्यरचनेचे हे विशेष आहेत. इतिवृत्त आकर्षक करण्यासाठीं स्थलांचीं व व्यक्तींचीं मार्मिक वर्णनें केलीं आहेत. [1]समुद्र, नद्या, पर्वत, नगरें, युद्धें, ऋषींचे आश्रम, ऋतु, विलाप, मत्सर, द्वेष, स्त्रीपुरुषांचीं रूपें इत्यादिकांचें हुबेहूब चित्रण आहे. उपमा, उत्प्रेक्षा, रूपकें, अनन्वय इत्यादि अलंकार आहेत. अचेतनाला सचेतन करणारी कल्पना (लंकानगरी-दर्शन–सुंदरकाण्ड–३) आहे. प्रवास, राजकारणचर्चा (मंत्र) व शिष्टाई यांचें वर्णन आहे. व्यवहारोपयोगी सुभाषितांची पेरणी आहे व तत्त्वज्ञानहि आहे. थोडक्यात सांगावयाचें तर विदग्ध महाकाव्यांना नमुना म्हणून पुढें ठेवावयास योग्य असें हें पहिलें, ऐतिहासिक आर्ष महाकाव्य आहे. हेंच आदिकाव्य पुढील कलासंपन्न महाकाव्यांचें उगमस्थान होय. हीच विदग्ध महाकाव्यांची गंगोत्री.

---

१ सागर (युद्ध. ४.११०-१२४), भागीरथी (अयोध्या. २.५०–१५–२६), चित्रकूट (अयोध्या. ५६-६–१२), लंका (सुंदर २–८–२३), लक्ष्मण-इंद्रजित् व रामरावणयुद्ध (युद्ध. ८९ व ९३–९६), अगस्त्यभ्रात्याचा आश्रम (अरण्य. ११ ४६–५२), हेमंत (अरण्य. १६.४–२६), शरद् (किष्किंधा. ३०), वर्षा (किष्किंधा. २८), मंदोदरीविलाप (युद्ध.१११), मंथरेचा द्वेष (अयोध्या. ७–९) इत्यादि.

## पहिला आधारहि तोच.

रामायण हाच विदग्ध महाकाव्यांचा पहिला आधारहि आहे. कारण रामायणांतिल कथाभाग घेऊन त्यावरच कांहीं विदग्ध महाकाव्यें रचण्यांत आलीं आहेत. पहिला महाकवि कालिदास यानें आपल्या 'रघुवंशा'च्या नऊ ते सोळा सर्गांना रामायणाचा आधार घेतला असून वाल्मीकीचें ऋण मोठ्या भक्तिभावानें मान्य केलें आहे. (रघु १.४, १४.७०, १५.३३ व ६४). इतकेंच नव्हे तर त्यानें 'रघुवंश' व 'कुमारसंभव' हीं नावेंहि रामायणांतूनच घेतलीं आहेत. (**रघुवंशस्य** चरितं चकार भगवान्मुनिः । बाल. ३.९, व **कुमारसंभव**श्चैव धन्यः पुण्यस्तथैव च। बाल. ३७.३१). 'कुमारसंभवा'च्या कथेचा त्रोटक आराखडा त्यानें रामायणांतूनच घेतला आहे (बाल. ३६.३७) व मग त्यांत इतर ठिकाणच्या कथांची गुंफण केली आहे. 'मेघदूता'ची मध्यवर्ती कल्पनाहि कालिदासाला रामायणातील हनुमंतसंदेशावरूनच सुचली असावी (मेघ १ व १०५. सीता व हनुमंत उल्लेख पहा). कालिदासाव्यतिरिक्त इतर अनेक महाकवींनीं रामायणाचा आधार घेऊन रचना केली आहे. उदाहरणार्थ, प्रवरसेनाचें प्राकृत 'सेतुबंध', कुमारदासाचें 'जानकीहरण' ( सहावें शतक ), भट्टीचें 'रावणवध' ( पाचवें शतक), इत्यादि. अश्वघोषासारखे बौद्ध व धनंजयासारखे जैन कवी यांवरहि रामायणाची छाप पडली आहे.

## व्यासांचें महाभारत.

विदग्ध महाकाव्याचा दुसरा आधार व्यासांचें महाभारत. जातिवंत कविकल्पना, निसर्गवर्णनें, प्रासादिक व भावपूर्ण भाषाशैली आणि कांहीं नैतिक गुणांचे भव्य आदर्श हे रामायणाचे विशेष होत. तर सूक्ष्म व कुशाग्र बुद्धि, मानवीस्वभावदर्शन, ठसकेबाज व विचारप्रधान भाषा आणि प्रसंगसापेक्ष नैतिक गुणांचें तारतम्य-विवेचन हीं महाभारताचीं वैशिष्ट्यें आहेत. पितृभक्ति, पतिनिष्ठा, भ्रातृप्रेम व स्वामिभक्ति हे सद्-गुणांचे चार प्रकार रामायणांत विशिष्ट व्यक्तींचे गुण म्हणून वार्णिलेले असले तरी ते पुढें आदर्श म्हणून मानले गेले. त्याच्या परिपालनांत कराव्या लागणाऱ्या प्रचंड त्यागाचें उज्ज्वल चित्र रामायणात मोठ्या भावनात्मकतनें

रंगविलें आहे. रामायणांत चर्चा नाहीं, वादविवाद नाहींत, कीं शंका-कुशंका नाहींत. धर्म म्हणजे धर्म व तो पाळावयाचा म्हणचे त्यागपूर्वकहि पाळावयाचाच. राम, सीता-उर्मिला, भरत-लक्ष्मण व हनुमान यांना आपापल्या निष्ठेचा संशय नाहीं. परिस्थिति कांहींहि असो, इतर लाभालाभ कांहींहि होवोत, त्याचा विचार त्याच्या ध्यानींमनीं नाहीं. पण महाभारतांत सर्वच प्रकार भिन्न आहे. तेथें द्रौपदी पतिनिष्ठ असूनहि राजकीय घोरणांत धर्मराजाची पर्वा करीत नाहीं. भ्रातृभक्त भीम धर्मराजाला जुमानत नाहीं. भीष्मादि वृद्धांना अधर्म पाहूनहि ओशाळगतीनें स्वस्थ बसावें लागतें. व अजातशत्रु व सत्यनिष्ठ धर्माला प्रत्यक्ष चुलतबंधूशीं वैर करून 'नरो वा कुंजरो वा' म्हणावें लागतें.

'येथें चातुर्य शहाणें झालें.'

याचा अर्थ असा कीं 'धर्म हा धर्म म्हणून परिपालनीय असला तरी तो परिस्थितिसापेक्ष आहे. धर्माची गति सूक्ष्म असल्यानें धर्माला धोपटमार्ग नाहीं' असा सूक्ष्म धर्मतत्त्वविचार महाभारतांत असून तो विचार फारच भव्य, रोमांचकारी आणि गंभीर घटनांतून मोठ्या कौशल्यानें गुंफला आहे. महाभारताचे प्रसंग भव्यच पण त्यांतलीं पात्रें त्याहूनहि भव्य ! राजसभेंत द्रौपदीसारख्या राजस्नुषेवरील वस्त्रहरणप्रसंग, श्रीकृष्णासारख्या राजकार्यधुरंधर अशा तत्त्वज्ञान्याची स्वभावरेखा, दुर्योधनासारखा खलनायक, कर्णासारखा शूर व मानी पुरुष व धर्मासारखा शांतिदूत महाभारतावांचून दुसऱ्या कोणत्या महाकाव्यांत आढळणार ? व्यासाची ही विशाल धीमत्ता ज्ञानेश्वराच्या शब्दांत वर्णावयाची तर तेथें 'चातुर्य शहाणें झालें' आहे. व सबंध 'विश्वच व्यासमतीनें कवटाळलेलें' दिसत आहे ! महाभारतांतील काव्याचा हा एक वेगळा प्रकार भारवीसारख्या पुढील महाकवींच्या बुद्धीला प्रेरक झाला आहे. शिवाय भारतांतलें अनेक बाके प्रसंग पुढील महाकवींनीं आधारास घेतले आहेत. पंचमहाकाव्यांपैकीं 'किरातार्जुनीय', 'शिशुपालवध' व 'नैषधीयचरित' हीं तीन महाकाव्यें महाभारतकथाश्रयच आहेत. शिवाय कृष्णानंदाचें 'सहृदयानन्द' ( तेरावें शतक ). व वंदारुभट्टाचें 'उत्तरनैषध' ( एकोणिसावें शतक ) हीं दोनहि महाकाव्यें नलोपाख्यानावर आहेत.

'राघवपांडवीय', 'राघवनैषधीय' इत्यादि काव्यांत भारतकथा आहेच. शिवसूर्याचें 'पांडवाभ्युदय' ( १५ वें शतक ), अगस्त्याचें 'बालभारत' ( १४ वें शतक ) इत्यादि अनेक काव्यें भारताश्रय आहेत.

## आणखी तीन आधार— (१) पुराणें.

महाकाव्याचे प्रमुख व प्रसिद्ध असे हे दोनच आधार. पण यांव्यतिरिक्त इतर तीन आधारांवरील विदग्ध महाकाव्यें उपलब्ध आहेत. ते आधार म्हणजे १ पुराणें, २ धार्मिक चरित्रकथा व ३ अर्वाचीन इतिहास. १ शैव किंवा वैष्णवपुराणें, हरिवंश व भागवतपुराण यांवर आधारलेलीं पुढील विदग्ध महाकाव्यें आहेत. शिवानें त्रिपुरविजय केला या लिंग, मत्स्य व शिव पुराणोक्त कथेवर मङ्खकवीनें पंचवीस सर्गांचें 'श्रीण्कठचरित' नांवाचें महाकाव्य रचिलें आहे (इ. सन ११४०), विद्यामाधवानें शिव-पार्वती व कृष्णरुक्मिणी यांच्या विवाहावर 'पार्वतीरुक्मिणीय' हें काव्य शैवपुराण व हरिवंश यांवर आधारून लिहिलें आहे ( १२ वें शतक ). नंदनवनांतील पारिजात वृक्ष कृष्णानें द्वारकेंत आणिला या भागवतपुराणोक्त कथेवर कविराजानें 'पारिजातहरण' नांवाचें एक महाकाव्य रचिलें आहे ( १२ वें शतक उत्तरार्ध ) व 'विश्वगुणादर्शचम्पू'चा कर्ता वेंकटाध्वरि यानें भागवत व रामायण यांच्या आधारें 'यादवराघवीय' रचिलें ( १७ वें शतक ). काश्मिरी कवि रत्नाकर राजानक यानें अंधकासुराचा शिवानें केलेला वध या विषयावर 'हरविजय' नांवाचें पन्नास सर्गांचें प्रचंड महाकाव्य लिंग, पद्म व स्कंद या पुराणांच्या आधारें रचलें आहे ( ९ वें शतक उत्तरार्ध ) यांत माघाचें अनुकरण आहे.

## (२) धार्मिक चरित्रकथा.

बौद्धकवि अश्वघोष ( इ. सन १०० ) यानें आपलीं 'बुद्धचरित' व 'सौंदरनंद' हीं महाकाव्यें भगवान् गौतमबुद्धाच्या चरित्रावर रचलेलीं आहेत. त्यांना आधार अर्थात्च 'ललितविस्तारां'त आलेल्या किंवा तत्सदृश इतर चरित्रविषयक धार्मिक कथाच. दुसरा बौद्धकवि शिवस्वामी ( ९ वें शतक उत्तरार्ध ) यानें 'अवदानशतक' नांवाच्या बुद्धकथांतून निवडलेल्या कपिण राजाच्या धर्मपरिवर्तनावर वीस सर्गांचें एक महाकाव्य

रचिलें आहे. त्यांचें नांव ' कण्फणाभ्युदय ' असून त्यांत शिवस्वामीनें माघ व भारवि यांचें भरपूर अनुकरण केलें आहे. जैन धर्मातील तीर्थंकर व श्रेष्ठ पुरुष यांच्या चरित्रांवर पौराणिक कथांच्या आधारें रचलेलीं पुढील महाकाव्यें आहेत. पंधरावा तीर्थंकर धर्मनाथ याच्या जीवनचरित्रावरचें भट्टार हरिचंद्राचें एकवीस सर्गांचें 'धर्मशर्माभ्युदय' ( ८ ? वें शतक ), वाग्भटाचें ? नेमिनाथतीर्थंकरावरचें पंधरा सर्गांचें ' नेमिनिर्माण ' ( १२ वें शतक ), पंडित हेमचंद्राचें त्रेसष्ट श्रेष्ठ पुरुषांवरील ' त्रिषष्टिशलाकापुरुषचरित ' ( १२ वें शतक उत्तरार्ध ).

## (३) अर्वाचीन इतिहास.

ज्यांना ऐतिहासिक असें प्रमाणसिद्ध पुराव्यांवरून म्हणतां येईल अशा राजवर्णनांचीं महाकाव्यें अकराव्या शतकापर्यंत उपलब्ध नाहींत. कालिदासानें गुप्तांचा ध्वनित उल्लेख केला असें मानलें तरी कालिदासाच्या काव्यांना ऐतिहासिक काव्यें म्हणणें योग्य होणार नाहीं. बाणानें ' हर्षचरित ' लिहिलें पण तंत्रदृष्ट्या तें महाकाव्य नाहीं. म्हणून अशा प्रयत्नांचा आरंभ मुंजराजाचा दरबारी कवि पद्मगुप्त ( परिमल कालिदास ) यानेंच केला असें मानलें पाहिजे. माळव्यांच्या सिंधुराजाच्या खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक चरित्रावर यानें 'नवसाहसाङ्कचरित' या नांवाचें अठरा सर्गांचें महाकाव्य रचिलें आहे (११ वें शतक). यानंतरचीं पुढील कांहीं काव्यें उल्लेखनीय आहेत. कल्याणचा चालुक्य राजा त्रिभुवनमल्ल (सहावा विक्रमादित्य ) याच्यावर काश्मीरी कवि बिल्हण यानें रचलेलें अठरा सर्गांचें ' विक्रमाङ्कदेवचरित ' ( ११ वें शतक उतरार्ध ), अनहिलवाडचा चालुक्यराजा कुमारपाल याच्या चरित्रावर हेमचंद्रानें लिहिलेलें अड्डावीस सर्गांचें ( वीस सर्ग संस्कृत व आठ प्राकृत ), ' कुमारपालचरित ' ( १२ वें शतक उत्तरार्ध ), कोणी अज्ञात काश्मीरी कवीनें पृथ्वीराज चव्हाण याच्या शौर्यकथांवर लिहिलेलें ' पृथ्वीराज-विजय ' ( १२ व्या शतकाचा शेवट ) व चव्हाणकुलांतील प्रतापी हंमीर यांच्या पराक्रमावर न्यायचंद्रानें रचलेलें १४ सर्गांचें 'हम्मीर महाकाव्य' ( १४ वें शतक. ).

अर्वाचीन ऐतिहासिक राजांवर महाकाव्यें लिहिण्याची पद्धत सर्व प्रांतांतून चालू आहे. महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें तर छत्रपति श्रीशिवाजीमहाराजां-

वर समकालीन परमानंदानें लिहिलेलें 'शिवभारत' व जयरामाचें 'पर्णाल-पर्वतग्रहणाख्यान', राजाराममहाराजांचे चरित्रावर केशवपंडितानें लिहिलेलें 'राजारामचरित' व अहिल्याबाई होळकर या पुण्यचरित राज्ञीवर कै. भागवतशास्त्री यांनीं इ. स. १९३७ मध्यें लिहिलेलें सतरा सर्गांचें 'अहल्याचरितम्' इतकीं उदाहरणें पुरेतशीं होतील.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं आमच्या विदग्ध महाकाव्यरचनेला लागणारी सामग्री ( epic material ) तीन प्रकारची आहे. १ काव्याविषयक (Poetical), २ इतिहासविषयक (Historical) यांत नवा जुना इतिहास आला. व ३ पुराणविषयक ( Legendary ) यांत पुराणें, पौराणिक चरित्रें व कथाहि आल्या. या तीन प्रकारांचे मुख्य प्रतिनिधी म्हणजे अनुक्रमें रामायण, महाभारत व पुराणें होत. त्यांतल्या त्यांत रामायण व महाभारत यांवरच विदग्ध काव्यांचा भर जास्त असल्यानें त्यांच्याच प्रथम विचार करूं. तसें केल्याशिवाय त्यांच्या आश्रयानें तयार केलेल्या विदग्ध महाकाव्यांचें स्वरूप व प्रयोजन नीटसें ध्यानीं येणार नाहीं.

## ( २ ) आर्ष महाकाव्यें.

### आर्ष म्हणजे काय ?

विश्वनाथानें आपल्या साहित्यदर्पणांत रामायण-महाभारतांना महाकाव्य ही संज्ञा प्रथम दिली व त्यांना 'आर्ष' हें अत्यंत उचित विशेषणहि प्रथमच लावलें ( सा. द. ६.३२५ ). ह्या एका समर्पक विशेषणानें त्या महाकाव्यांचें स्वरूप स्पष्ट होऊन त्यांचें पुढील विदग्ध महाकाव्यांशीं असलेलें वेगळेपणहि दिसून आलें. आर्ष म्हणजे ऋषिप्रणीत. ऋषिप्रणीत म्हणजेच अत्यंत प्राचीन, प्रथमचें, पवित्र, स्वयंस्फूर्त व ऋषींच्या द्रष्टेपणानें युक्त. जुन्या कल्पनेप्रमाणें कवि हा ऋषि असावयाचा. येथें ऋषि म्हणजे द्रष्टा ( नानृषिः कविरित्युक्तम् । ऋषिश्च किल दर्शनात् । भट्टतौत ). कवि हा ऋषि म्हणजे स्वयंप्रज्ञ द्रष्टा असतो असें सांगून भट्टतौतानें आपल्या 'काव्यकौतुकां'त त्याचें उदाहरण आदिकवि वाल्मीकि हेंच दिलें आहे.

शिवाय आनंदवर्धनानें 'ध्वन्यालोकां 'त ( उद्योत ३ ), रामायण-महाभारतांना इतिवृत्तप्रधान, कथाश्रय व 'सिद्धरसप्रख्य' ग्रंथ म्हटलें आहे. यावरून आर्ष महाकाव्याचीं पुढील लक्षणें स्पष्ट होतात. आर्ष महाकाव्य हें ऋषिप्रणीत, द्रष्टेपणानें युक्त, प्राचीन, प्रथमचें, स्वयंस्फूर्त व खरा इतिहास सांगणारें असतें. पाश्चात्य टीकाकारहि अशा जुन्या व आधारभूत काव्यांना अशींच अनेक विशेषणें लावीत असतात. तीं येणेंप्रमाणें— Primitive ( आद्य, सहजावस्थेंतील ), Primary (मूळ, आधारभूत), Natural ( निसर्गस्फूर्त ), Authentic ( सत्य, अस्सल, प्रमाणभूत ), Communal ( विशिष्ट जमात, संघ, वंश किंवा जात यांसंबंधींचीं ), Popular ( लोकजीवनस्पर्शी, राष्ट्रीय ), Oral ( लोकसमुदायापुढें प्रत्यक्ष गाऊन दाखवावयाचीं. तोंडपाठ असलेलीं, अक्षरनिविष्ट नसलेलीं ) व Epics of growth ( मजकुराची वारंवार भर पडून तयार झालेलीं ).

## ॲरिस्टॉटलचें आर्षकाव्यलक्षण.

ग्रीक साहित्यशास्त्राचा आद्य प्रणेता ॲरिस्टॉटल् ( ख्रिस्तपूर्व ४०० ) यानें आपल्या Poetics या ग्रंथांत Epic चें (आर्ष महाकाव्याचें) पुढील लक्षण केलें आहे. तेंहि पहाण्याजोगें आहे. तो म्हणतो --

'As to that poetic imitation which is narrative in form and employs a single metre, the piot ought, as in a tragedy, to be constructed on dramatic principles. It should have for its subject a single action, whole and complete, with a beginning, a middle and an end. It will thus resemble a single and coherent organism and produce the pleasure proper to it....Moreover, the thought and the diction must be artistic.'

म्हणजे आर्ष महाकाव्यांत एकाच वृत्तांत लिहिलेलें कथानक असतें. त्याची रचना नाट्यरचनेच्या धर्तीवरच असावी. त्यांत सुसंबद्ध, एकाच मध्यवर्ती घटनेवर आधारलेली, एकसंधी व एकजीव कथा मांडलेली असावी. त्याचप्रमाणें त्यातील प्रमेयाची मांडणी व शैली मोठी कलात्मक असावी. महाकाव्याच्या कथानकरचनेला नाटकाचे नियम लावणें हा

प्रकार ॲरिस्टॉटल्प्रमाणें विश्वनाथानेंहि केला आहे ( सर्वे नाटकसन्धयः ). पण ॲरिस्टॉटल् आर्ष काव्याबद्दल तर विश्वनाथ विदग्ध काव्याबद्दल बोलत आहे हें ध्यानांत घ्यावें. ॲरिस्टॉटल्चें वरील लक्षण केवळ काव्याच्या बाह्यांगाबद्दल ( Form ) असून इतर दृष्टींनींहि पुरेसें समाधानकारक नाहीं.

## ' एपिक् ' म्हणजे काय ?

Epic 'एपिक्' हा शब्द ग्रीक epos म्हणजे वचन, कवन (saying) किंवा देवाचें किंवा सिद्ध पुरुषाचें वाक्य (oracle) यावरून निघाला आहे. यावरून epos याचा अर्थ आर्ष काव्यांना मूळ सामग्री म्हणून उपयोगी पडलेलीं कवनें असा पुढें झाला. होमरच्या पूर्वीचा हेसिअड् (Hesiod) हा असल्या काव्यांचा कर्ता. होमरनें असल्या कवनांतून epopee ची निर्मिति केली. यांत मुख्यतः पुराणें ( mythology ) व दंतकथा ( legends ) असतात. पुराणांतील देवदेवतांची निर्मिति निसर्गशक्तीविषयीं आद्य मानवांनीं बसविलेल्या कल्पनांतून झाली. दन्तकथांत खऱ्याखुऱ्या घडलेल्या ऐतिहासिक प्रसंगाचें अतिशयोक्त वर्णन असतें. या दोन घटकांच्या कल्पक मिश्रणानें जुनीं epics बनलीं आहेत. 'The epics grew out of a poetic theology, glorifying aristocratic History' हें कॉडवेल्चें वर्णनहि (Illusion and Reality, P. 13) याच अर्थाचें आहे. तात्पर्य, कोणत्याहि देशांतील प्राचीन मानवाला निसर्ग व मानवी जीवन यांचा जो पहिला अनुभव आला त्या अनुभवाचें कथात्मक कल्पनारम्य चित्रण म्हणजे तेथील महाकाव्यें ( epics ) असें स्पष्ट होतें. त्यामुळें या काव्यांत एका व्यक्तीच्या मनाचा आविष्कार नसतो. सबंध वंश किंवा जमातच जणों काय आपले विचार-विकार त्यांतून प्रकट करीत असते. (The poet has been the race itself).

## ' विदग्धा'च्या अर्थच्छटा.

कालिदासादि कवींनीं रचलेल्या नव्या काव्यांना आमच्या सर्व साहित्यशास्त्रकारांनीं नुसतीं ' महाकाव्यें ' म्हटलें आहे. याचें कारण ते रामायण-महाभारतांना विशेषतः वेद, इतिहास किंवा स्मृतिग्रंथ– फार झालें तर

काव्यमय इतिहास व स्मृतिग्रंथ– समजत असावे. त्यामुळें त्यांनीं पुढील तदाश्रय काव्यांना नुसतीं 'महाकाव्यें' म्हटलें व त्यांचीं लक्षणें दिलीं. आर्ष महाकाव्यें व पुढील महाकाव्यें यांतील भेद त्यांनीं निराळ्या विशेषणांनीं दाखविला नाहीं. तो भेद लक्षांत घेणें मात्र जरूर आहे. पाश्चात्य टीकाकार नव्या महाकाव्यांना जीं विशेषणें लावतात त्यांवरून हा भेद स्पष्ट होतो. व तसा भेद आपल्याकडेहि असलेला प्रत्यक्ष दिसून येतो. म्हणून तीं विशेषणें येथें सांगतों. त्यांच्यामतें उत्तरकालीन महाकाव्यें Secondary (दुय्यम, परोपजीवी), Artificial (कृत्रिम, मुद्दाम रचलेलीं), Literary (ललित, काव्यकलायुक्त), Court Epics (राजसभेसाठीं रचलेलीं किंवा राजप्रशस्तिपर), Epics of Culture (नवसंस्कृतिप्रधान), Classical (स्थिर, नियमबद्ध, आदर्शदर्शी, अभिजात) व Written (तोंडीं ऐकावयास नव्हे, तर निवडक वाचकांनीं वाचावीं म्हणून मुद्दाम लिहून काढलेलीं) असतात. यांतील सर्व लक्षणें आपल्याकडील नवीन महाकाव्यांना लागतात. हीं सर्व लक्षणें व्यक्त करणारें त्यांतल्यात्यांत समर्पक व सर्वव्यापी 'विदग्ध' हें एकच विशेषण यांना लावतां येईल असें मला वाटतें. सोय व समर्पकता या दोनही दृष्टींनीं तें रूढ करण्यास हरकत नाहीं. 'विदग्ध' शब्दांत चातुर्य, कलात्मकता; पांडित्य, नागरपणा, सांस्कृतिक विकास इत्यादि प्रमुख अर्थच्छटा आहेत.

## त्याचा यौगिक व योगरूढ अर्थ.

'विदग्ध' शब्दाचा यौगिक किंवा धात्वर्थ 'विशेष प्रकारें भाजलेलें' well roasted (वि + दह्–मू. धा. वि.) असा आहे. कच्ची किंवा हिरवी मूळ खाद्य वस्तु प्रथम वाळवून (शुष्क), शिजवून (पक्व) किंवा भाजून Baked or Toasted (दग्ध) मग उपयोगांत आणतात. म्हणजे नैसर्गिक अन्नावर सुधारलेल्या नागर माणसानें कांहीं विशिष्ट संस्कार करून उपयोगिलेलें सुसंस्कृत अन्न असा याचा मूळ अर्थ झाला. सुश्रुतांतहि विदग्ध अन्नाचा उल्लेख आहे. या मूळ धात्वर्थावरून लक्षणेनें विदग्ध याचा योगरूढ अर्थ सुसंस्कृत, चतुर, निपुण, नागर, पंडित असा झाला ('त्रिकाण्डशेष' व 'शब्दरत्नावली' कोश). म्हणजे निसर्गदत्त वस्तूंवर मानवानें केलेल्या बुद्धिपूर्वक संस्कारांनीं येणारी कशाचीहि अवस्था विदग्ध

शब्दानें सूचित होते. 'रसमंजिरी'मध्यें 'विदग्धा' म्हणून नायिकेचा एक प्रकार सांगितला आहे. ती क्रियाचतुर व भाषणचतुरहि असते. म्हणून ठोकळमानानें विदग्ध शब्द 'Literary'साठीं वापरला तर चालेल. 'विदग्ध' शब्दानें सूचित होणाऱ्या चातुर्य, कलात्मकता, नागरपणा इत्यादि गुणांचा पूर्ण अभाव आर्ष काव्यांत होता असें मात्र कोणीं समजूं नये. उत्तरकालीन विकासावस्थेच्या अनुरोधानें हे गुण अधिक प्रमाणांत विदग्ध काव्यांत आले येवढाच याचा अर्थ मानावा.

## आमचे 'सूत' व शाहीर.

जुन्या व नव्या महाकाव्यांना अनुक्रमें 'आर्ष' व 'विदग्ध' या संज्ञा देणें कसें योग्य आहे हें येथवर दाखविलें. आतां पाश्चात्य टीकाकारांनीं या दोनहि काव्यांना लावलेलीं विशेषणेंहि आपल्या काव्यांना कशीं लागू पडतात तें पाहूं. रामायण-महाभारतांपूर्वी वेदकालापासून आपल्याकडे असणाऱ्या देव, राजे व ऋषि-मुनी यांच्या कथा त्या त्या काळीं बहुधा तोंडपाठ केल्या जात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्या मुखानें संक्रमित होत होत्या. या कथांना इतिहास, पुराणें, आख्यानें, उपाख्यानें, गाथा, वाकोवाक्य, नाराशंसी इत्यादि नांवें होतीं. 'एका राजाच्या कृत्याच्या निमित्तानें पूर्वी घडून आलेल्या हकीगती सांगणें' याचें नांव इतिहास ( प्राग्वृत्तकथनं चैकराजकृत्यमिषादितः । यस्मिन् स इतिहासः स्यात्पुरावृतः स एव हि ।), सर्ग म्हणजे जगाची उत्पत्ति, प्रतिसर्ग म्हणजे जगाच्या संहारानंतरची उत्पत्ति, वंश म्हणजे देवांची वंशावळ, मन्वन्तरें म्हणजे मनूचीं युगें व वंशानुचरित म्हणजे राजे लोकांची वंशावळ या पांच गोष्टी ज्यांत सांगितलेल्या असतात तीं पुराणें ( शुक्रनीति ४-३-५१-५२ ). विष्णुपुराणाच्या टीकेंत श्रीधरस्वामी पुढील व्याख्या देतात. 'स्वतां पाहिलेल्या गोष्टींचें कथन तें आख्यान, दुसऱ्याकडून ऐकलेल्या गोष्टी सांगणें तें उपाख्यान, पितर, पृथ्वी इत्यादिकांनीं गाइलेल्या ( फार मागच्या पिढ्यांतून रूढ असलेल्या ) त्या गाथा. मानवांच्या स्तुतिपर कथा त्या नाराशंसी. वरील लक्षणांवरून हा मजकूर तोंडी व गाइलेला होता हें उघड आहे. शिवाय या कथारूप मजकुराचें कथन, वर्णन वा गायन करणारा एक स्वतंत्र वर्ग होता. त्या वर्गाला 'सूत' म्हणत. जुन्या कथांचा संग्रह करून ते त्या

जिवंत ठेवीत. देव, ऋषि व मोठाले राजे यांच्या वंशांचें व महात्म्यांच्यां स्तुतींचें धारण करणें हें सूतांचें कर्तव्य. ( धर्म एष हि सूतस्य सद्भिर्दृष्टः सनातनः । देवतानां ऋषीणां च राज्ञा चामिततेजसाम् । वंशानां धारणं कार्यं स्तुतीनां च महात्मनाम् । पद्मपुराण. १-१-२८ ). जे पुराणांतलि फार प्राचीन काळच्या राजाच्या कथा सांगतात ( उच्चरन्ति ) ते सूत. थोड्या वर्षांपूर्वी दिवंगत झालेल्या शूर राजांचें वर्णन ( प्रेतलोकगतान् शूरान् वर्णयन्ति ) करणारे ते मागध, व विद्यमान लढवय्यांचीं प्रबंध रचून वर्णनें करणारे ते बंदी. ( वर्तमानान् संग्रामकारिणः वर्णयन्ति प्रबंधैः ) अशा व्याख्या जैमिनीअश्वमेधपर्वांत ( अ. ५५ ) दिल्या आहेत. यावरून ज्यांना आपण शाहीर किंवा bards म्हणतो त्यांची परंपरा जुनी असून तिचें काम शूर व पराक्रमी लढवय्यांच्या कथा गाणें हें होतें.

## पुराणांची पडलेली भर.

या जुन्या सामग्रीच्या एकत्रीकरणानेंच मोठाले इतिहास व पुराणें हीं तयार करण्यांत आलीं. त्यांतल्या त्यांत पुराणें हीं प्राचीन. पुराणांत फार जुन्या परंपरा जपून ठेवलेल्या होत्या. पूर्वपरंपरा सांगणारीं तीं पुराणें ( पुरापरम्परां वक्ति पराणं तेन वै स्मृतम् (वायु.१.२.५३). या पुराणांचा उल्लेख वेद, ब्राह्मणें, सूत्रग्रंथ व स्मृति यांमध्यें सांपडत असल्यानें तीं अत्यंन्त प्राचीन आहेत ( पहा अथर्ववेद. ११.७.२४, शतपथ व गोपथ ब्राह्मण, छांदोग्य व बृहदारण्यक उपनिषद्, आपस्तम्बधर्मसूत्र व गौतम, याज्ञवल्क्य इत्यादि ). पूर्वीच्या सामग्रीनें म्हणजे आख्यानें, उपाख्यानें, गाथा वगैरेनीं पुराणें रचण्यात आलीं ( आख्यानैश्चाप्युपाख्यानैर्गाथाभिः कल्पशुद्धिभिः । पुराणसंहितां चक्रे पुराणार्थविशारदः । विष्णुपुराण ). पुराणविरचना भारतकर्ता व्यास यानेंच केल्याचें सांगितलें आहे. पुराणांतून देवांच्या व राजांच्या कथा आहेत ( वंश व वंशानुचरित ) त्याचप्रमाणें धार्मिक भागहि आहे. पैकीं पूर्वीचा कथाभाग हा जुन्या शाहिरांच्या हातचा असून पुढचा धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक भाग त्यांस ब्राह्मणांनीं जोडला असावा असें पार्जिटर म्हणतो. पण तें खरें दिसत नाहीं.

## आर्षकाव्यांची सामग्री.

व्यासांनीं आपल्या भारतरचनेंत पुराणांचा उपयोग केला आहे असें

त्यांतील अनेक उपाख्यानांवरून स्पष्ट दिसतें. शिवाय मत्स्यपुराणकाराचाहि तोच समज दिसतो. ( अष्टादशपुराणानि कृत्वा सात्यवतीसुतः। भारताख्यानमखिलं चक्रे तदुपबृंहितम् । मत्स्य ५३.७० ). रामायणांतहि प्रसंगोपात्त अनेक जुन्या पौराणिक कथांचा उल्लेख व कथनहि आहे. उदाहरणार्थ– सावित्री, श्येनकपोत, उर्वशीपुरूरवा, रेणुका, इंद्र-वृत्र, वामन, ययाति इत्यादिकांच्या कथा त्यांत आहेत. महाभारतांत पूर्ववीरांच्या पराक्रमांचा उल्लेख स्पष्ट आहे ( म. आदि. १-२२०-२२५ ). रामायण हें वाल्मीकिनें लवकुशांकडून अश्वमेधयज्ञांत लोकांसमोर प्रत्यक्ष गावविलें हें रामायणांतच सांगितलें आहे. (बाल. ४ व उत्तरकाण्ड सर्ग ९३ ). शिवाय रामायण-महाभारतांत नट व नर्तक यांबरोबर गायकांचा (गायन ) उल्लेख येतो. ते 'गायक' म्हणजे थोर राजांचीं चरित्रें लोकांसमोर गाणारेच असावेत ( बाल. १८.१८ व वनपर्व १५.१४ ). प्रथम व्यासांनीं शुकास, नंतर व्यासांचे सांगण्यावरून वैशंपायनानें जनमेजय राजास व शेवटीं सौतीनें ऋषींस महाभारतकथा तोंडीच सांगितलेली आहे. याच अनुरोधानें महाभारताचीं 'जय', 'भारत' व 'महाभारत' अशीं तीन संस्करणें झालीं व रामायणांतहि नवीन भाग घातला गेला. यावरून हीं महाकाव्यें पुढील मजकुरानें वाढलेलीं आहेत हें स्पष्ट होतें. म्हणून होमरच्या काव्यांप्रमाणें आमचीं काव्यंहि epics of growth व oral epics च आहेत. यावरून हें स्पष्ट होतें कीं सदर पुराणें, आख्यानें, उपाख्यानें आणि सूत, मागध व बंदी यांनीं गाइलेल्या वीरकथा हा सारा मजकूर आमच्या आर्ष काव्यांची सामग्री ( epic material ) आहे. होमरच्या ईलियड्ला शाहिरी कवनांचा, बेओउल्फ् ( Beowolf ) या अँग्लो-सॅक्सन् काव्याला पुराणांचा व इतर आर्ष काव्यांना जुन्या ऐतिहासिक कथांचा असाच उपयोग झाला आहे.

## आर्ष काव्यांचा एकसूत्रीपणा.

पण रामायण-महाभारत हीं काव्यें म्हणजे नुसत्या पुराणांचा, इतिहासांचा व दीर्घ कथांचा संग्रह नव्हे. महाभारत-रामायणांत पांडव, कृष्ण व राम या खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक थोर वीरांचा इतिहास हा मध्यवर्ती विषय आहे. ही कल्पित कथा नाहीं कीं एखादें रूपकहि (Allegory) नाहीं. नुसती

प्रदीर्घ कथाहि (Long narrative poem) ती नव्हे. नुसतें रूक्ष इतिहासकथनहि त्यांना म्हणतां येत नाहीं. आर्यवंशाच्या पराक्रमवर्णनाला वाहिलेलीं अशीं तीं ऐतिहासिक, सुसंबद्ध व हेतुयुक्त महाकाव्यें आहेत. आर्यवंशाचे विशेष, नीति व धर्म यांचें परिपालन, सद्गुणांचीं भव्य प्रतिकें (symbols) व धर्मार्थकाममोक्ष हीं मानवी जीवनाचीं अंतिम ध्येयें नजरेसमोर धरून केलेलें आर्यांच्या पराक्रमाचें काव्यमय व भव्य वर्णन त्यांत आहे. यांत मानव हा मध्यवर्ती असून त्या मानवाचें महिमान वाढवून दाखविण्यासाठींच त्यांत देवदानवादि अतिमानुषशक्तींचीं पात्रें योजण्यांत आलीं आहेत. कारण अतिमानुष शक्तींवर त्या काळच्या लोकांचा विश्वास होता. त्यांतील कथा अशा हेतूनें (epic intention) सांगण्यांत आल्या आहेत कीं एकेक विशिष्ट कथा किंवा विशिष्ट प्रसंग सर्वसामान्य मानवीजीवनाचा गंभीर अर्थ वाचकाला न कळत उकलून दाखवील. इतकी सहेतुकता, इतका सुसंबद्धपणा व येवढी भव्यता होमरच्या काव्यांत खास नाहीं. रामायण-भारतांतील शैथिल्य, पुनरुक्ति, बेढबपणा त्यांत वरचेवर पढलेल्या भरीमुळें आलेला आहे. शिवाय हीं काव्यें सर्वसामान्य जनसमुदायासमोर म्हणण्यासाठीं रचलेलीं असल्यानें (oral epics) त्यांत उत्तरकालीन मुद्दाम लिहून काढलेल्या (written epics) आणि थोड्या निवडक लोकांसाठीं कसून तयार केलेल्या काव्यांचा रेखीवपणा, बारकावा (nicety) व जिल्हई हे गुण नसावे हें अपेक्षितच आहे.

## वीरयुगाचे विशेष.

येवढी गोष्ट मात्र खरी कीं ज्या युगाला वीरयुग म्हणजे heroic age म्हणतात त्या युगांतील कांहीं विशेष या काव्यांत आहेत. त्यामुळें पुढील काळच्या विकसित संस्कृतीच्या मानानें तीं थोडीं कमी प्रतीचीं व मानवाच्या सहजावस्थेंतील (primitive) वाटतात. ग्रीकांच्या ईलियड व ओडेसी या महाकाव्यांचा रचनाकाल ख्रिस्तपूर्व १००० हा असून आमच्या रामायण-महाभारतांचा काळ ख्रिस्तपूर्व ३००० वर्षें असा मानला जातो. आधुनिकांच्या मतें तो इ. पूर्व १५०० आहे. इतक्या प्राचीन मानवाचे व्यवहार थोडे जुने व निसर्गप्रेरित असले तर नवल नाहीं. मात्र वीरयुग म्हणजे रानटीपणाचें युग खास नव्हे. त्याचीहि एक

संस्कृति होती. यांत विशिष्ट वीरांचा वैयक्तिक पराक्रम, त्यांची अचाट शक्ति, त्यांची जयश्री किंवा त्यांचें धारातीर्थी पतन व स्वर्गगमन याला विशेष महत्त्व होतें. आपण असामान्य वीर, असामान्य योद्धे व अभूतपूर्व साहसी ठरावें, कीर्तीचें शिखर गाठावें व आपल्यामागें आपल्या वीर-कीर्तीची ज्योत युगानुयुगें तेवत ठेवावी हें वैयक्तिक ध्येय त्या वेळीं वीरांच्या पुढें होतें. रामायणांत पराक्रमाबरोबर असामान्य वैयक्तिक त्यागाचें निदर्शनहि आहे. यांत त्या वेळच्या धर्मकल्पना, नीति, वंशधर्म व कुलधर्म यांच्याहि मर्यादा सांभाळल्या जात होत्या हें खरें. तथापि अखेरीस व्यक्तिगत असामान्यपणाचा मोठा उमदा व जोरदार आविष्कारच त्या युगांत प्रधान होता. त्यामुळें युद्धें, विशेषतः द्वंद्वयुद्धें, व साहसें यांना महत्त्व असे. शौर्य हाच सद्गुण व दौर्बल्य हाच दुर्गुण ठरे. तात्पर्य, त्या वेळीं राष्ट्र, धर्म, देव, साम्राज्य अशा व्यापक गोष्टींपेक्षां वैयक्तिक पराक्रमावर लोकांची नजर जास्त खिळलेली होती. या वीर युगाचे कांहीं विशेष रामायण महाभारतांत आहेत. रामायणांत प्रथम अयोध्येची राज्यक्रांति व त्याला जोडून आर्यांचा दक्षिणदिग्विजय वर्णिला आहे. महाभारतांत प्रथम पांडवकथा, नंतर कृष्ण-संप्रदाय व मग वैदिक आचार व तत्त्वज्ञान यांची भर यांचा एक रांधा आहे. ह्या दोन महाकाव्यांचें हें एकीकरण बराच काल बनत राहिल्यानें त्यांत अमुक एक गोष्ट आहे आणि अमुक एक नाहीं हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. तथापि विदग्ध महाकाव्यांच्या कालाहून या कालाची प्राचीनता, प्राथम्य (Primary) व त्यांचें वेगळेपण ठोकळ मानानें ध्यानांत येण्यासाठींच हें विवेचन आहे असें समजावें. वरील विवेचनावरून हीं काव्यें Primitive, Primary, Authentic, Oral, व Popular कशीं होतीं हें ध्यानांत येण्यासारखें आहे. आतां त्या वेळच्या लोकस्थितीविषयीं थोडें सांगतों.

## प्राचीन मानव.

प्राचीन मानव अद्याप अस्थिर होता. तो आपल्या वसाहतीसाठीं नवे प्रदेश शोधीत होता. ते शोधून त्याचा ताबा घेण्यास त्याला मोठाले प्रवास व तद्देशीयांशीं घनघोर संग्राम करावे लागत होते. कधीं कधीं एकाच देशांत आलेल्या दोन जमातींत किंवा कुलात अन्तःसंग्राम पेट घेत होते. निसर्गावर त्याचा संपूर्ण ताबा बसला नसल्यानें बाह्य साधनांची उत्तर-

कालांतल्यासारखी विपुलता त्यापाशीं नव्हती. त्या समाजाला अद्याप निसर्गाचा अर्थ नीट न लागल्यामुळें तो निसर्गशक्तींना आपल्या कल्पनेच्या जोरावर देवदानव मानीत होता. निदान मानवी व्यवहारांत दैवी शक्तीचा प्रत्यक्ष हात असतो यावर त्याची श्रद्धा होती. त्यामुळें अघटित चमत्कार व मानवाशीं पशुपक्ष्यांचेंहि सहकार्य त्याला अनैसर्गिक वाटत नसे. त्या वेळचें मानवी मन साधें, मोकळें, प्रामाणिक व निसर्गप्रेरित होतें. मनांत क्रोध आला कीं मारामारीला उठावयाचें, चूक दिसली कीं सरळ क्षमा मागावयाची आणि स्त्री-पुरुषांना एकमेकांबद्दल कामविकार उत्पन्न झाला तर तो उघड बोलून दाखवावयाचा ! म्हणजे त्यांचें हृदय त्यांच्या ओठांवर होतें म्हणावयास हरकत नाहीं. धर्मानें अमुक करावें असें सांगितलें कीं तें करावयाचें असा त्यांचा साधा व सरळ बाणा होता. त्यांच्या मनाप्रमाणं त्यांची भाषाहि साधी व सरळ होती. याचा अर्थ ते अगदीं अविनसुधारलेले रानटी लोक होते असें मुळींच समजूं नये. त्यांचीहि एक उच्च संस्कृति बनली होती. पण तें युग पराक्रमाचें, शौर्याचें, झटापटीचें, अद्भुताचें, साहसाचें, कुतूहलाचें व महत्त्वाकांक्षेचें होतें.

## तत्कालीन संघजीवन.

त्या काळीं माणसाचा निसर्गाशीं समोरासमोर सामना चालू होता. त्या सामन्यात ते हिरिरीनें लढून विजयाचा रोमांचकारी आनंद मदमुराद लुटीत किंवा अपयश आलें तर ' बलवती खलु नियतिः ' असें म्हणून तितक्याच समाधानानें मरणास व हालअपेष्टांसहि तयार असत. त्या वेळचें जीवन हें एका वंशाच्या, जमातीच्या किंवा कुलाच्या अभिनिवेशानें प्रेरित होतें. त्यामुळें त्यांच्या हालचालींत वांशिक, सांघिक किंवा सामुदायिक एकजिनसीपणा (Racial homogeneity) असे. जीवनात व्यक्तीपेक्षां गटाला, व्यष्टीपेक्षा समष्टीला व फुटीपणापेक्षां संघवृत्तीला प्राधान्य असे. त्यामुळें त्यांचे हर्षामर्ष सुखदुःखें, जयापजय व लाभालाभ सामुदायिक असत. त्यांच्या भावना व भावनाविष्कारहि वैयक्तिक नसून सामुदायिक होता. त्या काळच्या समाजातला एक मनुष्य म्हणजे समाजाची छोटी प्रतिमा होती. त्या वेळचे नायक व वीर या संघशक्तींतून निर्माण झालेले होते. त्यामुळें

पराक्रमी वीरांचे पोवाडे सबंध जमात, वंश किंवा राष्ट्र संपूर्ण तन्मयतेनें गात होते.

**संघकाव्य म्हणजे काय ?**

त्यामुळें त्या वेळचे शाहीर कवनें करीत असें म्हणण्यापेक्षां सांघिक जीवन त्यांच्या मुखानें गाऊं लागे असेंच मानणें जास्त सयुक्तिक होईल. त्या वेळच्या कवींना काव्यविषय मुद्दाम शोधून काढण्यासाठीं डोकें खाजवीत बसण्याची जरूरी नव्हती. जीवनसंग्राम त्यांच्या दारावर ठोठावीत उभा होता. त्यांत प्रकट होणारे त्याचे वंशगुण (Racial traits), त्यांचें कुल-वैभव, त्यांच्या देवदेवता, त्यांचे धार्मिक व लौकिक उत्सव, खेळ व करमणुकी, त्यांच्या उमद्या आकांक्षा, त्यांचीं आक्रमणें आणि आक्रन्दनें, त्यांचीं साहसें आणि भयें, त्याचे वादविवाद आणि कलह, त्यांचीं पुण्यें आणि पापें, त्याचे भोग आणि त्याग इत्यादि प्रकार कविमुखानें प्रकट होण्यास जणूं उतावीळ होऊन राहिले होते; व कवींना ढोसणी लावून त्यांजकडून काव्य वदवीत होते. मात्र याचा अर्थ त्या वेळच्या कवींना काहींच करावें लागत नव्हतें असें नव्हे. ठिकठिकाणच्या जुन्या शाहिरांचीं कवनें, पोवाडे, आख्यानें व कथा यांचीं जुडगीं लोकापुढें ठेविलीं किंवा कवीनें स्वतः ऐकिलेलीं किंवा पाहिलेलीं हकीकत जशीच्या तशी सांगितली कीं झालीं आर्ष काव्यें अशी समजूत करून घेणें योग्य होणार नाहीं. त्या वेळचीं काव्यें लोककाव्यें होतीं याचा अर्थ यच्चयावत् लोक तीं लिहीत होते किंवा संघ लिहीत होते असा नव्हे. एखादा कवीच तीं काव्यें लिही. फार झालें तर एका मध्यवर्ती घटनेच्या खुलावटीसाठीं इतर आख्यानें व उपाख्यानें याचा योग्य स्थलीं समावेश करी. पण तो सारा मजकूर अखेरीस एकाच कवीच्या रचनाकुशल व प्रतिभासंपन्न मनाच्या मुशींतून एकसंधी होऊनच बाहेर पडे. म्हणजे तें काव्य अखेर वैयक्तिक किंवा व्यक्तिगत प्रतिभेचीच निर्मिति असे. फार झालें तर ती व्यक्तिगत प्रतिभा प्रथम लोकजीवन आत्मसात् करून घेऊन मगच प्रकट होई येवढेंच म्हणता येईल.

**आर्ष काव्यांचीं पुनरावर्तनें.**

आर्ष महाकाव्याचा आणखी एक महत्त्वाचा विशेष असा आहे कीं त्यांत काहीं गोष्टी पहिल्याप्रथमच आल्या आणि अखेरच्या ठरल्या. प्राचीन

ग्रीक पुराणांतील ट्रॉयच्या युद्धांतील विलक्षण प्रसंग अनेक नव्या व जुन्या कवींचे चिरंतन विषय होऊन बसले. या पुनरावृत्त होणाऱ्या, अनेक कवींकडून पुन्हां पुन्हा गाइल्या जाणाऱ्या आणि पुढील युगांचा आनंद पुनर्भेटीनें दुणावणाऱ्या कथाना ट्रोजन कथामंडळ ( Trojan Cycle ) म्हणतात. ग्रेट ब्रिटन व आयर्लंड याच्या जुन्या कथांत अर्थर नांवाच्या शूर, साहसी व उदार सम्राटाच्या कथाचेंहि असेंच एक आर्थरियन कथामंडळ ( Arthurian Cycle ) बनलें आहे. फ्रान्समधील ख्रिश्चन धर्माचा पुरस्कर्ता व कैवारी राजा शार्लमन ( Charlemagne ) हाहि अशाच कथांचा विषय आहे: आपल्याकडील रामायण-महाभारतांतील कथांची लोकप्रियता व त्याची भारतीय वाङ्मयांत झालेली व होत असलेली पुनरावृत्ति तर प्रसिद्धच आहे. महाकाव्याचा प्रत्येक देशातील इतिहास तपासला असता असें दिसतें कीं तेथें जुन्या काळीं निर्माण झालेलीं एकदोनच आद्य काव्यें शेवटचीं ठरलीं आहेत. याचा अर्थ पुढें महाकाव्यें झालींच नाहींत असा नव्हे. पुढील नव्या काव्यांना या पहिल्या जुन्या काव्याचें चर्वितचर्वण, पुनरुक्ति, आधार, उल्लेख, अनुकरण असें काहीं केल्याशिवाय गत्यंतरच राहिलें नाहीं असा त्याचा अर्थ आहे. हें असें का व्हावें हा प्रश्न निःसंशय विचारणीय आहे. आपल्या प्रत्यक्ष पूर्वजाबद्दल किंवा वाङ्मयीन पूर्वजाबद्दल वंशजांना नितान्त आदर असतो. पूर्वपरंपराप्रेम, पूर्वाचार्यांबद्दल श्रद्धा, वाडवडिलाबद्दल भक्तिभाव ह्या गोष्टी जुन्या काव्याच्या या सार्वत्रिक आदराला कांहीं अंशीं कारण आहेत हें खरेंच, पण याच गोष्टी सर्वांशीं कारण आहेत असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

## प्रतिभावंतांचे पहिले अनुभव.

आर्ष महाकाव्याच्या प्राचीन व प्रतिभावंत पूर्वजांना जीवनसंग्रामाचा अनुभव प्रथमच अगदीं समोरासमोर आला. निसर्ग आणि मानव याच्या झगड्यात दोघाच्या बलाबलाचें तारतम्य त्यांना प्रथमच उमगलें. निसर्ग व मानव, मानव व मानव आणि नियति व मानव यांच्यामधील पहिल्या पहिल्या सलोख्याचीं व झटापटींचीं दृश्यें त्याच्या प्रतिभाचक्षूपुढें ताजीं होतीं. चंद्रम्याची पाहिली शीतळाई, सागराचा अथाग विस्तार, असंख्य तारानक्षत्रांनीं उजळलेला अंतरिक्षाचा घुमट, हिंस्र श्वापदांच्या गर्जनांनीं

आणि कड्यांतरून कोसणाऱ्या प्रपातानीं दणाणून गेलेलीं भयंकर अरण्यें, फुलाचा सुगंध, फळांचा स्वाद, मातेची पाखर, प्रियेचें अलिंगन, पुत्राच्या अंगाचा पहिला स्पर्श, मित्राचा स्नेहाळ हात व शत्रूच्या गदेचा प्रहार, मानवी स्नेह व निसर्गाचे संहार, नियतीचे आकस्मिक प्रसाद आणि प्रकोप इत्यादि गोष्टींच्या पहिल्या अनुभवामुळें त्यांच्या अंतःकरणांत उठलेले भावनाकल्लोळ परम उत्कट व अपूर्व होते. व या अपूर्व अनुभवावरून त्यांनीं काढलेलीं मानवी जीवनाविषयींचीं अनुमानें व कयासहि पहिलेच होते. व ते शेवटचेहि ठरले.

## इतिहासाची पुनरावृत्ति.

मानवी मनाच्या रचनेचें एकरूपत्व लक्षांत घेता प्राचीन काळीं बाह्य जगाशीं संनिकर्ष पावलेल्या पूर्वजांच्या मनाच्या क्रिया-प्रतिक्रिया प्रायः सार्वकालिकच होत्या असें म्हणणें योग्य होईल. विशेषतः मानवी विकार ही वस्तू प्रायः चिरंतर व अविकार्य आहे. कांहीं विचारहि असेच आहेत. त्यामुळें प्राचीन जगाच्या क्षोभक व उत्कट अनुभवामुळें प्राचीन कवींच्या आणि विचारवंतांच्या भावनात्मक प्रतिक्रियांना व कांहीं विचारांनाहि कायमपणा किंवा अंतिमत्व ( finality ) यावें यात कांहींच आश्चर्य नाहीं. भीमाची सूडाची भावना, द्रौपदीचा मानीपणा, रावणाची परस्त्रीलोलुप वृत्ति, कीचकाचा उन्मत्तपणा, सीता-सावित्रींची पतिभक्ति, दुर्योधन दुःशासनाचा दीर्घद्वेष व युधिष्ठिराची सामोपचारी वृत्ति, भीमाची व बेओऊल्फ् ( Beowolf ) यांची साहसप्रियता, हरिश्चंद्र व जॉब यांची सत्त्वधीरता, राम व युलिसीस यांची धीरवृत्ति, उत्तराचा भित्रेपणा, शकुनीची कपटी वृत्ति इत्यादि मनोविकार इतके उत्कटपणें रंगविले गेले आहेत कीं या बाबतींत आतां पुढें नवें कांहीं शिल्लक उरलें आहे असें वाटत नाहीं. वरीलसारख्या पात्रांच्या अनुभवांच्या पडछाया व प्रतिध्वनि आपल्याला आपल्या परिस्थितींत येणाऱ्या भावनात्मक अनुभवांत पहावयाचे व ' आम्हांलाहि असेंच वाटतें ' असें म्हणावयाचें यापेक्षां जास्त कामगिरी पुढील युगांकडे राहिली नाहीं. कारण मानवी मन सर्वकाळीं प्रायः एकरूप असल्यानें मानवी कृत्येंहि तशींच घडतात व सुखदुःखाचे तेच अनुभव येतात. यालाच इतिहासाची पुनरावृत्ति असें म्हणतात.

## कांहीं अंतिम विचार.

प्राचीन कवींचे मानवी जीवनविषयक कांहीं विचारहि असेच त्रिकालाबाधित व सिद्धान्तरूप आहेत. पाडवांसारखे एवढे दिग्गज पराक्रमी पिते व श्रीकृष्णासारखा पाठीराखा असतांना अभिमन्यूसारख्या कोंवळ्या वीराचा वध व्हावा, सीतेसारख्या महापतिव्रतेला जीवनात हालअपेष्टा व अपमान भोगावा लागावा, रुस्तुमच्या शस्त्रालाच त्याचा प्रिय पुत्र सोराब याचा बळी पडावा, विश्वामित्रासारख्या पवित्र पुरुषाला दुष्काळामुळें चाडाळाच्या घरची कुत्र्याची तंगडी पोटासाठीं चोरावी लागावी, पराक्रमी राजे पाडव व रामलक्ष्मण यांना भणंगासारखें रानावनांत भटकावें लागावें, यावरून नियतीपुढें दुर्बल मानवाचे प्रयत्न किती फोल आहेत हा सिद्धान्त कायम होतो. हेलन, द्रौपदी व सीता या परस्त्रियांवद्दल दुर्वासना धरल्यामुळें पॅरिस, कौरव व रावण याचा सकुल व समूळ नाश झाला यावरून परनारीधर्षणाचे घोर परिणाम किती अटळ आहेत हाहि धडा सार्वकालिक होतो. चौदा वर्षांचा घोर वनवास संपवून व अनेक प्राणघातक आपत्तींना तोंड देऊन अखेरीस राम परत आले व ते आतां आपल्यास भेटणार ही शुभवार्ता मारुतीकडून ऐकून भरत त्याला म्हणाला, ' मनुष्य जिवंत राहिल्यास, शंभर वर्षांनीं कां होईना, त्याला आनंद प्राप्त होतो असा लोकानुभव कल्याणप्रद आहे. ( कल्याणी बत गाथेयं लौकिकी प्रतिभाति मे। एति जीवन्तमानन्दो नरं वर्षशतैरपि। रामायण युद्ध. १२६.२ ) हें वाल्मीकीचें जीवनविषयक आशावादी वचन व भारतीय युद्धाच्या निराशाजनक घटनानंतर ' मानवी जीवनांतील सर्व संचय क्षय पावतात, सर्व चढीचा परिणाम पडतीत होतो, संयोगाचे शेवटीं ताटातूट ठेवलेलीच आणि जीवितांचा अन्त मृत्यूंत होतो. ' ( सर्वे क्षयान्ता निचयाः पतनान्ताः समुच्छ्रयाः। संयोगा विप्रयोगान्ता मरणान्तं च जीवितम्। महा. १२।२७। ३१ ) असा व्यासाचा निराशावादी व भयंकर धडकी भरविणारा उद्गार हे दोनीहि परस्परविरोधी विचार सार्वकालिक व अखेरचेच आहेत.

### पहिली झेप अखेरची ठरली !

' या नाशवंत व नानानामरूपात्मक जगाच्या पसाऱ्याच्या पलीकडे काहीं एक अमर व एकलें तत्त्वच आपल्या स्वधेनें वायूशिवाय श्वसन

करीत स्फुरत राहिलेलें आहे' (आनीदवातं स्वधया तदेकं । ऋ.१०.१२९.२) या तत्त्वज्ञान-विचारावर एका ऋग्वेदकालीन ऋषीच्या प्रतिभेची झेप प्रथमच पडली व कायमची ठरली. त्याप्रमाणें आर्ष काव्यांच्या निर्मात्या कवींनीं कांहीं विकार-विचाराना शेलक्या प्रसंगानिशीं घातलेली कवः पहिली व शेवटची ठरली. त्याचप्रमाणें आर्ष काव्यांत त्या त्या राष्ट्राच्या स्थिरावलेल्या संस्कृतीचा पाया घातलेला आहे. वांशिक विशेषांची पूर्णता आहे, आर्यांचा संयम आणि साहस, त्यांचें धैर्य व भीरुता, त्याचा सात्त्विकपणा व दुष्टता, त्यांचा त्याग व भोग, त्याचें विशालत्व व संकुचितपणा, त्यांचें औदार्य व कंजूषवृत्ति, इत्यादि गुण व दोष कोणत्या थराला जातात त्याचेंहि वर्णन महाभारत-रामायणांत आहे. तापणाऱ्या व गोठणाऱ्या पाण्याचें कमाल तपमान व कमाल शीततामान जसें ठराविक मर्यादेपलीकडे जात नाहीं, तशीच भारतीय आर्यांच्या गुणदोषांची उच्चनीचता भारतापलीकडे सहसा जाणार नाहीं. म्हणून महाभारत-रामायणानंतर तिसरें आर्ष महाकाव्य झालें नाहीं. व त्यांतील कथांची पुनरुक्ति करण्यापलीकडे अखिलभारतीय वाङ्मयाला त्या बाबतींत कांहींच जास्त करतां आलें नाहीं. त्यामुळें भारतीय आर्यांच्या जीवनामध्यें भारत-रामायण हीं काव्यें मिनून राहिलीं आहेत. आम्ही त्यांतील कथा वाचतों व तसें आचरण्याचा यत्न करतों. महाभारत-रामायणातल्या थोर स्त्रीपुरुषांचीं नांवेंसुद्धां आम्ही आज आनंदानें मिरवीत आहोंत. रामायण-महाभारताचीं नावें उच्चारतांच आमचीं पांगलेलीं भारतीय मनें लोहचुंबकाला चिकटणाऱ्या लोहकणांप्रमाणें एकत्र होतात. हीं राष्ट्रीय काव्यें प्रथम आलीं व शेवटचीं ठरून आमच्यांत मुरून राहिलीं. आमचीं मनें त्यांचीं झालीं. पुढें आम्हीं काव्यें लिहिलीं, पण त्यांच्या मागोवा घेत; तत्त्वज्ञान सांगितलें पण त्याच्या आधारानें; आणि वीरकृत्येंहि केलीं पण त्यांच्याच प्रेरणेनें. सारांश, आमचा आचार-उच्चार-विचार त्यांच्या वळणावर गेला आहे.

## पुढील कालांतील त्यांचे पडसाद.

वरील विवेचनावरून हें ध्यानीं येईल कीं केवळ प्राचीनता हेंच आर्ष महाकाव्यांच्या लोकप्रियतेचें कारण नाहीं. त्यांत मानवी विकार-विचाराचा भरघोस व त्रिकालाबाधित आविष्कार आहे. भारतीय आर्यवंशाच्या

झाडून साऱ्या विशेषांचें एकत्रीकरण आणि त्याच्या प्रभावाचा परमोच्च बिंदु त्यांत आहे. तीं काव्यें त्या वेळ-या संस्कृतीचे साठे व त्या वेळच्या ज्ञेय जगताचे विश्वकोश (Eucyclopædia) आहेत. म्हणूनच रामायणा-बद्दल खुद्द प्रजापतीनें अशी ग्वाही दिली आहे कीं, " जोंपर्यंत पर्वत स्थिर राहतील व जोंपर्यंत नद्या वाहत राहतील तोंपर्यंत ही रामायणकथा या पृथ्वीतलावर टिकून राहील. " ( यावत्स्थास्यन्ति गिरयः सरितश्च महीतले । तावद् रामायणकथा लोकेषु प्रचरिष्यति ( बाल. २.३६ ).

महाभारताबद्दलहि असेच यथार्थ उद्गार आहेत. ' या श्रेष्ठ इतिहासामुळें पुढील कवींना अखंड प्रेरणा मिळेल. ज्याप्रमाणें पर्जन्य हा प्राणिमात्राचा आधार तसें महाभारत पुढील कविश्रेष्ठाचा आधार होऊन राहील. भारतवृक्ष हा अक्षय आहे ! ( इतिहासोत्तमादस्मात् जायन्ते कविबुद्धयः । सर्वेषा कविमुख्यानामुपजीव्यो भविष्यति । पर्जन्य इव भूतानामक्षयो भारतद्रुमः । आदि २.३८५ ). तसेंच ' शहानामा ' या पार्शियन् महाकाव्याचा कवि फिर्दौसी म्हणतो कीं ' माझें काव्य कालसागराच्या लाटानींहि नाश पावणार नाहीं. भावी पिढ्या माझें काव्य सर्वदा पठन करतील ' ! आमच्या आर्ष काव्यांबद्दलचे वरील उद्गार अक्षरशः खरे ठरले आहेत. या दोन तेजस्वी नेत्रांमधून भारतवर्ष आज पांच सहस्र वर्षें जीवनाकडे पहात आहे. याच पर्जन्याच्या ओलाव्यावर तें पोसलें आहे. आणि याच वृक्षाच्या विशाल व शीतल छायेखालीं विसावलें आहे. कालिदास-भास-भवभूतींसारखे संस्कृत महाकवी व नाटककार, प्रवसेन वाक्पतिराज-विमलासारखे प्राकृत सूरी व भास्करभट्ट बोरीकरापासून ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर ते मोरोपंतांपर्यंतचे मराठी कवि व तुळशीदास (हिंदी), रण्ण ( कानडी ), कृत्तिवास ओझा (बंगाली), प्रेमानंद ( गुजराथी ), रामसरस्वती (आसामी), टिक्कण ( तेलगू) इत्यादि देशभाषाकवी याच अस्सल स्वयंस्फूर्त व आर्ष काव्याचे (Authentic epics) ललितमधुर व तेजस्वी पडसाद आपापल्या काळात घुमवीत आहेत.

**' व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्. '**

विशेषतः भारतांतील प्रसंग, पात्रें, घटना व मानवी जीवनाची वास्तवता व भवितव्य यांचें विवेचन इतकें सखोल, चौफेर, सूक्ष्म व सार्वत्रिक

आहे कीं 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' म्हणजे 'व्यासानें आपल्या विशाल प्रतिभेच्या जिव्हेनें निखिल मानवी जीवनाची पहिली चव घेऊन टाकली आहे. पुढच्या पिढ्यांचा जीवनास्वाद आतां शिळा किंवा उष्टा झाला' असें जें एक वचन रूढ आहे त्यांत बरेंच तथ्य आहेसें वाटतें. 'धर्म, अर्थ, काम व मोक्ष या बाबतींत जें महाभारतांत आहे तें दुसरीकडे नाहीं, व जें महाभारतांत नाहीं जें दुसरीकडे दुर्मिळ आहे'! हेंहि महाभारताचें वर्णन अयथार्थ नाहीं पण वरीलसारख्या वचनांच्या मर्यादाहि ध्यानांत घेणें इष्ट आहे हीं वर्णनें व वचनें अक्षरशः खरीं नाहींत. आर्ष काव्यांतील कांहीं भाग सार्वकालिक असला तरी बराचसा भाग तत्कालीन होता. व त्या तत्कालीन भागांत पुढील पिढ्यांनीं सुधारणा केली. महाभारतांतील द्रौपदीचे पांच पती, भीमानें दुःशासनाचें रक्त पिणें, नियोग ची चाल, त्रैवर्णिकाचे आतर्वर्णीय विवाह, भक्ष्याभक्ष्यविचार, गवालंभ, पलपैत्रिक (समांस श्राद्ध), संन्यास इत्यादि शेंकडों बाबींत पुढें बदल करण्यांत आला. कृत, त्रेता इत्यादि युगांतले धर्म निराळे व कलियुगांतले धर्म निराळे असें सांगून अनेक सूत्रकार, स्मृतिकार व निबंधकार यांनीं कलिवर्ज गोष्टींचें सप्रपंच विवेचन केलें आहे. 'अग्निहोत्रं, गवालम्भं, संन्यासं, पलपैतृकं। देवराच्च सुतोत्पत्तिं कलौ पञ्च विवर्जयेत्।' (स्मृतिमु०) हें या बाबतींतील वचन प्रसिद्धच आहे. हा झाला धार्मिक भाग. यानंतर पुढील युगांत झालेली शास्त्राची वाढ, विद्याफलांची वृद्धि, आचारांतील व आहारविहारातील सुसंस्कृतता, भाषेची कमाई इत्यादि शेंकडा बाबींत पुढील काळानें आघाडी मारली. त्यामुळें 'आर्ष काव्यांची केवळ पुनरुक्ति पुढील विदग्ध महाकाव्यानीं केली' या विधानाच्या मर्यादाहि मर्मज्ञ ध्यानांत घेतलीच.

## आर्ष काव्यांचे विषय.

आर्ष काव्यांच्या महत्त्वाविषयीं येवढें विवेचन केल्यावर आतां त्यांच्या घटनेकडे वळावयाचें. त्यांतल्या मुख्य भागाना आपल्याकडे काण्डें व पर्वें म्हटलें असून त्यांच्यांतील छोट्या प्रकरणाना अध्याय असें नांव दिलेलें आहे. सर्ग हें रामायणांतील प्रकरणांना दिलेलें नांव प्राचीन नसावें. आर्ष काव्यांतील भाषा साधी व सोपी आहे. त्यांच्या रचनेंत शिथिलता, पुनरुक्ति वगैरे दोष व त्यांतील पात्रांच्या आचारविचारांत क्वचित्

असंमाव्यता व ग्राम्यता आहे. पण हे दोष त्यांत पडलेल्या भरीमुळें व त्या काळच्या आचारविचारांच्या प्राथमिकपणामुळें उत्पन्न झाले आहेत.

आर्ष महाकाव्यांतून सर्वत्र येणारे विषय प्रायः पुढीलप्रमाणें असतातः-

१ घनघोर रणसंग्राम. ईलियड घ्या, महाभारत-रामायण घ्या, किंवा बेओऊल्फ् घ्या, त्यांत तुम्हांला रणगर्जना, बाणाचे सणसणाट, रथाचे धडधडाट व मृत्यूचें तांडवनृत्य पाहावयास सांपडेल.

२ दीर्घ व धाडसी प्रवास व त्यांत दृष्टीस पडणारीं नद्या, पर्वत, सागर, जंगलें व हिंस्र पशू इत्यादि दृश्यें. वनवासी पांडव व राम-सीता-लक्ष्मण याचे प्रचंड व भयंकर प्रवास प्रसिद्धच आहेत. त्यांत पाताळ व स्वर्ग हींहि स्थळें आहेत. असेच साहसी प्रवास ऑडेसिअस्, एनीअस्, बेओऊल्फ् इत्यादींनीं केल्याचीं वर्णनें आहेत.

कांहीं साहसी व शूर जमातींचीं वा टोळ्यांचीं एका प्रदेशांतून दुसऱ्या प्रदेशांतील आक्रमक परिभ्रमणें (Volker Wanderings) हीं महाकाव्यरचनेला प्रेरक होतात असा सिद्धान्त ए. जे. टॉइनबी यानें आपल्या 'A Study of History' या प्रचंड ग्रंथाच्या पांचव्या भागांत (पृ. ५९६-६०६) मांडला आहे. पांडवांचा दिग्विजय, रामाचा लंकाविजय किंवा आर्यांनीं केलेली भारतातील वसाहत हीं यांचीं उदाहरणें होत.

३ परस्त्रीचें अपहरण. सीता, हेलन व द्रौपदी याच्या अपहरणाचे किंवा अपमानाचे प्रसंग तर प्रसिद्धच आहेत.

४ द्यूत, शर्यती व खेळ. अचिलिस् व पांडव यांनीं मर्दुमकीच्या खेळांची व शस्त्रपरीक्षेची करमणूक केली. युद्धाला व द्यूताला कोणीं आह्वान केलें तर तें स्वीकारावयाचें असा वीरयुगांत दंडक होता.

५ कडाक्याचे वादविवाद. महाभारतांत भीम द्रौपदी व धर्म यांच्या व ईलियडमध्येंहि योद्ध्यांमध्यें वाद झाल्याचीं वर्णनें आहेत.

६ नियतीवर हवाला. कालाचें सर्वभक्षित्व. रामायण-महाभारतांतील स्त्री-पुरुषाच्या जीवनावर भवितव्यतेच्या सर्वंकषत्वाची छाया पडलेली स्पष्ट दिसते. अचिलिस् व अभिमन्यु तरुणपणीं कां मरावे? अडाम् व ईव्ह् याना सर्पाची, सीतेला काचनमृगाची व धर्माला द्यूताची भुरळ कां पडावी? उत्तर एक. नियति.

७ अतिमानुष शक्तीचा वापर. रामायण-महाभारतांत इंद्र, अग्नि, वरुण, ब्रह्मदेव, विष्णु, शंकर इत्यादि वैदिक व पौराणिक देव आणि राक्षस मानवी व्यवहारांत पडलेले दिसतात. तीच गत ॲपोलो, ज्युपिटर, ॲकिलस् मिनर्व्हा, ज्यूनो, थेटिस इत्यादि ग्रीक देवतांची व ग्रेंडेलसारख्या राक्षसाची आहे. विरोधच दाखवावयाचा झाला तर ग्रीकांचे देव आमच्या देवापेक्षां अधिक मत्सरी, लहरी व निष्ठुर असून मानसाच्या हितापेक्षां अहिताकडेच त्यांची प्रवृत्ति जास्त दिसते. निसर्गशक्तींच्या मानवावरील अनुग्रह-निग्रहांमुळें तो त्यांवर देवत्वाचा आरोप करतो. अतिमानुष सामर्थ्याच्या पात्राची काव्यांत योजना म्हणजे प्राचीन मानवाच्या निसर्गजयाच्या तृप्त अगर अतृप्त वासनेचा आविष्कार होय. त्या प्राचीन समाजाला जें व्यवहारात शक्य नव्हतें तें कल्पनेंत शक्य करून घेण्याची आवड होती. म्हणून तत्कालीन कवींनीं ती या मार्गानें पुरविली असा याचा अर्थ आहे.

अतिमानुष पात्रांबरोबरच अधोमानुष ( sub-human ) पात्रें– म्हणजे पशु व पक्षी याचीहि योजना सर्व आर्ष काव्यात आहे. रामायणातील हनुमान हा तर अतिमानुष, मानुष व अधोमानुष अंशाचें एक नमुनेदार मिश्रण आहे. शिवाय जटायू जाम्बुवन्त वगैरे रामपक्षीय मंडळी रामायणात आहेतच. महाभारतात हंस व गरुड आहेत. तेथील शकुन्तलेचें रक्षण जसें पक्षानीं केलें तसें 'शहानाम्या'मधील झाल राजपुत्राचें संवर्धन सिमर्घ नावाच्या सुवर्णपंखी गरुडीनें केल्याचें सांगितलें आहे.

## आर्ष महाकाव्यांचा मोठेपणा.

आर्ष महाकाव्यांचें येवढें विवेचन झाल्यावर त्यांच्यांतील प्राणभूत मोठेपणाचें दिग्दर्शन करून हा विषय येथें पुरा करूं. महाकाव्याचें महत्त्व किंवा मोठेपण पुढील गोष्टींत असतें—

( १ ) त्याचा नायक कोणी महान् युगपुरुष असावा लागतो. आणि या महापुरुषाच्या जीवनात फार मोठ्या राष्ट्रव्यापक व देशाच्या जीवनात उलथापालथ करून टाकणाऱ्या घडामोडींचा, विजयाचा वा उत्पाताचा समावेश व्हावा लागतो. या पुरुषाच्या अंगीं फार मोठें शौर्य, धैर्य, त्याग, औदार्यादि गुण असावे लागतात.

( २ ) नायकाच्या जीवनपटाचा संपूर्ण व विस्तृत ताणा (span) त्यांत यावयास पाहिजे. एक दोन प्रसंगांचें चित्रण येऊन भागत नाहीं. म्हणजे मानवी जीवनाच्या सर्व अवस्थावर महाकवीला आपली नजर फिरवितां येते व विवेचन विस्तृत व सर्वांगपरिपूर्ण होतें.

( ३ ) त्यांत देव, राक्षस, गंधर्वादि अतिमानुष व अमानुष व्यक्ति असाव्या लागतात. पण मुख्यत्वेंकरून मानवी जीवनाचें विशाल दर्शन घडावें लागतें. त्या मानवी कथेची पार्श्वभूमि मात्र विश्वव्यापक (cosmic) ठेवावी लागते, म्हणजे मानवी जीवनांतील घटनाचा संबंध विश्वाचें धारण-पोषण वा संहार याच्याशीं पोचला पाहिजे. त्यायोगें काव्याला मोठें पल्लेदार विशालत्व व भव्यता प्राप्त होते.

( ४ ) मुख्य विषयाच्या अनुषंगानें अनेक उपकथा व आख्यानें, मागें सांगितलेले सात विषय, वर्णनें, भाषणें, धर्म व तत्त्वज्ञान यांचीं चर्चा इतक्यांचा समावेश होईल येवढा मोठा काव्यांचा विस्तार असावा लागतो. ईलियड् व ओडेसी यांत प्रत्येकीं चोवीस सर्ग ( Books ) आहेत. बेओऊल्फ अजमासें साडेतीन हजार ओळींचें आहे, 'शहानामा' हें फिर्दोशीचें पर्शिअन महाकाव्य साठ हजार ओळींचें आहे. तर आमचें महाभारत एक लक्ष श्लोकाचें आहे. म्हणजे त्याचा विस्तार 'ईलियड' व 'ओडेसी' यांच्या एकत्रित विस्तारापेक्षा आठपट जास्त आहे ! रामायणांत पांचशें सर्ग व अजमासें पंचवीस हजार श्लोक आहेत.

( ५ ) शैली सोपी पण आकर्षक आणि साधी पण जोरकस व गंभीर पाहिजे. ती सर्व लोकांना समजेल व रुचेल अशी असते. तिच्यात पाडित्याचा दिमाख नको. पण सहजस्फूर्त व अनुभवप्राप्त ज्ञान मात्र लागतें. व मुख्य म्हणजे जीवनाचें चित्रण गंभीर असावें लागतें. तिच्यांत विशिष्ट वंशाच्या किंवा राष्ट्राच्या प्रवृत्ति उत्कटत्वानें दिसत असल्या तरी त्यात विश्वव्यापक मानव्याचें विशाल दर्शन असतें. जीवनाचें प्रतिपादन पर्वता-येवढें उच्च व समुद्राएवढें खोल असतें. तात्पर्य, विषय नायक, प्रसंग, पात्रें, विस्तार, विवेचन व शैली या साऱ्या गोष्टी मोठ्या म्हणजे व्यापक, भव्य, टोलेजंग, विशाल, प्रचंड, उंच, खोल व गंभीर असाव्या लागतात.

## निसर्गाची आद्यनिर्मिति.

आतांपर्यंत केलेल्या विस्तृत विवेचनावरून आर्ष महाकाव्यांच्या स्वरूपाविषयीं बरीच स्पष्ट कल्पना वाचकांना येईल. आर्ष काव्यांची ही येवढी चर्चा त्यावर आधारलेल्या विदग्ध महाकाव्यांची कल्पना स्पष्ट व्हावी यासाठींच केली अहे आर्ष काव्याचें तंत्र समजावून द्यावें आणि त्यामुळें कवींना त्यांचें अनुकरण सुलभ करावें यासाठीं नाहीं. कारण पुढील कवींनीं महाकाव्यरचनेचा नमुना म्हणून पुढें ठेवला तो कालिदासादिकाच्या विदग्ध महाकाव्याचा; आर्ष काव्यांचा नव्हे. आर्ष काव्यें हीं त्याला प्रेरक झालीं. फार झालें तर त्यातील काहीं बाह्य गोष्टींचें अनुकरणहि झालें आहे. पण त्यांचें प्राथम्य, त्याची स्वकालनिष्ठता, त्यांच्या मनाची खळबळ उडविणारे आद्य प्रसंग या गोष्टींचें अनुकरण कोण कसें करणार? आर्ष महाकाव्यें अशीं तयार करावीं असें सांगणें म्हणजे समुद्र तयार करावयास प्रथम एक फार खोल खड्डा करून त्यात खूप पाणी ओतावें असें सांगणें होय. किंवा उत्तुंग पर्वत तयार करावयास दगड-मातीच्या प्रचंड ढिगाऱ्यावर झाडें रोवावीं असें सांगणे होय. आर्ष महाकाव्यें हीं सागर व पर्वत यासारख्या निसर्गाच्या पहिल्या प्रचंड निर्मितींतील एक चीज आहे. तिच्याकडे पाहून पुढील कवींनीं आपल्या काव्याचीं क्रीडासरोवरें व क्रीडापर्वत बनवावे हवे तर.

या आर्ष काव्यांच्या प्रेरणेनें पुढील विदग्ध काव्यरचना कशी झाली तेंच आतां पहावयाचें. नव्या कालातील नवें विदग्ध काव्य म्हणजे केवळ चर्वितचर्वण, उच्छिष्टाचें भोजन किंवा शिळा कढीला आणलेला नवा ऊत नव्हे. विदग्ध काव्य म्हणजे आपापल्या काळच्या विशिष्ट परिस्थितींत, तत्कालीन जीवनरसांनीं बनविलेली, स्वकालाच्या वस्त्रालंकारांनीं नटविलेली व स्वकालाच्या इच्छा व आकांक्षांना पालवित्यारी जुन्या द्रव्याची नवी जिवंत मूर्ति आहे. या मूर्तीचा बदलता काळ कोणता व त्यात तिची नवी जडण घडण कशी झाली तें आतां पाहू.

## ( ४ ) विदग्ध महाकाव्यें.

### नव्या युगाचा अवतार.

आर्ष महाकाव्यात चित्रित केलेल्या जुन्या युगानंतर एक नवें युग लागलें. पूर्वीचीं छोटीं गणराज्यें लोप पावून त्यांचीं साम्राज्यें बनलीं. चंद्रगुप्त, अशोक, विक्रमादित्य, गुप्त, हर्षवर्धन इत्यादि पौरस्त्य व पेरिक्लिस, सम्राट् ऑगस्टस्, राणी एलिजाबेथ इत्यादि पाश्चात्य राजे-राण्यांच्या विस्तृत राजवटी सुरू झाल्या. खेड्यांचीं नगरें व वनांचीं उपवनें होऊं लागलीं. समाजात स्थिरता, शांतता, सुबत्ता व सवड नांदूं लागल्यामुळें शास्त्रें व कला अधिक प्रमाणानें वाढूं लागल्या. नवे शिष्टाचार, सभ्यता व संस्कृति उत्पन्न झालीं. पूर्वीची निरागसता, सरळपणा व साधेपणा जाऊन त्याचे जागीं व्यवहारात चतुरता, पाटव व नागरपणा येऊं लागला. राजधर्म व प्रजाधर्म अधिक सूक्ष्म व गुंतागुंतीचे बनले. शास्त्रांचा सूत्रकाल संपून भाष्यकाल डोकावूं लागला. पांडित्य वाढूं लागलें. विद्यापीठें, गुरुकुलें व कलाशाला अधिक व विस्तृत प्रमाणावर सुरू झाल्या. मानसांचे मनोव्यापार संयम व शिस्त यांच्या दडपणाखालीं संमिश्र बनूं लागले. त्यामुळें त्यांच्या भाषेचा सरळपणा व साधेपणा जाऊन ती ध्वनियुक्त, श्लेषप्रधान, नटवी व पांडित्यप्रचुर होऊं लागली. सामान्य वाचक व विशिष्ट अभ्यासू वाचक आणि बहुजनसमाज व राजदरबारचे रंचक रसिक असा भेद अधिकाधिक दिसूं लागला. जीव, जगत् व परमेश्वर यांच्या स्वरूपाविषयीं व परस्परसंबंधाविषयीं भिन्न पंथ व भिन्न मतें सुरू होऊन त्यांच्या भिन्न उपपत्त्या पुढें येऊं लागल्या. मोठाले व्यापार, बाजारपेठा, लौकरानें सुरू होऊन संपत्ति फैलावूं लागली. शेती व इतर उद्योग पूर्वापेक्षा वाढले. 'माझेंच मत खरें' असा आग्रह थोडासा मागें पडून समन्वय व सलोखा याकडे कल दिसूं लागला. ठामपणाऐवजीं संशय सुरू झाला. रामायणाचें नैतिक व महाभारताचें बौद्धिक युग संपून आतां भौतिक युग सुरू झालें. त्यामुळें ऐषआराम, क्रीडावृत्ति व सुखलोलुपता अधिकाधिक दिसून येऊं लागली. पूर्वीच्या दणकटपणाची जागा नाजुकसाजुकानें घेतली. खुल्या वृत्तीच्या ऐवजीं लाज-भीड आली. अद्भुताविषयीं

प्रेम व त्यावरील विश्वास आणि अतिमानुषाविषयींची आवड व त्यावरील श्रद्धा हळूहळू कमी होऊन समाजाची दृष्टि वास्तवाभिमुख होऊं लागली. पूर्वीच्या खऱ्याखुऱ्या प्रत्यक्ष व मूर्त ( concrete ) घटनांचें महत्त्व लोपलें व त्याऐवजीं आतां त्या मूर्त घटनांतील अमूर्त तत्त्वाला (abstract idea) प्राधान्य आलें. त्यामुळें पूर्वीचे प्रसंग व घटना हीं विदग्ध महाकाव्यांत वर दाखवावयाची ( ostensible ) बाजू ठरून अमूर्त तत्त्व हेंच मुख्य व खरें ( real ) प्रतिपाद्य झालें. थोडक्यांत सांगावयाचें तर नागर-जीवन अधिक प्रमाणांत सुरू झालें व आंतर व बाह्य संस्कृतीला नवा रंग चढला.

**जुनें तें सोनें.**

वरील नव्या युगांत झालेला हा बदल आधुनिकदृष्ट्या त्या त्या समाजाच्या आतर आणि बाह्य सांस्कृतिक विकासाचा द्योतक व विकासवादा-प्रमाणें अपरिहार्य होता. पण भूतपूर्व तेंच अपूर्व, ' जुनें तेंच सोनें व नवें ती माती ' असें समजणाऱ्या धार्मिकांच्या मनाला हा बदल मानवला नाहीं. त्यांचीं ध्येयें, त्यांचे आदर्श व त्यांचीं स्वप्नें पवित्र भूतकालाच्या अफाट अंबरांत ताऱ्यासारखीं लुकलुकत होतीं व त्यांच्या प्रकाशांत ते या धरणीवरील मार्ग कसातरी आक्रमीत होते. या नव्या पापी युगांत न्याय-देवता (Astraea) अन्तर्धान पावली व धर्म नष्ट झाला असें ग्रीक लोक आम्हां आर्यांप्रमाणेंच मानीत होते. Hesiod सारखे कांहीं कवी सुवर्ण, रौप्य व कांस्य हीं युगें संपून लोहयुग लागल्याचें सांगत होते. तर आम्ही कृत, त्रेता व द्वापार संपून कलीचा अवतार झाल्याचें बोलत होतों. चिनी तत्त्ववेत्ता व धर्मसंस्थापक कन्फ्यूशिअस् ( इ. पू. ५०० ) यांचेंहि हेंच मत होतें. या मताचा वाङ्मयावर असा परिणाम झाला कीं जुनीं काव्यें, जुने नायक, जुन्या कथा व जुन्या कल्पना' यांची पुनरावृत्ति नव्या काव्यांत आदर्श म्हणून होऊं लागली. अर्थात् मागें पृ. १९-२२ वर सांगितल्या-प्रमाणें आर्ष काव्यांत काहीं भाग खरोखरीच त्रिकालाबाधित होता; व त्याबद्दल कोणासहि आदर वाटावा हें साहजिक होतें. पण सर्वच जुनें चांगलें व सर्वच नवें वाईट हें मत टिकण्यासारखें नव्हतें. त्यामुळें जुन्या-नव्याच्या समन्वयाकडे प्रवृत्ति होऊं लागली.

## नव्या चौकटींत जुनीं चित्रें.

आर्ष काव्यांचें कांहीं बाबतींतील मूलभूत महत्त्व, जुनें तें सोनें मानण्याची प्रवृत्ति व जुन्या आर्ष काव्यांचा समाजात झालेला फैलाव आणि त्यांना मिळालेली प्रसिद्धि व मान्यता या कारणांमुळें जुन्या कथांचें पुनःकथन सुरू झालें. पण हें पुनःकथन म्हणजे केवळ शाब्दिक पुनरुच्चार नव्हता. यांत जुन्या-नव्यांची देवघेव होती. जुने ऋषि, जुने शूर, जुने राजे व जुने आदर्श या आपल्याजवळच्या गोष्टी जुन्यानें नव्याला दिल्या. पण जुन्याचं मूल्यमापन नव्या दृष्टीनें चालू झाल्यानें नव्यानें आपल्या पसंतीचे नवे अलंकार जुन्याला दिले. म्हणजे चित्रांचे जुने आराखडे नव्या रंगांनीं व नव्या वेषभूषेनें नटविले गेले; व वर्तमान कालाच्या चौकटींत बसविण्यांत आले. जुन्या द्रव्यानें घडविलेल्या मूर्तींच्या सांगाड्याना नवा घाट दिला जाऊन त्यावर नवा साज घालण्यांत आला व त्यांची स्थापना नव्या मंदिरात करण्यांत आली. जुने आशय नव्या अक्षरवाटिकेनें व नव्या शाईनें लिहिले गेले व त्या लिखित पत्रांचीं नव्या बांधणीचीं पुस्तकें करण्यांत आलीं. जुन्याचें स्वकालोचित नवीकरण हा जो या युगातल्या पुनःकथनाचा हेतु त्यानें प्रेरित झालेलीं महाकाव्यें म्हणजेच 'विदग्ध महाकाव्यें' होत.

## कवींची व वाचकांचीहि सोय.

शिवाय, आपल्या काळांतील वर्‍यावाईट गोष्टींबद्दल आपलें मत किंवा आपल्या काळचें मत प्रकट करण्यास हे जुने नमुने कवींना फार सोईचे वाटले. जुने वंश, रूप, जुनीं ध्येयें व जुनी इष्टि आता सर्वपरिचित झालीं होतीं. तो इतिहास आतां सर्व राष्ट्रांच्या हाडींमासीं खिळून राहिला होता. यामुळें जुन्याच्या नामोल्लेखानें बोलणें ही एक सर्वसुलभ बोलभाषा झाली होती. आपल्या पसंती-नापसंतींना मान्यता मिळवून देण्याचा तो एक सोईचा मार्ग होता. भिन्न मताच्या आचार्यांनीं गीतेचा आश्रय ज्या कारणासाठीं केला, व आजहि करीत आहेत, त्याच कारणासाठीं विदग्ध महाकवींनीं जुन्या कथाचा अवलंब केला. असें करतांना त्यांनीं नवीं पात्रें, नवीं मतें, नव्या विद्याकला व नवा काळ जुन्यांत बसवून दिला. मूळ

कथेंत फरक केले. कांहीं गाळलें व कांहीं नवें घातलें. त्यांनीं पूर्वीचें कांहीं वास्तव आपल्या कल्पनेप्रमाणें कमी केलें व त्याला आदर्श बनविलें व आपल्या काळचें वास्तव जुन्या अद्‌भुतांत सामील केलें. ही कवींची योजना कवी व वाचक या उभयपक्षीं सोईची ठरली. कारण जुन्या घटनांचे सर्वच्या सर्व तपशील कोणासच माहीत नसल्यानें कवींना आपल्यास जरूर असणाऱ्या नव्या गोष्टी त्यात सहज समाविष्ट करतां आल्या व लोकांनाहि आपला काळ अद्‌भुताश्रयामुळें अधिक रोचक वाटला.

## वास्तव आदर्श केलें.

मूळ रामायणाप्रमाणें पाहतां विश्वामित्रानें जेव्हां दशरथाजवळ कोवळ्या वयाच्या रामाची मखरक्षणार्थ मागणी केली तेव्हां दशरथाला प्रथम धक्काच बसला. नंतर त्यानें यज्ञरक्षणार्थ राक्षसांशीं करावयाच्या सामन्यासाठीं रामाऐवजीं आपलें सैन्य पाठवून देण्याची तयारी दाखविली. तो स्वतःहि लढाईस जाण्यास कबूल झाला; पण नवसा-सायासानें झालेला रामासारखा कोवळा मुलगा त्या राक्षसांच्या मोहिमेवर पाठविण्यास तो कांहीं केल्या मान्यता देईना. अखेर विश्वामित्र संतापला व वसिष्ठानें मध्यस्थी केली. तेव्हां कोठें दशरथ राम-लक्ष्मणास, मन मोठें घट्ट करून, पाठविण्यास कसाबसा तयार झाला ( बालकाण्ड १९–२२ ). दशरथाचें हें पुत्रप्रेम स्वाभाविक किंवा वास्तव नाहीं असें कोण म्हणेल ? तसेंच रावणानें सीतेस पळवून नेल्यावर आपला आश्रम सुना झालेला पाहून रामाला झालेलें दुःख व त्यानें केलेले विविध विलाप रामायणांत विस्तरशः वर्णिले आहेत ( अरण्य. ६१–६३. ) हा शोकहि अगदीं वास्तवाला धरूनच आहे. पण कालिदासाला हे रघुवंश-महापुरुष सर्व सद्‌गुणांचे मूर्तिमंत नमुनेच बनवावयाचे असल्यानें त्यानें दशरथाच्या आढ्यावेढ्याचें रूपान्तर औदार्यप्रेरित तत्कालिक संमतींत केलें ( रघु. ११.२ ) व 'रघुकुलात प्राणाची याचनाहि व्यर्थ जात नाहीं' असा शेरा मारून तिचा सर्वसामान्य नियम बनवला. सीताहरणानंतरचा रामाचा शोक तर कालिदासानें अनुल्लेखानेंच दूर लोटून दिला आहे. स्त्रीमोहांत गुंतणें महापुरुषांच्या मनाच्या कमकुवतपणाचें लक्षण आहे असें कालिदासास कदाचित् वाटत असावें.

त्याचप्रमाणें रामास किंचित् कमीपणा आणणारें वालीच्या वधाचें प्रकरणहि कालिदासानें गाळलें आहे. श्रीहर्षानेंहि आपला नल महाभारतांतील नलापेक्षां ( तेथें त्याचा स्वार्थ स्वाभाविक व वास्तव असूनहि ) अधिक कर्तव्य-तत्पर, उदात्त व निःस्वार्थी दाखवला आहे.

**सत्य अद्भुतांत सामील.**

याच्या उलट माळव्याच्या सिंधुराजावरील 'नवसाहसाङ्कचरित' या ऐतिहासिक (११ वें शतक) महाकाव्यांत पद्मगुप्तानें राक्षसवधाचें एक अद्भुत कृत्य नायकाकडून करविलें आहे. तसेंच बिल्हणानें कल्याणच्या चालुक्य राजावरील आपल्या 'विक्रमाङ्कदेवचरित' या महाकाव्यांतील (११ वें शतक) ऐतिहासिक घटनेंत भगवान् शंकराचा संबंध आणिला आहे. असें करण्यात या विदग्ध महाकवींनीं कांहीं अनुचित केलें असें हें सांगण्याचा हेतु नाहीं. हें सांगण्याचें प्रयोजन येवढेंच कीं, या नव्या कवींची विदग्ध-महाकाव्य-रचना विशिष्ट हेतूंनीं प्रेरित होती व ती त्यांनीं जाणिवेनें अंगिकारलेली होती. आणि आर्षकाव्यांची रचना त्या काळच्या ज्ञात-अज्ञात गरजांप्रमाणें विशिष्ट, ऐतिहासिक, भव्य आणि उदात्त घटनांच्या प्रेरणेनेंच झाली असल्यानें त्यांत स्वयंस्फूर्तता होती व अन्य कृत्रिम हेतूंचा अभाव होता हा आर्ष आणि विदग्ध-काव्य-रचना-हेतूंतील फरक वाचकांच्या ध्यानीं आणावा.

**कालिदासपूर्व महाकाव्यें.**

आतां विदग्ध काव्यरचनेचा प्रारंभ केव्हां झाला तें पाहिलें पाहिजे. अश्वघोष किंवा कालिदास हे उपलब्ध विदग्ध-महाकाव्यरचनेचे प्रवर्तक आहेत. आर्ष कवि वाल्मीकि व व्यास यांचा काल व कालिदासाचा काल यांच्यामध्यें किमानपक्षीं दोन अडीच हजार वर्षांचें अंतर आहे. दरम्यान कांहीं विदग्ध-काव्यें झालीं असावीं असें वाटतें. प्रसिद्ध व्याकरणकार पाणिनि ( इ. स. पूर्व ३४० चा सुमार ) याच्या नांवावर 'जांबवती-विजय' नांवांचें महाकाव्य मोडतें. 'वाररुच' काव्याचाहि उल्लेख सांपडतो. पण या काव्याचा कर्ता वररुचि म्हणजे वार्त्तिककार कात्यायन का दुसरा कोणी हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. पतंजलीच्या महाभाष्यांत

उदाहरणें म्हणून दिलेलीं कांहीं काव्यवचनें अनुष्टुभाव्यतिरिक्त प्रदीर्घ संस्कृत वृत्तांत आहेत. व तीं मोठीं प्रौढ व अलंकारमंडितहि आहेत. यावरून तीं कोठल्यातरी महाकाव्यांतलीं असावीं असा तर्क आहे. उदाहरणार्थ–' वरतनु संप्रवदन्ति कुक्कुटाः । ' (पुष्पिताग्रा-अन्त्यगुरुहीन समचरण), ' प्रियां मयूरः प्रति नर्तीतीति ।' (इंद्रवज्रा), 'प्रथते त्वया पतिमती पृथिवी । ' ( प्रमिताक्षरा ). तसेंच गिरनार येथील शिलालेख ( इ. स. १५० ) व कांहीं राजप्रशस्तिपर रचना काव्यपद्धतीनें लिहिलेली आढळते. पण या कालांतील संपूर्ण महाकाव्यें प्रत्यक्ष उपलब्ध नसल्यामुळें त्यांचें अस्तित्व अनुमानणेंच आवश्यक आहे. कालिदासकालाच्या अनिश्चयामुळें अश्वघोष हा बौद्ध महाकवि प्रथम का कालिदास प्रथम ही गोष्ट निश्चयानें सांगतां येत नाहीं. ' बुद्धचरित ' व कालिदासीय काव्यें यांत पुष्कळ साम्यस्थलें व सारखीच चांगली तोलदार शैली आहे. पण कोण कोणाचें अनुकरण करतो हें ठरविणें मतभेदातीत नाहीं. म्हणून कालिदासाला निदान वैदिकधर्मीय व उपलब्ध संस्कृत विदग्ध-महाकाव्यरचनेचा आद्यप्रवर्तक मानावयास कोणतीच हरकत नाहीं.

## हिंदुस्थानचा व्हर्जिल !

कालिदास हा विदग्ध काव्यरचनेचा नुसता आद्य प्रवर्तकच नव्हे. तो विदग्ध काव्यरचनेचा आदर्शहि आहे. उत्तरकालीन कवी कांहीं अगदींच सामान्य कलावंत होते असें नाहीं. पण त्यांपैकीं एकालाहि कालिदासावर ताण तर राहोच पण त्याची नुसती बरोबरीसुद्धां करतां आली नाहीं. पाश्चात्य विदग्ध कवींत इटॅलियन कवि व्हर्जिल व आमचा कालिदास या दोघांत बरेंच साम्य आहे. दोघेहि समकालीन आहेत ! ( व्हर्जिलचा काल इ. स. पूर्व १९ व कालिदासाचा काल निदान एका मताप्रमाणें तरी इ. स. पूर्व ५७). व्हर्जिलचें ' एनीड ' हें लॅटिन काव्य विदग्ध महाकाव्याचा नमुना असून इटलींतील व इतर देशांतील डाटे, चॉसर वगैरे कवींना व्हर्जिल म्हणजे साक्षात् सरस्वतीचा अवतार वाटत होता. व्हर्जिल हा दोन हजार वर्षेंपर्यंत लोकांच्या कौतुकाचा, टीकाकारांच्या भाष्यांचा आणि कवींच्या भक्तियुक्त अनुकरणाचा किंवा स्पर्धेचा विषय होऊन राहिला आहे. कालिदासाची गोष्ट तीच आहे. त्याच्या महाकाव्यावरून पुढील काव्यलक्षणें ठरलीं.

त्याचें अनुकरण व स्पर्धा करण्याचे प्रयत्न झाले. सर्व्हिअस, डोनॅटस् व मॅक्रोबिअस् यांनीं ज्याप्रमाणें व्हर्जिलच्या 'एनीड'च्या विविध अंगांची चर्चा केली तशी चर्चा इकडे प्राचीन काळापासून बहुतेक सर्व साहित्य-शास्त्रकारांनीं व विशेषतः मल्लिनाथ, वल्लभ, चरित्रवर्धन, दिनकर, सुमति-विजय, धर्ममेरु इत्यादि तेहतीस वैदिकधर्मी व जैन टीकाकारांनीं केली आहे. म्हणून नाट्यरचनेच्या साम्यामुळें कालिदासाला जसा 'हिंदुस्तानचा शेक्स्पिअर' म्हणतात तसा महाकाव्यरचनेच्या साम्यामुळें त्याला 'हिंदुस्थानचा व्हर्जिल' म्हणावें !

## वीरयुगाला पहिली कलाटणी.

या दोघांहि विदग्ध महाकवींनीं विदग्ध काव्यरचनेचा पाया घातला हें खरें. पण तो घालतांना होमर व वाल्मीकि यांच्या वेळच्या वीर युगाच्या कल्पनेला त्यांनीं पहिली कलाटणी दिली ही त्यांत विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. होमरला ॲचिलिस्, हेक्टर वगैरे वीर व्यक्ति म्हणून संमत होते. वैयक्तिक शौर्य, वैयक्तिक औदार्य, वैयक्तिक त्याग व वैयक्तिक असामान्यपणा हा वीरयुगांत कौतुकाचा व आदराचा विषय होता. रामायणांतसुद्धां सीता, लक्ष्मण, भरत, मारुति इत्यादि पात्रें उत्कट वैयक्तिक गुण दाखवितात. नारदाच्या प्रश्नावरून वाल्मीकीनें तर राम हा एकच Superman (पुरुषश्रेष्ठ, देवांश) आहे असें प्रारंभींच सांगितलें आहे (बाल. सर्ग १). व्हर्जिलनें हें वीरांच्या वैयक्तिक आदराचें केंद्र व्यक्तीकडून राष्ट्राकडे नेलें रोमचें प्रेम हा आदराचा व वीरांच्या मूल्यमापनाचा कस ठरला. कालिदासानेंहि राम, दशरथ, रघु, सीता, लक्ष्मण इत्यादि व्यक्तींचा व्यक्तिपणा काढून त्यानें त्यांना सर्वसामान्य नमुने बनविले, आपले आदर्श केले व आपल्या काळची विशिष्ट राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक स्थिति त्यांच्या द्वारें ध्वनित करण्याचा मार्ग प्रथम चोखाळला. रामकथेंतील प्रत्येक गोष्टीला कालिदासानें उत्तरकालीन युगांतील त्या त्या गोष्टीचें एक प्रतीक ( symbol ) बनाविलें. कालिदास व व्हर्जिल हे दोघेहि पंडित कवी. दोघांनाहि आपापल्या साम्राज्याचा अभिमान. व्हर्जिलनें आपल्या एनियस्च्या वर्णनात ऑगस्टसचें उदात्त चित्र ध्वनिरेखांनीं रंगवलें तसा कालिदास रघुवंशीय राजांच्या वर्णनांत

विक्रमादित्य (पहिला किंवा दुसरा) राजाच्या प्रतिष्ठेच्या छटा सूचक पद्धतीनें उमटवीत आहे.

**प्रतीकमार्ग**—Symbolism.

आपल्या कथेंतील विशिष्ट पात्रांच्या विशिष्ट ( पण प्रातिनिधिक ) अनुभवांवरून सार्वत्रिक व सर्वसामान्य मानवी जीवनाचें व सर्वकष नियतीचें दर्शन घडविणें हें काम होमर, वाल्मीकि, व्यास इत्यादि ऋषिकवींनीं केलें आहे. या प्रकारांतील सर्वसामान्य तत्त्वाबद्दल त्याचा प्रतिनिधि म्हणून योजिलेल्या विशिष्ट व्यक्तीला किंवा प्रसंगाला प्रतीक म्हणजे symbol म्हणतात. व या हेतूनें सामान्याचा प्रतिनिधि म्हणून विशिष्टाची सूचकतेनें योजना करणें या पद्धतीला प्रतीकमार्ग किंवा symbolism म्हणतात. वीरयुगांत होमरनें हेक्टर, यूलिसस इत्यादि धैर्यशाली व्यक्तींच्या विशिष्ट उदाहणांवरून किंवा बेओऊल्फ्च्या लेखकानें आपल्या नायकाच्या विशिष्ट उदाहरणांवरून धैर्य साहस किंवा हृदयाचा अपराजय ही वृत्ति मानवी जीवनाला आवश्यक म्हणून सांगितली. व्यासानें द्रौपदी-भीमांच्या द्वारें तेजस्विता व धर्माच्या द्वारें क्षमा, जीवनध्येय म्हणून प्रतिपादिली. वाल्मीकीनें रामाच्या द्वारें जीवितसार म्हणून कर्तव्यनिष्ठा व सीतेच्या द्वारें तितिक्षा बोधित केली. या प्रतीकमार्गाचा विकास विदग्धमहाकवींनीं आपल्या कालानुरूप केला. होमरच्या धैर्य या वैयक्तिक गुणानंतर आपोंलोनिअस् ऱ्होडियस् ( Apollonius Rhodius ) यानें आपल्या Argonauticaमध्यें प्रेम हा सामाजिक गुण प्रतीकमार्गानें सांगितला. पुढें व्हर्जिलनें धैर्य व प्रेम याच्याबरोबरच ऑगस्टस्च्या वेळीं उदित झालेली रोमन साम्राज्यनिष्ठा प्रतिपादिली. पण व्हर्जिलचें महाकाव्य म्हणजे केवळ राजकारणी प्रचार नव्हे. त्यांत संपूर्ण मानवी जीवनाचा आदर्श दर्शविला असून साम्राज्यनिष्ठा ही त्या कोंदणांत हिऱ्यासारखी बसवून दिली आहे. समर्थ रामदासांच्या मोक्षकल्पनेंत नीति व धर्म यांच्या जोडीला जशी स्वराज्यस्थापना बसते तसाच कांहींसा हा व्हर्जिलचा प्रकार वाटतो. कॅमाइन्सच्या काव्यांत वास्को ड गामा हें पोर्तुगालच्या प्रतिष्ठेचें, टॅसोच्या काव्यांत गोफ्रेडो ( Goffredo ) हा ख्रिश्चन शौर्याचें, व व्हर्जिलच्या काव्यांत एनिअस् हा रोमच्या वैभवाचें प्रतीक आहे. 'किरातार्जुनीयां'त

अर्जुन हा प्रवृत्तिमार्गाचें व क्षात्रतेजाचें प्रतीक असून मिल्टनच्या महाकाव्यांत तर अडाम् हा निखिल मानव्याचें व सेटन् हा आसुरी संपदेचें प्रतीक आहे.

## काव्यहेतूचा पुढील विकास.

इटॅलियन् कवि टॅसो ( इ. स. १५४४–९५ ) व पोर्तुगीज कवि कॅमोइन्स ( इ. स. १५२४–१५८६ ) यांच्या काव्यांत त्यांच्या काळीं यूरोपमध्यें सुरू झालेल्या धार्मिक एकीकरणाच्या व राजकीय आक्रमणाच्या प्रवृत्तीचें उत्तम निदर्शन आहे. 'जेरुसलेम डिलिव्हर्ड' व 'ल्युसिअड्' या त्यांच्या काव्यांत यूरोपला मारून टाकणाऱ्या त्यांच्या काळच्या नवीकरणाच्या उसाळीचे ( spirit of Renaissance ) नादनिनाद घुमून राहिले आहेत.टॅसो आपल्या काव्यांत अकराव्या शतकांत क्रुसेडर वीरांनीं नास्तिकांच्या हातून 'जेरुसलेम' हें पवित्र स्थान सोडविल्याची कथा मोठ्या अभिमानानें सांगतो. तर कॅमोइन्स वास्को-द-गामानें इ. स. १४९७ मध्यें जलपर्यटन करून हिंदुस्थानचा शोध लावल्याचा वृत्तान्त विजयोन्मादानें वर्णितो. एकांत ख्रिश्चन धर्मांची चढाई तर दुसऱ्यांत साम्राज्यविस्ताराची आकांक्षा आहे. या दृष्टीनें हीं काव्यें चांगलीं वठलीं असलीं तरी या तत्कालीन विशिष्ट प्रवृत्तीहून वेगळें व कायम स्वरूपाचें असें मानवजीवनविषयक भव्य दर्शन त्यांत प्रतीत होत नाहीं. हें काम म्हणजे काव्यहेतूचा हा पुढील शेवटचा विकास मिल्टननें केला. मिल्टनपूर्वीच्या सर्व काव्यांत जें मानवी जीवन प्रतीकमार्गानें चित्रित करण्यांत आलें त्यांत मानवाला आपल्या इच्छाशक्तीचीच प्रतीति झाली होती. पण मिल्टनच्या काव्यांत मानवी इच्छाशक्ति व मानवासहित सर्व विश्वाला गवसणी घालणारी परमेश्वरी इच्छाशक्ति या दोनीहि तत्त्वांचें दर्शन एकदमच झालें आहे. जीवात्मा व परमात्मा या दोन परस्परविरोधी, आपापली शक्ति प्रभावी करण्यासाठीं धडपडणाऱ्या, समर्याद व अमर्याद सामर्थ्यांच्या दोन तत्त्वांचा झगडा त्यानें चित्रित केला आहे. ईश्वरी इच्छा दुर्दम्य आहे हें खरें असलें तरी तिच्याविरुद्ध झगडणारें मानवी सामर्थ्यहि कांहीं कमी झुंजार नाहीं असें अखेरीस त्यानें 'सेटन' या प्रतीकात्मक पात्राच्या द्वारें दाखविलें आहे. तसेंच, विवेक व मानवी विकार यांतील झगडा त्यानें ॲडाम् व ईव्ह या जोडप्याच्या द्वारें चित्रित केला आहे.

## आमच्याकडे काय झालें ?

होमरपासून मिल्टनपर्यंत होत आलेला हा काव्यहेतूचा विकास जसा टप्प्याटप्प्यांनीं दाखवितां येतो तसा विकास व्यास-वाल्मीकींपासून कालिदास-श्रीहर्षांपर्यंत दाखवितां येत नाहीं. याचें कारण विशेषतः महाभारतांत मानवी जीवन व परमेश्वरी सामर्थ्य, जीवात्मा व परमात्मा इत्यादीबद्दल अमुक एक विवेचन येऊन गेलें नाहीं असें नाहींच. वनपर्वांतील द्रौपदी-धर्म-संवादांत ( अ. ३० ) जीवात्म्याच्या सामर्थ्यांची धडपड व त्यानें ईश्वरी सत्तेविरुद्ध उभारलेलें बंड स्पष्टपणें येऊन गेलें आहे. महाभारतांतील 'जय'रूप मूळ वीरकाव्यांत ही आध्यात्मिक भर मागाहून पडली असावी. तें कांहींहि असलें तरी आमचा पहिला विदग्ध कवि कालिदास याच्यापुढें जें भारत किंवा जें रामायण होतें तें ही सर्व भर पडून तयार झालेलें पूर्ण स्वरूपाचें महाभारत; व सर्व काण्डांनीं युक्त रामायण. त्यामुळें आमच्या इकडे झालेला काव्य-हेतूचा विकास निराळ्या बाबींतच शोधावा लागेल. कालिदासानें तो कोणत्या बाबतींत केला हें पाहूं.

## उपभोगप्रवृत्तीची जोड.

त्यानें रामयणकाळांतील केवळ नीति (Morality) व भारतकाळांतील केवळ बुद्धि (Intellectual activity) यांना भौतिकाची (Material aspect ) जोड दिली. कठोर कर्तव्यनिष्ठा व धर्माधर्मविवेक यांच्या जोडीला भौतिक उपभोगापासून होणारें समाधान असल्याशिवाय मानवी जीवन पूर्ण होत नाहीं. बुद्धि व नैतिक प्रवृत्ति यांच्या समाधानांत जर इंद्रियें भुकीं राहिलीं तर तें मानवी जीवन अपूर्णच होय. महाभारत-रामायणकालांत नैसर्गिक उपभोगप्रवृत्ति होती. पण त्या उपभोगांत कलात्मकता, सुसंकृतता व रसिकता नव्हती म्हणून त्याग व भोग, वैभव व वैराग्य, शौर्य व शृंगार आणि धर्मार्थकाम व मोक्ष यांचा सुंदर समन्वय कालिदासानें आपल्या काव्यांत प्रत्यक्ष उदाहरणांनीं केला. नैतिक व बौद्धिक जीवनाला इंद्रियगम्य व उपभोगात्मक सौंदर्याची जोड दिली. जगातील अंतिम सत्याचें (Absolute) आकलन इंद्रियद्वारा– म्हणजे इंद्रियजन्य संस्कारांनीं जागृत झालेल्या भावनाच्या द्वारा– केलें कीं सौंदर्यप्रतीति होते. व्यासांनीं सत्य व वाल्मीकीनें शिव आकळिलें होतें.

त्याला कालिदासानें उपभोगात्मक सुंदर जोडलें व 'सत्यं शिवं सुंदरं' या महाकाव्यरचनेच्या त्रैगुण्याची मूर्ति पुरी केली. या कालिदासाच्या कामगिरीला कोणीं विलासप्रियता तर कोणीं शृंगारनिष्ठा अशीं नांवें द्यावीं हवीं तर.

## कालिदास 'कविकुलगुरु' कां ?

व्हर्जिलच्या साम्राज्यवादाप्रमाणें कालिदासानेंहि आदर्श राजसंस्था चित्रित केली व त्यागाला उठाव देऊन श्रुति-स्मृति-पुराणोक्त आर्य संस्कृतीचें काव्यमय रूप तिच्या रोमरोमांत भिनवून टाकलें. आर्ष-काव्यें व पुराणें यांतील अद्भुतताहि त्यानें वापरली. पण ती कशासाठीं ? तर सत्य अधिक परिणामकारक व्हावें म्हणून. दिलीपाशीं बोलणारा सिंह व आकाशांतून होणारी सुवर्णांची वृष्टि ( रघु सर्ग २ व ५) ह्या अद्भुत घटना आहेत. पण ध्येयवाद विरुद्ध उपयुक्ततावाद व सुकृताची ह्या लोकीं सफलता हीं दोन तत्त्वें त्यांनीं अधिक रमणीय करून दाखविलीं आहेत. (पृ.९९) वाल्मीकि-व्यासांनीं आपल्या साध्या पण अव्याजमनोहर भाषाशैलीनें आपल्या प्राथमिक कलेचें सहजस्फूर्त व अनुभवजन्य ज्ञानाशीं साहचर्य दाखविलें. तर कालिदासानें आपल्या कमावलेल्या नागर व अलंकृत भाषाशैलीनें आपल्या श्रेष्ठ कलेचें पांडित्य, वैदग्ध्य व उच्च ध्येय यांच्याशीं साहचर्य दाखविलें आहे. असो. तर महाकाव्याचा हेतु ( epic intention) त्याची कल्पना व पद्धत (epic conception and manner) व त्याची विशिष्ट ढब ( style ) या महाकाव्यांच्या प्राणभूत घटकांचा नवा पाया घालून विदग्धमहाकाव्यरचना त्यानें प्रवर्तित केली. कालिदासाला 'कविकुलगुरु' हें अनन्यसामान्य बिरुद उत्स्फूर्त आदरानें रसिक बहाल करतात तें याच्च गोष्टीसाठीं असावें काय ?

## कालाचा कवींवर परिणाम.

मागें सांगितल्याप्रमाणें विदग्ध महाकाव्यरचनेचे वेळीं बदललेल्या काळाचा कवींवर व त्यांच्या विदग्ध काव्यांवर कसा प्रत्यक्ष परिणाम झाला तें पाहूं. येथून पुढचे बरेचसे कवि राजाश्रयाला होते, विशिष्ट धर्माचे किंवा दर्शनाचे अभिमानी होते, पंडित आणि विदग्ध होते, व स्वकालज्ञ होते.. त्यामुळें आपलें काव्यप्रयोजन न सोडतां प्रच्छन्नपणें किंवा उघडपणें राजस्तुति करणें, त्या त्या धर्माची व धर्मपुरुषाची थोरवी गाणें,

पांडित्य, कला व चातुर्य यांचें प्रकटन करणें व त्यांतून स्वकालाच्या छटा प्रकट करणें असे त्यांचे पोटहेतु होते. आपल्या उत्कट रसवत्तेनें समाजाच्या वरच्या थराच्या भावनांना आवाहन करून त्यांनीं जुन्या आदर्शानुसार नव्याची घडी बसविली. स्वकालाची उन्नति किंवा अवनतीहि जुन्या आदर्शांच्या चित्रणानेंच त्यांनीं ध्वनित केली. दिलीप, रघु किंवा राम हे आदर्श राजे होते असें दाखविल्यानें स्वकालाच्या हीन राजांचें हीनत्व व श्रेष्ठ राजांचें श्रेष्ठत्वहि केवळ सूचित तुललेनें प्रकट होतें. हीच गोष्ट कालिदासानें केली. विक्रमादित्य, किंवा गुप्तघराण्यांतील पराक्रमी आणि दिग्विजयी राजांची ध्वनित स्तुति किंवा कांहीं नालायक राजांची निंदाहि (रघु ८.२ व अग्निवर्णवर्णन सर्ग १९) कालिदासानें एकदमच ध्वनित केली आहे. इटालियन् सम्राट ऑगस्टस् यानें व्हर्जिलला रोमबद्दल प्रेम व स्वराष्ट्राभिमान उद्दीपित करणारें काव्य लिहावयास सांगितलें. त्यावरून त्यानें ग्रीक आदर्श डोळ्यांपुढें ठेवून आपलें 'एनीड' महाकाव्य लिहिलें. स्पेन्सरच्या 'फेअरी क्वीन' या महाकाव्यांत मोठ्या सूचक पद्धतीनें एलिझाबेथ राणीचा अपूर्व गौरव केला आहे व तिच्या शत्रूंचा फाजितवाडा उडविला आहे.

**राजाश्रित कवि.**

इटॅलियन कवि टॅसो यानें फेरारा च्या ( Ferrara ) राजदरबारीं असतांना आपलें 'जेरूसलेम डिलिव्हर्ड' हें काव्य लिहिलें. तो तेथील दरबारी मंडळींत वावरत होता. त्यामुळें आपलें काव्य त्यांना पसंत पडेल याच पद्धतीनें त्यानें लिहिलें. भारवि हा कांची येथें पल्लव राजा सिंहविष्णु याच्या दरबारीं होता. 'नैषध'कर्ता श्रीहर्ष कनोजचा राजा जयचंदाचे पदरी होता. 'नवसाहसांकचरित'कार पद्मगुप्त हा मुंज राजाच्या दरबारीं होता. 'विक्रमाङ्कदेवचरिता'चा कर्ता काश्मीरी कवि बिल्हण यानें चालुक्यराजा त्रिभुवनमल्ल यांच्या आश्रयास राहून आपली काव्यरचना केली. 'शहानामा'चा कर्ता फिर्दौसी हा गझनीच्या महमुदाचा आश्रित होता (१०वें शतक). मोठा कवि म्हटला कीं तो राजाश्रयाला असावयाचाच असा पूर्वी नियमच झाला होता. कारण सामान्य लोक अद्यापि मोठ्या कवीला आश्रय देऊं शकत नव्हते. या कारणास्तव या विदग्ध काव्यांना राजकाव्यें

( Court epics ) म्हणतात. आर्षकाव्यांचे प्रणेते कोणा राजाच्या पदरीं नव्हते. वाल्मीकीनें आपलें रामायण आदर्श राजा श्रीरामचंद्र यावरील अन्यहेतुनिरपेक्ष आदरामुळें निर्माण केलें आणि व्यासमुनि हे तत्त्वज्ञानाच्या बैठकीवरून स्ववंशीयांच्या रोमहर्षण युद्धकथा सांगण्यास प्रवृत्त झाले.

## धर्माश्रित कवी.

बुद्धकवी अश्वघोष व शिवस्वामी, जैन कवी भट्टार हरिचंद्र व हेमचंद्र यांचीं महाकाव्यें केवळ धार्मिक हेतूनेंच लिहिलेलीं आहेत. कालिदास व भारवि शिवभक्त, माघ वैष्णव, व श्रीहर्ष अद्वैतमताभिमानी होता. मिल्टन् प्युरिटन् पंथाचा अभिमानी व राजसंस्था व चर्चचें वर्चस्व यांचा कट्टा द्वेष्टा होता. डांटे कॅथॉलिक पंथाचा अभिमानी होता. इटॅलियन् कवि टॅसो याचें Jerusalem Delivered हें महाकाव्य ख्रिश्चन धर्माच्या उत्कट अभिमानानें लिहिलेलेंअसून क्रूसेडर वीरांनीं आपलें धर्मपीठ जेरुसलेम हें नास्तिकांच्या हातांतून सोडवून घेतल्याची कथा त्यांत सांगितली आहे.

## चाढती शृंगारिक प्रवृत्ति.

विदग्ध काव्य राजवर्णनपर असो कीं धार्मिक असो त्यांत शृंगाराला प्राधान्य असावयाचेंच हा नियम संस्कृतांत ठरल्यासारखा दिसतो. उत्तरकाल अधिक भौतिक झाल्यामुळें म्हणा, किंवा समाज अधिक स्थिर झाल्यानें सामाजिक संबंध अधिक जिव्हाळ्याचे झाले म्हणून म्हणा, किंवा राजेरजवाडे व उच्च राहणीचे निवडक सुखलोलप व विलासी श्रीमंत वाचक यांची आवड पुरविणें पुढील लौकिक व राजाश्रयी कवींना आवश्यक झाल्यामुळें म्हणा, शृंगाराचें स्तोम संस्कृत काव्यांत फार माजलें. पंचमहाकाव्याच्या शहाण्णव सर्गांपैकीं बत्तीस सर्गांत शृंगार आहे. सवड, संपदा आणि क्रीडावृत्ति यांच्या साहचर्यानें उत्पन्न होणारी ही शृंगारभावना पूर्वीच्या वीरयुगीन महाभारत-रामायणांत नाहीं. तेथील कामप्रवृत्ति सहजावस्थेंत आहे.पण पुढें 'कामशास्त्र','रतिरहस्य' इत्यादि शृंगार शास्त्रावरील ग्रंथ प्रकट होऊन शृंगाराच्या चित्रणाला शिष्टमान्यता मिळाली. इतकेंच नव्हे तर तरुण-तरुणींनीं मिळून करावयाच्या उद्यानकेली, मधुपान, जलक्रीडा, पुष्पावचय व सुरतोत्सव या शृंगारविषयांचा समावेश विदग्धमहाकाव्यलक्षणांत झाला. शृंगाराबरोबरच वात्सल्य, मित्रप्रेम, व्याही, जामात, दीर, नणंदा इत्यादींबद्दलची आपुलकी, अतिथिसत्कार, दानप्रवृत्ति

इत्यादि सामाजिक प्रेमाचे प्रकार विदग्ध काव्यांत जास्त प्रमाणांत येतात. श्रीहर्षांचा नायक नल हा तर वीर नसून एक आदर्श गृहस्थच आहे.

## पाश्चात्यांचा संयमित शृंगार.

वीरयुगांतील ऋषिकवींच्या नीतिकल्पनांना शृंगारलोलुपता फारशी मानवणारी नसल्यानें तिचें स्वादिष्ट चित्रण कोणत्याच आर्ष काव्यांत नाहीं. ग्रीकांच्या देवदेवतांप्रमाणें आमच्या इकडील इंद्रादिदेवांना व देवांगनांना मात्र या बाबतींत जास्त मुभा आहे. पण अर्जुन व ओडीसिअस् हे मानवी वीर मात्र गैर स्त्रीमोहाला वश होत नाहींत. Romantic epics मध्यें स्त्रीदाक्षिण्ययुक्त प्रेमाचा आविष्कार आहे. त्याचा थोडा परिणाम यूरोपांतील विदग्ध काव्यावर झाला आहे. तथापि सम्राट ऑगस्टस् याच्या या बाबतींतील कडक धोरणामुळें व्हर्जिलच्या 'एनीड'मधील शृंगार संयमित व मित आहे. टॅसो कॅमाईन्स यांच्यावर बोइआर्डो (Boiardo) व ॲरिओस्टो (Ariosto) यांच्या Romantic epics मधील शृंगाराचा परिणाम झाला असूनहि आपल्या काव्याचें गांभीर्य राखण्यासाठीं ते शृंगाराच्या बाबतींत संयमानेंच वागतात. मिल्टन् हा आदर्श दांपत्यप्रेम चित्रित करतो पण उत्तान शृंगारांत रमत नाहीं. शृंगाराप्रमाणें ग्राम्य व थिल्लर विनोद हाहि युरोपिअन विदग्ध काव्यांत नाहीं. आपलें गांभीर्य न सोडतां केलेला थोडासा विनोद, कालिदास करतो तसा, त्यांच्यामध्येंहि आहे. आमचे भारवि-माघ गंभीर वृत्तीचे आहेत. एकंटा श्रीहर्ष मात्र कांहीं ठिकाणीं ग्राम्य विनोद करतो.

## युद्धाचें क्षेत्र बदललें.

युद्धें हा जो वीरयुगीन काव्यांचा प्राण त्याचें महत्त्व व जिवंतपणा पुढील काव्यांत कमी झाला. ईलियड्, रामायण-महाभारत किंवा बेओऊल्फ्मधील युयुत्सु वृत्तीचें चित्रण जिवंत व हुबेहूब आहे. पण व्हर्जिल व आपल्याकडील भारवि-माघादि कवि यांनीं काढलेलीं युद्धचित्रें निर्जीव व काल्पनिक वाटतात. व्हर्जिलच्या युद्धवर्णनाबद्दल बोलतांना नेपोलियन असें म्हणाला होता म्हणे, "होमरचीं युद्धवर्णनें इतकीं हुबेहूब व स्वाभाविक आहेत, कीं तीं त्यानें ट्रोजन युद्धांतील वीर ॲगेमेम्ननू याच्या खुद्द डायरींतून घेतलीं असावीं असें वाटतें. पण व्हर्जिलचीं युद्धवर्णनें अस्वाभाविक व असंबद्ध आहेत." आमचे माघ-भारवि तर युद्धांच्या हालचालींतील तपशिलापेक्षां किंवा शस्त्रा-

स्त्राच्या घावांपेक्षां त्यांच्या वर्णनांत योजावयाच्या कृत्रिम बंधांतील शब्द-योजनेकडेच अधिक लक्ष देतात ! ( पहा. किरात सर्ग १५ व शिशु. सर्ग १९ ). भारत-रामायणांच्या कथांतील युद्धें या विदग्ध कवींवर लादलीं गेलीं आहेत असें वाटतें. उत्तरकालांत शारीरिक बलापेक्षां मानसिक बलाकडे लक्ष जास्त वेधलें व त्यामुळें मानसिक लढ्यांपुढें शारीरिक लढे फिके झाले. जुन्या युद्धांपेक्षां त्या युद्धांतून उत्पन्न झालेल्या फलाची नैतिक मीमांसाच पुढें जास्त होऊं लागली. युद्धें हीं केवळ रूपकें किंवा इसापनीतींतील कल्पित कथा ठरल्या व युद्धरूपकांच्या सूचित अर्थांकडे किंवा तात्पर्यांकडे अधिक लक्ष वेधलें. मिल्टननें तर वीरयुगांतील वीर्यांची कल्पना साफ बदलून टाकली. त्यानें धर्मपर काव्यवृक्षावर वीरकाव्याचें कलमच जणुं काय बांधिलें ! त्याला रणांगणावर हिरीरीनें लढणाऱ्या वीरांच्या द्वंद्वयुद्धापेक्षां शिव व अशिव, श्रेयस् व प्रेयस्, विवेक व विकार आणि धर्म्य व अधर्म्य या द्वंद्वांचीं युद्धेंच अधिक मोलाचीं वाटलीं. वीरयुगांतील अर्थरच्या प्राचीन कथेवर आपलें काव्य आधारणारा टेनिसन् तर स्वच्छच सांगतो कीं, 'माझा काव्यांतील अर्थर म्हणजे आत्मा (Soul) असून त्यांचें राउंड टेबल म्हणजे मानवी विकार (Passions) आहेत.'

**प्रसंग कां प्रतीक ?**

केवळ युद्धेंच काय, जुन्या कथांतील इतर प्रसंगसुद्धां अशाच कांहीं तत्त्व-ज्ञानात्मक, धार्मिक किंवा नैतिक तत्त्वांचीं केवळ उदाहरणें म्हणून चितारण्यात येऊं लागलीं. रघुवंशातील दिलीपसिंह-संवाद (सर्ग २) व रघु-कौत्सप्रसंग (सर्ग ५) यांत अनुक्रमें 'उपयुक्ततावादापेक्षां कर्तव्यनिष्ठा श्रेष्ठ' व 'सत्का-र्यांत वेंचलेलें धन दात्याला कोणत्या ना कोणत्या रूपांत परत मिळतें' हीं दोन नीतितत्त्वें मोठ्या सूचक पद्धतीनें गोविलीं आहेत. भारतांतील भीम-द्रौपदी-युधिष्ठिर व इंद्र-अर्जुन यांच्या संवादांत भारवीला अर्थकाम विरुद्ध मोक्ष हाच लढा प्रामुख्यानें दिसतो. एकनाथ, वामन पंडित वगैरे मराठी आख्यानकवींनीं तर पूर्ण वेदान्ती दृष्टीनें रामायण-महाभारतांतील आख्यानें सांगितलीं आहेत.

यावरून असें दिसून येईल कीं विदग्ध काव्यांत उत्तरोत्तर विकास आहे तो काव्यरचनेच्या हेतूचा (Development of epic intention).

विदग्ध महाकाव्यांत स्थूल प्रसंगांपेक्षां त्या प्रसंगांतील सूक्ष्म तत्त्वाला जसें महत्त्व आलें त्याप्रमाणें कथेपेक्षां कथनकौशल्याची मातब्बरी अधिक ठरली. वस्तूपेक्षां तिच्यावरील जडावाला व प्रसंगापेक्षां त्याच्या कलात्मक मांडणीला प्राधान्य आलें. त्यामुळें कमावलेली भाषा, जाणिवेनें योजलेले शब्दांचे व अर्थांचे अलंकार, परिश्रमानें योजलेलीं विविध वृत्तें, नाट्यमय मांडणी, स्वभावलेखन, विविध रसांचा परिपोष, ध्वनि, वक्रोक्ति, योग्य प्रसंगीं निसर्गाचीं वर्णनें, अर्थान्तरन्यासात्मक सुभाषितांची पेरणी, वातावरणनिर्मिति इत्यादि कथनकलेच्या मोहक विलासांनीं पुढील काव्यें नटलेलीं दिसतात. अगदीं जाणिवेनें प्रदर्शित केलेलें पांडित्य हा तर पुढील काव्यांचा फारच मोठा विशेष आहे. आमच्याकडील एकाहि महाकवि अपंडित नाहीं. उलट आमच्या काव्यांत पांडित्याच्या कमतरतेपेक्षां त्याची विपुलताच जास्त जाणवते. पात्रांच्या संभाषणांतून व उपमा-उत्प्रेक्षादि अलंकारांच्या द्वारें या सर्व पंडित कवींचें शास्त्रज्ञान काव्यभर विलसत राहिलेलें दिसतें.

## महाकवींची आत्मनिष्ठा कीं वस्तुनिष्ठा ?

विदग्ध काव्यांत दिसणारी फार महत्त्वाची गोष्ट म्हणजे कवीची वाढती आत्मनिष्ठा (subjectivity). होमर, वाल्मीकि व व्यास हे इतके आत्मनिष्ठ नाहींत. कोलरिज् होमरबद्दल तर असें म्हणतो कीं 'त्याच्या काव्यावर (स्वतःच्या व्यक्तित्वाचा ठसा तर राहोच. पण ) त्याच्या देशाचाहि ठसा उमटलेला नाहीं. त्याच्या युगाचा ठसा त्यावर आहे. (In Homer, there was the individuality of an age, but not of a country') त्यांच्या काव्यांतील पात्रें स्वतांच्याच मुखानें बोलतात, त्यांनीं योजलेले प्रसंग आपल्याच तन्त्रानें वागतात, घटना आपल्याच कलानें घडतात, वस्तु आपल्याच रूपानें वावरतात व शब्दहि आपलाच अभिप्राय आपणच सांगतात. तात्पर्य, त्यांच्या काव्यांत वस्तूला तिचें असणारें वस्तुपण कायम ठेविलेलें आहे. म्हणून त्या आदि कवींत जास्त वस्तुनिष्ठा (objectivity) आहे असें म्हटलें. अर्थात् कोणीहि कवि पूर्णपणें वस्तुनिष्ठ असूं शकत नाहीं. कांहीं महात्म्यांचा स्वार्थच जसा परार्थ होतो तशी या प्राचीन कवींची आत्मनिष्ठा तिच्या व्यापकपणामुळेंच वस्तुनिष्ठा झाली आहे. पण पुढील कवींची आत्मानिष्ठा इतकी व्यापक नाहीं. 'मी कालिदास

बोलतों आहें, मी मिल्टन् हें सागतों आहें, माझीं भारवीचीं वा श्रीहर्षाचीं हीं मतें आहेत' अशी जाणीव या व्यक्तिनिष्ठ (self-conscious) कवींच्या मनांत स्फुरत आहे. त्यांचीं पात्रें कवीच्या मनानें विचार करतात, कविमुखानें बोलतात, त्यांचे प्रसंग व घटना कवीच्या धोरणानें घडतात, वस्तू कवि देतील तीं रूपें धारण करतात व शब्दांच्या चलनी नाण्यांवरहि कविसम्राटाचे मुखवटे उमटविलेले असतात.

**यांत सरसनीरस कोण ?**

पण आदिकवींच्या वस्तुनिष्ठेला वर जशी व्यापक आत्मनिष्ठेची मर्यादा सांगितली तशी या विदग्ध कवींच्या आत्मनिष्ठेचीहि एक मर्यादा सांगितली पाहिजे. शेले, बायरन्, केशवसुत, गडकरी इत्यादि भावकवींप्रमाणें ( Lyrical poets ) कालिदास-भारवि हे भावकवी नव्हेत. त्यांची आत्मनिष्ठा केवळ स्वतांच्याच भावनाकल्पनांपुरती मर्यादित नाहीं. ते स्वतःमध्यें जग पाहत नाहींत. त्याची आत्मनिष्ठा स्वकालाच्या ( निदान स्वकालातील एका विशिष्ट, निवडक व प्रभावी वर्गाच्या ) सामुदायिक मनाशीं एकरूप झालेली आहे. ते जगांत आपल्याला पाहतात. वीरयुगें जशीं होमर-वाल्मीकींच्या मुखानें बोललीं तशीं उत्तरकालीन युगाची संस्कृति कालिदास-श्रीहर्षाच्या मुखानें बोलते आहे. तात्पर्य, बदललेल्या नव्या सुसंस्कृत कालाला जें वाटत होतें, त्याला जें दिसत होतें व त्याला जें व्यक्त करावयाचें होतें, तें तें हे कवि आपल्या लेखणीनें वठवीत होते. म्हणून आर्षकाव्यें आपल्या वस्तुनिष्ठेनें आपल्या काळाशीं जितकीं समरस झालेलीं होतीं ( were as close to their subject ) तितकींच विदग्ध काव्येंहि आपल्या काळाशीं समरस झालेलीं होतीं. त्यामुळें अस्सल ( Authentic ) व कमअस्सल (Secondary), नैसर्गिक ( Primary किंवा Natural ), व कृत्रिम ( Artificial ), आणि लोककाव्यें ( Folk-epics ) व राजसभाकाव्यें ( Court epics ) अशीं आर्षकाव्यें व विदग्ध महाकाव्यें यांना दिलेलीं विशेषणें उभयपक्षीं हीनत्वदर्शक किंवा श्रेष्ठतावाचक न समजतां केवळ स्वरूपदर्शकच समजलीं पाहिजेत.

एकंदरीनें असें म्हणतां येईल कीं आर्षकाव्यांकडून विदग्ध काव्यांकडे येतांना वाचकांना गणराज्यांतून साम्राज्यांत, स्थूलांतून सूक्ष्मांत, ओबड-

धोबडांतून सफाईत, उंचीवरून खोलींत, रणांगणांतून गृहांगणांत, युद्धांतून शान्ततेंत, व्यक्तीकडून समाजांत व एका संस्कृतींतून उच्चतर संस्कृतींत आल्यासारखें वाटेल. हीं दोन्हीहि काव्यें आपापल्यापरी उत्तमच आहेत. यांत बरें-वाईट, हीन-चांगलें व सरस-नीरस असा भेद नाहीं. धारोष्ण दूध व बासुंदी, स्वैर वाहणारी सरिता व बांधून काढलेला संथ कालवा व मोकळें वन आणि बंदिस्त उद्यान यांत सरस-निरस कोणतें? हा बदलत्या कालाचा किंवा संस्कृतिविकासाच्या दोन अवस्थांचा परिपाक आहे.

## संस्कृत महाकाव्यांचीं लक्षणें

इतकें विवेचन झाल्यावर आतां विदग्ध महाकाव्याचीं संस्कृत साहित्य-शास्त्रकारांनीं दिलेलीं लक्षणें पाहूं व नंतर त्यांचें मूल्यमापन करूं. विदग्ध-महाकाव्याचीं लक्षणें 'अग्निपुराण'कार ( ३३७.२०-३२ ), 'काव्यालंकार'कर्ता भामह ( १.१९ ), 'काव्यादर्श'कार दण्डी (१.१४-२० ), 'सरस्वतीकण्ठाभरण'कार भोज ( ५.१२८ ) 'साहित्यदर्पण'कार विश्वनाथ ( ६.३२४ ), व 'ईशानसंहिता'कार इतक्यांनीं दिलीं असून त्यांत पुष्कळच सारखेपणा आहे. चौदाव्या शतकांतील विश्वनाथानें 'साहित्यदर्पणां'त दिलेलीं लक्षणें बहुतेक पूर्ण आहेत. कारण त्याच्यासमोर पुष्कळच महाकाव्यें होतीं. लक्षणीय विषयांच्या समग्र अवलोकनामुळें त्याचीं लक्षणें व्यापक आहेत. येथें तीं देताना १ कथा, २ पात्रें, ३ सजावट, ४ रचना, ५ भाषाशैली व ६ हेतु, अशा सहा अंगांनीं त्यांचें पृथक्करण करणें इष्ट आहे.

**१ महाकाव्यांची कथा** ( Story )— ( रामायण-महाभारतादि ) इतिहास किंवा इतर साधुशील पुरुषांचीं चरित्रें यांतून निवडावीं. ती कथा मोठी असावी.

**२ पात्रें**-- त्यांतील नायक देव किंवा थोर क्षत्रियकुलांतील पुरुष, किंवा धीरोदात्त गुणांनीं युक्त चतुर महापुरुष असावा. नायक एक किंवा अनेकहि चालतील. नायिका, मुनि, दूत, योद्धे, व असती स्त्रिया ( अग्निपुराणकाराच्या मतें ) व खलनायक इत्यादि इतर पात्रें त्यांत असावीं

**३ सजावट** --मुख्य कथानक उठावदार व्हावें म्हणून त्यांत पुढील विषय व प्रसंग घालावे. **विषय**–प्रभात, मध्याह्न, सायंकाळ, रात्र, अंध-

कार, सहा ऋतु, पर्वत, सागर, नद्या, अरण्यें, चंद्र, सूर्य, उद्यानक्रीडा, जलविहार, मद्यपान, सुरतक्रीडा, नगरें, मुनि व त्यांचे आश्रम, स्वर्ग व यज्ञ.

**प्रसंग**– विवाह, पुत्रजन्म, रणप्रयाण, दूतप्रेषण, राजकारणचर्चा, वियोग, समागम व मृगया ( शिकार ).

शृंगार, वीर व शांत यांपैकीं कोणतातरी एक रस मुख्य करून इतर सर्व त्याला पोषक असावे काव्यांत अलंकार असावे.

**४ रचना**–प्रारंभीं आशीर्वाद किंवा इष्ट देवतेला प्रणाम असावा. किंवा एकदमच कथेला सुरुवात करावी. कथेचे सुटे व सुसंबद्ध भाग पाडून त्यांना सर्ग म्हणावे. ते फार मोठें नसावे व लहानहि नसावे. ते सर्ग श्रुतिसुभग वृत्तांत रचावे. एका सर्गांत एकच वृत्त असावें. क्वचित् अनेक वृत्तेंहि चालतील. मात्र सर्गाच्या शेवटचा श्लोक निराळ्या वृत्तांत असावा. प्रत्येक सर्गाच्या शेवटीं पुढील सर्गांतील विषयाची सूचना दिलेली असावी. सर्व सर्ग एकमेकांशीं संबद्ध असावे, म्हणजे नाटकांत असतात तसे कथानकविकासाचे सर्व टप्पे ( अवस्था ) व संधी सुसंबद्धपणें यावे. त्यांची संख्या आठांपेक्षां कमी व तिसांपेक्षां जास्त ( ईशान संहितेप्रमाणें) नसावी. कवि, प्रतिपाद्य विषय, नायक किंवा इतर महत्त्वाचें पात्र यांना धरून महाकाव्याला नाव द्यावें. प्रत्येक सर्गाला नांव द्यावयाचें असेल तर त्यातील कथेवरून तें द्यावें.

**५ भाषाशैली**– वैदर्भी, गौडी, पांचाली, लाटी वगैरे सर्व प्रमुख रीति यथाप्रसंग योजाव्या, व माधुर्य, ओज, प्रसाद इत्यादि गुणांनीं व शब्दार्थालंकारांनीं शैली चांगली भरघोस करावी. (अग्निपुराणकार मत). यांत उपनागरिका, परुषा व कोमला या वृत्ती असाव्या. प्रसंगोचित भाषाशैलीनें अनेक रसांचा व भावाचा चांगला परिपोष व्हावा.

**६ हेतु**— धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांचें साधन हा महाकाव्यरचनेचा हेतु असावा. महापुरुषांच्या थोर कीर्तीचें वर्णन, सज्जनांची स्तुति व दुर्जनाची निंदा त्यांत असावी. मात्र हें काव्य लोकरंजक असावें. एवंगुणविशिष्ट काव्य अजर व अमर होतें. वरील लक्षणांपैकीं सर्वच्या सर्व लक्षणें एकाच काव्यांत असावयास पाहिजेत

असें नाहीं; प्रसंगानुसार त्यांतील जमतील तीं लक्षणें काव्यांत आणलीं तरी चालतील.

**अंतरंगाचा विचार नाहीं-**

विदग्ध महाकाव्याचीं वरील लक्षणें एकंदरीनें व्यापक व पुरेशीं मार्गदर्शकहि आहेत. पण तीं प्रायः बाह्यांगविषयकच आहेत. त्यावरून महाकाव्याचा साचा ( form ) कसा असावा याचा चांगला बोध होतो. पण त्यांत स्फुरणाऱ्या चैतन्याची कल्पना त्यावरून येत नाहीं. महाकाव्याची कथा सांगतां सांगतां मानवी जीवनाच्या कोणत्यातरी एका अंगाचें दर्शन घडविणें व त्यासाठीं प्रतीक म्हणून तीं तीं दृश्यें किंवा प्रसंग कल्पकतेनें योजणें हें महाकाव्यरचनेचें प्राणभूत तत्त्व आहे. आमच्याकडे दिलेलें चतुर्विध पुरुषार्थसाधन हें काव्यप्रयोजन दिसावयाला पुरेसें व्यापक असलें तरी काव्यरचनेच्या वरील हेतूंची निश्चित कल्पना त्यानें येत नाहीं. चतुर्विध पुरुषार्थ हें सर्वच काव्यप्रकारांचें व शास्त्रांचें, फार काय, सर्व मानवी जीवनाचेंहि ध्येय आहे.

त्यामुळें रामायण-महाभारतांतील कथेवर आधारलेलें व वरील बाह्यांगविषयक नियमांनीं युक्त असें कोणतेंहि काव्य आमच्याकडे महाकाव्य ठरतें ! व्याकरणशास्त्र व साहित्यशास्त्र यांच्या उदारहणासाठीं रचलेल्या 'भट्टिकाव्या'ला किंवा द्विसंधान, त्रिसंधान वगैरे शाब्दिक चमत्कार दाखविण्यासाठीं लिहिलेल्या तंत्रबद्ध काव्यांना 'महाकाव्य' म्हणवून घेण्याचा अधिकार प्राप्त होतो ! व महाभारत आणि भागवत यांत सांगितलेल्या शिशुपालवधकथेवा कोणताहि खोल अर्थ ( significance ) मनाशीं निश्चित न करतां व कोणत्याहि थोर तत्त्वाचें प्रतीकात्मक चित्रण मनाशीं न योजतां माघ हा केवळ बाह्यांगाच्या सुंदर सजावटीमुळें आणि पांडित्य व कल्पकता यांवरच आमच्याकडे उच्च दर्जाचा महाकवि ठरतो ! अर्थात् फार थोर महाकवी व फार उच्च कोटींतील महाकाव्यें यांबद्दलच फार थोर व उच्च हेतूंची अपेक्षा करावयाची. इतर कवींच्या महाकाव्यांचें मूल्यमापन बाह्यांगावरून, व्हावें हें व्यवहारदृष्ट्या ठीकच आहे. कांहीं काव्यांतून तर महाकाव्यांच्या बाह्यांगांपैकीं कांहीं अंगें आढळलीं तरी त्यांना 'महाकाव्य' संज्ञा दिली जाते.

## खण्डकाव्यें व विदग्ध महाकाव्याचे इतर प्रकार.

महाकाव्याच्या दीर्घतेच्या अपेक्षेनेंच, म्हणजे महाकाव्याचा एक छोटासा स्वयंपूर्ण तुकडा (खण्ड) म्हणून, 'खण्डकाव्य' ही संज्ञा कांहीं निबद्ध लघुकाव्यांना दिलेली आढळते. याचें उत्तम उदाहरण कालिदासाचें 'मेघदूत' हें होय 'खण्डकाव्यं महाकाव्यस्यैकदेशानुसारि च्च' ह्या विश्वनाथाच्या साहित्यदर्पणांतील व्याख्येवरूनहि हेंच अनुमान दृढ होतें. विषय लौकिक, रस प्रायः शृंगार व छोटा प्रसंग किंवा कथा असा याचा थाट असतो. या प्रकाराला इंग्रजी Idyl हा शब्द ठीक होईल. बिल्हणाची 'चौरपञ्चाशिका' व इतर संदेशकाव्यें हीं खण्डकाव्याचीं उदाहरणें होतील. मराठींत 'खण्डकाव्य' हा शब्द हल्लीं चिन्तनपर, विडम्बनात्मक व कथाप्रधान अशा कोणत्याहि लहान काव्यांना लावतात. यांत महाकाव्याचा 'एकदेश' म्हणजे भाग असतो येवढें सांगण्यापलीकडे विश्वनाथानें तरी जास्त काय सांगितलें आहे ?

पाश्चात्य काव्यांत स्पेन्सरचें Faerie Queen हा Romantic epicचा, मिल्टनचें Paradise Lost हा Classical epic चा व पोपचें Rape of the Lock हा Mock-heroic-epic चा नमुना मानतात. आमच्याकडचीं विदग्ध काव्यें मात्र केवळ classical या प्रकारांतच बसतात. Romantic epics हीं अद्भुतरम्य महाकाव्यें. यांमध्यें अद्भुत, काल्पनिक, असंभवनीय व असत्य यांचें प्रमाण अधिक असून स्त्रीदाक्षिण्यप्रेरित प्रेमाचा समावेश असतो. यांचा ओढा ठराविक चाकोरीपलीकडे जाऊन कांहीं नवें सांगावें व वैचित्र्य आणावें यांकडे असतो. यांतील कांहीं गोष्टी classical epics मध्यें केवळ अलंकार म्हणून येत असल्या तरी त्यांची प्रवृत्ति एकंदरींत प्रत्यक्ष पौराणिक किंवा ऐतिहासिक घटना, संभवनीयता, नियमबद्धता आणि सत्य यांकडे जास्त असते. आमच्याकडील सुबंधूची 'वासवदत्ता' व बाणाची 'कादम्बरी' या गद्यकथा Romantic epicच्या धर्तीच्या आहेत. प्रत्यक्ष Romantic epic मात्र आमच्याकडे नाहीं. विडंबनात्मक (mock-heroic ) महाकाव्यें तर आमच्याकडे अजिबातच नाहींत. तिकडे ग्रीकांच्या The Battle of Frogs and Mice या विडंबनपर काव्यापासून ही परंपरा चालत आली आहे. उदात्त, भव्य व पवित्र कल्पनांचें विडंबन निदान महाकाव्यांत तरी आमच्याकडे निषिद्ध मानलें गेलें आहे असें दिसतें.

## ( ५ ) विदग्ध महाकाव्यांची सजावट

### काव्याचीं बारा उत्पत्तिस्थानें.

विदग्ध-महाकाव्यांचा उगम, आधार व मूळ सामग्री (epic material) कोणती तें मागें सांगितलें ( प्र. पृ. ८ ). म्हणजे तेथें विदग्ध महाकवींनीं कथा कोठून घेतल्या याचा ऊहापोह केला. आतां त्या निवडलेल्या कथांची भरघोस व डौलदार सजावट विदग्ध कवींनीं कशाच्या आधारें केली तें पाहूं. आमच्याकडे कवीनें कांहीं ग्रंथांचें अध्ययन करून अंगीं पांडित्य व बहुश्रुतता वाढवावी व निसर्गदत्त प्रतिभेला ( शक्तीला ) व्युत्पत्तीची जोड द्यावी असा सर्व शास्त्रकारांचा कटाक्ष आहे. भामह, वामन, क्षेमेंद्र, राजशेखर व विनयचंद्र यांनीं कवीला काव्याची सजावट करावयास योग्य अशी सामग्री विस्तारानें सांगितली आहे. राजशेखर आपल्या 'काव्यमीमांसें'त (अ. ८) म्हणतो ' १ श्रुतिः, २ स्मृतिः, ३ इतिहासः, ४ पुराणं, ५ प्रमाणविद्या, ६ समयविद्या, ७–९ राजसिद्धान्तत्रयी, १० लोको, ११ विरचना, १२ प्रकीर्णकं च काव्यार्थानां द्वादश योनयः ।' म्हणजे चार वेद, मन्वादि स्मृतिग्रंथ, रामायण-भारतादि इतिहास, पुराणें, मीमांसा, न्याय, वैशेषिक, बौद्ध इत्यादि प्रमाणविद्या, शैव, वैष्णव, बौद्ध इत्यादि समय-(पंथ) विद्या, अर्थशास्त्र, नाट्यशास्त्र, कामशास्त्र ही शास्त्रत्रयी, निरनिराळ्या देशांतील प्राकृत व विदग्ध लोक, प्रत्यक्ष इतिहास भूगोलादींच्या ज्ञानावर आधारलेल्या किंवा काल्पनिक व्यक्तींची किंवा स्थलांची वर्णनें, व हस्तिशिक्षा, रत्नपरीक्षा, धनुर्वेद इत्यादि विद्या-कला अशीं हीं काव्याचीं बारा उत्पत्तिस्थानें आहेत.

येथें घातलेला ' उत्पत्तिस्थानें ' हा शब्द फक्त रामायण-महाभारतांना व कांहीं अंशीं पुराणांना मुख्यार्थानें लागू पडतो. वेद, स्मृति, प्रमाणविद्या वगैरे इतर नऊ स्थानें फक्त गौणार्थानें द्यावयाचीं आहेत. त्यांचा अर्थ ' सजावटीची सामग्री ' असाच समजला पाहिजे. आतां या स्थानांचा क्रमशः विचार करूं. पैकीं इतिहासाचा विचार पूर्वी झालाच आहे.

### ( १ ) श्रुति.

श्रुति म्हणजे चार वेद ( व उपनिषदेंहि ). यांचा उपयोग कवींनीं पावित्र्य, मांगल्य, प्रामाण्य इत्यादींच्या भावना जागृत करण्यासाठीं जागो-

जाग केला आहे. विशेषतः उपमा-उत्प्रेक्षादींच्या द्वारें व कोहा कल्पना सांगतांना श्रुतींचा उल्लेख येतो. ' श्रुतीच्या अर्थामागें जशी स्मृति जाते तशी दिलीपाच्या मागें सुदक्षिणा गेली ' (रघु. २. २). ' आदित्यो वा अस्तं यन्नमिमनुप्रविशति ' या श्रुतिकल्पनेवर आधारलेली उपमा पहा ( रघु. ४. १ ), ' कुमारां'तील ब्रह्मस्तुति ( सर्ग २.४-१५ ), 'रघूं'तलि विष्णुस्तुति ( सर्ग १२.१६-३३ ), 'किरातां'तील अर्जुनकृत शिवस्तुति (सर्ग१८.२२-४२), ' शिशुपालां'तील भीष्मकृत कृष्णस्तुति ( सर्ग १४.६०-८७ ), व 'नैषधां' तील नलकृत सूर्य, शिव, विष्णु इत्यादींची स्तुति ( सर्ग २१.३४ १२० ) या ठिकाणीं श्रुति, प्रणव ( ओंकार ) व उपनिषदें, किंवा प्रस्थानत्रयी यांतील अनेक कल्पना आल्या आहेत. त्या जिज्ञासूनीं मुळांतूनच पहाव्या. त्याचप्रमाणें षड्दर्शनें, ईश्वरावतार, षट्शास्त्रें यांचाहि उल्लेख वरील स्थलांत वैपुल्यानें येतो. श्रीहर्षानें सरस्वतीच्या अंगप्रत्यंगवर्णनात सगळीं शास्त्रें, सर्व कला, वेद आणि वेदांगें यांचा उपयोग किती समर्पकपणें केला आहे तेंहि अवश्य पहावें ( नै. १०.७३-८७ ). तसेंच नै. ५.१८.

## ( २ ) स्मृति.

विदग्ध महाकाव्यांतील नायक प्रायः राजा असतो. तो क्वचित् देव असला तरी राजाचेच आचार पाळत असतो. (पहा. शंकर, कार्तिकेय, राम, कृष्ण, इंद्र ). त्यामुळें स्मृतींतील राजधर्माचा भाग सर्वच कवींनीं सजावटीसाठीं वापरला आहे. रघुवंशांतील दिलीप, रघु, अज, दशरथ, व अतिथि यांच्या राजनीतीचीं वर्णनें मनु, याज्ञवल्क्य, महाभारत व इतर अनेक स्मृती यांच्या आधारें केलेलीं आहेत. ब्राह्मण व क्षत्रिय यांचा समागम राष्ट्राला पोषक आहे या अर्थाच्या मनुस्मृतींतील 'नाब्रह्म क्षत्रमृध्नोति । नाक्षत्रं ब्रह्म वर्धते ॥ ब्रह्म क्षत्रं च संपृक्तमिह चामुत्र वर्धते । (मनु९.३२२). या वचनानुरोधानें लिहिलेला रघूंतील श्लोक पहा (रघु८.४). 'किरातां'तील दुर्योधनाची राजनीति ( कि. १.९-२३), भीम व युधिष्ठिर राजकारणचर्चा ( सर्ग २ ), ' शिशुपालां'तील कृष्ण, बलराम व उद्धव यांमधील राजकारणचर्चा ( सर्ग २ ), नलाचें वर्णन व त्याचा दिनक्रम ( नै. १ व २१ ) इत्यादि ठिकाणीं स्मृत्युक्त राजधर्मवर्णन आहे. तसेंच 'कुमारा'मधील शिवपार्वतीविवाह, नलदमयन्तीविवाह, 'रघूं'तील

रघुजन्म ( रघु. ३ ) इत्यादि ठिकाणीं स्मृत्युक्त संस्कारांच्या अनुरोधानें वर्णनें केलीं आहेत. स्मृतींमध्यें राजनीति आली आहे ती केवळ राजधर्माच्या अनुषंगानें. स्मृतींचें स्वरूप विशेषतः सामाजिक आहे. व पंचमहाकाव्यांतील सामाजिक भाग, आचारधर्म व वर्णाश्रमव्यवस्था वरील स्मृतींच्या आधारें विवेचण्यांत आली आहे. महाभारताच्या शांतिपर्वांतील 'सर्वे धर्मा राजधर्मप्रधानाः ।' व 'सर्वस्त्यागो राजधर्मेषु राजन् । त्यागं धर्मं चाहुरग्र्यं पुराणम् ॥' हीं दोन वचनें तर कालिदासानें आपल्या नजरेसमोर ध्रुवताऱ्याप्रमाणें सतत ठेविलीं आहेत.

## ( ३ ) पुराणें.

काहीं महाकाव्यांचा आधार म्हणून पुराणांचा उल्लेख मागें पृ. ६ वर केला. येथें महाकाव्याच्या सजावटींतहि त्यांचा उल्लेख करणें आवश्यक आहे. कारण केवळ पौराणिक कथांवर जशीं कांहीं महाकाव्यें रचलेलीं आहेत तशीं दुसरीं बरींच महाकाव्यें अनेक विदग्ध महाकवींनीं पौराणिक कथांच्या पुरवण्यांनीं, त्यांच्या उल्लेखांनीं व त्यांतील कल्पनांनीं सजविलीं आहेत. इतकेंच नव्हे तर ज्यांत कोणत्या ना कोणत्या रीतीनें पौराणिक संदर्भ नाहीं असें महाकाव्यच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. कवीला इतिहास-पुराणांचें ज्ञान असणें अत्यंत आवश्यक मानलें जात होतें. इतकेंच नव्हे तर इतिहास-पुराणें हे कवीचे दोन चक्षू आहेत ( इतिहासपुराणाभ्यां चक्षुर्भ्यामिव सत्कविः । विवेकाञ्जनशुद्धाभ्यां सूक्ष्ममप्यर्थमीक्षते । ) व त्याचा उपयोग विवेकानें केल्यास कवीला सूक्ष्मार्थाचें ज्ञान होतें अशी पूर्वीची समजूत आहे. म्हणून पुराणांचा थोडा विचार येथें करणें प्रस्तुत होईल.

पुराणांचे व्यासपूर्व पुराणें व व्यासोत्तर पुराणें असे दोन वर्ग पडतात. एकंदर पुराणें छत्तीस असून त्यांत १८ महा व १८ उप पुराणें आहेत. महापुराणेः— १ ब्रह्म, २ ब्रह्माण्ड, ३ ब्रह्मवैवर्त, ४ मार्कंडेय, ५ भविष्य व ६ वामन. या सहांना राजस किंवा ब्रह्मपुराणें म्हणतात. ७ विष्णु, ८ भागवत, ९ नारदीय, १० गरुड, ११ पद्म व १२ वराह. या सहांना सात्त्विक किंवा विष्णुपुराणें म्हणतात. १३ शिव, १४ लिंग, १५ स्कन्द, १६ अग्नि, १७ मत्स्य व १८ कूर्म. या सहांना तामस किंवा शैवपुराणें

म्हणतात. पुराणें जवळ जवळ अनादि किंवा अज्ञातादि असलीं तरी त्यांमध्यें प्राचीन व अर्वाचीन असे वर्ग करतां येतात. तसेंच प्राचीन पुराणांत सु.ां प्राचीन भाग व पुढें भर घातलेला भाग असा भेद करावा लागतो. कारण यांचीं संस्करणें अनेक वेळां करण्यांत आलीं. अत्यन्त जुन्या काळापासून विक्रमकालापर्यंतच्या पुराणांना ( खिस्तपूर्व १ लें शतक) प्राचीन व विक्रमोत्तर पुराणांना अर्वाचीन म्हणावें.

**भागवत इ. स. ५ व्या शतकापूर्वीं.**

पार्जिटर यानें प्राचीन पुराणांच्या रचनेचा काल खिस्तपूर्व ५०० ते खिस्तोत्तर १५० मानला आहे. राजवंशवर्णनाचा व इतर कांहीं संशयास्पद भाग वगळल्यास भविष्य, विष्णु, वायु, भागवत व मत्स्य हीं पुराणें प्राचीन आहेत. राजवंशवर्णनाचा भागहि खिस्तोत्तर तिसरें किंवा चवथें शतक या कालापर्यंत घालण्यांत आला. असो. एकंदरीनें पुराणकालनिश्चय ही कठीण गोष्ट आहे. फक्त कालिदास हाच एक प्राचीन कवि असल्यानें त्यानें कोणत्या पुराणांचा उपयोग केला? त्यानेंच पद्मादि पुराणांचा उपयोग केला का या पुराणांनीं त्याचा केला ? असले प्रश्न उत्पन्न होतात. त्याचा ऊहापोह पृ. ४२ व ९३–९६ केला आहे. माघानें भागवतकथेचा उपयोग 'शिशुपाला'च्या पहिल्या तेरा सर्गांना केल्याचें सांगितलें आहे (पृ.२०४-६). पण पार्जिटर भागवताचा काल नववें शतक, रा. ब. वैद्य दहावें शतक व इतर मंडळी तेरावें शतकहि मानतात ! पण भागवताचें प्राचीनत्व तेथेंच ( पृ. २०५ ) दाखविण्यांत आलें आहे. शिवाय भागवत पाचव्या शतकांत असलेंच पाहिजे असें सिद्ध करणारा पुरावा अन्नमलाई युनिव्हर्सिटीचे प्रो. कृष्णमूर्ति शर्मा यांनीं पुढें आणला आहे. (Annals of the B. O. R. Institute, Vol. XIV—1932-33-Pp. 182-218 पहा ). गौडपादाचार्यांच्या वृत्तीचें मूळ जी माठर वृत्ति ( ईश्वरकृष्णाच्या सांख्यकारिकेवरील टीका ) तिच्यामध्यें भागवतपुराणाचे दोन उल्लेख आहेत. या माठर वृत्तीचें भाषान्तर चिनी भाषेंत इ. स. ५५५ च्या सुमारास झालें आहे. यावरून मागें हटवीत हटवीत भागवतकाल पांचव्या शतकापर्यंत तरी नेतां येतो व भागवत 'शिशुपालवधा'पेक्षां बरेंच पूर्वीचें ठरतें. असो. तर कालिदास ते श्रीहर्ष या सर्व कवींनीं आपल्या काव्याच्या

सजावटीसाठीं पद्म, विष्णु, भागवत, भविष्य, शिव इत्यादि पुराणांचा उपयोग कसा केला आहे तें त्या त्या स्थलीं दाखविलें आहे.

## (४-५) प्रमाण व समयविद्या.

प्रमाणविद्या व समयविद्या म्हणजे वेदान्त सांख्य. न्याय, मीमांसा, बौद्ध इत्यादि दर्शनांचे सिद्धान्त व शैव, वैष्णव इत्यादि धर्मपंथांचीं रहस्यें. यांचा उपयोग विदग्धकवी कसे करतात तें कालिदास, भारवि, माघ व श्रीहर्ष यांच्यावरील रसग्रहणांत सोदाहरण दाखविलें असल्यानें त्याची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. जिज्ञासूंनीं पुढील पृष्ठें पहावीं पृ. १००, १५३, १७४, २८०, व २८९.

## (६-८) राजसिद्धान्तत्रयी.

१ **अर्थशास्त्र.** राजसिद्धान्तत्रयी म्हणजे अर्थशास्त्र, नाट्यशास्त्र व कामशास्त्र यांतील महत्त्वाचे सिद्धान्त विवेचणारी ग्रंथत्रयी. म्हणजेच कौटिलीय अर्थशास्त्र, भरताचें नाटयशास्त्र व वात्स्यायनाचें कामसूत्र. यांचा विचार क्रमानें करूं. महाभारत व मनुयाज्ञवल्क्यादि स्मृती यांमध्यें राजे लोकांच्या आचाराबद्दल विवेचन येऊन गेलें असलें तरी खुद्द राज्यशासनाचे सर्व तपशील कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत आहेत. येथें 'अर्थ' याचा अर्थ केवळ संपत्ति असा नव्हे. तर विद्या, भूमि, सोनें, पशु, धान्य, घरांत लागणारीं सर्व उपकरणें, मित्र इत्यादि जीवनोपयोगी सुखसाधनें यांचा लाभ व विवर्धन म्हणजे अर्थ. धर्म व काम हे पुरुषार्थ अर्थमूल आहेत. म्हणून कौटिल्यानें आपल्या शास्त्रांत राज्याच्या दृष्टीनें वरील सर्व साधनांचा व्यापक विचार या शास्त्रांत केला आहे. व हें अर्थसंपादन न्याय्य व्हावें म्हणून नैतिक बंधनांचाहि विचार अनुषंगानें केला आहे. कौटिलीय अर्थशास्त्र चंद्रगुप्ताचा मंत्री चाणक्य यानें रचलें (खिस्तपूर्व ४००). त्यावर कामंदकानें आपला 'कामंदकीयनीतिसार' हा ग्रंथ आधारलेला आहे (इ. स. ४००). या दोन ग्रंथांच्या आधारें महाकाव्यांचे टीकाकार महाकवींचे एतद्विषयक सिद्धान्त विशद करीत असतात. रघुवंश सर्ग ४ मधील 'धर्मविजयी नृपः' ही कल्पना अर्थशास्त्रांतील आहे. ('त्रयोऽभियोक्तारो धर्मलोभासुरविजयिनः।' कौ. अर्थ. १२.१ पहा.) अर्थशास्त्रांतील राजर्षिवृत्त,

इंद्रियजय, अमात्य, मंत्री, पुरोहित यांची निवड, हेर, शत्रू इत्यादि शेकडों प्रकरणें नजरेसमोर धरून सर्व महाकवींनीं आपले आदर्श राजे चितारले आहेत. अर्थशास्त्रांतील षाड्गुण्य, अरिषड्वर्ग, कुप्य, यथापराधदण्ड, चार-चक्षुः इत्यादि असंख्य शब्दसुद्धां रघु, किरात व माघ या काव्यांतून वापरलेले आहेत. महाकाव्याच्या सजावटींत कामसूत्राखालोखाल अर्थशास्त्राला स्थान आहे हें कोणासहि मान्य होईल.

**२ नाट्यशास्त्र.** महाकाव्याच्या कथारचनेंत नाट्यसंधी व अवस्था यांचा उपयोग होतो. शिवाय शैलीचेंहि विवेचन या शास्त्रांत असून सर्व रसपरिभाषेचें उगमस्थान भरताचें नाट्यशास्त्रच होय ( खि. पू. २०० ). पण राजशेखरानें नाट्यशास्त्राचा येथें केलेला उल्लेख साहित्यशास्त्र या अर्थीच घ्यावयास पाहिजे. तरच त्याला काव्ययोनि हें नांव अधिक समर्पकतेनें लागेल. साहित्यशास्त्रानें महाकाव्यांच्या सजावटींत केवढी भर घातली आहे हें सांगण्याचीसुद्धां आवश्यकता नाहीं. शब्दाची व अर्थाची मनोहर मांडणी हाच मुळीं काव्याचा गाभा असल्यानें त्या मांडणीचे विशेष सांगणारें हें शास्त्र काव्ययोनि आहे हें उघड आहे.

**३ कामसूत्र.** 'कामसूत्र' हा वात्स्यायनाचा कामशास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथ आहे. (काल खिस्तपूर्व ३ रें ते खिस्तोत्तर ४ थें शतक). शृंगारशास्त्रावरील या ग्रंथाचा उपयोग कालिदासादि सर्व महाकवी व भवभूति आदिकरून सर्व नाटककार व इतर सर्व ललितलेखक यांनीं विपुल केला आहे. यांत नागर व विलासी जीवनाचें चित्र असून कामोपभोगाचे सर्व प्रकार आहेत. कामसूत्राचा सारांश सोप्या व मनोहर भाषेंत मांडणारा कोक्कोकाचा 'रतिरहस्य' ( १२ वें शतक ) नांवाचा ग्रंथ आहे. महाकवींनीं कामशास्त्रानुरोधानें केलेलें शृंगारवर्णन 'रतिरहस्या'च्या वचनांनीं विशेषतः मल्लिनाथ स्पष्ट करून सांगतो. मुग्धा नायिकेशीं नायकानें सामोपचारानें कसें वागावें, दूती कशी व कोणती पाठवावी, रुष्ट व कुपित नायिकेला वश कशी करावी, रताचे प्रकार कोणते इत्यादि गोष्टी कालिदासापासून श्रीहर्षापर्यंतच्या सर्व महाकवींनीं कामसूत्राचा मागोवा घेत वर्णिल्या आहेत. तसेंच मधुपान, जलक्रीडा, पुष्पावचय इत्यादि विविध कामोद्दीपनें, कटाक्षक्षेप, चुंबन-आलिंगन, नखक्षत, दन्तक्षत, सीत्कार, बाह्यसुरत, आभ्यन्तरसुरत, इत्यादि

कामसूत्रांतील श्लोकडों प्रकरणें शृंगारवर्णनांत ठराविक व सांकेतिक होऊन बसलीं आहेत.

कुमार सर्ग ८.२ १९, किरात ९.३४-७४, शिशुपाल १०-३९–९०, व नैषध १८ या ठिकाणीं शृंगाराचें उत्तान वर्णन आहे. रघुवंशांत सर्ग १९ मध्यें अग्निवर्णाच्या विलासाचें असेंच उत्तान वर्णन आहे. पण अग्निवर्णाच्या अतिरिक्त भोगलालसेतच त्याचा मृत्यु आहे हें सूत्र कालिदासानें प्रथमपासूनच सूक्ष्मतेनें खेळविलें असल्यानें येथील शृंगाराच्या कडा करुणानें किंवा वैराग्यानें रंगलेल्या आहेत. श्रीहर्षाच्या नैषधामध्यें शृंगारच प्रधान रस आहे. व हे पंडितवरेण्य चांगलेच रंगेल असल्यानें त्यांनीं आपल्या उत्तान शृंगाराच्या सीमा ग्राम्यता व अश्लीलता येथपर्यंत नेऊन भिडविल्या आहेत ! कामसूत्राचें अनुकरण अक्षरशः कसें चालत होतें याचें नैषधांतील एकच उदाहरण देतों. कामसूत्रांतील तिसऱ्या अधिकरणांत 'कन्याविस्रम्भण प्रकरण' नांवाचा दुसरा अध्याय आहे. तो श्रीहर्षानें आपले १८ व २० हे सर्ग लिहितांना डोळ्यांपुढें ठेवला आहे. "कुसुमसधर्माणो हि योषितः सुकुमारोपक्रमाः, तास्त्वनधिगतविश्वासैः प्रसभमुपक्रम्यमाणाः संप्रयोगद्वेषिण्यो भवान्ति तस्मात्साम्नैवोपचरेत् ॥६॥" या सूत्राचें उपबृंहण १८ व्या सर्गाच्या पूर्वभागांत केलें आहे. त्यांतच श्लोक ३०मध्यें विपरीतरत,आणि ११४ व ११६ मध्यें समरत सूचित केलें आहे. हा अतिरेक भूषणावह नाहीं.

कामसूत्र ३.२.२०-२६ मध्यें परिचित नायिका दोघांच्याहि विश्वासांतील मैत्रिणींच्या द्वारा भाषण करील असें म्हणून पुढें 'सा तु परिहासार्थमिदमनयोक्तामिति चानुक्तमपि ब्रूयात्' असें सांगितलें आहे. म्हणजे मैत्रिण मात्र नायिकेनें तिच्याजवळ पूर्वी कांहींहि सांगितलें नसतां 'हिनें असें असें मजजवळ सांगितलें !' असें थट्टेनें नायकाला सांगेल. नेमक्या या कल्पनेचा मनोहर विस्तार श्रीहर्षानें 'कला' नांवाच्या चतुर सखीच्या द्वारा केला आहे ( नै. २०.२६-१०६ ).

पंचमहाकाव्यांच्या ९६ सर्गांपैकीं ३२ सर्गांत हा शृंगारप्रपंच आहे. यावरून विदग्ध महाकाव्याच्या सजावटींत कामसूत्राचें केवढें स्थान आहे हें कळेल. महाकाव्याचा हेतु चतुर्विध पुरुषार्थसाधन हा आहे, व

काम हा तिसरा पुरुषार्थ आहे असा कोटिक्रम करून ( नै. १८. १ ) आपल्या अतिरिक्त व उत्तान शृंगाराच्या वर्णनाचें समर्थन संस्कृत कवी व त्यांचे टीकाकार करीत असतात. पण महाकाव्यासारख्या उदात्त व भव्य काव्यरचनेंत झालेला हा अतिरेकाचा प्रकार संस्कृत काव्याला मोठासा भूषणावह आहे असें मुळींच नाहीं. तत्कालीन राजे व उपभोगलोलुप असे श्रीमान् यांच्या रंजनासाठीं हें सारें प्रकरण आहे असें सरळपणें कबूल केलेलेंच बरें !

### ( ९-११ ) लोक, विरचना व प्रकीर्णक.

या तीन शेवटच्या साधनांचा उपयोग विदग्ध कवींनीं कसा केला आहे हें त्या त्या स्थलीं स्पष्ट दिसतच आहे. कालिदासादि कवींनीं राजांच्या, ऋषींच्या व पंडितपात्रांच्या तोंडीं भारदस्त भाषा व पांडित्य घातलें आहे त्यामुळें ते व्युत्पन्न लोक. शिवाय भिल्ल, गुराखी, शेत राखणाऱ्या बाया ( शालिगोप्यः ), घार काढत असलेले गवळी, सैन्यांतले शिपाई इत्यादिक प्राकृत लोक. कालिदासानें रघूच्या दिग्विजयवर्णनांत, इन्दुमती-स्वयंवरवर्णनांत व हर्षानें दमयन्तीस्वयंवरवर्णनांत भिन्न देशांच्या राजांचे व तेथील वैशिष्ट्यांचे उल्लेख केले आहेत. शिवाय पातालांतील कुमुद्वती (रघु. १६), स्वर्गातील इंद्रादि देव ( नै. ५ ), हिमालयाच्या प्रदेशावरील विद्याधर, गंधर्व व किन्नर इत्य दि भिन्नस्थलांतील पात्रांची योजना कवी करतात. धनुर्वेद, संगीतादि विद्या, हस्तिशिक्षा इत्यादि विद्याकलांचे उल्लेख अनेक आले आहेत. याप्रमाणें विदग्धमहाकाव्याची भरघोस सजावट आहे.

### ( ६ ) महाकाव्यशैली—epic style.

### शैली म्हणजे कवि.

महाकाव्याचा हेतु, त्यांत केलेलें मानवी जीवनाचें प्रतीकात्मक चित्रण, त्याची भव्य बैठक इत्यादि अंगांप्रमाणेंच महाकाव्याची शैली हेंहि एक महत्त्वाचें अंग आहे. इतकेंच नव्हे तर शैली ही सबंध महाकाव्यांत भरून राहिलेल्या त्याच्या भव्यतेची मूस आहे. शैली म्हणजे नुसती शब्दयोजना नव्हे. शैली म्हणजे संबंध कवि ! त्या शैलीतूनच त्याच्या भावनांचा नाट्य-

पूर्ण विलास, ध्येयाची उदात्तता, संस्कृतीची उच्चता वगैरे गोष्टी प्रतीत होतात. मागें सांगितल्याप्रमाणें आर्ष व विदग्ध महाकाव्यांच्या भाषा-सरणीमध्यें फरक असतो. पहिली साधी, सोपी, सरळ ( direct ), प्रत्यक्ष बोलल्याप्रमाणें व कथनमात्रप्रयोजन असते. तर दुसरी नटवी म्हणजे अलंकृत, अवघड, श्लेषप्रधान, ध्वनियुक्त, मुद्दाम कल्पिलेली व कथन-कलाप्रदर्शनात्मक असते. व्याकरणदृष्ट्या सांगावयाचें तर कर्ता, कर्म व क्रियापदांची योग्य क्रमानें साधी गुंफण पहिलींत असते तर दुसरींत यांच्या जोडीला विशेषणें, क्रियाविशेषणें, सामासिक पदें, निरनिराळे साधित शब्द (नामें व धातु) व शब्दांचे व अर्थांचे अलंकार असतात. हें सर्व खरें पण असा हा बाह्य फरक पडण्याचें अन्तर्गत कारण काय तें सांगितल्यावांचून वरील भेदाचें रहस्य कळणार नाहीं. म्हणून कांहीं प्रत्यक्ष उदाहरणांनीं तें स्पष्ट करतों.

## प्रसंगांची पुनर्निर्मिति.

भाषा हा कवीच्या उद्दीपित मनाचा– विचार-विकारांच्या अन्तर्गत खळबळीचा– बाह्य आविष्कार आहे. कविकल्पित मानस दृश्यांचें भाषा हें शब्दमय चित्र आहे. यासाठीं आर्ष व विदग्ध कवी याची मानसिक अवस्थाच तपासली असतां वरील फरकाचें रहस्य ध्यानीं येईल. ऋषिकवी व विदग्धकवी याची भूतकालीन घटनांकडे पहाण्याची वृत्तिच निराळी असते. स्वकालीन घटनावर्णनांत ऋषिकवीची वृत्ति असावी तितकी तटस्थतेची नसते. व्यास-वाल्मीकी आपापल्या घटनांच्या संनिध होते. किंवा त्या घटनांतच गुरफटले होते म्हणा ना. कालिदासादि विदग्ध कवी मात्र त्या कालाकडे दुरून पहात होते. त्यामुळें त्या घटनांकडे पूर्ण तटस्थतेनें व सर्व बाजूंनीं पाहून त्यांचा हेतु, त्यांचें स्वरूप व त्यांचा अर्थ त्यांना अधिक चांगला लावतां आला. त्यामुळें विदग्ध कवीच्या मनांत त्या घटनांमुळें अनेकविध तरंग उठले. म्हणून आर्षकवींचीं मानसदृश्यें साधीं, एकेरी, सहजस्फूर्त, विनायास व प्रसंगांच्या प्रेरणेनेंच तयार झालेलीं असतात. तर त्याच प्रसंगावर आपली कथा आधारणाऱ्या उत्तरकालीन विदग्ध कवींचीं मानसदृश्यें दुहेरी, तिहेरी, बुद्ध्या किंवा प्रयत्नानें उद्भावित व कलात्मक आविष्काराच्या जाणिवेनें उभीं केलेलीं असतात.

आर्ष कवींनीं वर्णिलेला प्रसंग ते सर्व बाजूंनीं समजावून घेऊन आपल्या मनांत नीट मुरवून घेतात व मग जणों काय तटस्थपणें तो पुन्हा निर्मित त. व त्या पुनर्निर्माणांत आपलें व्यक्तित्व, आपले हेतू व योजना, मानसदृश्यें (imagery), आपली भावना, आपलें पांडित्य, आपलें वैदग्ध्य, आपली नाट्यमयता ओतून मूळच्या साध्या एकरंगी चित्राचा आराखडा बहुविधरंगांनीं रंगवितात.

## वाल्मीकीचा व कालिदासाचा परशुराम.

याचें उदाहरण म्हणून रामायण-बालकाण्ड-सर्ग ७४-७५ यांत वर्णिलेला मूळ राम-भार्गवप्रसंग व कालिदासानें आपल्या रघुवंशांत—सर्ग ११—केलेली त्याचीच पुनर्निर्मिति घेऊं. रामानें आपलें धनुष्य मोडलें हे शब्द ऐकून संतापलेला परशुराम दशरथाच्या सेनेपुढें उभा राहिला. त्याला पाहून भ्यालेले सर्व ऋषी आपापल्यांत कुजबुजूं लागले 'याच्या मनांत पुन्हां क्षत्रियवध तर करावयाचा नाहीं ?' त्यांनीं त्याची अर्घ्यानें पूजा केली. ती स्वीकारून परशुराम रामाला म्हणाला, 'राम दाशरथे वीर वीर्यं ते श्रूयतेऽद्भुतम्। धनुषो भेदनं चैव निखिलेन मया श्रुतम्। तदद्भुतमचिन्त्यं च भेदनं धनुषस्तथा। तच्छ्रुत्वाहमनुप्राप्तो धनुर्गृह्यापरं शुभम्। तदिदं घोरसंकाशं जामदग्न्यं महद्धनुः। पूरयस्व शरेणैत्र स्वबलं दर्शयस्व च। तदहं ते बलं दृष्ट्वा धनुषोऽप्यस्य पूरणे। द्वंद्वयुद्धं प्रदास्यामि वीर्यश्लाघ्यमहं तव ।' हें परशुरामाचें भाषण सोपें व सरळ आहे. त्यांत प्रत्यक्ष बोलतांना वापरतात तशी भाषा आहे, व पुनरुक्तीहि आहे. त्यांत अलंकार नाहींत. फक्त त्याचा क्रोध मात्र त्यांत आहे. पण कालिदासानें हा प्रसंग आपल्या मनांत चांगला मुरविला. नंतर परशुरामाच्या भावनेंत समरसतेनें शिरून त्यानें त्याची चीड व धुमसणारा क्रोध मोठ्या कलात्मकतेनें व्यक्त केला. तो करण्यापूर्वी त्यानें परशुरामाचें आगमन ठसकेबाजपणें वर्णिलें आहे. ऋषीमुनींच्या ऐवजीं दशरथच परशुरामाच्या पूजेसाठीं 'अर्घ्य आणा' असें आपल्या सेवकांस धांदलीनें सांगत आहे. पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून संतापलेला भार्गव क्षत्रियकुलाचा नाश करणारी आपली तीव्र नजर रामावरच रोखून त्यास बोलत

आहे असें कालिदास मोठ्या नाट्यमयतेनें सांगतो. आतां कालिदासाच्या परशुरामाचे– भार्गवाचे– शब्द ऐका:—

क्षत्त्रजातमपकारवैरि मे तन्निहत्य बहुशः शमं गतः ।
सुप्तसर्प इव दण्डघट्टनाद्रोषितोऽस्मि तव विक्रमश्रवात् ॥
मैथिलस्य धनुरन्यपार्थिवैस्त्वं किलानमितपूर्वमक्षणोः ।
तन्निशम्य भवता समर्थ्यये वीर्यशृङ्गमिव भग्नमात्मनः ॥
अन्यदा जगति राम इत्ययं शब्द उच्चरित एव मामगात् ।
व्रीडमावहति मे स संप्रति व्यस्तवृत्तिरुदयोन्मुखें त्वयि ॥
बिभ्रतोऽस्त्रमचलेऽप्यकुण्ठितं द्वौ रिपू मम मतौ समागसौ ।
धेनुवत्सहरणाच्च हैहयस्त्वं च कीर्तिमपहर्तुमुद्यतः ॥
क्षत्रियान्तकरणोऽपि विक्रमस्तेन मामवति नाजिते त्वयि ।
पावकस्य महिमा स गण्यते कक्षवज्ज्वलति सागरेऽपि यः ॥
विद्धि चात्तबलमोजसा हरेरैश्वरं धनुरभाजि यत्त्वया ।
खातमूलमनिलो नदीरयैः पातयत्यपि मृदुस्तटद्रुमम् ॥
तन्मदीयमिदमायुधं त्वया संगमय्य सशरं विकृष्यताम् ।
तिष्ठतु प्रधनमेवमप्यहं तुल्यबाहुतरसा जितस्त्वया ॥
कातरोऽसि यदि वोद्धतार्चिषा तर्जितः परशुधारया मम ।
त्यानिघातकठिनाङ्गुलिर्वृथा बध्यतामभययाचनाञ्जलिः ॥

रघु. ११.७५–७८.

कालिदासाच्या वरील शैलींत परशुरामाच्या फणकाऱ्याचें थैमान कसें चौफेर, विविधरंगी व कलात्मक आहे तें पहा. रामाचा धनुर्भंगपराक्रम ऐकून भार्गवाला क्रोध आला. हा एकेरी विचार न सांगतां तो क्रोध उत्कट करण्यासाठीं कालिदास त्याला दांडक्यानें डिवचलेल्या नागाच्या क्रोधाची मानसप्रतिमा जोडतो. रामाचा वाढता बडेजाव भार्गवाला

सहन होत नाहीं. त्यामुळें धनुर्भंग हा त्याला आपला मानभंग वाटतो व त्याचें मन एका पूर्वकालीन अपमानाच्या स्मृतीनें अधिक भडकतें. तो रामाच्या धनुर्भंगाची किंमत कमी करतो व तो त्याला शरणागतीचें किंवा युद्धाचें टिच्चून आह्वान देतो. या भावनातांडवामुळें शिंग मोडणें, हैहयानें केलेलें वत्सापहरण, अग्नीची दाहकता, परशूची धार, धनुष्याच्या दोरीनें घट्टे पडलेले रामाचे हात, शरणागति इत्यादि अनेक मानसप्रतिमा कवीच्या मनात समकालच उभ्या राहिल्या व शैली संकीर्ण झाली. तींत अलंकार आले, सामासिक शब्द आले व मूळच्या अनुष्टुभाएवजीं पल्लेदार व ठसकेबाज रथोद्धता वृत्त आलें. शिवाय रामाच्या सुसंस्कृत व सत्त्वधीर स्वभावाला ही तामसी भार्गवाची पार्श्वभूमिहि छान तयार झाली.

**दोघांचेहि इंद्रनारद-संवाद.**

वनपर्वांत पुढील प्रसंग आहे. नारद इंद्रलोकाला गेले असतां इंद्र त्यांना विचारतो, 'जिवाची तमा न धरतां लढून व धारातीर्थी पतन पावून माझ्या लोकीं नेहमीं येणारे राजे हल्लीं च कसे येत नाहींत ? ते माझे प्रिय अतिथि आहेत. ते क्षत्रिय हल्लीं कोठें आहेत ?' क्व नु ते क्षत्रियाः शूरा न हि पश्यामि तानहम् । आगच्छन्तो महीपालान् दयितानतिथीन्मम ॥ शस्त्रेण निधनं काले ये गच्छन्त्यपराङ्मुखाः । वनपर्व. ५१.१७-२०.

या साध्या पृच्छेचें श्रीहर्षकृत पुढील विदग्ध परिवर्तन पहाः—( नै. ५. १४-१९):—

तं कथानुकथनप्रसूतायां दूरमालपनकौतुकितायां ।
भूभृतां चिरमनागतिहेतुं ज्ञातुमिच्छुरवदच्छतमन्युः ॥
प्रागिव प्रसुवते नृपवंशाः किं नु संप्रति न वीरकरीरान् ।
ये परप्रहरणैः परिणामे विक्षताः क्षितितले निपतन्ति ॥
पार्थिवं हि निजमाजिषु वीरा दूरमूर्ध्वगमनस्य विरोधि ।
गौरवाद्वपुरपास्य भजन्ते मत्कृतामतिथिगौरवऋद्धिम् ॥
साभिशापामिव नातिथयस्ते मां यदद्य भगवन्नुपयन्ति ।
तेन न श्रियमिमां बहुमन्ये स्वोदरैकभृतिकार्यकदर्याम् ॥

पूर्वपुण्यविभवव्ययलब्धाः श्रीभरा विपद एव विमृष्टाः ।
पात्रपाणिकमलार्पणमासां तासु शान्तिकविधिर्विधिदृष्टः ॥
तद्विमृज्य मम संशयशिलिप स्फीतमन्त्रविषये सहसाघम् ।
भूयतां भगवतः श्रुतिसारैरद्य वाग्भिरघमर्षण ऋग्भिः ॥

'गोष्टीमागून गोष्टी करण्यांत इंद्र नारद रंगून गेले होते, अशी वास्तव पार्श्वभूमि चित्रित करून मग श्रीहर्ष इंद्राचा प्रश्न योग्य तऱ्हेनें नारदापुढें मांडतो. हा प्रश्न विचारतांना नृपवंशांत शूर पुत्रउत्पन्न होत नाहींत काय ? यांतील 'वंश' शब्दावरील श्लेषानें श्रीहर्षाच्या मनांत वंश व वेळूचा अंकुर या दोन प्रतिमा उभ्या केल्या व दुपेडी दोरी वळावी त्याप्रमाणें वंश व वेळू यांचे जोडधागे पाहिल्या श्लोकांत आले. पुढील दोन श्लोकांत श्रीहर्षानें वीरांनीं धारातीर्थीं पतन पावण्यांतील मोठेपणा, त्यांना वाटणारें इंद्र लोकांतील ऐश्वर्याचें विलोभन व असे वीर अतिथि न आल्यामुळें उदार इंद्राला वाटणारा तीव्र विषाद मोठ्या सूक्ष्मतेनें व विस्तारानें चितारला आहे. अर्थात् या डौलाला साजेल असें 'स्वागता' वृत्त तेथें आलें. विचाराच्या भरघोसपणाबरोबर भाषेचा भरघोसपणा येतो. तिच्यांत पांडित्य, उंची तत्त्वविवेचन, सूक्ष्म मानसपृथक्करण आणि तत्कालीन धार्मिक कल्पनांचा व सभ्याचाराचा डौल यांची भर पडली कीं ती भाषा अधिकच ढंगदार, रेखीव, अर्थघन व पल्लेदार होते.

ऋषिकवी व विदग्धकवी यांच्या अलंकारयोजनेबद्दल एवढेंच सांगतां येईल कीं ऋषिकवी शब्दालंकार अगदीं अल्प, व अर्थालंकारहि फारच मोजके वापरतात. तर विदग्धकवी मात्र या दोनहि बाबतींत रेलचेल करून सोडतात. शिवाय विदग्धकवींचे साम्यविरोध दाखवावयाचें क्षेत्र फारच व्यापक व संपन्न आहे. तर ऋषिकवींचें ज्ञात जगत्च फार साधें व मर्यादित होतें असें स्पष्ट दिसतें.

**शैलीचे प्रकार.**

विषयाच्या किंवा भावनेच्या अनुरोधानें व कविमनाच्या ठेवणीप्रमाणें भाषाशैलीमध्यें भेद उत्पन्न होतात. कालिदासासारखा अक्लिष्ट व प्रसन्न वृत्तीचा कवि नेहमींच आकर्षक व रम्य वैदर्भी शैली वापरतो. भारवी

अर्थघन गौडी लिहितो. श्रीहर्ष कधीं प्रसन्न वैदर्भी तर, कधीं क्लिष्ट पांचाली योजतो व माघहि कधीं पांडित्यप्रचुर व अवजड तर कधीं सफाईदार शैली मिश्रितरूपानें वापरतो.

संस्कृत साहित्यशास्त्रांत शैलीचे तीनचार प्रकार आहेत. त्याच्या मिश्रणानें विदग्ध महाकाव्याची शैली बनलेली दिसते. ते प्रकार असे :

१ **वैदर्भी**—माधुर्यगुण व्यक्त करणाऱ्या मृदु वर्णांनीं युक्त, समासरहित किंवा अगदीं अल्प प्रमाणांत समास असलेली व ललित अशी जी पदरचना ती वैदर्भी रीति. ( माधुर्यव्यञ्जकैः वर्णै रचना ललितात्मिका। अवृत्तिरल्पवृत्तिर्वा वैदर्भीरीतिरिष्यते । सा. द. ६२६ ).

२ **गौडी**—ओज गुण व्यक्त करणाऱ्या कठोर वर्णांनीं युक्त, रचनेंत डौल असलेली व समासयुक्त अशी जी पदरचना ती गौडी रीति. ( ओजःप्रकाशकैर्वर्णैर्बन्ध आडम्बरः पुनः । समासबहुला गौडी। सा. द. ६२७ )

३ **पांचाली**—माधुर्य व ओज या दोन गुणांव्यतिरिक्त इतर गुण व्यक्त करणाऱ्या वर्णांनीं युक्त व पांचसहा पदांच्या दीर्घ समासांनीं युक्त अशी जी पदरचना ती पांचाली. ( वर्णैः शेषैः पुनर्द्वयोः । समस्तपञ्चषपदैः बन्धः पाञ्चालिको मतः । सा. द. ६२८.) शिवाय लाटी, ग्राम्या इत्यादि मिश्रणजन्य इतर रीतिप्रकार आहेत.

## ( ७ ) पञ्चमहाकाव्यांच्या सांगातीं व नंतर.

### भारविमाघांपूर्वी.

कालिदासपूर्व अनुपलब्ध महाकाव्यांचा उल्लेख मागें पृ. ३३ वर केला. अश्वघोषाचीं 'बुद्धचरित' व 'सौंदरनंद' हीं काव्यें महाकाव्यरचनेच्या दृष्टीनें उत्तम आहेत. पहिल्यांत बुद्धाचा जन्म, विवाह, वैराग्य, तपश्चर्या, ज्ञानप्राप्ति इत्यादि विषय फारच कलात्मकतेनें मांडले आहेत. बुद्धानें आपल्या भावाचें केलेलें धर्मपरिवर्तन हा 'सौंदरनंदा'चा विषय असून तें काव्य अठरा सर्गांचें आहे. हीं काव्यें कालिदासपूर्व असलीं तरी महाकाव्याचा पहिला उत्तम नमुना या दृष्टीनें त्यांना आदरिलें पाहिजे. तीं कालिदासोत्तर ठरलीं तरीहि कालिदासाच्या कृतीच्या अनुकरणानें निर्माण झालेली सुंदर काव्यकृति या नात्यानें कां होईना त्यांची गणना सत्काव्यांत

अवश्य व्हावयास पाहिजे. कुमारदासाचें 'जानकीहरण' (६ वें शतक) हें रामचरित्रावरील महाकाव्य कालिदासाच्या अनुकरणानेंच निर्माण झालें आहे. यांतील रचना मधुर आहे. भट्टीचें 'रावणवध' (इ. स. ६००–६४०) काव्य एका दृष्टीनें वैशिष्ट्यपूर्ण आहे. यांतील कथा रामायणोक्तच आहे. तथापि ती चित्रित करण्यांत कलाविलास किंवा इतर उच्च हेतूंपेक्षां अलंकारांचीं व व्याकरणाच्या निरनिराळ्या प्रकरणांचीं उदाहरणें देणें हाच भट्टीचा स्पष्ट हेतु आहे. काव्यकलेसाठीं नसलें तरी व्याकरणाला मदत म्हणून याचा अभ्यास जुन्या पंडितांत चालतो. या काव्यात रामकथा आहे हें कोणाच्या ध्यानांतहि नसतें. त्यामुळें हें काव्य कर्त्याच्या नांवानेंच म्हणजे 'भट्टिकाव्य' म्हणून प्रसिद्ध आहे. कथेच्या ओघांत व्याकरणाचीं विशिष्ट रूपें उदाहृत करण्याची भट्टीची लकब माघानें थोड्या प्रमाणांत उचललेली दिसते.

**माघानंतर.**

यानंतर भारवि-माघांच्या अनुकरणानें झालेलीं वैदिक, बौद्ध व जैन काव्यें भागें पृ. ६–८ वर उल्लेखिलीं आहेतच. त्यांत कांहीं धार्मिक व कांहीं ऐतिहासिक आहेत. हे सर्व कवी प्रायः श्रीहर्षपूर्व आहेत. माघानंतरच्या महाकाव्यावर पांडित्याची छाप जास्त जास्त बसूं लागली व महाकाव्याचा वाचकवर्ग संकोच पावत जाऊन तीं पंडितमात्रगम्य झालीं. काव्यकलेचा ह्रास झाला. कालिदासाची भावनोत्कटता व प्रसाद लोप पावून भारवीची विचारप्रवणता, माघाचें पांडित्य व पुढील कवींचे शब्द-चमत्कार या पायऱ्यांनीं महाकाव्य घसरत चाललें. मध्यन्तरीं सुबंधु, दण्डी, बाण वगैरे वक्रोक्तिनिपुण गद्यलेखकांची छाप पद्यलेखकांवर पडून काव्य कृत्रिम होऊं लागलें. द्विसंधान व त्रिसंधान म्हणजे एका श्लोकांतून दोन दोन किंवा तीन तीन अर्थ काढणें ही एक टूम निघाली. याचा आरंभ भारवि-माघांच्या अर्थत्रयीवांची श्लोकांमध्यें पूर्वी (कि. १५.४५, शि. १९.११६) झालाच होता. श्रीहर्षानें तर एकेका श्लोकांतून पांच पांच अर्थ काढून या सर्वांवर ताण केली (नै. १३.३४). पण शब्दांच्या दोन, तीन किंवा चार अर्थांकडे नजर ठेवून दोन किंवा तीन निरनिराळ्या कथा एकाच शब्दयोजनेनें सूचित करावयाच्या ही करामत मात्र अपूर्वच म्हटली

पाहिजे. जैन कवि धनंजय याच्या 'राघव-पांडवीयां'त (इ. स. ११६०) राम व पांडव यांचीं चरित्रें एकदम एका शब्दयोजनेनेंच वर्णिलीं आहेत. हरदत्तसूरीचें 'राघवनैषधीय', विद्यामाधवाचें 'पार्वतीरुक्मिणीय', वेङ्कटाध्वरीचें 'यादवराघवीय' व सोमेश्वराचें 'राघवयादवीय' हीं अशाच रचनेचीं काव्यें होत. चिदंबराच्या 'राघव-पाण्डव-यादवीय' काव्यांत तर राम, पांडव व यादव यांच्या कथा एकदमच आणल्या आहेत.

**आजतागायत चालू.**

या कृत्रिम काव्यरचनेच्या काळांत 'नैषधीयचरित' हें एकच काव्य विशेष उल्लेखनीय असें झालें. यानंतर ऐतिहासिक, धर्मपर व विशिष्ट राजवर्णनपर अशी महाकाव्यरचना संस्कृतांत विपुल झाली. संस्कृत महाकाव्यांची संख्या उणीपुरी तीनशें साडेतीनशें भरेल. पण त्यांत पंचमहाकाव्यें व इतर दहापंधरा अशा पंचवीस महाकाव्यांचेंच नांव ऐकूं येतें. यांचीं कारणें अनेक आहेत. आपल्याकडे परानुकरण व सर्वांनींच एका ठराविक चाकोरींतून चालणें या दोन मोठ्या प्रवृत्ती दिसून येतात. त्यामुळें महाकाव्यांत सर्वत्र तोचतोचपणा दिसून येऊं लागला. नाटकें, भाण, चम्पू, लघुकाव्यें, स्तोत्रें, सुभाषितें यांची निष्पत्ति मोठ्या प्रमाणावर होऊं लागली. शिवाय पुढील काव्यें सर्वसामान्य सुशिक्षितांनाहि न समजण्यासारखीं क्लिष्ट व कृत्रिम झालीं. देशी भाषांचा आश्रय वाचकांना दिवसेंदिवस सुलभ झाला. परकी आक्रमणांना सुरुवात झाली. व अकराव्या शतकापर्यंत संस्कृत विद्वेत जो जोम, जी नावीन्याची आवड व जो जिवंतपणा होता तो हळू हळू नाश पावूं लागला. तथापि संस्कृत महाकाव्यें निर्माण होण्याचें काम अगदीं अक्षरशः आजतागायत चालू आहे. अनिर्मिति ही संस्कृत महाकाव्याबद्दलची तक्रार नसून अप्रसिद्धि व अनास्था हाच त्याबाबत विचारणीय प्रश्न आहे.

**संमिश्र काव्यरचना.**

याच सुमारास महाकाव्यरचनेच्या संमिश्र प्रकाराला सुरवात झालेली दिसते. या संमिश्र प्रकारांत आर्ष महाकाव्यें, पुराणें व विदग्धमहाकाव्यें यांच्या रचनाविशेषांचें मिश्रण आढळतें. त्यामुळें त्याला नेमक्या कोणत्या

नांवानें संबोधावें ही मतभेदाची बाब होऊन बसली आहे. क्षेमेंद्राची 'नृपावली', नीलमुनीचें 'नीलमतपुराण', कल्हणाची 'राजतरंगिणी', मेरुतुंगाचा 'प्रबंध-चिन्तामणि', जैनसाधूंवरील त्याचेंच 'महापुरुचरित' व परमानन्दाचें 'शिवभारत' हे काव्यग्रंथ या संमिश्र प्रकाराचीं प्रातिनिधिक उदाहरणें आहेत. या सर्वांत प्रत्यक्ष राजचरित्रें व साधुचरित्रें आहेत. यांत आर्ष काव्यांतील अनुष्टुभ् वृत्त वापरलें आहे व पुराणाची शिथिलता व सोपेपणा आहे. पण विदग्धमहा-काव्यांतील काव्यात्मता, सालंकारत्व, सर्गान्तीं वृत्तभेद इत्यादि प्रकार त्यांत नाहींत असें नाहीं. विशेषतः 'राजतरंगिणीं'त तर (इ. सन ११५०) शान्त हा रस प्रधान असून, अनुष्टुभ् वृत्तरचनेनंतर इतर वृत्तांतील श्लोक प्रकरणाचे शेवटीं आहेत. सुंदर उपमा-उत्प्रेक्षा आहेत. व चांगल्या राजांची स्तुति व वाईटांची निंदा आहे. म्हणून या ग्रंथाला महाकाव्य म्हणावें कीं इतिहास असा प्रश्न पडतो. तीच गोष्ट 'शिवभारता'ची. यांत अनुष्टुभ् सर्वत्र वापरलें असलें तरी अध्यायान्तीं वृत्तभेद आहे. यांत एकतीस अध्याय आहेत. काशींतील ब्रह्मवृंदानें परमानन्दास असा प्रश्न केला कीं, 'सध्या दक्षिणेंत सर्वनृपगुणयुक्त राजा कोण'? त्यावर परमानंदानें श्रीशिवछत्र-पतीचें राज्याभिषेकापर्यंतचें चरित्र त्यांस निवेदन केलें. हा थाट रामा-यणाच्या प्रारंभींचा आहे. व काव्याचें नांव आहे 'शिवभारत'! पण आंत विदग्धमहाकाव्यांतील शैली व अलंकार हौसेनें वापरले आहेत. हें काव्य विषयदृष्ट्या, हेतुदृष्ट्या व विस्तारदृष्ट्या महाकाव्यच आहे. पण मिश्रप्रकारचें आहे.

उत्तरकालांतील या संमिश्र संस्कृतकाव्य-रचनाप्रकाराचा उद्देश माझ्या मतें काव्याच्या सोपेपणानें व लोकप्रिय अशा राजांच्या व साधूंच्या चरित्र-वर्णनानें आपापल्या काव्यांस लोकप्रियतेचें विस्तृत अधिष्ठान मिळवावें ही कवींची इच्छा. याच प्रवृत्तीचा आश्रय पुढें देशभाषाकवींनीं केला. कारण ते तर निव्वळ प्राकृत जनांसाठींच लिहीत होते. परंतु खुद्द संस्कृतांत अस्सल विदग्धमहाकाव्यरचना चालू असली तरी तिचे वाचक जुन्या परंपरेचे तंत्रभक्त पंडित. म्हणून आपल्या काव्याचा मोहरा पुन्हा एकदां सामान्य संस्कृतज्ञ सुशिक्षितांकडे वळविण्यासाठींच हा संमिश्र प्रकार वरील संस्कृत कवींनीं योजला असावा.

## महाकाव्यरचनेचें कालानुसंधान.

आमच्या संस्कृत महाकाव्यांच्या या उत्तरकालीन स्वरूपावरून एक गोष्ट ध्यानीं येते. महाकाव्यरचना– मग तो आर्ष असो, विदग्ध असो कीं संमिश्र असो– स्वकालीन परिस्थितीशीं अनुसंधान राखीत आलेली आहे. गरजेप्रमाणें पुरवठा हा न्याय येथेंहि लागू आहे. मानवसमाजाच्या विकासाला तरी निश्चित एक दिशा कोठें दिसते ? कधीं पुढें, कधीं पुन्हा मागें, तर कधीं पुढेंमागेंच्या सांध्यांवर विकासाचा प्रवास चालू असतो. महाकाव्येंहि या विकासाच्या अनुरोधानेंच चाललेलीं आहेत. ऋग्वेदापासून रामायण महाभारतकालापर्यंतचीं आख्यानें, शाहिरी काव्यें व सूतांनीं, मागधांनीं आणि बंद्यांनीं गायिलेलीं वीरचरित्रें रामायण-महाभारतांत परिणत झालीं. व व्यासवाल्मीकी हे महाकवी आर्ष महाकाव्यरचनेच्या परमोच्च बिंदूचे विधाते ठरले. बदलत्या कालांत ह्या आर्ष रचनेला विदग्ध रूप देणारा कविकुलगुरु कालिदास हा विदग्धमहाकाव्यांच्या पूर्णावस्थेचा भाग्यशाली शिल्पकार झाला. तिसऱ्या अवस्थेंत या शिल्पवस्तूंचें संरक्षण भारवि व माघ यानीं करून त्याच्या वैभवाची प्रतिष्ठा वाढविली व शेवटीं अवनत होत चाललेल्या या काव्यप्रकाराचा बोज श्रीहर्षानें राखला व विदग्धमहाकाव्याची उपयुक्तता आहे त्या स्वरूपांत तरी आता संशयास्पद झाली असें सुचविलें. तात्पर्य, वाल्मीकि, कालिदास, भारवि, माघ व श्रीहर्ष संस्कृत महाकाव्याच्या त्या त्या अवस्थेचे प्रतिनिधी झाले व तेथेंच त्यांची खरी गरज संपली. पुढें महाकाव्यरचनेनें मिश्ररूप धारण करून देशी भाषांत प्रवेश केला.

## पाश्चात्य देशांत काय झालें ?

नेमका हाच प्रकार पाश्चात्य देशांतहि झाला. होमर, व्हार्जिल, कॅमोइन्स ( Camoens ), टॅसो व मिल्टन हे कविपंचक तिकडील महाकाव्यरचनेच्या त्या त्या अवस्थांचें निदर्शक आहे. मिल्टनच्या 'पॅरेडाइज् लॉस्ट' नें महाकाव्यरचनेचा खरा महोत्सवकाल संपल्याचें सूप वाजविलें. कारण त्याच्या काव्यांत महाकाव्यांच्या जुन्या सजावटीचें कौशल्य शिगेला पोंचलें व प्रतीकमार्गानें व्यक्त व्हावयाच्या वस्तुनिष्ठेचा (objective symbolism) कळस झाला. त्याच्यानंतर ही रचना गतार्थ झाली.

आमच्याकडे महाकाव्यरचनेचें सारसर्वस्व जसें वाल्मीकि, कालिदास व श्रीहर्ष या ब्रह्मा, विष्णु व महेशांत प्रकटलेलें दिसतें, तशी तिकडे होमर-व्हर्जिल-मिल्टन ही त्रयी महाकाव्यरचनेची अर्कभूत प्रतिमा आहे. मिल्टननंतर पाश्चात्य देशांतहि महाकाव्यरचनेचे वेगळाले प्रवाह निरनिराळी रूपें धारण करून प्रकट होऊं लागले. महाकाव्यरचनेचा हेतु, तंत्र, कथा, शैली, नायक, वातावरण इत्यादि अंश इतर वाङ्मयप्रकारांशीं संमिश्र होऊं लागले. त्यामुळें निर्भेळ महाकाव्य कोणतें तें निवडणें कठीण झालें वुइलियम् मॉरिसचें Sigurd the Volsung हें काव्य, महाकाव्य व कल्पित कथा ( Fairy-tales ) यांचें मिश्रण आहे. तें तंत्रदृष्ट्या निर्दोष असलें तरी त्यामध्यें स्वकालानुसारित्व व जिव्हाळा नाहीं. स्कॉट्च्या प्रदीर्घ शाहिरी काव्यांत जुन्या वीरकथा आहेत पण महाकाव्याची सुसंबद्धता व हेतु नाहीं. तसेंच शेलेचें Revolt of Islam व कीट्सचें Hyperion हीं काव्यें कलासुंदर असलीं तरी महाकाव्याच्या भव्यतेचा त्यांत अभाव आहे. टेनिसनच्या Idylls of the King ची गत तीच आहे.

**इंग्रजी महाकाव्यें बंद पडलीं.**

आपल्याकडे बाण, भवभूति, भट्टनारायण, विशाखदत्त वगैरे कवींनीं आपली महाकाव्यरचनेची शक्ति कथा आणि नाटकें यांच्या द्वारा प्रकट केली. त्यांनीं हे वाङ्मयप्रकार न रचता महाकाव्यें लिहिलीं असतीं तरी ते महाकाव्याचे निर्माते म्हणून सहज मान्यता पावले असते. प्रसिद्ध 'फॉऊस्ट' ( Faust ) महानाटकाचा कर्ता गटे व दी डायनास्टस् ( Dynasts ) या नाटकाचा निर्माता हार्डी हेहि मनोरचनेच्या दृष्टीनें महाकविच आहेत. अर्थात् नाटकाच्या व महाकाव्याच्या रचनेंत कांहीं मूलभूत फरक असतोच हें ध्यानांत ठेवूनच वरील विधान केलें आहे. यापुढें महाकाव्य चालू राहिलेंच तर तें पूर्वीच्या स्वरूपांत न राहतां रूपान्तरांत राहील. महाकाव्याचें प्राणभूत तत्त्व मानवी जीवनाचें प्रतीकात्मक चित्रण. तें फार झालें तर पूर्वी जसें वस्तुनिष्ठ होतें तसें न राहतां व्यक्तिनिष्ठ होईल व त्या Subjective Symbolism वर महाकाव्यरचना टिकेल अशी आशा एबरक्रोंबी या प्रसिद्ध टीकाकारानें व्यक्त केली आहे व यांचीं उदाहरणें म्हणून लुक्रेटिअस् ( Lucretius ) व वर्डस्वर्थ

यांची Prelude सारखीं काव्यें त्यानें दिलीं आहेत. जॉर्ज मेरिडियकडेहि त्यानें उमेदीनें बोट दाखविलें आहे. रॉबर्ट ब्रिजेस याच्या 'टेस्टामेंट ऑफ् ब्यूटी' यामध्येंहि कांहींना महाकाव्याचें स्वरूप दिसतें. पण आधुनिक काळांत इंग्रजी वाङ्मयांत महाकाव्यें होत नाहींत हेंच खरें.

## (८) महाकवी.

### महाकवीच्या विशिष्ट व सामान्य अर्थ.

'आर्ष' व 'विदग्ध' महाकाव्यांच्या मागें दिलेल्या लक्षणांवरून ही गोष्ट स्पष्टच आहे कीं अशीं महाकाव्यें रचणारा तो महाकवि. पण संस्कृतांत व मराठींतहि या शब्दांचा उपयोग या मर्यादित व पारिभाषिक अर्थींच करतात असें नाहीं. नाटकें, दीर्घ कथा, कादंबऱ्या इत्यादि वाङ्मय-प्रकार लिहिणाऱ्या व महाकाव्यनिर्मात्या महाकवीची मनोरचना असणाऱ्या इतरहि प्रतिभावंत कवींना हें उपपद लावतात. राजशेखरानें 'काव्य-मीमांसे'च्या पांचव्या अध्यायांत कवींचे अनेक प्रकार व त्याच्या मनाच्या विकासाच्या अवस्था सांगितल्या आहेत. तो असें म्हणतो कीं प्रतिभा व व्यासंग या गुणांनीं युक्त तोच कवि. त्यांत मग प्रतिभा व व्यासंग यापैकीं एकाचें आधिक्य असणारा काव्यकवि किंवा शास्त्रकवि होतो. कोणी सव्यसाची असतात. त्यांत कोणी अर्थकवि, कोणी रसकवि, कोणी अलंकारकवि, कोणी उक्तिकवि वगैरे असतात. वरीलपैकीं जास्तींत जास्त गुणांनीं युक्त तो महाकवि. या कल्पनेप्रमाणें आपल्याकडे बाण, भवभूति इत्यादि भारतीय, व शेक्सपिअर, गट इत्यादि पाश्चात्य कवींना महाकवी म्हणण्यांत येतें. पण 'महाकवि' याचा विशिष्ट पारि-भाषिक अर्थ व लक्षणेनें रूढ झालेला त्याचा सामान्य अर्थ यामधील भेद मात्र लक्षांत ठेवला पाहिजे.

### आमचे ऋषि-कवी धर्माधार होते.

आमचे ऋषि-कवी व्यास व वाल्मीकि हे फार मोठे तपस्वी, निःस्पृह व उदात्त ध्येयें दाखविणारे द्रष्टे होते. वाल्मीकीचे अंगीं व्यासापेक्षां कवित्व जास्त आहे. दोघेहि वीरकथा सांगणारे मोठे प्रभावी सूतश्रेष्ठ होते. वाल्मीकि सद्गुणांचे आदर्श निर्मिणारा ध्येयवादी, तर व्यास जग आहे

तसें दाखवून देणारा वास्तववादी दिसतो. या दोघांच्याहिबद्दल एक विशेष असा आहे कीं हे दोघेहि आपापल्या महाकाव्यांत महत्त्वाच्या व्यक्ति (characters) म्हणून वावरतात. रामायणाची नायिका वाल्मीकीच्या आश्रमांत आश्रयार्थ येते व वाल्मीकीच्या आश्रमांतच राम, सीता व लव कुशांच्या गांठी होतात. व्यास तर आपले नातू पांडव व कौरव यांच्या व्यवहारांत मधून मधून पडतांना दिसतात. ही गोष्ट जगांतील दुसऱ्या कोणत्याहि महाकाव्यांत नसावी. व्यासानें वेदांची पुनारचना, पुराणांची निर्मिति व वेदान्तसूत्रांचें ग्रथन केल्याचें सांगतात. त्यामुळें वाल्मीकीपेक्षां व्यासाच्या कर्तृत्वाचा व्याप मोठा दिसतो. दोघांच्याहि काव्यांचें पावित्र्य आमच्याकडे फारच मानलें जातें. हीं महाकाव्यें (विशेषतः महाभारत) श्रुतिस्मृतीइतकीं प्रमाण व वंदनीय मानलीं जातात. तीं धर्मस्थानें आहेत. याचें कारण आमच्य. प्राचीनांचे सर्वच व्यवहार धर्मनिष्ठ मानले जातात. मराठी संतकवी कालिदास-भारवि-माघांसारख्या लौकिक कवींना वंदन करीत नाहींत. व्यास-वाल्मीकींच्या पवित्रचरणीं मात्र त्यांची सदा प्रणति असते. यावरून आमच्या ऋषि-कवींचें ऋषित्व व धर्माधारत्व ध्यानीं येईल. आर्षकवी बरेचसे वस्तुनिष्ठ होते तर विदग्ध कवींची वस्तुनिष्ठा त्यांच्या आत्मनिष्ठेनें मर्यादित आहे.

**पाश्चात्य महाकवी लौकिक होते.**

प्राश्चात्यांचीं विशेष प्रसिद्ध अशीं आर्षकाव्यें म्हणजे ईलियड, ओडेसी (ग्रीक), बेओऊल्फ (अँग्लो-सॅक्सन), साँग आफ् रोलंड (फ्रेंच) व Das Nibelungenlied म्हणजे The Song of the Nibelungs (जर्मन) हीं होत. पहिल्या दोन ग्रीक काव्यांचा कर्ता होमर खिस्तपूर्व १०५०-८५०च्या सुमाराचा. भारताप्रमाणेंच ईलियड् हें महाकाव्य सर्वच एकट्या होमरनें रचिलें आहे कीं नाहीं याबद्दल संशय आहे. ईलियडपूर्वी प्रचारात असलेल्या अनेक वीरकथांचा संग्रह ईलियड्मध्यें आहे. होमर हा वीरकथांचा गायक म्हणजेच शाहीरहि असून तो अंध होता असें सांगण्यात येतें. 'बेओऊल्फ' या आर्ष महाकाव्याची मूळ रचना स्वीडनमध्यें आठव्या शतकापूर्वी झाली. त्यानंतर त्याला कोणीतरी एका नॉर्दंबरियन् शाहिरानें खिश्चन स्वरूप दिलें असें सांगतात. बेओऊल्फचा कर्ता

अज्ञात आहे. 'सॉंग ऑफ रोलंड' हें फ्रेंच आर्ष महाकाव्य शार्लमन राज्याच्या कथामंडळापैकीं आहे. त्याचा काल १० वें शतक. यामध्यें ४००२ कविता असून त्याचा नायक शार्लमन राजा आहे. याचा कर्ता अज्ञात आहे. 'सॉंग ऑफ दि Nibelungs' या जर्मन महाकाव्याचा रचनाकाल १३व्या शतकाचा आरंभ मानतात. तें प्रायः एकाच कवीनें रचलेलें आहे त्याचा कर्ता Conrad von Kurenberg असावा असें मत आहे.

हीं सर्व काव्यें केवळ वीरकाव्यें ( Heroic epics ) आहेत. त्यांपैकीं कांहींमध्यें धर्मासाठीं युद्धें असलीं तरी धर्मचर्चा किंवा अध्यात्म हें त्याचें उद्दिष्ट नाहीं. कर्तव्यपरायणता, धर्मनिष्ठता व पुरुषार्थसाधन हा जसा आमच्या आर्ष काव्याचा उघड हेतु दिसतो तितका वरील काव्यांचा नाहीं. तीं काव्यें लौकिक आहेत. आमचीं धार्मिक आहेत. त्यामुळें त्या काव्यांचे कर्ते साधे लौकिक पण प्रतिभावंत शाहीर आहेत. तर आमच्या काव्यांचे निर्माते धर्माधार व प्रतिभावंत ऋषि आहेत.

**कलेचा हेतूशीं समन्वय.**

आमचे विदग्ध महाकवी मात्र ऋषिमुनी किंवा मोठे तपस्वी नव्हते. त्याचें धार्मिक महत्त्व विशेष कांहीं नाहीं. या दृष्टीनें तीं साधें माणसें. पण त्यांचा कवित्वगुण मात्र जबर आहे. व्यास-वाल्मिकींचें ज्ञान सहजस्फूर्त व अनुभवजन्य, तर यांचें प्रायः ग्रंथद्वारा प्राप्त झालेलें. वाल्मीकीचें 'अनुष्टुभ्' सहजोद्गारातून अवतरलें तर विदग्धकवींना अनेक दीर्घ वृत्तें अभ्यासानें साधलीं. आमच्या विदग्धकवींबद्दल थोडक्यांत येवढेंच सांगावयाचें कीं ते राजाश्रयाला असले तरी राजाची खुशमस्करी त्यांनीं महाकाव्यांत केली नाहीं. ते आदर्शदर्शी, कर्तव्याला प्रेरणा देणारे व हेतुप्रधान काव्यरचना करणारे असले तरी त्यांनीं त्यामुळें काव्यकलेची हानि केली नाहीं; व ते भूतकालीन ध्येयाचे भोक्ते असले तरी त्यानीं वर्तमानाकडे पाठ फिरविली नाहीं.

त्याचा भूतकालाकडील ओढा वर्तमानाला प्रेरणा देण्यासाठींच होता. अप्रिय व दुःसह वर्तमानांतून पळ काढून रम्य केलेल्या भूतकालाच्या गुहांत लपून बसणारे पळपुटे ( escapits ) ते नव्हते. त्यांचीं काव्यें आर्षकाव्यांप्रमाणें अगदीं सामान्य जनांसाठीं नव्हतीं. हें खरें असलें तरी

त्या त्या काळच्या वरच्या थरांतील सांस्कृतिक जीवनाचें त्यांचें चित्रण यथातथ्य व प्रातिनिधिक आहे. त्या वेळचा समाज राजसंस्थाप्रधान होता व सर्वत्र श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माची पकड होती. त्यामुळें मोठाले क्षात्रिय व तपस्वी ब्राह्मण या क्षात्रब्राह्मद्वयीचें वर्चस्व ( Aristocracy ) तेव्हां होतें. सामान्य जनतेला आजच्याप्रमाणें स्वाधिकाराची जाणीव झाली नव्हती. त्यामुळें सर्व विदग्ध काव्यांत वरील दोघांचेंच चित्रण आहे. 'लोक' ही त्या वेळीं एक 'पालनीय' वस्तु होती. असें असलें तरी त्या वेळच्या अनियंत्रित राजसत्तेवर त्यागधर्माचीं इतकीं बंधनें महाकवींनीं घातलेलीं आहेत कीं तीं पाळणाऱ्या राजाला आजचा 'लोकसेवक'च म्हणावा लागेल ! ( रघुवंश पहा. )

**महाकवींची परिणतावस्था.**

आपल्या कडील सर्व विदग्ध कवी व व्हर्जिल, टॅसो, कॅमाइन्स, मिल्टन, (१६०८-१६७४) वगैरे कवी यांना राज्यव्यवहाराचें प्रत्यक्ष ज्ञान होतें. ते राष्ट्राभिमानी व धर्माभिमानी होते. कांहींनीं राजकारणहि केलेलें होतें. अनेक वर्षांच्या दीर्घ मनन, चिंतन व अभ्यास यांच्यानंतर यांनीं आपलीं काव्यें रचलीं. कोलेरिजचा महाकाव्यरचनेचा वीस वर्षांच्या तयारीचा हिशोब प्रसिद्धच आहे. पण मिल्टननें मात्र तशी तयारी प्रत्यक्ष केली होती. व्हर्जिल व कालिदास यांनीं परिणतप्रज्ञ अवस्थेंत आपलीं महाकाव्यें लिहिलीं. फिर्दोसीनें तर आपल्या वयाच्या ८५ व्या वर्षीं 'शहानामा' संपविलें. वृद्धपणांत अनुभवाला पक्केपणा येऊन कवीच्या मनाला आवश्यक असलेली तटस्थता व वस्तुनिष्ठता प्राप्त होते. टॅसोनें अल्पवयांत महाकाव्यरचना केली. त्यामुळें त्याच्या विचारांना यावी तेवढी परिपक्वता आलेली दिसत नाहीं. असो. यावरून महाकवि कसा असतो याची सामान्य कल्पना येईल.

## (९) महाकाव्यांचा देशी अवतार.

**प्राकृत काव्यें.**

प्राकृत महाकाव्यरचना विदग्ध संस्कृत महाकाव्यरचनेची समकालीनच आहे. कालिदासाचा समकालीन समजला जाणारा प्रवरसेन यानें 'सेतुबंध' किंवा 'दसमुहवहो' हें महाकाव्य प्राकृतांत लिहिलें. रामायणकथेच्या

जैनसंस्करणावर आधारलेलें विमलाचें 'पउमचरिय' हें पुराणमहाकाव्य ( Puranic epic ) गाथा व इतर श्रुतिमनोहर वृत्तांत लिहिलेलें आहे ( ४ थें शतक ). यशोवर्म्याचा दरबारकवी वाक्पतिराज यानें गौड-राजाच्या वधावर "गउडवहो' हें महाकाव्य लिहिलें (८ वें शतक). वर्धमानानें पहिला तीर्थंकर आदिनाथ याच्या चरित्रावर 'आदिनाथचरिय' हें पुराणमहाकाव्य ११०३ मध्यें रचिलें. शिवाय पुष्पदंताचें दोहा इत्यादि अपभ्रंश वृत्तांत लिहिलेलें 'महापुराण' व 'जसहरचरिउ' ही अपभ्रंश भाषेंतील काव्यरचना आहे (१०वें शतक). रामपाणिवादानें (१८वें शतक). मात्र आपलीं 'कंसवहो' व 'उषानिरुद्ध' हीं खंडकाव्यें कमावलेल्या अभिजात प्राकृतांत– पण संस्कृत वृत्तांचा आश्रय करून– लिहिलीं आहेत.

**महानुभाव महाकवींचा प्रारंभ.**

प्राकृत काव्यें हा संस्कृत व देशी काव्यें यांमधील एक टप्पा आहे. व त्यांत पुढील देशी महाकाव्यरचनेचे एक दोन विशेष दिसतात. यासाठीं त्याचा येथें अगदीं त्रोटक उल्लेख केला. सर्वसामान्य जनता नजरेसमोर धरून त्याच्या भाषेंत त्यांना मानवेल अशा पद्धतीनें व संस्कृताबरोबर प्राकृत वृत्तें वापरून ही रचना झाली. म्हणजे विमल व वर्धमान यांच्यासारख्यांनीं तरी संस्कृतांत रूढ असलेली केवळ पंडितगम्य विदग्धकाव्यपद्धति सोडून आर्ष किंवा पुराणपद्धतीचा नव्यानें आरंभ केला. याचें कारण ते सामान्य जनतेसाठीं लिहीत होते. देशी भाषांमध्यें हीच प्रवृत्ति दिसते. देशी काव्यरचनेचा काळ साधारणपणें अकरावें बारावें शतक हा आहे. मराठींतील पहिल्या काव्यरचनेचा मान महानुभावपंथीय कवींना आहे. हे सर्व कवी जरी चागले गाढे पंडित होते तरी त्यांनीं काव्यरचना केली ती प्राकृतजनांच्या आनंदासाठीं व आपल्या पंथाच्या प्रचारासाठीं.

**त्यांची लोकाभिमुखता.**

पहिला महानुभाव कवि दामोदर पंडित (१२ वें शतक उत्तरार्ध) यानें भागवतपुराणावर आधारलेल्या आपल्या 'वच्छहरणां'त 'प्राकृतजन मानवतीः तैसी ओडवो कथासंगती' असें आपलें धोरण स्पष्ट केलें आहे. पण ही सर्व कविमंडळी पंडित असल्यानें त्यांच्या रचनेंत विदग्धकाव्यांचे विशेष -न येणें अपरिहार्य होतें. ज्याला महानुभावांतला पहिला महाकवि म्हणतां

येईल तो भास्करभट्ट बोरीकर (१३ वें शतक) आपल्या नजरेसमोर विदग्ध-महाकाव्याचा नमुनाच ठेवतो आहे. तो म्हणतो, 'देखोनी महाकवीचा पंथु । मज होतसे मनोरथु । वाखाणावेया यदुनाथु । श्रीकृष्णरावो'॥ आपल्या 'शिशुपालवधां'त यानें विदग्धमहाकाव्याच्या डौलदार पद्धतीचा अवलंब केला असला तरी तो जो छंद वापरतो तो अस्सल देशी ओवी-छंद. हाच ओविछंद एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर इत्यादि मराठी कवींनीं आपल्या रामायण-महाभारतांवरील रचनेसाठीं वापरला आहे. पण त्यांच्या रचनेंत विदग्धकाव्यांचा थाट आहे. याचा अर्थ असा होतो कीं हे सर्व कवि असंस्कृतज्ञ सामान्य लोकांसाठीं जरी आर्ष किंवा पुराणपद्धतीच्या महाकाव्याचा आश्रय करीत होते तरी त्यांच्यावरील विदग्धकाव्यरचनेची छाप नाहींशी झाली नव्हती. वामन, सामराज, नागेश, विठ्ठल, रघुनाथ पंडित व काहीं अंशीं मोरोपंत यांनीं तर हा ओवीबद्ध आर्षकाव्यप्रकार दूर सारून रामपाणिवादाप्रमाणें पुनरपि संस्कृतवृत्तप्रचुर विदग्धकाव्य-रचना मराठींत करण्याचा पायंडा पाडला.

**तीन प्रवाह.**

म्हणजे देशी भाषांतील महाकाव्य किंवा महाकाव्यसदृश रचना ठोकळ-मानानें तीन प्रवाहांच्या मिश्रणानें झाली आहे. (१) भागवतासारखीं काव्यमय पुराणें, (२) रामायण महाभारत हीं आर्षकाव्यें, व (३) कालि-दासादींचीं विदग्धमहाकाव्यें. त्यांत पुराणांची शिथिलता व साधेपणा, आर्षकाव्याची लोकाभिमुखता व विदग्धमहाकाव्यांची वर्णनपद्धति एक-वटली आहे. त्यामुळें मराठींतील रामयण-भागवताश्रय, ललित व दीर्घ आख्यानकाव्यांना व खंडकाव्यांना 'महाकाव्य' हा शब्द अगदीं कांटे-कोरपणानें लावणें जरासें कठीणच आहे. तथापि महाकाव्याच्या बाह्यांगाचा व अन्तरंगाचीं कांहीं लक्षणें त्यापैकीं कांहींत दिसत असल्यानें त्यांस संमिश्र महाकाव्यें समजणें योग्य होईल. त्याच दृष्टीनें पुढील चर्चा करीत आहें.

**मराठी 'शिशुपालवध'.**

निदान १२ ते १९ या शतकांतील देशी काव्यरचना हेतु व वर्णनरीति या दृष्टीनें विदग्धमहाकाव्यासारखीं आणि वृत्तरचना, सोपेपणा व साधेपणा या दृष्टीनें आर्ष किंवा पुराणमहाकाव्यसारखी दिसते.

मराठींतील पहिले दोन महाकवी भास्करभट्ट बोरीकर व नरेंद्रपंडित अयाचित हे होत. यांचीं महाकाव्यें अनुक्रमें शिशुपालवध ( इ. स. १२७३ ) व रुक्मिणीस्वयंवर (इ. स. १२९२) हीं आहेत. श्रीकृष्ण हें महानुभावपंथाचें उपास्य दैवत व श्रीचक्रधर हा त्याचा संस्थापक. अकराव्या किंवा बाराव्या शतकाचे सुमारास जंगम, जोशी, शाक्त, गाणपत्य, कंथडी, बौद्ध, जैन, वगैरे पंथ आपापल्या मतांच्या प्रसारासाठीं प्रयत्न करीत होते. नवीन पंथाचा बस प्रथम सर्वसामान्य बहुजनसमाजांतच बसणें शक्य असल्यानें जो तो पंथ सामान्य प्राकृत जनांसाठीं वाङ्मय निर्मीत होता. महानुभावांचेंहि हेंच धोरण होतें. म्हणून त्यांनीं भागवतपुराणाच्या आधारें मराठींत काव्यरचना केली. श्रीकृष्णाचें गोड चरित्र सोप्या ओव्यात गाइलें व आपल्या पंथांचीं तत्त्वेंहि फैलाविलीं. श्रीचक्रधर किंवा चक्रपाणी हा शब्द श्रीकृष्ण किंवा आपला पंथप्रवर्तक 'चक्र-धर' या दोघांसहि लागावा अशा खुबीनें बोरीकरानें अनेक ठिकाणीं वापरला आहे. (तसाच 'नागार्जुन' हा शब्द). 'शिशुपालवधा'च्या ओव्या १०८९ आहेत. बोरीकरानें सदर महाकाव्य रचतांना माघाचें 'शिशुपालवध' व भागवतपुराण हीं दृष्टीसमोर ठेविलीं आहेत. पहिला इंद्रनारदसंवाद व शिशुपालाचें पूर्वजन्मकथन या बाबतींत त्यानें प्रथम माघाचें व पुढें भागवताचें धोरण सांभाळलें आहे. तथापि विनोद व शृंगार हे प्राकृत जनाना मानवणारे दोन रस परिपुष्ट करण्यासाठीं बोरीकरानें नवीन प्रसंग कल्पिले आहेत. काव्याचे सर्ग किंवा अध्याय असे भाग पाडलेले नाहींत. त्याची रचना सलग आहे. मूळ 'शिशुपाला'तील वीररसाचा उठाव शृंगाराच्या मानानें गौण वाटतो. पण विदग्धमहाकवीला लागणारी भरदार कल्पना-शक्ति, सूक्ष्म निरीक्षण, स्वकालानुवर्तित्व व परिणामकारक शैली हे गुण या काव्यात आहेत. बोरीकराच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा तर सर्वत्रच दिसतो.

## नरेंद्राचें 'रुक्मिणीस्वयंवर'.

पण भास्करभट्टापेक्षां नरेंद्रपंडित हा अधिक प्रमाणांत 'महाकवि' या श्लाघनीय पदाला पात्र आहे. त्याचें 'रुक्मिणीस्वयंवर' भागवतकथेवरच आधारलेलें असून त्यांत त्यानें स्वतःच्या कल्पनेची मर फार मोठ्या प्रमाणांत घातली आहे. पद्मपुराणाचा आश्रयहि आपण केल्याचें तो

सांगतो. पण विद्यमान संस्कृत व महानुभावीय प्राकृत पद्मपुराणांत नरेंद्रानें घातलेलीं शापभ्रष्ट किन्नरासारखीं पात्रें व प्रसंग सांपडत नाहींत. (कोलते-संपादित आवृत्तीची प्रस्तावना पहा.) 'आणिकें काव्यें, नाटकें, कथाः आख्यानें प्रबंध चित्रगाथाः' (१७) यांचाहि त्यानें आधार घेतला आहे. माझ्यामतें रुक्मिणी-कृष्णप्रेम, किन्नरानें वर्णिलेले राजे, रुक्मिणीची मदन-बाधा, तीवर सख्यांचे उपाय, रुक्मिणीकृष्णांचीं रूपवर्णनें वगैरे बाबतींत श्रीहर्षाचें 'नैषधीयचरित' नरेंद्रापुढें निश्चित आहे. चंद्रोदय, द्वारकानगरी, वनविहार, उपवनें, ऋतु, सायंकाल इत्यादि विदग्धमहा-काव्यांतील वर्ण्यविषय यांत आहेत. हल्लीं मान्य अशी या काव्याची ओवी-संख्या ८७९ असली तरी हें काव्य मूळचें १८०० किंवा २९९७ ओव्यांचें होतें असेंहि सांगतात. यांत ओवी हा प्राकृत छंद वापरला आहे व त्यात सर्ग नाहींत. असलीं किरकोळ लक्षणें सोडलीं तर नरेंद्राचें हें काव्य मराठींतील सर्वश्रेष्ठ विदग्धमहाकाव्य आहे असें निश्चित वाटतें. नरेंद्राची कल्पनाशक्ति, त्याची अलंकारयोजना, त्याची रसनिष्पत्ति व शैली अगदीं अनुपम आहेत.

## भागवतपंथीय काव्यांचा हेतु.

महानुभावी काव्यांनंतर भागवतसंप्रदायाच्या काव्याकडे वळावयाचें. भागवतधर्माची ग्रंथरचना दुहेरी हेतूनें प्रेरित झाली. एकीकडून अवैदिक पंथांच्या आक्रमणाला पायबंद घालणें व दुसरीकडून वैदिकपंथांतील कांहीं पडझडीची डागडुजी करणें हीं दोन धोरणें त्यांना सांभाळवयाचीं होतीं. कर्मकांडाचें बंड मोडणें, वर्णाश्रमव्यवस्थेंत सलूख निर्माण करणें, मराठी भाषेंत रचना करून भारत-भागवत-रामायण या त्रयीचा संदेश बहुजनसमाजाला पोहोंचवणें, प्रबल होत चाललेल्या आक्रमक यावनी सत्तेपासून स्वधर्मरक्षण करणें, स्वधर्मीयांचें अभेद्य संघटन करणें, इत्यादि अनेक हेतू या कवींच्या पुढें होते रामदेवराव यादव याच्या निधनानंतर तर महाराष्ट्र पोरका झाला होता. ना राजाश्रय ना धर्माश्रय अशी प्रजेची हलाखी होऊन लोक हवालदील झाले होते. चौदाव्या शतकांत तर महाराष्ट्रात एक अराजकच माजलें होतें. आंतून व बाहेरून आघात पडत होते. आर्यवृत्ति अनाथ झाली होती. अशा वेळीं मराठीचा व बहुजनसमाजाचा कैपक्ष

घेऊन ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकारामांसारखे भागवतधर्माचें मंदीर उभविणारे अलौकिक शिल्पी पुढें सरसावले नसते तर महाराष्ट्रांत स्वधर्म व स्वभाषा नावालाहि उरली नसती.

मराठी महाकाव्यरचनेच्या या हेतूंचें विवेचन करतांना एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते. संस्कृत विदग्धमहाकाव्यें जशीं राजाश्रयानें झालीं व राजप्रशस्तिपरहि झालीं तशी ही रचना नव्हे. नरेंद्र व मोरोपंत हीं दोन टोकें सोडलीं तर इतर सर्व कवी धर्मसेवेच्या व जनहिताच्या उदारबुद्धीनें काव्यरचनेला प्रवृत्त झाले होते. पूर्वीचीं संस्कृत काव्यें court epics असण्याचें कारण त्या काळीं स्वराज्यें होतीं व कोर्टेंहि होतीं. पण मुसलमानी अमलानंतर महाराष्ट्रांत राजाच राहिला नाहीं तर राजसभा कोठली? शहाजी राजाचा किंवा पुण्यप्रताप शिवाजीमहाराजाचा आश्रय मिळतांच जयराम पिंड्ये व परमानन्द या संस्कृत कवींचीं काव्यें पुन्हा अवतीर्ण झालीं. नरेंद्रानें रामदेवाचा आश्रय तेजस्वीपणानें सोडला व मोरोपंतांनीं मात्र बारामतकरांचा आश्रय शेवटपर्यंत पत्करला होता.

## एकनाथांचें 'रुक्मिणीस्वयंवर'.

वरील हेतुसिद्धीसाठीं महाकाव्यसदृश कथानकरचना करणारे पहिले कवी एकनाथ. 'रुक्मिणीस्वयंवर' व 'भावार्थरामायण' या त्यांच्या दोनच ग्रंथाचा आपल्यास येथें विचार करावयाचा. 'रुक्मिणीस्वयंवरा'चे अठरा अध्याय असून ओवीसंख्या सुमारें दोन हजार आहे. हें एक अध्यात्मपर पौराणिक महाकाव्य आहे. पण यांतहि विदग्धमहाकाव्याचीं पुढील लक्षणें आढळतात. यांतील कथा भागवतानुसारी असली तरी एकनाथांनीं त्या कथेवर अथपासून इतिपर्यंत एक अध्यात्मिक रूपक बसविलें आहे. 'ये ग्रंथींचें निरोपण । जिवा शिवा होतसे लग्न' । अशी नाथांची भूमिका असून रुक्मिणीकृष्णांचा विवाह म्हणजे जीवात्मा व परमात्मा याचा संयोग ही कल्पना त्यांनीं सर्व तपशिलांत व सर्व वर्णनांत खेळवून दाखवली आहे. मूळ कथेवर स्वकालीन हेतूचा व परिस्थितीचा जडाव मोठ्या काव्यात्मतेनें केला आहे व आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा तीवर उमटविला आहे. मात्र त्यांत नरेंद्राच्या काव्याइतकी विदग्धरचना व त्याच्याइतकें कवित्वहि नाहीं. एकनाथाचें 'भावार्थरामायण' ही एक प्रचंड आख्यानकविता

आहे. मात्र मूळ रामायणाबरोबर त्यांनीं इतर ठिकाणच्या कथा, कल्पना व प्रसंग घेऊन ती रचली आहे. कांहीं संस्कृत नाटकांतील श्लोकांचीं प्रतिबिंबें त्यांत दिसतात. त्यांत विदग्धमहाकाव्याची चुणूक आहे ती राम, सीता, हनुमान्, रावण, इत्यादि मूळ पात्रांच्या रंगकामांस स्वकालाची छटा भरणें ही होय.

**आख्यानकविता का महाकाव्यें ?**

एकनाथांचें 'भावार्थरामायण', फादर स्टेफेन्सचें 'ख्रिस्तपुराण', सरस्वती गंगाधराचें 'गुरुचरित्र', रामदासाचें व मुद्गलाचें 'युद्धकाण्ड', श्रीधराचें 'रामविजय', 'हरिविजय', 'पांडवप्रताप', 'शिवलीलामृत' व मोरोपंताचें आर्याभारत व इतर अशीच रचना हिला महाकाव्य न म्हणतां आख्यानकविता ( narrative poetry ) म्हणावेंसें वाटतें. मागें म्हटल्याप्रमाणें संस्कृतांत व प्राकृतांत पूर्वी झालेल्या वाङ्मयाचा संकीर्ण परिणाम होऊन बनलेलें मिश्रण म्हणजे हें कथावाङ्मय आहे. त्यांत प्रत्येक प्रवाहांतील कांहीं लक्षणें दिसतात. महानद्या निघतांना जरी विशिष्ट, वेगळ्या व पृथगात्म असल्या तरी समुद्रांत मिळण्याच्या स्थळीं जशा सामान्य, संकीर्ण व संमिश्र दिसतात तसें महाकाव्यप्रवाहांचेंहि झालें. वरील धार्मिक व साध्याभोळ्या मराठी आख्यानकवितेला महाकाव्य म्हणण्याची अडचण तर दूरच राहूं द्या. इंग्लंडमधील एकोणिसाव्या शतकातील मोठ्या पटाईत कलावंताच्या कथात्मक रचनेला narrative poetry म्हणावें का epic poetry म्हणावें याबद्दलहि टीकाकारांना अडचण वाटते. कारण अनेक प्रकारांचें मिश्रण होऊन त्या वेळचा कथात्मक कवितेला संकीर्ण स्वरूप आलें होतें. ली हंटचें Story of Rimini, कोलेरिज्चें Ancient Mariner, कीट्सचें Eve of St Agnes, टेनिसन्चें Idylls of the King, अर्नोल्डचें Sohrab and Rustum, साऊदेचें Thalaba व वर्डस्वर्थचें Michael वगैरे सरस व कलात्मक आख्यानकाव्यांनाहि narrative poetry च म्हणतात.

**मराठी विदग्ध कवी.**

ज्या मराठी कवींच्या आख्यानकवितेला त्यांतल्या त्यांत जास्त विदग्ध म्हणतां येईल ते कवी म्हणजे मुक्तेश्वर, वामन, विठ्ठल, नागेश,

सामराज, रघुनाथ पंडित व मोरोपंत हे कलाकवी होत. महामारतावर कलात्मक रचना करणारा मुक्तेश्वर हाच पहिला कवि. आख्यानकवि ही जरी मुक्तेश्वराची इतर कविसामान्य भूमिका असली व तो जरी ओवीच चापरीत असला तरी त्याच्या कविमनाला महाकवीच्या मनाचें वळण आहे. विशिष्ट प्रसंग मोठ्या हौसेनें रसोत्कट कराव, अलंकारांनीं नटवावे, सकाळ, संध्याकाळ, रात्र, पावसाळा, नद्या इत्यादींचीं वर्णनें मधून मधून करावीं, युद्धें रंगवावीं, स्थलवर्णनांचे व व्यक्तींच्या रूपवर्णनाचे मनोहर विस्तार मांडावे अशी उभारी त्याच्या मनाला आहे. त्याचें मन मोठें कल्पक आहे. वामनापासून पुढें तर प्रौढसंस्कृतवृत्तमंडित, संस्कृत-महाकाव्यरचनेच्या धर्तीची व सहेतुक काव्यरचना झालेली दिसते. तींत अडचण फक्त काव्याच्या लांबीची आहे. महाकाव्याच्या पल्लेदार रचनेच्या मानानें हीं काव्यें तोटकीं वाटतात. त्यामुळें कोणी त्यांस खंड-काव्यें हि म्हणूं शकेल. पण विठ्ठलनागेशांची 'सीतास्वयंवरा'वरील रचना, विठ्ठलाचें 'द्रौपदीवस्त्रहरण' व 'रुक्मिणीस्वयंवर', सामराजाचें 'रुक्मिणीहरण' व रघुनाथ पंडिताचें 'नलदमयन्तीस्वयंवर' हीं काव्यें जरी लहान असलीं तरी त्यांत संस्कृत विदग्ध महाकाव्यरचनेचे विशेष सांठलेले दिसतील. म्हणजे पूर्वीचें कालिदासश्रीहर्ष मराठींत जणों काय पुन्हा अंशरूपानें दिसूं लागलेंसें भासतें. वरील काव्यांत सर्ग, भिन्न वृत्तें, अलंकार, श्लेष, चित्र बंध, विद्वत्ता, सकाळ, सायंकाळ इत्यादींचीं वर्णनें इत्यादि बाह्यांगविषयक ( form ) सर्व तपशील आहे, व महाकवीच्या मनाची बैठकहि काहीं अंशीं नाहीं असें नाहीं. पण या सर्वांस त्यांच्या तोटकेपणामुळें खण्डकाव्येंच म्हटलें पाहिजे. 'नलदमन्तीस्वयंवर' तर रघुनाथ पंडितानें श्रीहर्षाच्या 'विद्वदौषधनैषधाच्या' च्या आधारेंच लिहिलें आहे. 'हे त्याचीच टिका' असें तो प्राजलपणें मान्यच करतो. हें दोनशें-चौपन्न श्लोकाचें छोटें पण कलासुंदर काव्य खण्डकाव्यच होय. रामराज, नागेश, विठ्ठलाच्या काव्यांत कालिदासादि कवींच्या कल्पनांचा ठिक-ठिकाणीं आढळ होतो. वामनाचीं रामायण-महाभारतांवरील कथात्मक स्फुट काव्यें व मोरोपंती स्फुट प्रकरणें हीं सुंदर खंडकाव्यें आहेत.

## सामराजाचें 'रुक्मिणीहरण.'

सामराजाचें 'रुक्मिणीहरण' मात्र (१७ वें शतक) हें नरेंद्राच्या 'रुक्मिणीस्वयंवरा'च्या नंतरचें दुसऱ्या श्रेणीचें मराठी महाकाव्य आहे. यांत आठ सर्ग असून श्लोकसंख्या अकराशेंच्यावर आहे. त्यांतल्या त्यांत कालिदासाची छाप सामराजावर फारच आहे. तिसऱ्या सर्गांत रुक्मीनें केलेली कृष्णनिन्दा कुमारसंभावांतील बटूनें केलेल्या शिवनिंदेप्रमाणें स्तुतिगर्भहि आहे गर्भवतीचीं लक्षणें, सायंकाल, चंद्रोदय, नगरी इत्यादींचीं वर्णनें त्यांत आहेत. भिन्न वृत्तरचना व सालंकारत्व आहे. केवळ रघु कुमारच नव्हेत तर शाकुंतल, मेघदूत व विक्रमोर्वशीय यांतील कल्पनासाम्यें या काव्यांत सांपडतात. एकंदरींत 'स्वयंवर' हा प्रसंग मराठी कवींचा आवडता विषय असून नुसत्या रुक्मिणीस्वयंवरावर सोळा कवींची काव्यरचना आहे.

## आढाव्याचा निष्कर्ष.

नागेश व विठ्ठल याची 'सीतास्वयंवरा'वरील रचना वरील प्रकारचीच आहे. यातील मांडणी व सजावट विदग्ध पद्धतीची असली तरी विस्तार मात्र कमी आहे. नागेशाचें काव्य सलग लिहिलेल्या भिन्न भिन्न वृत्तांच्या चारशें पंधरा श्लोकांचें आहे. विठ्ठलानें आपलें सुमारें चारशें श्लोकांचें काव्य सात सर्गांत विभागलें आहे. आपल्या काव्यरचनेला आपण सामग्री कोठची घेतली हें विठ्ठल पुढीलप्रमाणें सांगतोः— 'काहीं श्रीहनुमंतनाटककथा, कांहीं 'रघुवंशि'ची। कांहीं आदि कविप्रमेयरचना, कांहीं गिरा देशिची। (सर्ग ३. १). मराठी कविता म्हणजे आर्या व विदग्ध काव्यें यांचें मिश्रण असें जें प्रारंभीं म्हटलें त्याची ही विठ्ठलानें दिलेली साक्ष आहे. असो. या धावत्या आढाव्याचा निष्कर्ष असा कीं मराठींत १ आख्यानकविता, २ महाकाव्यें, व ३ खंडकाव्यें या तीन प्रकारचो कथात्मक काव्यरचना आहे. त्यांत ज्याना वरील मर्यादित अर्थानें महाकाव्यें म्हणतां येतील अशीं चारच १ भास्करभट्टाचें 'शिशुपालवध,' २ नरेंद्राचें 'रुक्मिणीस्वयंवर,' ३ एकनाथाचें 'रुक्मिणीस्वयंवर' व ४ रामराजाचें 'रुक्मिणीहरण.'

## भाषान्तरात्मक महाकाव्यें.

मराठी राज्याच्या अस्तानंतर सुरू झालेल्या इंग्रजी राज़वटींत मराठी वाङ्मयाच्या निर्मितीला एक निराळें वळण लागलें. आपला इतिहास, आपली संस्कृति, आपली भाषा इत्यादींचा नव्या दृष्टीनें विचार झाला व त्यावर पाश्चात्यांच्या दृष्टीचे ठसे उमटले. याचा पहिला परिणाम म्हणजे इंग्रजी व संस्कृत काव्यांचीं मराठी भाषांतरें. मिल्टनच्या 'Paradise Regained' (१-४) याचा मराठी तर्जुमा ग. र. नवलकर यांनीं केला. त्र्यंबकचे प्रसिद्ध कवी गणेशशास्त्री लेले यांचें 'रघुवंशा'चें भाषान्तर (इ. स. १८८३) व केशवसुतांनीं आरंभिलेलें पण पहिल्या सर्गापाशींच थांबलेलें 'किरातार्जुनीया'चें भाषान्तर हीं संस्कृत महाकाव्यांचीं भाषान्तरें करण्याची तत्कालीन प्रवृत्ति दाखवितात. कोल्हापूर येथील डॉ. श्रीखंडे या रसिक कवींनीं केलेलें 'कुमारसंभवा'चें उत्तम भाषान्तर 'सुश्लोककुमार' (इ. स. १९४०) हें याच प्रवृत्तीचें अर्वाचीन उदाहरण होय. रा. ग. रा. हवलदार यांचें 'ईलियड'चें मराठी भाषान्तर प्रसिद्धच आहे. बंगाली कवि मधुसूदन दत्त यांच्या 'मेघनादवध' महाकाव्याचें भाषान्तर माधवानुजांनीं केलें आहे.

## कुंटे यांचें 'राजा शिवाजी'.

हीं व अशासारखी भाषान्तररूप रचना सोडली तर अस्सल मराठी महाकाव्याच्या आरंभस्थानीं कुंटे यांच्या 'राजा शिवाजी' याची गणना केली पाहिजे. 'राजा शिवाजी' महाकाव्याचा (इ. स. १८७१) पहिल्या सहा प्रकरणांचा पूर्वविभागच आज उपलब्ध आहे. त्यांत अजमासें तेराशें श्लोक असून ते सर्व भुजंगप्रयात या बहुजनसमाजाला परिचित असलेल्या वृत्तांत लिहिलेले आहेत. या काव्याचीं बारा प्रकरणें लिहिण्याचा कुंटयांचा उद्देश होता. कुंटे यांनीं या काव्याला जोडलेल्या इंग्रजी प्रस्तावनेंत आपल्या काव्यरचनेचा हेतु स्पष्ट केला आहे. अस्सल मराठी अमदानीचा आद्यप्रवर्तक व बहुजनसमाजांतून वर आलेला श्रीछत्रपतींसारखा नायक योजून त्यांनीं त्याच्या शौर्याचें गानहि अस्सल साध्या व सोप्या भाषेंत केलें आहे. कुंट्यांचा नायक परमानंदांच्या संस्कृत 'शिवभारता'त

व भूषन कवीच्या हिंदी काव्यांत येऊन गेला असला तरी मराठींत त्याचें चरित्र वर्णण्याचें श्रेय कुंट्यांना दिलें पाहिजे. पंडिती भाषा सोडून लोकभाषेंत लिहिणें ( ज्यांना ते अनुक्रमें Classical व Romantic म्हणतात ) व रामायण-भारतांतले ठराविक नायक सोडून खास आपला नायक योजणें हा महाकाव्यरचनाहेतूचा विकास होय. व तो विकास करण्याचें श्रेय त्यांचे पदरीं टाकलेंच पाहिजे. पण त्यांचा हा हेतु प्रशंसनीय असला तरी त्याची योग्य अम्मलबजावणी करण्याचें काव्यकौशल्य कुंट्यांना लाभलें नव्हतें. त्यांची रचना शिथिल, शेकडों यतिभंगांनीं भरलेली, गद्यप्राय व रसहीन आहे. लोकभाषा जरी झाली तरी तिच्यामध्यें 'जोडे हाणी' असले अगदीं संभाषणप्रयुक्त प्रयोग टाळलेच पाहिजेत. ' काढी बहिर्जी मग अल्गुजाला । नामी हणी तान करी मजाला ' ' मिळाले मराठे, मिळाली सभा ती ' या ओळी त्यांच्या भाषेची कल्पना देतील. यासाठीं या काव्याला तत्कालीन मान्यता मिळाली नाहीं.

**खऱ्यांचें 'यशवंतराव' महाकाव्य.**

श्री. वा. वा. खरेशास्त्री यांचें 'यशवंतराव' हें काव्य (इ.स. १८८८) मात्र बहुतेक अंशीं खरें मराठी महाकाव्य आहे. यांतील कथा बरीचशी कल्पित असली तरी तत्कालीन संभवनीय ऐतिहासिक घटना व खेरंखुरें ऐतिहासिक वातावरण यांवर आधारलेली आहे. काव्याच्या कथानकाचा काल सुमारें इ. स. १७४० ते १७५७ च्या सुमाराचा असून त्यात मल्हारराव होळकर, दिल्लीरखान वगैरे ऐतिहासिक पात्रें आहेत. मराठ्यांची अंतस्थ दुही व रजपुत-मराठ्यांमधील अनिष्ट व राष्ट्रघातक वैर या मराठ्यांच्या इतिहासातील दोन शोचनीय घटना होत. या खेदजनक प्रकारांनीं त्रस्त झालेल्या शास्त्रीबोवांच्या कविमनानें मराठारजपूतऐक्याचें एक गोड काल्पनिक चित्र रंगविलें व तें या महाकाव्यात आदर्श म्हणून मांडिलें आहे. या काव्याचे चोवीस सर्ग असून श्लोकसंख्या १७२६ आहे. त्यांत वीररस प्रधान असून शृंगार, करुण, भयानक, हास्य इत्यादि रस गौणपणें आले आहेत. मल्हारराव व त्याचा पुत्र यशवंतराव यामध्यें उद्भवलेला युद्धप्रसंग फिर्दोसीच्या 'शहनाम्या'तील 'सोराब रुस्तुम' कथेंतील सोराबनें आपला पिता रुस्तुम यांच्याशीं गैरमाहितीनें केलेल्या शोचनीय युद्धाची

आठवण करून देतो. शास्त्रीबोवांनीं संस्कृत विदग्ध काव्याच्या नमुन्याबरहुकूम चंद्रोदय, नगरें, सायंकाळ, ऋतु, युद्धें यांचीं वर्णनें केलीं आहेत. चित्रकाव्यरचनेचीहि जुणूक त्यांनीं दाखविली आहे. त्यांतील स्वभावरेखन, कथानकरचना व भाषाशैली या बाबीहि महाकाव्यरचनेला साजेशा आहेत.

**महाकवी सावरकर.**

यानंतर ज्यांच्या कविमनाला महाकवीचा घाट व पल्लेदारपणा हे गुण निसर्गानें सढळ हातानें दिले आहेत असे कवी बॅ. सावरकर हे होत. यांच्या कवित्वाला कर्तेपणाची अनन्यसामान्य जोड आहे. या वीरकवीचे अनुभव दत्तक नसून औरस आहेत. त्यांच्या शब्दाशब्दांत कर्तृत्वाची प्रेरणा स्फुरत आहे. इटालियन कवी टॅसो व पोर्तुगीज कवी कयमॉइन्स यांची कडवी धर्मभावना व राष्ट्रभावना यांच्यांत एकवटली आहे. हिंदुधर्म व हिंदुराष्ट्र या दोन भावनांच्या एकीकृत उसाळींतून त्यांची 'कमला' व 'गोमांतक' हीं दोन काव्यें उत्थान पावलीं आहेत. हीं दोनहि काव्यें प्रथम कवीच्या खडतर कारावासांत कल्पिलेलीं आहेत (इ. स. १९१२) व पुढें प्रसिद्ध झालेलीं आहेत (१९२३–२४). पानिपतच्या रणसंग्रामावर आधारलेल्या एका महाकाव्याचा पहिला सर्ग हें 'कमला' काव्याचें स्वरूप आहे. 'विरहोच्छ्वास' या काव्यांत या अपुऱ्या महाकाव्याचा पुढील थोडासा भाग आला आहेसें वाटतें. 'गोमान्तक' काव्य पूर्व व उत्तर अशा दोन भागांचें असून त्यामध्यें ४८१२ ओळी आहेत. कथानकाचा काळ इ. स. १७३८–१७५८ च्या सुमाराचा आहे. पहिल्या भागात गोव्यात हिंदूंचा छळ कसा होत होता तें एका ब्राह्मणकुटुंबाच्या हृदयद्रावक वृत्तांतावरून कवीनें दाखविलें आहे व उत्तरभागात मराठ्यांची सत्ता वाढल्यानें त्या छळाचें परिमार्जन कसें झालें त्याचा वृत्तान्त मोठ्या विजयोन्मादानें सांगितला आहे.

**त्यांचे काव्यगुण.**

सावरकरांच्या शैलींत प्रसाद कमी असला तरी त्याची उणीव त्यांचें भारवीच्या तोलाचें ओज भरून काढतें. सावरकर वीर व करुण या रसाप्रमाणें शृंगारहि रंगवूं शकतात हें 'कमला' काव्यावरून

स्पष्ट होतें. त्यांचा उपहासहि तलवारीसारखा तिखट असतो. त्यांचा अनुष्टुभ् चांगला अर्थघन व रसवाही आहे. महाकाव्याच्या भरघोस सजावटीला योग्य होईल असें एक नवीन 'वैनायक' वृत्त (म्हणजे जातीच) त्यांनीं योजलें आहे. व्यास, वाल्मीकि, कालिदास, होमर, मिल्टन् इत्यादि महाकवींशीं सावरकरांचा चांगलाच परिचय आहे. वर पोर्तुगालचा राष्ट्रकवी कॅमॉइन्स याचें नांव सहज तुलनेसाठीं आलें म्हणून तो कवि व सावरकर यांच्यामधील एक विरोधहि दाखवावा असा मोह होतो. ज्युपिटरचा वर घेऊन हिंदुस्थान जिंकावयास निघालेल्या वास्को ड गामा याच्या यशस्वी सफरीचें वर्णन व पोर्तुगालची प्रतिष्ठा हा कॅमॉइन्सच्या 'लुसिअड्स्' या महाकाव्याचा विषय तर त्याच पोर्तुगीजांनीं स्थापलेल्या छळक धर्माला मराठेशाहींत बसलेला पायबंद हा सावरकरांच्या 'गोमांतक' महाकाव्याचा विषय आहे. तात्पर्य स्वतंत्र कथानक, भव्य प्रसंग, तोलदार शैली, तडफदार व उत्कट भावना, पल्लेदार कल्पना, व उच्च व उदात्त हेतु यांमुळें सावरकराच्या वरील दोन काव्यांना— तीं अपुरीं आहेत तरी— मराठी महाकाव्यांत फार वरचें स्थान द्यावें लागेल.

## दोन रामायणी महाकाव्यें.

यानंतर संस्कृत विदग्ध महाकाव्याच्या धर्तीच्या व रामायणावरच आधारलेल्या, सांगलीचे कवि साधुदास व कै. वि. वा. भिडे या दोघां कवींच्या, काव्यांचा उल्लेख केला पाहिजे. साधुदासांच्या (गो. गो. मुजुमदार) 'वनविहारा'त (१९१२) सतरा सर्ग असून त्यांत राम वनवासाला निघाल्यापासून तों हनुमान् सीतेचा लंकेंत शोध लावतो येथपर्यंतचा रामायणकथेचा भाग आहे. 'रणविहारा'त (१९१६) रामरावणयुद्ध आहे. व 'गृहविहारां'त (१९२८) रामाच्या उत्तरचरित्राची कथा आहे. वि. वा. भिडे यांनीं रामकथेवर 'राघवीयपरीवाह' नांवाचें वीस सर्गांचें महाकाव्य लिहिलें आहे. त्याचा पहिला भाग सर्ग १ ते १० इ. स. १९०८ मध्यें प्रसिद्ध झाला आहे. त्यांत रामायणांतील पहिल्या सहा काण्डांचा विषय आला आहे. वरील दोन्हीहि काव्यांवर रघुवंशादि संस्कृत विदग्ध महाकाव्याची घनदाट छाया पडली आहे. संस्कृत काव्यपरंपरेचें मराठींत केलेलें रक्षण या दृष्टीनें हे दोनीहि प्रयत्न प्रशंसनीय होत. मात्र

यांत महाकाव्यरचनेचा हेतुविकास नाहीं. साधुदासांच्या 'गृहविहारां'त सहजता, प्रसाद व रसपरिपोष त्यांतल्या त्यांत जास्त आहे. मिड्यांचें 'राघवीय परीवाह' नांवापासून तों तहत शेवटापर्यंत क्लिष्ट आहे. त्यांच्या मराठी रचनेला संस्कृत प्रत्यय जोडले कीं ती संस्कृत होईल ! म्हणून तिला संस्कृतप्रचुर म्हणण्यापेक्षां संस्कृतमयच म्हणावी.

## महाकाव्याचे मोहरे व छटा.

'रामायण', 'कृष्णायन' या महाकाव्यांच्या नामाप्रमाणेंच 'खिस्तायन' (अ. १-११ १९२१) हें रे. टिळकांच्या काव्याचें नांव वाटतें. पण त्यांतलि सारा थाट पुराणाचा आहे. फादर स्टीफन्सच्या खिस्तपुराणाच्या व उत्तरकालीन खिस्तचरित्रविषयक काव्यांच्या परंपरेंतीलच हें पुराण आहे. रे. टिळकांच्या भक्तिभावाचा व प्रसन्न शैलीचा त्यावर उठलेला ठसा मात्र मोहक आहे. अनंततनयानीं (द. अ. आपटे) हरिविजय, रामविजय इत्यादि जुन्या काव्याच्या वर्तीवर 'तिलकविजय' (पूर्वार्ध–१९२८) रचला आहे. धीरोदात्त असा अर्वाचीन नायक, त्याचें भारतव्यापी कर्तृत्व व त्याची स्वातंत्र्यनिष्ठ उत्कट झुंजारवृत्ति ही सामग्री महाकाव्याला योग्य आहे. पण अनंततनयांनीं आपल्या भोळ्या भक्तिभावानें व जुन्या मराठी काव्यांच्या अनुकरणानें या विषयाचें अगदींच पुराण बनाविलें आहे. कवी चंद्रशेखर यांच्या मनाची घडण व शैली महाकवीची वाटते. त्यांनीं 'सोमनाथ' महाकाव्य लिहिण्याचें योजलें होतें. 'गोदागौरव' यांलाहि महाकाव्याचा डौल आहे. पण महाकाव्यविरचनेचे त्यांचे मनोरथ अपूर्णच राहिले प्रसिद्ध भावगीतकवी यशवंत यांच्या दीडशें पृष्ठांच्या 'काव्यकिरीट' (१९४०) या काव्याचा मोहरा महाकाव्याचा आहे. मराठेशाहीचा अभिमान, आदर्श स्वराज्याचे मनोरथ, भव्य कल्पना व समर्पक भाषाशैली या गुणांमुळें राजप्रशस्तिपर महाकाव्यांत या काव्याला मानाचें स्थान आहे. विश्वामित्री नदीनें इतर नद्यांस केलेलें आवाहन व भविष्यदर्शन हे दोन आदि-अंताचे प्रसंगच वरील विधानाची साक्ष पटवितील. शिवाय माधवज्युलियन् च 'जीवनयोग', 'विश्वमानव', 'मानवगौरव' 'महायात्रा', 'परमाणूंचें संहारताण्डव' इत्यादि व्यापक विषयांवर रचना करूं पाहणारे श्री. ना. ग. जोशी इत्यादि कवींत महाकवित्वाचे काहीं अंश दिसतात. पण अलि-

कडील कांहीं कवींमधील या सुप्त शक्तीला जोमदार अंकुर कां फुटत नाहींत किंवा ते फुटणार आहेत कीं नाहीं, याचा विचार पुढें करूं.

### आढाव्याचा निष्कर्ष.

तूर्त वरील चर्चेचा निष्कर्ष म्हणून असा सांगतां येईल कीं, इंग्रजी अमदानीच्या सुरवातीपासून आजपर्यंत ( भाषान्तरात्मक रचना सोडल्यास ) खरी स्वतंत्र व महाकाव्यहेतुदृष्ट्याहि विकासमार्गावर असणारीं तीनच महाकाव्यें झालीं. १ 'राजा शिवाजी' ( केवळ हेतुदृष्ट्या ), २ 'यशवंतराव' व ३ 'गोमान्तक'. संस्कृत विदग्धमहाकाव्यांची केवळ परंपरा रक्षिणारीं दोन काव्यें झालीं. १ साधुदासांचें 'रामायणविहार' ( तीन काव्यें एकत्र घेतल्यास ) व २ भिड्यांचें 'राघवीय परीवाह'. इतर कांहीं स्फुट व खंड काव्यात महाकाव्यांचा मोहरा व छटा दिसतात.

## [१०] इतर देशी महाकाव्यें.

मराठींतील महाकाव्यरचनेचा येवढा विचार केल्यावर आतां इतर देशी भाषांकडे वळावयाचें. इतर देशी भाषांत दोन वर्ग. एक संस्कृतोत्पन्न भाषांचा व दुसरा द्राविडी व इतर भाषांचा. बहुतेक सर्व संस्कृतोत्पन्न भाषांमधील वाङ्मयाचा प्रत्यक्ष आरंभ अकराव्या शतकाच्या आगेमागें आहे. तेथपासून इंग्रजी अमदानीपर्यंत त्यांतील वाङ्मय प्राधान्येंकरून धार्मिक स्वरूपाचें आहे. व तें रामायण, महाभारत आणि भागवतादि पुराणें यांच्या आश्रयानें झालें आहे. इतर कांहीं वाङ्मय त्या त्या भाषा बोलणाऱ्या प्रांतातील राजवटीसंबंधानेंहि आहे. त्यातील धार्मिक काव्य प्रायः दीर्घ आख्यानकाव्य स्वरूपाचें व खण्डकाव्य स्वरूपाचेंहि आहे. व त्यांवर रघु, कुमार, नैषध इत्यादिकाची छाया पडलेली आढळते. द्राविडी भाषांतील वाङ्मयनिर्मिति संस्कृतोत्पन्न भाषाच्या मानानें चारपांच शतकें आधींची आहे. तरी तेथेंहि रामायण, महाभारत व संस्कृतसाहित्यपद्धति या गोष्टीच प्रेरक झालेल्या दिसतात. इंग्रजी अमदानीनंतर कांहीं नवे विषय व नवी दृष्टि त्यांत दिसूं लागते. विषय जुना असला तरी तो नवकालाच्या पद्धतिनुरूप मांडलेला तरी असतो. कालिदासादींच्या काव्यांचीं भाषांतरें त्यांत आढळतात. असे हे देशी-

मार्पेतील खण्ड व दीर्घकाव्य रचनेचे सर्वसामान्य विशेष आहेत.

## गुजराथी महाकाव्यरचना.

गुजराथीमध्यें पंधराव्या शतकाच्या आरंभीं वीररसप्रधान अशीं दोन काव्यें झालीं. १ श्रीधराचें 'रणमल्लचण्ड' ( इ. स. १४०० ) व पद्मनाभाचें 'कहानड दे प्रबंध' ( इ. स. १४५६ ) पाहिल्यांत राठोड-कुलांतील ईंधरच्या रणमल्ल या पराक्रमी राजपुत्रानें पाटण्याच्या झाफरखानाशीं केलेल्या लढाईंचें वर्णन आहे. या काव्याचे सत्तर श्लोक उपलब्ध असून ते चौपाई व दोहा या छंदात लिहिलेले आहेत. दुसऱ्यांत झालोरचा राजपुत्र कहानड दे यानें आणीबाणीच्या प्रसंगीं अल्लाउद्दीन खिलजीनें घातलेल्या वेढ्यास मोठ्या शौर्यानें बारा वर्षेंपर्यंत तोंड दिल्याचें वर्णन आहे. यानंतर नरसिंह मेहता, अखो वगैरे संतांची भक्तिपर कविता झाली. प्रेमानंद ( १६३६–१७३४ ) हा फार मोठा आख्यानकवी होऊन गेला. याची रचना खण्डकाव्यपर आहे. 'रुक्मिणीहरण', 'नळाख्यान', 'सुभद्राहरण' इत्यादि तीस काव्यें त्यानें लिहिलीं. प्रेमानंद हा साहित्यशास्त्रज्ञ होता. त्यामुळें विद्ग्धकाव्यरचनेचे सर्व विशेष त्याच्या काव्यांत आहेत. 'नलाख्यान' व 'ओखाहरण' यांसारख्या कांहीं काव्यात महाकाव्यरचनेचे कांहीं विशेष आढळतात. पण जुन्या गुजराथींत नांव घेण्यासारखें महाकाव्य झाल्याचें कोणी सागत नाहीं.

नव्या गुजराथीमध्यें नर्मदाशंकर (१८३३–१८८६) याचीं पुढील तीन काव्यें महाकाव्यसदृश आहेत. 'वीरासेंह', 'इंद्रजित्काव्य' व 'पृथुराज रासा'. प्रो. ठाकोर यांचे 'एक तोडेली डाल' (तोडलेली फांदी) हा एक महाकाव्यरचनेचा अपूर्ण प्रयत्न आहे. यांत पहिले ४४ श्लोकच आहेत. नागरदास पंड्या यानीं 'रघु' व 'कुमार' यांचीं गुजराथी भाषांतरें केलीं आहेत (१९३८). कवि न्हानालाल यांची मनोरचना मात्र महाकवीची असून त्यांनीं 'कुरुक्षेत्र' नांवाचें महाकाव्य लिहिलें आहे. त्याच्या 'विश्वगीतेंतील' कल्पना महाकाव्याच्या पल्लेदारपणाला साजेशी आहे. उमाशंकर जोशी यांचें 'विश्वशान्ति' हें व्यापक व भव्य कल्पनेच्या दृष्टीनें महाकाव्य या प्रकारांत बसूं शकेल.

अर्वाचीन गुजराथीमधील महाकाव्यांच्या अनिष्पत्तीचीं प्रो. रामना ायण

वि. पाठक पुढील कारणें देतातः- १ भावकाव्यांची वाढ, २ कवींमधील ध्येयनिष्ठेचा अभाव, कष्टाचा कंटाळा व असामर्थ्य, ३ वाचकांचें औदासीन्य ( 'अर्वाचीन काव्यसाहित्यना वहेणो' पृ. १५८ ते १६३ ). प्रो. दिवाटिया आपल्या गुजराथी वाङ्मयावरील व्याख्यानमालेंत (१९३२) गुजरार्थीत नाव घेण्यासारखीं महाकाव्यें अल्पच असें सांगतात (पृ.३८).

**हिंदी महाकाव्यरचना.**

जुन्या हिंदीमध्यें तुळशीदासाच्या 'रामचरितमानसा'चा मान फार मोठा आहे (१६ वें शतक) त्याचें रामायण केवळ अनुवादात्मक नाहीं. भक्तीचें महिमान वाढाविण्यासाठीं त्यानें हनुमंताला प्राधान्य दिलें असून रावण हा नुसता राक्षसी वृत्तीचा न दाखवितां तो लोकशत्रु होता ही गोष्ट प्रामुख्यानें चित्रित केली आहे हिंदी प्रांतांत तुळशीदासकृत रामायणाला वाल्मीकिरामायणाचें महत्त्व असल्यानें तें हिंदीचें आर्षमहाकाव्य होय. यांतील जीविताचें विवेचन गंभीर, शैली भरदार, स्वभावरेखा जिवंत व कल्पना पल्लेदार आहे. हिंदी कवि भूखन (भूषण) याचें 'शिवराजभूषण' हें ऐतिहासिक महाकाव्य प्रसिद्धच आहे (१७ वें शतक). आधुनिक हिंदींतील महाकाव्यें पुढीलप्रमाणें आहेतः—अनूपशर्मा यांचें गौतमबुद्धाच्या जीवनचरित्रावरील 'सिद्धार्थ' (१९३०-३५), द्वारकाप्रसाद मिश्रांचें राजकारणध्वनियुक्त 'कृष्णायन' (१९४६), सोहनलाल द्विवेदींचें 'कुणाल,' हरि औध यांचें राधाकृष्णपर 'प्रिय प्रवास' (१९३५) व जयशंकर प्रसाद यांचें अध्यात्मिक रूपकपर 'कामायनी'. मैथिलीशरण गुप्तांचें बुद्धचरित्रपर 'यशोधरा' व रामायणकथापर 'साकेत' हीं दोन महाकाव्यें आहेत. पैकीं 'साकेता'मध्यें स्वयंसेवक लक्ष्मण हा नायक असून ऊर्मिलेच्या आजवर सुप्तच असलेल्या भावनाचा छानदार आविष्कार त्यांत आहे. यांत आदिवासींचा आधुनिक प्रश्न चर्चिला असून अन्तःप्रेरणा व शास्त्र यांचा विरोध मोठ्या बहारीनें रंगविला आहे. ( हिंदीचे प्राध्यापक श्री. प्र. रा. भूपटकर यांच्या कृपेनें. )

**बंगाली महाकाव्यरचना.**

सुमारें तेराव्या चवदाव्या शतकापासून पुढें जुन्या बंगालींत प्रदीर्घ आख्यानात्मक व रामायण-भागवत-महाभारताश्रय काव्यांचा आढळ होतो.

असली नमुनेदार, लोकप्रिय व विदग्ध रचना बंगालींत करणारे कवी कृत्तिवास ओझा (रामायण), मालाधर बसु, रघुनाथ भागवताचार्य (भागवत), व काशीरामदास (भारत), इत्यादि होत. तसेंच कर्नल टॉड्च्या राजस्थानाच्या इंग्रजींतील इतिहासाच्या प्रसिद्धीनंतर बंगालींत बरीच वीररसपूर्ण काव्यरचना झालेली आहे उदाहरणार्थ, रंगलाल बानर्जी (१९ वें शतक) यांनीं 'पद्मिनी', 'कर्मदेवी' इत्यादि ऐतिहासिक आख्यान-काव्ये स्कॉट् व बायरन् यांच्या काव्यांच्या धर्तीवर लिहिलीं.

अर्वाचीन बंगालींत नाव घेण्यासारखें महाकाव्य म्हणजे मधुसूदन दत्तांचें 'मेघनादवध' हें होय (१८६१). लक्ष्मणानें रावणाचा पुत्र मेघनाद ( इंद्रजित् ) याचा वध केला. या रामायणोक्त कथेवर जरी हें महाकाव्य आधारलेलें असलें तरी कवीनें तिला दिलेली कलाटणी लक्षणीय आहे. यात रावणाला प्राधान्य असून राम गौण झाला आहे. व कवीपुढील काव्यरचनेचा आदर्श आपल्या संस्कृत काव्याचा नसून मिल्टनच्या महाकाव्याचा आहे. या काव्याचे नऊ सर्ग असून रचना निर्यमक आहे. यांत कवीचा कल्पनाविलास, स्वभावरेखाचातुर्य व वृत्तीची स्वतंत्रता दिसून येते. या काव्याच्या गुणवत्तेबद्दल बराच उलटसुलट ऊहापोह झालेला आहे (पहा. 'नवयुग' २३ मार्च १९४७). मधुसूदन दत्ताचें 'तिलोत्तमा-संभव' हेंहि एक पौराणिककथाश्रय पण पाश्चात्य महाकाव्याच्या धर्तीचें निर्यमक (Blank Verse) महाकाव्य आहे (सुमारें १८५८). याच काव्याच्या प्रेरणेनें व पौराणिक कथेच्या आधारें 'वृत्रसंहार' नांवाचें महाकाव्य हेमचंद्र बंदोपाध्याय यांनीं रचिलें आहे (१९००). नवीनचंद्र सेन यांचें 'पलासीर युद्ध' (प्लासीची लढाई) हें वीररसपूर्ण व देशाभिमानानें रसरसलेलें काव्य रंगलाल बानर्जीच्या धर्तीचेंच आहे. पण त्यांचीं 'रैवतक', 'कुरुक्षेत्र' व 'प्रभास' हीं तीन काव्यें कल्पनेच्या (Conception) व मांडणीच्या दृष्टीनें महाकाव्यसदृश आहेत. सदर तीनहि काव्यें महाभारताश्रय असून त्यात श्रीकृष्णाच्या जीवनाच्या तीन अवस्था (बाल्य, तारुण्य व उत्तर वय ) चित्रित केल्या आहेत. त्यात आर्य व अनार्य या भारत-वर्षांतील दोन जमातींना समतोल ठेवणारा श्रीकृष्ण हा मध्यवर्ती नायक कल्पिला आहे (सुमारें १८८०). यानंतर नाव घेण्यासारखें काव्य

आधुनिक बंगालींत झालें नाहीं. ( डॉ. सुशीलकुमार दे यांनीं समक्ष दिलेल्या माहितीवरून ).

**कानडी महाकाव्यरचना.**

जुन्या कन्नड वाङ्मयांत महाकाव्यसदृश रचनेचा आरंभ दहाव्या शतकातील पम्प या कवीच्या 'विक्रमार्जुनविय' (पम्प भारत) आणि 'आदि-पुराण' या चम्पूपासून झालेला आहे. यांतील वृत्तें निराळीं असलीं तरी महाकाव्याचे इतर अनेक विशेष यांत आहेत. यांच्याच प्रेरणेनें रण्ण यानें 'गदायुद्ध' हें महाभारताश्रय महाकाव्य लिहिलें. हरिहराचें 'गिरिजा-कल्याण', व रुद्रभट्टाचें 'जगन्नाथविजय' हे महाकाव्यसदृश चम्पू आहेत (१२ वें व १३ वें शतक). मुद्दण नांवाच्या कवीनें एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं लिहिलेल्या 'रामाश्वमेधां'त नव्याजुन्या प्रवृत्तींचें मिश्रण आहे.

अर्वाचीन कानडींत भावकाव्याचेंच प्राचुर्य आहे. तथापि प्रो. बेंद्रे व मास्ति यांसारख्या कांहीं कवींचीं आख्यानकाव्यें हि झालीं आहेत. डी. व्ही. गुंडप्प यांचें 'मंकु तिम्मन कग्ग' हें अर्वाचीन महाकाव्य आहे. यातील कथा एका साध्या वृद्ध अनुभवी शिक्षकाची आहे. यांत पाश्चात्य व पौरस्त्य संस्कृतीचे विशेष मोठ्या सहानुभूतीनें चित्रित केलेले आहेत. कवि विनायक (प्रो. गोकाक) याचें 'आकाशगंगे' हें दुसरें अर्वाचीन महाकाव्य होय. यांतील नायक त्रिविक्रम हा 'आकाशगंगे'च्या शोधांत असून काव्याचें स्वरूप अध्यात्मपर आहे. सौंदर्य, प्रेम व सौहार्द याबद्दलच्या कवीच्या कल्पनांचा आविष्कार यांत फार बहारीचा आहे. के. व्ही. पुट्टापा यांच्या अद्यापि अपूर्ण असलेल्या 'श्रीरामायणदर्शनां'त रामाची जुनीच कथा असली तरी कवीनें मानवजीवनाचें आपलें नवीन 'दर्शन' यांत व्यक्त केलें आहे. (सदर माहिती माझे विद्वान् मित्र व सांगली येथील कॉलेजांतील कानडीचे प्राध्यापक आर्. एस्. मुगळी, एम् ए., याच्या कृपेनें मिळाली.) पार्शिअन् कवि मुल्ला फिरोज् याचें 'जॉर्ज नामा' नावाचें एक महाकाव्य (इ. स. १८३०–३३) आहे. त्यांत 'शहनाम्या'च्या धर्तीवर इंग्लंडचे राजे 'जॉर्ज दि फोर्थ' यांची प्रशास्ति आहे.

हा आढावा अगदीं त्रोटक व अपुरा असला तरी महाकाव्याच्या निर्मितीचें सातत्य व कालानुरोधानें बदलत जाण्याची त्याची प्रवृत्ति या

दोन गोष्टी त्यावरून स्पष्ट नजरेस येतील असें वाटतें.

## (११) महाकाव्याचें भवितव्य.

### काव्यकलेचें स्वातंत्र्य.

पौरस्त्य व पाश्चात्य महाकाव्यांच्या आतापर्यंत दाखविलेल्या स्थित्यन्तरावरून त्याच्या भवितव्यतेचें अंधुक दर्शन वाचकांस झालेंच आहे. तेंच येथें थोडें अधिक स्पष्ट करतों. प्राश्चात्य वाङ्मयांत महाकाव्यें अजिबात बंद पडलीं. व आमच्या वाङ्मयांत महाकाव्यें अल्पप्रमाणांत होत असलीं तरी होणारीं महाकाव्यें व्हावीं तशीं प्रभावी होत नाहींत. या दोन गोष्टी जमेस धरून बऱ्याच टीकाकारांनीं या घटनेची कारणमीमांसा केली आहे. ती निःसंशय उद्बोधक आहे. तिचा परामर्श घेऊन शेवटीं आपला निष्कर्ष काढणें येवढेंच शेवटीं करावयाचें योजलें आहे. ए. सी. ब्रॅडले यानें आपल्या 'The Long Poem in Wordsworth's Age' या निबंधांत या विषयाची थोडी चर्चा केली आहे. त्याच्या मतें वर्डस्वर्थचा काळ हा खरा भावकाव्याचा काळ असल्यानें सदर काळात दीर्घ काव्यें झालीं असलीं तरी जुन्या काळच्या ऐतिहासिक (महा)काव्याची खरी मौज त्यांत नाहीं. कारण जुन्या काव्यांची रचना करणाऱ्या कवींची मनें वस्तुनिष्ठ (objective) होतीं. म्हणजे जुने कवी लोकांच्या भावनांशीं समरस होऊन जुने प्रसंग सांगत. पण या काळांत कवींचा ओढा आपलेच विचार-विकार प्रकट करण्याकडे झाला. तसेंच कवी हे एंका विशिष्ट राष्ट्राकरतां, विशिष्ट धर्माकरतां, विशिष्ट वंशाकरता किंवा विशिष्ट राजाकरतां लिहीतनासे झाले. (महा)काव्यांना या विशिष्टतेचीच आवश्यकता असते. व या विशिष्ट बैठकीवरून ते अखिल मानव्याचा विचार करतात. पण या कालचे कवी या बैठकीशिवायच केवळ तात्त्विक (Abstract) विषयांवर आपले विचार प्रकट करूं लागले. कवी आतां विशिष्ट प्रांताचे किंवा देशाचे रहिवासी न राहातां सरस्वतीच्या विश्वव्यापक व लोकसत्ताक राज्याचे प्रजाजन बनले. काव्यकलेला तंत्राचें किंवा कोणत्याहि नियमाचें बंधन दुःसह झालें. त्यामुळें अमक्याच विषयाची निवड करून तो अमक्याच पद्धतीनें लिहावा हा दण्डक कवींनीं झुगारून दिला.

**सर्वच प्रतिकूल.**

शिवाय जुन्या काळच्या कथा आधुनिक काळांत रंगविण्यामध्यें इतरहि अडचणी आहेत. जुन्या कथांच्या कथनांत त्यांचा वर्तमानाशीं कांहीं जिव्हाळ्याचा संबंध दाखविल्याशिवाय तें कथन रंजक होत नाहीं. व तसा संबंध दाखविण्यासारखें भूत व वर्तमान यांत साम्य राहिलें नाहीं. त्या वेळच्या यांत्रिक, एकरूप, सुस्थित व शांततामय काळांत व्यक्तीच्या मोठ्या पराक्रमाला जागाच नव्हती. याहि जीवनांत कांहीं बारीकसारीक काव्यविषय असतात. पण त्यांची दखलगिरी घ्यायला एखादा भावकवि, कादंबरीकार, लघुकथालेखक, नाटककार किंवा नाट्यछटाकारहि पुरेसा आहे. शिवाय तें युग इतिहाससंशोधनाचें व शास्त्रज्ञानाचें होतें. भरमसाट ऐतिहासिक प्रसंग व सृष्टिनियमाविरुद्ध होणाऱ्या घटना यावर कवींचा व वाचकांचाहि विश्वास नाहीं. शिवाय ऐतिहासिक राजकाव्यें लिहावयाचीं म्हणजे राजाच्या दरबारची व तेथील व्यवहाराची माहिती कवीला पाहिजे. सर्वच कवींना ही संधि मिळते असें नाहीं. तसेंच दीर्घकाव्य लिहिण्याला लागणारा खोल अनुभवहि कवींना नव्हता.

**तेंच अधिक प्रमाणांत.**

वर्डस्वर्थच्या काळांतील ऐतिहासिक किंवा पौराणिक दीर्घ काव्याच्या ऱ्हासाबद्दल ब्रॅड्लेनें केलेली ही मीमांसा हल्लीच्या काळांतील महाकाव्याच्या ऱ्हासाला अधिक प्रमाणांत लागू पडते. कारण वर्डस्वर्थच्या काळांतील दीर्घ काव्याना मारक असणाऱ्या प्रवृत्तींच्या अंकुरांना हल्ली पालवी फुटली आहे. वास्तवाभिमुखता, बुद्धिप्रामाण्य (Rationalism), व्यक्तित्वाचा विकास (Individualism), विभूतिपूजेची (Hero-worship) नावड, यंत्रयुगाचे परिणाम, गद्य वाङ्मयाचा प्रचंड प्रसार इत्यादि गोष्टी हल्लींच्या काळीं अधिक प्रमाणांत दिसत आहेत अशा काळांत सबंध काव्यकलेचाच ग्रंथ आटोपल्याची भाषा जेथें चालू आहे तेथें महाकाव्यासारख्या विशिष्ट काव्यशाखेबद्दल तर बोलावयासच नको. मार्क्सच्या अनुयायाच्या मतें तर महाकाव्य ही केवळ वरच्या वर्गाची कला (Bourgeois Art किंवा Fascist Art) असल्यानें ती आपल्या मरणानेंच मेली आहे. आतां यापुढें काव्य टिकावयाचें असेल तर तें समाजवादी (Communist) पाहिजे.

समाज असंस्कृत, साधा, निरागस व आद्य अवस्थेंत असेल तेव्हांच महाकाव्यें निर्माण होतात. तो काळ जाऊन समाज सुधारत चालला कीं ही निर्मिति बंद पडते असें कांहींचें मत आहे. पण तें इतकें फोल आहे कीं त्याचा गंभीर विचारहि करण्याची जरूर नाहीं. ज्याला आर्षकाव्यें व विदग्धकाव्यें यांतील फरक कळतो तो तरी हें मत ऐकूनहि घेणार नाहीं.

**प्रो. वा. म. जोशी यांची मीमांसा.**

प्रो. वा. म. जोशी यानीं महाकाव्याच्या अनिर्मितीची मीमांसा पुढील-प्रमाणें केली आहे (विचारसौंदर्य पृ. ९–१०). "अलीकडच्या शास्त्रीय युगांत बाह्य परिस्थितीमध्यें सापेक्षतः स्थिरता व निश्चितता, पण अन्तःसृष्टीमध्यें अस्थिरता व अराजकता उत्पन्न झाली आहे. हल्लीं काहीं पूज्य किंवा आदरणीय नाहीं. सर्व कल्पना संशयास्पद झाल्या आहेत. समुद्रगंभीर प्रश्न व विराट्स्वरूपी सौंदर्य कल्पनेला अगम्य झालीं आहेत. कशावरच उत्कट श्रद्धा नाहीं, निश्चित ध्येयें व आकांक्षा नाहींत. सारांश, ज्या उच्च, व्यापक, सोत्साह व आत्मप्रत्ययपूर्ण वृत्तीनें व दृष्टीनें पाहिल्याशिवाय महाकाव्याची निष्पत्ति होऊं शकत नाहीं ती दृष्टि अलीकडे फारशी दिसत नाहीं." प्रो. जोशी यांना हल्लींच्या युगांत महाकाव्याला योग्य असा विषय नाहीं म्हणून तें होत नाहीं, असें म्हणावयाचें नाहीं. त्यांची तक्रार आधुनिक वाचकांच्या श्रद्धेविरुद्ध व कवींच्या महाकाव्यनिर्मितिक्षम मनाविरुद्ध आहे. डॉ. ग्रामोपाध्ये यांनीं म. सा. पत्रिकेंतील आपल्या लेखांत 'कवींच्या व्यापक वस्तुनिष्ठ दृष्टीचा अभाव हेंच अर्वाचीन काळांत, विशेषतः मराठींत, महाकाव्यें लिहिलीं जात नाहींत याचें प्रमुख कारण म्हणून सांगतां येईल'! असें प्रतिपादिलें आहे. त्यांच्या मतें अश्रद्धा, संशयवाद, किंवा प्रतिभेचें क्षणभंगुरत्व इत्यादि गोष्टी महाकाव्याच्या अनिर्मितीचीं कारणें होऊं शकत नाहींत.

**प्रतिबंधक कारणें आहेत व नाहींतहि !**

महाकाव्याची जागा आतां कादंबरीनें घेतली (the novel as epic) इतकेंच नव्हे तर नायकहि मेला ( Death of the Hero ) असें मत राल्फ फॉक्स यानें आपल्या 'The Novel and the People' या पुस्तकांत मांडलें आहे. श्री. नारखेडे, प्रो. अ. ना. देशपांडे वगैरेंनीं केलेली

कारणमीमांसा थोडी वेगळी असली तरी यापुढें महाकाव्यनिर्मिति होणार नाहीं असेंच त्यांचें मत दिसतें. नारखेडे यांना महाकाव्ययोग्य विषय हल्लीं आहेत व प्रतिभाहि आहे असें वाटतें. पण वाचक सश्रद्ध नाहींत ही त्यांची तक्रार. तर प्रो. देशपांडे यांचे मतें हल्लींचे कवी आत्मनिष्ठ आहेत म्हणून ते महाकाव्यानिर्मितीला अपात्र ठरतात.

महाकाव्यांची निर्मिति होऊन तिची समाजांत बूज होणें याला एकंदर कारणें तीन. १ योग्य विषय, २ योग्य कवि व ३ उत्तेजन देणारा वाचकवर्ग. वर दिलेल्या महाकाव्यांच्या अनिर्मितीच्या चर्चेंत कोणी विषयाच्या योग्यतेचा, कोणी कवीच्या योग्यतेचा तर कोणी वाचकवर्गाचा अभाव दाखवीत आहेत. कांहींना त्यांतील कांहीं किंवा सर्वच कारणांचा अभाव मान्य आहे. पण आपलेंच कारण खरें असें दाखवितांना एक दुसऱ्याचें कारण खोडून काढतो. त्यामुळें पर्यायानें महाकाव्यनिर्मितीचीं तीनहि कारणें आज अस्तित्वांत आहेत असेंहि त्यांतून सिद्ध करता येईल ! पण कारणें असतांना कार्य मात्र निर्माण होत नाहीं हें कोडें कसें सोडवावयाचें ?

**लोकनेते नायक होतील !**

ह्या कारणमीमांसेंतील परस्परविरोध मोठा सूचक आहे. त्या विरोधानें असें सिद्ध होतें कीं यापुढें महाकाव्यें निर्माण होणार नाहींत व होतीलहि ! हीं परस्परविरोधी अनुमानें खरींहि आहेत व खोटींहि आहेत. पण या खऱ्याखोट्या अनुमानांतच महाकाव्याची भावी निष्पत्ति सूचित होते. अगदीं **पूर्वीच्या स्वरूपाचीं** महाकाव्यें आतां निर्माण होणार नाहींत हें खरें आहे. पण महाकाव्याच्या हेतूचा जो विकास मागें दाखविला त्यावरून महाकाव्य ही रचना बदलत्या कालाशीं अनुसंधान राखून टिकणारी आहे असें सिद्ध झालें आहे. त्यावरून असें वाटतें कीं, बदलत्या **स्वरूपांत** तिची निष्पत्ति होईल. जुनी ग्रीक 'ट्रॅजेडी' बदलत बदलत 'एकच प्याल्या'पर्यंत टिकली आहे. तशीं रामायण महाभारत हीं आर्षकाव्यें बदलत बदलत मधुसूदन दत्तांच्या 'मेघनादवध' व हेमचंद्र बंदोपाध्याय याच्या 'वृत्रवध' यापर्यंत, न्हानालाल याच्या 'कुरुक्षेत्रा'पर्यंत व मैथिलीशरण गुप्तांच्या 'साकेता'पर्यंत टिकून आहेत. रामलक्ष्मण व भीमार्जुन यांच्याऐवजीं जर नायक म्हणून शिवाजी, यशवंतराव किंवा पेशवे

चालतात, तर लो. टिळक, सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, जवाहिरलाल, सावरकर इत्यादि लोकनेते कां चालूं नयेत? राजसत्ता व धर्मसत्ता यांचें संयुक्त अस्तित्व पूर्वी वरच्या वर्गात होतें. त्याचें विकेंद्रीकरण (Decntralization) होऊन हल्लीं त्या मध्यम व कनिष्ठ वर्गात आल्या आहेत. त्यामुळें हे दोन वर्ग हेंच हल्लींच्या वीरांचें जन्मस्थान आहे. वीरवृत्ती, मग ती कोणत्याहि स्वरूपात व कोठेंहि आढळो, तिच्याबद्दल आदर किंवा भक्ति वाटणें हा मानवी मनाचा स्वभावसिद्ध धर्म आहे.

## महाकाव्यनिर्मितीची शक्यता.

हल्लींच्या व्यक्तित्वाच्या विकासामुळें किंवा वास्तवाभिमुखतेमुळें फार झालें तर ती भक्ति प्रकट करण्याच्या पद्धतींत फरक पडेल. प्राचीन महाकाव्यांतील अतिमानुषशक्तीचा वापर, नायकाचें देवीकरण, व इतर प्रकारची अतिशयोक्ति हा महाकाव्याचा आत्मा नसून तो एक शोभेचा अलंकार आहे हें मागेंच सिद्ध झालें आहे. व काव्याला आवश्यक अशी जी थोडी अतिशयोक्ति लागते ती भूतकालीन कथ चें वर्तमानाशीं जिव्हाळ्याचें साम्य ध्वनीनें दाखविल्यास, किंवा वर्तमान कथाना भूतकालाच्या कोंदणात कौशल्यानें बसविल्यास नुसती सह्यच नव्हे तर रोचकहि होईल. पुनरुत्थानाची थोर आकांक्षा बाळगणाऱ्या या व्यासवाल्मीकी व कालिदासाच्या आर्यावर्तात महाकाव्यांस योग्य उदात्त विषय व वीरवृत्ति नाहीं व ती चित्रित करणाऱ्या वस्तुनिष्ठ कवींची उणीव आहे या दोन्हीहि कल्पना भ्रामक आहेत. आज केवळ कांहीं तात्पुरत्या व्यावहारिक कारणांसाठीं भावकाव्यें निर्माण होत असलीं तरी त्यामुळें महाकाव्यनिर्मितीची ताकदच कोणा कवीला राहिली नाहीं हें म्हणणें खरें नाहीं. अगदीं वर्तमानकालीन घटनांवर काव्यनिर्मिती करणें मताच्या अनिश्चयामुळें कठीण असतें. समकालीन घटनांवरील व वीरपुरुषांवरील मतभेदाची धूळ खालीं बसल्यावर त्यांबद्दलचें निश्चित असें एक मत कांहीं काळानें शिल्लक उरतें. व त्यावर काव्यनिर्मिति होणें संभवनीय असतें. अगदीं सटरफटर काव्यें धरलीं तरी संस्कृत भाषेंत दोन हजार वर्षांत फक्त जास्तींत जास्त चारशें महाकाव्यें झालीं. जुन्या मराठीच्या सातशें वर्षांत चारपांचच महाकाव्यें झालीं. या हिशेबानें मराठी किंवा इतर

देशी भाषा यांतील आजवर झालेली काव्यरचना निराशाजनक नाहीं.

**महाकवींच्या आगमनाची खात्री.**

महाकाव्यें व महाकवी लोकजीवनाशीं जसे अधिक समरस होत जातील तशी ही रचना अधिक लोकप्रिय होईल. टिळक, सुभाषचंद्र, म. गांधी, सावरकर, नाना पाटील, आंबेडकर, इत्यादिकांवर आजवर झालेले व होत असलेले पोवाडे ही भावी महाकाव्याची सामग्री ( epic mateiral ) आहे; यांतूनच पुढील महाकाव्यरचना होणार आहे. महाकाव्याचे कांहीं गुण असलेलीं चरित्रें, कादंबऱ्या, इतिहास, नाटकें, किंवा कथा या हल्लीं होतें आहेत हें खरें, पण हे वाङ्मयप्रकार महाकाव्याची जागा घेऊं शकणार नाहींत. महाकाव्याचें म्हणून कांहीं निराळें वैशिष्ट्य असतें. असल-वैशिष्ट्यपूर्ण काव्यें लिहिणाऱ्या भावी महाकवींच्या आगमनाचा संभव निश्चित आहे यांत शंका नाहीं.

---

## प्रमुख आधारभूत ग्रंथांची यादी.


( 1 ) God, Man and Epic Poetry Vols. I & II–H. V. Routh

( 2 ) Lectures on Greek Poetry
( 3 ) Classical Studies } J. W. Mackail.

( 4 ) The Epic—the Art & Craft of Letters–Abercrombie.

( 5 ) English Epic and Heroic Poetry by Dixon.

( 6 ) The Book of the Epic—H. A. Guerber.

( 7 ) A History of Sanskrit Literature—A. B. Keith.

( 8 ) Classical Sanskrit Literature–M. Krishnamachariar

( 9 ) The Heroic Age in India—N. K. Sidhanta, M.A.

(10) From Virgil to Milton—C. M. Bowra.

(11) A Preface to the Paradise Lost–G. S. Lewis.


---

# कालिदासाचें ' कुमार-संभव '

## कवि-परिचय

### कालनिर्णयाचे तरंगते पाय.

उपलब्ध वैदिक संस्कृत महाकाव्यांच्या रमणीय रचनेचा आद्यप्रवर्तक कविकुलगुरु कालिदास अमुक एका विशिष्ट काळीं व स्थळीं होऊन गेला असें अद्यापहि निश्चयानें सांगतां येत नाहीं. आपला सविस्तर वृत्तान्त, किंवा निदान आपलें नांवगांव तरी, आपल्या काव्यांत कोठेंहि उल्लेखूं न देणारी या महाकवीची शालीनता आणि आमच्या प्राचीनांची स्थलकालनिर्णया-विषयींची शोचनीय अनास्था या दोन गोष्टी आमच्या या लज्जास्पद अज्ञानाला कारणीभूत आहेत. परंतु हें अज्ञान सुदैवानें कांहीं पाश्चात्य व पौरस्त्य अर्वाचीन पंडितांनीं आपल्या ऐतिहासिक दृष्टीनें अंशतः तरी दूर केलें असून भारतीय कवींच्या कालनिर्णयाचे तरंगते पाय निदान अनुमानाच्या भूमीवर तरी स्थिर केले आहेत. कालिदासाच्या काव्यकृतींत चित्रित केलेल्या परिस्थितीचा तत्कालीन ऐतिहासिक घटनांशीं शक्य तेवढा मेळ बसवून हीं अनुमानें त्यांनीं काढलेलीं आहेत.

त्यांपैकीं सर वुइलियम जोन्स, प्रो. र. ना. आपटे, रा. ब. चिंतामणराव वैद्य, प्रो. शारदारंजन रे, प्रो. चट्टोपाध्याय इत्यादि कांहीं पंडितांच्या मतें कालिदास ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला. तो शकारि विक्रमादित्याच्या पदरीं असलेल्या 'नवरत्नां'पैकीं एक होता. ह्या शककर्त्या विक्रमादित्यानें आपल्या नांवाचा विक्रमसंवत् इ. स. पूर्वी ५७ व्या वर्षीं सुरू केला. त्याची राजधानी उज्जयिनी असून त्याचा राजकवि कालिदास अर्थात् उज्जयिनीसच रहात असे. डॉ. भांडारकर, प्रो. कीथ, प्रो. वा. वि.

मिराशी इत्यादि कांहीं संशोधकांच्या मतें कालिदास द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या आश्रयास होता. प्रसिद्ध गुप्तघराण्यांतील या राजानें इ. स. ३८० ते इ. स. ४१३ पर्यंत राज्य केलें ही गोष्ट ऐतिहासिक साधनांवरून सिद्ध आहे. कालिदासवर्णित परिस्थितीचा या गुप्तकालाशीं जास्तींत जास्त चांगला मेळ बसतो. म्हणून कालिदासाचा काल चवथ्या शतकाचा शेवट किंवा फार झालें तर पांचव्या शतकाचा आरंभ मानावा. या दोनहि मतांच्या अभिमानी पंडितांनीं पुरस्कारलेलीं अनुमानें बळकट पायावर उभीं असून त्यांच्या अनुयायांचा वर्गहि मोठा आहे. तथापि दुसऱ्या मतांतील प्रतिपाद्य काल अर्वाचीन असल्यानें त्याला ऐतिहासिक साधनांचें साहाय्य मिळणें अधिक सुलभ झालें व त्यामुळें कालिदासीय वर्णनांचा तत्कालीन परिस्थितीशीं मेळ अधिक चांगला दाखवतां आला. याचा परिणाम असा झाला आहे कीं आज कालिदासाच्या गुप्तकालीन उपपत्तीला विश्वविद्यालयीन मंडळींत अधिक मान्यता आहे. पहिल्या शतकाच्या उपपत्तीला तिच्या प्राचीनत्वामुळेंच विश्वसनीय ऐतिहासिक साधनें दाखवणें थोडें जास्त कठिण आहे. त्यामुळें कांहीं मोघम उल्लेख, व कथासरित्सागर, बृहत्कथामंजिरी, जैनांचें कालकाचार्य कथानक इत्यादींवर अवलंबून राहणें त्यांत भाग पडतें. तथापि त्या मतालाहि कांहीं पुरावा उपलब्ध होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

**कालाच्या हिशेबांत १५०० ची चूक.**

शकांचा (पार्शियनांचा) पराभव करणारा शककर्ता काश्मीरचा श्रीहर्ष विक्रमादित्य याचे वेळीं (म्हणजे इ. स. पूर्व ४५७) कालिदास–(मातृगुप्त)–असावा येथपासून तों धारानगरीच्या भोजराजाच्या पदरीं इ. स. ११ व्या शतकांत तो असला पाहिजे येथपर्यंत पंडितांच्या मतांचा लंबक झुकला आहे. ज्या हिशेबांत १५०० ची चूक येते तो कालाचा हिशेब औरच म्हटला पाहिजे. किंवा कालविषयक मताच्या लंबकानें पंधराशें वर्षांचें अंतर कापावें हें सुद्धां एक कविमाहात्म्यच नव्हे तर काय? पण त्यांतल्यात्यांत स्थिर होऊं पाहणाऱ्या दोन मतांचाच वर उल्लेख केला आहे. इतर मतमतांतरांचा प्रत्यक्ष उपन्यास करून तीं छानीत बसणें प्रस्तुत ग्रंथाच्या उद्देशाला धरून नसल्यानें तो ऊहापोह येथें करीत नाहीं. मात्र येथें येवढेंच

सांगणें इष्ट आहे कीं मातृगुप्त कालिदासापासून अभिनव कालिदासापर्यंत जवळ जवळ नऊ कालिदास नांवाचे कवि व चार पांच विक्रमादित्य होऊन गेल्यानें खऱ्या महाकवि कालिदासाचा काल, त्याचें वसतिस्थान आणि त्यानें केलेले ग्रंथ यांच्या निर्णयांत गोंधळच गोंधळ माजून राहिला आहे ! तें काहींहि असलें तरी मागें व पुढें सरकविण्यांत येणाऱ्या कालिदासकालाच्या दोन पक्क्या ऐतिहासिक सीमा ठामपणें निश्चित आहेत. 'मालविकाग्निमित्र' नाटकांत ज्या अग्निमित्राचें चित्र कालिदास रेखाटतो तो पुष्यमित्राचा पुत्र. या शुंगवंशीय पुष्यमित्राचा काल इ. स. पूर्व १५० हें सिद्ध आहे. तसेंच ज्या ऐहोळें येथील जैनमंदिराच्या शिलालेखांत कालिदासाचा उल्लेख आहे तो लेख इ. स. ६३४ चा. अर्थात् या सातशेंसाडेसातशें वर्षांच्या कक्षेंत येणारीं 'रघुकार' कालिदासाच्या कालाविषयींचीं जीं मतें तींच विचारार्ह आहेत.

## कल्पनेच्या पंखावरील जिज्ञासा.

कालिदासाच्या कालाबद्दलच्या मतमतांतरांत जेथें पंधरा शतकांएवढें विस्तीर्ण अन्तर तेथें त्याच्या स्थलाबद्दलची व चरित्राबद्दलची गोष्टच बोलावयास नको. कालिदास ही महाविभूति अतिप्राचीन काळीं होऊन गेल्यानें व तिची निश्चित माहिती पूर्वी कोणासच नसल्यामुळें प्राचीनांची कुतूहलप्रेरित कल्पना जागृत झाली व तिनें अनेक दंतकथांचे मनोहर तंतू कांतून कालिदासचरित्राचें एक सुंदर सणंग विणून काढलें आहे. व त्यांचा खपहि भाविकांच्या बाजारपेठेंत फार छान होतो. पण यांत कालिदासाच्या अक्षरशः असंख्य भाविक भक्तांना तरी दोष कां द्या ? थोर लोकांबद्दलच्या तीव्र जिज्ञासेचे हातपाय जखडले कीं ती कल्पनेच्या उघड्या पंखावर बसून मनमानेल तसा स्वैरसंचार न करील तरच नवल. कालिदासाचा जीवनवृत्तान्त, त्याचें अलौकिक कवित्व, चातुर्य व औदार्य यांबद्दलच्या बऱ्याच आख्यायिका व दंतकथा कर्णपरंपरेनें आल्या असून त्यांतून कांहीं सोळाव्या शतकांतील बल्लाळ कवीच्या 'भोजप्रबंध' ग्रंथांत आहेत. त्यापैकीं कांहींचा येथें उल्लेख करतों.

## समस्येसह जीवितहि पूर्ण झालें !

कालिदास हा ब्राह्मणाचा मुलगा. तो लहान असतांच त्याचे

आईबाप निवर्तले. या सुरूप, सुदृढ आणि बुद्धिमान् पोरक्या मुलाचा प्रतिपाळ एका कनवाळू गवळ्यानें केला. हा मुलगा गवळ्यांच्या संगतींत वाढल्यानें त्याच्यावर विद्येचे संस्कार झाले नाहींत. जवळच्या नगरींतील एका राजकन्येचें लग्न तेथील प्रधानानें कपट करून या देखण्या परंतु विद्याहीन तरुणाशीं मुद्दामच लावून दिलें. पुढें त्या राजकन्येनें या आपल्या मूर्ख पतीची निर्भर्त्सना करून त्याला काली देवीच्या उपासनेनें विद्वत्ता संपादण्यास पाठवून दिलें. कालीच्या उपासनेमुळें त्याला कवित्व, विद्वत्त्व व कालिदास हें नांव मिळालें. तो परत आपल्या पत्नीकडे आल्यावर तिनें त्याला 'आतां तुझ्या वाणींत कांहीं विशेष गुण आले का!' (**अस्ति कश्चिद् वाग्विशेषः?**) असा प्रश्न केला. त्यासरशीं त्यानें '**अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा**' या आरंभाचें 'कुमारसंभव', '**कश्चित्कान्ता-विरह-गुरुणा स्वाधिकारात् प्रमत्तः**' या आरंभाचें 'मेघदूत' व '**वागर्था-विवसंपृक्तौ**' या आरंभाचें 'रघुवंश' अशीं तीन काव्यें उत्तरादाखल घडाघड म्हणून दाखविलीं. पण आपल्या बुद्धिवैभवाचें निमित्त झालेल्या आपल्या उपकारी मार्येस मात्र त्यानें मातृसमान मानिलें. त्यामुळें चिडून जाऊन तिनें त्याला शाप दिला कीं, 'तूं स्त्रीहस्तें मृत्यु पावशील.' त्यानंतर त्याचें वर्तन स्वैरपणाचें होऊं लागलें. एकदा कुमारदास नांवाच्या आपल्या मित्रास भेटण्यासाठीं कालिदास सिंहलद्वीपांत गेला असतां त्याला एका वेश्येच्या तोंडून समजलें कीं, तेथील राजानें '**कमले कमलोत्पत्तिः श्रूयते न तु दृश्यते।**'—म्हणजे एका कमलावरच दुसऱ्या कमलाची उत्पत्ति होते असें ऐकिवांत आहे पण ही गोष्ट प्रत्यक्ष नजरेस येत नाहीं—अशी एक समस्या प्रकट केली व ती पूर्ण करून देणाऱ्यास मोठें पारितोषिक जाहीर केलें. कालिदासानें लागलीच ती पुढीलप्रमाणें पूर्ण केली. '**बाले तव मुखाम्भोजे कथमिन्दीवरद्वयम्**' म्हणजे 'हे कुमारी, असें जर आहे तर तुझ्याच मुखकमलावर दोन (नेत्ररूपी) निळीं कमळें दिसतात हें कसें?' व ती त्या वेश्येला सांगितली.

समस्यापूर्तीचें जाहीर झालेलें बक्षिस आपल्यालाच मिळावें या दुष्ट इच्छेनें तिनें कालिदासाचा खून करविला. पण पुढें हा गुन्हा उघडकीस आला. कुमारदासाला हा वृत्तान्त समजल्यावर त्यानें मित्रप्रेमामुळें कालि-

दासाच्या चितेवर स्वतःस जाळून घेतलें. ही जागा सिंहलद्वीपांत माटर नांवाच्या दक्षिणप्रांतांत किरिंदी नदीच्या मुखाजवळ अद्यापहि दाखविली जाते असें कै. म. म. डॉ. सतीशचंद्र विद्याभूषण यांनीं म्हटलें आहे. ( प्रो. मिराशी, कालिदास पृ. ७०–७२ ).

## ब्राह्मणांचें दैन्य दूर झालें.

कांहीं दंतकथांतून कालिदासानें भवभूतीच्या ' उत्तररामचरितां 'तील अंक १.२७ या श्लोकाच्या शेवटच्या चरणांत ' रात्रिरेवं व्यरंसीत् ' याच्याऐवजीं ' रात्रिरेव व्यरंसीत् ' अशी मार्मिक दुरुस्ती सुचविल्याचा उल्लेख आहे, तर कांहींत भोजानें आरंभिलेल्या एका श्लोकाच्या पहिल्या चरणानंतर कवि महेश्वर, बाण व कालिदास यांनीं एकापेक्षां एक वरचढ काव्यमय चरण रचिल्याचें सांगितलें आहे. भोजप्रबंधांत तर कालिदास आपल्या बुद्धिचातुर्यानें गरीब ब्राह्मणांस राजाकडून साहाय्य मिळवून देई, अनेक अवघड समस्या सोडवी, जीवनांतील आणि काव्यांतील कठिण कोडीं चटकन् उकलून दाखवी यांबद्दलच्या पुष्कळ कथा आहेत.

एकदां एक गरीब आणि अविद्वान् ब्राह्मण कालिदासाकडे आला व त्यानें ' भोजराजाकडून मला कांहीं द्रव्य मिळवून द्या ' अशी कालिदासाला विनंति केली. ' आपलें अध्ययन काय झालें आहे ! ' असें कालिदासानें विचारतांच ब्राह्मणानें नकारघंटा वाजविली. मात्र " मला पुरुषसूक्तांतील ' सहस्रशीर्षा ' येवढा एकच मंत्र येतो " असें तो म्हणाला. ब्राह्मणाच्या दारिद्र्याची कींव येऊन कालिदास त्याला बोलला, ' चिंता नाहीं. तेवढा सबंध मंत्र तरी सभेंत राजापुढें म्हणा म्हणजे झालें. ' सदर भटजीबुवा विद्वानांच्या सभेंत राजासमोर उभे राहिले. तों काय ? त्यांचें सर्वांग लटालटा कांपूं लागलें. कालिदासानें खूण करतांच त्यानें ' सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपाद् ' येवढा भाग कसाबसा म्हटला पण पुढें स्मरणशक्तीनें भटजीस आयत्यावेळीं ठकविलें. तो शून्य चेहरा करून नुसता उभा राहिला. तेव्हां कालिदास चटकन् पुढें होऊन राजास म्हणाला, " महाराज, या विद्वान् कविवर्यांना शत्रूवर चाल करावयास निघालेल्या आपल्या अफाट सैन्याचें वर्णन करावयाचें आहे व तें त्यांनीं पुरुषसूक्तांतील या पहिल्या चरणानें आरंभिलें आहे. तूर्त ते विनयामुळें थांबले आहेत.

त्यांना अभिप्रेत पुढील चरण असा आहेः—'चलितश्चाकितश्छन्नस्तव सैन्ये प्रधावति' म्हणजे आपलें सैन्य स्वारीवर झपाट्यानें निघालें तेव्हां त्याच्या प्रचंड हालचालीच्या हिसक्यांनीं शेष ( सहस्रशीर्षा ) लटपटूं लागला. इन्द्र ( पुरुषः सहस्राक्षः ) त्या सेनासागराकडे पाहून आश्चर्यचकित झाला आणि सूर्य ( सहस्रपाद् ) सैन्यानें उठविलेल्या धुरळ्यानें झांकाळून गेला.'' असली विलक्षण काव्यमय स्तुति त्या ब्राह्मण कवीनें (?) केलेली ऐकून रसिक भोजराजा संतुष्ट झाला व ओघानेंच त्या ब्राह्मण कवीचें (!) जन्माचें दारिद्र्य फिटलें हें काय भोजाचें औदार्य जाणणारांना सांगितलें पाहिजे ?

**रसिकांचे बोलके अभिप्राय.**

या सर्व आख्यायिका ऐतिहासिक दृष्टीनें अविश्वसनीय असल्या तरी कित्येक शतकांनीं मोठ्या मार्मिकपणें केलेलें कालिदासाच्या अतुल गुणांचें तें साधेंभोळें आणि प्रेमळ कौतुक आहे. आणि याच दृष्टीनें त्याकडे पाहिलें पाहिजे. कालिदासाची निव्वळ व्यक्तिविषयक माहिती मत्सरी कालानें गडप करून टाकिली असली तरी त्याच्या काव्यकृतींच्या निर्मल दर्पणांत पडलेलें त्याच्या व्यक्तिमत्त्वाचें स्पष्ट प्रतिबिंब कालाच्या प्रपितामहासहि पुसून टाकतां येणार नाहीं ! कवींचीं काव्यें हींच त्यांचीं खरीं चरित्रें होत. आणि कालिदासाच्या या काव्यचरित्रांचे जगभर पसरलेचे रसिक वाचक त्याच्या कविजीवनाची ग्वाही स्वमुखानें पुढीलप्रमाणें देत उभे आहेत.

महाकवि बाण कालिदासाच्या सरस काव्याला मधुर रसानें थबथबलेल्या मंजिरीची उपमा देतो. जयदेव त्याला कविता कामिनीचा प्रत्यक्ष विलास मानतो. गोवर्धनाचार्य, राजशेखर इत्यादि रसिक त्याची भारतीय रससिद्ध सत्कवींच्या अग्रभागीं गणना करतात. 'उपमा कालिदासाचीच', 'शृंगाररस कालिदासानेंच वटवावा', 'स्त्रीहृदयाचें रहस्य असें कालिदासालाच उमगलें होतें' ( वल्लभाचार्य ), 'कालिदासाच्या तोडीचा दुसरा कवि न सांपडल्यामुळें कविगणना करणाऱ्या कोणा रसिकाच्या हाताचें करंगळीनंतरचें बोट 'अनामिका' हें सार्थ नाम पावलें', 'पृथ्वीवर राहूनहि स्वर्गसुखाचा अनुभव कोणास घ्यावयाचा असला तर त्यानें शरदृतूंतील चंद्राचे किरण, शर्करायुक्त दूध, तारुण्यांतील मादक नवाळी, कोमलांगी

युवती आणि कालिदासाची कविता यांचें सेवन करून पहावें ', ' संस्कृत कविता ही वाल्मीकीची खेळकर कन्या. तिला व्यासाचेकडून शिक्षणसंस्कार झाला. पुढें तिनें विदर्भ देशाच्या रीतीप्रमाणें कालिदासालाच पति म्हणून वरलें' इत्यादि अभिप्राय स्वतःच इतके बोलके आहेत कीं त्याबद्दल जास्त कांहीं लिहावयास नको. बरें, हें झालें कालिदासाच्या देशबंधूंविषयीं. आतां त्याच्या विदेशीय लोकप्रियतेविषयीं. विशेषतः त्याच्या ' शाकुन्तला 'नें तर त्याला विश्वकुटुंबांतील सर्वांचा एक जिवलग या नात्याची जोड करून दिली आहे.

केवळ भाषांतराच्या द्वारें कालिदासाच्या काव्यकृतींशीं ओळख झाल्यानेंहि अनेक पाश्चात्य कवि आणि रसिक इतके मोहित झाले कीं त्यानीं त्याला आत्मीयत्वानें कवटाळिलें ! मोनियर वुइलियम्सच्या प्रस्तावनेंत प्रथम ' **कालिदास हा भारतीय शेक्सपियर होय** ' ही श्लाघनीय आणि सार्थ उक्ति प्रथा पावली. फार काय ? या उक्तींतील उपमानस्थानीं असलेला खुद्द शेक्सपियरसुद्धा जर कालिदासाची नाट्यमाधुरी चाखता तर त्यानेंहि आपल्या या सजातीय सख्याबद्दल असेच कौतुगोद्गार खचित काढले असते. कवीच कवीला ओळखतो. या ओळखींत स्थलकालाचें अंतर संकोचून मागें हटतें. प्रसिद्ध जर्मन कवि गटे व आपल्याकडील भारतीय कवीन्द्र रवींद्रनाथ टागोर हे दोघेहि शाकुंतलाच्या मोहिनीने वेडावून गेलेले आहेत. गटे म्हणतो, " स्वर्ग आणि पृथ्वी याचें मधुर मीलन जर कोठें पहावयाचें असेल आणि तारुण्याची टवटवी व परिपक्वतेचीं फळें जर कोणास एके स्थळीं असलेलीं बघावयाचीं असतील तर मी शाकुंतलाकडे अंगुलिनिर्देश करीन. " चेझी नांवाचा रसिक शाकुंतलातील ' **आलक्ष्यदन्तमुकुलान्** ' हा वत्सल रसपूर्ण श्लोक वाचून आनंदानें नाचूं लागला. कालिदासाच्या इतर रसिकांमध्यें अलेक्झँडर व्हॉन हँबोल्ट, श्लेजेल, लेसन, डॉ. रायडर, सिल्व्हॉ लेव्ही इत्यादि मंडळींची गणना करतां येईल. स्थलसंकोचास्तव सर्वांचा नामनिर्देशहि येथें करतां येत नाहीं.

## कालिदासाचें आत्मचरित्र.

स्वतः कालिदासाच्या कृतींतील उल्लेखांवरून त्याचें चरित्र आणि चारित्र्य याबद्दल पुढील अनुमानें निघतात. या अनुमानांनीं दाखविलेलें त्याचें आत्मचरित्र विश्वसनीय मानण्यास प्रत्यवाय नाहीं. कालिदासाचा जन्म ब्राह्मण-

कुळांत झाला. तो माळव्यांत उज्जयिनी येथें रहात असे. तो राजकवि असून शिवभक्त होता. त्याचें शिक्षण त्या कालच्या एखाद्या गुरुकुलांत झालें होतें. श्रुति, स्मृति, इतिहास, पुराणें, योग, सांख्य, अद्वैतवेदान्त, ज्योतिःशास्त्र, कामशास्त्र, वैद्यक, व्याकरण, अर्थशास्त्र, संगीत, चित्रकला इत्यादि शास्त्रांचा आणि कलांचा त्याला उत्तम परिचय होता. त्यानें प्रवास करून ठिकठिकाणच्या रीतीभातींचें आणि लोकस्थितीचें चांगलें सूक्ष्म अवलोकन केलें होतें. राजदरबार, युद्धें, संधि, राजशासन, श्रीमंत लोक यांची त्याला जवळून माहिती होती. तत्कालीन समाजव्यवस्थेंत प्रमुख असलेली राजसंस्था त्याला मनापासून आवडे. राजपुत्र, राजकन्या, विजयी वीर इत्यादिकांचें वैभव वर्णित असतां त्याला पराकाष्ठेचा आनंद आणि अभिमान वाटतो. प्राचीन विद्या आणि विद्यागुरु यांबद्दल त्याला गाढ आदर आहे. त्याच्या ठायीं असलेल्या नैसर्गिक प्रतिभेला त्याच्या शास्त्राभ्यासाची, कलापरिचयाची, लोकव्यवहाराच्या सूक्ष्म अवलोकनाची व सांस्कृतिक अभिमानाची जोड मिळाली. कालिदासाची वृत्ति त्यांतल्या त्यांत शृंगारांत रमते हें खरें असलें तरी तो स्वैराचारी असावा असें दिसत नाहीं. तो वृत्तीनें रंगेल असला तरी गृहस्थाश्रमाची पवित्रता व एकनिष्ठ पत्नीप्रेम यांची त्याला पूर्ण जाणीव आहे. तो मोठा विनोदी, विनयसंपन्न, निरलस आणि वत्सल असावा. त्याचें आयुष्य थोर लोकांच्या सहवासांत आणि संपन्नतेंत गेल्यानें त्यानें खालच्या जीवितातील दुःखें, दारिद्र्य आणि दुर्व्यसनें यांचा विशेष आत्मीयतेनें विचार केलेला नव्हता. त्याला दीर्घ आयुष्य लाभलेलें असावें व शेवटीं जीवनातील कीर्ति, संपदा आणि आरोग्य या ऐहिक सुखांचा आणि मनःसमाधानाचा पूर्ण अनुभव घेऊन हा भाग्यशाली कवीश्वर भगवान् शंकराच्या स्वरूपात विलीन झाला असला पाहिजे.

## वाङ्मयांतील सप्तरंगी इंद्रधनुष्य.

कालिदासानें १ शाकुन्तल, २ विक्रमोर्वशीय व ३ मालविकाग्निमित्र अशीं तीन नाटकें, कुमारसंभव व रघुवंश हीं दोन महाकाव्यें, मेघदूत हें एक खंडकाव्य व ऋतुसंहार हें निसर्गवर्णनपर काव्य अशा सात कलाकृति निर्माण केल्या. इतरहि कांहीं ग्रंथ त्याच्या नांवावर मोडतात. पण त्याबद्दल विश्वसनीय पुरावा नाहीं. भावकवि, महाकवि आणि नाटककार या तीनहि भूमिका।

सारख्याच यशस्वीपणानें करणाऱ्या या कविभास्कराच्या प्रतिभेंतून निर्माण झालेल्या या सात कृति म्हणजे वाङ्मयनभोमंडळांत चमकणारें एक सप्तरंगी स्थिर इन्द्रधनुष्यच होय. याच्याकडे आज मूर्तिमंत दोन सहस्र वर्षें साश्चर्य कौतुकानें पहात असून जगांत रसिकता कायम असेतोपर्यंत भावी युगें तशींच पहात राहतील यांत संशय नाहीं. त्याच्या या सात कृतींपैकीं अत्यंत उज्ज्वल व गडद रंगाच्या दोन भव्य कृतींचाच विशेष परिचय आपणांस येथें करून द्यावयाचा आहे. म्हणून आतां त्या मार्गालाच लागूं.

## कुमार[१]-संभव–कथासार

### ही अद्‌भुत राजधानी कोणाची ?

ही अद्‌भुत नगरी कोणा भाग्यवंताची राजधानी असावी बरें ? हिचें पाहावें तें सारेंच विलक्षण ! सभोंवतीं शुभ्र उदकानें खळाळणारें गंगेचें पात्र हाच तिचा नैसर्गिक खंदक ! रत्नशिलांचे उंच खडक हे तिचे स्वाभाविक तट ! त्या तटबंदींत उगवलेल्या आणि रात्रीं आपोआप प्रकाशत राहणाऱ्या वनस्पति ह्याच तेथल्या दीपिका ! यक्ष, किन्नर आणि वनदेवता हे तिचे रहिवासी. अगोदरच गगनचुंबी गिरिशिखरावर वसलेल्या या नगरींतले प्रासाद आणि महाल तरी किती उंच ! त्यांच्या गच्च्यांवरील स्फटिकांच्या फरसबंदींत प्रतिबिंबित झालेलीं नजीकचीं नक्षत्रें तेथें उधळलेल्या माणिक-

---

१ 'तारक' नांवाच्या त्रिभुवनाला गांजणाऱ्या असुराचा वध करील असा सेनापति देवांना हवा होता. त्याचा जन्म शंकरपार्वतींचेच पोटीं होणें शक्य होतें. म्हणून देवांच्या इच्छेनुरूप शंकरानें—पार्वतीची पात्रता पारखून घेऊन—तिच्याशीं विवाह केला. त्यांच्या पोटीं झालेला कुमाराचा म्हणजे कार्तिकेयाचा जन्म ( संभव ) व त्या सहा दिवसांच्या कुमाराने देवांचें सैनापत्य करून तारकाचा वध करण्यात प्रकट केलेला महिमातिशय–अपूर्व पराक्रम–( संभव ) यांचें वर्णन ज्यांत आहे तें ' कुमार-संभव ' काव्य. काल खिस्तपूर्व पहिलें शतक किंवा खिस्तोत्तर चवथ्या शतकांचा शेवट. सर्ग १७ ( पूर्ण ) श्लोकसंख्या १०९३.

मोत्यांच्या ओंजळींसारखीं चमकतात ! गडगडाट करणारे मेघ तर तेथील महालांच्या इतके निकट कीं नृत्यमंदिरांत मृदंग वाजत आहेत का मेघध्वनि होतो आहे याचा भ्रमच एखाद्यास पडावा ! या नगरीच्या बाहेर एक ' गंधमादन ' नांवाचें उद्यान असून तेथील ' संतानक ' वृक्षाच्या छायेला विद्याधर प्रवासी विसांवा घेत पडलेले असतात. कुबेराची ' अलका ' नगरीचशी काय पण प्रत्यक्ष इंद्राची 'अमरावती'सुद्धां हिच्यापुढें फिक्कीच पडेल कदाचित्.

**सम्राट् व सम्राज्ञी.**

या अद्भुत राजधानींत राहणारा व या उत्तुंग प्रदेशावर अधिराज्य करणारा सम्राट्हि असाच उत्तुंग असला पाहिजे नाहीं का ? होय. अगदीं खरें आहे. इथला सम्राट् नगाधिराज हिमालय, आणि त्याचीच ही ' ओषधिप्रस्थ ' नांवाची राजधानी होय. सबंध जगताला आधारभूत जी यज्ञसंस्था तिला लागणाऱ्या सोमवल्ली, खादिरवृक्ष इत्यादि सामग्रीचा पुरवठा याच्याचकडून होत असतो; आणि सगळा भूभार धारण करण्याचें सामर्थ्यहि याच्या एकट्याच्याच ठिकाणीं आहे. हें ध्यानीं आणून स्वतः प्रजापतीनेंच याला ' शैलाधिराज ' केलें होतें. याची सम्राज्ञी मेना. ती स्वर्गीय सप्तपितृगणांची मानसकन्या असून ब्रह्मवादिनी होती. अशा या अलौकिक मातापितरांच्या पोटी ' मैनाक ' नांवाचा पुत्र जन्मला. हा इतका सुंदर होता कीं खुद्द नागवधूंना सुद्धां त्यानें मोहविलें. सागराशीं त्याचें सख्य असल्यानें पर्वतांचीं पंखें तोडण्यास सज्ज झालेल्या इंद्राचेंहि त्यापुढें कांहीं चाललें नाहीं.

**लाडकी राजकन्या.**

याचीच धाकटी बहीण पार्वती. हिमालयाचें हें लाडकें दुसरें अपत्य. अखिल चराचर सृष्टीच्या मातृस्थानीं असलेल्या या पार्वतीच्या जन्मसमयीं सगळी पृथ्वी आनंदानें पुलकित झाली व देवांनीं पुष्पवृष्टि केली. ही लावण्यवती कन्या जसजसी वाढत चालली तसतसें तिनें आपल्या मोहक बाललीलांनीं साऱ्यांना वेड लावलें. खुद्द पित्याला तर हिचा फार लळा. ज्योतीनें दीपाला, स्वर्गंगेनें आकाशमार्गाला, आणि संस्कृत वाणीनें विद्वानाला नवी शोभा

चढावी व पावित्र्य यावें त्याचप्रमाणें पार्वतीमुळें हिमालयाचें झालें होतें. आणि याचें कारणहि तसेंच होतें. दक्षप्रजापतीची कन्या 'सती' पित्यानें केलेल्या आपल्या पतीच्या अपमानामुळें कोपली व आपली तनु योगमार्गानें तिनें तेथल्या तेथें दग्ध करून टाकली. तीच ही 'सती' हिमालयाच्या पोटीं जन्मास आली होती. भगवान् शंकरहि याच हिमालयाच्या एका रम्य प्रदेशांत तप करीत होते. ही सगळी असामान्य व अलौकिक मंडळी या उच्च स्थलावर एकत्र आणण्यांत विधात्यांचा कांहीं गुप्त आणि उच्च हेतु असावा. आणि त्या गुप्त आणि उच्च हेतूला अनुसरून तेथें एखादी उच्च आणि उदात्त घटना झाली असली पाहिजे. आणि तिचें वर्णन करणारा कवीहि असाच कोणी तरी उच्च आणि उदात्त काव्यनिर्मितीचा प्रतिविधाता असावा. ज्याची प्रतिभा हिमालयाच्या उत्तुंग शिखरांवर उड्डाण घेऊं शकते व ज्याच्या प्रज्ञेला तेथल्या गूढ घटना उकलूं शकतात असाच कोणी प्रतिभाशाली आणि प्रज्ञावंत महाकवि असल्या या विलक्षण कथानकाला हात घालील कीं नाहीं ! महाकवि कालिदासच आपल्या तेजस्वी वाणीनें त्या राजधानींत झालेल्या त्या रोमहर्षण घटनेचें वर्णन करीत आहे हें सांगावयास पाहिजेच असें नाहीं.

**हिचा वर कोण होणार ?**

सर्वांना जीव कीं प्राण असणाऱ्या पार्वतीनें बाल्यांतून तारुण्यांत प्रवेश केला. स्त्रियांचें तारुण्य हें कामदेवाचें अमोघ अस्त्रच. तेव्हां पार्वतीच्या तारुण्यास्त्राच्या जोरावर आपण एखाद्या योग्यालाहि जिंकूं शकूं असें कामदेवाला वाटलें असल्यास नवल नाहीं. वीणेच्या निनादासारखी तिची वाणी, कलहंसीसारखी तिची गति, लतांच्यासारखा तिचा विभ्रम, हरिणीच्या नेत्रांसारखे तिचे तेजस्वी नेत्र,कमलासारखे चरण आणि भ्रमराप्रमाणें कृष्ण तिचा केशपाश होता. हें पाहिलें म्हणजे एखाद्यास सहजच वाटे कीं 'काय हो ! जगांतली सगळी उत्तम आणि शेलकी सौंदर्यसामग्री प्रयत्नानं निवडून काढून ब्रह्मदेवानं 'सौंदर्य एका ठिकाणीं जमवलं तर कसं दिसतंय तरीं पाहूं' अशा विचारानें हिला निर्माण केली कीं काय !! हिच्या या असामान्य लावण्याला विद्येच्या तेजाची जोड मिळाली. आणि ही अलौकिक विद्यावती व लावण्यवती कन्या वरण्याची योग्यता कोणा

समाग्याला आहे हा एकच विचार सर्वांच्या मनांत वारंवार घोळूं लागला. पण म्हणतात ना, 'देवाला असतेच सर्वांची काळजी!' सगळ्या त्रिभुवनांत मनाला वाटेल तेथें संचार करणारे नारद एकदा फिरत फिरत हिमालयाकडे आले. त्यांचे कुशल प्रश्न झाल्यावर पित्यानजीकच असलेल्या उपवर पार्वतीकडे नारदांची नजर गेली. तिच्याकडे अर्थपूर्ण नेत्रानें पाहून देवर्षि हिमालयाला म्हणाले, 'हिमालया! आपल्या मुलीला स्थळ पाहण्याच्या विचारांत असशीलच तूं. पण मी तुला सांगतों, ही तुझी मुलगी भगवान् त्रैलोक्याधिप महेश्वराची अर्धांगी होणार आहे.' खुद्द देवर्षींचेच ते शब्द. मग हिमालय दुसरीं स्थळें कशाला शोधीत बसेल? श्रीशंकरासारखा जामात आणि पुनः आपल्याच प्रदेशांतील एका शिखरावर तपश्चरण करीत असलेला. दगदगच मिटली त्याची.

**ब्रह्मचाऱ्याची सेवा करणारी तरुणी!**

दगदग मिटली खरी पण हिमालय पडला मोठा मानी. शंकरानें आपण होऊन आपल्या मुलीला मागणी घातल्यावांचून आपण तरी विवाहाचें बोलणें त्याच्यापाशीं कसें काढावें असा त्याला पेंच पडला. त्यावर एक सुंदर तोड काढली त्यानें. तप करीत असलेल्या त्या तेजस्वी ब्रह्मचाऱ्याची सेवा करण्याला त्यानें पार्वतीला अनुज्ञा दिली. पार्वतीलाहि आनंद वाटला. तिनें आपल्या जया आणि विजया अशा दोन सख्या बरोबर घेतल्या व ती दररोज शंकराची सेवा करण्यास जाऊ लागली. शंकराला अर्चनेसाठीं लागणारीं पुष्पें आणावीं, अग्निशाला संमार्जावी, पूजेला उदक आणून द्यावें, आणि दर्भ तोडून आणावे असा तिचा क्रम असे. हीं श्रमाचीं कामें करीत असतांना तिचा नाजूक देह क्वचित् शिणलाच तर शंकराच्या मस्तकावरील चंद्राच्या किरणांनीं ती लगेच ताजीतवानी होत असे! या असल्या नाजूक सेवेला तपस्वी शंकरांनींहि कशी परवानगी दिली हें त्यांचें तेच जाणोत! भोंवतीं मोह असूनसुद्धा जे चलित होत नाहींत तेच खरे संयमी म्हणावयाचे.

**जुलमी तारक आणि देवांची दैना.**

हिमालयावर ही सेवा चालली असतां दुसरीकडे कांहीं विलक्षण घटना भवितव्यतेच्या पोटांत शिजत होत्या. त्रिभुवनाला 'त्राहि भगवन्' करून

सोडणाऱ्या तारकासुराच्या जाचाला देवसुद्धां आतां पुरे नमले होते. तारकानें देवांवर विलक्षण दरारा बसविला होता. येवढा मोठा जाज्वल्य आणि उग्र असा सूर्य ना ! पण तो तारकाला भारी भीत होता. त्याच्या सरोवरांतील कमळें उमलविण्यापुरताच कोमल प्रकाश तो त्याच्या नगरींत पाडी. पंख्याच्या वाऱ्यापेक्षां जास्त मोठा वारा वाहविण्याची वायुदेवाची छाती नव्हती ! वासुकीसारखा महाभयंकर नाग ! पण तोसुद्धां डोक्या-वरच्या मण्याचा प्रकाश रात्रभर तारकाच्या शयनमंदिरांत देत एखाद्या ठाणवईसारखा कोपऱ्यांत उभा राही ! ! चंद्राला सोळाहि कलांनीं प्रकाशावें लागे. सहाहि ऋतूंना एखाद्या सामान्य माळ्याप्रमाणें आपापले क्रम सोडून सगळ्यांना एकदमच सेवा द्यावी लागे. फार कशाला, सर्व सुरांचा राजा महेन्द्र सुद्धां तारकाची मर्जी राखावी म्हणून कल्पवृक्षांच्या कुसुमांचे गुच्छ बांधून दररोज त्याजकडे धाडीत असे ! सूर्याच्या अश्वांचे खुर ज्यांना स्पर्श करीत अशीं मेरूचीं उत्तुंग शिखरें उपटून त्यानें त्यांचे आपल्या बागांतले क्रीडापर्वत केले होते. मंदाकिनींतील सुवर्णकमळें त्यानें आपल्या उपवनांतील वापींत लाविलीं होतीं. त्यानें इंद्राचा 'उच्चैःश्रवा' नांवाचा अश्व पळविला होता व त्याच्या ऐरावताला नामोहरम करणारे तारकाचे हत्ती प्रचंड मेघांच्या तटाला ढुशा देत होते. तात्पर्य, स्वर्ग ओसाड पडला होता व देवांगना अश्रु गाळीत होत्या. ही जर खुद्द स्वर्गाची स्थिति तर मृत्युलोकाची आणि पाताळाची दशा काय सांगावी ?

## मार्ग दिसला पण फारच बिकट.

या गांजणुकीला कंटाळलेले देव, इंद्र व देवगुरु बृहस्पति यांसह, ब्रह्म-लोकाला एके दिवशीं गेले. ब्रह्मदेवाच्या वरानेंच तारक एवढा बलाढ्य झालेला होता. त्यामुळें ब्रह्मदेवाकडेच आपलें गाऱ्हाणें आपण न्यावें असा त्यांचा हेतु होता. त्यांनीं ब्रह्मदेवाचें दर्शन घेऊन त्याची उचित शब्दांनीं स्तुति केली; व मग आपली सर्व दुःस्थिति त्याला सविस्तर निवेदिली. ती ऐकून ब्रह्मदेवाचें मन द्रवलें व तो त्यांस म्हणाला, " भिऊं नका. तुमच्या पीडकाचा नाश कालांतरानें पण अवश्य होईल. मींच त्याच्या संहाराची व्यवस्था केली असती. पण मींच त्याला वर दिला आहे ना ? अहो, विषवृक्ष सुद्धां आपणच जर लावला असेल तर आपणच तो तोडणें उचित

नव्हे. पण मी तुम्हांला यांतून एक मार्ग सांगतों. तारकाला मारण्याचें सामर्थ्य फक्त शंकराच्या वीर्यांतच आहे. पण तो तर जितेंद्रिय व संयमी पडला. म्हणून असें करा. लोहचुंबकानें जसें लोखंडहि आकर्षून घेतात तसें पार्वतीच्याकडून त्याचें संयमी मन ओढून घ्या. शंकराचें वीर्य उमा धारण करण्यास समर्थ आहे. या दोघांच्या पोटीं उत्पन्न झालेला पुरुषच तारकाचा वध करील. जा, आपल्या कामाला लागा.'' असें बोलून ब्रह्मदेव अन्तर्धान पावले. दृढ ब्रह्मचर्याचें व्रत कडकपणें पाळणाऱ्या उग्र शंकराचें मन वळवावयाचें म्हणजे कोण कठिण मामला ! देवांना वाटलें उपाय सांपडला खरा पण तो अंमलांत कसा व कोणीं आणावयाचा ? मार्ग दिसला पण तो फारच बिकट !

**ती कामगिरी कामानेंच पत्करली.**

पण इंद्राची बुद्धि त्यांतूनहि निसटून जाण्यासाठीं धडपडूं लागली व हें कठीण काम यशस्वितेनें पार पाडूं शकणाऱ्या एका देवाचें त्याला एकदम स्मरण झालें. त्याचें स्मरण करतांक्षणींच तो देवेंद्रासमोर हात जोडून उभा राहिला आणि मोठ्या विनयानें इंद्राला म्हणाला, ''देवाधिराज ! हा मी कामदेव आपल्यापुढें उभा आहें. आज्ञा व्हावी. आपलें पद घेण्याच्या इच्छेनें कोणी तपस्वी उग्र तप करीत आहे काय ? तसें असल्यास मी माझ्या बाणांनीं त्याला घायाळ करतों. कोणी कामिनी आपल्यांस वश होत नसेल तर मी तिचें मन आपल्याविषयीं उतावीळ करतों. फार काय, माझ्या साहाय्याला एक वसंत असला म्हणजे पुरे. तुमचा मी मी म्हणणारा योगी भगवान् शंकर जरी असला तरी मी त्यालासुद्धां घाबरा करीन ! इतरांची तर कथाच नको.'' कामदेवानें सहज बोलण्याच्या ओघांत आणि अभावितपणानें आपण योजलेल्या कठीण कार्याचीच शक्यता अशा तऱ्हेनें दाखविलेली पाहून इंद्राला फारच संतोष झाला. तो त्याला म्हणाला, '' अरे, मी तुझें सामर्थ्य पुरें ओळखतों; आणि म्हणूनच तर एका अवघड कामगिरीवर तुझी योजना मीं केली आहे. ही कामगिरी म्हणजे पार्वतीकडून जितेंद्रिय शिवाला मोहित करणें. एवढें तूं केलेंस म्हणजे स्वर्गाचा सासुरवास संपला म्हणून समज.'' मदनानें ती कामगिरी तत्क्षणीं पत्करतांच इंद्रानें त्याच्या पाठीवर प्रेमानें

थोपटलें. काम आपल्या प्राणांचीहि पर्वा न करतां आपल्या कामास लागला.

**तपोवनाचें उपवन झालें !**

मदन बरोबर वसंताला व रतीला घेऊन निघाला तो तडक शंकराच्या तपोभूमींत आला. त्याच्या लावण्यवती अप्सराहि आपापल्या संगीतोपकरणांसहित तेथें दाखल झाल्या. प्रथम त्या वनांत वसंताचें सारें वैभव प्रकट झालें. मलयानिल वाहूं लागले. आम्रमंजरी दिसूं लागल्या. कोकिलांचे मधुर आलाप ऐकूं येऊं लागले व स्थिरचर सृष्टि कामाविद्ध होऊन तपस्व्यांचाहि इंद्रियसंयम ढिला पडूं लागला. भ्रमर व भ्रमरी, मृग व मृगी, चक्रवाक व चक्रवाकी एकत्र येऊं लागल्या. फार काय ! कोमल लतासुद्धां वृक्षस्कंधाला आपल्या बाहुपाशांनीं बिलगूं लागल्या. त्यांतच अप्सरांचें स्वर्गीय संगीत सुरू झालें. शंकराचा संयम दृढ असला तरी त्याच्या गणांमध्यें चुळबुळ सुरू झाली. त्यांच्या त्या चाळ्यांबद्दल नन्दी त्यांना वरचेवर दरडावीत होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शंकराच्या त्या तपोभूमीला शृंगारचेष्टांना उचित अशा उपवनाचें स्वरूप आलें.

**स्मरभूमि श्मशानभूमि झाली.**

या वेळीं– अगदीं याच वेळीं– लावण्यवती पार्वती आपल्या सख्यांसह तपोवनाच्या दारवठ्यावर येऊन उभी राहिली. तिचा तो मोहक वेष व गोड विभ्रम पाहून मदनाला आपल्या कार्यसिद्धीबद्दल आशा वाटूं लागली. नंदीनें तिच्या आगमनाची वर्दी धन्याकडे दिली. त्यांनीं अनुज्ञा देतांच पार्वती शंकरासमोर आली व तिनें त्यांस नमस्कार करून आपल्याबरोबर आणलेली पुष्करबीजांची माला त्यांचेपुढें केली. ती घेण्यासाठीं शंकरानींहि आपले हात पुढें केले. व पार्वतीच्या सुंदर मुखाकडे ते किंचित् रोखून बघूं लागले. त्या बघण्यानें पार्वती लाजली व तिनें आपलें मुख मोठ्या मोहक अभिनयानें फिरविलें. मदनाचा कार्यभाग होतोसें दिसूं लागलें. त्यानें 'संमोहन' नांवाचा आपला हुकमी बाण धनुष्याला लावला. पण–पण काय ? 'आपण आज चलित होत आहोंत' हें शंकराच्या ध्यानीं आलें. त्यांनीं आपलें मन आवरलें व आपल्या विकृतीच्या कारणाचा शोध करण्यास आपली प्रखर दृष्टि चोहींकडे फिरविली. तोंच त्याना आपलें

धनुष्य आकर्ण ओढून आपल्यावर बाण टाकण्याच्या बेतांत असलेला मदन दिसला ! मग काय विचारतां ! आपल्या तपांत अडथळा करणाऱ्या त्या अपराध्याला तिथल्या तिथें जाळून टाकणारी एक उग्र ज्वाला त्यांच्या तृतीय नेत्रांतून निघाली. ती उग्र ज्वाला पाहून तेथें वर जमलेले देव भेदरून गेले व त्यांनीं हात जोडून शंकराची प्रार्थना केली, 'प्रभो ! कृपा करून आपला कोप आवरता घ्या.' हें सर्व होत आहे तोंच त्या ज्वालेनें मदनाला भस्मसात् केलें सुद्धां. रति मूर्च्छित पडली व शंकर आपल्या गणांसहित कोठें गुप्त झाले. बिचारी पार्वती ! तिचें खट्टू मन म्हणत होतें, 'तुझ्या पित्याच्या इच्छा विफल झाल्या, तुझें सौंदर्य व्यर्थ ठरलं आणि हें सर्व झालं तें सर्व तुझ्या मैत्रिणींदेखत.' तिला लोकांत तोंड काढायला सुद्धां जागा राहिली नाहीं. शंकराच्या त्या रौद्ररूपाची तिला स्मृति झाली. आणि तिनें भीतीनें आपले डोळेच घट्ट मिटून घेतले. पिता आला. लेकीला त्यानें धीर दिला. आणि तिला राजधानींत घेऊन गेला. एका क्षणापूर्वी स्मरभूमि असलेली ही जागा श्मशानभूमि झाली. विवाहप्रकरणावर पडलेला हा पडदा कायमचाच असेल काय ?

## रतीचा हृदयद्रावक आकांत

रति भानावर आली खरी पण 'आपण विधवा झालों आहोंत' हें जेव्हां तिला आठवलें तेव्हां या भानापेक्षां ती मूर्च्छाच बरी होती असें तिला वाटूं लागलें. मदनासारखा सुंदर पति ! त्याचे किती गुण आठवावे, त्याच्या संगतींतले किती प्रसंग स्मरणांत आणावे आणि किती रडावें तिनें ! तिनें थोर आक्रान्त मांडला, ऊर बडविला आणि ती मातींत लोळलीसुद्धां. जळलेला पति काय अशानें परत येतो ? ती स्फुंदस्फुंदून म्हणाली, 'पतिदेवा, जरा थांबा. मीहि तुमच्या मागून येतें. तुमच्या मागें केवळ मीच नव्हे तर अख्खें जगत् आतां निराधार झालें आहे. तुमच्या धनुष्याची दोरी असलेली ही पहा भ्रमरपंक्ति तुमच्या शोकाचे आर्तरव काढीत फिरत आहे. आतां या आम्रमंजरीला बाण म्हणून कोण आपल्या चापावर योजणार ? तुम्ही नसतांना विलासिनींच्या विलासाला क्लीबांच्या विकृत हावभावांचें हिडीस स्वरूप येणार. आणि जगांत सौंदर्याला थारा रहाणार नाहीं.' ती असा शोक करीत आहे तों इतका वेळ दूर असलेला वसंत तिच्याजवळ येऊन विनतमुख उमा

राहिला. त्याला ती म्हणाली, " माझी चिता रच. आजपर्यंत आम्हां दोघांच्या विलासासाठीं तूं पुष्पशय्या रचीत होतास ! आज तुझ्या या वहिनी-साठीं हीहि शय्या तयार कर. सती जाणं हें पतिव्रतांचं व्रतच आहे." असें ती बोलत आहे तोंच एक आकाशवाणी झाली. " रति ! आपले प्राण देऊं नको. तुझ्या पतीनें स्वतां प्रजापतीला चलित करून त्याचा अपराध मागें केला होता. म्हणून त्यानें त्याला असा शाप दिला होता. पण धर्मानें मध्यस्थी केल्यानें प्रजापतीनें उःशाप दिला कीं, ' जेव्हां पार्वतीच्या तपानें प्रसन्न होऊन शंकर तिचें पाणिग्रहण करील तेव्हां तो मदनाला जिवंत करील ' तर तोंपर्यंत धीर धर." ही वाणी ऐकल्यामुळें व वसंताच्या आग्रहामुळें तिनें सती जाण्याचा बेत रहित केला व ती शिवपार्वतीच्या विवाहाची मोठ्या आतुरतेनें प्रतीक्षा करीत राहिली. मृत आशांना अंकुर फुटले म्हणायचे !

## पार्वतीची घोर तपश्चर्या.

पार्वती कांहीं काळ निराश झाली खरी पण तिनें शंकरप्राप्तीचा मार्ग सोडून दिला नाहीं. जें रूपानें साधलें नाहीं तें तपानें साधावयाचें असें तिनें ठरविलें. मोठ्या मिनितवारीनें मातापितरांपासून अनुज्ञा घेऊन ती तपोवनांत गेली व तेथें तिनें घोर तप आरंभिलें. वास्तविक पाहिलें तर कोठें या अधिराजाच्या कन्येची सुकुमार तनु आणि कोठें हें मुनींनाहि दुःसाध्य उग्र तप ! पण तिचा निश्चयच तसा पक्का होता. तिनें आपले रत्नहार व उंची वस्त्रें फेंकून दिलीं व वृक्षांचीं खरखरीत वल्कलें परिधान केलीं. रेशमासारख्या मऊ आणि सुगंधी केशांच्या जटा बांधल्या. रत्नखचित कमरपट्टा टाकून कमरेला मुंजातृणाची तिपेड दोरी आवळली. ज्या नाजुक हातांनीं तिचें रोज ओष्ठप्रसाधन चालावयाचें, किंवा फार झालें तर मऊ मऊ चेंडू तिनें झेलावयाचे, त्या हातांनीं ती तीक्ष्ण दर्भ खुडूं लागली. आणि रुद्राक्षमाला धारण करूं लागली. उंची गाद्यांगिरद्यांवर लोळतांना फुलांच्या पाकळ्या सुद्धां जिच्या अंगाला रुताव्या ती आतां साध्या कठीण स्थंडिला-वर उशाला फक्त हात घेऊन पडत असे ! ती जातीनें झाडांना पाणी घाली व हरिणांना चारा देई. हें तिचें तप तपस्विजनांच्याहि कुतूहलाचा

विषय झालें. पुढें पुढें तर तिनें फारच देहदंडन आरंभिलें. उन्हाळ्यांत भोंवतीं चार अग्नि पेटवून सूर्यकडे दृष्टि लावून बसावें, पावसाळ्यांत उघड्या मैदानांत शिळेवर बसून पर्जन्यवृष्टि चालू असतां रात्रीच्या रात्री काढाव्या आणि हिंवाळ्यांत बर्फासारख्या गार पाण्यांत रात्रीं गळ्याइतकें उभें राहावें असा तिचा क्रम होता. आहार तर तिनें अजिबात सोडलाच होता. तपाची आतां पराकाष्ठा झाली. तिनें लावलेल्या झाडांना सुद्धां फळें आलीं पण तिनें जोपासलेल्या मनोरथाला मात्र फळच नव्हे तर फूलहि येण्याचें चिन्ह दिसेना.

**धूर्त ब्रह्मचाऱ्याचा तिखट उपहास.**

असें हें तिचें घोर तप चाललें असतां एके दिवशीं एक तेजस्वी ब्रह्मचारी तिच्या आश्रमांत आला. औपचारिक कुशल प्रश्न झाल्यावर त्यानें सरळच मुद्याच्या गोष्टीला आरंभ केला. तो धूर्तपणें म्हणाला, "तुझ्यासारख्या शैलाधि-राजाच्या वैभवशाली कन्यकेला हें तप करण्याची बुद्धि कां व्हावी हेंच मला विचार करूनहि समजत नाहीं. तुला काय कमी आहे कीं जें तूं तपानें मिळवूं म्हणतेस? का नवराबिवरा हवा आहे तुला? पण जो या तुझ्या असल्या तपानेंहि अद्याप वश होत नाहीं तो आहे तरी कोण असला निर्दय आणि अरसिक पुरुष?" या प्रश्नाचें उत्तर पार्वतीच्या संकेतानुसार तिच्या सखीनेंच दिलें. ती म्हणाली, "तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें पतीसाठींच ही तप करीत आहे. आणि तो पति असा तसा कोणी सामान्य नसून खुद्द भगवान् शंकरच आहे. त्याचा हिनें इतका ध्यास घेतला आहे कीं, तिच्या ध्यानींमनीं आणि स्वप्नीं दुसरी गोष्ट नाहीं." हें ऐकल्यावर ब्रह्मचारी खदखदां हंसून म्हणाला, "हें येवढें तप पार्वतीनें आणि तेंहि त्या औंगळ शंकरासाठीं करावें! जगांत यापेक्षां जास्त अनुचित दुसरी गोष्ट असणें शक्य नाहीं. काय तें शंकराचें निवासस्थान, काय त्याचा तो वेष, काय त्याच्या ती भोंवतालची मंडळी. एकेक बघावें तें आश्चर्यच. शिवाय त्याला काय कुलशील आहे, का रूप आहे, का धनदौलत तरी? खासा बेत! आतां तुमचा विवाह झाला म्हणजे तुझीं उंची रेशमी वस्त्रें व त्याचें घाणेरडें आणि रक्ताळलेलें हत्तीचें चामडें यांचा संयोग मोठा गमतीचा दिसेल नाहीं! तुमची वरात निघायची म्हणजे त्या म्हाताऱ्या

बैलावरून, आणि जायची कुठें तर फुलांचा खच पडलेल्या त्या शुभ लग्न-मंडपांतून प्रेतांच्या केसांचे पुंजकें पसरलेल्या घाण श्मशानांत ! वाः ! छान. पार्वती ! पतीच्या निवडींत आपल्या चातुर्याचा चांगलाच उपयोग केलास म्हणावयाचा !" त्या धूर्त व धीट बटूचा हा शिवावद्दलचा उपहास पार्वतीला फारच झोंबला.

**' मला तेच हवे आहेत. '**

तिचे ओठ रागानें कांपूं लागले. पण तो राग गिळून तिनें ताडकन् उत्तर केलें– "ब्रह्मचारीबुवा, तुम्हांला शंकराचें चरित्र माहीतच नाहींसें दिसतें. म्हणूनच तुम्ही असे बरळलांत. मतिमंदांनीं महात्म्यांची अशी निंदा करावी हें ठीकच झालें पण असें पहा.तुम्ही त्यांना अमंगळ आणि अशुभ असें म्हणालांत. पण शुभाशुभ, मंगलामंगल इत्यादि द्वंद्वापलीकडे असणाऱ्या निरिच्छ आणि जगदाधार शंकरांना या असल्या मांगल्याच्या कल्पना कशाला लावतां ? त्यांना बैलवाले दरिद्री म्हटलेंत. पण ऐरावतावर बसणाऱ्या देवेश्वरालाहि ते वंद्य आहेत. त्यांचें कुलशील काढलेंत. पण जे जगाची उत्पत्ति करणाऱ्या ब्रह्मदेवाचेहि आदिकारण आहेत त्यांच्या कुलाची विचारणा कसली करतां ? आणि ज्यांच्या अंगावरचें भस्म आपल्या कपाळीं लावून देवसुद्धां पवित्र होतात त्यांच्या शीलाची विचक्षणा तरी काय मांडतां ? मी तुम्हांला निक्षून सांगतें. मला हा वादच नको आहे मुळीं. तुम्ही म्हणतां तसे जरी ते असले तरी तेच मला हवे आहेत., मीं कोणाच्याच मताची पर्वा करीत नाहीं." या प्रत्युत्तरावरहि तो लोचट ब्रह्मचारी कांहीं बोलणार असें दिसतांच पार्वतीनें आपल्या सखीस सांगितलें, " विजये, या बटूला आश्रमाबाहेर घालव. महात्म्यांची निंदा ऐकून मला माझे कान इतःपर विटाळावयाचे नाहींत. नाहीं तर मीच आपली येथून चालती होतें कशी ! " असें म्हणून पार्वती फणकाऱ्यानें उठली सुद्धां. पण काय ! ती उठते तोंच बटूचे भगवान् शंकरच झाले !! आणि त्यांनीं ' पुरे झाला हा राग ' असें म्हणून हंसत हंसत पार्वतीचा हात धरला. आतां कशी जाते पार्वती ? " आजपासून मी तुझा दास झालों. तूं मला तुझ्या तपानें विकत घेतलेंस ना !" असें शंकरानें म्हणतांच पार्वती लाजली आणि तिचे तपःक्लेश कोठेंच्या कोठें नाहींसे झाले.

**'जांवई तर छानच मिळविलात बाई !'**

या दोघांचें हें असें ठरलें असलें तरी विधीप्रमाणें सर्व यथास्थित झालें पाहिजे ना ? म्हणून पार्वतीच्या इच्छेनुरूप हिमालयाजवळ तिची मागणी घालण्यासाठीं शंकरानें मरीचि, अत्रि, अंगिरस, वसिष्ठ इत्यादि सप्तर्षि व अरुंधती यांना केवळ स्मरणमात्रानें आपल्याजवळ बोलावून घेतलें. अरुन्धतीसारखी वसिष्ठाची धर्मपत्नी पाहिल्याबरोबर ब्रह्मचारी शंकराच्या मनांत विवाहाबद्दल असलेली पूर्वीची अढी नाहींशी झाली व त्याला दारापरिग्रहाबद्दल आदर वाटूं लागला. धर्मपत्नी हें गृहस्थाच्या धार्मिक विधीचें मुख्यच कारण आहे. धार्मिक दृष्टीनें कां होईना शंकराचें मन आतां पार्वतीकडे चांगलेंच आकृष्ट झालें आहे हें पाहून पूर्वी केलेल्या अपराधानें धास्ती घेतलेल्या मदनाच्या मनांत 'आपण आतां लवकरच प्रकट होणार' अशी आशा डोकावूं लागली. शंकरानें आपला विवाहनिश्चय ऋषींस सांगितला व हिमालयाकडे जाऊन पार्वतीसाठीं रीतसर मागणी घालावयास विनविलें. सप्तर्षि मोठ्या आनंदानें ओषधिप्रस्थास येऊन हिमालयाला भेटले. सर्व विश्वाचा पालक शंकर, सर्वांची चैतन्यशक्ति पार्वती, आणि विश्वाचें मंगल करणारा त्यांचा विवाह. मग कोणाला नाहीं आनंद होणार ? हिमालयाला धन्यता वाटली. त्यानें मेनेचा होकार घेतला. हें सर्व चाललें असतां पार्वती तेथेंच खालीं मान घालून उभी होती. तिच्या पोटांत हर्षाच्या उकळ्या येत होत्या. पण जसें कांहीं आपल्याला त्यांतलें कांहींच माहीत नाहीं असा बहाणा करून ती हातांतल्या कमळाच्या पाकळ्या मोजीत होती ! तिला प्रेमानें कुरवाळून तो वत्सल पिता गहिंवरून म्हणाला, " ये बाई, भगवान् शंकराला मी तुझी भिक्षा घालीत आहें. हे मुनि ती मागण्यासाठीं आले आहेत. मला माझ्या गृहस्थाश्रमाचं हें कन्यादानरूपी मोठं फल मिळालं. मीं धन्य झालों. आणि हें पहा, या मुनींना नमस्कार कर पाहूं." पार्वतीला असें सांगून तो ऋषींना म्हणाला, " महाराज, तुम्हां सर्वांना ही शंकराची पत्नी नमस्कार करते आहे." सर्वांनीं पार्वतीला आशीर्वाद दिले. अरुंधतीनें तर पार्वतीला आपल्या मांडीवर बसवून घेऊन तिचें लाजरें मुख कुरवाळलें. लेकीच्या भावी विरहामुळें मेनेच्या डोळ्यांना धार लागली होती. तेव्हां अरुंधती

तीचें सांत्वन करून म्हणाली, " मेनाबाई, जांवई तर छानच मिळविलात तुम्ही. अहो ! मुलीला चांगलं सोन्यासारखं घर मिळाल्यावर मग काय त्यांत वाईट वाटून घेतां ? "

**लगीनघाई.**

सम्राटाच्याच कन्येचा विवाह ! मग काय विचारतां ! सगळें ओषधिप्रस्थ नगर आनंदानें फुलून गेलें. लग्नाची तयारी सुरू झाली. पार्वतीला लग्नाची वेषभूषा घातली. वृद्ध बाया वात्सल्यानें, तर बरोबरीच्या मैत्रिणी सखी-स्नेहानें, पार्वतीची गोडशी थट्टा करूं लागल्या. मांगल्यवेषानें सज्ज झालेली पार्वती आपलें प्रतिबिंब आरशांत पहात पहात मनांत म्हणत होती, ' केव्हां येणं होतंय इकडचं ? ' इकडे नवरदेवाची भूषा चालली होती. ब्राह्मी, माहेश्वरी, वैष्णवी, माहेंद्री इत्यादि सप्तमाता त्यांस सजवीत होत्या. पण शंकराचा नेहमींचा वेषच एकदम विवाहवेषांत रूपान्तर पावला. गजाजिनाचें सुंदर भरजरी रेशमी उपवस्त्र झालें. भस्माची उटी झाली व सर्पांचे रत्नखचित अलंकार बनले. नवरदेवानें आपलें रूप तरवारीच्या पात्यांत प्रतिबिंबित झालेलें पाहिलें. ब्रह्मा, विष्णु, इंद्र, चंद्रादि तेहतीस कोटि देव आले. नवरा वाजतगाजत वधूमंडपांत आला. त्याला वाटेंत पाहायला कोण गर्दी ! आणि काय तारांबळ बायकांची ! आपल्या रतीचे डोळे या विवाहाकडे फारच उत्कटतेनें सारखे लागून राहिले असतील नाहीं ! पार्वतीला शंकर मिळाल्यानेंच तिला तिचा मदन मिळणार होता. कन्यादान झालें. होमाग्नीला वधूवरांनीं प्रदक्षिणा घातली. नवरानवरी थोरांची दृष्टि चुकवून हळूच एकमेकांकडे पहात होतीं. लग्नविधि यथासांग पार पडल्यावर इन्द्रादि देवांनीं हात जोडून शंकराची प्रार्थना केली कीं, ' आतां मदनाच्या शापाची मुदत संपली आहे, आपण त्याला उठवून त्याच्या सेवेचा स्वीकार करावा.' शंकरांनीं ती विनंति मान्य केली इतकेंच नव्हे तर आपल्यावर मदनानें आपले सारे बाण एकदम रोखावे असें सांगितलें. मदन जिवंत झाला. रतीचा आनंद गगनांत मावेना. मदनरतीचे व्यापार पूर्ववत् सुरू झाले.

**पार्वतीच्या गोड सहवासांत.**

पार्वतीच्या सहवासांत विविध विलास भोगीत शंकर श्वशुरांच्या घरीं

एक महिनामर राहिला. नंतर हिमालयाचा निरोप घेऊन स्वारी सर्वत्र गतिमान् नंदीवर बसून पार्वतीसह यथेष्ट संचार करूं लागली. आज मेरु-पर्वतावरील शोभा पहा, उद्यां कैलासपर्वतावरील चांदण्या रात्रीची मौज लूट, परवां गंधमादनपर्वतावर विहार कर याप्रमाणें तो प्रियेसह हिंडत होता. सुखोपभोगांत कितीहि रमलेला असला तरी शंकरानें आपले नेहेमींचे जपतपादि विधि मात्र कधींच सोडले नाहींत. पार्वतीजवळून शंकर संध्या-वंदनादि नित्यविधि करावयास गेला म्हणजे तिला राग येई. पण तो तिची कशीबशी समजूत घाली. हिमालयाच्या अत्युच्च शिखरावरून दिसणारे सूर्यचंद्राचे उदयास्त, सकाळ, संध्याकाळ व रात्री यांचे भव्य देखावे यांतील विविध व असीम सौंदर्य शंकर पार्वतीचे नजरेस आणी. या कालांत त्याची गांठ घेणें कोणालाहि अशक्य होऊन बसलें. विजया नांवाच्या पार्वतीच्या सखीच्या द्वारें आपण आल्याची वर्दी कोणीं त्याजकडे पोहोंचवली तरीसुद्धां शंकराचें दर्शन अशक्य होऊन बसलें होतें. याप्रमाणें केवळ विषयोपभोगांत निमग्न असणाऱ्या शंकरानें एका रात्रीप्रमाणें, शंभर वर्षें घालवलीं; तरीसुद्धां त्याची उपभोगतृष्णा मात्र शमलेली नव्हती !

**अनंगरंगाचा भंग.**

पार्वतीच्या मुखकमलावरील भ्रमर झालेला शंकर याप्रमाणें गंधमादन-पर्वतावरील आपल्या क्रीडास्थानांत पार्वतीशीं रममाण असतां एके दिवशीं एक अत्यंत मनोहर असा पारवा त्याच्या दृष्टीला पडला. तो आपले गुंजावनी डोळे फिरवीत फिरवीत मधुरस्वरानें घुमत होता. त्या वेळीं तो आपली गहिरी मान मागेंपुढें करून आपला पिसारा वरचेवर हलवीत होता. आपल्या एकान्त संभोगस्थलांत येऊन मोठ्या डौलानें मंडलाकार संचार करणाऱ्या त्या पारव्याला पाहून शंकराला वाटलें कीं सुधासमुद्रांत क्रीडा करणाऱ्या रतिमदनाच्या मनोहर हालचालीनें त्याच्या लाटांवर उत्पन्न झालेला हा पांढरा स्वच्छ फेसच आहे ! त्याला पाहून शंकराला क्षणभर कौतुक वाटलें खरें पण अधिक बारकाईनें न्याहाळल्यानंतर त्याच्या ध्यानीं आलें कीं हा दिसतो तसा साधा पारवा नसून पक्षाचें रूप घेतलेला अग्नि आहे. मग काय विचारतां ? शंकराच्या भुवया क्रोधानें वाकड्या झाल्या. अग्नीनें या स्थळीं, अशा वेळीं आणि कपटरूपानें यावें ? शंकराचा संताप

अनावर झाला. लगेच अग्नीनें आपलें रूप प्रकट केलें आणि हात जोडून थरथर कांपत तो शंकरास म्हणाला, " मगवन्, दीनाला क्षमा असावी. आपण त्रिजगांचे स्वामी. आपणच आम्हां देवांचे विघ्नहर्ते. आपण जाणतां कीं तारकासुरानें पीडिलेले इंद्रादि देव आपल्या कृपेची याचना करीत तिष्ठत उभे आहेत. आपण प्रियासमागमांत रममाण आहांत त्याला शंभर वर्षे लोटलीं ! आपल्या दर्शनाची वाट पाहून कंटाळलेल्या देवांनीं हा निरोप येथेंच आपल्याला पोहोंचविण्याची विनंति मला केली. आणि मीहि या प्रसंगाला साजेल असें हें कपोतरूप घेऊन येथें येण्याची धिटाई केली. आमची उतावीळ ध्यानीं घेऊन माझा हा अपराध पोटांत घ्यावा मगवन्. आपणांस पुत्र व्हावा. त्याच्या साहाय्यानें आम्हीं तारकास जिंकावें व इंद्रानें पूर्वीप्रमाणें स्वर्गादि लोकांचें राज्य चालू करावें अशी आमची इच्छा आहे. तरी प्रसाद व्हावा."

'तूं कुष्ठी होशील.'

देवांची दुरवस्था दाखवणारें अग्नीचें तें विनयसंपन्न आणि यथार्थ भाषण ऐकून शंकराचा राग नाहींसा झाला. तारकासुराला मारील अशा पुत्राच्या उत्पत्तीचा संकल्प व भविष्यकालीन घटना मनांत चिंतून शंकर कांहीं काल ध्यानस्थ झाला. व काय चमत्कार ! अनंगरंगाच्या भंगामुळें चलित झालेलें आपलें कल्पान्त कालाग्नीप्रमाणें उग्र व तेजस्वी वीर्य शंकरानें अग्नीचे ठायीं प्रविष्ट केलें. त्या वीर्याच्या प्रवेशामुळें अग्नीचा देह करपून गेला. त्यांतच अनंगरंगभंगानें चिडलेल्या पार्वतीनें त्याला पुढील शाप दिला, " अग्ने, ज्या अर्थी तूं भलत्याच वेळीं येथें येऊन माझा विरस केलास त्या अर्थी तूं पवित्र अपवित्र वस्तु खाणारा, भीमकर्मे करणारा, धुरकट आणि कुष्ठी होशील." दक्षाच्या शापानें क्षयी झालेल्या चंद्राप्रमाणें किंवा थंडीच्या कडाक्यानें करपलेल्या कमलकोशाप्रमाणें पार्वतीच्या शापानें कुरूप आणि कळकट झालेला अग्नि शंकराचें उग्र वीर्य आपल्या देहांत कसें तरी धारण करीत तेथून निघून गेला. इकडे अग्निविरसंताप-लेल्या पार्वतीचा क्रोध शमविण्याचा यत्न सौम्य उपायांनीं शंकरानें चालविला. घर्मबिंदूंनीं व्याप्त झालेलें तिचें मुख त्यानें आपल्या वस्त्रानें पुसलें. पंख्यानें तिला वारा घातला. आणि तिचीं वस्त्रें भूषणें नीटनेटकीं केलीं.

पार्वती शान्त होतांच योग्य अवसर पाहून तिच्या जया व विजया नांवाच्या सख्या तेथें आल्या व त्यांनीं तिची सुंदरशी वेषभूषा केली. त्याच वेळीं बाहेर वैतालिकांनीं स्तुतिपाठ केला व गंधर्वांनीं गोड गायन केलें. इतक्यांत नंदीनें बहिर्द्वारांत इंद्रादि देव दर्शनासाठीं उभे असल्याचें शिवाला कळविलें. शंकरानें त्यांना दर्शन दिलें. त्या देवांनीं त्या त्रैलोक्याच्या मातापितरांना वंदन केलें व शंकराचा निरोप घेऊन ते निघून गेले. नंतर शंकर पार्वतीसह विहारासाठीं बाहेर पडला. गणांची सेवा व ऋषींचे नमस्कार घेत घेत शंकर मोठ्या आनंदानें विविधस्थलांचीं कौतुकें पहात होता. याप्रमाणें गौरीच्या संगतींत शंकर कैलासपर्वतावर राहूं लागला.

**त्याचा दाह शमला. पण—**

शंकराचें ज्वलज्जहाल वीर्य धारण करणारा बिचारा अग्नि जो तेथून तडक निघाला तो सभेंत बसलेल्या इंद्राकडे आला. अग्नीची ती दुर्दशा पाहून इंद्र त्याला घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला, " अग्ने, अरे तुझी ही अशी दशा कशानें झाली ? " यावर अग्नीनें घडलेला सर्व वृत्तान्त इत्थंभूत सांगितला त्र इंद्राला तो काकुळतीस येऊन म्हणाला, " माझ्या अंगाचा डोंब होत आहे. माझे प्राण कसेंहि करून वांचव. " यावर इंद्र त्याच्या अंगावरून प्रेमाचा हात फिरवीत त्याला म्हणाला, " तूं देवांचा हितकर्ता, पृथ्वीचा पोषक आणि जगताचा प्राणदाता आहेस. देवांवर अनंत उपकार करतांना तुजवर ही आपत्ति ओढवली असल्यानें ती तुला भूषणावहच आहे. मी तुला या दाहशमनाचा उपाय सांगतों तो ऐक. तूं भागीरथीमध्यें स्नान कर म्हणजे तुझा दाह तात्काळ नाहींसा होईल. भागीरथी ही शंभूचीच जलमयी मूर्ति असल्यानें शंभूचें दुर्धर व उग्र वीर्य ती सहज धारण करूं शकेल. " तें ऐकून अग्नि भागीरथीकडे गेला. तिच्या प्रसन्न तीरावर शुभ्र हंसांचा कलरव चालला होता. त्या हंसकूजनाच्या मिषानें ती त्याला जणों काय म्हणत होती, " अग्ने, तुझें दुःख नाहींसें करून मी तुझें कल्याण करतें. ये. " अग्नीनें भागीरथींत स्नान केल्याबरोबर त्याचे देहांतील उग्र वीर्य तिच्या जळांत संक्रान्त झालें व अग्नीच्या देहाचा ताप निमाला आणि तो तिला नमस्कार करून मोठ्या प्रसन्न चित्तानें निघून गेला.

**सहा मुखांचें बालक !**

पण इकडे भागीरथीची दशा काय झाली ? जलांत प्रविष्ट झालेल्या शिववीर्याच्या दाहानें तिचें जल तप्त झालें. त्या उकळत्या पाण्यांतून तडफडणारे जलचर पटापट बाहेर पडूं लागले. इतक्यांत माघ मासांतील गंगास्नान करण्यासाठीं तेथें सहा कृत्तिका आल्या. त्यांनीं मोठ्या भक्तिभावानें या मंदाकिनीला वंदन करून तिच्या जलांत स्नान केलें. पण काय चमत्कार ! गंगेचें तें पाणी त्यांच्या अंगांस स्पर्श करतें न करतें तों त्यांतील उग्र वीर्य त्यांच्या शरीरांत भिनलें व त्यांना आपण विषाच्या डोहांत बुचकळलों कीं काय असें वाटूं लागलें. त्या पाण्याच्या बाहेर पडल्या. तों त्यांना आढळलें कीं नदींतील तें उग्र वीर्य आपल्या उदरांत शिरून तेथें तें गर्भत्व पावलें आहे. आतां आपले पति आपल्यास काय म्हणतील या धाकानें व लज्जेनें त्या व्याकुळ झाल्या. मग त्यांनीं त्या गर्भाचें विसर्जन तीरावरच्या शरवणांत केलें व त्या घरोघरीं निघून गेल्या. चंद्रकलांप्रमाणें कोमल अशा त्या सहा गर्भांतून एक तेजाळ व षण्मुख बालक निष्पन्न झालें. आपल्या नभोगामी तेजानें सहस्रकर सूर्याशीं व आपल्या सहा मुखांनीं प्रत्यक्ष चतुर्मुख ब्रह्मदेवाशीं त्या बालकानें उपजतांक्षणींच स्पर्धा मांडली होती कीं काय असें वाटलें !

**आईला पान्हा फुटला.**

इंद्रादि देवांनीं प्रार्थना केल्यावरून भागीरथीनें त्या बालकाला स्तनपान दिलें. त्या सहाहि कृत्तिका येऊन त्या बालकाचें संगोपन करूं लागल्या. या मनोहर बालकाबद्दल पुढें भागीरथी, अग्नि आणि कृत्तिका यांमध्यें मोठा कलह माजून राहिला. ' हें माझेंच बालक ' असें प्रत्येकाचें म्हणणें होतें. हें त्यांचें भांडण चाललें असतां त्याच वेळीं शंकर पार्वतीसह विमानांतून आकाशमार्गानें चालला होता. सहा दिवसांचें तें सुंदर आणि बाळसेदार बालक पाहून पार्वती शंकरास म्हणाली, " या बालकाची भाग्यवान् माता कोण बरें असेल ! या बालकाजवळ हें भांडण कसलें चाललें आहें ? " हें ऐकून शंकर तिला म्हणाला, " हे देवी, हें बालक तुझेंच आहे. माझ्याच वीर्यापासून हें तेजस्वी बालक निर्माण झालें असल्यानें तूं आज पुत्रवती स्त्रियांमध्यें अतिश्रेष्ठ ठरली आहेस. " हें ऐकतांच पार्वतीच्या

रोमरोमांतून वात्सल्य दाटून आलें व ती लगेच खालीं उतरून त्या बालकास कुरवाळूं लागली. तिनें त्यास कौतुकानें मांडीवर घेतलें. त्या वेळीं तिला अपूर्व पान्हा फुटला. क्रमाक्रमानें त्या बालकाच्या सहाहि मुखांचें चुंबन ती घेऊं लागली. तिचा आनंद गगनांत मावेना. मातापितरांनीं त्या बालकाला आपल्या मंदिरांत नेलें. तेव्हां सर्वत्र मंगल गीतांचे सुस्वर ध्वनि व देवदुंदुभींचे गंभीर नाद ऐकूं येऊं लागले. सृष्टि प्रसन्न झाली. देवांनीं आकाशांतून पुष्पवृष्टि केली.

### त्याच्या बाललीला.

त्या बालकानें आपल्या विविध बाललीलांनीं मातापितरांच्या अंतःकरणास अत्यंत संतोष दिला. कधीं नंदीचीं शिंगें धर, तर कधीं आपल्या मातेच्या सिंहाचे आयाळच ओढ, तर कधीं भृंगी नांवाच्या गणाची शेंडीच उपट, अशा चित्तवेधक खोड्या तो धीट बालक करूं लागला. कधीं आपल्या पित्याच्या मांडीवर बसून तो निर्भय मुलगा पित्याच्या अंगावरील नागाचें तोंड बेधडक उघडी व 'एक, नऊ, दोन, दहा, पांच, सात' असे अंक मोजत तो त्याच्या दांतांची मोजदाद करूं लागे. आपल्या वडिलांच्या गळ्यांत रुळणाऱ्या नरकपालांच्या माळेंतील एकेका कपालाच्या मुखविवरांत बोटें घालून तो मौक्तिकभ्रमानें त्यांतील शुभ्र दंतपंक्तीच घेऊं पाही. शंकराच्या जटाजूटावरील अत्यंत शीतल गंगाप्रवाहात त्यानें आपला हात घालतांच तो थंडीनें बधिर होत असे. तेव्हां तो चतुर मुलगा शिवाच्या भालनेत्रांतील अग्निज्वालेवर तो शेकून घेई ! शंकराच्या जटेंत प्रकाशणाऱ्या चंद्रकोरेचें त्याला फार कौतुक वाटे व तिला तो वरचेवर कुरवाळी. याप्रमाणें विविध बाललीला करणाऱ्या त्या पुत्राच्या संगतींत दिवस केव्हां उजाडला व रात्र केव्हां झाली हेंहि त्या मातापितरांना उमगत नसे. केवळ सहा दिवसांत या बालकाला यौवन प्राप्त झालें व पूर्वजन्मसंस्कारांनीं त्याला निखिल शास्त्रविद्या व शस्त्रविद्या एकदम अवगत झाली.

### 'आम्हांला हा सेनापति द्या.'

याच वेळीं तारकासुराच्या छळानें गांजलेला इन्द्र शंकराकडे आला.

नंदीनें इंद्र आल्याचें वर्तमान शंकराकडे कळवितांच त्यानें इंद्रास आंत घेऊन येण्यास सांगितलें. पार्वती आणि त्याचा पुत्र षडानन यांसहित बसलेला त्रैलोक्याधीश्वर शंकर इंद्राच्या नजरेस पडला. विशेषतः हातांत शस्त्रास्त्रें धारण करणाऱ्या व मेरूप्रमाणें तेजस्वी व स्थैर्यवान् असणाऱ्या त्या कुमाराला शंकराजवळ बसलेला पाहून 'मी आतां माझ्या शत्रूचा पराभव करीन' अशी आशा इंद्राच्या मनांत डोकावूं लागली. इंद्र आणि त्याबरोबरीचे इतर देव शंकरास प्रणाम करून आसनावर बसले. त्यांचीं तीं म्लान वदनें पाहून शंकरानें त्यास विचारिलें, "तारकासुरानें तुमच्यावर आज कांहीं नवें गंडांतर उत्पन्न केलें आहे काय ? तारकासुराचा बीमोड करावयास मी समर्थ आहें. वणव्यांत सांपडलेल्या वनाचें रक्षण मेघावांचून दुसरा कोण करील !" हें शंकराचें आशादायी वचन ऐकून इंद्र त्यास म्हणाला, "आपण सर्वसाक्षी असल्यानें खरी परिस्थिति जाणतच आहांत. पूर्वीं आम्ही ब्रह्मदेवाकडे आमचें गाऱ्हाणें घेऊन गेलों असतां त्यानें आम्हांस असें सांगितलें आहे कीं शंकराचा पुत्रच देवाचें सैनापत्य करून तारकासुराला मारण्यास समर्थ आहे. अशा तऱ्हेच्या पुत्राच्या उत्पत्तीची वाट आम्हीं आजवर पाहिली. आमच्या भाग्यानें हा योग्य पुत्र आपल्यास लाभला आहे. तरी आपण स्वतः या सेनापतीस आमचें इष्ट कार्य करण्याची आज्ञा द्यावी. या तुमच्या प्रतापी पुत्राच्या तीक्ष्ण शस्त्रानीं ठार झालेल्या दैत्यांच्या रमणींचे विलाप दशदिशांत कोंदून राहोत आणि घराबाहेर गेलेल्या देवांच्या पत्न्यांनीं बांधलेल्या वेण्या सुटण्याचा सुप्रसंग लौकरच येवो." हें ऐकून शंकर म्हणाला, "मीं तुमच्या कार्याला पुत्रपौत्रांसह सज्ज आहें. मी योगी असूनहि पार्वतीपरिग्रह केला तो माझ्या पुत्रानें शत्रूचा वध करावा याच हेतूसाठीं. तरी त्याला तुम्ही सेनापति म्हणून न्या. तुमचें कार्य सफल होवो." त्यानें लागलीच युद्धासाठीं उत्सुक असलेल्या षडाननास आशीर्वाद दिला व त्यास म्हटलें, "बाळा, जा. शत्रूवर विजय मिळीव." कुमारानें पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानली. आपल्या पराक्रमशाली पुत्राचा तो वीरोचित आविर्भाव पाहून पार्वती आनंदित झाली. कोणच्या वीरप्रसू मातेला अशा समयीं हर्षाचें भरतें येणार नाहीं ?

## सैनापत्याचा अभिषेक.

देवांसहित समरांगणाकडे निघालेल्या त्या कुमारानें मातेच्या चरणीं मस्तक ठेविलें. तिनें त्यावर आनंदाश्रूंचा वर्षाव केला. तोच त्याचा खरा सैनापत्याभिषेक झाला ! तिनें त्याला मांडीवर बसवून कुरवाळलें आणि त्याच्या मस्तकाचें अवघ्राण करून ती त्याला म्हणाली, "बाळा, शत्रूला मारून मला– तुझ्या या वीरमातेला– कृतार्थ कर." नंतर मोठ्या रणोत्साहानें तो देवांसह नक्षत्रपथ उल्लंघून स्वर्गाच्या सरहद्दीवर आला. फार कालापूर्वी सोडलेल्या व तारकाच्या ताब्यांत असलेल्या त्या स्वर्गांत पाऊल टाकण्याची हिंमत त्या स्वर्गवासी देवांना होईना. जो तो दुसऱ्याला म्हणे, 'तूं शिर कीं आधीं.' दुसरा म्हणे, 'छे ! तूं आमचा पुढारी. तूंच पाहिल्यानें पुढें हो कीं.' नंतर त्या भेदरलेल्या देवांनीं कुमाराच्या तोंडाकडे आशेनें पाहिलें. तो प्रकार पाहून त्या बालवीरानें सर्वांस धीर दिला व तारकाच्या वधाची घोर प्रतिज्ञा करून स्वर्गप्रान्तांत प्रवेश केला. त्या वेळीं इंद्रादि देव आणि नारदादि ऋषि यांनीं आपापलीं उत्तरीय वस्त्रें त्यास दिलीं व त्याचीं आपण घेतलीं. या युद्धकार्यांत 'आतां आपण एकमेकांचे भाऊ झालों' असा याचा अर्थ होता. ( याला 'निरुच्छन' म्हणतात. ) नंतर कुमारानें पितामह ब्रह्मा, कश्यप महर्षी, देवमाता अदिति, ब्राह्मीप्रभृति सप्त माता, शची आदिकरून देवपत्न्या व ऋषिपत्न्या यांचें दर्शन घेतलें व त्यांचे शुभाशीर्वाद मिळविले. तेथील स्वर्गशोभा पाहून त्याला फार आल्हाद वाटला. त्यानें मोठ्या भक्तीनें तिला प्रणाम केला. इंद्राची अमरावती, नंदनवन, तेथील वापी इत्यादिकांची मोडतोड आणि पडझड पाहून कार्तिकेयाच्या चित्तांत करुणा आणि क्रोध यांचे कढ येत होते. वैजयन्त नांवाच्या इंद्राच्या आतां ओसाड पडलेल्या, कोळिष्टकांनीं भरलेल्या व जर्जर झालेल्या वाड्यांत सर्व मंडळी जमली व तेथेंच त्यांनीं कार्तिकेयाला सैनापत्याचा अभिषेक केला. या महाप्रतापी बालसेनानीच्या-मुळें स्वर्गांत पुन्हा उत्साह, आशा आणि निर्भयता मूर्तिमंत अवतरलीं.

## देवसेना निघाली.

देवसेना सिद्ध होऊन समराला निघाली. आघाडीला सेनानी कुमार शक्तिधर यांची स्वारी 'विजित्वर' नांवाच्या अजिंक्य रथांत बसून चालली

होती. त्याच्या मस्तकांवर देवांनीं छत्रचामरें धरलेलीं होतीं. किन्नर, सिद्ध इत्यादि त्याची स्तुति गात होते. त्याच्यामागें स्फटिकाच्या डोंगरासारख्या विशाल व श्वेत ऐरावतावर बसलेला वज्रधर इंद्र, प्रचंड मेंढ्यावर आरूढ झालेला उग्र अग्नि, इंद्रनील पर्वताप्रमाणें अवाढव्य रेड्यावर अधिष्ठित झालेला दंडधर यम, आणि पिशाचोपविष्ट आणि खवळलेला नैर्ऋत ही मंडळी चालली होती. त्यांच्यामागें मोठ्या मगरावर बसलेला भयंकर पाशधारी वरुण, वेगवान् हरिणावर बसलेला वायु, शत्रूंच्या रक्तप्राशनाची वाट पहाणारी भयंकर गदा हातीं घेतलेला कुबेर व हिमालयाच्या टेकड्यांसारख्या विशाल व शुभ्र वृषभावर बसलेले घोरदर्शन रुद्र असे एकंदरींत आठ दिक्पाल निघालेले दिसत होते. मागें प्रचंड देवसेना गर्जना करीत चालली होती. दुदुंभी झडत होत्या, तुर्यें वाजत होतीं. धुरळ्यानें आणि ध्वनीनें दशदिशा कोंदून गेल्या होत्या. घोड्यांच्या टापा, हत्तींचे चीत्कार व वीरांच्या रणगर्जना यांनीं गिरिगह्वरें निनादूं लागलीं. सुमेरु पर्वत उतरून ही राक्षसकुलाचा ग्रास घ्यावयास सिद्ध झालेली सेना तारकासुराच्या राजधानीच्या रोखें निघाली.

## अपशकुनांना न डरणारा तारक.

अंधक व बल या राक्षसांना ठार मारणाऱ्या मदनान्तक शंकराचा पुत्र कार्तिकेय प्रचंड देवसेना घेऊन आपल्यावर चालून येत आहे ही वार्ता कळतांच तारकासुराच्या नगरांतील राक्षसांचें धाबें दणाणलें. ते धावतच तारकाकडे गेले व हात जोडून त्याला म्हणाले " महाराज, शिवपुत्त्रासह इंद्र आपल्यावर चाल करून आला आहे. " तें त्यांचें भाषण ऐकून तारक तिरस्कारानें हंसला व कुत्सित हेल काढून उद्गारला, " आजपर्यंत अनेकदा इंद्रानें एकट्यानें माझा पराजय केलाच आहे. आतां शंकराच्या पोराच्या साहाय्यानें आणखी एकदा तो करील ! ! " असें बोलून त्यानें आपली राक्षससेना सज्ज केली. ती देवसेनेवर तुटून पडण्यास चालली असतां धुरळ्यानें सूर्य दिसेनासा झाला. ही राक्षससेना कांहीं अंतर चालून गेली तों तिला अनेक अपशकुन झाले. गिधाडें व पारवे आकाशांत घिरट्या घालूं लागलीं. उलट वारा वाहूं लागला. तोंडांतून विषाग्निज्वाला टाकणारे नाग फूत्कारत सेने पुढून जाऊं लागले. सूर्याला

खळें पडलें. भालू ओरडूं लागल्या. मेघ नसतांना आकाशांतून विजा कोसळूं लागल्या. रक्ताचा पाऊस पडला. कुत्रीं रडूं लागलीं. पण त्यांना न भितां तारकासुर तसाच पुढें चालला. त्या वेळीं आकाशवाणी झाली : "अरे, मदान्धा कार्तिकेयाशीं युद्ध करायला जाऊं नको. या सहा दिवसांच्या बालकापुढें तुझें कांहीं चालणार नाहीं. उगवत्या सूर्यासमोर रात्रीचा गाढ अंधकार टिकतो का ? त्याला शरण जा आणि आपलें प्राण राख !" हे शब्द ऐकून कोपलेला तारक गरजला, " रे क्षुद्र देवांनो, काय बडबड लाविली आहे ही ! माझ्या बाणांच्या जखमा विसरलांत वाटतें ? पिसाळलेल्या कुत्र्यांप्रमाणें माझ्यापुढें काय कैंकटत आहांत ? सावालाहि चोरांबरोबर मरावें लागतें तसें या शिवपुत्त्राला देवांबरोबरच मरावें लागणार हें निश्चित." असें म्हणून त्यानें आपली कराल तरवार परजली आणि तो आपल्या सेनेसह देवसैन्यावर येऊन धडकला. उभयपक्षानीं परस्परांचे योद्धे हेरले व युद्धास तोंड लागलें.

**रक्ताच्या नद्या वाहिल्या.**

पायदळाशीं पायदळ, रथास रथ, हत्तीस हत्ती आणि घोडदळास घोडदळ भिडलें. भाट वीरांचीं नांवें उच्चारून त्यांना पुढें घालूं लागले. रक्तानें माखलेल्या तरवारी सूर्यप्रकाशांत विजेसारख्या तळपूं लागल्या. बाण पाखरांसारखे आकाशांत भिरभिरूं लागले. बाणांनीं भरलेलें अंबर गिधाडांच्या चीत्कारमिषानें कण्हूं लागलें. यमाच्या खादाड जिभेसारखे लाल भाले वीरांच्या हातांत फिरूं लागले. हत्ती सैरावैरा धावूं लागले. रक्ताच्या नद्या व मांसाचा चिखल झाला. शस्त्रांनीं चिरलेल्या हत्तींच्या गंडस्थळांतून गळलेलीं मोतीं चिखलांत रुतलीं. तें पाहून वीरांच्या कीर्तीचें हें बीं रुजत आहे कीं काय असें वाटलें. दोन वीर एकमेकांशीं लढतां लढता ठार होऊन स्वर्गांत गेले. पण तेथेंहि एकाच अप्सरेच्या लोभानें ते लढूं लागले ! असा समरचमत्कार चालू असतां असुरांचा नायक पुढें सरसावला व त्यानें देवांवर बाण टाकले. त्या बाणांतून शेकडों नाग उत्पन्न झाले व त्यांनीं इंद्रादि देवांना करकचून बाधून टाकलें. त्यामुळें घुसमटलेले देव कार्तिकेयाकडे धावले व त्यांनीं त्याजपाशीं साहाय्याची याचना केली.

**देवांच्या उरांतील शल्य निघालें.**

कार्तिकेयानें केवळ दृष्टिक्षेप करतांच ते नागपाश तटातट तुटले. तो चमत्कार पाहून तारकासुर आपल्या सारथ्याला म्हणाला, " अरे, या पोराच्या नुसत्या दृष्टीचा हा परिणाम आहे पहा. तर मग माझा रथ त्याच्याजवळ नेऊन उभा कर." तारकाचा रथ कार्तिकेयाजवळ जातांच तारक क्रोधानें त्याला म्हणाला, " अरे, शंभु बैराग्याच्या पोरा, तुला हें देवांचें विकत श्राद्ध कशाला हवें ? तुझ्या कोंवळ्या हाताला हें शस्त्र पेलतें तरी का ? येथून जीव बचावून मुकाट्यानें परत फिर आणि आईबापांच्या मांडीचा आडोसा कर. जा. " त्याचे हे अवहेलनेचे शब्द कुमाराला झोंबले. तो आपल्या हातांतील शक्ति परजीत त्याला म्हणाला, " तुला साजेल असेंच तूं बोललास. आतां शस्त्र घे व माझे वार सहन कर. " मग दोघांचें भयंकर युद्ध सुरू झालें. ' हा मुलगा आतां आपल्याला आटपत नाहीं ' असें दिसूं लागतांच तारकानें कपटयुद्ध सुरू केलें. त्यानें वातास्त्र सोडून सुरसेनेची वाताहात केली व दहनास्त्र सोडून तिला भाजून काढलें. त्यावर कार्तिकेयानें प्रत्यस्त्रें सोडलीं. तरी तो आटपत नाहींसें पाहून कार्तिकेयानें युगान्तकालाग्निप्रमाणें लखलखणारी महाभयंकर शक्ति तारकावर सोडली. ती त्याच्या प्रचंड शरीरावर देवांच्या आनंदाश्रूंसहित व दानवांच्या दुःखाश्रूंसहित पडली. त्या शक्तीनें गतप्राण झालेल्या तारकाच्या देहाचें धूड जमिनीवर कोसळलें. ती जमीन त्या आघातानें खालीं दबेल म्हणून शेषानें खालून आपल्या फणांचा नेट तिच्याखालीं लावला ! देवांच्या मुखावर आनंद मोहरला. मंदाकिनीच्या तुषारांनीं टवटवी आलेल्या कल्पवृक्षांच्या कुसुमांची अपार वृष्टि या विजयी बालवीराच्या मस्तकावर झाली. त्रिभुवनाच्या उरांत रुतणारा हा तारकरूपी कांटा कुमारानें याप्रमाणें उपटून टाकतांच इंद्राचें स्वर्गावरील अधिराज्य पूर्ववत् चालू झालें.

# कुमार-संभव—रसग्रहण

## पुराणें का इतिहास ?

'कुमारसंभवा'चें हें रम्योदात्त कथानक सतरा सर्गांत व सुमारें अकराशें श्लोकांत ग्रथित केलेलें आहे. या महाकाव्याचा हा विस्तार जसा महान् तसा त्याचा विषयहि भव्य आणि महान् आहे. वैदिकधर्मी आर्यांचे अवैदिक असुरांशीं जे अनेक उग्र संग्राम प्राचीन भारतांत झाले त्यांपैकीं एकाचा वृत्तान्त यांत आहे. त्रैलोक्यावर जुलूम करणाऱ्या अनियंत्रित, अन्यायी आणि उन्मत्त अशा 'तारका'च्या आसुरी सत्तेचा नायनाट हा या काव्याचा मुख्य विषय होय. यांत देव, देवता, देवर्षि, यक्ष, गंधर्व, विद्याधर आणि असुर इत्यादि दैवी आणि अतिमानुष पात्रें वावरतांना दिसत असलीं तरी हा खराखुरा मानवी इतिहास आहे. निसर्गाचा आपल्या कल्पनेप्रमाणें अर्थ लावून त्यांतील प्रमुख जड शक्तींना मानवानें सचेतन अशीं विशिष्ट रूपें व नांवें दिलीं. त्यांतूनच देव-देवता निघाल्या व त्यांच्या कथा व आख्यायिका जन्मास आल्या. असल्या अद्भूत व दिव्य सामग्रीच्या साहाय्यानें रम्योदात्त रूपांत सांगितलेला मानवी इतिहास म्हणजेच पुराणें. शिलाहारकालीन 'महालक्ष्मी' व म्लेच्छ दैत्याचा संहार करणारी रामदासांची 'रामवरदायिनी' हीं या प्रवृत्तीचीं ताजीं उदाहरणें होत. बऱ्याच महाकाव्यांतून अशाच आख्यायिका व पुराणें यांची खऱ्या मानवी इतिहासाशीं सांगड घातलेली आढळते. ग्रीक महाकाव्यांतूनहि असेंच दैवी व मानवी प्रवृत्तींचें मिश्रण आहे व त्यामुळेंच महाकाव्यामोंवतीं एक अद्भुततेचें व भव्यतेचें वलय निर्माण होतें.

## अनेक धाग्यांची गुंफण.

'कुमारसंभवां'त वेदकालींच देवत्व पावलेल्या इन्द्र, वरुण, अग्नि, मरुत् वगैरे निसर्गशक्ति आहेत. ब्रह्मा, कुबेर, यम, मदन, सप्तर्षि, ब्रह्मदेवाचे मानसपुत्र व मानसकन्यका इत्यादि पौराणिक व्यक्ति आहेत. हिमालयासारखा प्रचंड पर्वतेश्वर म्हणजे अनेक निसर्गशक्तींचें वसतिस्थानच. तो येथें सम्राटाचें देहधारी व सचेतन रूप पावला आहे. मेना, पार्वती, मैनाक इत्यादिकांची मानुष, दैवी व पौराणिक धाग्यादोऱ्यांनीं

त्यांत गुंफण करण्यांत आली आहे; व स्वर्ग आणि पृथ्वी, मानुष, अमानुष व अतिमानुष, इतिहास आणि पुराणें आणि सत्य व अद्भुतता यांचें एक बेमालूम रसायन करण्यांत आलें आहे. त्यांतच रामायण-महाभारत-पूर्वकालीं घडून आलेलें दोन परस्परभिन्न संस्कृतींच्या मानववंशांचें मिश्रणहि आहे. शंकर ही एका विभिन्न, कमी सुधारलेल्या, राकट, रानवट पण महापराक्रमी वंशाची देवता दिसते. त्या वंशाशीं आर्यांना एकदां केव्हां तरी ऐक्य करणें जरूर वाटलें असलें पाहिजे. 'विष्णु म्हणजे शिव व शिव म्हणजे विष्णु' ही महाभारतकालीन घोषणा ( कु. ७·४४ पहा. ), ब्रह्मा-विष्णु-महेश यांचें सर्वश्रेष्ठत्व व शिवाचा राम, परशुराम इत्यादि अवतारांशीं दाखविलेला संबंध हीं या ऐक्याच्या दृढीकरणाचीं गमकें होत. पार्वती व शिव यांचा विवाह लावून शिवभक्त कालिदासानें शंकरसंस्कृतीचें आर्यसंस्कृतीशीं झालेलें ऐक्य तत्त्वज्ञानाच्या बैठकीवरून फारच मनोहरपणें खुलवून दाखविलें आहे. जटिल-पार्वतीसंवादांतील पार्वतीनें केलेलें शिवाचें समर्थन (सर्ग ५), शंकराची विवाहकालीन वेषभूषा ( सर्ग ७.३०-३६ ) इत्यादि स्थलें हीं या ऐक्याच्या दृढीकरणांतील कालिदासाच्या अमोघ चातुर्याचीं उदाहरणें होत.

## त्यागावांचून तेज नाहीं.

असो. तारकासुराचा वध हा या काव्याचा विषय आहे. पण तो वध घडवून आणण्याला जें सामर्थ्य पाहिजे होतें तें सुखलोलुप देवांमध्यें राहिलें नव्हतें. त्यासाठीं पृथ्वीवरील तेजाचें आवाहन करणें त्यांना प्राप्त झालें. सबंध द्यावा-पृथिवीचें ऐक्य होऊन जेव्हां फार मोठ्या त्यागाला सुरवात झाली तेव्हांच तारकाला ठार करणारी प्रचंड प्रतिकारशक्ति निर्माण होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. या त्यागयज्ञांत अनेकांना अनेक आहुति द्याव्या लागल्या. तेव्हांच पेटलेल्या या यज्ञकुंडांतून पराक्रमाची ज्वाला निर्माण झाली. या त्यागयज्ञांत पार्वती, शंकर, मदन, रति, अग्नि, भागीरथी आणि कृत्तिका यांना कमीअधिक प्रमाणांत जेव्हां आपापल्या स्वार्थाच्या आहुती अर्पाव्या लागल्या तेव्हां 'कुमारा'सारखें प्रखर प्रतिकारतेज त्यांतून निर्माण झालें ! हें प्रतिकारतेज निर्माण करावयाला व राखावयाला पार्वतीसारख्या रूपसुंदर राजकन्येला आपला नाजुकपणा

झुगारावा लागला व श्रीमंतीच्या व इभ्रतीच्या भ्रामक कल्पना दूर साराव्या लागल्या; शंकरासारख्या वैयक्तिक मोक्ष संपादण्यासाठीं जगापासून दूर राहणाऱ्या लहरी, तापट व लोकविमुख महान् योग्याला आपली निवृत्ति टाकून प्रवृत्तीकडे वळावें लागलें, आणि वैयक्तिक व स्वार्थी तपश्चर्या एकीकडे सारून 'लोकसंग्रहार्थ' आणि जगाच्या धारणपोषणार्थ गृहस्थाश्रमाचा सार्वजनिक मार्ग पत्करावा लागला. 'लैंगिक क्रीडेसाठींच स्त्री-पुरुष-प्रेम' असें प्रतिपादणाऱ्या मदनाला स्वतःस जाळून घ्यावें लागलें व रतीला वैधव्यदुःखांत कांहीं काळ पिचावें लागलें. म्हणजे शारीरिक प्रेमाला कर्तव्याच्या अग्नींत दिव्य करावें लागलें. अग्नीला कुष्ठाच्या, भागीरथीला दाहाच्या व कृत्तिकांना लौकिक अपवादभयाच्या यातना सोसाव्या लागल्या. स्वार्थत्यागाचा हा भव्य आणि महान् विषय ह्या महाकाव्यांत कालिदासानें वर्णिला आहे.

**आर्यसंस्कृतीचा महान् आदर्श.**

या महाकाव्याची दुसरी एक महती अशी आहे कीं कालिदासानें हीं महातत्त्वें श्रुतिस्मृतिपुराणेतिहासांतील सिद्धान्तान्वयें प्रतिपादन करून तत्कालीन आर्यसंस्कृतीचा एक महान् आदर्श आपल्यापुढें ठेवला आहे. श्रौतसंस्था, स्मार्त आचार, ऐतिहासिक घटना व पौराणिक अद्भुतता यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनीं त्यानें हें 'कुमारसंभव' महावस्त्र विणलें आहे. वरील सर्व धाग्यांच्या ताणांतून त्याची चपल कल्पना धोट्यासारखी इकडून तिकडे फिरत असून तिनें कसला सुंदर व चित्रविचित्र काव्यपट निर्माण केला आहे तो पाहा. हिमालयाचें शैलराजत्व त्याच्या यज्ञोपयोगित्वामुळें आहे (१ १७ व ६.७२), तारकासुराचा जुलूम विशेष जाचक होण्याचें कारण त्या वेळीं यज्ञकर्म यथासांग होत नव्हतीं हें होय (२.४६), ब्रह्मदेव हा स्वतः हवि आणि होता आहे ( २.१५ ), विवाह हा एक यज्ञच आहे ( ७.४७ ), इत्यादि प्रमुख कल्पनांनीं व अनेक वैदिक उपमांनीं ( ६.२८ ) कालिदासानें आर्यसंस्कृतीचें अधिष्ठान मोठ्या भक्तीनें आणि रसिकतेनें वर्णिलें आहे. स्मार्त विधि व तत्कालीन शिष्टांनीं परिगृहीत आचार यांची पेरणी तर सबंध काव्यभर आहे. सर्ग ६ व ७ यांतील विवाहविधि व नवरीनें विवाहापूर्वी आरशांत व वीर वरानें तर-

वारीच्या पात्यांत आपलें प्रतिबिंब पाहावयाचें ही चाल मोठ्या साक्षेपानें कालिदास सांगतो. महाभारत व रामायण व कांहीं पुराणें यांतील कुमार-जन्माच्या व इतर कथा कालिदासानें घेतल्या असून त्या आपल्या कथा-नकाच्या रचाईंत मोठ्या कौशल्यानें बसाविल्या आहेत, व सांख्य, अद्वैत-वेदान्त, योग, ज्योतिष, राजनीति, कामशास्त्र इत्यादि तत्कालीन शास्त्रांतील कल्पनांचा त्यावर जडाव केला आहे. ऋषींचें मंत्रसामर्थ्य, योग्याच्या अणिमादि सिद्धि, यक्ष, गंधर्व, विद्याधर इत्यादि योनिविशेष यांचा कालिदासानें मोठ्या मार्मिकपणें उपयोग करून आपल्या काव्यात उदात्ततेचें व अद्भुताचें वातावरण निर्मिलें आहे. व या सर्व दैवी, अति-मानुष, पौराणिक वा ऐतिहासिक सामग्रींत खऱ्याखुऱ्या मानवी भावनांचें जें बेमालूम मिश्रण त्यानें केलें आहे त्याला तोडच नाहीं. आणि तुम्ही आम्ही वाचक जे 'कुमारसंभवा'त रंगतों ते या मानवी अंशामुळेंच.

**पार्वतीची स्वभावरेखा.**

'कुमारसंभवा'त जर कोणाची स्वभावरेखा रसिकाच्या मनांत अधिक भरत असेल तर ती पार्वतीचीच. खुद्द तिचा पिता हिमालय. पण त्याला जें वात्सल्य, जें कौतुक व जी तन्मयता पार्वतीबद्दल वाटली नसेल ती वत्सल तन्मयता पार्वतीची रेखा निर्माण करणाऱ्या कालिदासाला वाटतेशी दिसते. बाला पार्वती, उपवर पार्वती, विरहिणी पार्वती, भग्नप्रेम पार्वती, तपस्विनी पार्वती, विवाहवेषभूषित पार्वती, विलासिनी पार्वती, आणि माता पार्वती अशा आठ निरनिराळ्या अवस्थांतील पार्वतीच्या रेखांतील विकासशील आणि रम्य छटांचें आणि प्रतिछटांचें अमर चित्रण त्यानें मोठ्या विस्तारानें, कल्पकतेनें आणि पूर्ण तन्मयतेनें केलें आहे. हीं जिवंत व हुबेहूब चित्रें स्वतः कालिदास आपल्याला जणों काय आपल्या हातांनीं एकामागून एक दाखवीत आहे व म्हणत आहे, 'ती पहा छोटी पार्वती मंदाकिनीच्या विशाल वाळवंटांत आपल्या बालमैत्रिणींबरोबर वाळूचे किल्ले करीत बसली आहे, बाहुल्या नाचवीत आहे आणि आपल्या छोट्या हातांनीं चेंडू खेळण्यांत दंग झाली आहे. आतां इकडे पहा. हिचें अंग तारुण्यानें मुसमुसलें आहे. त्याला वस्त्रालंकारांची जोड मिळाल्यानें त्याची शोभा अवर्णनीय झाली आहे. चंद्राची आणि कमलांची कांति एकदमच

तिच्या मुखावर विलसत आहे. निसर्गांतील सौंदर्यांचीं उपमानें तिच्यापुढें फिक्कीं पडत आहेत. आतां जरा इकडे वळा. लज्जावती पार्वती शंकराच्या सेवेंत कशी दंग झालेली आहे पहा. 'माझं रूप म्हणजे माझ्या रूपासारखंच' अशी जाणीव तिच्या प्रत्येक हालचालींत दिसत आहे. शंकराला वश करायला कितीसा वेळ लागणार ? असा तिला आत्मविश्वास आहे. पण हा गोड भ्रम मदनदाहानें निरास पावल्यावर याच मोहक, अल्लड व खेळकर पार्वतींत केवढा फरक एकदम पडला तो पहा.

**महाश्वेतेची थोरली बहीण !**

करारी, दृढनिश्चयी, त्यागी व सहिष्णु अशी एक तपस्विनी आतां पार्वतीच्या जागीं तुम्हांला दिसेल. जशी कांहीं बाणाच्या महाश्वेतेची थोरली बहीणच. शंकराची कुत्सितपणें निंदा करणाऱ्या जटिलावर ती कडाडली तेव्हां पहा तिच्या स्वाभिमानाचें उग्र तेज ! ! तिची विद्वत्ता, तिचें वाक्चातुर्य व तिचा संयमी पोक्तपणा तिच्या प्रत्येक वाक्यागणिक प्रतीत होतो आहे. पण लगेच शंकर प्रकट होतांच-जाण्यासाठीं एक पाय उचललेला, एक स्थिर, धड जाववतहि नाहीं आणि धड राहवतहि नाहीं अशा स्थितींत ती लज्जावती, कृतार्थतेनें नटलेली उमा शंकराच्या बाहुपाशात उभी आहे. आपल्या विवाहाचें बोलणें चाललें असतां लाजून जाऊन कमलाच्या पाकळ्या मोजण्याचा चाळा करीत उभी आहे. विवाहाच्या वेळीं लग्नाच्या वेषभूषेंत तिला पहा. तिच्या सख्या तिची नाहीं नाहीं ती थट्टा करीत आहेत. आणि म्हणून त्यांना लटक्या रागानें हातातील फुलें फेंकून ती मारीत आहे ! प्रत्यक्ष शंकरसमागमांत तिचा विलासीपणाहि असाच शिगेला पोहोंचलेला तुम्हांला आढळेल व शेवटीं आपला पुत्र कार्तिकेय गंगातीरावर दिसतांच वात्सल्यानें व्याकुल झालेली पार्वती 'माता' या प्रौढ अवस्थेंत आपल्याला दिसेल. ती आपल्या पुत्राला हर्षातिरेकानें अलिंगीत आहे, त्याचें अंगप्रत्यंग कौतुकानें निरखीत आहे, तिला प्रेमपान्हा फुटला आहे, ती त्याला स्तनपान देत आहे व त्याच्या मुखाचें चुंबन घेत आहे ! शेवटीं ती पहा वीरमाता पार्वती आपल्या पुत्राला आनंदानें रणांगणावर पाठवीत आहे, त्याच्या मस्तकावर पवित्र अश्रूंनीं सेनापत्याचा अभिषेकच करीत आहे. आणि त्याला म्हणत

आहे, 'बाळा, त्या तारकाला मारून माझें वीरमातृत्व यथार्थ कर.'

**कांहीं शब्दचित्रें.**

हिमालय व मेना यांचें वात्सल्यहि कालिदासानें फार हळुवारपणानें चित्रित केलें आहे. हिमालयाच्या वर्णनानें ऐश्वर्यसंपन्न, धीरगंभीर, सुसंस्कृत व स्नेहाळ अशा एका पूर्वकालीन सम्राटाचें चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभें राहतें. शंकराचा उग्र, तापट, रागीट, लहरी, छांदिष्ट पण उदार स्वभाव जागोजागीं व्यक्त झाला आहे. तारकासुराचा बेलगामी उन्मत्तपणा, ज्याच्या त्याच्यापुढें साहाय्यासाठीं याचना करणाऱ्या इंद्राचें दैन्य, देवांचा भित्रेपणा, वसिष्ठादि सप्तर्षि व अरुंधती यांचें महानुभावत्व, मदनाची स्वामिभक्ति इत्यादि गोष्टी कथेच्या ओघांत कलमाच्या एकेका नाजूक फराट्यासरशी कालिदासानें वर्णिल्या आहेत. 'रतिविलाप' व 'जटिलपार्वतीसंवाद' हीं दोन प्रकरणें तर संस्कृत सरस्वतीचीं सर्वमान्य कण्ठभूषणेंच आहेत. जटिलानें शिवाविरुद्ध काढलेला प्रत्येक आक्षेप मोठ्या शिताफीनें त्याच्याच गळ्यांत घालणाऱ्या पार्वतीचें संवादचातुर्य वानावें का त्यात प्रकट झालेली काव्यमयता वर्णावी, किंवा त्या प्रसंगाचें नाट्य प्रशंसावें असें रसिकाला होऊन जातें. अशीच संवादचातुरी कालिदासानें सिंह-दिलीप, इंद्र-रघु इत्यादि स्थळीं रघुवंशात प्रकट केली आहे.

**सृष्टिकाव्य व सुभाषितें.**

निसर्गवर्णन हा कालिदासीय काव्याचा एक मनोहर विशेष येथेंहि प्रकट झालेला दिसतो. हिमालय हें कालिदासाचें आवडतें स्थल आहे. त्याच्या बहुतेक काव्य-नाटकांत हिमालयाचा प्रदेश आला नाहीं असें व्हायचें नाहीं. येथें तर मुख्य स्थळ हिमालयच. पहिल्या सर्गातील हिमालयाचें मनोहर वर्णन, तिसऱ्यांतील वसंतऋतूंतील वनशोभा, सहाव्यांतील 'ओषधिप्रस्था'चें वर्णन, व विशेषतः आठव्या सर्गातील 'गन्धमादन' वनांतून दिसणाऱ्या सायंकाल, रात्र व चंद्रोदय या देखाव्याचें वर्णन अप्रतिम आहे (श्लोक ३०-८०), पुढील सर्व महाकाव्यांतील असल्या वर्णनाचा पायाच जणों काय या वर्णनानें घातला आहे असें वाटतें. सुभाषितें हा कालिदासाच्या वाणीचा एक रुचिर अलंकार आहे. तोहि कुमार-संभवांत चमकतांना दिसतो. 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते, विकारहेतौ

सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः' 'शरीरमाद्यं खलु धर्म-साधनम्' 'मनोरथानामगतिर्न विद्यते' इत्यादि सुंदर सुभाषितें म्हणीसारखीं संस्कृतज्ञांच्या तोंडीं खेळत असतात.

## कांहीं दोष व उणिवा.

विवेचक रसग्रहणाच्या दृष्टीनें 'कुमारसंभवां'तील कांहीं दोषांचें दिग्दर्शनहि अवश्य आहे. कालिदासाचीं हिमालयवर्णनें चमत्कृतिजनक असलीं तरी भवभूतीच्या निसर्गवर्णनासारखीं हुबेहूब नाहींत. अवलोकनापेक्षां कल्पनेवरच कालिदासाचा या बाबतींत भर जास्त असल्यानें त्यांत कृत्रिमता व सांकेतिकपणा दिसतो. शिवाय हिमालय हें 'कुमारसंभवां'तील एक महत्त्वाचें पात्र म्हणून योजलेलें असल्यानें, त्याच्या केवळ भौतिक व स्थावर स्वरूपावरच जो भर पहिल्या सर्गांत देण्यांत आला आहे तो गैर वाटतो. पार्वतीचें वर्णनहि कृत्रिम व क्लिष्ट आहे. कल्पना ओढून ताणून आणल्यासारख्या दिसतात. 'रतिविलाप' कल्पकपणाचा वाटला तरी त्यांत भावनोत्कटता त्या मानानें कमी. शिवाय त्यांतीय करुणरसाची दीप्ति पुनः पुनः व थांबून थांबून केलेली आहे. कालिदासाच्या नाटकांच्या मानानें 'कुमारसंभवां'तील शृंगार फारच संयमित व विशुद्ध असला तरी त्याची शृंगारदृष्टि येथेंहि कांहीं स्थलीं अतिरेकाला गेल्या-शिवाय राहिली नाहीं. पार्वती ही देवी असल्यानें तिच्या लावण्यवर्णनांत मानुषी स्त्रीच्या लावण्यवर्णनांतील कामुकतेपेक्षां कमी कामुकता प्रकट झाली पाहिजे. पण पार्वतीच्या सौंदर्याकडे– ती तपस्विनी असतांना सुद्धां– कालिदास जरा जास्त धिटाईनें न्याहाळतो असें दिसतें. याचा इतका अतिरेक आठव्या सर्गांत झाला आहे, कीं शिवपार्वतीचे विलास अगदीं उत्तान पद्धतीनें वर्णिल्यामुळें कालिदासाला शाप झाला व आपलें काव्य त्याला तेथेंच सोडून द्यावें लागलें अशी एक आख्यायिका प्रसृत झाली आहे. ही देवताशापाची अद्भुत आख्यायिका खरी असो वा खोटी असो, साध्या सदभिरुचीच्या कसोटीला सुद्धां हा कालिदासाचा अतिरेक सहन होत नाहीं हें कांहीं खोटें नाहीं. व या बाबतींत आनंद-वर्धन व मम्मट यांनीं कालिदासाला बोल लावण्यास मुळींच कमी केलें नाहीं. 'उत्तम देवताविषयक संभोगशृंगाराचें उत्तान वर्णन मातापितरांच्या

संभोगशृंगारवर्णनासारखें अगदीं अनुचित समजावें' असें काव्यप्रकाशांत स्पष्टच म्हटलें आहे ( उल्लास ७ ).

**नामी संधि दवडली !**

थोडेंसें अनौचित्य पत्करून सुद्धां देवतावर्णनांत अधिक मानवी अंश कालिदासाला आणावयाचा होता असें मानलें तरीहि त्यानें शृंगारवर्णनाची एक नामी संधि दवडली असें म्हणावें लागतें. 'पार्वती ही शंकराची अर्धांगी होणार' असें नारदमुनींनीं हिमालयाला सांगितलें. त्यावरून हिमालयानें पार्वतीला आज्ञा केली कीं, 'मुली, शंकराचें आराधान करण्यास जात जा.' त्याप्रमाणें ती जाऊं लागली. हें शिस्तीच्या दृष्टीनें ठीक असलें तरी तें पार्वतीसारख्या प्रगल्भ वयाच्या चतुर मुलीच्या मनोधर्माला साजेसें झालें नाहीं. प्रेमांत जें उभयपक्षीं आकर्षण आवश्यक असतें तें येथें बिलकुल नाहीं. शंकर पार्वतीला कां आवडला, केव्हांपासून आवडूं लागला, शंकराचें पार्वतीविषयक प्रेम व्यक्त झालें होतें का ? इत्यादि प्रश्नांविषयीं येथें संपूर्ण मुग्धताच आहे. त्यामुळें पार्वतीचें शंकरविषयक प्रेम लादल्यासारखें, एकांगी व नीरस वाटतें. पार्वतीचें विवाहपूर्व वर्तन प्रणयाराधन ठरत नसून केवळ सेवा ठरतें. याला शंकराचें वशित्व कारणीभूत आहे हें मान्य. पण शृंगाररसाच्या दृष्टीनें हें वैगुण्य वाटल्यावांचून राहत नाहीं. बरें, शंकराच्या वशित्वामुळें तो पार्वतीप्रणयाला बिलकूल अभिमुख नव्हता असें म्हणावें तर पार्वती एखाद्या मानवी नायिकेसारखी शृंगारी प्रेमानें त्याच्यासाठीं झुरते असें कालिदास दाखवितो तें कां ? हें लक्षांत येत नाहीं ( सर्ग ५.५४-५८ ). नायक शिडकारीत असूनहि नायिकेनें त्याच्या मागें लागावें हा एक प्रेमप्रकार आहे असें मानिलें तरी शंकर हा प्रणयानुकूल नायक होण्यास योग्य आहे असें पार्वतीला वाटण्याजोगा प्रसंग त्याच्या आराधनेपूर्वी कालिदासानें दाखवावयास पाहिजे होता, म्हणजे सर्व शृंगाररसाच्या दृष्टीनें योग्य झालें असतें.

**संपूर्ण 'कुमारसंभव' कालिदासाचेंच ?**

कालिदासानें 'कुमारसंभवा'चे फक्त पहिले आठ सर्ग लिहिले असून पुढचा नऊ ते सतरा सर्गांचा भाग मागाहून कोणीतरी त्यास जोडला असें एक मत आहे. मल्लिनाथ या कालिदासाच्या प्रसिद्ध टीकाकाराची

'कुमारसंभवा'वरील 'संजीवनी' टीका फक्त पहिल्या आठ सर्गांवरच आहे. पुढील सर्गांवर सीताराम नांवाच्या अगदीं आधुनिक टीकाकारानें ( इ. स. १८१४ ) आपली टीका लिहिली आहे. 'कुमारसंभवां'तील कालिदासीय श्लोक म्हणून जीं जीं उदाहरणें जुन्या साहित्यशास्त्रकारांनीं उद्धृत केलीं आहेत तीं 'कुमारसंभवा'च्या पहिल्या आठ सर्गांतीलच. संभोगवर्णनामुळें कालिदासाला शाप झाला व पुढील काव्य त्यानें अर्धेंच टाकलें. पुढील सर्गांतील काव्यसंपदा कालिदासाच्या नेहमींच्या काव्य-संपदेहून हिणकस वाटते इत्यादि अनेक बाह्य व अंतर प्रमाणें हें काव्य आठ सर्गांपर्यंतच कालिदासानें लिहिलें या मताच्या पुष्ट्यर्थ दिलीं जातात. तीं निःसंशय विचारणीय आहेत.

पण याचा अर्थ कालिदासाला आपलें काव्य आठव्या सर्गांतच पूर्ण करावयाचें होतें असा मात्र नव्हे. टीकाकार नारायण, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर इत्यादि विद्वान् रसिकांनीं 'कुमारसंभव' या नावावरून व अंतर्गत अपेक्षेवरून 'हें काव्य केवळ आठ सर्गांचेंच संपूर्ण काव्य आहे' असें मत दिलें आहे. पण तें चिन्त्य वाटतें. अंन्तर्गत अपेक्षा म्हणून नारायण जें प्रमाण देतो तें 'तारकाच्या नाशासाठीं (योग्य) सेनानी उत्पन्न करविण्याची आमची इच्छा आहे' (कु. २.५१) हें देवाचें वाक्य. या वाक्यांत जसा कुमारोत्पत्तीचा तसा तारकनाशाचाहि उल्लेख नाहीं काय? पण अंतर्गत अपेक्षेच्या बाबतींतच आमची मुख्य मदार आहे ती ब्रह्मदेवाच्या शेवटच्या आश्वासनावर. त्यांत तो स्पष्टच म्हणतो कीं 'शिवाचा पुत्र तुमचें सैनापत्य पत्करून आपल्या पराक्रमानें ( तारकाला ठार मारून त्याच्या ) कारागृहांत पडलेल्या देवांगनांच्या वेण्या ( पुन्हा नीट बांधण्यासाठीं ) सैल करील.' (कु. २.६१). याच गोष्टीचा पुनरुच्चार कु. १२.५२ मध्यें कुमारसंभवाची सांधजोड करणाऱ्या कवीनें मोठ्या साक्षेपानें केला आहे. ही तारकनाशाची अपेक्षा पुरी होऊन कथेंतील क्रियैक्य साधण्याच्या दृष्टीनें 'कुमार' सतरा सर्गांअखेरच संपला पाहिजे.

बरें, विष्णुशास्त्री म्हणतात ('कविपंचक' पहा ) त्याप्रमाणें कुमाराची उत्पत्तीच ( संभव ) कालिदासाला अभिप्रेत होती म्हणून त्यानें 'कुमार-संभव' हें नाव आपल्या काव्याला दिलें हें खरें मानलें तरी आठ सर्गांत

कुमाराचा जन्म तरी कोठें झाला आहे ! तो दहाव्या सर्गाच्या शेवटीं आहे. 'शिवपार्वतीविवाह झाला कीं कुमारजन्म त्यामुळें सूचित होतो' असें म्हणावें तर या 'कुमारा'चा जन्म इतर सामान्य कुमारासारखा नाहीं. शिवाचें वीर्य अग्नींत, तेथून तें गंगेंत, तेथून कृत्तिकांत संक्रान्त होत जावयाचें व मग त्याचें षण्मुख बालक बनावयाचें. व नंतर तें मातापित्यांकडे यावयाचें हा प्रकार साधा नाहीं. याचें प्रत्यक्ष कथन पाहिजे, सूचनेनें येथें भागावयाचें नाहीं.

आतां अडचण राहते ती 'संभव' या शब्दाच्या अर्थाची. तीवर जीवानंद नांवाच्या टीकाकारानें अशी तोड सुचविली आहे कीं 'संभवा'चा अर्थ 'महिमातिशय' म्हणजे अपूर्व पराक्रम असाहि आहे. म्हणून हे दोनीहि अर्थ ध्यानांत घेऊन कालिदासानें ही शब्दयोजना केली असावी. शिवाय आठव्या सर्गाची अखेर संपूर्णतादर्शक नाहीं व महाकाव्य आठ सर्गांपेक्षां अधिक असावें असें विश्वनाथानेंहि म्हटलें आहे. म्हणजे चौदाव्या शतकापर्यंत आठ सर्गांचें महाकाव्य विश्वनाथाला माहीत नव्हतें असें दिसतें. म्हणून नऊ ते सतरा सर्ग कालिदासाचे असोत वा नसोत कथानकाच्या परिपूर्तीच्या दृष्टीनें त्यांची अत्यंत आवश्यकता आहे यांत तिलप्राय संदेह नाहीं.

**सांधजोडणी समर्पक आहे.**

पुढील काव्यरचना करणारा कवि अगदीं प्रतिकालिदासच कोठला असणार ? त्यामुळें कालिदासीय कल्पनेची मरारी त्याच्यांत नसेल, क्वचित् उथळपणाहि त्यामध्यें दिसेल, विशेषतः त्याच्या अनुष्टुप् रचनेंतील शैथिल्यहि जाणवेल. त्याचीं सुभाषितें सुद्धां पूर्वीच्या कालिदासीय सुभाषितांपेक्षां उथळ व नीरस वाटतील. पण तो अज्ञात कवि मोठा चाणाक्ष होता यांत शंका नाहीं. त्यानें कथेचे अपूर्ण धागे नेमके पुरे केले आहेत, स्वभावपरिपोषाच्या सुसंगतेकडे लक्ष पुरविलें आहे, कालिदासीय कल्पना व भाषासरणी शक्य तितकी अनुवादित केली आहे व काव्याची सांधजोड एकंदरीनें फारच समर्पक केली आहे. कालिदासाचें अपूर्ण काव्य पूर्ण करावयास घेणें ही जोखीमच मुळीं इतकी जड आहे कीं आपले खांदे खंबीर असल्याची जाणीव असल्यावांचून कोणीहि शहाणा कवि ती आपल्या अंगावर घेण्यास

धजणारच नाहीं. आणि बाणपुत्र भूषणबाण यानें आपल्या पित्याची असामान्य कथा पुरी करून रसिकांचे जे धन्यवाद घेतले तेच धन्यवाद या अज्ञात कवीला कोणीहि देईल इतक्या मोलाची आणि तोलाची कामगिरी त्यानें बजाविली आहे.

**मूळ आणि मशागत.**

कालिदासाला आपल्या या अद्‌भुत कथानकाचें मूळ महाभारत व रामायण या आर्ष महाकाव्यांत सापडलें व त्या साध्यासुध्या मुळाला आपल्या प्रतिभेचें पाणी घालून त्यानें त्याची मशागत केली व त्याचा एक मनोहर वृक्ष बनविला. वरील दोन आर्ष काव्यें हीं आख्यानरत्नांची खाण आहे. त्यांतील अनगड रत्नें येऊन त्यांना कालिदासानें मनोहर पैलू पाडले व कांहीं प्राचीन पौराणिक कथांच्या सुवर्णसूत्रांनीं त्या रत्नांचा हार बनवून तो संस्कृतसरस्वतीच्या कंठांत घातला. महाभारताच्या अनुशासनपर्वांत (अध्याय १३०.३७) कार्तिकेयाच्या जन्माची एक कथा आहे. रामायणाच्या बालकाण्डांतहि ( सर्ग ३६-३७ ) ती आहे. पण या कथा त्रोटक, विसंगत व मोडक्यातोडक्या आहेत. पण याच कथांना कालिदासीय प्रतिभेचा स्पर्श झाल्याबरोबर त्यांतून सुसंगत व जिवंत महाकाव्य निर्माण झालें, त्यांत प्राण स्फुरूं लागला, नाट्य निर्माण झालें, व रसांचे ओघ त्यांच्या नाडींतून वाहूं लागले. तिसऱ्या सर्गांतील महनदहन, पार्वती-जटिल-संवाद इत्यादि प्रसंग इतके नाट्यपूर्ण आहेत कीं बाणासारख्या कवीला या प्रसंगावर 'पार्वतीपरिणय' नांवाचें एक नाटक लिहावें अशी स्फूर्ति झाली ! शिवपुराण, मत्स्यपुराण, सौरपुराण, ब्रह्मपुराण इत्यादि पुराणांच्या मूळ प्राचीन भागांमध्यें नवी भर घालणारांना कालिदासाच्या कल्पनेनें आपापलीं लिखाणें नटाविण्याचा मोह अनावर झाला. शिवाय आर्ष महाकाव्यांतून एकदां वर्णिलेल्या पराक्रमाचीं वर्णनें पुन्हा पुन्हा करण्यांत कालिदासाचा तत्कालीन हेतु त्याच्या वेळच्या राजांचे महापराक्रम ध्वनिरूपानें सूचित करण्याचा होता हें वेगळेंच. कालिदासाला विक्रमादित्यकालीन माना किंवा गुप्तकालीन समजा त्यानें मोठ्या खुबीनें या दैवी काव्याला आपल्या कालाच्या मनोहर रंगछटा नाजूक हातानें दिल्या आहे हें निश्चित.

**तीन ऐक्यें.**

'कुमारसंभवां'त क्रियैक्य ( Unity of action ) उत्तम साधलें आहे. त्या मानानें 'रघुवंशा'ची रचना विस्खळित दिसते. अनेक राजांचीं अनेक कथानकें वर्णन करणारा तो एक इतिहास आहे. कुमार-संभवाचें तसें नाहीं. ती एक स्वयंपूर्ण, विकासशील, निश्चित आदिअंताची एक ललितकथा आहे. कालैक्याकडे ( Unity of time ) मात्र तितकेंसें लक्ष त्यांत दिलेलें दिसत नाहीं. पार्वतीच्या जन्मापासून तों मदन-दहनापर्यंतचा काळ सुमारें अठरा वर्षांचा असावा. तेथून पुढें पार्वतीच्या तपाचाहि काळ बराच मोठा आहे ( तिनें लावलेल्या वृक्षांना फळें आलीं. सर्ग ५.६० ). पुढें कथानकाला द्रुतगति आहे. पुन्हा शंकर-पार्वती-विलासांत शंभर ऋतु लोटले. त्यानंतरचा काळ मात्र केवळ सहा दिवसाचा आहे. कारण सहा दिवसांचा कुमार तारकाला मारतो असें स्पष्ट विधान आहे ( सर्ग १५.३४ ). कुमारसंभवांतील स्थलें म्हणजे मुख्य हिमालयावरील प्रदेश, ब्रह्मलोक, स्वर्ग व तारकासुराशीं झालेल्या युद्धाची समरभूमि अशीं आहेत.

**रसपूर्ण अन्तरंग.**

पण कालिदासाच्या काव्यांच्या रसग्रहणासाठीं असलीं बाह्य अंगें चाचपीत बसण्याऐवजीं त्यांच्या गाभ्यांतच शिरलेलें अधिक बरें. आमच्या महाकाव्यलक्षणांतून बहिरंगापेक्षां अन्तरंगाकडेच जास्त लक्ष दिलेलें असतें. महाकाव्य 'रसभावनिरंतर' म्हणजे अनेक रसांनीं आणि भावांनीं परिप्लुत आणि रस, रीति, गुण इत्यादींनीं युक्त असावें असेंच म्हटलेलें असतें. 'कुमारसंभवा'च्या विषयस्वरूपावरून त्यांत वीररस प्रधान असला पाहिजे असेंच अनुमान होतें. व तें खरें आहे. सर्ग १४ ते १७ पर्यंत वीररस आहे. कार्तिकेयाचा रणोत्साह, त्याचें स्वर्गाकडे प्रयाण, स्वर्ग उत्सन्न झालेला पाहून त्याला आलेला कोप, त्याचा सैनापत्यावर अभिषेक, देव आणि असुर यांच्या सेनांच्या हालचाली, प्रत्यक्ष युद्ध, तारकाचीं व कार्तिकेयाचीं भाषणें व शेवटीं तारकवध हे सर्व प्रसंग वीररसात्मक आहेत. मधून मधून भयानक व बीभत्स त्याला उठाव देतात ( सर्ग १५ श्लोक १३–३२ अरिष्टसूचक अपशकुन व भयंकर रणकंदन. सर्ग १६ व सर्ग १६-२४ पहा). वीराच्या

खालोखाल शृंगाररस आहे. त्या दृष्टीनें मदनाचा शंकराच्या तपोवनांत प्रवेश, निखिल वनाची मदनविद्ध स्थिति, पार्वतीचें आगमन व शंकराला पडलेली तात्पुरती मोहिनी हे शृंगाररसाच्या दृष्टीनें बहारीचे प्रसंग आहेत. पुढें पार्वतीशंकरमीलन ( सर्ग ५ शेवट ), शंकर-पार्वती-विवाह व त्यांचे विलास ( सर्ग ७ व ८ ) हे शृंगाररसपूर्ण प्रसंग होत. हिमालयाच्या वर्णनांत अद्भुत, ब्रह्मदेवाच्या स्तुतींत भक्ति, कार्तिकेयाच्या बाल्यवर्णनांत वत्सल, रतीच्या विलापांत व देवांच्या दुर्दशावर्णनांत करुण असे इतर रस कांहीं छटारूपांनीं तर कांहीं समग्र प्रकट झालेले आढळतात. जटिलाच्या शिवनिंदेत तिखट उपाहासाच्या रूपानें हास्यरसाचीहि छटा आढळते. शंकराच्या तपोवनाचें व त्याच्या समाधिस्थितीचें वर्णन शांतरसपर आहे ( सर्ग ३.४४-५१ ). याप्रमाणें वीर, शृंगार व करुण हे तीन मुख्य रस असून बाकीचे सर्व गौणपणें या काव्याची शोभा वाढवीत आहेत. याचा अर्थ कुमारसंभवाच्या वाचकाच्या हृदयांतील इतक्या तारा छेडल्या जाऊन त्याच्या गोड स्वरसंमेलनांत तो रंगून जातो असा आहे.

**वर अलंकारांचा जडाव.**

या भावनांच्या ओघांत किती तरी रसानुकूल व समर्पक उपमा कमलासारख्या सर्वत्र विकसतांना दिसतात. येथें उपमा याचा अर्थ मनोहर साम्य असा घेऊन त्यांत उत्प्रेक्षा, दृष्टान्त, रूपक, निदर्शना इत्यादि साम्याधिष्ठित अलंकारांचा समावेश करावा. म्हणजे कालिदासाच्या साम्यान्वेषक कल्पनेची कल्पना वाचकांना येईल. शंकराच्या तपोवनांत वसंतऋतु सुरू होऊन मदनाचा संचार चराचर सृष्टींत होऊं लागला या शृंगारपर भूमिकेवरून केलेली पुढील उत्प्रेक्षा पहा. 'कोंवळ्या पल्लवांचीं पिसें ज्याला जोडलीं आहेत असा आम्रमंजरीचा बाण मदनासाठीं त्याचा मित्र जो वसंत त्यानें तयार केल्यावर शेवटीं त्या बाणावर त्यानें काळ्या रंगानें 'मदन' अशीं अक्षरें कोरलीं. आणि तीं अक्षरें कोणतीं ? तर आम्रमंजरीवर बसलेले भ्रमर ! ! ( सर्ग ३.२७). अत्यंत पवित्र देवकार्यासाठीं भगवान् शंकर पार्वतीचा परिग्रह करून पुत्रोत्पत्ति करणार होते या उदात्त संदर्भात कालिदासानें दिलेली वैदिक उपमा पहा : 'अग्नि उत्पन्न करण्यासाठीं यजमान जसा अरणि घेतो त्याप्रमाणें कार्तिकेयाच्या उत्पत्तीसाठीं मी.

पार्वतीपरिग्रह करीत आहें' (सर्ग ६.२८) विवाहहोमाग्नीभोंवतीं प्रदक्षिणा घालणारें तें शंकर-पार्वतीचें जोडपें कसें दिसलें ? तर मेरुपर्वताभोंवतीं फिरणाऱ्या दिवस व रात्र या पतिपत्नीसारखें ! (सर्ग ७.७९). केवढी विशाल व उदात्त कल्पनेची भरारी ही ! पावसाळ्यात पार्वतीची तपश्चर्या चालू होती. मुसळधार वृष्टि चालू असतां मध्येंच विजेचा चमचमाट होई. त्यावरील उत्प्रेक्षा पहा. पार्वतीच्या महातपाची साक्षीदार रात्र जणों काय तिजकडे नेत्र उघडून मधून मधून पहात होती ( ५.२५ ). असो. अशा कितीतरी उत्प्रेक्षा, दृष्टान्त, रूपकें दाखवितां येतील. कालिदासानें 'कुमारा'-नंतर 'रघु' लिहिला का 'रघु'नंतर कुमार लिहिला असा एक वाद पंडितां-मध्यें आहे. हा वाद जुळ्या भावांपैकीं पहिला कोण आणि दुसरा कोण यासारखा आहे. वास्तविक कल्पनाविलास, भाषाशैली, रचनाचातुर्य, अर्थ-गांभीर्य या बाबतींत 'रघु-कुमार' ह्यांचें इतकें सादृश्य आहे कीं त्यांचें पौर्वापर्य ठरविणें कठीण आहे. तथापि रघु हा ज्येष्ठ असावा असें वाटतें. असो. याचें अधिक विवेचन पुढें रघुवंश-रसग्रहणाचे वेळीं करूं.

'कुमारसंभव' हें पहिलेंच वैदिक महाकाव्य असून तें इतर महा-काव्यांच्या रचनेला आधारभूत आहे. यांत कार्तिकेय हा पुराणप्रसिद्ध धीरोदात्त नायक आहे. नगरें, ऋतु, पर्वत, नद्या यांचीं वर्णनें आहेत. चंद्रसूर्यांचे अस्तोदय आहेत. कुमारोत्पत्तीचीं वर्णनें आहेत, विवाह आहेत, विरह आहेत, युद्धें आहेत, श्राव्यवृत्तांचे सर्ग आहेत, सर्व कांहीं आहे. तात्पर्य, पंचमहाकाव्यांपैकीं पहिलें महाकाव्य म्हणवून घेण्याला जी गुणवत्ता लागते ती 'कुमारसंभवां'त असल्यानें तें संस्कृत काव्याचा प्राण कसा ठरतें तें आपण पाहिलें. आतां पुढील महाकाव्यांच्या अवलोकनाला लागूं या.

## कुमार-संभव–सुभाषितें

(१) **एको हि दोषो गुणसंनिपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः।१.३**

( केवळ बर्फामुळें हिमालयाच्या विविध सौंदर्याची हानि झाली नाहीं.) चंद्राच्या ( असंख्य ) किरणांमध्यें जसा त्यावरील एक डाग तसा

( माणसाच्या ) अनेक गुणांच्या समुदायांत ( त्याचा ) एखादा दोष सहज झांकून जातो.

**(२) क्षुद्रेऽपि नूनं शरणं प्रपन्ने ममत्वमुच्चैः शिरसां सतीव । १.१२**

( हिमालयानें शरणागत अंधाराला आपल्या गुहांमध्यें आश्रय दिला.) रक्षण मागावयास आलेल्या मोठ्या ( सज्जन ) माणसांवर जें ममत्व तेंच ममत्व एखाद्या रक्षणार्थी क्षुद्रावरहि थोर मनाचे महात्मे दाखवतात.

**(३) अभ्यर्थनाभङ्गभयेन साधुर्माध्यस्थ्यमिष्टेऽप्यवलम्बतेऽर्थे। १.५२**

( शंकरानें आपण होऊन पार्वतीला मागणी घातली नव्हती. म्हणून हिमालयानेंहि आपली कन्या स्वीकारण्याची विनंति शंकराला केली नाहीं.) आपण दुसऱ्यास केलेली विनंति कदाचित् त्याजकडून झिडकारिली जाईल या भीतीनें मानी माणूस इष्ट वस्तूबद्दलहि उदासीनच राहतो.

**(४) विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः।१.५९**

( आपल्या तपाला प्रतिकूल असलेली तरुण पार्वतीची सेवा शंकरानें मान्य केली. ) मन चळण्यासारखी परिस्थिति असूनहि ज्यांचें मन चळत नाहीं तेच खरे निग्रही ( संयमी ) समजावयाचे.

**(५) शाम्येत्प्रत्यपकारेण नोपकारेण दुर्जनः । २.४०**

दुर्जनावर उपकार केल्यानें तो शांत होणें नाहीं. त्याला उलट टोलाच लगावला पाहिजे.

**(६) विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम् । २.५५**

( ब्रह्मा देवांना म्हणतो—' माझ्याच वरानें उत्कर्ष पावलेल्या तारकासुराला मी कसा मारूं ? ) आपणच ( पाणी घालून ) वाढवलेलें झाड तें जरी विषारी असलें तरी आपणच तोडणें अयोग्य आहे.

**(७) प्रयोजनापेक्षितया प्रभूणां प्रायश्चलं गौरवमाश्रितेषु । ३.१**

( इतर देवांना वगळून इंद्राची दृष्टि आज कामदेवाकडेच विशेष वळली.) आपल्या सेवकांकडून ज्या मानानें कमीअधिक काम करून घ्यावयाचें असेल त्या मानानेंच मालकाची त्यांजबद्दलची गौरवबुद्धि कमीअधिक होत असते.

**(८) अप्यप्रसिद्धं यशसे हि पुंसामनन्यसाधारणमेव कर्म । ३.१९**

एखादें काम अगदीं क्षुल्लक ( अप्रसिद्ध ) कां असेना पण एका विशिष्ट

माणसावांचून दुसऱ्या कोणाकडूनहि तें होण्यासारखें नसेल तर तें त्या माणसाच्या कीर्तीला कारणीभूत होतें. ( शंकरावर अस्त्र चालायचें तें फक्त मदनाचेंच. म्हणून मदनाचें काम अनन्यसाधारण तर होतेंच पण तें प्रसिद्धहि होतें. म्हणून मदन तर विशेषच स्पृहणीय असा इंद्राचा अभिप्राय. )

**(९) प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृजःप्रवृत्तिः २८**

( कोठें एक गुण असला कीं तेथें दुसरें कांहीं उणें असावयाचेंच. यावरून वाटतें कीं- ) गुणाला सर्वांगीण परिपूर्णता आणण्याला विधात्याचें मन बहुधा प्रतिकूलच दिसतें.

**(१०)आत्मेश्वराणां न हि जातु विघ्नाःसमाधिभेदप्रभवो भवन्ति।३.४०**

( समाधिस्थ शंकरावर अप्सरांच्या मोहक संगीताचा कांहींच परिणाम झाला नाहीं. ) मनोनिग्रही लोकांची एकाग्रता मध्यें आलेल्या अडथळ्यानें मुळींच भंगत नाहीं.

**(११)न हीश्वरव्याहृतयःकदाचित्पुष्णन्ति लोके विपरीतमर्थम्।३.६३**

( 'तुला एकनिष्ठ पति लाभो' असा आशीर्वाद शिवानें पार्वतीला दिला. ) थोरांच्या तोंडून निघालेले उद्गार कधींहि खोटे व्हायचे नाहींत.

**(१२) स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते । ४ २६**

( वसंत आलेला पाहून मदनाच्या मृत्यूनें विव्हळ झालेली रति अधिकच रडूं लागली. ) जिव्हाळ्याचा माणूस पाहिला कीं दुःखी माणसाचें दुःख जणों काय बांध फोडून सैराट वाहूं लागतें.

**(१३) दयितास्वनवस्थितं नृणां न खलु प्रेम चलं सुहृज्जने। ४.२८**

( रति मदनाबद्दल शोक करतांना म्हणते, 'माझ्यावर तुम्ही रुसलां पण तुमचा मित्र वसंत आला आहे– त्याच्याबरोबर तरी बोला ना. ) आपल्या प्रिय बायकोवरहि माणसाचें प्रेम अस्थिर असतें पण तेंच आपल्या मित्रावरचें त्याचें प्रेम मात्र कधींहि ढळत नाहीं.

**(१४) प्रमदाः पतिवर्त्मगा इति प्रतिपन्नं हि विचेतनैरपि । ४.३३**

( चंद्राबरोबर चंद्रिका व मेघाबरोबरच वीज नाहींशी होते. यावरून–) 'पतीच्या मागोमाग पत्नीनें जावयाचें' ही गोष्ट अचेतनांनीं सुद्धां पत्करली आहे.

**(१५) अशनेरमृतस्य चोभयोर्वशिनश्चाम्बुधराश्च योनयः । ४.४३**

( मदनाला शाप देणारा क्रुद्ध ब्रह्मा धर्माच्या मध्यस्थीमुळें शांत झाला व त्यानें शापाला मर्यादा घातली. ) संयमी माणसें व मेघ रागावले कीं आगीचा व लगेच प्रसन्न झाले तर अमृताचाहि वर्षाव करूं शकतात.

**(१६) रविपीतजला तपात्यये पुनरोघेन हि युज्यते नदी । ४.४४**

( 'हे रति, तुझा व तुझ्या पतीचा कालान्तरानें संयोग होईल '— कारण ) उन्हाळ्यांत आटलेल्या नदीचा पावसाळ्यांत पुनरपि प्रवाहाशीं संयोग होतोच.

**(१७) प्रियेषु सौभाग्यफला हि चारुता । ५.१**

( पार्वतीनें मदनदहनानंतर आपल्या रूपाची अवहेलनाच केली. ) वल्लभाचे मनांत आपल्याविषयीं आवड उत्पन्न करणें हेंच स्त्रीच्या सौंदर्याचें खरें कार्य आहे.

**(१८) क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् । ५.५**

( शंकराची सेवा करण्याचा पार्वतीचा निश्चय तिच्या आईला बदलवितां येईना. ) इच्छिलेल्या वस्तूबद्दल झालेला मनाचा निर्धार आणि उतारावर वाहणारें पाणी कोणाला फिरवितां येईल बरें ?

**(१९) न धर्मवृद्धेषु वयः समीक्ष्यते । ५.१६**

( म्हातारे तापसहि उग्र तप करणाऱ्या त्या तरुण पार्वतीला पाहण्यासाठीं आदरानें आले. ) जो धर्माचरणांत श्रेष्ठ तो धर्मवृद्ध. मग त्याचें वय कांहीं कां असेना.

**(२०) शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । ५.३३**

( जटिल पार्वतीला विचारतो– ' हें तप करतांना तूं शरीरप्रकृतीला जपत आहेस ना ? कारण– ) धर्म-संपादनाचीं जीं ( धन, वाणी, बुद्धि इत्यादि ) साधनें आहेत त्यांत शरीर हेंच मुख्य.

**(२१) यदुच्यते पार्वति पापवृत्तये न रूपमित्यव्यभिचारि तद्वचः । ५.३६**

( जटिल पार्वतीला म्हणतो, हे पार्वति,– ) ' सुंदर व्यक्ति सद्गुणी आणि सुशील असतात ' असा जो समज आहे तो खरा आहे.

**(२२) यतः सतां संनतगात्रि संगतं मनीषिभिः साप्तपदीनमुच्यते । ५.३९**

( जटिल पार्वतीस म्हणतो, ' हे सुंदरी, केवळ थोडें बोलणें (सात शब्द) झाल्यानेंहि सज्जनांची मैत्री जमते.

**(२३) कः करं प्रसारयेत्पन्नगरत्नसूचये । ५.४३**

( पार्वतीवर हात टाकण्याची भलत्याची प्राज्ञा नाहीं. ) सापाच्या फणेवरील रत्न ओढण्यास कोणाचा हात वाहील ?

**(२४) न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत् । ५.४५**

( जटिल पार्वतीला म्हणतो– ' तूं पति मिळविण्यासाठीं तप करीत असशील तर तें तूं एकदम थांबव. कारण ' ) रत्नाचा शोध करीत ( रत्नपारखी ) येतात. रत्न त्यांना शोधण्यास कधींच जागचें उठत नाहीं.

**(२५) मनोरथानामगतिर्न विद्यते । ५.६४**

( पार्वतीची सखी जटिलाला सांगते– ' पार्वतीनें केवळ तपाच्या जोरावर शंकराला मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरली आहे. ही गोष्ट दुर्लभ आहे खरी. पण आशा सुटत नाहीं ना ? ) मनोरथ ( शक्याशक्यतेचा विचारहि फारसा न करतां ) कोणत्या ( उच्च ) ध्येयामागें लागतील तें सांगतां यावयाचें नाहीं.

**(२६) अलोकसामान्यमचिन्त्यहेतुकं द्विषन्ति मन्दाश्चरितं महत्मनाम् । ५.७१**

( पार्वती शिवाचे दोष दाखविणाऱ्या जटिलाला रागानें म्हणते– ) लोकविलक्षण आणि ( सामान्य माणसांना बाहेरून ) ज्यांतील कार्यकारणभाव आकलंतां यावयाचा नाहीं अशा महात्म्यांच्या चरित्राला मतिमंद दूषणें लावतात.

**(२७) न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते । ५.८२**

पार्वती शिवनिंदा करणाऱ्या जटिलाला म्हणते– 'शिव कसाहि असो मीं त्याला एकदां मनानें वरिलें आहे. ) आपल्या मनाला पटेल आणि मानेल तसें वागणारा (निश्चयी) माणूस जननिंदेची मुळींच पर्वा करीत नाहीं.

**(२८) न केवलं यो महतोऽपभाषते शृणोति तस्मादपि यः स पापभाक् । ५.८३**

महात्म्यांची टवाळी करणारालाच केवळ पाप लागतें असें नाहीं. त्या निंदकाची ती टवाळी ऐकणारा सुद्धां त्या पातकाचा धनी होतो.

**(२९) क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते । ५.८६**

( शिव प्रसन्न झाल्यानें पार्वतीचे सर्व तपःक्लेश क्षणांत निमाले. ) कार्यसिद्धीसाठीं पडलेले क्लेश, कार्य सिद्ध झाल्यानें, कार्यकर्त्याला नवीन जोम आणतात.

**(३०) स्त्रीपुमानित्यनास्थैषा वृत्तं हि महितं सताम् । ६.१२**

( शंकरानें अरुन्धती व सप्तर्षी यांचा आदर करतांना ही स्त्री, हे पुरुष असा भेद केला नाहीं. ) सज्जनांना ( माणसांच्या ) शीलाचीच मातब्बरी वाटते– मग ती शीलवान् व्यक्ति पुरुष आहे का स्त्री याला ते किंमत देत नाहींत.

**(३१) क्रियाणां खलु धर्म्याणां सत्पत्न्यो मूलकारणम् । ६.१३**

( अरुन्धतीसारख्या आदर्श धर्मपत्नीच्या उदात्त दर्शनानें नैष्ठिक ब्रह्मचारी शंकराला दारापरिग्रह म्हणजे विवाह या वस्तूबद्दल आदर वाटूं लागला. ) होमहवनादि ( गृहस्थानें करावयाच्या ) धार्मिक विधींचें सत्पत्नी हें मूळ कारण आहे. ( त्यांच्या सहकार्याविंचून ते विधि यथासांग होणार नाहींत. )

**(३२) प्रायः प्रत्ययमाधत्ते स्वगुणेषूत्तमादरः । ६.२०**

( शंकराच्या स्मरणमात्रेंकरून त्याच्याकडे आलेले सप्तर्षी त्याला म्हणाले, 'तूं या बोलावण्यानें आम्हांस जें महत्त्व दिलेंस त्यायोगें आम्ही कोणी आहों अशी जाणीव आम्हांला झाली. ) थोर लोकांनीं आपल्या गुणांचा आदर केला तरच सामान्य माणसांना आपल्या गुणावत्तेबद्दल विश्वास वाटतो.

**(३३) विक्रियायै न कल्पन्ते संबन्धाः सदनुष्ठिताः । ६.२९**

( शंकर सप्तर्षींना म्हणतो, 'तुम्हींच हिमालयाकडे जाऊन मजसाठीं पार्वतीला मागणी घाला. ) सज्जन आणि संमावित पुरुषांनीं घडवून आणलेले विवाहादि संबंध पुढें कधींच बिघडत नाहींत. थोरांच्या मध्यस्थीनें घडून आलेले संबंध कायमचे व पक्के होतात.

**(३४) विनियोगप्रसादा हि किंकराः प्रभविष्णुषु । ६.६२**

( सप्तर्षी आपल्याकडे आलेले पाहून हिमालय त्यांना म्हणाला, 'आपल्या दर्शनानें मी पवित्र झालों. पण आपणें मला कांहीं आज्ञा करा.' ) कारण दासांनां कांहीं काम करावयास सांगणें हाच प्रभूंचा त्यांच्यावरील कृपाप्रसाद होय.

**(३५) अशोच्या हि पितुः कन्या सद्भर्तृप्रतिपादिता । ६.७९**

( सप्तर्षी हिमालयाला म्हणाले, 'तूं पार्वती शंकरासच देणें योग्य.' ) कारण सुस्थलीं पडलेल्या कन्येबद्दल पित्याला ( पुढें तिचें कल्याण होईल कीं नाहीं याविषयीं ) सचिंत असण्याचें कारण उरत नाहीं.

**(३६) प्रायेण गृहिणीनेत्राः कन्यार्थेषु कुटुम्बिनः । ६.८५**

( हिमालयानें पार्वतीच्या लग्नासंबंधीं मेनेचा अभिप्राय घेतला. ) मुलीच्या ( विवाहादि बाबतींत ) गृहस्थ बहुधा आपल्या गृहिणीच्या मतालाच प्राधान्य देतात.

**(३७) भवन्त्यव्यभिचारिण्यो भर्तुरिष्टे पतिव्रताः । ६·८६**

( मेनेनें पतीला संमति दिली. ) पतीला इष्ट असलेल्या गोष्टींत पतिव्रतांची प्रतिकूलता कधींहि नसते.

**(३८) स्त्रीणां प्रियालोकफलो हि वेषः । ७.२२**

( विवाहाची उंची वेषभूषा करून पार्वती शंकराच्या आगमनाची वाट पहात राहिली. ) प्रियेनें आकर्षक वेषभूषा कशासाठीं करावयाची ? प्रियानें ती पहावी म्हणूनच.

**(३९) कालप्रयुक्ता खलु कार्यविद्भिर्विज्ञापना भर्तृषु सिद्धिमेति । ९३**

( शिवपार्वतीविवाह आटोपल्याबरोबर देवांनीं 'मदनाची सेवा आतां आपण स्वीकारा' अशी विनंति शिवाला केली. व त्यानेंहि ती मानली. ) खऱ्या कार्यज्ञ माणसानें योग्य काळीं प्रभूला केलेली विज्ञापनाच सिद्धीस जाते ( मालकाला विज्ञापना करतांना काळवेळ पहावी लागते. )

**(४०) धिङ्महत्त्वमसतां हतान्तरम् । ८.५७**

( शुद्ध आणि अशुद्ध, स्थिर आणि चल, वक्र आणि सरळ सर्वच वस्तू अंधकारांत कांहीं काळ सारख्या ( समान ) दिसूं लागल्या. ) धिक्कार असो खलांना आलेल्या ( तापुरत्या ) महत्त्वाला ! कीं जें बऱ्यावाईटांतलें अंतर लक्षांत न घेतां सर्वच वस्तू एका मापानें मोजतें !

**(४१) विक्रिया न खलु कालदोषजा निर्मलप्रकृतिषु स्थिरोदया । ६५**

( शिव चंद्रोदयाचें वर्णन करीत आहेत. प्रथम तांबूस दिसणारा चंद्र आतां ( वर आल्यावर ) स्वच्छ धवल दिसूं लागला. ) स्वभावतः शुद्ध असलेल्यांच्या ( सज्जनांच्या ) मध्यें केवळ प्रसंगवशात् झालेला ( अयोग्य ) बदल चिरकाल टिकणारा नसतो. ते लगेच आपल्या मूळ प्रकृतीला येतात.

**(४२) स्तोत्रं कस्य न तुष्टये । १०.९**

( अग्नि देवांस सांगतो आहे, ' मीं स्तुति केल्यावर शिव प्रसन्न झाले.' ) स्तुति कोणाला संतोषदायक नाहीं ?

**(४३) विपत्तिरपि संश्लाघ्योपकारव्रतिनोऽनल । १०.२३**

( देव अग्नीला म्हणाले– हे अग्ने !– ) परोपकाराचें व्रत घेतलेल्या पुरुषाला त्यांत आलेलीं संकटेंहि त्याला भूषणास्पदच होतात.

**(४४) कार्येष्ववश्यकार्येषु सिद्धये क्षिप्रकारिता । १०.२५**

( ' अग्ने, तूं शक्य तितक्या लौकर गंगेकडे जा. ) तातडीनें करावयाच्या जरूरीच्या कामांत जर यश हवें असेल तर आळसांत वेळ दवडून चालावयाचें नाहीं.

**(४५) रत्नाकरे युज्यत एव रत्नम् । ११.१**

( पार्वतीच कुमारासारख्या पुत्ररत्नाची खाण होण्यास योग्य. ) सागरकुक्षींतूनच रत्नाचा जन्म व्हावा हें उचित.

**(४६) मुदे न हृद्या किमु बालकेलिः । ११.४०**

( बाल कार्तिकेयानें आपल्या बाललीलांनीं पार्वती-परमेश्वरांचीं हृदयें आकर्षिलीं. ) रमणीय बाललीला कोणास आल्हाददायी होणार नाहीं ?

**(४७) भवन्ति वाचोऽवसरे प्रयुक्ता ध्रुवं फलाविष्टमहोदयाय। १२.४३**

( शिवाच्या या बोलण्यानंतर आतां आपल्या हेतूबद्दल गोष्ट काढण्याची हीच वेळ आहे असें इंद्रानें पाहिलें व तो बोलला ) योग्य प्रसंग पाहून केलेलें बोलणें निश्चितपणें फलप्रद होतें.

**(४८) सुतविक्रमे सति न नन्दति का खलु वीरसूः । १२.५९**

( कार्तिकेयाचा रणोत्साह पाहून पार्वतीला हर्ष झाला. ) आपल्या

पुत्राच्या पराक्रमदर्शनाची वेळ आली असतां कोणत्या वीरमातेला आनंदाचें भरतें येणार नाहीं ?

**(४९) महतां वृथा भवेद्‌सद्‌ग्रहान्धस्य हितोपदेशनम् । १५.२६**

( आत्मघातकी युद्धापासून तारकानें परावृत्त व्हावें म्हणून देवांनीं प्रयत्न केला. पण तो हट्टी राक्षस पुढेंच निघाला. ) हट्टानें किंवा दुराग्रहानें अंध झालेल्या इसमाला महात्म्यांनीं केलेला हितोपदेश फुकट जातो.

**(५०) न कस्य वीर्याय वरस्य सङ्गतिः । १५.'५१**

( कार्तिकेयाला पाहिल्याबरोबर देववीरांना रणोत्साह चढला. ) श्रेष्ठाच्या संगतींत कोणाचा उत्साह वाढत नाहीं ?

# २

# कालिदासाचा ' रघुवंश '

## रघुवंश[1]--कथासार

### आश्रमाच्या वाटेवर.

अनेक रम्य वनप्रदेश एकामागून एक ओलांडीत एक भव्य रथ वसिष्ठमुनींच्या आश्रमाच्या रोखानें चालला होता. रथाबरोबर लवाजमा होता. पण तो मोजकाच. रथांत बसलेल्या व्यक्तीकडे पाहिल्या-बरोबरच हा कोणी महाबलाढ्य क्षत्रिय आहे हें निराळें सांगण्याची जरूरच नव्हती. त्याची ती रुंद छाती, भरदार खांदे, पुष्ट बाहू, शाल वृक्षाप्रमाणें उंचीपुरी मूर्ति व तिच्यावर चमकणारें प्रज्ञेचें ओज बघितलें कीं हा नुसता एखादा क्षत्रियकुलोत्पन्न तेजस्वी सम्राटच नसून खुद्द क्षात्रतेजच आपल्यास योग्य असें मानवशरीर पाहून तेथें अवतरलें आहे असें वाटे. त्याच्या शेजारीं एक लावण्यवती क्षत्रिया बसलेली होती. दोघांनींहि अगदीं साधे वेष धारण केले होते. त्यामुळें चित्रा (नक्षत्र) आणि चंद्रमा यांच्या जोडी-प्रमाणें तीं दिसत होतीं.

संध्याकाळ पडत होती. मार्गावरील तळ्यांतील कमळांचा सुगंध चोहींकडे दरवळून राहिला होता. मधूनच सारस पक्ष्यांची एखादी रांगच्या रांग आकाशांतून भरारत जाई. तिकडे हीं दोघें कौतुकानें पाहत. त्यांना वाटे ही बिनखांबांची अंतराळांतली तोरणमाळच असावी ! ताज्या

---

१. सूर्यवंशांत उत्पन्न झालेला रघुराजाचा पिता दिलीप व रघुराजाचे अज, दशरथ, रामचंद्र, कुश, अतिथि, निषध इत्यादि वंशज यांचें म्हणजे रघूच्या वंशाचें वर्णन ज्यांत आहे तें काव्य. काल खिस्तपूर्व पहिलें शतक किंवा चवथ्या शतकाचा शेवट. सर्ग १९ (अपूर्ण). श्लोकसंख्या १५६९.

लोण्याचा नजराणा बरोबर घेऊन सरकारस्वारीकडे अदबीनें येणाऱ्या वृद्ध गवळ्यांना हीं दोघें कांहीं रानझाडांचीं नांवें कुतूहलानें विचारीत. मध्येंच महाराजांनीं याज्ञिक ब्राह्मणांना दान दिलेला एखादा यज्ञस्तंभ असलेला गांव लागे. तेथील ब्राह्मण त्यांची पूजा करून त्यांना आशीर्वाद देत. याप्रमाणें मार्गावरील वस्तु व वनश्री पाहत चाललेल्या त्या दोघांना आपण किती अंतर तोडलें हें ध्यानींहि आलें नाहीं. वसिष्ठाश्रमाच्या संनिध रथ येऊन थडकलासुद्धां.

**आश्रमांतील सायंकाळ.**

वनांतून सामिधा, दर्भ व फळें आणावयास गेलेले तापस आतां चोहींकडून आश्रमाकडे परत येत होते. मुनिकन्यांनीं आश्रमवृक्षांच्या आळ्यांत घातलेलें पाणी पक्षी पीत होते. नीवार धान्याचे घास खाण्यासाठीं हरणांचीं पाडसें ऋषिपत्न्यांभोंवतीं मुलांसारखीं जमलीं होतीं. दिवसा अंगणांत वाळत घातलेल्या धान्याच्या आतां राशी करण्यांत आल्या होत्या व त्या मोकळ्या झालेल्या जागेवर हरीण स्वस्थ रवंथ करीत बसले होते. सायंहोमासाठीं अग्नि प्रदीप्त केले जात होते व हव्यगंधानें वासित झालेला होमधूम सबंध प्रदेश पावन करीत होता. आश्रमाच्या द्वारांत रथ येतांच राजानें सारथ्यास सांगितलें, 'जा, दमलेल्या घोड्यांना विश्रान्ति दे.' आणि स्वतां खालीं उतरून आपल्या पत्नीस रथांतून त्यानें उतरून घेतलें. हे श्रेष्ठ अतिथि सायंकाळीं अनपेक्षितपणें आश्रमास आलेले पाहतांच त्यांचें स्वागत करण्यासाठीं आश्रमांतील मुनी मोठ्या लगबगीनें, आनंदानें आणि आदरानें पुढें झाले. आणि कां नाहीं त्यांना आनंद होणार !

**हा अतिथि कोण ?**

आश्रमास अनपेक्षितपणें भेट देणारा हा अतिथि वैवस्वत मनूच्या कुळांत उत्पन्न झालेला महापराक्रमी आणि आदर्श राजा दिलीप होता. त्याचे ठिकाणीं राजकारणी मुत्सद्याचें चातुर्य, लढवय्याचें शौर्य व साधूचें शुचित्व एकवटलें होतें. अपराध्यास योग्य शासन करणाऱ्या त्या दिलीपाच्या राज्यांत चोरीचा संबंध लोकांच्या मालमत्तेशीं कधींच येत नव्हता. तो एक आपला ऐकण्याचाच विषय असे. तो प्रजेचा पित्याप्रमाणें सांभाळ करी. फार काय, त्यांचे सर्वश्रेष्ठ गुण पंचमहाभूतांप्रमाणें परोपकारासाठींच

होते असें वाटे. चार वर्ण आणि चार आश्रम यांचें योग्य प्रकारें प्रतिपालन करणारा हा राजर्षि 'सुदक्षिणा' नांवाच्या आपल्या धर्मपत्नीला सवें घेऊन आलेला पाहून कोणा आश्रमवासी तपस्विजनांना धन्यता वाटणार नाहीं ? मुनिजनांनीं मोठ्या प्रेमादरानें केलेल्या आतिथ्याचा स्वीकार पतिपत्नींनीं केला. त्यामुळें त्यांचे वाटचालीचे श्रम नाहींसे झाले. वसिष्ठमुनींचा सायंविधीहि तोंपर्यंत संपला होता. राजाराणींनीं वसिष्ठ-अरुंधतीचें दर्शन घेतलें व त्यांचें आदरानें पादवंदन केलें.

**मनांतील शल्य.**

वसिष्ठमुनींनीं दिलीप राजाला राज्यांतील क्षेमवार्ता विचारली. त्यावर हात जोडून तो म्हणाला, " महाराज, दैवी व मानुषी आपत्तींचें निवारण करणारे आपल्यासारखे कुलगुरु मला भाग्यानें लाभले असल्यानें माझा सर्व राज्यकारभार सुरळीत चालला आहे. योग्य वेळीं पर्जन्य पडतो. प्रजा सुखी व दीर्घायु आहे. कोणतीहि उणीव म्हणून नाहीं. पण– पण एक शल्य माझ्या मनांत खुपत आहे. ( आपल्या सुदक्षिणा राणीकडे बोट करून तो म्हणाला– ) या आपल्या सूनबाईंना अद्यापि पुत्ररत्न झालें नाहीं. त्यामुळें, महर्षे, अनेक रत्नांना प्रसविणाऱ्या माझ्या समुद्रवलयांकित पृथ्वीपासूनसुद्धा मला व्हावें तसें सुख होत नाहीं. माझ्या पश्चात् पिण्डप्रदानाचा लोप होणार या दुःखानें ग्रस्त झालेले व अश्रु ढाळणारे माझे पितर श्राद्धाचे प्रसंगीं पोटभर जेवतहि नाहींत. सत्पुत्राच्या लाभानें ऐहिक व पारलौकिक कल्याण होतें. पण असा पुत्र मला नाहीं हें पाहून– आपणच लावलेल्या वंध्य आम्रवृक्षाला पाहून जसें आपणांस दुःख होतें तसें– दुःख आपणांस होत नाहीं का ? महर्षे, इक्ष्वाकु वंशांतल्या मजसारख्यांना दुर्लभ असलेली सिद्धि आपल्या हातीं आहे. या निपुत्रिकपणांतून मी सुटेन असा कांहीं उपाय सांगा. केवळ यासाठींच राज्यधुरा प्रधानांवर सोंपवून मीं आपल्याकडे धांव घेतली आहे. "

**गाईचा शाप.**

याप्रमाणें राजानें विनंति केल्यावर वसिष्ठांनीं समाधि लावली व अन्तर्ज्ञानानें राजाच्या निपुत्रिकपणाचें कारण शोधून ते त्यास म्हणाले– " राजा, तूं एकदां देवेन्द्राचें दर्शन घेऊन परत पृथ्वीवर येत होतास. त्या वेळीं

कल्पवृक्षाच्या छायेला देवांची कामधेनु 'सुरभि' बसली होती. तिला तूं वंदन करावयास पाहिजे होतेंस. पण घरीं आपली पत्नी सुदक्षिणा ऋतु-स्नात आहे हें जाणून तूं या धेनूला प्रणाम न करतां घाईनें निघून गेलास. त्यामुळें धेनूनें तुला शाप दिला कीं, 'राजा, संततीच्या लोभानें ज्या अर्थीं तूं माझा अवमान केलास त्या अर्थीं माझ्या संततीची सेवा केल्यावांचून तुला संतति होणार नाहीं.' राजा, तो शाप तुला ऐकूं आला नाहीं. थोरांचा अनादर आपल्या कल्याणाच्या आड कसा येतो तें पाहा. असो. ती धेनु हल्लीं पाताळांत आहे. पण तिची मुलगी 'नंदिनी' माझ्याच आश्रमांत असते. तिची आपल्या पत्नीसमवेत तूं आराधना कर. ती प्रसन्न झाली तर तुझे मनोरथ खात्रीनें पूर्ण करील." असें वसिष्ठ बोलत आहेत तों ती 'नंदिनी' वनांतून आश्रमांत परत आली. मस्तकावर शुभ्र केसांची अर्धचंद्राकृति, तांबूस रंग, वासराला पाहिल्यानें दुग्धधारा स्रवणारी मोठी कांस असें तिचें पवित्र रूप पाहून ती आपली मूर्तिमान् कार्यसिद्धि आहे असें दिलीपास वाटलें. तोंच वसिष्ठहि त्याला म्हणाले, 'पाहा, हिचें नांव घेतांच ही येथें आली. हा तुला मोठा शुभशकुन झाला. तर लाग उद्यां-पासून हिच्या आराधनेला. तुम्ही दोघें व्रतस्थ राहा. हिची पूजा-अर्चा करा. तिला तूं रानांत नेऊन आणीत जा. ती बसली म्हणजे आपण बसावें. ती चालूं लागली कीं चालावें. ती पाणी प्याली म्हणजे आपण पाणी प्यावें. तात्पर्य, मोठ्या एकनिष्ठेनें तिचें रक्षण व सेवा करा. जा. तुम्हांला सिद्धि मिळो !"

## गोसेवक सम्राट्.

सम्राट् आणि सम्राज्ञी यांनीं सर्व राजोपचार ताबडतोब दूर केले. निवासाला पर्णकुटी, भोजनाला रानफळें आणि अंथरायला दर्भासनें अशी त्यांची व्रतोचित राहणी होती. त्यांचे नेहमींचे सेवक आतां त्यांच्या सेवेला नव्हते. तीं दोघेंहि आतां 'नंदिनी'चीच सेवा करीत होती. राजानें राणी-सहवर्तमान धेनूची सकाळीं पूजा करावी व तिला वनसंचारार्थ सोडावें. राणीनें कांहीं अंतरापावेतों धेनूबरोबर जावें व मग मागें फिरावें, पुढें राजानें संबंध दिवसभर ती धेनु जाईल तिकडे तिच्यामागें जावें, कोठें चांगलें गवत दिसलें तर त्याचे चवदार घास तिला द्यावे, तिच्या अंगा-

वरील माझा वाराव्या–अगदीं तिच्या सावलीसारखें तिच्याबरोबर असावें, सायंकाळीं घरीं परतावें, राणीनें तिला सामोरें जावें, रात्रीं गुरूची व धेनूची सेवा दोघांनीं करावी आणि मग झोपीं जावें, असा त्यांचा नित्यक्रम सुरू झाला. सिंहव्याघ्रादि हिंस्र श्वापदांनीं व्याप्त असलेल्या त्या हिमालयाच्या घोर अरण्यांत हिंडत असतांना या गुराखी बनलेल्या सम्राटाचीं बाह्य राजचिन्हें– छत्र, चामर, मालदार, चोपदार, पालखी वगैरे– जरी दिसत नव्हतीं तरी त्याचें खरें अंतर्गत राजतेज त्याच्या मुखावर विलसत होतें. तें त्याचें पवित्र व उग्र राजतेज हिमालयांतील स्थिरचर सृष्टीलाहि प्रतीत होत होतें. वृक्षांवर बसलेले पक्षी त्याला आलेला पाहून भालदारांप्रमाणें 'नजर रखो' अशी ललकारणी सरकारस्वारीसाठीं जणों काय करीत होते. हिंडण्याचे श्रम त्याला झाले तर वायु स्वतां त्याला विंझण्यानें सुखवीत होता. कुंजाकुंजामधून राजाच्या यशाचें गायन वनदेवता करीत होत्या. नगरींत आल्यावर पौरकन्या जशा त्याच्यावर लाह्या उधळीत तशा या अरण्यांतील लता वाऱ्यानें हलल्या कीं आपलीं पांढरीं फुलें त्यावर उधळीत होत्या. राजाच्या केवळ सांनिध्यानें अरण्यांतील वणवे शमले, झाडें फुलाफळांनीं बहरलीं, आणि प्राण्यांतील वैरभाव शान्त झाला.

**सिंह बोलूं लागला !**

राजाचा हा असा क्रम अव्याहतपणें एकवीस दिवस चालला. बाविसाव्या दिवशीं– कां कोण जाणे–'नंदिनी' हिमालयाच्या निबिड अरण्यांतील एका गुहेंत शिरली. तेथें गंगेचा धबधबा असून कांठाला चांगलें कोंवळें गवत उगवलेलें होतें. तेथें गाय चरूं लागली. दिलीपहि वनाची शोभा पाहण्यांत दंग झाला. तों काय ? एकदम त्याच्या कानांवर गाईचा दीन हंबरडा पडला. त्यासरशी तो नजर वळवून पाहतो तों त्या गाईच्या अंगावर झेंप टाकून बसलेला एक अक्राळविक्राळ सिंह त्याच्या नजरेस पडला ! त्याला तेथल्या तेथें ठार करण्यासाठीं त्याचे हात धनुष्यबाणांकडे एकदम वळले. पण काय चमत्कार ! त्याचा उजवा हात धनुष्यावर लावलेल्या बाणावरच खिळून राहिला ! ! राजा अगतिक होऊन मनांत जळफळूं लागला ! तों आणखी एक चमत्कार ! समोरील सिंह मनुष्यवाणीनें राजाला उद्देशून बोलूं लागला ! " राजा, पुरे कर तुझी ही धडपड. माझ्यावर तुझे हे बाण

चालणार नाहींत. मी साधासुधा रानटी पशु नसून भगवान् शंकराचा सेवक आहें. माझें नांव 'कुम्भोदर' आहे. हा तुझ्यासमोरचा देवदारू वृक्ष आहे ना. हा पार्वतीचा फार आवडता वृक्ष आहे. त्याला हत्ती वगैरे कडून इजा पोंहचूं नये म्हणून मला त्याच्या संरक्षणार्थ येथें नेमलेलें आहे. जवळपास आलेल्या जनावरांना खाऊन मीं माझी उपजीविका करावीं असा शंकराचा आदेश आहे. आज माझ्या भाग्यानें ही धुष्टपुष्ट गाय आपण होऊन माझ्या हद्दींत आलेली आहे. तिला खाऊन मी माझ्या फारां दिवसांच्या उपासाचें पारणें फेडणार आहें. राहूच्या तोंडांत अचानकपणें चंद्राची अमृतमय मूर्ति पडावी तशी ही स्वादिष्ट गाय माझ्या जबड्यांत परमेश्वरयोजनेनेंच पडत आहे. जा. हिचें रक्षण आपणांस करतां आलें नाहीं याची खंत करूं नको. अरे ! जेथें शस्त्रच चालत नाहीं तेथें शस्त्रधारी क्षत्रिय कुंठित झाला तर त्यांत त्याला काय कमीपणा आहे ?"

'मला खा पण हिला सोड.'

'प्रत्यक्ष भगवान् शंकराच्या प्रभावानेंच हें झालें म्हणावयाचें तर !' राजाला त्यातल्या त्यांत थोडें बरें वाटलें. पण तो थोड्या नम्रतेनें पण निग्रहानें म्हणाला, "कुम्भोदरा, तुझा धनी सर्व त्रैलोक्याच्या स्थितिगतीचा चालक आहे. त्याची इच्छा मला अनुल्लंघनीयच आहे. पण ही माझ्या गुरूची गाय 'हिचें रक्षण मी करीन' असें म्हणून मीं हिला संगें आणली. आणि तिचा वध माझ्या समोरच जर होऊं लागला तर तो मीं उघड्या डोळ्यांनीं कसा पाहूं? यावर एक तोड मी तुला सांगतों ती ऐक. तूं भुकेला आहेस तर मला खा व हिला सोडून दे." राजाचें हें भाषण ऐकून सिंह खदखदा हंसला ! तेव्हां त्याच्या जबड्यांतील शुभ्र दाढांचीं किरणें गुहेंतील अंधकारांत क्षणभर चमकलीं ! तो म्हणाला—"राजा ! काय वेडाबिडा तर नाहींस ? अरे ! तुझें एवढें साम्राज्य, ही तुझी काया, हें तुझें तारुण्य, एवढ्या साऱ्यांवर एखाद्या क्षुद्र गाईसाठीं तूं पाणी सोडण्यास तयार झालास ? धन्य आहे तुझ्या शहाणपणाची ! फार तर या एका गाईच्या मोबदला एक सोडून कोटी गाई तूं आपल्या गुरूला देऊन टाक. तूं राजा गेल्यावर तुझ्या शेंकडों प्रजाजनांची दुर्दशा होईल हेंहि ध्यानीं घे व हा अविचार करूं

नको.” असें बोलून सिंह थांबतांच त्याच्याच शब्दांचा प्रतिध्वनि गुहेंत घुमला व वाटलें कीं पर्वत पुन्हां तेच शब्द राजाला सांगत आहे ! ! यावर राजा म्हणाला, “ रक्षणीयांचें रक्षण करणें हें क्षत्रियाचें कर्तव्य. तें ज्या माझ्या हातून होत नाहीं त्या मला राज्य काय किंवा प्राण काय घेऊन काय करावयाचे आहेत ? ही धेनु असामान्य आहे. हिजबद्दल कोणताहि मोबदला चालणार नाहीं. तूं आपला मलाच खा. माझ्या या जड शरीरापेक्षां माझें कीर्तिरूप शरीर मला प्रिय आहे. तरी कृपा कर. तूं आतां माझा स्नेही झाला आहेस. स्नेहाखातर ही गोष्ट पत्करं व मलाच खा.”

**मरणाऐवजीं पुष्पवर्षाव !**

‘ बरें तर ’ असें म्हणून सिंहानें त्याचें बोलणें मान्य करतांच दिलीपाचा बाणाला चिकटलेला हात मोकळा झाला. त्यानें धनुष्य खालीं ठेवलें व आपला देह सिंहाला एखाद्या मांसाच्या गोळ्याप्रमाणें अर्पण केला. जमिनीवर पडलेला दिलीप कल्पना करीत होता कीं, ‘आतां तीक्ष्ण नखाग्रांच्या सिंहाची उडी आपल्यावर पडणार.’ पण काय चमत्कार ! त्याची उडी पडण्याऐवजीं विद्याधरांनीं उधळलेली पुष्पवृष्टिच त्याच्यावर पडली. ‘ हें काय ? ’ म्हणून दिलीप उठून पाहतो तों पुढें धेनुमाताच उभी ! सिंहाची स्वारी कोठेंच दिसेना. तो विस्मित झाला. त्याला उद्देशून नंदिनी म्हणाली— “ राजर्षे, तुझी परीक्षा पाहाण्यासाठीं मीं ही माया उत्पन्न केली. अरे, सिंह तर राहोच, पण ऋषीच्या सामर्थ्यामुळें यमाची सुद्धां माझ्या शरीराला स्पर्श करण्याची ताकद नाहीं. तूं माझ्या कसोटीला पूर्णपणें उतरलास. गुरूवरील तुझी भक्ति व मजवरील सद्भाव पाहून मी तुजवर प्रसन्न झालें. माग तुला काय हवें तें. ” राजानें हात जोडले व चिरकांक्षित कीर्तिमान् पुत्र मागितला. धेनूनें तेथेंच आपलें दूध काढून तें पिण्यास राजाला सांगितलें. पण ‘मुनीच्या अनुज्ञेनेंच मी हें करीन’ असें त्यानें उत्तर दिलें. दोघेंहि आश्रमाला परतलीं. सर्वांना हा वृत्तान्त कळतांच सर्वत्र आनंदीआनंद झाला. राजानें धेनुदुग्धाचें प्राशन केलें. दुग्ध कसलें तें ? वंशाचें मूर्तिमंत धवल यशच. याप्रमाणें पूर्ण मनोरथ झालेल्या राजाराणीला वशिष्ठमुनींनीं आपल्या राजधानीस पाठवून दिलें. राजाला परत आलेला पाहून प्रजा आनंदली.

## इंद्रानें घोडा चोरला !

सुदक्षिणेला यथाकाल गर्भ राहून तिला डोहाळे लागले. राजाला आनंद झाला. तो तिच्या इच्छा पुरविण्याची शिकस्त करी. योग्य दिवशीं दिलीपाला पुत्ररत्न झालें. पुत्रजन्माची वार्ता सांगणाऱ्याला काय बक्षीस देऊं आणि काय न देऊं असें राजाला झालें. त्यानें पुत्रमुख पाहून नेत्रांचें पारणें फेडलें. मुलाचें 'रघु' असें नांव ठेवण्यांत आलें. बालचंद्रासारखा तो तेजस्वी रघु वाढूं लागला. शस्त्रविद्या आणि शास्त्रें यांत तो प्रवीण झाला. दिलीपानें त्याला युवराज केलें. वायूचें अग्नीला साहाय्य व्हावें तसें पुत्राचें पित्याला साहाय्य होऊं लागलें. दिलीपानें आतांपर्यंत नव्याण्णव अश्वमेध यज्ञ केले होते. म्हणजे शंभर यज्ञांना आतां एकच कमी होता. तो यज्ञ त्यानें आतां आरंभिला आणि रघूला तुरंगरक्षणाच्या कामावर योजिलें. शंभर यज्ञ करणाऱ्याला इंद्रपद मिळतें. तेव्हां हें आपल्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाला मिळूं नये अशी इंद्राची मत्सरी इच्छा असणारच. म्हणून त्यानें दिलीपाच्या शंभराव्या यज्ञांत एक अनपेक्षित विघ्न आणलें. त्यानें रघूच्या खास संरक्षणाखालचा अश्वमेधीय अश्वच सैनिकांना नकळत चोरला व तो त्यास गुप्तपणें घेऊन चालला. सैनिक दिङ्मूढ झाले. इतक्यांत अचानकपणें रघूच्या जन्माला कारण असलेली 'नंदिनी' तेथें प्रकट झाली. तिच्या अंगांतून निथळणाऱ्या पवित्र जलानें रघूनें आपले नेत्र प्रक्षाळतांच त्याला मानवी इंद्रियांना अगोचर असे सर्व पदार्थ स्पष्टपणें दिसूं लागले. त्याला लागलीच घोडा घेऊन पलायन करणारा इंद्र पूर्वेच्या बाजूस उमगला. त्याबरोबर रघूनें त्यास मोठ्यानें हटकलें व या चौर्यकर्माबद्दल त्याची त्यानें मोठ्या खुबीनें निर्भर्त्सना केली. तो इंद्रास म्हणाला, " इंद्रा, तूं यज्ञांतील हविर्भाग घेणाऱ्यांतला पहिला देव असें असून तूंच माझ्या पित्याच्या यज्ञाला अडथळा कसा बरें आणतोस ? देवेन्द्रा, तूं इतरांना सन्मार्ग दाखवणारा असून तूंच स्वतां अन्यायानें वर्तूं लागलास याला काय म्हणावें ? आमचा हा अश्व सोडून दे. " हें रघूचें खोंचदार भाषण ऐकून इंद्र म्हणाला, " राजपुत्रा, तूं म्हणतोस तें खोटें नाहीं. पण 'शतक्रतु' म्हणजे शंभर यज्ञ करणारा हें माझेंच बिरुद आहे. तें हिरावून घेऊन माझी अपकीर्ति करण्यास तुझा पिता प्रवृत्त झाला

आहे. तें मी कसें सहन करीन ? जसें एकट्या विष्णूलाच 'पुरुषोत्तम' व एकट्या शंकरालाच 'महेश्वर' म्हणतात तसें एकट्या मलाच 'शतक्रतु' म्हणतात. ही माझी पदवी दुसऱ्या कोणीहि धारण करतां कामा नये. म्हणून तूं हा घोडा परत नेण्याचा नाद मुकाट्यानें सोड. नाहीं तर सगरपुत्त्राची कपिलाकडचा घोडा सोडवून नेण्यांत जी गति झाली ( म्हणजे ते दग्ध झाले ) तीच तुझी होईल. "

**बालवीराचें तेज.**

पण असल्या धमकावण्यांना भीक घालणारा रघु नव्हता. त्यानें इन्द्रास उत्तर म्हणून युद्धाचें आव्हानच दिलें ! झालें. प्रौढ वयाचा आणि कसलेला वज्रधारी देवेन्द्र आणि कोंवळ्या वयाचा धनुर्धारी कुमार रघु यांचें अभूतपूर्व व रोमांचकारी द्वंद्वयुद्ध सुरू झालें. रघूनें केलेली बाणवृष्टि इंद्रास असह्य झाली. म्हणून त्यानें त्या बालवीरावर वज्राचा प्रहार करून त्यास खालीं पाडलें. सैन्यांत हाहाकार उडाला. पण क्षणार्धांत सावध होऊन रघु पुन्हा उठला. त्या रघूचा पराक्रम पाहून इंद्रालाहि संतोष झाला. गुणांचें कौतुक कोण नाहीं करणार ? इंद्र रघूला म्हणाला, "बालवीरा, माझ्या वज्राचा आघात पर्वतानाहि सहन होत नाहीं. तो तूं सहन केलास. शाबास आहे तुझी. एक अश्व सोडून पाहिजे तें तूं मजपाशीं माग. मी तें तुला द्यावयाला सिद्ध आहें." त्यावर आपला लावलेला बाण मागें घेत रघु म्हणाला, " देवेन्द्रा, तुला अश्व परत द्यावयाचाच नसेल तर निदान शंभराव्या यज्ञाचें फल तरी माझ्या पित्याला दे व हा झालेला वृत्तान्त तुझ्याच वार्ताहराकडून माझ्या पित्याला कळीव." याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर रघु आपल्या पित्याकडे परत आला. या पराक्रमी रघूला राज्याभिषेक करून दिलीपानें वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केला व तो सुदक्षिणेसह वनांत राहावयास गेला.

**रघूचा दिग्विजय.**

रघूनें पित्याच्या मागें राज्य स्वीकारलें व सिंहासन आणि शत्रु यांचा एकदमच कबजा घेतला. या पराक्रमी राजाला पाहून प्रजेमध्यें नवा जोम स्फुरूं लागला. पंचमहाभूतांमध्येंहि नवीन गुणांचा संचार झाल्यासारखा दिसूं लागला. थोडक्यांत सांगावयाचें तर या नव्या राजाबरोबर सर्वच

नवीन झालें. पावसाळा संपून शरद्ऋतु सुरू झाला तसे दिग्विजयाचे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. इंद्रानें आपलें पावसाळ्यांत दृग्गोचर होणारें इंद्रधनुष्य मागें घेतलें व रघूनें आपलें विजयी धनुष्य हातीं धरलें. नद्यांचे पूर ओसरून त्या उतारास योग्य झाल्या. रस्त्यांवरील चिखल वाळला, सृष्टीमध्यें तेजाचा संचार झाला, व शरद्ऋतु जणों काय रघूला दिग्विजयाची प्रेरणा करीत होता असें दिसलें. आपल्या सैन्याची जमवा-जमव करून रघूनें आपला मोर्चा प्रथम पूर्वेकडे वळविला. मार्गांत पूर्व-दिशेकडील अनेक प्रदेश जिंकीत सुह्म, वंग इत्यादिकांना त्यानें आपल्या ताब्यांत घेतलें. नंतर कपिशा नदी ओलांडून तो कलिंगावर चाल करून गेला. नंतर पांड्य आदिकरून राजे जिंकीत जिंकीत तो कोंकणांत (अपरान्त) गेला. नंतर खुष्कीच्या मार्गानें त्यानें पारसिकांना जिंकलें व हूण, कांबोज इत्यादिकांचा पाडाव करीत काश्मीराच्या मार्गें तो हिमालय पर्वतांत आला. हिमालयांतील पहाडी लोकांना जिंकून तो कामरूप येथें आला. याप्रमाणें त्यानें सर्व दिशा जिंकून ठिकठिकाणीं ध्वजस्तंभ रोविले. व या दिग्विजयाचा अखेर विश्वजित् नांवाचा एक यज्ञ केला. यांत त्यानें युद्धांत मिळविलेली सर्व संपत्ति ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून देऊन टाकली. मेघ आणि उदारधी सज्जन जें घेतांत तें रूपान्तरानें परत देऊन टाकण्यासाठींच.

**कोरड्या मेघाकडे चातक.**

अशा स्थितींत एकदां रघुराजाकडे 'वरतंतु' नांवाच्या ऋषीचा एक शिष्य कौत्स आला. त्याला आपल्या गुरुजीला चौदा कोटी गुरुदक्षिणा द्यावयाची होती. वास्तविक गुरु एवढी गुरुदक्षिणा मागत नव्हते. पण कौत्सानें आग्रह केल्यावरून त्यांनीं प्रत्येक विद्येस एक याप्रमाणें चौदा विद्यांस चौदा कोटी गुरुदक्षिणा मागितली. एवढी रक्कम कौत्सानें कोठून द्यावयाची ? अर्थातच तो रघुराजाकडे आला. पण या वेळीं कौत्सानें रघूकडे येणें म्हणजे एकादशीनें शिवरात्रीकडे येण्यापैकींच होतें ! कौत्स नांवाचा विद्वान् ब्राह्मण आपणाकडे आलेला पाहतांच रघुराजा त्यास समोरा गेला. पण त्यानें हातीं मातीचीं पूजापात्रें घेतलीं होतीं. कारण, रघूच्या खजिन्यांत आतां कोणतीहि धातु शिल्लक नव्हती. सत्कारानंतर

रघूनें आगमन-प्रयोजन विचारतां कौत्सानें गुरुदक्षिणेचा सर्व प्रकार सांगितला व तो म्हणाला, " तुझ्या या मातीच्या पूजापात्रांवरूनच तूं आतां निर्धन झाला आहेस हें मीं ताडलें. पण राजा ! तुझी निर्धनता औदार्यजन्य असल्यामुळें तें तुझें भूषणच आहे. चंद्रसुद्धां आपलें अमृत देवांना वांटल्यावर कलाविहीन झाला तरी शोभूनच दिसतो. म्हणून मी तुजजवळ या दक्षिणेची याचना करून तुला खेद देणार नाहीं. ज्यांतून पावसाळ्यांतलें सर्व पाणी गळून गेलें आहे अशा शरदृतूंतील कोरड्या मेघाजवळ चातक तरी कोठें पाणी मागतो ? राजा ! स्वस्थ ऐस. मी दुसऱ्या कोणाकडे तरी जातों व मला पाहिजे असलेली रक्कम मिळवितों." असें म्हणून कौत्स जाऊं लागला.

**कुबेरावर स्वारी.**

त्याला थांबवून रघू म्हणाला, " कौत्सा ! आमच्या कुळाची कीर्ति अशी आहे कीं, आमच्याकडे आलेला याचक विन्मुख होऊन कधींच परत जात नाहीं. तरी कृपा करून तूं आमच्या यज्ञशाळेंत दोन तीन दिवस राहा. तोंपर्यंत मी तुझ्या गुरुदक्षिणेची सोय करतों. " असें म्हणून रघूनें कुबेरावर स्वारी करण्यासाठीं रथ सज्ज केला. एखाद्या मांडलिकावर जशी सत्ता गाजवावी त्याप्रमाणेंच कुबेराकडूनहि आपणांस हवें तितकें धन आपण आणूं असा रघूस विश्वास वाटत होता. पहाटेस या स्वारीवर तो निघणार इतक्यात त्याचे खजिनदार त्याजकडे धांवत येऊन आश्चर्यानें सांगूं लागले कीं, " महाराज ! आपल्या खजिन्यामध्यें आकाशांतून सोन्याची वृष्टि झाली आहे ! " रघूनें तें सर्व सोनें कौत्साला देऊं केलें. पण कौत्स तें घेईना. त्याला त्यांतील चौदा कोटीच हवें होतें. याचकाला पाहिजे आहे त्यापेक्षां जास्त देणारा उदार दाता व आपल्याला पाहिजे आहे तेवढेंच घेणारा निःस्पृह याचक अशी या दोन महापुरुषांची विलक्षण जोडी त्या दिवशीं अयोध्येच्या लोकांनीं पाहिली. संतुष्ट झालेल्या कौत्सानें प्रयाणाचे वेळीं रघूस आशीर्वाद दिला, " राजा ! तुला तुझ्यासारखाच पुत्र होईल. "

**गजाचा गंधर्व झाला !**

कौत्साचें आशीर्वचन लौकरच फळास आलें. रघूस तेजस्वी पुत्र झाला.

त्याचें त्यानें 'अज' असें नांव ठेविलें. ज्योतीवर ज्योत पेटवून ध्यावी त्याप्रमाणें मुलानें पित्याचे सर्व गुण जसेच्या तसे उचलिले होते. अजाची विद्या पुरी झाली. अंगावर यौवन भिरवूं लागलें. त्याचे गळ्यांत माळ घालण्यास राजलक्ष्मी केवळ त्याच्या पित्याच्याच आज्ञेची वाट पाहात होतीसें दिसलें. इतक्यांत विदर्भ देशांतून भोज राजाकडून एक दूत रघूकडे आला. भोजानें आपली भगिनी 'इंदुमती' हिचें स्वयंवर आरंभिलें होतें आणि त्यासाठीं कुमार अजाला निमंत्रण होतें. रघूनें पुत्त्रास मोठ्या सेनेसह विदर्भाला जाण्यास अनुज्ञा दिली. सेनेचे अनेक मुक्काम मार्गांत पडले. त्यांपैकीं नर्मदा तीरावरील एका मुक्कामांत एक विस्मयकारक वृत्तान्त घडला. नर्मदा नदींतून एक हत्ती तीराकडे मोठ्या वेगानें पोहत येत होता. त्याच्या गंडस्थळांतून मद गळत होता. त्या उग्र मदाचा गंध असह्य झाल्यामुळें रघूच्या सैन्यांतील हत्ती आपापले साखळदंड तोडून सैरावैरा पळूं लागले. त्यामुळें सैन्यांत एकच गोंधळ माजला. अजानें तें पाहून त्या हत्तीच्या मस्तकावर एक तीक्ष्ण बाण सोडला. तो बाण मस्तकांत घुसतांक्षणींच हत्तीचें रूप टाकून देऊन कोणी एक तेजस्वी गंधर्व प्रकट झाला व अजावर कल्पवृक्षाचीं फुलें उधळून म्हणाला, " मला मतंग ऋषीच्या शापामुळें ही गजयोनि प्राप्त झाली होती. पण त्या मुनीकडून असा उःशाप मिळाला होता कीं, ' इक्ष्वाकु कुळांतील अज नांवाचा राजकुमार तुझी या योनींतून सुटका करील. ' त्याप्रमाणें तूं आज मला मुक्त केलें आहेस. मी प्रियदर्शन नांवाच्या गंधर्वाचा पुत्त्र आहें. माझी आठवण म्हणून हें 'संमोहन' नांवाचें अस्त्र मी तुला देतों. " असें म्हणून तो गंधर्व चित्ररथाच्या राज्याकडे निघून गेला व अजहि विदर्भाच्या मार्गास लागला. विदर्भ राजधानीजवळ रघुपुत्त्र अज आला आहे हें कळतांच विदर्भराज मोठ्या आनंदानें त्यास सामोरा गेला आणि त्याला नगरींत मोठ्या इतमामानें आणून त्यानें एका रम्य स्थलीं त्याला उतरवून घेतलें. त्याची बडदास्त भोजानें अशी ठेविली कीं अज हा यजमान व विदर्भराज हाच पाहुणा लोकांस वाटला. स्वयंवरप्रसंगीं इंदुमतीच्या लाभाबद्दलचे विचार अजाच्या मनांत सारखे घोळत असल्यानें त्याला

रात्रीं लौकर झोंप येईना. त्यामुळें पहाटेस निद्रेंतच असलेल्या त्या राजपुत्त्राला उठविण्यासाठीं समवयस्क, चतुर व गोड गळ्याच्या भाटांनीं अजाची अत्यंत काव्यमय स्तुति गायिली. राजहंसाच्या कूजनानें जागृत झालेला 'सुप्रतीक' नांवाचा सुरगज जसा गंगापुलिनांतून बाहेर निघतो तसा त्या भाटाच्या मधुरगीतांनीं जागा झालेला अज आपल्या शय्येवरून उठला. त्यानें सर्व प्रातःकर्में यथाशास्त्र केलीं, सुंदर वेष चढविला व स्वयंवरमंडपांत प्रवेश केला.

## इंदुमतीचें स्वयंवर.

भोजानें अजाला एका उच्च आसनावर बसविलें. स्वयंवरमंडप उत्तम रीतीनें शृंगारला असून त्यांत देशोदेशींचे राजपुत्त्र ओळीनें बसले होते. मदनासारखा सुंदर, कार्तिकेयासारखा पराक्रमी व इंद्रपुत्र जयंताप्रमाणें वैभवशाली अशा त्या अजाकडे सर्व राजसभेचे डोळे लागले. व 'याला सोडून इंदुमती आम्हांस कसली वरते ?' अशा निराशेचा विचार प्रत्येक राजपुत्त्राच्या मनांत चमकून गेला. इतक्यांत वाद्यांच्या गजरांत व भालदारांच्या ललकाऱ्यांत पालखींत बसलेली इंदुमती स्वयंवरमंडपांत आली. तिला पाहून राजपुत्त्रांचे डोळे दिपून गेले. त्यांच्या विविध शृंगारचेष्टा सुरू झाल्या. जिला राजपुत्त्रांच्या वंशाची पूर्ण माहिती होती अशी इंदुमतीची सखी 'सुनंदा' तिचबरोबर होती. इंदुमतीनें हातांत पुष्पमाला घेतली होती व सुनंदा मोठ्या चातुर्यानें व धीटपणें प्रत्येक राजपुत्त्रापुढें तिला नेऊन त्याचें वृत्त वर्णीत होती.

सुनंदेचें एका राजपुत्त्राचें वर्णन संपलें कीं त्याला नापसंत करून इंदुमती पुढें चालण्यास सुनंदेला नेत्रांनीं खुणावी. मग दुसऱ्या राजपुत्त्राचें वर्णन सुरू होई. सरोवरांत उठलेल्या लाटांसरशी राजहंसी जशी या कमलाजवळून त्या कमलाकडे जाते तशी इंदुमती परंतप, अंगनाथ, अवंतिनाथ, प्रतीप, सुषेण व पाण्डय या राजपुत्त्रांजवळून पुढें गेली. इंदुमती आपल्यांजवळ आली कीं आशेनें उज्ज्वल दिसणारें राजपुत्त्रांचें मुख ती पुढें निघून गेली कीं निराशेनें काळें ठिक्कर पडे ! जशी मार्गानें चाललेली दिव्याची ज्योत पुढें आली कीं प्रकाशित झालेले सज्जे ती निघून जातांच काळोखांत गडप होतात त्याप्रमाणें हें चाललें होतें. अखेरीस अजाचें

वर्णन सुनंदेनें केलें. त्याला पाहिल्याबरोबर इंदुमती तेथेंच थबकली. सुनंदेनें तिचा भाव जाणून तिला थट्टेनें म्हटलें, "कां ताईसाहेब ! चला ना पुढें." इन्दुमतीनें तिच्याकडे लटक्या रागानें पाहिलें व आपल्या हातांतील पुष्पमाला अजाच्या कंठींत घातली. सभामंडप आनंदानें मोहरून गेला. जो तो म्हणूं लागला– " निवड फार योग्य झाली. कौमुदी चंद्राला आणि गंगा सागराला मिळाली. "

## मत्सरी राजांची पुरी फजिती.

असंख्य चहात्यांचा हा गगनभेदी जयजयकार सर्वांनाच मानवला खरा; पण नाकारलेल्या राजपुत्रांना तो थोडाच रुचणार होता ? ते मत्सरानें जळफळूं लागले. त्यांनीं तेथेंच दंगल माजविली असती पण शशीच्या प्रभावामुळें त्यांस तसें करतां आलें नाहीं. भोजानें तें जोडपें मिरवत नगरात आणलें. ही मिरवणूक पाहतांना पौर-स्त्रियांची कोण धांदल ! लग्नसोहळा यथासांग पार पडला. सर्व राजपुत्रांचा मानसन्मान झाला. पण जो तो या आपल्या नकाराचा सूड उगविण्याचा विचारांत होता. अज इंदुमतीला घेऊन अयोध्येकडे निघाला मात्र तों या सर्व राजपुत्रांनीं एकजुटीनें एकट्या अजावर हल्ला केला. अजानें इंदुमतीचें रक्षण तिच्या पित्याच्या प्रधानावर सोपविलें व आपण त्या पडेल राजपुत्रांच्या सेनेवर त्वेषानें तुटून पडला. घनघोर युद्ध झालें व शेवटीं अजानें गंधर्वपुत्राकडून मिळालेल्या 'संमोहन' नांवाच्या अमोघ अस्त्राचा प्रयोग राजपुत्रावर केला. त्यामुळें ते सर्व गाढ निद्रेनें घेरले गेले. त्यांनीं आपले देह अस्ताव्यस्तपणें ध्वजस्तंभांना टेकले व ते निश्चेष्ट पडून राहिले. अजानें शंखनाद करून आपला विजय आपल्या सेनेला विदित केला व इन्दुमतीजवळ येऊन मोठ्या वीरश्रीनें तो तिला म्हणाला, " प्रिये, हे पहा पडेल राजपुत्र ! हे माझ्या हातून तुला नेणार होते ! यांना आपल्या वस्त्रांची तरी शुद्ध आहे का पहा ! " आपल्या पतीच्या या पराक्रमानें इंदुमतीला पराकाष्ठेचा हर्ष झाला व ती लज्जावनत झाली. अज इंदुमतीसह घरीं आलेला पाहून रघूला फार आनंद झाला. अजावर राज्यकारभार सोपवून आपण आतां निवृत्त व्हावें असें त्यास वाटूं लागलें.

## माळेमुळें मृत्यु !

लागलीच राज्याचीं सूत्रें अजाच्या हवालीं करून रघु वनवासाला निघाला. पण पितृभक्त अजाची भीड पडल्यामुळें तो नगराबाहेरीलच एका आश्रमांत विरक्तपणें राहिला. रघूचा यत्न निःश्रेयस तर अजाचा यत्न अभ्युदय मिळविण्याचा होता; व हीं एकाच धर्मांचीं दोन अंगें ते पितापुत्र हस्तगत करण्याच्या उद्योगांत होते. कांहीं काळानें अजानें आपलें देहविसर्जन योगमार्गानें केलें व तो परमात्मस्वरूप झाला. अजाला इंदुमतीचे पोटीं 'दशरथ' नांवाचा पुत्र झाला. यानंतर एके दिवशीं अज इंदुमतीसह नगराबाहेरील एका उद्यानांत क्रीडेसाठीं गेला. याच वेळीं नारदमुनि दक्षिण समुद्राच्या तीरावरील गोकर्णक्षेत्रीं निवास करणाऱ्या शंकराचीं आराधना करण्यास आकाशमार्गानें चालले होते. त्यांच्याजवळील वीणेवर स्वर्गीय पुष्पाची सुगंधी माला लटकत होती. ती वाऱ्यानें जणों काय सुगंधाच्या लोभानें उडविली. ती माला पृथ्वीवर उतरत उतरत जेथें इंदुमती अजासह पहुडली होती नेमकी त्या ठिकाणीं येऊन इंदुमतीच्या वक्षस्थलावर पडली. आणि काय ? त्या माळेकडे अवलोकन करून तिनें आपले नेत्र क्षणांत आणि कायमचे मिटले. तें पाहून प्रथम अजहि मूर्च्छित झाला. पण कांहीं वेळानें सावध होऊन त्यानें इंदुमतीचें शरीर मांडीवर घेऊन हृदयद्रावक विलाप आरंभिला. तो काय वर्णावा ? तो म्हणाला, "मालेनेंहि जर माणसाला मृत्यु येतो तर अंतकाच्या मनांत आलें कीं कोणतें-हि साधन नाशासाठीं त्याला चालवतां येतें असें झालें. प्रिये ! मीं तुझा असा कोणता अपराध केला होता म्हणून मला न विचारतां व मला बरो-बर न घेतां तूं परलोकाला निघून गेलीस ? तुझ्यावांचुन माझें जीवन शून्य झालें. निदान या तुझ्या पुत्राकडे पाहून तरी हा निष्ठुरपणा तूं करावयास नको होता." असा शोक अज करीत असतां जवळील वृक्षलतांनींहि अश्रू गाळले. इंदुमतीचें शरीर दग्ध करून राजा नगरांत आला खरा पण त्याला कशांतच सुख वाटेना. त्याचें सांत्वन करण्यासाठीं वशिष्ठांनीं आपला शिष्य वामदेव यास पाठविलें. त्यानें अजाला इन्दुमतीबद्दल पुढील वृत्तान्त सांगितला. "पूर्वीं तृणबिंदु नांवाचा कोणी मुनि घोर तप करीत होता. तो आपलें पद घेईल या भीतीनें इंद्रानें त्याजकडे हरिणी नांवाची

एक देवांगना त्याचा तपोभंग करण्यास पाठविली. हरिणीनें त्याचें मन विचलित करण्याचा प्रयत्न करतांच तृणबिंदु कोपला व त्यानें 'तूं मानुषी होशील' असा तिला शाप दिला. तिनें क्षमा मागतांच 'स्वर्गीय पुष्पांचें दर्शन होईपर्यंतच तूं मानुषी होशील' अशी दुरुस्ती त्यानें केली. हीच ती हरिणी इंदुमती झाली व स्वर्गीय मालेच्या दर्शनानें देवाङ्गना होऊन स्वर्गाला गेली !" ही कथा सांगून वामदेवानें आत्मा व शरीर, मृत्युलोक आणि जीवनमरण यांचें तत्त्वज्ञान अजास समजावून दिलें व शोक आवरता घेऊन पूर्ववत् पृथ्वीपालन करण्याचा त्यास उपदेश केला. पण त्या उपदेशाचा परिणाम अजावर झाला नाहीं. त्यानें आपल्या पुत्राला– दशरथाला– गादीवर बसविलें व आपण उपवास करून प्रियेच्या भेटीसाठीं स्वर्गांत निघून गेला.

## मृगयेंत मृत्यूचें बीज.

पित्याच्या मागें दशरथानें राज्यशकट फार चांगल्या तऱ्हेनें चालविला. तो सत्यवक्ता, न्यायप्रिय आणि पराक्रमी होता. त्यानेंहि दिग्विजय करून सरयू व तमसा नद्यांवर यज्ञ केले. एकदा मधुमास आपल्या संपूर्ण वैभवानें प्रकट झाला असतां दशरथाला मृगयेस जाण्याची इच्छा झाली. सचिवांच्या अनुमतीनें तो शिकारीसाठीं रानांत शिरला. तेथें त्यानें सिंह, गेंडे, वराह वगैरे श्वापदें मारलीं. एका हरिणाच्या मागें लागून तो एकटाच तमसा नदीवर आला. तेथें त्याला नदींतून हत्तीच्या आवाजासारखा एक आवाज ऐकूं आला. म्हणून हत्तीस मारण्यासाठीं त्यानें आपला शब्दवेधी बाण, फारसा विचार न करतां, सोडला. तों काय अनर्थ ! 'अहो बाबा, मेलों हो' असा करुण शब्द त्याच्या कानांवर पडला. दशरथ जवळ जाऊन पाहतो तों एका वृद्ध तपस्व्याचा मुलगा नदींत पाणी भरावयास आणलेल्या घागरीस टेकून घायाळ होऊन पडलेला !

प्रश्न विचारल्यावरून मुलानें– श्रावणानें– अडखळत सांगितलें– "माझ्या अंध आणि वृद्ध मातापितरांसाठीं पाणी नेण्यास मी येथें आलों. माझ्या अंगांत रुतलेला हा बाण न काढतांच तुम्ही मला माझ्या आईबापांकडे न्या." हें ऐकून दशरथाला पराकाष्ठेचें दुःख झालें. त्याचें हृदय पश्चात्तापानें होरपळून गेलें. पण करतो काय ? त्यानें त्या मुलास त्या वृद्धाकडे नेलें व

आपल्याकडून नकळत झालेला अपराध नम्रपणें कबूल केला. वृद्ध मातेनें आक्रान्त केला. मुलाच्या शरीरांतील बाण काढतांच त्याचें प्राणोत्क्रमण झालें. वृद्ध तापस कोपला. त्यानें आपले अश्रूच आपल्या ओंजळींत धरून दशरथास शाप दिला कीं, 'माझ्याप्रमाणेंच तुझाहि अंत तुझ्या वृद्धपणीं पुत्रशोकानेंच होईल !' हा शाप दशरथाला अनुग्रहासारखाच वाटला. कारण त्याला अद्याप संततीच झाली नव्हती. यावर दशरथ त्यास म्हणाला, 'मला माझ्या अपराधाबद्दल हवी तर मरणाची शिक्षा सांगा !' पण वृद्ध म्हणाला, 'आम्हीच मुलाकडे जातों. तूं आमची चिता रच !' दशरथाचे सैनिक आतां त्या स्थलीं येऊन पोंहचले होते. त्या सर्वांनीं चिता रचली व तीं वृद्ध मातापितरें तिच्यांत भस्मसात् झालीं. दशरथ जड अन्तःकरणानें राजधानीला परतला. वडवाग्नि जसा सागराचें अन्तरंग जाळीत त्याच्या उदरांत राहतो तसा दशरथाला हा शाप सारखा जाळीत राहिला.

## रामाचा अवतार.

दशरथ राज्य करीत होता. त्याला दहा हजार वर्षें झालीं. पण त्याला सतति होईना. म्हणून ऋष्यशृंगप्रभृति ऋषींनीं त्याच्यासाठीं 'पुत्रकामेष्टि' यज्ञ सुरू केला. याच वेळीं 'रावण' नांवाच्या दैत्यानें सर्व देवांस गांजून सोडलें होतें. त्यामुळें त्रस्त झालेले ते सर्व देव भगवान् श्रीविष्णूकडे गेले. त्याची उचित शब्दांनीं स्तुति करून त्यांनीं दैत्याच्या संकटाची त्यास कल्पना दिली. यावर विष्णु म्हणाले, " मी हें सर्व जाणतों. हा रावण ब्रह्मदेवाच्या वरानें माजला असल्यानें मीं त्याची आजपावेतों गय केली. त्याला देवापासून मृत्यु नाहीं. म्हणून मी दशरथाच्या पोटीं जन्म घेऊन त्याचा वध करीन. तुम्ही निश्चित असा." असें म्हणून श्रीविष्णु अन्तर्धान पावले. इकडे पुत्रकामेष्टि यज्ञ संपल्यावर एक दिव्य पुरुष अग्नींतून प्रकट झाला. त्यानें आपल्या हातांतील पायसान्न दशरथास अर्पण केलें. या पायसान्नाचे —म्हणजेच विष्णुच्या तेजाचे— दोन सम विभाग करून एक आपली ज्येष्ठ पत्नी कौसल्या ईस व दुसरा आपली लाडकी प्रिया कैकेयी ईस दिला व अशी इच्छा प्रकट केली कीं, त्या दोघींनीं आपल्या भागांतील अर्धा अर्धा अंश सुमित्रेला देऊन तिचा मान करावा. त्याप्रमाणें त्या पायसाचे तीन विभाग होऊन ते त्या तिघींनीं भक्षण केले. कालान्तरानें त्या तिघींनाहि

गर्भधारणा होऊन कौसल्येला 'राम', कैकेयीला 'भरत' व सुमित्रेला 'लक्ष्मण' व 'शत्रुघ्न' असे पुत्र झाले. हे चारी बंधु एकजुटीनें राहत असल्यामुळें धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांच्या अवतारांसारखे भासले. ते विष्णूच्या चार हातांसारखे पराक्रमी होते. ते चौघेहि पितृवत्सल पुत्र आपल्या अंगच्या गुणरत्नांनीं चार रत्नाकरांप्रमाणें दशरथास परम संतोष देत असत.

**तेज वयावर नसतें !**

त्या चौघां भावांमध्यें परस्परांबद्दल सारखेंच बंधुप्रेम असलें तरी त्यांतल्या त्यात राम-लक्ष्मण व भरत-शत्रुघ्न याना एकमेकांविषयीं विशेष जवळीक वाटे. आणि या दोन जोड्या गुणांनीं सारख्याच असल्या तरी त्यांतल्या त्यांत रामाचें तेज जवळच्या आणि दूरच्या लोकांना अधिक स्पृहणीय झालें होतें. याचा परिणाम असा झाला कीं विश्वमित्रऋषि एके दिवशीं दशरथाकडे येऊन म्हणाले, " राजा, माझ्या यज्ञाला राक्षसांकडून सारखे अडथळे येतात. तरी यज्ञरक्षणार्थ तुझ्या रामाला मजबरोबर पाठवून दे. " वास्तविक पाहता, ज्याच्या डोक्यावर अद्याप झुलपें आहेत असा कोंवळा आणि नवसासायासांनीं झालेला राम कोणीकडे ? आणि विश्वामित्राच्या यज्ञांत विघ्न आणणारे ते क्रूर राक्षस कोणीकडे ? पण तेज हें कांहीं वयावर नसतें; व दशरथहि असली विचित्र मागणी सुद्धां नाकारण्याइतका कच्च्या दिलाचा नव्हता. त्यानें मोठ्या खंबीर मनानें व औदार्यानें रामाला व त्याचे सागाती लक्ष्मणालाहि विश्वामित्राबरोबर तपोवनांत पाठविण्याची तयारी ताबडतोब केली. निघण्यापूर्वी ते दोघे आज्ञाधारक कुमार आपलीं छोटींशीं धनुष्यें पाठीला लावून वडलांच्या पायां पडले, व त्याच क्षणीं वडलाच्या नेत्रातूनहि त्या दोघांवर प्रेमाश्रु पडले. विश्वामित्रानें दिलेल्या मंत्राच्या सामर्थ्यामुळें राम-लक्ष्मणांस वाटचालीचे श्रम फारसे झाले नाहींत. पुढें सूर्यासारखा तेजस्वी विश्वामित्र व त्याच्यामागून मधु माधव याच्या रमणीय जोडीप्रमाणें राम-लक्ष्मण मोठ्या उत्साहानें चालले होते. त्या कुमाराना वाटचालीचे श्रम न व्हावे म्हणून सगळें वन आपल्या समृद्धीनें त्या दोघां कुमारांस रिझवीत होतें व विश्वामित्रहि जुन्या कथा सागून त्यास रंजवीत होते.

**अरण्य नव्हे, रावणाचें सिंहासनच हादरलें !**

विश्वामित्र एक कथा राम-लक्ष्मणांस सांगत होते. "सुकेतु नांवाचा एक यक्ष होता. त्याच्या मुलीच्या अपराधावरून अगस्त्यऋषीनें रागावून तिला शाप दिला कीं ' तूं माणसें खाणारी भयंकर राक्षसी होशील.' इतकें बोलून ते रामास म्हणाले, ' तीच ताडका राक्षसी या वनांत रहात असून तिनें हा प्रदेश कसा उजाड करून टाकला आहे पहा ! ' असें विश्वामित्रानें म्हणतांक्षणींच त्या दोघां बालवीरांनीं आपलीं धनुष्यें सज्ज करून मोठा टणत्कार केला. तो टणत्कार निघतो न निघतो तोंच काळोख्या रात्रीसारखी काळीकभिन्न, अंगावर प्रेताचीं वस्त्रें धारण करणारी व स्मशानांतून सुटलेल्या वावटळीसारखी घोंघावणारी एक अक्राळविक्राळ राक्षसी आपल्यावर धावून येत असलेली रामाला दिसली. तिनें एक हात रामावर आघात करण्यासाठीं उचलला होता, व ठार मारलेल्या पुरुषांच्या आंतड्यांच्या माळा तिच्या गळ्यांत लोंबत होत्या. तिनें आपल्यावरच झेंप टाकलेली पहातांच रामानें एक तीक्ष्ण बाण धनुष्यास जोडला व ' स्त्रीला मारूं नये ' अशी दयाबुद्धि व तो बाण हीं दोन्ही एकदमच सोडलीं. त्या बाणानें ताडकेच्या उरांत एक मोठें भगदाड पडलें. भगदाड कसलें तें ! आजपर्यंत राक्षसांत प्रवेश न मिळालेल्या क्षुधित यमराजाचें नवीन उघडलेलें तें एक प्रवेशद्वारच होतें ! निष्प्राण होऊन तें ताडकेचें धूड जमिनीवर कोसळतांच तें सबंध अरण्य हादरलें व त्याजबरोबर त्रिभुवनाच्या पराजयानें स्थिर समजलें जाणारें रावणाचें सिंहासनहि हादरलें ! त्या पराक्रमानें विश्वामित्रास संतोष होऊन त्यानें रामाला राक्षससंहारक असें एक दिव्य अस्त्र समंत्रक दिलें.

"हा पण मीं उगीचच केला."

अशा तऱ्हेनें प्रवास करून विश्वामित्राच्या यज्ञभूमीवर हे तिघे येऊन पोहोंचले. यज्ञांत राक्षसांचे अडथळे येतच होते. एकदां तर यज्ञवेदीवर आकाशांतून रक्ताचा सडाच पडला ! त्यामुळें याज्ञिकांची गाळण उडाली. पण क्षत्रियाचा बच्चा राम मात्र डगमगला नाहीं. त्यानें वर पाहिलें तों त्यास आकाशांत संचार करणारें राक्षसांचें एक मोठें सैन्य दिसलें. रामानें लागलीच ताडकेचा मुलगा मारीच, मायावी सुबाहु इत्यादि म्होरक्यांना ठार

करून राक्षससेना पिटाळून लावली व अशा तऱ्हेनें यज्ञांत येणारीं विघ्नें दूर केलीं. पूर्णमनोरथ झालेल्या विश्वामित्रांनीं त्या बालवीरांची पाठ थोपटली. याच सुमारास जनकानें मिथिला नगरींत एक यज्ञ आरंभिला होता. त्यासाठीं त्यानें विश्वामित्रास निमंत्रण दिलें. रामलक्ष्मणांनींहि जनकाजवळ असलेल्या (परशुरामाच्या) अवजड धनुष्याची कीर्ति ऐकली होती व तें प्रत्यक्ष पाहण्याची त्यांना जिज्ञासा होती. म्हणून त्यांनाहि बरोबर घेऊन विश्वामित्र मिथिलेस जाण्यास निघाले. वाटेंत शिळा होऊन पडलेल्या अहल्येचा उद्धार आपल्या पदरजानें करून राम विदेहनगरीला आला. विश्वामित्रांनीं 'रामास तुमचें धनुष्य पाहावयाचें आहे' असें जनकास सांगितलें. दशरथराजाच्या त्या राजबिंड्या पुत्रास पाहून व विशेषतः त्याची रमणीय व कोमल तनु पाहून जनकाला आपल्या पणाचा पश्चात्ताप झाला. तो म्हणूं लागला, " माझ्याजवळील शिवधनुष्य जो उचलील, म्हणजेच माझ्या कन्येसाठीं धनुष्य उचलण्याचें शुल्क (मुलीच्या बापास द्यावयाचें द्रव्य) जो देईल, त्यासच मी माझी मुलगी सीता देईन असा निश्चय मीं उगाच केला." तो विश्वामित्रास म्हणाला, " अहो याच्याच्यानें हें धनुष्य कसचें उचलवतें ? शेंकडों मल्ल्या मल्ल्या राजेश्वरांनीं या धनुष्यापुढें हात टेकले आहेत." पण विश्वामित्रानें त्याला रामाच्या शक्तीबद्दलचें आश्वासन दिल्यानें जनकानें तें शिवधनुष्य अनेक मल्ल पाठवून त्या स्थळीं आणलें. रामानें तें तात्काळ उचलून त्यास दोरी लावली. दोरी लावीत असतां फार ताण बसल्यामुळें तें धनुष्य ताड्कन् मोडलें. मोडणाऱ्या या धनुष्याच्या आवाजानें खुनशी परशुरामास जणूं कांहीं खबर दिली कीं, " तूं निर्वंश केलेली क्षत्रियजात पुन्हा उत्पन्न झाली." जनकानें मोठ्या आनंदानें सीता रामास देऊं केली व दशरथास बोलावून घेऊन मोठ्या समारंभानें विवाहविधि पार पाडला व त्याच समारंभांत लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांचीं लग्नें केलीं. लक्ष्मणाला जनकाची औरस मुलगी उर्मिला, व भरत-शत्रुघ्नांस जनकाचा धाकटा भाऊ कुशध्वज याच्या दोन मुली मांडवी व श्रुतकीर्ति देण्यांत आल्या. अशा तऱ्हेनें दशरथानें चार सुनमुखें पाहिलीं !

**लग्नांतून विघ्न !**

लग्नसोहाळा आटपून आपल्या मुलांसुनांना घेऊन परिवारासह दशरथ

परत अयोध्येस चालला. कांहीं मुक्कामांनंतर त्याला वाटेंत मोठे अपशकुन होऊं लागले. सूर्यामोवतीं खळें पडलें, दिशा काळवंडल्या, भालू ओरडूं लागल्या आणि उलट वारे वाहूं लागले. या अपशकुनांनीं घाबरलेला दशरथ आपल्या गुरूंस त्याविषयीं कांहीं प्रश्न विचारीत आहे तोंच त्याच्या सैन्यासमोर एक देदीप्यमान उग्र पुरुष उभा ठाकला. त्याच्या गळ्यांत एक यज्ञोपवीत असून खांद्याला धनुष्य अडकविलेलें होतें. त्यामुळें चन्द्राशीं संयुक्त असलेल्या सूर्याप्रमाणें व सापानें वेष्टिलेल्या चंदनवृक्षाप्रमाणें तो दिसला. ज्यानें आपल्या मातेचा वध करून अंतःकरणांतील करुणा समूळ नाहींशी केली होती, ज्याच्या गळ्यांतील एकवीस अक्षबीजांच्या माळेवरून ज्यानें एकवीस वेळां क्षत्रसंहार केल्याचें ध्वनित होत होतें व ज्यानें आपल्या पित्याच्या वधाचा सूड उगवण्यासाठीं सबंध क्षत्रियांची जात नामशेष करण्याचें कंकण बांधलें होतें, त्या परशुरामाला आपल्यापुढें अचानक येऊन उभा राहिलेला पाहिल्याबरोबर दशरथाला फार भय वाटलें. आपण वृद्ध झालों आहों व आपलीं मुलें तर अजून लहान आहेत. त्यामुळें आपणांस या परशुरामाचा प्रतिकार करतां येणार नाहीं याचा त्याला विषाद वाटला. म्हणून परशुरामापुढें नमतें घेण्यासाठीं तो आपल्या सेवकांना म्हणाला, "अरे मुनिवर्यांस अर्घ्य आणा, धांवा लवकर." पण परशुरामानें दशरथाकडे लक्षहि दिलें नाहीं व जेथें राम उभा होता तेथें जाऊन त्यास तो दरडावून म्हणालाः—

"रामा, निजलेल्या सापास डिवचून जागें करावें त्याप्रमाणें तुझ्या पराक्रमानें माझ्या सुप्त अभिमानाला डिवचलें आहे. जनकाकडील माझें धनुष्य तूं मोडलेंस याचा अर्थ माझ्या पराक्रमाचें नाकच तूं कापलेंस असें मी समजतों. तुझा जिवेंपर्यंत माझ्याच्यानें स्वस्थ बसवणार नाहीं. तूं शिवधनुष्य मोडलेंस यांत कांहींच अर्थ नाहीं. माझ्या हातचें हें धनुष्य घे व याला बाण लाव. तुझ्याशीं युद्धच कशाला? जरी तूं एवढेंच केलेंस तरी तूं मला जिंकलेंस असें मी समजेन; पण तुला जर माझ्या उग्र परशुधारेची भीति वाटत असेल तर हात जोडून मला शरण ये."

**जिंकलेल्या शत्रूला नमन!**

परशुरामाचें हें भाषण ऐकून रामानें मंद स्मित केलें; व धीरगंभीरपणें

परशुरामाचें धनुष्य त्याचे हातून त्यानें घेतलें. हेंच रामाचें त्याला प्रत्युत्तर ! रामानें तें धनुष्य क्षणार्धांत वाकविलें व त्याला बाण जोडला. परशुराम निस्तेज झाला. राम त्याला म्हणाला, "तूं माझा अपराध केला असलास तरी तूं ब्राह्मण; म्हणून तुला मला शासन करावयाचें नाहीं. पण अडचण एकच आहे. आणि ती म्हणजे मीं लावलेला बाण परत घेत नसतों. तेव्हां बोल. या बाणानें तुझी गति नाहींशी करूं कीं यज्ञानें तूं मिळविलेल्या स्वर्गलोकाचा मार्ग रोधून टाकूं !" यावर परशुराम नम्रपणें बोलला, "रामचंद्रा, तूं प्रत्यक्ष आदिपुरुष आहेस हें मी निश्चित जाणतों. पण पृथ्वीवर अवतार घेऊन आलेल्या तुझें दैवी तेज पहावें या हेतूनेंच तुला मीं जरा डिंवचलें; दुसरें कांहीं नाहीं. मला आतां मिळवावयाचें असें कांहींच नाहीं. मला स्वर्गहि नको आहे. म्हणून तीर्थाटनासाठीं माझी गति कायम ठेव व माझा स्वर्गमार्ग बंद करून टाक हवा तर." तें ऐकून रामानें पूर्वेकडे तो बाण सोडून दिला व परशुरामाच्या स्वर्गाच्या प्रवेशद्वाराला, जणों काय, कायमचा अडसरच लाविला. इतकें झाल्यावर विनयशील रामानें परशुरामाचे पाय धरून म्हटलें, "तपोनिधे, मजकडून घडलेल्या या उपमर्दाबद्दल मला क्षमा असावी." पराक्रमानें जिंकलेल्या शत्रूंशीं नम्रपणें वागणें यांतच बाहुशाली क्षत्रियांची खरी संस्कृति दिसून येते !" परशुराम आपल्या वाटेनें निघून गेल्यावर दशरथाला हायसें वाटलें. तो अयोध्येस पोहोंचला. तों सीतेला पहाण्यासाठीं तेथील खिडक्या स्त्रियांनीं नुसत्या फुलून गेल्या होत्या.

## रामाच्या पादुकांचें राज्य !

मंदावत चाललेल्या दीपाप्रमाणें दशरथ आतां क्षीणतेज झाला अस-ल्यानें त्यानें रामास राज्याभिषेक करण्याचें ठरविलें. पण कैकेयीच्या तोंडून, दोन कृष्णसर्पिणींप्रमाणें, दोन दुष्ट इच्छा अचानकपणें बाहेर पडल्या. १ रामानें चौदा वर्षें वनवासास जावें, व २ भरताला राज्याभिषेक व्हावा. या विषारी फूत्कारांनीं दशरथ व्याकुळ झाला व प्रजा कष्टी झाली पण रामानें पित्याचे शब्द खरे करण्यासाठीं कैकेयीच्या या दोनहि इच्छा मानल्या व तो लक्ष्मण व सीता यांसह वल्कलें परिधान करून वनांत गेला. या धक्क्यानें दशरथ निवर्तला. प्रधानांनीं मातुलगृहीं गेलेल्या भरतास

बोलावून आणिलें. त्याला आपल्या आईचें हें आत्मघातकी वर्तन नापसंत झालें. तो ताबडबोब रामाच्या मागें धावत गेला. चित्रकूट मुक्कामीं या भावांची गांठ झाली. पण रामानें परत फिरण्याचें नाकारलें. तेव्हां भरतानें त्याच्या पादुका अयोध्या राज्यावर स्थापल्या वे आपण विरक्तपणें नन्दिग्रामांत राहून राज्य चालवूं लागला.

**पायीं गेलेला राम पुष्पक विमानानें परतला.**

रामाचा कष्टमय वनवास सुरू झाला. वाटेंत अनेक राक्षसांनीं उपस्थित केलेलीं संकटें दूर करीत व अनेक मुनींचे पुण्यपावन आश्रम पहात राम दक्षिणेकडे चालला. पंचवटीमधील निवासांत त्यानें शूर्पणखेच्या विडंबनानें कोपलेल्या खर, दूषण, त्रिशिर इत्यादि राक्षसांचा संहार केला. पिसाळलेल्या शूर्पणखेनें हें सर्व वृत्त रावणास सांगितलें. त्यामुळें चिडून जाऊन कपटानें त्यानें सीतेला लंकेस पळवून नेलें. जटायूकडून हें वृत्त रामास समजल्यावर त्यानें सुग्रीवाशीं सख्य करून वानरांचा मुख्य हनुमान् यास सीतेच्या शोधार्थ पाठविलें. लंकेंत सीतेचा तपास लावून तिला आश्वासन देऊन व लंका जाळून मारुति परत रामाकडे आला. नंतर वानरांची प्रचंड सेना घेऊन व सेतूनें समुद्र उल्लंघून रामानें लंकेस वेढा दिला. तेथें घनघोर युद्ध झालें व शेवटीं रामानें रावणाचा सपरिवार निःपात केला. देवांनीं दुंदुभि वाजविल्या व रामावर पुष्पवृष्टि केली. देवांचा बंदिवास संपला. अग्निदिव्यानें शुद्ध झालेल्या सीतादेवीचा रामानें स्वीकार केला. बिभीषणाला लंकाराज्यावर स्थापिलें व रावणाकडून जिंकून घेतलेल्या 'पुष्पक' विमानानें तो मित्रपरिवारासह अयोध्येकडे यावयास निघाला.

**आकाशांतून भारतभूदर्शन.**

पुष्पक विमान लंकेंतून उंच अन्तरिक्षांत गेल्यावर राम सीतेला तेथून दिसणारे भारतभूमीचे रमणीय भाग दाखवूं लागला. मलय पर्वतापर्यंत सेतूनें विभागलेल्या सागराचें वर्णन रामानें प्रथम केलें. त्यात कोठें कोठें तिमी नांवाच्या अजस्र माशांच्या सच्छिद्र डोक्यांतून पाण्याचीं कारंजीं उडत होतीं, कोठें समुद्र-सर्प वारा पिण्यासाठीं किनाऱ्यावर पसरलेले दिसत असून त्यांच्या डोक्यांवरील मणि सूर्यप्रकाशांत चमकत होते. नंतर पंचवटी प्रदेशावर विमान आल्यावर रामानें तेथील आपल्या वसतीच्या खुणा सीतेस

वरून दाखविल्या. तसेंच तेथें तप करीत असलेले तपस्वीहि तिच्या नजरेस आणले. पुढें चित्रकूट पर्वत सीतेला दाखवून रामानें प्रयागाजवळील गंगा-यमुनासंगमाचें वर्णन केलें. तेथें गंगेच्या शुभ्र जलप्रवाहांत यमुनेचें कृष्णवर्ण उदक मिसळल्यामुळें तीं कोठें मोती व इंद्रनील मणि यांच्या हारासारखी, तर कोठें श्वेतकमलें व नीलकमलें यांच्या मालेसारखी, कोठें मधून मधून निळें आकाश दिसत असलेल्या शुभ्र आणि विरल शरन्मेघमालेसारखी तर कोठें कृष्णसर्पानें वेष्टित अशा शंकराच्या शुभ्र तनूसारखी दिसत होती. अखेर विमानांतून दिसत असलेल्या सरयू नदीचें वर्णन रामानें केलें. तेथून त्याला आपल्या भेटीस येत असलेल्या भरताचें सैन्यहि दिसलें. वल्कलें नेसलेला व रामाच्या स्वागतासाठीं हातीं अर्घ्य घेऊन अमात्य आणि कुलगुरु यांसह सेनेच्यापुढें चालत असलेला भरत रामाला दिसला. रामाच्या आज्ञेनें विमान खालीं उतरलें. सर्वांच्या गांठी झाल्या. रामानें सुग्रीव, विभीषण वगैरेंच्या ओळखी भरतास करून दिल्या. अखेर भरतानें मोठ्या आदरानें आपलें शिर जानकीच्या पायांवर ठेवलें. लंकाधिपति रावणाच्या प्रेमयाचना लाथाडून लावणारे ते सीतेचे चरण व ज्येष्ठभ्राता रामचंद्र याच्याप्रमाणेंच व्रतस्थ राहणाऱ्या भरताचें तें जटिल शिर परस्परसंयोगानें एकमेकांना पुण्यप्रद झालें. शेवटीं राम अयोध्येच्या बाहेरील उपवनांत उतरला.

**भरलेल्या घरांतून पुन्हां वनाकडे !**

तेथें त्यानें कौसल्या व सुमित्रा या मातांचें दर्शन घेतलें. दोघींनीं दोघां पुत्रांना अलिंगिलें. आनंद आणि दुःख यांच्या मिश्रणानें त्यांचे ऊर दाटून आले. दोघांच्या अंगांवरून त्यांनीं हात फिरविला. तेव्हां त्यांना तेथें राक्षसांच्या शस्त्रांनीं झालेल्या जखमांचे वण लागले. जखम ओली असतांना जसा तिला मृदु स्पर्श करावा तसा त्या वणांना स्पर्श करतांना त्या प्रेमळ मातांना वाटलें, 'क्षत्रियांगनांना इष्ट असलेली 'वीरमाता' ही पदवी आम्हांला नसलेली पुरवली.' नंतर सर्वांनीं मिळून रामास राज्याभिषेक केला व राजा रामचंद्र मोठ्या थाटानें चौदा वर्षांपूर्वी सोडलेल्या अयोध्येंत प्रवेशला. वाड्यांत आल्यावर त्यानें कैकयीच्या मनाचा संकोच उदार वचनांनीं दूर केला व इष्टमित्रांस आपापल्या ठिकाणीं पोहोंचवून तो प्रजेचें पुत्रवत् पालन करूं लागला. कांहीं कालानें सीतेला डोहाळे लागले. 'काय

इच्छा आहे' असें रामानें विचारतांच ती म्हणाली, "पुनरपि एकदां भागीरथीच्या तीरावर तपोवनांत राहावें असें मला वाटतें." रामानें तिची इच्छा पूर्ण करण्याचें वचन दिलें. दरम्यान आपल्या गुप्तहेरांकडून रामास असें समजलें कीं, राक्षसाच्या घरीं राहिलेल्या सीतेच्या चारित्र्याबद्दल पौरजनांना शंका येत आहे. तेव्हां त्यास मोठा धक्का बसला. सीता शुद्ध आहे हें त्यास माहीत होतें. शिवाय तिनें अग्नि-दिव्य करून आपली शुद्धता सिद्ध केली होती. तथापि राजा या नात्यानें प्रजेची शंकाकुल वृत्ति असतांना सीतेला जवळ ठेवावी असें त्यास वाटेना व त्यानें तिला टाकून देण्याचा निश्चय केला. हा त्याचा निश्चय त्याच्या बंधूना अमान्य होता. पण करतात काय ? ज्येष्ठ बंधु व राजा असलेल्या रामापुढें त्यांचा इलाज चालेना. डोहाळे पुरविण्याच्या निमित्तानें रामानें लक्ष्मणाकरवीं सीतेची गंगेपलीकडील अरण्यांत पाठवणी केली. रामाचा खरा हेतु लक्ष्मणाकडून कळतांच तिला पराकाष्ठेचें दुःख झालें व तिनें रामास लक्ष्मणाबरोबर एक निरोप पाठवला, "राजा, लोकापवादावरून तूं मला टाकलेंस हें तुझ्या कुलाला व विद्वत्तेला शोभत नाहीं. तुझ्या इच्छे-प्रमाणें मी या अरण्यांत तुझेंच कल्याण चिंतीत राहीन व पुढील जन्मीं तूंच पति मला मिळावास अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करीन." हा निरोप घेऊन लक्ष्मण परत गेल्यावर सीतेला रडें कोसळलें. तिच्या रोदनाचा आवाज ऐकून समिधा आणण्यासाठीं त्या वनांत आलेले वाल्मीकि मुनि तेथें आले. त्यांनीं तिचें सांत्वन करून तिला आपल्या आश्रमांत नेलें. तेथें ती तपस्विनींमध्यें वल्कलें धारण करून व्रतवैकल्यात दिवस घालवूं लागली. इतक्यांत तिला अशी वार्ता समजली कीं रामाचे यज्ञ चालू आहेत. पण त्यासाठीं दुसरें लग्न न करता आपलीच प्रतिमा यजमानपत्नी म्हणून त्यानें जवळ ठेवली आहे. यामुळें दुःखांत सुख वाटून सीतेच्या मनांतील परित्यागाचा खेद काहींसा कमी झाला.

**आईला तेवढाच चिरंगुळा.**

इकडे राम पृथ्वीचें पालन करीत असतां यमुनातीरावरील कांहीं ऋषि एकदां रामाकडे आले व म्हणाले कीं, "'लवण' नांवाचा राक्षस आमच्या यज्ञांत विघ्न आणीत आहे तरी आमचें रक्षण करावें." रामानें लागलीच

त्यांस आश्वासन देऊन शत्रुघ्नाला लवणासुराचें शासन करण्यास पाठवलें. शत्रुघ्न मोठें सैन्य घेऊन चालला असतां वाटेंत वाल्मिकीच्या तपोवनांत वसतीस राहिला. त्याच रात्रीं सीता प्रसूत होऊन तिला दोन पुत्र झाले. शत्रुघ्नाला हें वृत्त ऐकून फार आनंद झाला व प्रातःकाळीं मुनींचा निरोप घेऊन तो पुढें निघाला. पुढें लवणासुराची व शत्रुघ्नाची गांठ पडून दोघांचें युद्ध झालें. त्यांत शत्रुघ्नानें लवणासुरास एका बाणानें ठार केलें. यमुनेच्या तीरावर शत्रुघ्नानें मथुरा नांवाची नगरी वसाविली. इकडे वाल्मीकि मुनींनीं सीतेच्या दोन पुत्रांचे संस्कार यथाविधि करून त्यांचीं 'कुश' आणि 'लव' अशीं नांवें ठेवलीं. योग्य वेळीं त्यांना सांगवेद शिकवून आपण रचलेलें आद्यकाव्य– रामायण– पाठ करून गावयास लाविलें. रामाचें हें पुण्यपावन चरित्र हीं दोन्ही मुलें आईच्या समोर म्हणूं लागलीं कीं तिची विरहव्यथा किंचित् कमी होत असे. तिला तेवढाच विरंगुळा होई. शत्रुघ्नाला शत्रुघाती व सुबाहु असे दोन मुलगे पूर्वी झाले होते. त्यांना त्यानें मथुरा व विदिशा या दोन नगरींच्या राज्यावर स्थापिलें आणि तो अयोध्येस रामाकडे परतला. लवणासुरास मारून आलेल्या शत्रुघ्नाचें रामानें अभिनंदन केलें. त्यानें आपल्या स्वारीचा सर्व वृत्तान्त रामास सांगितला पण सीतेला पुत्र झाल्याचें मात्र त्यानें त्यास कळविलें नाहीं.

## अपमृत्यु कां झाला ?

एकदा एका ब्राह्मणाचा अल्पवयी मुलगा एकाएकीं वारला. तेव्हां तो ब्राह्मण रामाच्या राजवाड्यापुढें येऊन रडूं लागला व म्हणाला, "हे पृथ्वि ! दशरथाच्या हातून रामाकडे आल्यामुळें ही तुझी कोण शोचनीय अवस्था झाली आहे !" ब्राह्मणाच्या या शोकांतील खोंच रामाच्या ध्यानांत आली. कारण इक्ष्वाकु कुलांतील नृपतींच्या राज्यांत अकाल-मृत्यु होत नसे रामानें ब्राह्मणास आश्वासन दिलें व ब्राह्मणाच्या पुत्राला नेणाऱ्या प्रत्यक्ष यमाचें शासन करण्यास तो पुष्पक विमानांतून निघाला. इतक्यात आकाशवाणी झाली कीं, " राजा, तुझ्या प्रजेमध्यें अधर्म झाला आहे. त्याचा शोध करून तो नाहींसा कर." ती ऐकून वर्णधर्मांतील अनाचार दूर करण्यासाठीं राम विमानांतून वेगानें चालला. एके ठिकाणीं रामाला एक तपस्वी आढळला. त्यानें झाडाच्या फांदीस

आपल्यास उलटें टांगून घेतलें होतें व स्वर्गाच्या आशेनें तो धूम्रपानाचें व्रत करीत होता. 'तुझें नाव काय ?' असें रामानें विचारतांच तो म्हणाला, "माझें नांव शंबूक. मी जातीचा शूद्र आहें." शूद्रास असल्या तपाचा अधिकार नाहीं त्यामुळें हा अनाचार होत असून तोच अनर्थाला कारणीभूत आहे असें जाणून रामानें त्याचा शिरच्छेद करण्यासाठीं हातांत शस्त्र घेतलें व एका आघातानें त्याचा शिरच्छेद केला. प्रत्यक्ष रामाच्या हातानें मृत्यु आल्यानें शंबुकास स्वर्गप्राप्ति झाली. राम तिकडून अयोध्येस परत येण्यापूर्वीच ब्राह्मणाचा मृत पुत्र जिवंत झाला होता.

**'अरे ! हे अगदीं रामासारखे दिसतात !'**

रामानें अश्वमेध यज्ञास सुरवात करून संचारार्थ अश्व सोडला. यज्ञासाठीं ठिकठिकाणचे राजे, राक्षस, वानर व महर्षि जमले. यजमानपत्नी म्हणून सीतेची हिरण्मयी प्रतिमा ठेवण्यांत आली होती.

या यज्ञाचा विशेष असा होता कीं, त्याला यथाशास्त्र लागणाऱ्या सामग्रीपेक्षां किती तरी पट सामग्री तेथें सिद्ध होती व नेहमीं यज्ञविघात करणारे राक्षसच त्याचे रक्षक होते ! कुश व लव हे दोघे वाल्मिकीचें रामायण गात ठिकठिकाणीं फिरत असत. वाल्मीकिसारख्याचें काव्य, रामाच्या चरित्रासारखा विषय व त्यांचा गोड आवाज मग त्या काव्यगायनानें श्रोते वेडे कां नाहीं होणार ? ही गोष्ट रामाच्या कानांवर गेली. त्यामुळें त्यानें त्या मुलांस आपल्यापुढें तें काव्य गावयास बोलाविलें. काव्यगायन चालू असतां लोकांना विशेष आश्चर्य वाटलें तें त्या मुलांच्या आणि रामाच्या तोंडावळ्यांतील सारखेपणाचें. रामानें मोठ्या प्रेमानें त्यांस फार मोठी बिदागी दिली व विचारलें, "बाळांनो, हें काव्य कोणाचें ? व हें गावयास तुम्हांला कोणीं शिकविलें ?" याचें उत्तर 'वाल्मीकि' असें येतांच राम वाल्मिकीकडे गेला व त्यानें आपलें सर्व राज्य त्यास अर्पण केलें. त्यावर वाल्मिकीनें रामास कुशलवाचा खरा वृत्तान्त सांगितला व 'पतिव्रता जानकीचा स्वीकार कर' असें रामास मोड्या कळवळ्यानें विनविलें. यावर राम म्हणाला, "मुने, तिचें अग्निदिव्य आम्हीं प्रत्यक्षच पाहिलें आहे. पण रावणाच्या दुराचारी वृत्तीमुळें अयोध्यावासीजनांचा तिच्या शुद्धतेवर विश्वास बसला नाहीं. तरी माझें म्हणणें एवढेंच कीं, तिनें पुन्हा एकदा, लोकांसमक्ष, आपलें चारित्र्य शुद्ध

असल्याचें सिद्ध करून त्यांची खात्री पटवावी म्हणजे मी तिचा पुत्रांसमवेत स्वीकार करतों. ''

**'वसुंधरे, मला पोटांत घे !'**

वाल्मिकीनें हें मान्य करून सीतेला सर्वांपुढें आणविली व 'वत्से, आपल्या शुद्धतेची साक्ष पटव ' असें तिला सांगितलें. तिच्या काषायवस्त्रावरून व तिच्या प्रशान्त मुद्रेवरून तिचें पावित्र्य कोणालाहि ताडतां येण्यासारखें होतें. तिनें आचमन केलें व ती पृथ्वीस उद्देशून मोठ्यानें म्हणाली, "वाणी, मन व कर्म यांनीं माझ्या पतीशीं मीं यत्किंचित्सुद्धां प्रतारणा केली नसेल तर, हे माते धरित्रि, तूं मला आपल्या पोटांत घे." हे शब्द ती उच्चारीत आहे तोंच नागफणांच्या सिंहासनावर बसलेली वसुंधरा जमीन दुभंगून प्रकट झाली ! तिनें सीतेला आपल्या मांडीवर बसविलें आणि राम 'नको नको' म्हणत असतां तिच्यासह ती पाताळांत गुप्त झाली. राम सीतेला पृथ्वीकडून परत हिसकावून आणण्याचा प्रयत्न करूं लागला. पण 'होणाऱ्यापुढें उपाय नाहीं' असें सांगून मुनीनें त्याला शान्त केलें. रामानें आतां सीतेवरचें प्रेम लवकुशांवरच केंद्रित केलें व तो कालक्रमणा करूं लागला.

**पुढच्या पिढीची व्यवस्था.**

सिन्धु देशांत गंधर्वांनीं बंडाळी माजविली होती. ती आपल्या मामाच्या— युधाजिताच्या— इच्छेप्रमाणें मोडून भरतानें गंधर्वांना शस्त्रांऐवजीं हातांत वीणा घ्यावयास लावलें व तेथील तक्षशिला व पुष्कलावती या दोन राजधान्यांमध्यें आपल्या तक्ष व पुष्कल या पुत्रांस सुस्थिर करून भरत रामाकडे आला. रामाच्या अनुमतीनें अंगद व चंद्रकेतु या आपल्या दोन पुत्रांना लक्ष्मणानें 'कारापथ' देशाचें अधिपति केलें. रामानें आपले पुत्र कुश व लव यांना अनुक्रमें कुशावती व शरावती या दोन राजधान्यांमध्यें स्थापिलें. शत्रुघ्नाच्या दोन पुत्रांची व्यवस्था मथुरा व विदिशा येथें लागली होतीच. याप्रमाणें पुढील पिढींची व्यवस्था रामानें आपल्या देखत लावली, व तो आपल्या निर्वाणाची वाट पहात राहिला.

**एकामागून एक जाऊं लागले.**

रामाच्या कुटुंबांतील माणसें हळूहळू महाप्रस्थानाला जाऊं लागलीं. कौसल्यादि माता प्रथम गेल्या. पुढें एकदां प्रत्यक्ष काल मुनिवेषानें रामाकडे आला व म्हणाला, " तुझ्याशीं मला कांहीं एकान्त करावयाचा आहे. पण आम्ही बोलत बसलों असतां तेथें जो येईल त्याचा तुला त्याग केला पाहिजे ! " रामानें ही गोष्ट मान्य केल्यावर काल आपलें रूप प्रकट करून त्यास म्हणाला, " परमेश्वराच्या आदेशानें तुला आतां स्वर्गाकडे यावयास पाहिजे." हें त्यांचें बोलणें चाललें असतांना रामाला भेटण्यासाठीं दुर्वास-ऋषि आले व द्वारांत बसलेल्या लक्ष्मणाला ' रामाची गांठ मला ताबड-तोब पाहिजे ' असें म्हणूं लागले. लक्ष्मणाला माहीत होतें कीं या वेळीं रामाकडे जाणें म्हणजे समयभंग आहे. इकडे आड व तिकडे विहीर अशी त्याची स्थिति झाली. शेवटीं दुर्वासाच्या शापभयानें तो रामाकडे गेलाच. पण असें करण्यांत रामानें मुनीला दिलेलें वचन त्यानें मोडलें होतें. म्हणून तें खरें करण्यास तो साधुपुरुष, लक्ष्मण, शरयुतीरीं गेला व त्यानें योग-मार्गानें देहत्याग केला. लक्ष्मण गेल्यानें रामाचा एक हात मोडल्यासारखा झाला. पुढें एके दिवशीं रामानें आपले दोन भाऊ बरोबर घेतले व हातांत अग्नि घेऊन तो उत्तरेकडे चालूं लागला. अयोध्यानगरीहि आपल्या अधीश्वराच्या मागें निघाली. रामाचा हेतु जाणून वानर व राक्षसहि त्याच्यामागें चालूं लागले. अयोध्यावासी लोक सर्वांच्या मागें चालल असून ते आपल्या अश्रूनीं रामार्चीं मार्गावर उमटलेलीं पावलें भिजवीत होते. रामासाठीं सरयुतीरीं विमान आलें. राम जातो हें पाहतांच सर्वांनीं सरयूमध्यें उड्या घेतल्या. आपल्या भक्तांवर अनुग्रह करणाऱ्या रामानें त्या सर्वांस जणों काय सरयूची शिडी करून स्वर्गास नेलें. ज्या ठिकाणीं राममक्तांनीं सरयूत उड्या टाकल्या तें ठिकाण पुढें 'गोप्रतरतीर्थ' या नांवानें प्रसिद्ध झालें. रामाचें अवतारकार्य पूर्ण झालें होतें. त्यानें रावणास मारून देवांना बन्धमुक्त केले होतें; आणि दक्षिणदिशेस चित्रकूटावर बिभीषण व उत्तरादिशेस गंधमादनावर हनूमंत असे दोन चिरंजीव कीर्तिस्तंभच उभारले होते. येवढें करून तो आतां आत्मरूपांत विलीन झाला हें उचितच झालें.

## ओसाड अयोध्या दुःखानें बोलली !

राम निजधामास गेल्यावर लव, तक्षक, पुष्कर, अंगद, चंद्रकेतु, शत्रुघाती व सुबाहू या सात बंधूंनीं आपला ज्येष्ठ भ्राता कुश यासच अधिराज मानलें व ते त्यास कर देऊं लागले. बंधुप्रेम ही इक्ष्वाकुकुलाची पूर्वपरंपराच होती. याप्रमाणें कुश कुशावतीमध्यें राज्य करीत असतां एक चमत्कार घडला. एके दिवशीं मध्यरात्रीं आपल्या शयनमंदिरांत कुश जागाच होता. सर्व रक्षकवर्ग निजलेला होता. अशा वेळीं तेथें आलेली एक स्त्री त्याला दिसली. पति प्रवासास गेल्यावर त्याच्या पत्नीचा जसा वेष असतो तसा तिचा होता. तिनें कुशाचा जयजयकार केला व ती हात जोडून उभी राहिली. आरशांत जसें प्रतिबिंब शिरावें त्याप्रमाणें बंदिस्त मंदिरांत अचानकपणें शिरलेल्या त्या स्त्रीला कुश आश्चर्यानें म्हणाला, " बाई, आपला चेहेरा दुःखी दिसतो आहे. आपण कोण ? कोणाच्या ? व या ठिकाणीं कां आलांत ? रघुवंशांतील राजांचें मन परस्त्रीस्पर्शाला विमुख असतें हें आपल्याला माहीत आहे ना ? "

यावर ती स्त्री म्हणाली, " राजा, मी अयोध्यानगरीची अधिदेवता आहें. तुझ्या वडिलांनीं निजधामास जातांना आपल्याबरोबर अयोध्यावासी लोकांसहि नेलें. त्यामुळें आतां ती नगरी ओसाड पडली आहे. सूर्यवंशांतल्या राजांच्या पराक्रमानें व सुराज्यानें मी कुबेराची अलकापुरी किंवा इंद्राची अमरावती यांच्याहूनहि वरचढ होतें. पण तुझ्या कारकीर्दीत माझी अशी करुणास्पद स्थिति झाली आहे. राजा, पूर्वी जेथें रात्रौ अभिसारिकांचा नादमधुर संचार चाले, तेथें आतां आपल्या तोंडांतील ज्वाळांच्या उजेडांत मासाचे तुकडे शोधणाऱ्या भालू सैरावैरा हिंडत असतात. पूर्वी जेथील पुष्करणींच्या पाण्यावर जलक्रीडा करणाऱ्या प्रमदांनीं ताडन केल्यामुळें त्याचा मृदंगासारखा मधुर आवाज निघे, त्याच पाण्यांत आज रानरेडे बसत आहेत व त्यांच्या शिंगांच्या आघातानें त्याच पाण्याचा रडका आवाज निघत आहे. पूर्वी जेथल्या राजवाड्यांतील जिन्यांच्या पायऱ्यांना विलासवती ललनांच्या पायांचा अळिता लागावयाचा, तेथें आतां हरणांच्या रक्तानें माखलेल्या वाघांच्या पावलाचे ठसे उमटलेले असतात. राजा, राजवाड्यांतील भिंतींवर पूर्वी हत्तींचीं चित्रें काढलेलीं असत. त्यां-

मध्यें कांहीं गजराज पद्मवनांत शिरलेले असून त्यांना हत्तिणी कमलतंतू देत आहेत असे प्रसंग चितारलेले असत. आतां हे वाडे ओसाड झाल्यानें सिंह तेथें निर्भयपणें संचार करतात व हत्तींचीं चित्रें खरीं मानून त्यांवर आपलें पंजे मारतात, व त्यांचे गिलावे ढासळून पाडतात. म्हणून तुला माझी विनंति कीं तूं कुशावतींतील आपली वस्ती सोडून दे. आणि तुझ्या कुलपरंपरागत राजधानींत येऊन राहा." 'बरें आहे' असें कुशानें म्हणतांच ती देवता अंतर्धान पावली.

**हरवलेल्या रत्नाबरोबर स्त्रीरत्नहि गवसलें !**

कुशानें ब्राह्मणांचा सल्ला घेऊन अयोध्येकडे जाण्याची तयारी केली व कुशावती नगरी ब्राह्मणांच्या हवालीं केली. अयोध्या नगरीची नवी रचना करून तो तिच्यामध्यें राहूं लागला. पूर्वीचें सर्व वैभव अयोध्येला आतां प्राप्त झालें. पुढें यथावसर ग्रीष्मऋतु सुरू झाला. कुशालाहि जल-क्रीडा करण्याची इच्छा झाली. तो आपल्या स्त्रियांसहित जलक्रीडा करीत असतां त्याच्या दंडांतील रत्नाचा अलंकार सरयूच्या पाण्यांत पडला. तें त्याच्या लक्षांतहि आलें नाहीं. स्नानानंतर अलंकार पडलेला आहे हें लक्षांत येतांच त्यानें अनेक कुशल पाणबुड्याना नदींत उतरविलें. त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले पण अलंकाराचा शोध लागेना. या अलंकारांतील रत्न अगस्त्य मुनींनीं पूर्वी रामाला दिलेलें होतें, व रामानें तें कुशास दिलें होतें. त्या-मुळें आपल्या वडिलाची आठवण म्हणून कुश त्या अलंकारास फार मानीत होता. तें अशा तऱ्हेने नाहींसें झालेलें पाहातांच त्याला खेद झाला; त्यांतून पाणबुड्यांनीं त्यास सांगितलें कीं, "महाराज, सरयूच्या डोहात राहणाऱ्या कुमुद नांवाच्या नागानें आपलें रत्न चोरलें आहे." हें ऐकून क्रुद्ध झालेल्या कुशानें आपल्या धनुष्यावर गरुडास्त्र योजिलें व तें फेकण्यास तो तीरावर उभा राहिला. डोहाचें पाणी भीतीनें उसळूं लागलें. त्या उसळ-णाऱ्या पाण्यांतून कुमुद नाग एका तरुण स्त्रीला संगें घेऊन वर आला. तें पाहून कुशानें आपलें अस्त्र मागें घेतलें. कुमुद हात जोडून कुशास म्हणाला, "राजा, माझी ही बहीण कुमुद्वती कंदुकक्रीडा करीत असतां तुझें हें रत्न अकस्मात् तिच्या हातांत पडलें. तें तूं आतां परत घे. आणि दुसरें असें कीं, तुझा अपराध करणारी ही माझी बहीण, त्या अपराधाचें

परिमार्जन तुझ्या सेवेनें करीत सदैव तुजजवळच राहील. तिचा स्वीकार कर.'' कुशानें ती विनंति मान्य करून कुमुद्वतीशीं यथाविधि विवाह लाविला. या विवाहसंबंधामुळें नागाचें गरुडभय व आयोध्यावासी जनांचें सर्पभय हीं दोनीहि नाहींशीं झालीं.

**त्यानें लोकपालांनाहि राबविलें.**

कुशाला कुमुद्वतीपासून 'अतिथि' नांवाचा पुत्र झाला कुशानें त्याजकडून प्रथम कुलाविद्यांचें अर्थग्रहण व नंतर राजकन्याचें पाणिग्रहण करविलें. इन्द्राला साहाय्य करण्यासाठीं कुशानें 'दुर्जय' नांवाच्या दैत्याशीं युद्ध केलें. त्या युद्धांत त्यानें दुर्जयास मारलें खरें. पण तोहि स्वतःच्या प्राणास मुकला. चन्द्राबरोबर कौमुदी जावी त्याप्रमाणें कुशाबरोबर कुमुद्वती सती गेली. त्या पुण्यानें तीं दोघेंहि अखंड स्वर्गवास भोगीत राहिलीं. कुशाच्या सांगण्याप्रमाणें सचिवांनीं अतिथीला मोठ्या थाटानें राज्याभिषेक केला. अभिषेकसमारंभांत अतिथीनें फार मोठीं दानें दिलीं; व पिंजऱ्यांतील पोपटांसहित कारागृहातील सर्व कैद्यांना सोडून दिलें. अभिषेकाच्या उदकानें अतिथीचें भिजलेलें सिंहासन कोरडें होतें न होतें तोंच त्याचा दुःसह पराक्रम चतुःसमुद्राच्या किनाऱ्यांपर्यंत जाऊन भिडला. वसिष्ठाचे मंत्र व अतिथीचे बाण यांचें संघटित साहचर्य असल्यावर राज्यांत असाध्य अशी कोठली गोष्ट असणें शक्य होतें ? अतिथीनें बाह्य शत्रूंबरोबरच षड्रिपु नांवाचे अन्तःशत्रूहि जिंकून टाकलें. त्यामुळें चंचल समजली जाणारी राज्यलक्ष्मी त्याचेजवळ चिरकाल राहिली. थोडक्यांत त्याचें राज्य सकलगुणैश्वर्यसंपन्न आणि अभूतपूर्व झालें. इन्द्र त्याच्या राज्यांत योग्य वेळीं वृष्टि करी, यम रोगराई होऊं देत नसे, वरुण नौकेनें व्यापार करणाऱ्यांचें हित पाही आणि कुबेर त्याचा खजिना वाढवी. याप्रमाणें हे चौघे लोकपाल मोठ्या नम्रतेनें आणि धाकानें त्याचीं कामें करीत असत.

**मधली राजवंशावळ.**

निषधदेशच्या अर्थपति नांवाच्या राजाची कन्या अतिथीची पत्नी होती. तिच्या पोटीं त्याला 'निषध' नांवाचा पुत्र झाला. प्रजेच्या कल्याणासाठीं झटणाऱ्या त्या पुत्रामुळें अतिथीला फार आनंद झाला. जीव-

लोकांतील सर्व सुखें भोगून अतिथि आपल्या धवल व पुण्य कर्मांनीं शुभ-लोकाला गेला. निषधाला 'नल' नांवाचा मुलगा झाला. नलाला 'नभस्' नांवाचा पुत्र झाला. त्याच्यावर राज्यकारभार सोपवून त्याचा पिता मोक्षमार्गाला लागला. नभस् राजाला पुण्डरीक नांवाचा मुलगा झाला. पुण्डरीकाला 'क्षेमधन्वा' नांवाचा पुत्र झाला. त्याला राज्यावर बसवून पित्यानें वनाची वाट धरली. क्षेमधन्व्याला 'देवानीक' नांवाचा पुत्र झाला. देवानिकाला 'अहीनगु' झाला. त्याला 'पारियात्र' झाला. पारियात्राला 'शिल' झाला. शिलाला 'उन्नाभ' झाला आणि त्याला वज्रणाभ झाला. यापुढें औरस-संततिक्रमानें पुढील राजे झाले. वज्रणाभ–शङ्खण–व्युषिताश्व–विश्वसह–हिरण्यनाभ–कौशल्य–ब्रह्मिष्ठ–पुत्र–पुष्य–ध्रुवसंधि.

**छोटा राजा, पण बडी कीरत.**

आपला पुत्र सुदर्शन हा अल्पवयी असतांनाच ध्रुवसंधि सिंहाच्या शिकारींत गतप्राण झाला. मंत्रिमंडळानें छोट्या सुदर्शनाला यथाविधि राज्याभिषेक केला. बालचंद्रानें आकाश, सिंहाच्या छाव्यानें अरण्य व कमलाच्या कळीनें सरोवर जसें दिसतें तसें तें राज्य त्या बालराजामुळें दिसूं लागलें. हा बाल सिंहासनावर बसला तर त्या विस्तीर्ण आसनाची केवढी जागा त्याला लागायची आहे ! पण त्याच्या राजतेजानें मात्र तें सर्व सिंहासन व्यापून गेल्यासारखें दिसे. तो उंच सिंहासनावर बसला म्हणजे त्याचे छोटेसे पाय सिंहासनाखालीं ठेवलेल्या सोन्याच्या पादपीठापर्यंत पोहोंचतहि नसत–वरच ते लोंबकळत राहावयाचे ! पण त्या अळित्यानें रंगलेल्या छोट्या चरणांना अनेक मांडलिक राजे, आपले सोनेरी मुकुट नमवून, वंदन करीत. त्याच्यावर चवऱ्या ढाळल्या जात असतां त्याच्या कानावरील झुलपें वाऱ्यानें भुरुभुरु उडत असावयाचीं ! पण त्याच्या तोंडचा निघालेला बोबडा बोलसुद्धां राज्याच्या सीमांपर्यंत अबाधितपणें झेलला जात होता. त्याच्या अंगावर दोन अलंकार जास्त झाले तर त्याला ओझें वाटे; पण तो बाल सबंध पृथ्वीच्या राज्याचा भार आपल्या राजतेजामुळें पेलत होता. त्याला नीटशी अक्षरओळख होण्यापूर्वीच वृद्ध मंत्र्यांच्या संगतीमुळें राज्यशास्त्रांत तो पारंगत झाला होता व त्याचीं सुफलेंहि त्याला मिळत होतीं. हा बालराजा पुढें शास्त्रविद्येंत व शस्त्रविद्येंत प्रवीण झाल्यावर योग्य राजकन्यांशीं

त्याचा विवाह लावण्यांत आला. त्यानें अग्निवर्ण नांवाच्या आपल्या पुत्रास गादीवर बसवून वार्धक्यांत नैमिषारण्याचा रस्ता धरला; व तो तेथें निष्काम तपश्चरणात काळ घालवूं लागला.

## अतिरिक्त विलासाचा घोर परिणाम.

सुदर्शनामागें राज्य चालविण्यास अग्निवर्णाला कांहींच आयास पडले नाहींत. पित्यानें सर्व निष्कंटक पृथ्वी जणों काय त्याच्या उपभोगासाठींच मागें ठेविली होती. आणि खरोखरच अग्निवर्णानें सर्व राज्यकारभार पूर्णपणें आपल्या सचिवावर सोंपविला व आपण नानाविध विलासांत दंग होऊन राहिला. लावण्यवती तरुणींच्या घोळक्यांत हा सदैव रमलेला असे. त्याच्या वाड्यांतून मृदंगाचा नाद आणि नाचरंग यांचेच शब्द नेहमीं ऐकूं येत. त्याच्या आणि प्रजेच्या गांठीभेटीचा योग कधीं येतच नसे. सचिवानीं अगदीं गळच घातली तर विलासमंदिराच्या गवाक्षांतून आपला पाय बाहेर काढून हे महाराजाधिराज आपल्या उत्सुक प्रजेला चरणदर्शनाचा अलभ्य लाभ देत असत!! ही स्वारी वादनविद्येंत इतकी तरबेज असे, कीं नर्तकींचा नाच सुरू असतां स्वतां मृदंग वाजवून हा त्यांना साथ करी व वेळीं त्यांच्या तालाच्या चुका दाखवून त्यांस लज्जित करी! स्त्रीसुखाच्या लालसेनें पछाडलेला हा कामुक राजा कामिनींच्या कह्यांत पूर्णपणें गेला. दिवसा, रात्रीं, सर्व ऋतूंत आणि सर्व स्थलीं याला एका उपभोगाव्यतिरिक्त दुसरें कांहींच सुचत नव्हतें. याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. पूर्वीच्या दराव्यामुळें त्याचे शत्रु जरी त्याच्यावर उठले नाहींत तरी अतिरिक्त भोगामुळें उत्पन्न झालेल्या शरीररोगांनीं चंद्राप्रमाणें याला पछाडलें. त्याचें तोंड पांढरें पडलें. शक्ति क्षीण झाली. वैद्यांनीं त्याला क्षयाची भावना झाल्याचें सांगितलें तरी तो आपला क्रम सोडीना. 'राजा पुत्रलाभासाठीं कांहीं व्रत करीत आहे' असें सांगून त्याला झालेल्या रोगाची प्रजेंत पसरणारी वार्ता सचिवांनीं कांहीं काळ थोपवून धरली. अखेर राजाची प्राणज्योत मालवली. सचिवांनीं गुप्तपणें त्याला वाड्याजवळील उद्यानांतच अग्निसंस्कार दिला.

## राज्यपदावर गरोदर राणी!

सुदैवानें अग्निवर्णाची एक राणी या वेळीं गरोदर होती. सचिवांनीं

प्रजेंतील कांहीं पुढाऱ्यांसमक्ष तिची परीक्षा करून घेतली व सर्वांच्या मतें तिलाच गादीवर बसविलें. तशा तऱ्हेच्या राजनिधनानें दुःखित झालेल्या मातेच्या उष्ण अश्रूनीं तिच्या पोटांतील गर्भ अगदीं तापून गेला होता. त्याला राज्याभिषेकसमयींच्या उदकसिंचनानें थोडी शीतळाई आली. पतीच्या सिंहासनावर अधिष्ठित झालेली ती गरोदर राणी आपल्या स्वामिनिष्ठ सचिवांच्या साहाय्यानें राज्यकारभार निर्वेधपणें पाहूं लागली. श्रावण महिन्यामध्यें भूमींत पेरलेल्या बीजाच्या अंकुराची वाट लोक जशी उत्सुकतेनें पहात असतात तशी गरोदर राणीच्या प्रसूतीची वाट प्रजाजन मोठ्या उत्सुकतेनें पहात होते.

## २ 'रघुवंश'—रसग्रहण

**भव्यतेचे दोन भिन्न नमुने.**

महाकाव्य या दृष्टीनें जसें 'कुमारसंभव' तसा 'रघुवंश'हि भव्योदात्त आहे. फक्त पहिल्यांतील भव्योदात्ततेहून दुसऱ्यांतली भव्योदात्तता किंचित् वेगळ्या प्रकारची आहे येवढेंच कायतें. 'कुमारां'तील घटना दैवी व आसुरी शक्तींच्या झगड्यांतून निर्माण झालेल्या असल्यानें त्यांत पार्थिव स्थलकालनिष्ठता गौण आहे. त्यांतून खरा मानवी इतिहास सूक्ष्मपणें सूचित होत असला तरी त्यांचें स्वरूप प्रायः काल्पनिक आहे. त्यांत बहुशः अतिमानुष शक्तीचा वापर असून एकंदरींत अद्भुतपणाचेंच वातावरण आहे. त्यांतील मानवी किंवा पार्थिव अंश अल्पस्वल्प असून तो ध्वनित आहे व त्यांतील तात्पर्य विश्वव्यापक व त्रिकालाबाधित आहे. हें सर्व भव्यहि आहे व उदात्तहि आहे. पण ही भव्योदात्तता दैवी सामग्रींत मानवी अंश मिसळल्यामुळें आलेली आहे. उलट 'रघूं'तील भव्योदात्तता मानवी सामग्रींत दैवी अंश मिसळल्यामुळें निर्माण झालेली आहे. 'कुमारां'त स्वर्ग पृथ्वीकडे कललेला दिसतो तर 'रघूं'त पृथ्वीच स्वर्गाच्या रोखानें उंचावत चाललेली आढळते. 'रघुवंशां'तील घटना स्थलकालमर्यादित, विषय विशिष्ट राजवंशवर्णनपर, व्यक्ति मूलतः मानवी

व वातावरण जास्त प्रमाणांत वास्तवतेचें आहे. 'कुमारां'तील देवदेवता मानवी विचारविकार प्रकट करतात, तर 'रघूं'तील वर्ण्य व्यक्तींचीं मनें स्वर्गीय उदात्ततेनें विनटलीं आहेत. 'कुमारां'त कल्पनेला तर 'रघूं'त प्रत्यक्षानुभवाला वाचा फुटलेली आहे. 'कुमारां'तील दैवी अद्भुततेमुळें भक्तिभाव दाटत असला तर 'रघूं'तील मानवी वास्तवतेनें प्रेमादर उचंबळतो. 'कुमारां'त कल्पनेच्या मुशींत निर्माण झालेले मानवी देव आहेत, तर 'रघूं'त प्रत्यक्ष हाडामांसाचीं देवमाणसें आहेत. 'कुमारां'त पौराणिक इतिहास आहे तर 'रघूं'त इतिहासाला पौराणिकता दिलेली आहे. सारांश, 'कुमारां'तील मानवी स्वर्ग अधिक भव्योदात्त म्हणावा का 'रघूं'तील स्वर्गीय मानवता जास्त भव्योदात्त म्हणावी हा रुचिभेदाचा प्रश्न आहे. त्यामुळें कलासृष्टींतील भव्योदात्ततेचे हे दोन वेगवेगळे नमुने मानावे हेंच ठीक. यांपैकीं ज्याला जो मानवेल तो त्यानें अधिक पसंत करावा.

**ही आत्महीनता कीं विनय ?**

दुसरें कोणाचें कांहींही असो, स्वतां कालिदासाला मात्र 'रघूं'तील भव्योदात्तताच जास्त मानवली आहे यांत संशय नाहीं. प्रथम 'ऋतुसंहारा'सारखीं काव्यें, आणि 'मालविकाग्निमित्र,' 'विक्रमोर्वशीय' यांसारखीं नाटकें लिहून प्राथितयश झालेला कालिदास आतां 'राष्ट्रकवि' या भूमिकेवर आरूढ झाला. त्यानें आपलें उपास्य दैवत 'शंकर' याचें एक रमणीय आख्यान 'कुमारां'त मोठ्या भक्तिभावानें गाऊन आपली वाणी 'प्रासादिक' केली. पण त्याच्या संपन्न अनुभवाचें सार त्याला अद्याप कोठें तरी सांठवावयाचें होतें. तो राजकवि होता. त्यानें साम्राज्यें कमावलेलीं आणि गमावलेलींहि पाहिलीं होतीं. राजा आणि प्रजा यांचे संबंध निरीक्षले होते. राजधर्मावर प्रजाजनांचें ऐहिक सुख अवलंबून आहे व राजसंस्था ही समाजचक्राची नाभि आहे हें तो जाणत होता. 'हत्तीच्या स्थूल पावलांत जशीं इतर श्वापदांचीं पावलें सामावतात तसें एकट्या राजधर्मांत सर्व प्रकाराचे धर्म सामावतात' असें व्यास महर्षींचें वचन त्याच्या हृत्पटलावर कोरलेलें होतें. वैदिक आर्यांची 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' संस्कृति त्याच्या रोमरोमांत भिनली होती. त्यामुळें 'राजधर्म हा त्यागधर्म

आहे, भोगधर्म नव्हे' हें तिचें ब्रीदवाक्य त्याला बोलून दाखवावयाचें होतें. म्हणून आपली परिणतप्रज्ञा, उदात्त भावना, आणि वास्तवाभिमुख कल्पना याचा आविष्कार त्यानें 'रघुवंशा'च्या द्वारें केला. त्यासाठीं वैवस्वतमनूच्या कुलांत जन्म पावलेला राजवंश आपल्या महाकाव्याचा विषय त्यानें कल्पिला. मनु, दिलीप, रघु, रामचंद्र इत्यादि राजांच्या भव्योदात्त चरित्रांनीं आणि गुणांनीं त्याच्यावर आधींच मोहनी घातली होती. त्यांच्या साहाय्यानें त्याला राजनीतीचा आदर्श निर्माण करावयाचा होता. काव्याच्या प्रारंभीं त्यानें आपल्या कवित्वाबद्दल 'मन्दः कवियशः प्रार्थी' असा थोडासा अविश्वास व्यक्त केला आहे. त्याचा कांहीं लोक असा अर्थ करतात कीं 'रघुवंश' ही कालिदासाची पहिली कृति होती. 'कुमारा'त अशी विनम्रपणाची प्रस्तावना नाहीं म्हणून तो नंतरचा असें ते मानतात. पण वर सांगितल्याप्रमाणें येवढाल्या राजर्षींच्या उदात्त चरित्राच्या द्वारें राजकीय आदर्श निर्माण करण्याच्या आपल्या या जबाबदारीच्या जाणिवेनें कालिदासारख्या कसलेल्या कविराजालासुद्धां आपल्या कुवतीबद्दल थोडी कातरता वाटावी यांत काय नवल? व ही कातरता त्यानें मोठ्या शालीन भावानें व्यक्त केली आहे. पण या शालीनतेंत सुप्त आत्मविश्वास आहे. ही शालीनता एखाद्या नवशिक्या कवीचा खराखुरा नम्रपणा नसून, एका श्रेष्ठ व आत्मप्रत्ययसंपन्न महाकवीचा औपचारिक विनय आहे. 'आपरितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्' असें म्हणणारा 'शाकुन्तला'चा पिता व 'मन्दः कवियशः प्रार्थी गमिष्याम्युपहास्यताम्' असें सांगणारा 'रघुकार' यांना जर त्यांच्या या बोलांवरून नवशिके कवि गणावयाचें तर शालीन महाकवींचा आत्मप्रत्यय जन्मभर मुकाच राहतो असें म्हणावें लागेल !

**ज्येष्ठ कोण ? 'रघु' का 'कुमार' ?**

'रघु' हा 'कुमारा'नंतरचा असें म्हणण्याला आणखी एक प्रमाण असें आहे कीं 'रघू'मध्यें कुमार, सेनानी व मदन याचे उल्लेख कालिदासानें अशा पद्धतीनें केले आहेत कीं त्यावरून 'वाचकांनीं माझा 'कुमारसंभव' वाचलाच आहे' असें तो गृहीत धरून चालतोसें दिसतें. कुमाराबद्दलचे पुढील उल्लेख पहा–'शिवाचें तेज स्वर्गंगेनें जसें धारण केलें'

(रघु. २·७५), 'ह्या देवदारु वृक्षानें स्कन्धाच्या मातेचें दूध चाखलें आहे' (रघु. २·३६), 'पार्वतीशंकरांना जसा कुमाराच्या जन्मानें आनंद झाला' (रघु. ३·२३), 'स्कंद देवसेनेला नेतो त्याप्रमाणें' (रघु ७·१), 'असुरांच्या अस्त्रांनी आपल्या सेनानीला जखमा झाल्यावर जशी पार्वती दुःखित झाली असती तशी' (रघु. २·३७), या उल्लेखांत कुमारकथा जवळ जवळ पूर्ण होते. तसेंच 'रतीच्या विनंतिवरून शंकरांनी मदनाला जिवंत केला' (रघु. ६·२) हें मदनाचें वर्णन मदनदहनाची पूर्ववर्णित कथा गृहीत धरून चालत नाहीं काय? पुढीलहि उल्लेख पहा. रघु.७.१५,९·३९,४५, रघु.११·१३,४५ इत्यादि. तसेंच कुमार ६.७९ मध्यें असें एक विधान आहे: 'अर्थांशीं जसा वाणीचा तसा शंकराशीं पार्वतीचा योग घडवून आण.' येथें विवाहापूर्वी सप्तर्षि हिमालयाला हें म्हणत आहेत, आणि विवाह झाल्यावर पार्वती व परमेश्वर हे वाणी आणि अर्थ यांसारखे खरेच एकमेकांशीं संलग्न झाले. त्यामुळें त्यांचा संयोग होण्याबद्दलच्या बोलण्यानंतर त्याचा संयोग झाला असें म्हणणें क्रमागत आहे. म्हणूनच 'रघुवंश' हा जो नंतर लिहिला त्याच्या आरंभीं 'वागर्थाविव संपृक्तौ' असें वर्णन येणें योग्य होय. 'अस्ति कश्चिद् वाग्विशेषः' या कविपरिचयात दिलेल्या दंतकथेप्रमाणेंहि 'कुमार' प्रथम व मग 'रघु' हें दिग्दर्शित होतें. 'आलीढ' नांवाच्या आसनाचें विस्तृत वर्णन कु. ३·७० मध्यें केल्यामुळें 'रघूं'त कालिदासानें त्याचा नुसता निर्देश केला आहे (र. ३·५२). कारण प्रथम लिहिलेल्या कुमारांत त्याची माहिती वाचकांस आहे असें कालिदास धरून चालला. शिवाय 'कुमारां'तील पहिले तीन सर्ग हे नवख्या कवीनें लिहिल्यासारखे थोडे कृत्रिम वाटतात. 'रघूं'त सर्वत्र सफाई व पूर्णता भरून राहिली आहे. कदाचित् असेंहि असण्याचा संभव आहे कीं प्रथम कुमाराचे १ ते ४ सर्ग लिहून मग रघु व पुढें दोनहि काव्यें एकदम (कांहीं भाग यांतील कांहीं त्यांतील) लिहिलीं असल्याचा संभव आहे. आपलेच कांहीं विचार आपल्या काव्यनाटकांत निराळ्या शब्दांत पुन्हा पुन्हा मांडणें ही कालिदासाची एक ठळक प्रवृत्ति दिसते. पार्वती व रघु यांचे जन्म, शंकर-पार्वती व अज-इन्दुमती यांचे विवाह वगैरे प्रसंग सुद्धां त्यानें अगदीं सारख्या शब्दांत

वर्णिले आहेत. मग तो 'रघु-कुमार' एकदमच लिहीत होता कीं काय न कळे. किंवा त्या कल्पना त्याला अतिशय रम्य व महत्त्वाच्या वाटल्यामुळें त्यांच्या चर्वणांत त्याला फार आनंद वाटत असला पाहिजे ! म्हणून या दोन काव्यांना जुळीं भावंडें असें मागें म्हटलें आहे. तें कांहीं असलें तरी 'रघूं'त या मानवी काव्याचा उद्देश व प्रतिपाद्य अधिक उदात्त व गंभीर आहे हें निश्चित.

## सूर्यवंशाला 'रघुवंश' कां म्हटलें ?

एक मानवी महाकाव्य रचण्याचा हेतु व त्याचा विषय याप्रमाणें कालिदासानें निश्चित केला. त्याचे वर्ण्यविषयभूत सर्व राजे जरी प्रायः सारख्याच योग्यतेचे होते तरी त्यांपैकीं दुसऱ्या कोणाहि राजाचें नांव आपल्या महाकाव्यास न देतां दिलीपाचा उदार व शूर पुत्र रघु यालाच त्यानें आपला आदर्श राजा मानून त्याचेंच नांव आपल्या महाकाव्यास दिलें. " जन्मापासून शुद्ध, फल येईपर्यंत प्रयत्न करणारे, एकछत्री साम्राज्य गाजवणारे, स्वर्गद्वारापर्यंत आपले रथ नेऊन भिडविणारे, यथाविधि यज्ञ करणारे, याचकाचे मनोरथ पुरविणारे, अपराध्यांस योग्य दंड ठोठावणारे, वेळींच सावध होणारे, दान देण्यासाठींच संपत्ति मिळविणारे, वंशसातत्यासाठीं गृहस्थाश्रम पत्करणारे, बाल्यांत विद्याभ्यास, तारुण्यांत विषयभोग आणि वृद्धपणीं मुनिव्रत सेविणारे व शेवटीं योगमार्गानें मर्त्य तनु टाकून देऊन आत्मस्वरूपांत विलीन होणारे, इत्यादि जीं वर्ण्य राजांचीं विशेषणें कालिदासानें प्रस्तावनेंत दिलीं आहेत त्यातील बरींचशीं रघुराजासच लागू पडतात. भगवान् रामचंद्रहि या समग्र विशेषणांचा विशेष्य होऊं शकत नाहीं. मग इतरांची गोष्ट कशाला ? म्हणून रघूसारख्या उदार, शूर, 'वंशाचा कर्ता व अनंतकीर्ति' राजाचें नांव आपल्या महाकाव्यास देऊन त्यानें आपण योजलेल्या हेतूला बळकटी आणली.

## राजलक्ष्मीच्या मुखावरील गालबोट.

'रघुवंशांती'ल हें राजवंशवर्णन कालिदासानें एकोणीस सर्गांत व १५६९ श्लोकांत सविस्तर व कलात्माक रीतीनें केलें आहे. त्यांत दिलीपापासून अग्निवर्णापर्यंत एकोणतीस राजांचें वर्णन असून दिलीप, रघु, अज, दशरथ, राम, कुश, अतिथि, सुदर्शन व अग्निवर्ण यांचीं वर्णनें कमी-

अधिक सविस्तर आहेत. व बाकीच्यापैकीं कांहींचीं त्रोटक व कांहींचीं तर नामोल्लेखमात्रच दिसतात. कामुक अग्निवर्णाचा एकच अपवाद सोडल्यास इतरांचीं वर्णनें मूर्तिमंत सोज्ज्वलतेनें नटलेलीं आहेत. रघुवंशांतील राजांच्या उज्ज्वल चारित्र्यलक्ष्मीच्या मुखावर अग्निवर्णाचें वर्णन हें एक गालबोट आहे असें म्हणणें अधिक शोभेल, कारण त्या योगानें या चारित्र्यसंपन्न आदर्श नृपालांची उन्नतता कमी होण्याऐवजीं अधिक खुलूनच दिसते. दिलीप ते कुश या सहा राजांच्या वर्णनासच रघूचे पहिले सोळा सर्ग खर्ची पडले असून उरलेल्या तीन सर्गांत बाकीच्या राजांची बोळवण आहे.

## 'रघुवंशा'चा मूलाधार कोणता ?

दशरथ-राम व लव-कुश यांच्या चरित्रवर्णनांतच काय तो कालिदासानें रामायणाचा आधार घेतलेला दिसतो. पण दशरथापूर्वीचे दिलीप, रघु आणि अज व कुशानंतरचे अतिथि, निषध, नल इत्यादि अग्निवर्णापर्यंतचे राजे यांच्या चरित्रवर्णनाला आधार कालिदासानें रामायणाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्या तरी ग्रंथांचा घेतलेला दिसतो. रामायणांत 'बालकांड' ( अध्याय ७०–३८ ते ४३ ) दिलेली रामचंद्राच्या पूर्वजाची यादी 'रघुवंशां'त वर्णन केलेल्या यादीहून भिन्न आहे. रामायणाप्रमाणें रघु हा काकु-स्थाचा मुलगा आहे. दिलीपाचा नव्हे. कालिदासापुढें अन्य कविकृत एखाद्या रामायणाची आवृत्ति किंवा पौराणिक अगर ऐतिहासिक स्वरूपाचें इतर कांहीं वृत्त असावें असें दिसतें. वायु आणि विष्णुपुराणांतल्या राज्यांच्या यादीशीं रघूची यादी जुळते यावरून या दोन पुराणांच्या प्राचीन भागांचा उपयोग कालिदासानें केला असेल. याचा थोडा विचार आतां करूं.

## कालिदास आणि पुराणें.

'रघुवंशा'तील दशरथापासून कुशापर्यंतच्या भागाला रामायणाचा मुख्य आधार आहे. तथापि त्यांतहि कांहीं किरकोळ फरक कालिदासानें केले आहेत. दिलीपापासून दशरथापर्यंतचा व कुशापासून अग्निवर्णापर्यंतचा रघुवंशांतील भाग मात्र कालिदासानें रामायणाव्यतिरिक्त इतर ठिकाणांतून घेतला असला पाहिजे हें उघड आहे. तसेंच 'कुमारसंभवां'तील 'रामायण' 'महाभारतां'तल्या त्रोटक कथांव्यातिरिक्त इतर भागहि त्यानें दुसरीकडून घेतला हेंहि तितकेंच उघड आहे. आतां 'हीं ठिकाणें कोणतीं ? 'या

प्रश्नाचें उत्तर पुराणें हें होय. व या बाबतींत पद्मपुराणाचें नांव प्रथम नजरेसमोर येतें. डॉ. हरदत्त शर्मा यांनीं 'पद्मपुराण व कालिदास ( १९२५ ) या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत हें मत मांडलें आहे. त्यांच्या मतें कलकत्ता येथील इंपेरियल लायब्ररीमध्यें असलेल्या पद्मपुराणाच्या एका प्राचीन हस्तलिखित प्रतींत 'शाकुन्तल' व 'रघुवंश' यांना आधारभूत असलेला भाग सांपडतो. त्या पद्मपुराणाच्या 'स्वर्गखंडां'त अध्याय १ ते ५ शाकुन्तलाची व 'पातालखंड' अध्याय ५ ते १६ मध्यें रघुवंशाची (दिलीप ते सीतापरिणय अखेर) मूळ कथा आहे. पद्मपुराणाच्या आनंदाश्रम प्रतींत 'रघुवंश' कथा तेथें नसून ती 'उत्तरखंड' अध्याय १९८-१९९ मध्यें आहे. पण त्यांत नंदिनीचा वर व रघूचा जन्म येवढाच भाग आहे. याशिवाय याच पद्मपुराणाच्या प्रतींत 'सृष्टिखंडा'मध्यें अध्याय ४०-४१ 'कुमारसंभवां'तील कथा ( थोड्या फरकानें असलेली ) आढळते. याच ठिकाणीं अध्याय ३७ ते ३९ मध्यें तारकासुराचा वर व त्याचा पराक्रम यांबद्दल मजकूर आहे. पण त्यांत त्याचा वध मात्र नाहीं. त्याच्या वधाची हकीगत 'शिवपुराणां'त (४) 'कुमारखंडा'मध्यें आहे. यावरून असें वाटतें कीं (अर्थात् तें निश्चित नाहीं) कालिदासाच्या 'कुमारा'च्या पहिल्या आठ सर्गांना पद्मपुराणाचा व त्याचेच नंतरचे सर्ग लिहिणाऱ्या कवीच्या पुढील सर्गांना शिवपुराणाचा आधार असावा. पण 'शिवपुराणां'तील (४) 'पार्वतीखंडा'वर मात्र 'कुमारसंभवा'ची छाया पडली असावीसें वाटतें.

**मौन हेंच शहाणपण.**

पण या गोष्टी निश्चयानें सांगतां येत नाहींत. याचें कारण मुख्यतः कालिदासाचा (व इतरहि महाकवींचा) काल निश्चित नाहीं. व पुराणांचा तर नाहींच नाहीं. म्हणजे दोन बिनआधाराच्या गोष्टींचा एकमेकांना मिळणारा आधार अर्थात् निराधारच ! ! तथापि पुराणें अत्यंत प्राचीन असल्याचा पुरावा हल्लीं उपलब्ध झाला आहे. अथर्ववेद, छांदोग्योपनिषद्, सुत्तनिपात्त इत्यादि ग्रंथांत पुराणांचा उल्लेख असून आपस्तंबधर्मसूत्रात तर ( खिस्तपूर्व २०० ) भविष्यपुराणांतील वचनच उद्धृत केलें आहे. पुराणांचा प्रसिद्ध अभ्यासक पार्जिटर यानें मूळ प्राचीन पुराणांचा काळ खिस्तपूर्व ५०० ते खिस्तोत्तर १५० असा मानिला आहे

(Ancient Indian Historical Traditions. P 51). पण या पुराणांत वेळोवेळीं नवीन भर पडत गेली व त्यामुळें कांहीं जुन्या कालिदासीय काव्यांचा संक्षेप करून तो पुराणांत समाविष्ट केला असल्याचा संभव आहे. त्यामुळें कालिदासानें पुराणाचा उपयोग केला का पुराणांनीं कालिदासाचा उपयोग केला हें ठरविणें फार कठीण झालें आहे. तथापि रामायण-महाभारतांव्यतिरिक्त कांहीं प्राचीन पुराणांचा उपयोग कालिदासानें केलेला आहे हें निःसंदिग्ध आहे. नाहीं तर दिलीप, रघु, अज, अतिथि, अग्निवर्ण इत्यादि राजांबद्दलच्या कथा कालिदासानें कल्पनेनें निर्मिल्या असें मानावें लागेल. तसें असल्यास रघुवंशांतील राजांचे गुण ऐकून आपण ह्या काव्यरचनेचें चापल करावयास प्रवृत्त झालों असें भक्तिभावानें सांगणारा कालिदास अप्रामाणिक थापाड्या मानावा लागेल ! दुसरा तर्क कर्णपरंपरेनें आलेल्या कांहीं कथा कालिदासाला उपयोगी पडल्या असाव्या असा करतां येईल. पण विशेषतः राजांच्या वंशावळींची बाब ऐकीव असून चालणार नाहीं. ऐकीव वंशावळीला प्रामाण्य कोण देणार ? रघूच्या अठराव्या सर्गांत दिलेल्या कुशापासूनच्या राजांचीं नावें विष्णु व वायु या दोन पुराणांतील यादीशीं जास्त जवळ आहेत. पद्मपुराणांत दिलीप, रघु, अज व दशरथ असाच क्रम आहे. पार्जिटरनें आपल्या 'कालियुगांतील राजवंशवर्णनपर पुराणें' या ग्रंथांत जुन्या पुराणांत राजवंशवर्णन सामील करून घेण्याचा काल साधारणतः खिस्तोत्तर तिसरें व चवथें शतक असा मानिला आहे. त्यामुळें कालिदास खिस्तपूर्व ठरो कीं खिस्तोत्तर ठरो त्याला पुराणांची व जुन्या राजवंशाची माहिती होती. व खिस्तोत्तर चवथ्या शतकांतला तो ठरला तर नवीन भरींतील राजवंशाचीहि माहिती त्याला होती असें ठरेल. कालिदासानें पद्मपुराणाचा आधार घेतला असावा असें सांगणाऱ्या डॉ. हरदत्तशर्मांचें एक प्रमाण विचारणीय आहे. ते म्हणतात, जुन्या पुराणांचीं नवीं संस्करणें करणारांनीं कालिदासाच्या 'रघुकुमार' काव्यांतून संक्षिप्त मजकूर घेतला असें मानिलें तरी तो घेतांना मूळच्या सौंदर्याचे ठिकाणीं कुरूपता, कौशल्याचे जागीं वेंधळेपणा, रसिकतेऐवजीं आचरटपणा व औचित्यस्थानीं अप्रयोजकता ते मुद्दाम करतील असें समजणें कठीण आहे. विशेषतः पद्मपुराणाच्या पार्वतीतपोवर्णनाच्या प्रसंगांत

पार्वतीच्या तपःसमाधीचा भंग करण्यास इंद्राच्या सांगण्यावरून सप्तर्षी आले असें पद्मपुराणांत वर्णन आहे. सप्तर्षींनीं येऊन केवळ तिला तपापासून परावृत्त करण्यासाठीं शंकराची निंदा करणें व प्रत्यक्ष शंकरानीं जटिलाचे रूपानें येऊन तिची आपल्यावरील भक्ति पारखण्यासाठीं आत्मनिंदा करणें व शेवटीं आपण प्रकट होणें यांत केवढें अंतर आहे बरें ? दुसऱ्या योजनेंत केवळ कालिदासालाच साजणारें औचित्य, नाट्य व मूर्तिमंत रसिकता आहे. या सौंदर्याचें खोबरें करून पुराणसंस्करणकारांनीं कालिदासाचा उपयोग केला असें मानण्याऐवजीं कालिदासानें मूळ ओबडधोबडपणात सौंदर्य स्फुरविलें असें मानणेंच अधिक उचित होईल. तथापि पद्मपुराणाचा व कालिदासाचा काळ— एखाद्या काळपुरुषासारखा— असल्या सुंदर कल्पनांचा भंग करीत असल्यानें वरील अनुमान नुसतें सूचित करून गप्प बसावें हेंच शहाणपणाचें होईल !

**सर्वत्र ऐतिहासिक छटा.**

तें कांहींहि असो, येवढें मात्र खरें कीं कालिदासानें या सर्व राजवर्णनांत सरसहा ऐतिहासिक वातावरण निर्माण केलेलें दिसतें. अवतारी रामाचा एकच अपवाद या बाबतींत फार झालें तर मानतां येईल. पण कोणत्याहि राष्ट्रांत कल्पनाकुशल कवि हेच आद्य इतिहासकार असल्यानें त्यांच्या कृतींत सत्य व कल्पना याचें मिश्रण असावयाचेंच. आमच्याकडे कविकल्पनाप्रचुर रामायण व महाभारत या राष्ट्रीय काव्यांची गणना इतिहासांतच करण्यांत येते हें याचें गमक आहे. ऐतिहासिक प्रसिद्धीच्या आदर्श रामराजावर देवपणाचें चढविलेलें कवच कविकल्पनामूल आहे. "महाकाव्यांत काव्य व इतिहास यांची तडजोड झालेली असते" ( An epic is a compromise between poetry and history ) असें जें. एफ्. डब्ल्यू. न्यूमन पाश्चात्य महाकाव्याबद्दल म्हणतो तें रघुवंशाच्या बाबतींत खरें आहे.

**आणखी एक पोट-हेतु.**

आपल्या प्रकट हेतूच्या सिद्धीसाठीं वरील सर्व सामग्री जमविण्यांत व तिची विशिष्ट मांडणी करण्यांत कालिदासाचा आणखी एक प्रच्छन्न पोट-हेतु असावा असा तर्क करण्यास सबळ पुरावा आहे. त्यासाठीं या पोट-

हेतूला पहिल्या प्रकट हेतूच्या पोटांतला हेतु मानण्यापेक्षां खुद्द कालिदासाच्या पोटांतला हेतु मानणें अधिक प्रशस्त दिसेल ! हा कालिदासाचा पोटहेतु निःसंदिग्धपणें सिद्ध होण्यास त्याचे स्थल व काल हीं निश्चितपणें समजलीं पाहिजेत. पण या बाबतींतील अंतर्गत आणि बाह्य पुरावा असावा तितका बळकट नाहीं. कांहीं पंडित कालिदासाला खिस्तशकपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेलेल्या विक्रमादित्याचा समकालीन मानतात तर कांहींचा ओढा त्याला द्वितीय चंद्रगुप्ताचा समकालीन (चवथें शतक) मानण्याकडे आहे. या वादांत पडण्याचें हें स्थल नव्हे. कालिदास विक्रम-कालीन असो कीं गुप्तकालीन ठरो, रघुवंशांतील राजवर्णनावरून कवीच्या पोटहेतूची सिद्धि कशी होते हेंच आपणांस येथें मुख्यतः पहावयाचें आहे. वरील दोन्हीहि काळ भारतवर्षाच्या विजयाचें आणि वैभवाचे निदर्शक होते. प्रचंड दिग्विजय केले जात होते, बुद्धकाळांत बंद पडलेली यज्ञसंस्था जोमानें सुरू झाली होती, सुराज्याचीं व शांततेचीं सर्व फळें प्रजा आनंदानें चाखत होती, विद्या आणि कला उत्कर्ष पावत होत्या, श्रीमंतीवर विलास मोहरून राहिला होता आणि सर्वत्र आनंदीआनंद कोंदला होता. अशा संपन्न राजवटीचें, जवळून आणि आत्मीयतेनें, वर्णन करणें ही गोष्ट कालिदासाला प्रस्तुत होती. पण काव्यांत प्रस्तुताचें वर्णन अप्रस्तुत-प्रशंसेनेंच अधिक बहारदार होतें हें जाणून कविश्रेष्ठ कालिदासानें 'रघुवंश' रूपी अप्रस्तुतप्रशंसेचा हा रम्योदात्त अलंकार संस्कृत सरस्वतीच्या कंठांत कायमचा रूळत ठेवला. वरून दिलीप, रघु, दशरथ इत्यादि महनीय राजर्षींचीं वर्णनें करावयाचीं व त्यांवरून आपल्या काळच्या थोर राजांचीं चरित्रें ध्वनित करावयाचीं असा हा कालिदासाचा पोटहेतु दिसतो. नाहीं तर वाल्मीकि आदिकरून कवींनीं आणि पुराणकारांनीं गायिलेलींच आख्यानें पुन्हा गाण्यांत कालिदासासारख्या श्रेष्ठ कवीला तरी निराळें कांहीं मिळवावयाचें होतें असें वाटत नाहीं.

**एक पोटांत आणि एक ओठांत !**

रघुवंशीय राजांचें वर्णन करीत असतां कालिदासाची मनःस्थिति या त्याच्या पोटहेतूमुळें कशी झाली असेल यांचें वर्णन त्याच्याच एका

नाटकांतील प्रसंग उदाहरण म्हणून घेऊन करतों. 'विक्रमोर्वशीय' नाटकांत कालिदासानें इंद्रसभेंत झालेल्या सरस्वतीकृत व भरतादिग्दर्शित 'लक्ष्मी-स्वयंवर' नाटकाचा उल्लेख केला आहे. त्यांत उर्वशीनें लक्ष्मीची भूमिका केली होती. पण ही भूमिका करीत असतां तिचें मन पृथ्वीवरील पुरुरवस् राजाच्या ठिकाणीं नितान्त आसक्त होतें. निगूढ मनोभावनेप्रमाणें इंद्रियें आपोआप वर्तन करतात असा मानसशास्त्राचा सिद्धान्त आहे. उर्वशीच्या सखीनें नाटकांत लक्ष्मी झालेल्या उर्वशीला विचारलें, 'तुझें प्रेम कोणावर आहे?' नाटकांतील भूमिकेला अनुसरून लक्ष्मीच्या पात्रानें– उर्वशीनें– 'माझें प्रेम पुरुषोत्तमावर आहे' असें म्हणावयास पाहिजे होतें. पण नाटकांतील भूमिका व आपलें व्यक्तित्व यांतील अंतर विसरून गेलेली उर्वशी 'माझें प्रेम पुरुरव्यावर आहे' असें चटकन् म्हणून गेली. कालिदासाचेंहि असेंच होत आहे असें वाटतें. रघुवंशीय राजांचें वर्णन करीत असतां स्वकालीन राजे व आपल्या कालच्या घटना यांची छाप त्याच्या मनावर आहे, म्हणून हीं वर्णनें आपल्या वर्ण्य विषयाशीं जुळतीं करण्यास त्यानें कांहीं प्रसंग वाढविले आहेत व कांहींतून मुग्ध सूचना करण्याची व्यवस्था केली आहे. म्हणजे पोटांत स्वकाल व ओठांवर प्राचीन काल अशी कालिदासाची व्यवस्था दिसते! रघूचा दिग्विजय विक्रमकालीन किंवा गुप्तकालीन दिग्विजयाचा सूचक आहे. विदर्भ किंवा अयोध्या येथील वैभव कालिदासकालीन वैभवाचें द्योतक आहे. 'विक्रमोर्वशीया'मधील **"दिष्ट्या महेंद्रोपकारपर्याप्तेन विक्रममहिम्ना वर्धते भवान्"** या वाक्यांत प्रच्छन्नपणें पहिल्या शतकांतील **विक्रमादित्य** व त्याचा पिता **महेंद्र** यांचा उल्लेख नसेल असें म्हणवत नाहीं. 'रघू'च्या सोळाव्या सर्गांतील ओसाड झालेल्या अयोध्येची पुनर्रचना उज्जयिनीसारख्या राजधानीच्या पुनर्घटनेचाच प्रतिध्वनि असावा. रघूच्या दानशौर्यासारखें एखादें घसघशीत उदाहरण कालिदासानें आपल्या कालीं पाहिलेलें असावें. सुदर्शनासारखा कोणी बालराजा (रघु. सर्ग १८) कालिदासाच्या अवलोकनांत असला पाहिजे. त्याशिवाय हीं अशीं सरस वर्णनें कालिदासानें केलीं नसतीं. मुळांत फारसा आधार नसतां कवि जेव्हां आत्मीयतेनें एखाद्या प्रसंगाचें सविस्तर वर्णन करतात त्या वेळीं आपल्या अनुभवाचा

आविष्कार करण्याचा त्यांचा पोटहेतु असावा असा वहीम येतो. याचा पुरावा म्हणून कांहीं पाश्चात्य पंडितांचें पुढील मत पाहाण्यासारखें आहे.

त्यांचें म्हणणें असें आहे कीं, ज्या गुप्त राजांच्या दरबारीं कालिदास राजकवि होता त्या राजांच्या प्रत्यक्ष वंशापर्यंत रघुवंशाची मालिका पोहोंचविण्याचा कालिदासाचा उद्देश होता. पण आकस्मिक निधनामुळें किंवा अन्य कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें त्याला आपला 'रघुवंश' पुरा करतां आला नाहीं. कालिदासाचा 'रघुवंश' अपुरा आहे हें कांहीं खोटें नाहीं. एकोणिसाव्या सर्गांतील अग्निवर्णाचें शोचनीय निधन व त्याच्या गरोदर विधवेचें राज्यारोहण असल्या दुःखान्त घटनांनीं कालिदासानें आपल्या काव्याचा शेवट कधींच केला नसता. पण दुर्दैवानें अपुऱ्या राहिलेल्या या 'रघुवंशा'चा पुढील भाग केवळ तर्कानेंच पुरा करीत बसण्याची पाळी आली आहे. मूळ रघुवंश पंचवीस सर्गांचा होता असा एक जुना समज आहे, तर कोणी ( H Fauche ) खिस्तपूर्व आठव्या शतकांत होऊन गेलेल्या अग्निवर्ण राजाच्या पुत्राचा समकालीन कालिदास होता असें मानतात ! कल्पनेच्या तोंडाला कोणीं हात लावावा ?

**त्यागाची थोर परंपरा.**

असो. याप्रमाणें कालिदासाच्या प्रकट व प्रच्छन्न हेतूंचें दिग्दर्शन केल्यानंतर त्यासाठीं त्यानें आपल्या चरित्रनायकांचें स्वभावदर्शन कसें केलें आहे तें पाहावयाचें. ' त्याग हा राजधर्माचा प्राण होय ' या प्रमुख कल्पनेप्रमाणें त्यानें आपले बरेचसे राजे त्यागी दाखविले आहेत. दिलीपानें क्षात्रधर्माच्या इभ्रतीसाठीं स्वदेहाचा, रघूनें यज्ञासाठीं सर्वस्वाचा, अजानें प्रिय पत्नीसाठीं स्वप्राणाचा, दशरथानें आपलें औदार्य राखण्यासाठीं स्वपुत्त्रांचा, रामचंद्रानें प्रजानुरंजनासाठीं सीतेसारख्या साध्वीचा व कुशानें इंद्रसाहाय्यार्थ स्वप्राणांचा त्याग केला. हे सर्वच त्यागप्रसंग उदात्त असून आर्यांच्या त्यागप्रधान संस्कृतीचे पुरे निदर्शक आहेत. दुसऱ्या सर्गांतील सिंह-दिलीप-संवाद संभाषणाचा एक उत्तम नमुना तर आहेच पण त्यागाच्या पार्श्वभूमीवर त्यांत दाखवलेला एक मानसिक लढाई विशेष लक्षणीय आहे. त्यागाला सिद्ध झालेल्या ध्येयवादी माणसाचे मनांत क्वचित् 'उपयुक्तता' किंवा 'व्यवहार' या वादांचे विरोधी

विचार येत असतात. त्यांचें चित्रण कालिदासानें या ठिकाणीं अद्‌भुताचा आश्रय करून केलें आहे. सिंहाचे तोंडीं उपयुक्ततावाद किंवा व्यवहारवाद असून दिलीप ध्येयवादाचें समर्थन प्राणपणानें करीत आहे. शेवटीं ध्येय-वादाचा (कर्तव्यनिष्ठेचा) जय होतो. दिलीपावरील" विद्याधरांची पुष्पवृष्टि म्हणजे कालिदासानें कठोर कर्तव्यनिष्ठेला दिलेली मूर्तिमंत मान्यताच होय!

**आर्य संस्कृतीचें काव्यमय रूपान्तर.**

पांचव्या सर्गांत वर्णिलेली रघूच्या खजिन्यांतील सुवर्णवृष्टि हें सुद्धां अद्‌भुताच्या भाषेंत सांगितलेलें एक नैतिक महातत्त्व आहे. 'सत्कार्यीं वेचनेलें धन, तन किंवा मन कधींच नाश पावत नाहीं. तें संस्कारूपानें सदैव सजीव टिकत असून कर्त्याच्या योग्य काळीं फलप्रद झाल्याशिवाय राहात नाहीं!' हें तें तत्त्व होय. दिलीपापासून अतिथीपर्यंत सर्वांच्या वर्ण-नांत कालिदासानें तत्कालीन स्मार्त आचार, शिष्टपरिगृहीत लौकिक रूढी, श्रौतविधि व पौराणिक कल्पना इतक्या कल्पकतेनें विणल्या आहेत कीं 'रघुवंश' म्हणजे 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' धर्माचें काव्यमय रूपान्तर आहे असें म्हणावेंसें वाटतें. देव, पितृ आणि आचार्य अशीं तीन ऋणें (रघु.८·३०), आर्यांचे गर्भाधानापासून श्मशानान्त स्मार्त संस्कार (रघु.३·२८–३५, ८.२६,) वर्णाश्रमव्यवस्था, चार पुरुषार्थ, श्रौतयज्ञ, सांख्य, योग, वेदान्तादि दर्शनें, इतर विद्या व कला, तपश्चरण व मुनिव्रतें, तपोवनें व उपवनें, भक्ति, वैराग्य व भोग यांच्या समर्पक उल्लेखांनीं 'रघुवंश' इतका गजबजून गेला आहे कीं तत्कालीन राष्ट्रीय मन एकट्या कालि-दासाच्या मुखानें बोलत आहे कीं काय असें वाटतें. आर्यसंस्कृतिनिदर्श-नाचे बाबतींत दुसरा कोणीहि भारतीय कवि कालिदासाची नुसती बरोबरी सुद्धां करील असें वाटत नाहीं. यांत कालिदासाचें वैशिष्ट्य आहे तें हेंच कीं तो आर्यसंस्कृतीचें नुसतें कोरडें निदर्शन करीत नसून आपण त्या संस्कृतीवर दृढ श्रद्धा ठेवणारे तिचे एक कट्टर अनुयायी आहों हें कृतीनें पटवीत आहे. प्लेटोनें आपल्या 'रिपब्लिक'मध्यें तत्त्वज्ञानी राजाची (philosopher king) नुसती एक रम्य आदर्श कल्पना सांगितली. पण कालिदासानें आपल्या अनेक राजर्षींच्या प्रत्यक्ष उदाहरणांनीं ती व्यवहार्य बनवून दाखविली आहे. कालिदासाचा 'रघुवंश' हेतुदृष्ट्या ध्येयवादी

( Idealistic ), वातावरणाच्या दृष्टीनें अद्‌भुतरम्य ( Romantic ) आणि मानवी स्वभावचित्रणाच्या व स्वानुभवप्रतिबिंबनाच्या दृष्टीनें वास्तववादी ( Realistic ) आहे. सबंध 'रघुवंशां'तील एकंदरीनें शांततेचें, समाधानाचें व समृद्धीचें वातावरण पाहिलें म्हणजे 'अतृप्त आकांक्षाची तृप्ति' हें कांहीं टीकाकारांनीं मानलेलें काव्यप्रयोजन एकांगी वाटतें. 'रघुवंशां'त तरी बऱ्याच राजवटींत तृप्त आकांक्षांचे धन्योद्गारच दिसून येतात. असमाधानें व अपरिहार्य दुःखें तत्त्वविचारानें जिंकलेलीं आढळतात. कृतकृत्यता प्रसन्नतेनें स्मित करते आहे असें वाटतें. आणि परिपूर्ण मनोरथ समाधानाचे ढेकर देत असल्याचा भास होतो. या व असल्या अनेक कारणांनीं प्राचीन पंडितांमध्यें कालिदासाची कीर्ति 'रघुवंशाचा कर्ता' ( रघुकार ) म्हणूनच जास्त होती. व तिचें निदर्शक म्हणून **'क इह रघुकारे न रमते'** हें सुभाषित रूढ आहे. होय. रघुकाराच्या या 'रघुवंश' महाकाव्यांत रमणार नाहीं असा कोण करंटा असूं शकणार बरें?

**स्वतंत्र सौंदर्य-साक्षात्कार.**

वरील विवेचनावरून एखाद्यास- विशेषतः 'कलेसाठीं कला' वाद्यास किंवा 'स्वतंत्र सौंदर्यानुभूति हेंच काव्याचें प्रेरक कारण आणि आनंद हें प्रयोजन होय' असें मानणारास- असें वाटण्याचा संभव आहे कीं कालिदास हा आपलीं काव्यें धर्म व नीति यांच्या विवेचनासाठीं व राजसंस्थेच्या प्रचारासाठीं लिहीत होता. आणि प्रमेयात्मक व प्रचारात्मक कला तर हलक्या जातीची. म्हणून कालिदासाची कला एक कमी प्रतीची तरी ठरते किंवा तिच्या माथीं येथें मारण्यांत आलेला धर्मनीतिप्रतिपादनाचा हेतु तरी चुकीचा ठरतो. यावर येथें असा स्पष्ट खुलासा केला पाहिजे कीं कालिदास हा राजाश्रयास होता, व कान्तासंमित उपदेश संस्कृत काव्यहेतूंना वावडा नाहीं, तेव्हां राजसंस्थेचा बडिवार व सूचित नीत्युपदेश हे कालिदासाचे हेतु कोणीं मानले तर त्यांत विशेषसें बिघडत नाहीं. पण मला कालिदासाचें म्हणून वैशिष्ट्य येथें हें सांगावयाचें आहे कीं वरील दोन हेतू त्याच्या उच्च कलेला मारक झालेले नाहींत. आणि याचें कारण कालिदास हा भाडोत्री राजस्तुति किंवा रूक्ष नीत्युपदेश

कोणाच्या सांगण्यावरून करावयास निघालेला नसून त्याला तत्कालीन समाजाचा एक स्वतंत्र सौंदर्यात्मक साक्षात्कारच झाला होता. तो आपल्या सौंदर्यानुभूतीच्या समाधींत जीं दर्शनें पाहात होता, व ज्या कलात्मक प्रेरणेनें तीं तो रंगवूं इच्छित होता, तींच दर्शनें व तीच कला त्याच्या काव्यांत आहेत. आतां त्यांत राजसंस्थेचा आदर्श व धर्मनीतीचें चित्रण आलें व हेतुवाद्यांना आपलें मत सिद्ध करण्यास तेथें अवसर मिळाला याला योगायोग म्हटलें पाहिजे. येथें मीं मात्र त्याच्या हेतूचें केलेलें निराळें विवेचन हें त्याच्या सौंदर्यानुभूतीच्या व कलात्मक स्वतंत्र दर्शनांचा ( Artistic Vision ) एक भाग म्हणूनच.

**परिणाम एकरूप का संकीर्ण ?**

आतां 'रघुवंशा'च्या कलांगाकडे वळावयाचें. 'कुमारा'प्रमाणें 'रघू'मध्यें एकच नायक नाहीं. रघुवंश अनेक नायकांच्या जीवन-चित्रांचा एक पट आहे. त्यामुळें त्यांत क्रियैक्य ( Unity of action ) नाहीं. पण एकच नायक महाकाव्यांत असावा असा आमच्या साहित्य-शास्त्रकारांचा विशेष कटाक्षहि नाहीं. साहित्यदर्पणकारानें **'तत्रैको नायकः सुरः'** म्हणजे महाकाव्यांत एक नायक व तो देव असावा असें सांगून लागलीच **' एकवंशभवा भूपाः कुलजा बहवोऽपि वा '** म्हणजे एकाच वंशांत उत्पन्न झालेले अनेक नीतिमान् नायक असले तरी चालतील असा पर्याय सांगितला आहे. हे नियम करतांना विश्वनाथाच्या डोळ्यांपुढें अनुक्रमें कालिदासाचे 'कुमार' व 'रघु' आहेत हें स्पष्ट दिसतें. अनेक नायक असल्यानें एकाच संविधानकाची चढउतार झालेली दिसत नाहीं. त्यामुळें मनावरील संस्कार संकीर्ण होतात हें कांहीं खोटें नाहीं. आणि पंचमहाकाव्यांत एकट्या 'रघू'खेरीज करून इतर ठिकाणीं एकच नायक योजला आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. रघुवंशांत संस्कारांचें ऐक्य ( Unity of impression ) असलेंच तर तें सबंध एकाच वंश-वर्णनानें उत्पन्न होणारें आहे, एका संविधानकानें उत्पन्न होणारें नाहीं. हा दोषच मानावयाचा असला तर तो विषयाच्या निवडीचा आहे. तेवढा वगळल्यास त्यांतील निरनिराळे सुटे प्रसंग कालिदासानें एकसंधीपणानें व नाट्यमयतेनें वर्णिले आहेत हें कबूल करावें लागेल. एकाच वंशांतील

राजाच्या अनेक कथानकांच्या वर्णनांत कालिदासानें संस्कारैक्य आणण्या-साठीं दुसरी एक योजना केली आहे. महाकाव्यांत वर्णावयाचे कुमारोत्पत्ति, नगरें, पर्वत, समुद्र, नद्या, ऋतु, मधुपान, विवाह, युद्ध, सुरत, जलक्रीडा इत्यादि सर्व विषय प्रत्येक राजाच्या संबंधानें कोठें नाहीं कोठें तरी त्यानें आणले आहेत.

## रघुवंशाची रसवत्ता.

रसदृष्ट्या पाहिलें असतां कालिदासाचीं तीन नाटकें, मेघदूत, ऋतुसंहार व कुमारसंभव यांतून कमी अधिक प्राधान्यानें भिरवणारा कालिदासाचा आवडता शृंगाररस रघुवंशांत फारच संयमानें वावरतांना दिसतो. कुमारां-तील एतद्विषयक प्रमाद कालिदासानें रघुवंशांत मोठ्या मर्मज्ञतेनें टाळ-लेला दिसतो. उदात्तचरित नायक-नायिकांचा शृंगार मर्यादित असावा हा नियम रघुवंशांत पाळलेला आहे. अतिरिक्त शृंगार फक्त अग्निवर्णाच्या बाबतींतच आहे. पण मर्यादेबाहेरील उपभोग नाशाला कारणीभूत होतो असा त्याचा परिणाम दाखविला असल्यानें त्याचें पर्यवसान वैराग्यांतच होते. रघुवंशांत इतर कोमल व उदात्त रसच प्रभावी आहेत. त्यांचीं अनेक मधुर मिश्रणें कालिदासानें बनविलीं आहेत. जिकडेतिकडे भव्यता, उदात्तता, शुचित्व आणि कर्तव्यनिष्ठा जागरूकतेनें वावरत आहे. त्यांच्या नियंत्रणाखालीं वीर, करुण, भक्ति, वात्सल्य, शान्त, शृंगार, भयानक इत्यादि रसांच्या छटा मनोहरपणें प्रकट झाल्या आहेत.

रघु व इन्द्र यांचें द्वंद्वयुद्ध ( सर्ग ३ ), रघूचा दिग्विजय ( सर्ग ४ ), अज आणि इंदुमतीनें नाकारलेलें राजपुत्र यांचें युद्ध ( सर्ग ७ ), राम आणि परशुराम यांचा प्रसंग ( सर्ग ११ ), राम-रावण-युद्ध ( सर्ग १२ ) इत्यादि ठिकाणीं वीर रसाचा प्रकर्ष आहे. दिलीपाची अनपत्यता ( सर्ग १ ), अजविलाप ( सर्ग ८ ), सीतात्याग ( सर्ग १४ ), व सीतेचें पृथ्वीच्या पोटांत अंतर्धान पावणें ( सर्ग १५ ) व रामनिर्याण (सर्ग १५ ) इत्यादि ठिकाणीं करुण रसाचा उठाव मोठ्या बहारीचा आढळतो. रघूचें बालपण ( सर्ग ३ ), कुशलवांचें बालपण ( सर्ग १५ ), बालराजा सुदर्शन याचें वर्णन ( १८ ) इत्यादि ठिकाणीं वत्सल रसाच्या नाजूक छटा आहेत. वसिष्ठाच्या आश्रमवर्णनांत शांत रस आहे. तशाच रघूच्या वानप्रस्था-

श्रमवर्णनांतहि त्याच्याच छटा आढळतात ( सर्ग ८ ). दहाव्या सर्गांतील विष्णुस्तुतींत भक्तिरस आहे. शृंगाररसाचा नाजुक शिडकाव पुढील ठिकाणीं आढळतो. सुदक्षिणेचें गरोदरपण ( सर्ग ३ ), इंदुमतीचें स्वयंवर ( सर्ग ६ ) व वसंतऋतुवर्णन ( सर्ग ९ ). दशरथाला झालेल्या अपशकुनांत भयानक रसाची छटा आहे ( सर्ग ११ ), अग्निवर्णाच्या विषयोपभोग-वर्णनांत शृंगार आहे. पण अनौचित्यामुळें व घोर परिणामामुळें तो रसाभास वाटतो. शृंगारप्रियता ही कालिदासाच्या मनाची बैठकच असल्यामुळें ऋतुवर्णनांतून व इतर अनेक प्रसंगांतून उपमा-दृष्टान्ताच्या द्वारें त्यानें शृंगाराच्या मुग्ध छटा जागोजाग व्यक्त केल्या आहेत. दुसऱ्या सर्गांतील नंदिनीनें केलेल्या दिलीपाच्या परीक्षेंत ( सर्ग २ ), रघूच्या कोशागारांत झालेल्या सुवर्णवृष्टींत ( सर्ग ५ ) व अशा इतर अनेक प्रसंगीं अद्भुतरसाची प्रतीति होते. वरील सर्व रस क्वचित् निर्भेळपणें तर बहुतेक सर्व ठिकाणीं संमिश्र स्वरूपांत आढळतात.

वेधक प्रसंगांच्या साहाय्यानें वाचकांमध्यें त्या त्या रसाची निष्पत्ति करणें म्हणजेच वाचकांची सहानुभूति नकळत मिळविणें होय. कारण रस म्हणजे तरी मानवी सहानुभूतीचीं विविध रूपेंच नव्हेत काय ? अशा सहानुभूतीबरोबरच वाचक कवीच्या उद्दिष्टांशीं सहमत होत असतो.रघुवंशांतील रसांत तल्लीन झालेल्या रसिकांच्या ठायीं अनेक सत्प्रवृत्ति अंकुरित होतात, मन प्रशान्त व उदात्त होतें व या जड आणि द्वंद्वमय पृथ्वीपासून आपण वर उन्नत होऊन जात आहों असें क्षणभर वाटतें. रघुवंशाच्या वाचनाचा हा परिणाम मला अनेक रसिकांनीं सांगितलेला असून मला स्वतःला तर 'रघू'पासून मित्राचें सौहार्द, गुरूचें मार्गदर्शित्व, कलावंतांच्या सहवासाचें सौख्य आणि जिवाच्या विसाव्याचें ठिकाण लाभलें आहे.

**स्वभावलेखन.**

हेतुदृष्ट्या ध्येयवादी असलेल्या रघुवंशात पृथगात्म स्वभावदर्शनाला फारसा वाव नाहीं. येथें नायकांचे केवळ नमुने ( Types ) व तेहि जवळ जवळ एक सांच्याचे आहेत. दिलीपाचा जो स्वभाव तोच रघूचा व तोच अखेरीस अतिथीचा. फरक पडलाच तर प्रसंगांच्या भिन्नपणानें पडावयाचा ! तरी सुद्धां धीरगंभीर दिलीप, उदार रघु, हळव्या मनाचा

कोमल अज, सहिष्णु दशरथ, सत्यनिष्ठ राम, भक्तिमान् व विरागी भरत आणि कामुक व विलासी अग्निवर्ण यांच्या स्वभावदर्शनांत निराळेपणा प्रतीत झाल्याशिवाय राहात नाहीं. दशरथ, अतिथि, दिलीप वगैरे राजांच्या स्वभाववर्णनांत कालिदासानें तत्कालीन राजनीतीचीं सूत्रें गोविलीं असल्यानें त्यांचीं स्वभावचित्रें असावीं तितकीं वास्तव वाटत नाहींत. 'रघुवंश' हें काव्य नायकप्रधान असल्यानें त्यांत नायिकांच्या स्वभावरेखांना फारसा वाव नसावा हें क्रमानेंच येतें. एक सीता वगळल्यास बाकीच्या सर्व राण्यांचीं चित्रें अस्फुट आणि अप्रधान आहेत. रघूच्या पत्नीचें तर रघुवंशांत नांवहि दिलेलें नाहीं. सुदक्षिणा पतिनिष्ठ पत्नीचा एक मूक नमुना आहे. उपवर व चतुर इन्दुमतीचें चित्र मोहक आहे. कौसल्या व सुमित्रा आदर्श माता आहेत. त्यांच्या पार्श्वभूमीवर कैकेयीची दुष्टता उठून दिसते. सीतादेवीचा त्याग, संयम, बाणेदार वृत्ति, वात्सल्य आणि पतिभक्ति हे गुण थोडक्यांत पण इतक्या नाजूक हातानें कालिदास चित्रित करतो कीं संबंध रामायण वाचून जो ठसा मनावर उठत नाहीं तो या कालिदासाच्या रेखांनीं उमटतो. सीतेबद्दल येवढी प्रचंड आत्मीयता कालिदासानें उत्पन्न केली आहे कीं तिच्या अंतर्धानसमयींचें वर्णन वाचतांना रघुवंशाच्या पंधराव्या सर्गांचीं पृष्ठें ( श्लोक ७३-८४ ) रसिकांच्या अश्रूंनीं आजपावेतों किती वेळां ओलींचिंब झालीं असतील व यापुढें आणखी किती वेळां तीं होतील यांचें परिगणन करणें केवळ अशक्य आहे.

## संवादचातुर्य.

'रघुवंशा'सारख्या वर्णनपर काव्यांत सुद्धां संवादरचनेचा नाट्यगुण कालिदासानें मोठ्या उठावदारपणानें प्रकट केला आहे. वशिष्ठ-दिलीप, सिंह-दिलीप, इंद्र-रघु, रघु-कौत्स आणि राम-परशुराम यांचे संवाद विशेष उल्लेखनीय असून त्या त्या संवादांत त्या त्या व्यक्तींच्या स्वभावछटा मनोहरपणें व्यक्त झाल्या आहेत. गर्विष्ठ, खुनशी आणि बढाईखोर परशुरामाच्या पार्श्वभूमीवर संयमी, शूर व विनीत रामाचें चित्र फारच उठावदार दिसतें. अशाच प्रसंगीं भवभूतीनें आपल्या 'महावीरचरित्रां'त दाखविलेलीं या दोन पुरुषांचीं स्वभावचित्रें या चित्रापुढें फिकीं वाटतात. मानी, हट्टी व अधिकाराभिलाषी इंद्राशीं बालवीर रघूचें निर्मल,

निर्भिड व तेजस्वी भाषण जगाच्या वाङ्मयांत अमर ठरेल. त्यांत निरागस मानी बालस्वभाव फारच उत्कृष्टपणें प्रकटला आहे.

**निसर्गाची उदार देणगी.**

अत्यंत उज्ज्वल प्रतिभा व तरल कल्पनाशक्ति यांची मोठी उदार देणगी निसर्गानें कालिदासाच्या पदरांत टाकली आहे. त्याच्या भावनाहि उत्कट असून त्यांना त्याच्या तेजस्वी प्रज्ञेचें साहाय्य आहे. शिवाय अभ्यास, अवलोकन आणि मनन यांच्या स्वप्रयत्नांनीं केलेल्या त्यांवरील संस्कारामुळें त्याचें कविमन पैलू पडलेल्या हिऱ्याप्रमाणें तेजस्वी झालें आहे. त्याच्या कलेंत संयम, प्रमाणबद्धता व सूचकता आहे, त्यामुळें त्याच्या साध्या वर्णनांत सुद्धां विलक्षण आकर्षकता येते. या सर्वांचा मिलाफ त्याच्या 'शैली'मध्यें झाला आहे. महाकाव्याला साजेल अशी प्रौढ, गंभीर, मोहक आणि लवचिक अशी त्याची शैली आहे. तिला उपमादृष्टान्तांनीं, सुभाषितांनीं, पौराणिक उल्लेखांनीं, आणि सद्भावनांच्या ओलाव्यानें अपूर्व मोहकपणा आला आहे. प्राचीन पंडित तर त्याच्या वैदर्भी रीतीला मधुर आणि रसाद्र अशा मंजिरीचीच उपमा देतात. 'रघुवंशां'त कालिदासाची शैली आपल्या पूर्ण वैभवानें तळपत आहे. कोलरिजनें एके ठिकाणीं महाकाव्यरचनेच्या तयारीला निदान वीस वर्षें तरी लागावीं असें म्हटलें आहे. त्यांतील दहा वर्षें सामग्री जमविण्यास व शास्त्राभ्यास करण्यास, पांच वर्षें रचनेला व उरलेल्या पांच दुरुस्तीला. मिल्टनचा आशयहि असाच आहे. यावरून महाकाव्यरचनेचें महत्त्व व्यक्त होतें. कालिदासाच्या आयुर्मर्यादेची कांहींच कल्पना आपल्यास करतां येत नसल्यानें तीन नाटकें, दोन लघुकाव्यें व दोन महाकाव्यें रचावयास कालिदासानें कसली तयारी किती दिवसपर्यंत केली होती हें समजण्यास मार्ग नाहीं. पण त्याच्या सहजमधुर व अक्लिष्ट काव्यकृतीवरून तरी असें वाटतें कीं सरस्वतीच्या या लाडक्या पुत्त्रानें आपल्या नैसर्गिक देणगीच्या जोरावर ही सर्व रचना अल्पकालांत केली असावी. रचनाकालाच्या लांबीच्या हिशेबानें काव्याचा कस ठरत नाहीं. प्रतिभेच्या जातिवंत उन्मेषांतून असल्या कलाकृति निर्माण होतात. त्या प्रतिभेच्या उन्मेषानें चमकणाऱ्या या श्रेष्ठ 'रघुकारा'ला प्रणाम करून आपण पुढील महाकाव्यांच्या परिशीलनाला लागूं.

# रघुवंश-सुभाषितें

**(१) हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा । १.१०**

( कालिदास म्हणतो— माझ्या 'रघुवंशा'चा आस्वाद काव्यांतील गुणदोष व्यक्त करण्यास समर्थ असणारे रसिकच घेण्यास योग्य आहेत. ) कारण सोन्याच्या शुद्धतेची किंवा हिणकसपणाची खरी परीक्षा ( तें ) अग्नींत ( टाकल्यानेंच ) होते.

**(२) संततिः शुद्धवंश्या हि परत्रेह च शर्मणे । १.६९**

( निपुत्रिक दिलीप वशिष्ठास म्हणतो—'तप, दान इत्यादिकांच्या पुण्यानें फक्त परलोकांतच सुख मिळतें. पण— ) शुद्ध वंशांत झालेल्या संततीनें ऐहिक व पारलौकिक अशा दोनीहि सुखांचा लाभ होतो.

**(३) प्रतिबध्नाति हि श्रेयः पूज्यपूजाव्यतिक्रमः । १.७९**

( वशिष्ठ दिलीपाला सांगतात– 'तूं सुरधेनूचा अपमान केलास, त्यामुळें तिनें तुला शाप दिला. तो तुझ्या संततीच्या मार्गांत आड येत आहे. ) जे पूजनीय असतील त्यांची पूजा– आदर– न करण्यानें कल्याणाच्या मार्गांत अडथळे येतात.

**(४) क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढः।२.५३**

( दिलीप सिंहास म्हणतो— ) 'जो क्षतांपासून ( नाशापासून ) प्राण्यांचें रक्षण करतो तो 'क्षत्रिय' अशी क्षत्र ( क्षत्रिय ) शब्दांची उदात्त व्युत्पत्ति जगप्रसिद्ध आहे.

**(५) क्रिया हि वस्तूपहिता प्रसीदति । ३.२९**

( कुमार रघूला शिकविण्यासाठीं नेमलेल्या सर्व विद्यागुरूंचे प्रयत्न– रघु बुद्धिमान असल्यानें– सहज सफल झाले. ) कारण, गुरूचें शिक्षण योग्य शिष्याला दिलेलें असेल तरच सफल होतें.

**(६) पदं हि सर्वत्र गुणैर्निधीयते । ३.६२**

( आपल्याला कसून विरोध करणाऱ्या रघूच्या पराक्रमाचें सुद्धां इंद्राला कौतुक वाटलें ) कारण खऱ्या गुणांचा परिणाम कोणावरहि व कोठेंहि होतोच.

**(७) प्राणिपातप्रतीकारः संरम्भो हि महात्मनाम् । ४.६४**

( दिग्विजय करीत निघालेल्या रघूशीं युद्ध करणारे उरलेले पारसीक राजे अखेर त्याला शरण आले. ) कारण मोठ्या लोकांचा कोप शांत करण्याचा मुख्य उपाय म्हणजे त्यांस नमस्कारपूर्वक शरण जाणें हाच होय.

(८) आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव । ४.८६

( रघूनें दिग्विजयानंतर 'विश्वजित्' नांवाचा यज्ञ केला व त्यांतील दक्षिणा म्हणून जें द्रव्य त्यानें मिळविलें होतें तें सारेच्या सारें त्यानें सत्पात्रांस देऊन टाकलें.) सज्जनांची रीत मेघाप्रमाणेंच आहे. दुसऱ्याकडून जें कांहीं ते घेतात तें फिरून त्यांना ( रूपान्तरानें ) देऊन टाकण्यासाठींच.

(९) पर्यायपीतस्य सुरैर्हिमांशोः कलाक्षयः श्लाघ्यतरो हि वृद्धेः । ५.१६

चंद्राच्या कलांत असलेलें अमृत देव आळीपाळीनें सारें पिऊन टाकतात. पण हा आपल्या सर्वस्वाचा व्यय चंद्र परहितार्थ करीत असल्यानें त्याची कृष्णपक्षांतील उत्तरोत्तर होणारी कृशता शुक्लपक्षांतील त्याच्या वृद्धीपेक्षां जास्त प्रशंसनीय आहे.

(१०) उष्णत्वमग्न्यातपसंप्रयोगाच्छैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य । ५.५४

( 'प्रियंवद' गंधर्वाच्या गर्विष्ठपणामुळें त्याला मतंग मुनीचा शाप झाला. पण गंधर्वानें क्षमा मागतांच मुनि मृदु झाले. ) शीतलता हा पाण्याचा नेहमींचा धर्म आहे. त्याला जी तात्पुरती उष्णता येते ती अग्नि किंवा सूर्याचीं किरणें यांनींच.

(११) भिन्नरुचिर्हि लोकः । ६.३०

( स्वयंवराच्या वेळीं इंदुमतीनें अंगराजाला नाकारलें. वास्तविक अंगराज गुणहीन नव्हता व इंदुमतीहि अगुणज्ञ नव्हती. पण -) माणसाची वैयक्तिक रुचि भिन्न.

(१२) मनो हि जन्मान्तरसंगतिज्ञम् । ७.१५

( मिरवणुकींत अज-इन्दुमतीचें अनुरूप जोडपें पाहून पौर स्त्रियांनीं धन्योद्गार काढले. कोणीं म्हटलें— 'पूर्वी हीं दोघें मदनरती असावीं. नाहीं तर शेकडों राजपुत्त्रांतून इन्दुमतीनें आपला मदनच नेमका कसा

हुडकून काढला असता ?) मनाला पूर्वजन्मांतील संबंध (वासनेमुळें) नेमके ज्ञात असतात.

**(१३) पवनाग्निसमागमो ह्ययं सहितं ब्रह्म यदस्त्रतेजसा । ८.४**

( ब्राह्मण वशिष्ठ मुनींनीं क्षत्रिय अजाचा राज्याभिषेक मंत्रपूत उदकानें केला. त्यामुळें तो आपल्या शत्रूंना अजिंक्य झाला. ) कारण क्षात्रतेजाशीं ब्राह्मतेजाचा संयोग होणें म्हणजे अग्नीशीं वायूची मैत्री जडण्यासारखेंच होय.

**(१४) विषमप्यमृतं क्वचिद् भवेदमृतं वा विपदीश्वरेच्छया । ८.४६**

( अज इन्दुमतीबद्दल शोक करीत असतां म्हणतो– ' ही पुष्पमाला जर प्राणघातक असेल तर तिला मीं माझ्या हृदयावर ठेवली असतां ती माझा प्राणनाश कां बरें करीत नाहीं ? याचा अर्थच हा कीं– ) परमेश्वराच्या इच्छामात्रेंकरून विषाचें अमृत व अमृताचें विष होऊं शकतें.

**(१५) मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः । ८.८७**

( अजाचें सांत्वन करावयास आलेला वशिष्ठाचा शिष्य अजाला म्हणतो — ) मरण हाच प्राण्यांचा नियतस्वभाव असून जीवित हा त्यांचा तात्पुरता बदल आहे.

**(१६) अपथे पदमर्पयन्ति हि श्रुतवन्तोऽपि रजोनिमीलिताः । ९.७४**

( दशरथानें फारसा विचार न करतां व राजधर्म लक्षांत न घेतां हत्तीवर–हत्ती आहे या समजानें–शब्दवेधी बाण टाकला.) चांगले चांगले विद्वान् सुद्धां, अविवेकानें अंध झाले तर, क्वचित् वांकड्या वाटेनें जातात ( अयोग्य आचरण करतात ).

**(१७) अव्याक्षेपो भविष्यन्त्याः कार्यसिद्धेर्हि लक्षणम् । १०.६**

( रावणाच्या छळानें त्रासलेले इंद्रादि देव भगवान् विष्णूकडे गेले. ते क्षीर समुद्राला पोहोंचतात न पोहोंचतात तों विष्णु आपल्या दीर्घकालीन योगनिद्रेंतून जागे झाले. ) अविलंब ( कोठेंहि खोळंबा न होणें ) भावी कार्यसिद्धीचें सूचक लक्षण आहे.

**(१८) तेजसां हि न वयः समीक्ष्यते । ११.१**

( विश्वामित्रानें दशरथाजवळ बालवयाच्या रामाची यज्ञरक्षणार्थ याचना

केली. कारण राम लहान असला तरी तेजस्वी होता. ) तेजस्वी पुरुषांच्या बाबतींत वय विचारांत घ्यावयाचें नसतें.

**(१९) सद्य एव सुकृतां हि पच्यते कल्पवृक्षफलधर्मि काङ्क्षितम् ।**
११.५०

( 'आपल्याजोगती सून आपल्यास आतां हवी' असें दशरथाच्या मनांत येतें न येतें तोंच 'जनकानें आपली कन्या पण जिंकणाऱ्या रामाला दिली' अशी अनुकूल वार्ता घेऊन जनकाचा पुरोहित शतानंद दशरथाकडे आला. ) पुण्यवान् लोकांच्या मनोरथांचें कल्पवृक्षाच्या फलांप्रमाणें आहे. ते कालाची अडचण झुगारून देऊन ताबडतोब पक्व (सिद्ध-पूर्ण) होतात.

**(२०) पावकस्य महिमा स गण्यते कक्षवज्ज्वलति सागरेऽपि यः ।**
११.७५

( परशुराम रामाला म्हणतो—' मी जरी स्वपराक्रमानें सर्व क्षत्रिय मारले तरी तुला जिंकल्यावांचून मला संतोष होणार नाहीं.) जसा वाळलेल्या गवतांत तसा समुद्रांतहि जर अग्नि पेटत राहील तरच त्या अग्नीची थोरवी समजावयाची !

**(२१) निर्जितेषु तरसा तरस्विनां शत्रुषु प्रणतिरेव कीर्तये ।११.८९**

( परशुरामाला नमविल्यावर रामानें त्यांच्या चरणीं मस्तक ठेवलें व म्हटलें 'मला क्षमा असावी.' ) स्वपराक्रमानें जिंकलेल्या प्रतिपक्ष्यांपुढें विनयानें लवणें हेंच पराक्रमशाली वीरांच्या कीर्तीचें रहस्य आहे.

**(२२) अत्यारूढो हि नारीणामकालज्ञो मनोभवः । १२.३३**

( शूर्पणखेनें सीता जवळ असतांना सुद्धां कामातुर होऊन रामाबद्दल अभिलाष प्रकट केला. ) स्त्रियांचा काम अतिरिक्त वाढला म्हणजे मग तो काळवेळ जाणीत नाहीं.

**(२३) अपि स्वदेहात् किमुतेन्द्रियार्थाद्यशोधनां हि यशो गरीयः ।**
१४.३५

( सतित्यागावांचून आपल्यावरील कलंक दूर होत नाहीं असा निश्चय रामानें केला व तो तिच्या त्यागाला प्रवृत्त झाला. ) कीर्ति हेंच ज्यांचें सर्वस्व त्यांना आपल्या देहापेक्षां सुद्धां कीर्तिच अधिक मोलाची वाटते. मग

( सीतेसारख्या ) इंद्रियविषयांपेक्षां कीर्ति अधिक मोलाची वाटेल यांत काय नवल ?

**(२४) आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया । १४.४६**

( लक्ष्मणानें वडील बंधु रामराजा याची सीतेला वनांत नेऊन सोडण्याविषयींची आज्ञा निमूटपणें मान्य केली. ) कारण वडील माणसांच्या आज्ञेची युक्तायुक्तता (लहानांनीं) चर्चावयाची नसते. ती निमूटपणें पाळावयाची असते.

**(२५) सांमुख्यानो हि जयो रन्ध्रप्रहारिणाम् । १५.१७**

( लवणासुराच्या हातांत त्रिशूळ नाहीं असें पाहून शत्रुघ्नानें नेमका त्याच वेळीं त्याच्यावर हल्ला चढविला ) कारण शत्रु अडचणींत आहे असें पाहून त्याच्यावर चढाई करणाऱ्यांनाच जय मिळतो.

**(२६) स्वादुभिस्तु विषयैर्हृतस्ततो दुःखमिन्द्रियगणो निवार्यते । १८.४९**

( अग्निवर्ण राजाला विषयाची अनिवार चटक लागली. त्यामुळें तो खंगत चालला. तरीहि वैद्यांचा सल्ला झुगारून देऊन तो विषयभोगांत आसक्त झाला.) आपाततः मधुर वाटणाऱ्या विषयांकडे एकदा ओढली गेलेलीं इंद्रियें पुनरपि वळविणें दुरापास्तच.

# भारवीचें 'किरातार्जुनीय'

## कवि-परिचय

### दोन जुन्या कथांचा नवीन शोध.

कालिदासाखालोखाल महाकवि म्हणून ज्याची कीर्ति अखिल भारतांत आज जवळ जवळ दीड हजार वर्षें दुमदुमून राहिली आहे त्या भारवीचा जीवनविषयक विश्वसनीय वृत्तान्त आम्हांला कालिदासाइतकाच ज्ञात आहे ! म्हणजे विशेष कांहींच ज्ञात नाहीं !! खुद्द भारवीनें, कालिदासाप्रमाणेंच, आपलें नांवसुद्धां आपल्या महाकाव्यांत उल्लेखिलेलें नाहीं. म्हणून इतर बाह्य प्रमाणांवरूनच त्याचा काल व देश केवळ अंदाजानें ठरविण्यांत आलेला होता. पण इ. स. १९२४ मध्यें दक्षिणहिंदुस्तानांत 'अवन्तिसुंदरीकथासार' व 'अवन्तिसुंदरीकथा' या दोन कविदण्डिकृत कथांचा शोध लागल्यापासून भारवीची बरीच नवीन व सविस्तर माहिती उपलब्ध झाली आहे. अर्थात् इतर अनेक जुन्या ग्रंथांप्रमाणें याहि ग्रंथांचें प्रामाण्य सर्वसंमत आहे असें नाहीं. पण यांतील माहिती पूर्वीच्या अनुमानांशीं फारशी विसंगत नसल्यानें ती जमेस धरण्यांत कांहींच हरकत नाहीं. वरील दोन कथाप्रकरणें 'दक्षिण भारती ग्रंथमाला' नं. ३ मध्यें रामनाथशास्त्री यांनीं संपादिलीं असून त्यांना एम्. रामकृष्ण कवि यांनीं उद्बोधक प्रस्तावना लिहिली आहे.

दण्डीच्या 'अवन्तिसुंदरीकथे'मध्यें महाकवि भारवी याची पुढील माहिती मिळते. " भारताच्या वायव्येकडील प्रदेशांत आनंदपुर नांवाचें एक शहर आहे. त्यांत वस्ती करून राहणाऱ्या ब्राह्मणकुलांपैकीं कौशिकगोत्रांतील एक कुटुंब तेथून निघून नासिक्य देशांतील अचलपुर या गांवीं

राहाण्यास आलें. या कुटुंबांतील नारायणस्वामी नांवाच्या ब्राह्मणाला दामोदर नांवाचा पुत्र होता. श्रीदामोदराप्रमाणेंच गुणवान्, बुद्धिवान् आणि विद्वान् असा हा वश्यवाणी दामोदरच महाकवि भारवी म्हणून पुढें प्रसिद्ध झाला. तेथें राहत असतां तेथील राजा विष्णुवर्धन याच्याशीं भारवीचा स्नेह जडला. एकदा भारवी राजाबरोबर शिकारीला गेला असतां त्याला नाइलाजानें मांसभक्षणानेंच आपली क्षुधा शमवावी लागली. आपल्या हातून अभक्ष्यभक्षणाचें पातक घडलें याबद्दल भारवीला फारच खंत वाटली. माता-पितरांना आपलें तोंडहि दाखविण्याची लाज त्याला वाटूं लागली. म्हणून गांवांत परत न येतां तो पापक्षालनार्थ तीर्थयात्रा करण्यासाठीं परस्पर निघून गेला. प्रवासांत गंगराजघराण्यांतील दुर्विनीत नांवाच्या राजाशीं त्याचा परिचय झाला व तो त्याच्याजवळच कांहीं काळ राहिला.

## एका आर्येमुळें राजाश्रय मिळाला.

तेथें असतांना भारवीनें दक्षिणभारतांतील कांचीपुर नगरींत रहात असलेल्या सिंहविष्णु नांवाच्या पल्लवराजाच्या स्तुतिपर एक सुंदर आर्या रचिली. (ती कोणा एका गायकास– गंधर्वास– उपलब्ध झाली.) एकदा सिंहविष्णु राजसभेंत बसला असतां सदर गायकानें तेथें येऊन ती भारवि-कृत आर्या सुस्वर कंठानें गायिली. ती अशी:—

'दानवराज हिरण्यकशिपूचें पर्वतासारखें कठिन आणि विशाल हृदय भेदून टाकण्यामुळें ज्याच्या वज्रतुल्य नखाची प्रचंडशक्ति प्रकट झाली व जें (त्यामुळें) जगाच्या उत्कर्षाचें कारण झालें तें **विष्णूचें नारसिंहरूप** तुमचें रक्षण करो.'

श्रीमहाविष्णूच्या स्तुतींत आपलाहि संबंध मोठ्या खुबीनें आणणाऱ्या या आर्येच्या श्रवणानें सिंहविष्णुला मोठा आनंद वाटला व त्यानें 'या आर्येचा कर्ता कवि कोण?' अशी पृच्छा केली. तेव्हां त्या गायकानें भारवीची वरील सर्व हकीगत सांगून 'हल्लीं हा कवि दुर्विनीत राजाजवळ आहे' असें निवेदिलें. सिंहविष्णूनें भारवीस ताबडतोब आपल्या दरबारीं आणलें व मोठ्या गौरवानें त्यास आपल्याजवळ ठेवून घेतलें. तेथें राहात असतां भारवीला तीन मुलगे झाले. त्यांतील मनोरथ नांवाच्या त्याच्या मुलाला 'वीरदत्त'

नांवाचा पुत्र झाला. त्या विरदत्ताची पत्नी गौरी. या मातापितरांचे पोटीं प्रसिद्ध कवि 'दण्डी' याचा जन्म झाला. ( अ. सुं. कथा १.११ ते ३२).

**कथांचा काळाशीं मेळ.**

वरील कथेंत उल्लेखिलेलें आनंदपुर गुजराथेंत असून नासिक्य देशांतील अचलपुर म्हणजे हल्लींच्या मध्यप्रान्तांतिल एलिचपुर होय. गंगघराण्यांतील दुर्विनीत व पल्लवराजा सिंहविष्णु हे इतिहासप्रसिद्ध राजे आहेत. सिंहविष्णु इ. स. ५७५–६०० च्या सुमारास कांची येथें राज्य करीत होता. भारवि सिंहविष्णूच्या दरबारीं अजमासें इ. स. ५७५ च्या जवळपास आला असावा. सिंहविष्णु हा विद्येचा भोक्ता व महापराक्रमी राजा होता. त्यानें आपल्या राज्याचा विस्तार करून शत्रूंच्या चढाईस पायबंद घातला. पल्लवराजे शैव होते. तथापि त्यांच्या धार्मिक मतांत संकुचितपणा नसल्यानें त्यांच्या राज्यांत शैव व वैष्णव संत ( अळवार, नायम्मार ), शिवार्चीं व विष्णूर्चीं देवळें, तामिळ व संस्कृत भाषा यांना सारखाच आश्रय होता. सिंहविष्णुवर्म्याचा पुत्र महेंद्रवर्मा ( इ. स. ६०० ते ६३० ). यालाच महेंद्रविक्रम म्हणत. हाहि विद्याकलांचा भोक्ता होता. यानें 'मत्तविलास' नांवाचें प्रहसन संस्कृतांत लिहिलें आहे.

गंगघराण्यांतील उपलब्ध प्राचीन लेखांवरून कोणी एका दुर्विनीत राजानें बृहत्कथेचें संस्कृतांत भाषान्तर केलें व भारवीच्या 'किरातार्जुनीया'च्या पंधराव्या सर्गावर टीका लिहिली अशी माहिती मिळते. या प्राचीन लेखाला गम्मरेड्डिपुर लेख असें म्हणतात. व त्याचा काल इ. स. ६ व्या शतकाचा पूर्वार्ध मानतात. अवन्तिसुंदरीकथेंतील दुर्विनीत हाच असल्यास यानें आपला कविमित्र भारवि याच्या काव्यावर, तें काव्य लिहून झाल्यावर लगेच, टीका लिहिली असावी हें साहाजिक दिसतें. मॅक्समुलरनें मात्र आपल्या 'India, what can it teach us' या ग्रंथांत दुर्विनीताचा काळ इ. स. ४७० असा दिला आहे. यावरून भारवीचा काल याच्याहि मागें हटविला पाहिजे असें सांगून प्रो. गोस्वामी त्याचा काळ चवथ्या शतकाचा शेवट किंवा पांचव्या शतकाचा आरंभ मानतात. पण दुर्विनीत भारवीचा समकालीन असल्यास भारवीला इतकें मागें नेण्याची आवश्यकता नाहीं.

कीथ वगैरे संशोधकांनीं भारवीच्या अवन्तिसुंदरींतील वृत्तान्ताला मान्यता

दिलेली नसली तरी भारवीचा याप्रमाणें ठरणारा काळ व कीथनें मानलेला भारवीचा काळ ( सहाव्या शतकाचा उत्तरार्ध ) यांत फारशी तफावत नाहीं. कांहीं ठिकाणीं सिंहविष्णूचा काल इ. स. ५२० दिलेला आढळतो. दण्डीचा काल इ. सॅ. ६३५ ते ७०० मानण्यांत येतो. भारवि हा अवंति-सुंदरीकथेंतील वृत्तान्तावरून दन्डीचा पणतू ठरतो. तीन पिढ्यांच्या-मधील काळ साधारण पाऊणशें वर्षांचा धरल्यास कालदृष्ट्या तरी त्यांचें हें नातें असंभवनीय दिसत नाहीं. दुसऱ्या पुलकेशीच्या ऐहोळें येथील इ. स. ६३४ च्या एका शिलालेखांत भारवीचा कालिदासासह उल्लेख आहे ( स विजयतां रविकीर्तिः कविताश्रितकालिदासभारविकीर्तिः । ). भारवीचा याप्रमाणें गौरवपूर्ण उल्लेख व्हावयास त्याची कीर्ति निदान शंपाऊणशें वर्षें स्थिर झालेली असावयास पाहिजे. याकोबीनें भारवीचा काल सहाव्या शतकाचा पूर्वार्ध मानला आहे.या सर्वांतून निघणारा भारवीचा काल इ. स. ५१० ते ५८० असा मानावा हें सयुक्तिक दिसतें. सुशीलकुमार दे यांनीहि भारवीचा काळ सहाव्या शतकाचा शेवट किंवा सातव्याचा आरंभ असाच मानलेला आहे.

## भारवीचें अनुकरण.

भारवीचें 'किरातार्जुनीय' व माघाचें 'शिशुपालवध' यांत दिसणारी कथानकाची मांडणी, कल्पना, शब्दप्रयोग इत्यादिकांमधील साम्य पाहून हरमान याकोबी यानें असा प्रश्न उपस्थित केला आहे कीं 'या दोघांपैकीं कोण कोणाचें अनुकरण करतो ? ' व कालदृष्ट्या भारवि प्रथम व माघ नंतर असें ठरवून त्यानें या प्रश्नाचें उत्तर माघच भारवीचा अनुकर्ता असें दिलें आहे. 'काशिकावृत्ती'त ( इ. स. ६५०–६० ) पाणिनीय सूत्र 'प्रकाशनस्थेयाख्ययोश्च' १.३.२३ याच्या विवेचनांत भारवीच्या 'किरातार्जुनीयां'तील एक उदाहरण (संशय्य कर्णादिषु तिष्ठते यः। ३·१४)घेतलें आहे व माघ आपल्या शिशुपालवधांत (२.११२) या वृत्तीचा व तीवरील न्यास-टीकेचा उल्लेख करतो. काशिकावृत्तीवरील जिनेंद्रबुद्धीची 'न्यासटीका' सहाव्या शतकाच्या शेवटीं (सुमारें इ स.७००) लिहिलेली आहे.यावरूनहि भारवि पूर्वीचा व माघ नंतरचा हें ठरतें. इ. स. ६२५ या वेळीं झालेल्या वर्मलात नांवाच्या राजाच्या सुप्रभदेव या सर्वाधिकाऱ्याचा नातू माघ असें-

हि निश्चित आहे. त्यावरून याकोबीनें भारवीचा काळ सहाव्या शतकाचा आरंभ व माघाचा काळ सहाव्या शतकाचा मध्य असा मानला आहे. पण तो बराच मागें पुढें नेला पाहिजे. प्राचीन संस्कृत कवींचा काळ ठरवितांना पन्नासपाऊणशें वर्षें इकडे तिकडे झालीं तर त्यात मोठेंसें काहींच नाहीं. कालिदासाच्या बाबतींत जेथें पांचशें वर्षें खपतात तेथें याचा काय हिशेब ? असो. आतां भारवीबद्दलची एक दंतकथा पाहूं.

**दरिद्री कवीची दाद लागेना.**

भारवि हा एक अत्यंत प्रतिभासंपन्न विद्वान् ब्राह्मण. तो नेहमीं आपल्या वाचनलेखनांत निमग्न असल्यानें प्रपंचासाठीं लागणाऱ्या धनाची तो मुळींच काळजी वाहत नसे. घरीं तर अठराविश्वे दारिद्र. त्याची पत्नी जरा जहालच होती. तिनें एके दिवशीं त्याला त्याच्या या आळसाबद्दल फारच दुरुत्तरें केलीं व 'आपली विद्वत्ता पाजळून राजाकडून कांहीं धन तरी घेऊन या' असें म्हणून त्यास घराबाहेर काढलें. प्रवास करीत करीत बिचारा भारवि चालला असतां एका अरण्यांत त्याला एक सुंदर तळें दिसलें. तेथें विसाव्यासाठीं बसला असतां त्यानें एक श्लोक रचून तो कमळाच्या पानावर लिहिला. **'सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम् । वृणते हि विमृश्यकारिणं गुणलुब्धाः स्वयमेव संपदः॥'** (कि.२·३०) "कोणतेंहि काम अविचारानें करूं नये कारण अविचार हें सर्व अनर्थांचें मूळ आहे. विवेकी पुरुषाच्या गुणांवर मोहून जाऊन लक्ष्मी त्यास आपण होऊनच वरते." त्याच वेळीं जवळच्या राजधानींतून मृगयेसाठीं त्याच अरण्यात संचार करणारा त्या देशचा राजा पाणी पिण्याकरतां तेथें आला. त्यानें तो कमळाच्या पानावर कोरून लिहिलेला अपूर्व श्लोक वाचला व त्याला भारवीच्या कवित्वाबद्दल फारच आदर वाटूं लागला. त्यानें भारवीस सांगितलें कीं 'आपण उद्यां माझ्या वाड्यांत मला भेटा. त्या वेळीं मी आपली योग्य ती संभावना करीन–' व श्लोक घेऊन आपण निघून गेला. त्यानें तो श्लोक सुवर्णाक्षरानीं लिहून घेऊन आपल्या शयनमंदिरात उंच ठिकाणीं दृष्टीसमोर टांगून ठेविला. फाटकीं वस्त्रें घालण्याऱ्या, प्रवासानें रोडावलेल्या व मलिन झालेल्या या भटजीला राजाकडे कोण घेऊन जाणार? दरवाज्यांतूनच पहारेकऱ्यांनीं त्याची हकालपट्टी केली.

**एका श्लोकानें दोघांचे प्राण वांचले.**

एक वर्ष लोटलें या गोष्टीला. चांगले आठ दिवस शिकारींत घालवावयाचे असा बेत करून त्या राजाची स्वारी नगराबाहेर पडली. पहिला मुक्काम नगरापासून फार लांब न पडल्यामुळें दुसरे दिवशीं रात्रीं राजा एकटाच नगरांत आला व शयनमंदिरांत शिरला. तों काय ? तेथील दृश्य पाहून त्याला आश्चर्याचा धक्काच बसला व संतापानें त्याचें सर्वांग थरथरूं लागलें. त्याच्या राणीशेजारीं पलंगावर कोणी एक तरुण निजलेला त्याला दिसला! त्यानें पळाचाहि विलंब न करतां आपली कट्यार बाहेर काढली व त्या दोघां घोर पातक्यांस यमसदनीं पाठविण्यासाठीं तो त्याच्यावर ती चालविणार इतक्यांत-इतक्यांत काय ? त्यानें तेथेंच टांगून ठेवलेला तो सोन्याच्या मोलाचा सुवर्णाक्षरी श्लोक त्याच्या नजरेस पडला. ' अविचार हें सर्व अनर्थांचें मूळ आहे. ' कविवाणी गंभीरपणें पण ठासून बजावीत होती. राजाचा हात एकदम ढिला पडला. पूर्ण चौकशी करून पातक्यांस देहान्तशासन करावें असा विचार करून त्यानें राणीस जागें केलें.राजास पहातांक्षणींच आनंदानें बेहोष होऊन ती म्हणाली, ' महाराज, महाराज, देवाची कृपा झाली आपल्यावर. आपला वीस वर्षांपूर्वी नाहींसा झालेला बाळ आज सांपडला. हा पहा तो तेथें झोपीं गेला आहे. ' राजाच्या मनाची स्थिति काय वर्णावी ? त्यानें परमेश्वराची प्रार्थना केली व या घोर अनर्थांतून अपल्यास पार पाडणाऱ्या कवित्वचनाच्या लेखकास शोधून काढण्याची सेवकांस आज्ञा केली. भारवीचें दैन्य फिटलें.

**भारवीची कविकृत प्रशंसा.**

किरातार्जुनीयाखेरीज इतर कोणतीहि भारवीची कृति व वर दिलेल्या त्याच्या माहितीखेरीज इतर कोणतीहि माहिती उपलब्ध नाहीं. पण त्याच्या कविकीर्तीनें मात्र त्याला आज अनेक शतकें रसिकांच्या कौतुकादराला पात्र करून ठेविलें आहे. महाकवि म्हणून कालिदासाच्या खाल्लोखाल त्याचीच गणना आहे. 'सदुक्तिकर्णामृतां'त सुबंधु, कालिदास, हरिश्चंद्र, भवभूति इत्यादि प्रमुख कवींत **'निसर्गमधुर वाणीची गुंफण करणारा'** म्हणून भारवीचा पुढीलप्रमाणें उल्लेख केलेला आहे. **'सुबंधौ भक्तिर्नः क इह रघुकारे न रमते । धृतिर्द्राक्षीपुत्रे हरति हरिचन्द्रोऽपि हृदयम् । विशुद्धोक्तिः सूरः प्रकृतिमधुरा भारविगिरः । तथाप्यन्त-**

**मौदं कमपि भवभूतिर्वितनुते ।**" कालिदासाची उपमा, भारवीचें अर्थगौरव, दण्डीचें पदलालित्य व माघाचे हे तीनहि गुण संस्कृत पंडितांत प्रसिद्ध आहेत. कुमार, रघु व मेघ हीं तीन काव्यें 'लघुत्रयी' व किरात, माघ व नैषध हीं तीन काव्यें 'बृहत्त्रयी' म्हणून गाजत असूनें काव्यगुण, पांडित्य, संस्कृति व व्युत्पात्तिसाधन या दृष्टींनी निखिल भारतांत आदरानें आज कैक शतकें पढलीं आणि पढविलीं जात आहेत.

## भारवि विचार व ठाशिव भाषा.

भारवि कवि मोठा मानी, पुष्कळ विचाराअन्तीं मोजकें पण परिणामकारक बोलणारा, व गंभीर प्रकृतीचा विवेकी पुरुष असावा असें त्याच्या लिहिण्यावरून दिसतें. त्यामुळेंच त्याच्या वाणींत थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थ व्यक्त करण्याचें सामर्थ्य (अर्थगौरव) व ओज हे गुण प्रकर्षानें दिसतात. अर्थान्तरन्यासांची रेलचेल हाहि भारवीच्या चिंतनशीलतेचाच परिणाम आहे. आणि म्हणूनच त्याचा टीकाकार मल्लिनाथ त्याच्या लेखनशैलीला 'नारीकेलफलपाक' म्हणतो. त्याची भारदस्त वाणी अगदीं कमावलेली असून तिच्याबद्दल त्याला अभिमान आहे. कमावलेल्या भाषेंत दीर्घकालीन विचारांची माडणी करणाऱ्या कारागिराच्या हातून फारसें लिहून होत नाहीं. तसेंच भारवीचें झालें असावें. पण त्याच्या एकाच कृतीचें वैभव येवढें झालें कीं माघासारख्या पंडितकवीला त्याच्याशीं स्पर्धा करावी असें वाटू लागलें.

विवेकाच्या नियंत्रणांत असल्या तरी भारवीच्या भावना कमी उत्कट नाहींत. किंवा नियंत्रणानेंच त्या अधिक उत्कट झाल्या आहेत असें म्हणणें सयुक्तिक होईल. शारदातनय म्हणतो, 'भारवीच्या भाषेंत भाव व रस यांचा पूर्ण मिलाफ होऊन त्यांचें तादात्म्य झालें आहे' ( तादात्म्यं भावरसयोर्भारविःस्पष्टमूचिवान् । ) कृष्णकवि आपल्या भारतचरितांत म्हणतो, 'अर्थघनत्व दाखवून सुद्धा सरस असणारी भारवीची वाणी एखाद्या दीपिकेसारखी सर्वांना मार्गदर्शक आणि म्हणून अत्यंत उपयुक्त झाली आहे' ( प्रदेशवृत्यापि महान्तमर्थं प्रदर्शयन्ती रसमदधाना । सा भारवेः सत्पथदीपिकेव रम्या कृतिः कैरिव नोपजीव्या । ). पण यामुळें भारवीची वाणी थोडी कठिन झाली आहे. किरातार्जुनीयाच्या पहिल्या तीन सर्गांची 'पाषाण-

त्रय' म्हणून प्रसिद्धि आहे. पंधराव्या सर्गांत तर अनेक कृत्रिम 'बंध' साधण्याचा त्यानें प्रयत्न केल्यानें तो केवळ चित्रकाव्य किंवा शब्दांची कसरत म्हणूनच ओळखिला जातो.

**कल्पनेला निरीक्षणाची जोड.**

साहित्य, व्याकरण, वेदान्त, न्याय, धर्म व विशेशतः दण्डनीति ( राज्य-शास्त्र ), कामशास्त्र या शास्त्रांचें भारवीचें अध्ययन असून पुराणेतिहासाशीं त्याचा परिचय होता. राजदरबारीं राहून फार जवळून त्यानें राजधर्मांचें अवलोकन केलें होतें असें वाटतें. भारवि शिवभक्त असावा. त्यानें प्रवास करून वनश्रीचें व लोकाचारांचें सूक्ष्म निरीक्षण केलेलें दिसतें. कालिदासानंतर संस्कृत काव्यांच्या सामान्य सुशिक्षितांशीं असलेला संबंध हळूहळू सुटत जाऊन तीं केवळ पांडितवर्गांतच वाचिलीं जऊं लागलीं. व त्यामुळेंच त्यांच्या भाषेंत अवघडपणा, कृत्रिमता, पांडित्यप्रदर्शन इत्यादि दोष दिसूं लागले. विषयाच्या भावपूर्ण मांडणीपेक्षां महाकाव्यरचनेच्या नियमांकडे लक्ष अधिक दिलें जाऊं लागलें. भारवी आपल्या किरातार्जुनीयाच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटच्या श्लोकांत 'लक्ष्मी' हा शब्द आणतो. तसाच माघ 'श्री' आणतो. 'अवंतिसुंदरीकथें'तील परिच्छेदाच्या शेवटच्या श्लोकांत दण्डीनें 'आनन्द', तर प्रवरसेनानें आपल्या काव्यांत 'अनुराग' हा शब्द मुद्दाम वापरला आहे. भारवीनें कालिदासापेक्षा अधिक वृत्तें योजलीं असून त्यांतल्या त्यांत त्याला 'वंशस्थ' वृत्त साधलें आहे असें क्षेमेन्द्र म्हणतो. असो. याप्रमाणें प्रज्ञावंत आणि वैदग्ध्यशाली अशा या महाकवीचा थोडाचा परिचय करून घेतल्यावर आपण त्याच्या एकुलत्या एक कृतीच्या अन्तःस्थ गुणांवरूनच या महाकवीची जास्त पारख करूं.

# 'किरातार्जुनीय'[1]—कथासार

## डिंवचलेली नागीण.

"तुमच्यासारख्या सुज्ञ पुरुषाला मी बायको माणसानं कर्तव्याचा उपदेश करूं पहाणं म्हणजे तुमची अमर्यादा करणं आहे हें मला समजत का नाहीं? पण काय करूं? अंगाचा नुसता मडका होतो आणि वाटतं स्त्री-जातीची मीडमर्यादा जरा ठेवावी एकीकडे आणि भडाभड बोलून टाकावं एकदाचं आपल्या मनांतलं."

डिंवचलेल्या नागिणीप्रमाणें चवताळलेली मानी द्रौपदी आपला क्रोध शक्य तितका आवरून धर्मराजाला हें म्हणत होती. तिच्या या अनावर क्रोधाचें कारणहि असेंच सबळ होतें. वनवासांत असणारे पांडव कांहीं काल द्वैतवनांत राहिले होते. तेथें असतांना धर्मराजानें एक हेर हस्तिनापुरास पाठवला व त्याला सांगितलें कीं, 'दुर्योधन प्रजेला कसा वागवीत आहे आणि ती त्यावर संतुष्ट आहे कीं नाहीं तें पाहून ये.' ब्रह्मचाऱ्याच्या वेषानें तो हेर टेहळणी करून परत आला आणि त्यानें धर्मास खबर दिली कीं, 'दुर्योधन न्यायानें राज्य करतो आहे. तुमच्यावरील अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठीं तो मुद्दामच फार नेकीनें वागत आहे. त्यावर प्रजा संतुष्ट असून त्याच्या राज्याचा सर्वांगीण उत्कर्ष होत आहे!'

---

१ वनवासांत असलेल्या पांडवांना दुष्ट कौरवांकडून राज्यप्राप्तीची आशा असलीच तर ती उत्तम व अधिक प्रभावी शस्त्रास्त्रांच्या साहाय्यानेंच होती. म्हणून व्यासांच्या सल्ल्यावरून व बंधूंच्या अनुमतीनें अर्जुन इंद्रकील पर्वतावर गेला. इंद्रानें त्याला अस्त्रप्राप्तीसाठीं तपानें शंकारास प्रसन्न करून घेण्यास सांगितलें. तप करणाऱ्या अर्जुनाची परीक्षा पाहण्यासाठीं श्रीशंकरांनीं किरातचें रूप घेऊन 'वराहाची शिकार प्रथम कोणीं केली' या मुद्यावर विवाद उपस्थित केला. त्याचें पर्यवसान अर्जुन व किरात यांच्या युद्धांत झालें. अर्जुनाचें युद्धकौशल्य पाहून प्रसन्न झालेल्या शंकरांनीं त्याला दिव्य पाशुपतास्त्र दिलें. किरात व अर्जुन यांच्या या प्रसंगावर लिहिलेलें काव्य तें 'किरातार्जुनीय' काल सहाव्या शतकाचा पूर्वार्ध. सर्ग १८ (पूर्ण). श्लोक-संख्या. १०४०.

शत्रूच्या उत्कर्षाची ही चीड आणणारी वार्ता धर्मराजानें द्रौपदीला आपल्या बंधूंसमक्ष जशीच्या तशी सांगितली. मग काय विचारतां ? आपला भयंकर अपमान करणारे दुर्योधन-दुःशासन सुखानें नांदत आहेत हें ऐकल्याबरोबर तिच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला. आणि कांहीं झालें तरी क्षमा आणि शांति यांचेंच व्रत पाळणाऱ्या धर्मराजाच्या मनाला चेतवण्यासाठीं ती वरीलप्रमाणें उद्गारली. ती पुढें म्हणाली:—

धन्य आहे तुमची ! !

"धर्मराज, तुमच्या इन्द्रासारख्या प्रभावशाली पूर्वजांनीं जिचा प्रतिपाळ बहुतकाळ केला ती पृथ्वी आपल्या हातांनीं, मदोन्मत्त हत्ती आपल्या सोंडेनें एखादी पुष्पमाला फेकून देतो तशी, तुम्हींच दूर लोटून दिली. तुम्हांला जिथें तिथें सत्य आणि सरळपणा पाहिजे असतो. पण ठकाशीं ठक जे होत नाहींत त्यांचा यां जगांत निभाव लागायचा नाहीं. कवच नसलेल्या योद्धयाच्या अंगांत जसे तीक्ष्ण बाण शिरतात तसें कापट्य-विरहित पुरुषांचा, त्यांच्या अन्तरंगांत शिरून, दुष्ट घात करत'त. मानी शूरांनीं ज्या मार्गाचा तिरस्कारच केला आहे त्या मार्गानें या आपत्कालां-तहि तुम्ही कसे वर्तत आहां ? आपली विपत्ति पाहून, वाळलेला शमीवृक्ष जसा अग्नीच्या ज्वालांनीं पेट घेतो तसें, तुमचें अंग क्रोधानें भडकत कसें हो नाहीं ? ज्याला चीड नाहीं तो माणूसच नव्हे. तो जंतु कोणाचा मित्र झाला काय किंवा शत्रु झाला काय दोहींची किंमत लोकांना सारखीच. पण जो कोपला असतां आपलें उद्दिष्ट हटकून सफल करतो त्या तेजस्वी पुरुषाला सर्व जनता आपण होऊन वश होते. परंतु तुमचें सगळेंच वेगळें ! तुमची कुलवधू विटंबिली जावो, भावांची दुर्दशा होवो, कीं तुम्हांला स्वतःला भणंगपणा येवो, तुम्ही स्वस्थच आहां. तुमची दुःस्थिति पाहून माझें चित्त तळमळतें; पण तुम्हांला त्याचें कांहीं नाहीं. तुमच्या मनाची ठेवणच मला कळत नाहीं. जगात किती विचित्र घडणेच्या चित्तवृत्ति असतात तरी !! तुम्हींच पाहा— हे तुमचे बंधु महारथि भीमसेन. ज्यांनीं पूर्वी नित्य चंदनाची उटी अंगाला लावावी, त्याचें शरीर आज जंगलांतून हिंडतां हिंडता धुळीनें माखलें आहे. हे तुमचे दुसरे बंधु इंद्रतुल्य पराक्रमी पार्थ. ज्यांनीं एकदा उत्तरकुरुदेश जिंकून तुमचे खाजिने सोन्या-

रुप्यांनीं मढवून काढले, ते हे धनंजय आज वल्कलें पांघरून फिरत आहेत. मृदुशय्येवर सुखासीनपणें निजणारे हे नकुल सहदेव ! पण आज राना-माळांतल्या तृणशय्येनें त्यांचीं अंगें दाढरलीं आहेत. त्यांच्या केशांची तरी ऊर्जा आहे काय ? हें सर्व आपल्या डोळ्यांनीं पाहात असतां तुमच्या सत्यनिष्ठ व क्षमाशील मनाला व्यथा होत नाहीं का ? क्रोध उफाळून येत नाहीं का ? 'जळो हा मनःसंयम आणि आग लागो त्या प्राप्त परिस्थितींत संतोष मानण्याच्या वृत्तीला–' असें तुम्हांस वाटत नाहीं ? धन्य आहे तुमची ! ! **धनुष्य टाकून समिधा तरी घ्या ! !**

"तुम्ही आपली स्वतःची दुर्दशा तरी ध्यानांत घ्यावी ! हास्तिनापूरच्या राजवाड्यांत मंचकावर आपण गाढ झोपीं गेलेले असावयाचे व भाट-बंदिजनांनीं स्तुतिगायनानें आपल्यास पहाटे जागें करावयाचें असा आपला राजोपचार चाले. पण आज दर्भांच्या शय्येवर तुमचा क्षणभर डोळा लागलाच तर भालूंच्या अभद्र ओरडण्यानें तुमची झोंपमोड होते. कुठें तुमचें ते पूर्वीचें पंचपक्वान्नांचें भोजन आणि कुठें हा रानफळांचा निःसत्त्व आहार. तुमचें कृश होणारें शरीर आणि यश मला पाहवत नाहीं. मला संताप येतो तो या गोष्टीचा कीं ही आपली अपमानास्पद दुर्दशा आमच्या शत्रूंनीं केलेली आहे. मला विपत्ति किंवा पराजय यांचें येवढें कांहीं वाटत नाहीं. ज्यांचा मानीपणा व तेज कायम आहे त्यांचा पराभवहि मला उत्सवासारखा वाटेल. पण तुमचें तें तीव्र क्षात्रतेजच मंदावलें आहे. आणि शांति व क्षमा यांचा जप तुम्हीं चालविला आहे. मी तुम्हांला निक्षून सांगतें, याउप्परहि तुम्हांला क्षमा हेंच सुखाचें साधन वाटत असेल तर क्षात्रतेजाचें चिन्ह असलेलें हें खांद्यावरचें धनुष्य द्या फेकून आणि हातांत समिधा व डोक्यावर जटाभार धारण करून 'अग्नये स्वाहा, अग्नय इदं न मम' असें करीत बसा. दुष्ट शत्रूंशीं कसलें आलें आहे न्यायाचें वर्तन आणि कुठलें वचनाचें परिपालन ? जय पाहिजे असेल तर खुशाल वचनभंग करावा हेंच राजे लोक करीत आले आहेत. शेवटीं अशी आशा करतें कीं, तुमची ही दुर्बुद्धि नाहींशी होवो, तुमच्या हातून शत्रू नाश पावोत व राज्यलक्ष्मी पुनरपि आपल्या गळ्यांत पूर्ववत् माळ घालो."

**मेघगर्जनेनें सिंह कां बरें खवळतो ?**

आभाळांत बिजली क्षणैक कडाडून जशी शान्त व्हावी त्याप्रमाणें आपलें छोटें पण तेजस्वी भाषण पुरें करून द्रौपदी स्तब्ध बसली. मानी भीमसेनाला द्रौपदीचें हें भाषण फारच आवडलें. हिनें आपलेंच मनोगत बोलून दाखविलें असें त्याला वाटलें व त्यानें धर्मासमोर द्रौपदीच्या तेजस्वी उपदेशाची स्तुति करून त्याला आपलाहि पाठिंबा पुढीलप्रमाणें दिला. तो म्हणाला—

" धर्मराज ! तत्त्वज्ञान, तीन वेद, अर्थशास्त्र आणि दंडनीति यांमध्यें प्रवीण असणाऱ्या तुमची ती बुद्धि सांप्रत च इतकी कुंठित होऊन कशी बसली आहे न कळे. तुमच्यामधील पौरुषाचा तर संपूर्ण लोपच झाला आहे. शत्रूचें बल सारखें वाढत असता त्याची उपेक्षा जे राजे करतात त्यांच्या नेमळेपणाला चिटून त्यांची राज्यलक्ष्मी लागलीच चालती होते. एखाद्या राजाचें वैभव ( आमच्याप्रमाणें तात्पुरतें ) ऱ्हास पावलेलें असेल, पण त्याचें नैसर्गिक क्षात्रतेज मात्र जर ज्वलंत असेल तर सर्व प्रजा प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें त्याचा मान देते. म्हणून सांगतों, आत्मपौरुष हा च या विपत्तींतून सुटण्याचा सन्माननीय व स्वाभिमानाचा एकच मार्ग आहे. तेव्हां स्वस्थ माशा मारीत बसण्याचा हा तुमचा विचार आतां बस्स झाला. उत्कर्ष पराक्रमाच्या आश्रयानें राहतो, रडतरावपणाच्या आश्रयानें रहात नाहीं. 'आपल्या अटीप्रमाणें आमचा वनवास संपल्यावर दुर्योधन आपण होऊन आपलें राज्य आपणांस देईल' या भरंवशावर तुम्ही जर त्या कालाची वाट पाहात असाल तर तो तुमचा नुसता भ्रम आहे. अहो, दुष्टबुद्धि दुर्योधन इतकीं वर्षें ताब्यांत असलेल्या संपन्न साम्राज्याचें उदक सुखासुखी तुमच्या हातावर सोडील ही गोष्ट कालत्रयीं तरी शक्य आहे काय ? आणि समजा, दुर्योधनानें तुमच्या हवालीं तुमचें राज्य केलें, तरी असलें दान दिलेलें निर्जीव राज्य घेण्यांत तुमच्या वीर्यशाली भावांच्या बाहुबलाची काय शोभा राहिली ? क्षत्रिय राज्य जिंकतो, भीक मागून तें घेत नाहीं. राज्यप्राप्ति ही माझ्या मतें गौण गोष्ट आहे. मानी क्षत्रिय आपल्या नश्वर प्राणांच्या पणानें क्षात्रधर्म राखल्याचें शाश्वत यश कमावीत असतो. राज्य मिळणें हें त्याचें एक केवळ आनुषंगिक फळ आहे. मेघ अंबरांत गर्जूं लागले कीं

मृगराज सिंह त्यावर चवताळून उठतो. तसें करण्यांत त्याला कोणत्या फलाची अपेक्षा असते ? अहो, परक्याची नसती प्रौढी खपूंच नये हा तेजस्वी लोकांचा उपजत स्वभावधर्मच आहे. म्हणून हात जोडून विनवितों कीं, हें औदासीन्य टाकून कांहीं पराक्रम करण्याचा निश्चय करा. कौरवांचें राज्य ते पराक्रमी आहेत म्हणून टिकलेलें नसून तुम्ही उदासीन आहांत म्हणून तें उभें दिसतें आहे.

"दादा, तुम्ही नुसतें मनांत आणायचा अवकाश आहे. चार दिग्गजांसारखे सामर्थ्यशाली आणि चतुःसमुद्रासारखे अजिंक्य असे तुमचे चार बंधु अंगावर चाल करून गेल्यावर त्यांच्यापुढें उभें राहण्याची कौरवापैकीं कोणाची माय व्यायली आहे मला सांगा. धर्मा, शेवटीं एवढीच आशा करतों कीं, तुमच्या वैऱ्यांनीं तुमच्या मनांत सतत भडकत ठेवलेला क्रोधाग्नि अखेर त्याच्या विधवांच्या अश्रुजलानेंच शान्त होवो."

## अविचार व घाई घातक आहेत.

हें बोलत असतां रागानें लाल झालेला भीम आपलें म्हणणें संपवून स्वस्थ बसला. त्याची समजूत घालून आपली विचारसरणी त्याला पटवून देण्यासाठीं युधिष्ठिर त्याला शांतपणें म्हणाला—

"भीमा, तुझ्या शब्दांतून तुझ्या मनांतील आशय फार उत्तम तऱ्हेनें व्यक्त झाला, तूं आपलें म्हणणें सप्रमाण आणि साधार मांडलेंस; पण तें आपलें धोरण ठरवण्यास पुरेसें निर्णायक आहे असें मात्र मला वाटत नाहीं. करावयाचें काय हें ठरविणें सोपें असलें तरी त्याची साधन-चिकित्सा मात्र कठीण आहे. माझें तुला पहिलें सांगणें हें आहे कीं, कोणतीहि गोष्ट अविचारानें करूं नये. कारण अविवेक अनेक अनर्थांस कारणीभूत होतो. याउलट विवेकी पुरुषावर जाणों काय लुब्ध होऊन कार्यासिद्धि त्याला आपोआप वश होते. ज्ञान हें देहाचें भूषण आहे. या ज्ञानभूषणाचें भूषण चित्ताची शांति. या शांतीचें भूषण पराक्रम व शेवटीं त्याचें भूषण न्यायानें मिळविलेला विजय होय. शास्त्रदीपानें अंधारांतलिहि कर्तव्यमार्ग स्वच्छ दिसतो. महात्म्यानें चोखाळलेल्या मार्गानें जाणारा मनुष्य विजयी होतो. दुर्दैवानें त्याला जरी कांहीं काळ अपजय आला तरी तो जयाइतकाच श्रेष्ठ आहे. ज्याला राज्य जिंकावयाचें

आहे त्यानें प्रथम क्रोधाचा आवेग जिंकला पाहिजे. आपल्या रागाचा भर ज्याला आवरतां येत नाहीं अशा सामर्थ्यवान् क्षत्रियाची शक्ति क्षीण होते. जो सर्वांशीं समधातपणानें वागतो व जो वेळ ओळखून मऊहि होतो आणि काठोरहि होऊं शकतो तो राजा आपल्या विवेक-ा बलानें लोकांवर वर्चस्व मिळवितो. राज्यलक्ष्मी चिरकाल टिकवून धरणें व आपल्या दुष्ट इंद्रियरूपी अश्वांना ताब्यांत ठेवणें या दोन गोष्टींमध्यें केवढें तरी अंतर आहे ! आपल्या ताब्यांत आपलीं इंद्रियें नसतील तर कमावलेलें राज्य आपल्या हातून केव्हांच निसटून जाईल. राज्यलक्ष्मी चंचल आहे असा बोभाटा खुद्द राज्यलक्ष्मीच्या अंगच्या गुणांनीं झालेला नाहीं. जे कोणी विद्वान् म्हणविणारे आपले कामक्रोधादि शरीरांतील रिपु जिंकीत नाहींत त्यांच्या दोषांमुळेंच लक्ष्मीला हा चंचलतेचा डाग लागला आहे. अरे भीमा, भलत्या वेळीं नुसत्या रागावण्यानें काय होणार ? त्यानें तुझें अंग मात्र तापेल. एखाद्या प्राकृत माणसारखा वागूं नको. त्यामुळें तुझी कार्यसिद्धि जवळ येण्याऐवजीं दूरच जाईल.'

**क्षमा हेंच श्रेष्ठ साधन.**

"माझें तर मत असें आहे कीं, भविष्यकाळीं उपकारक, प्रयत्नाचें विपुल फल देणारें, शत्रूला घातक व आपल्याला उपकारक असें क्षमेवांचून दुसरें साधन नाहीं. दुर्योधनाचें पारिपत्य करण्यांत आपण विलंब केला तर दुर्योधन सर्व राजांस वश करील या तुझ्या शंकेला उत्तर असें कीं, आमच्याशीं ज्यांचा अकृत्रिम स्नेह आहे असे मानी यादव आम्हां विनयसंपन्न पांडवांचा पक्ष सोडून देऊन उर्मट आणि कार्यापुरता संबंध जोडणाऱ्या दुर्योधनाच्या पक्षाला सर्वकाळच चिकटून राहतील हें शक्य नाहीं. आज जे कोणी स्नेहीसंबंधी व इतरेजन दुर्योधनाच्या पक्षात असल्यासारखे दिसतात ते केवळ स्वहितासाठीं नम्रपणाचें पांघरूण घेऊन दुर्योधनाजवळ काळ कंठीत आहेत. तूं म्हणतोस त्याप्रमाणें आपल्या वनवासाची मुदत संपण्यापूर्वीच जर दुर्योधनावर आपण हल्ला केला तर हे वरील राजे या आमच्या अन्यायी कृत्यानें आपल्यापासून फुटतील. त्यांची सहानुभूति आपल्या पक्षाकडे राहणार नाहीं. दुर्योधन हाडाचा उर्मटच आहे. तो या मानी राजांचें मन केव्हांतरी दुखवणारच. आणि तसें झालें म्हणजे ते आपल्या पक्षाला सहजच

मिळतील. अरे, साधा माणूस सुद्धां अपमान सहन करीत नाहीं. मग या मानी क्षत्रिय राजांची गोष्टच नको.

" दुर्योधनाच्या राज्यांत लवकरच असंतोष माजेल. त्याचे स्वजनहि त्याचेवर उलटतील. आपण जरा दम खाल्ला तर मुळें सैल झालेल्या वृक्षाप्रमाणें आपणांस त्याला सहज उलथून टाकतां येईल. शहाण्यानें दुष्टांच्या उत्कर्षाची उपेक्षा करावी. कारण त्यांचें वैभव अनर्थांतच गडप व्हावयाचें. आंतून आणि बाहेरून पोखरलेल्या दुर्योधनास जिंकण्यास मग आपणांस किती वेळ लागणार आहे ? "

**" आपलें येणें कां झालें ?"**

याप्रमाणें धर्म भीमसेनाची समजूत घालीत असतां मनांतला प्रत्यक्ष मनोरथच एकदम प्रकट व्हावा त्याप्रमाणें भगवान् वेदव्यास तेथें अचानक आले. धर्मराजानें लगबगीनें त्यांचें स्वागत केलें व त्यांची पूजा करून त्यांस आसनावर बसविलें आणि आपण नम्रपणें हात जोडून त्यांचेसमोर उभा राहिला. त्या वेळीं बृहस्पतीशेजारीं असलेल्या पूर्ण चंद्राप्रमाणें तो शोभला. प्रत्यक्ष वेदोनारायणच असे महर्षि व्यास यांचें येणें कां झालें हें जाणून घेण्यासाठीं युधिष्ठिर त्यांना नम्रपणें म्हणाला— " भगवन्, आकाशांत मेघ नसता झालेल्या पर्जन्यवृष्टीप्रमाणें आपलें आगमन अतर्कित असें झालें. हा लाभ शुभसूचक असून आमच्या पूर्वपुण्याईनें आम्हांला झाला. आज माझीं यज्ञकर्में फळाला आलीं आणि ब्राह्मणांचे आशीर्वाद सार्थ झाले असें मी मानतों. कारण आपल्या येण्यानें जगतामध्यें मी आज धन्य म्हणून गाजलों आहें. आपल्या सन्निध मी असलों कीं मी सर्व दुःखें विसरतों व माझें चित्त प्रसन्न होतें. 'आपलें येणें कोणत्या हेतूनें झालें' या माझ्या प्रश्नाला तरी खरें पाहिलें तर काय अर्थ आहे ? कारण, आपल्यासारख्या निरिच्छ तपोधनांना देतां येईल असें आमच्याजवळ तरी काय आहे ? तथापि हा प्रश्न जो मी आपल्यास करीत आहें त्याचा हेतु आमच्या कल्याणाचें असें कांहीं आपल्याकडून ऐकावयाला मिळेल येवढाच आहे."

**रणांगणावरील जय श्रेष्ठ शस्त्रास्त्रांनींच.**

युधिष्ठिराचा हा विनयमधुर प्रश्न ऐकून त्याचा विजय व्हावा या बुद्धीनें

व्यास त्याला बोलले:— "धर्मा, वास्तविक पाहिलें तर, ज्यांना ऐहिक आणि पारलौकिक कल्याण साधावयाचें आहे त्यांनीं आपल्या नातेवाईकांशीं समभावानें वर्तावें हें उचित. विशेषत: आमच्यासारख्या तपस्व्यांनीं तरी हा नियम अवश्य पाळला पाहिजे. पण युधिष्ठिरा, तुला खरें सांगूं? तुझ्या अमोल गुणांनीं माझें हृदय जिंकलें आहे. आम्ही विरक्त आणि मुक्तावस्थेंतील असलों म्हणून काय झालें? सज्जनांवरील प्रेम हें मुक्तांनासुद्धां सुटलें नाहीं. तुम्हीहि धृतराष्ट्राला त्याच्या मुलांसारखेंच. शिवाय तुम्ही दुर्योधनापेक्षां कितीतरी पटींनीं गुणवान्. असें असूनहि केवळ विषयलोभानें त्यानें तुम्हांस दूर लोटलें आहे. त्याला दुसरें कांहींच कारण नाहीं. अरे, जो कर्ण, शकुनि इत्यादि दुष्टाच्या सल्ल्यानें वागतो त्या धृतराष्ट्राचा नाश व्हावयाचा हें निश्चितच आहे. कुसंगति ही अपजयाला आणि अनर्थाला कारणीभूत होते. उलट तूं मात्र तुझे सर्व शत्रू अधर्मानें वागत असतां धर्मांचीच कास धरून विपत्कालीं सुद्धां सद्गुणांवरील आपलें प्रेम व्यक्त केलेंस. तुझ्या अंगचे सद्गुण याप्रमाणें कृपाला लागले हा तुझ्यावरील शत्रूंचा उपकारच आहे. हें सर्व ठीक झालें. पण तुला प्रस्तुत गोष्ट सांगतों ती ऐक. तुला तुझें राज्य मिळेल तें पराक्रमानेंच. नुसत्या सद्गुणांनीं नव्हे. आणि तुझे शत्रू तर तुजहून संख्याबलानें आणि शस्त्रास्त्रांनीं श्रेष्ठ आहेत. म्हणून सांगतों कीं, तुझा पक्ष बलशाली करण्याच्या मार्गाला लाग. समरांगणावरील सिद्धि अधिक बलसंचयानेंच होते. आज कौरवांचा पक्ष तुमच्या पक्षापेक्षां कसा श्रेष्ठ आहे हें सांगतों ऐक. प्रत्यक्ष परशुराम ज्याचा गुरु आणि जो इच्छामरणी असल्यानें ज्याच्यावर यमाचीहि मात्रा चालत नाहीं असा शत्रूच्या उरांत धडकी भरविणारा भीष्म त्यांचे बाजूस आहे. प्रलयानलाप्रमाणें शत्रुसेना खाऊं पहाणारा गुरुद्रोण त्यांचा पाठीराखा आहे. कर्णाच्या पराक्रमांस तर पारच नाहीं.

## अर्जुनाचाच आधार.

"मात्र यांत तुम्हांला एकच गोष्ट अनुकूल आहे कीं एकटा अर्जुन या सर्वांचा फडशा पाडूं शकेल. पण केव्हां म्हणशील, तर उग्र तपश्चर्या करून तो उत्कृष्ट बल संपादील तेव्हां. ज्या विद्येच्या योगानें असें असाधारण सामर्थ्य अर्जुनाला मिळेल ती विद्या तुम्हांस सांगण्यासाठींच मी येथें आलों

आहें." या व्यासवचनानंतर 'चल बाबा तर. घे ही विद्या साधून.' असें धर्मराजानें म्हणतांच एखाद्या शिष्याप्रमाणें अर्जुन व्यासापुढें उभा राहिला. त्याबरोबर जिच्यांतून ठिणग्या पडत आहेत अशी इंद्रमंत्ररूपविद्या व्यासाच्या मुखातून अर्जुनामधें संक्रांत झाली. सूर्यबिंबांतून निघालेले किरण कमलात शिरावेत तसें हें वाटलें. त्या मंत्रविद्येचें ध्यान कसें करावयाचें हेंहि व्यासानीं त्या धनुर्धार्‍यास सांगितलें. हें होतांच साक्षात्कार झाल्याप्रमाणें अर्जुनाचे ज्ञानचक्षु उघडले. याकरतां लागणारी तपश्चर्या कशी करावी हें सागण्यासाठीं व्यास अर्जुनाला म्हणाले—" अर्जुना, मीं सागितलेल्या मंत्रानें तुझें तेज आतां वाढलें आहे. तूं आतां आपलीं शस्त्रास्त्रें घे आणि दुसऱ्या कोणासहि आपल्या तपोभूमींत प्रवेश करूं न देतां जप, उपवास आणि स्नान आदिकरून मुनिव्रताचा आश्रय कर. इंद्राला प्रसन्न करण्यासाठीं ज्या पर्वतावर राहून तुला हें तप करावयाचें आहे त्या इंद्रकील पर्वतावर तुला हा यक्ष घेऊन जाईल." असें बोलून यास महर्षि अंतर्धान पावले. तोंच ऋषींनीं सांगितलेला यक्ष अर्जुनास इष्ट स्थळीं घेऊन जाण्यासाठीं येऊन उभासुद्धां राहिला.

**माझ्या अपमानव्रणावरील खपली निघाली.**

अर्जुनाच्या विरहानें सर्वांचीं मनें कांहीं काळ खिन्न झालीं. पण विवेकानें त्यानीं आपणास सावरून धरलें. द्रौपदीला मात्र आपला शोक आवरून धरतां येईना. तिच्या डोळ्यांत आसवें दाटून आल्यानें ते दवबिंदूंनीं व्याप्त झालेल्या कमळांसारखे दिसत होते प्रवासाला निघालेल्या पार्थाकडे तिला सप्रेम कटाक्ष टाकावयाचा होता. पण डोळ्यांवरील अश्रुपटलांमुळें तिला तसें करता येईना. बरें, आसवें गाळून दृष्टि मोकळी करावी म्हटलें तर प्रयाणाच्या मंगल प्रसंगीं अश्रुपात अनुचित होतो. अशा अडचणींत ती पडली. गोंधळलेल्या द्रौपदीचा तो सप्रेम कटाक्ष अर्जुनानें आपल्या प्रसन्नमनाच्या ओंजाळींत—प्रवासांतील शिदोरीप्रमाणें— सांठविला. दाटलेल्या कंठानें द्रौपदी अर्जुनाला म्हणाली, " पार्था, आमच्या वैऱ्याच्या कपटांत रुतून पडलेली आपली इभ्रत वर काढण्यासाठीं आपण चालला आहां. म्हणून येवढीच प्रार्थना करतें कीं, तपाची सिद्धि होईपर्यंत आमच्या विरहामुळें आपल्या चित्ताला फारशी व्याकुळता येऊं

देऊं नका. जे लोक विलक्षण कार्य करून कीर्ति व सुख मिळविण्यासाठीं उत्साहानें कामास लागतात व जे विरहादि क्लेशांनीं आपलें मन व्याकुळ होऊं देत नाहींत त्यानाच सिद्धि आपोआप वश होते. लोकांचें रक्षण करण्यासाठींच विधात्यानें उत्पन्न केलेल्या सबंध क्षत्रियवर्गाचें तेज लोपविणारा, तेजस्वितेचा प्राण जो अभिमान त्यावर गदा घालणारा, जो तुमच्या चुलतभावानींच केला या गोष्टीवर विश्वास ठेवतांना इतर प्रान्तांतील राजांनीं आपल्या माना लाजेनें खालीं घातल्या, ज्यामुळें तुमच्या पूर्वीच्या व पुढच्या पराक्रमाला कायमचें काळें फासलें गेलें व ज्याची स्मृति देखील दुःसह आहे असा माझा केशकर्षणानें झालेला अपमान मात्र तुमच्या या विरहानें, खपली काढलेल्या व्रणाप्रमाणें, आज पुन्हा ताजा झाला आहे."

**पूर्वीचेच अर्जुन तुम्ही आहां ना ?**

" धनजया, सांप्रत तुमची अभिमानवृत्ति लोपल्यामुळें तुम्ही निस्तेज दिसतां. शत्रूच्या प्रतापानें तुमचा विक्रम झाकाळून गेला आहे. निरुपयोगी होऊन पडल्यामुळें तुमच्या तेजस्वी शस्त्रास्त्रांना जणों काय लाज वाटत आहे. असल्या मंदतेज झालेल्या अस्त्रांनीं तुम्हाला तुमची पूर्वीची शोभा येत नाहीं. तुमच्या तोंडावर अवकळा पसरलेली दिसते. दुःशासनाच्या ओढण्यामुळें मलिन झालेल्या, तुमच्यासारखे पराक्रमी पति असतांना अनाथासारखें भासणाऱ्या व ज्यांचें रक्षण केवळ दैवयोगामुळेंच झालें अशा या माझ्या केसामुळें तुमच्या पराक्रमाची अवहेलना झालेली आहे. आज ही तुमची अशी स्थिति आहे. पण मला तुम्हाला या प्रसंगीं असें विचारावयाचें आहे कीं तपस्येसाठीं निघालेले हे पार्थ पूर्वीचे अभिमानी, तेजस्वी आणि पराक्रमी पार्थच आहेत ना ? जो लोकांचें रक्षण करतो तो क्षात्रिय; आणि युद्धकर्मांत ज्याचें बल प्रकट होतें तेंच धनुष्य. या गुणाविरहित या दोन्हीहि गोष्टी नामधारीच होत. हत्तींनीं घेरलेल्या सिंहाला त्याचें तेज पुन्हा परत मिळावें त्याप्रमाणें हातीं घेतलेल्या या कामानें तुमची पूर्वीची योग्यता तुम्हांला परत मिळाली आहे. जो आपली श्रेष्ठ योग्यता प्रत्यक्ष तेजस्वी कर्म करून टिकवून धरतो तो, लोकांमध्यें अद्वितीय ठरतो. पार्था, तुमच्या मागें आमचें कसें होईल

याची चिंता बाळगूं नका. तपोवनांतसुद्धां एकटें असतांना गैरसावध वागूं नका. मत्सर, द्वेष, प्रेम आदिकरून विकारांनीं व्याप्त झालेले लोक साधूंशीं वागतांना सुद्धां आपापले स्वभाव प्रकट करीत नाहींत असें नाहीं. त्यांच्यापासून साधूंनींहि जपूनच असावें हें चांगलें. बरें तर, व्यासमहर्षींच्या वचनाप्रमाणें वागून आमचे फारां दिवसांचे मनोरथ पूर्ण करा. धनंजया, यशस्वी होऊन परत आलांत कीं तुम्हांला कडकडून भेटण्यासाठीं ही तुमची भार्या द्रौपदी येथें वाट पाहत उभी आहे.''

**स्वर्गांत दुंदुभी वाजूं लागल्या.**

आपल्या अवमानाची जाणीव पुन्हा एकदा नव्यानें करून देणारा द्रौपदीचा हा तेजस्वी निरोप ऐकून अर्जुनाचें मन खवळून गेलें. त्याच्या कल्पनाचक्षूंसमोर त्याला शत्रू दिसूं लागले. धौम्य मुनींनीं त्याचीं शस्त्रास्त्रें त्याच्याजवळ दिलीं, त्यामुळें नेहमीं सौम्य दिसणारा अर्जुन कर्दन-काळासारखा भयंकर दिसूं लागला. साध्या सौम्य मंत्राची योजना जारण-मारण कर्मांवर केल्यानंतर तो जसा उग्र दिसतो त्याप्रमाणें अर्जुन भासूं लागला. खांद्याला अडकवलेलें गांडीव धनुष्य, पाठीवर अक्षय्य बाणांचा भाता, हातांत तीक्ष्ण तरवार व अंगावर रत्नखचित चिलखत अशा थाटांत यक्षानें दाखवलेल्या हिमालयाकडील मार्गानें जाणाऱ्या अर्जुनाला पाहून द्वैतवनांतील तपस्व्यांचीं हृदयें दुःखानें क्षणैक व्याकुळ झालीं. पण अर्जुना-च्या या सुफलदायी प्रयाणानें आनंदलेल्या देवांनीं स्वर्गांत दुंदुभि वाज-विल्या. त्याचा ध्वनि दशदिशांमध्यें दुमदुमून राहिला. स्वर्गीय पुष्पवृष्टीनें आकाशमार्ग फुलून गेला. आणि 'दुष्ट कौरवांच्या नाशाने तुझा भार लवकरच हलका होणार' ही सुवार्ता पृथ्वीच्या कानांत सांगण्यासाठीं आपले तरंगरूपी बाहु उंच उभारून सागर तिच्याजवळ येऊं लागला.

**शरद्ऋतूंतले इंद्रधनुष्य.**

यक्षाच्या मागोमाग अर्जुन चालला. तो काळ शरदृऋतूचा होता. द्वैतवनापासून हिमालयापर्यंतच्या मार्गावर दोन्ही बाजूंस रमणीय सृष्टिशोभा दिसत होती. शरद्ऋतूमुळें तिला नवें आकर्षकत्व प्राप्त झालें होतें. पिकून पिवळीं झालेलीं शेतें, कूजन करणाऱ्या कलहंसांच्या रांगा आणि स्फटिका-प्रमाणें स्वच्छ पाण्यानें तुडुंब भरलेलीं सरोवरें पहात पहात अर्जुन चालला

होता. शेतांत काम करणाऱ्या अव्याजमनोहर ग्रामयुवती व गाईगुरांबरोबर समरस होऊन हिंडणारे गोपाल पाहून अर्जुनाला मोठें कौतुक वाटत होतें. तो गौळवाड्यांजवळून चालला असतां आपल्या वासरांसाठीं पान्हा फुटलेल्या पुष्ट गाई त्याच्या नजरेस येत. तसेंच दधिमंथनाचा मृदंगमधुरध्वनि त्याच्या कानांवर पडे. शरदृतूची त्या वनांतील शोभा पाहण्यांत अर्जुन रंगलेला आहे असें पाहून यक्षानें वनशोभेचे आणखी कांहीं विशेष आपण होऊन त्याच्या नजरेस आणले. तो म्हणाला, "पार्था, ज्याप्रमाणें शरदृतूनें या फलांच्या योगेंकरून पृथ्वीला कृतार्थ केली आहे, त्याप्रमाणें हा शरदृतु तुझेहि मनोरथ पूर्ण करो. सांप्रत आकाश निरभ्र आहे. तथापि या कालातहि आकाशांत तुला एक इन्द्रधनुष्य दिसेल. त्या पाहा निरनिराळ्या रंगांच्या पोपटांच्या रांगा आपल्या पोंवळ्यासारख्या आरक्त चोंचींतून भाताचीं पिवळीं लोंबें घेऊन उडत आहेत" असें ते बोलत चालले आहेत तों हिमालय पर्वत दिसूं लागला. वर पांढरीं स्वच्छ बर्फाच्छादित शिखरें व खालच्या टेकड्यांवरील भाग श्यामल सस्यपंक्तींनीं आच्छादलेला अशा त्या हिमालयाला पाहून श्यामलवस्त्र नेसलेल्या गौरवर्ण बळीरामाची अर्जुनाला आठवण झाली.

**ही भोगाची आणि त्यागाचीहि भूमि आहे.**

अर्जुन हिमालय पर्वतावर येऊन त्याची शोभा पाहूं लागला. या पर्वतराजाचीं शिखरें इतकीं उंच होतीं कीं मेरु पर्वतावर विजय मिळवण्यासाठीं, एके जागीं बसल्याबसल्याच सर्व दिशा अवलोकन करण्यासाठीं किंवा आकाशमार्ग आक्रमून टाकण्यासाठींच त्यानें आपला माथा उंचावला आहे कीं काय असें वाटे. त्याच्या शिखरांवरून वेगवान् नद्या खालीं दऱ्यांत कोसळत होत्या. भागीरथीच्या प्रवाहाचें पाणी खालील खडकांवर आपटल्यामुळें त्याचे तुषार उंच उडत व वाटे कीं तिच्यावर धवल चामरें ढाळलीं जात आहेत. पृथ्वी, अंबर आणि स्वर्गलोक या ठिकाणीं राहणाऱ्यांची हिमालयावर वस्ती आहे. त्यावरून असें वाटतें कीं, भगवान् शंकरांनीं आपलें अलौकिक योगसामर्थ्य प्रकट करण्यासाठीं या हिमालयाला अखिल विश्वाचा प्रतिनिधि केला आहे. अर्जुनाचा सोबती यक्ष हिमालयाचीं आणखी कांहीं वैशिष्ट्यें त्याच्या नजरेस आणीत

होता. तो म्हणाला, " हीं पाहा हत्तींनीं आपलीं गंडस्थळें ज्या झाडांना घासलीं आहेत त्यांना हत्तींच्या गंडस्थळातील स्रावानें आम्रमंजिरींसारखा वास येत आहे. त्यामुळें कोकिलांना उन्माद चढला आहे व भ्रमर तेथें चिकटलेले आहेत. म्हणजे शरदृतूत वसंताची शोभा दिसून येते आहे. हा हिमालय देव आणि देवांगना, यक्ष, गंधर्व आणि किन्नर-किन्नरी याच्या विलासाचें एक वैभवशाली स्थान आहे. पण केवळ भोग हेंच या स्थानाचें वैशिष्ट्य नव्हे. अक्षय परब्रह्मपद मिळवूं पाहणाऱ्या योग्यांच्या शुद्ध बुद्धिलाहि या हिमालयापासूनच प्रेरणा मिळते. या पर्वतींत अज्ञान-नाशक वेदराशीबरोबर त्याचें साम्य आहे." याप्रमाणें नागाधिराज हिमालयाच्या विविध सौंदर्याचें आणि भव्यतेचें वर्णन करून यक्ष अर्जुनाला म्हणाला, " तेथें तुझें तप चालूं दे. सावधपणें वाग. चांगल्या कामांत सुद्धां सज्जनांना संकटें आल्यावांचून राहत नाहींत. इंद्रियांना चळूं देऊं नको. मी आतां स्वस्थानीं परत जातों. भगवान् शूलपाणि तुला धैर्य देवो आणि लोकपालाच्या संरक्षणानें तुझें इष्ट कार्य सिद्धीला जावो !" असें बोलून तो यक्ष निघून गेल्यावर अर्जुनाला त्याच्या विरहामुळें थोडी अस्वस्थता वाटली. पण लौकरच तो मोठ्या उत्साहानें आपल्या कार्याला लागला.

**त्याच्या तपाविरुद्ध तक्रार !**

गंगा नदीचे काठाकांठानें अर्जुन हिमालयांतील इंद्रकील पर्वतावर चढूं लागला. गंगातीरींच्या वृक्षांनीं भ्रमरांच्या गुंजारवाच्या मिषानें त्याचें स्वागत केलें. आणि त्याच्या मस्तकावर पुष्पवृष्टि केली. गंगातीराची शोभा पाहत पहात इंद्रकील पर्वत चढून अर्जुन एका स्थळाजवळ आला. तेथील वृक्ष पुष्पभारानें नमलेले होते. एकंदरींत ती भूमि साधूच्या मनासारखी पवित्र दिसली. ते स्थल तपाला अत्यंत अनुकूल होतें. तेथेंच अर्जुनानें आपल्या तपस्येला आरंभ केला. त्यानें मस्तकावर पिंगट रंगाच्या जटा धारण केलेल्या होत्या आणि आपलीं इंद्रियें विषयोपभोगापासून वळवून परमात्मध्यानाच्या मार्गाला लावलेलीं होतीं. त्याचें मन तपामुळें अत्यंत कनवाळू झालें होतें. म्हणून त्याचेजवळ जरी शस्त्रास्त्रें असलीं तरी हरिणाना त्याची भीति वाटत नसे. अंगानें अत्यंत कृश झालेल्या अर्जुनाला दयालु तपानें साहाय्यच केलें असें वाटलें. कारण अर्जुनाला सोसतील अशा

मंद तऱ्हेनेंच तेथील वारे वाहत आणि ऋतु कोणताहि असला तरी सूर्याचे किरण आल्हाददायक असत. फळें व फुलें तोडण्यासाठीं अर्जुन वृक्षाजवळ गेला म्हणजे अर्जुनाला त्रास पडूं नये म्हणून ते आपोआप खालीं वांकत. थोड्याच दिवसांत अशा प्रकारचें अनन्यसामान्य व उग्र तप अर्जुनानें चालवलेलें पाहून इन्द्रानें नेमलेले तेथील वनरक्षक हवालदिल झाले व या नव्या संकटाची वर्दी आपल्या स्वामीस देण्यासाठीं ते लागलीच इन्द्राकडे गेले. त्यास नम्रपणें प्रणाम करून फारच थोडक्यांत या तपाचा वृत्तान्त त्यांनीं त्याला निवेदन केला. कारण आपल्या कामगिरीची खोटी त्यांन मुळींच करावयाची नव्हती. ते म्हणाले, "देवेन्द्रा, वल्कलें धारण करणारा कोणी एक पुण्यपुरुष, कोणता तरी फार मोठा जय मिळण्यासाठीं, तपश्चर्या करीत आहे. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्याचे बाहु भुजंगासारखे भयंकर आहेत. शत्रूंच्या चित्तांत धडकी भरवील असें धनुष्यहि त्याच्याजवळ आहे. आणि आपल्या आचारानें त्यानें मुनींवरहि ताण केली आहे. सबंध पंचमहाभुतें त्याला वश झालीं असून सर्व त्याच्या तपस्येला मदत करीत आहेत. शीण हा त्याला माहीतच नाहीं. त्याच्या पिळदार शरीरावरून तो जयासाठींच उत्पन्न झाला आहे असें वाटतें. तो एखाद्या ऋषीच्या, दैत्याच्या किंवा राजाच्या वंशांत उत्पन्न झाला आहे का तो आणखी कोणी आहे हें आम्हांस कळतच नाहीं. प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत चरणीं निवेदन केलेली आहे."

## अप्सरा कामगिरीवर निघाल्या.

वनरक्षकांचें हें बोलणें ऐकून आपलाच पुत्र अर्जुन ही तपस्या करीत आहे हें इंद्रानें ताडलें व त्याला फार समाधान वाटलें. पण तें वर न दाखवतां त्यानें त्याच्या तपांत विघ्न आणण्याची आज्ञा अप्सरांना दिली. त्यांच्या मोहाला वश होणारा अर्जुन नव्हे हेंहि तो जाणत होता. पण नित्याच्या वहिवाटीला अनुसरूनच वागावयाचें असें ठरवून तो त्या अप्सरांना म्हणाला—"तुम्ही मदनाच्या हातांतलें एक अमोघ, सुकुमार व प्रभावी असें अस्त्र आहां. तुमच्या एका कटाक्षानें मी मी म्हणणाऱ्या संयमी पुरुषांच्या मनःसंयमाचें पाणी झालें आहे. म्हणून तुमचे गंधर्वादि सर्व मदतनीस बरोबर घ्या आणि या नवीन तपस्व्याच्या तपाचा भंग

करा.” आपल्याकडेच सर्व देवांसमक्ष देवेन्द्रानें ही महत्त्वाची कामगिरी सोंपविली म्हणून अप्सराना मोठा अभिमान वाटला. त्यांनीं मोठ्या उत्साहानें इंद्रास नमस्कार करून त्याची रजा घेतली. आपल्या सहस्र नेत्रांनीं इन्द्र त्याच्या त्या सोत्साह आणि रम्य आकृतींकडे पाहातच राहिला.

**वनाचें नगर झालें !**

बरोबर संरक्षक गंधर्व आणि रथ, हत्ती, घोडे इत्यादि मोठा लवाजमा घेऊन अप्सरा इन्द्रकील पर्वताकडे निघाल्या. गंभीर मृदंगनादानें त्यांचें प्रयाण सूचित झालें. त्यांना जातांना पाहण्यासाठीं देवांचा मोठा जमाव स्वर्गद्वारांत जमला. प्रवासातील श्रमानें आणि उष्णतेनें अप्सरांचीं मुख-कमलें कोमेजून गेलीं. घर्मबिंदूंनीं तीं फुलून निघालीं. पण त्या अवस्थेंत-सुद्धां तीं अधिक रमणीय दिसत होतीं. सौंदर्य विकृत झालें तरी खुलूनच दिसतें असें म्हणतात तें खोटें नाहीं. वाटेनें रमतगमत हा अप्सरांचा समूह इन्द्रकील पर्वतावर येऊन पोहोंचला. तेथें आल्यावर त्यांनीं योग्य स्थल पाहून तेथें आपली छावणी थाटली. हत्ती, घोडे इत्यादिकांना विश्रांति दिली. अरण्यांतील वृक्षांच्या फांद्यांवर अप्सरांचीं उंची वस्त्रें लोंबतांना दिसत होतीं. राहुट्या, तंबू ठिकठिकाणीं ठोकलेले होते, त्यामुळें त्या तपोवनाला नगराजवळील उद्यानाची शोभा आली.

**विलासिनींचे विहार.**

आपल्या मायेनें अप्सरांनीं ज्यांत उज्ज्वल मंदिरें आणि रमणीय गोपुरें निर्माण केलीं होतीं त्या नगरतुल्य शिबिरांतून सर्व अप्सरा वनविहारासाठीं बाहेर पडल्या. त्यांचेबरोबर त्यांचे वल्लभहि होते. कोठें सुगंधी फुलेंच तोडावीं, कोठें लतांचे आरक्त व कोवळे शेंडेच खुडावे, आणि एकमेकांची व एकमेकींची नाजुक थट्टा करावी, असें करीत त्या विलासिनींनीं आपला वनविहार संपविला. एकमेकांच्या संगतींत स्वैर-संचार करणाऱ्या त्या तरुण-तरुणींनीं हरतऱ्हेच्या शृंगारचेष्टा केल्या. नंतर ही सर्व विलासी मंडळी गंगेमध्यें जलक्रीडा करण्यासाठीं उतरली. एक-मेकांच्या अंगावर पाणी उडवून, खोटें भय दाखवून, आणि अशा इतर अनेक निमित्तानीं त्यांनीं परस्परानुराग तेथें व्यक्त केला. त्यांच्या त्या स्वैर जल-क्रीडेनें गंगेच्या पाण्यांत लाटा उत्पन्न झाल्या. त्याला अप्सरांच्या उटीचा

गंध व वर्ण आला, व तें त्यांच्या अलंकारांतील भिन्नरंगी रत्नांमुळें शबल दिसूं लागलें. यामुळें विलासानंतर कामीजनांची शय्या जशी शोभते तसें तें गंगेचें जल शोभूं लागलें.

**रात्र संपली, उपभोगेच्छा नव्हे.**

सायंकाल जवळ येत चालला. सूर्य पश्चिम क्षितिजावर टेकला. नानातऱ्हेच्या रमणीय वेषभूषा करून रात्रीच्या विलासाची अप्सरा उत्कंठेनें वाट पाहात आहेत हें जाणून त्यांची सोय करण्याकरतांच जणूं काय सूर्य निघून जात असावा असें वाटलें. अस्तकालच्या सूर्याचा रंग तांबडा झाला होता. त्यावरून असें वाटलें कीं सबंध दिवसभर कमळांतील मधु आपल्या किरणहस्तांनीं यथेच्छ प्याल्यामुळें लालबुंद झालेला सूर्य जणों काय झोके खात धरित्रीवर पडत होता. हळूहळू जिकडेतिकडे काळोख पसरूं लागला. चक्रवाकांचीं जोडपीं वियुक्त झालीं. त्यांचें आक्रन्दन ऐकून नलिनींनीं आपलीं कमलरूंपी मुखें दुःखानें खालीं घातलीं. इतक्यांत आकाशांत चन्द्रोदयाचीं चिन्हें दिसूं लागलीं. उदयपर्वतानें ज्याचें बिंब झांकून टाकलें आहे अशा चन्द्राचीं धवल किरणें निळ्या आकाशात प्रवेश करूं लागलीं. गंगेचें शुभ्र जल निळ्या समुद्रात प्रवेश करीत असतां जसें दिसतें तसा हा देखावा वाटला. आदिवराहानें आपल्या पाढऱ्या शुभ्र सुळयानें पृथ्वी जशी वर उचलली त्याप्रमाणें थोडयाच वेळांत चन्द्रानेंहि आपल्या कोरेनें अजस्र अंधकारपटल उलथून दिलें. चन्द्रोदयानें अंधकार आणि कामिनीच्या मनामधील मान नाहींसा झाला. सर्व अप्सरा आपापल्या प्रियाकडे आकृष्ट होऊन ठिकाठिकाणीं रमूं लागल्या. त्या सर्व विलासिजनांनीं यथेच्छ मधुपान केलें व त्याचे विविध तऱ्हेचे विलास अनिर्बंधपणें सुरू झाले. ज्यांचीं मनें एकमेकांविषयीं आसक्त झालीं आहेत असे ते गंधर्व व त्या अप्सरा मदनाच्या प्रेरणनें विषयोपभोग सेवीत असतां रात्र एकाएकीं संपून गेल्यासारखी वाटली. प्रभातवायूनें त्यांचे सर्व विलासजन्य श्रम नाहींसे केले.

**तपाचें सामर्थ्य.**

संभोगामुळें त्या अप्सरा अधिकच विलोभनीय दिसूं लागल्या. त्यांच्या सुंदर अवयवांमुळें भूषणांना नवी शोभा चढली. त्यानंतर त्या आपल्या

विहारस्थानांतून निघून रम्य आणि आकर्षक हावभाव करीत तपस्वी अर्जुनाला आपल्या मोहपाशांत गुंतविण्यासाठीं त्याच्या तपोभूमीकडे चालल्या. त्यांच्या तळव्याला लावलेला अळिता जमिनीवर त्यांच्या पावलागणिक उमटत होता. त्यामुळें इंद्रगोप नांवाचे ताम्रवर्ण कीटक जमावानें एकत्र बसल्यासारखे दिसत ! त्यांच्या पायांतील नूपुरांच्या रवानें वनातील हंस वेडावून गेले. त्या कांहीं अंतर चालून पुढें जातात तों त्यांना एक आश्रमभूमि लागली. तेथील वृक्षांचीं पानें आणि फुलें पूजे-साठीं कोणीतरी तोडलेलीं दिसत होतीं. तेथें वाघ व सिंह यांच्यासारखे हिंस्र पशू हरिणासहित सलोख्यानें वावरत होते. तेथें शिरतांक्षणींच अप्सरांना एक प्रकारची अस्फुट भीति वाटूं लागली. या सर्व लक्षणांवरून अर्जुनाचीं हीच तपोभूमि असावी असें त्यांनीं ताडलें. त्यानंतर त्या तपोवनांत शिरलेल्या त्या स्वर्गनिवासी अप्सरांचें व गंधर्वांचें तेजच एकदम लोपल्या-प्रमाणें झालें. याला म्हणावें तपाचें अतर्क्य सामर्थ्य !

**अप्सरांना धन्यता वाटली.**

आश्रमाजवळील नदीच्या वाळवंटांत तपस्वी पार्थाचीं ध्वजचक्ररेखांकित पावलें उमटलेलीं होतीं. तीं पाहून अप्सरांना विस्मय वाटला. आपल्या आश्रमाच्या द्वारांत तपश्चर्या करीत असलेला अर्जुन त्या अप्सरानीं प्रत्यक्ष पाहिल्यावर त्यांस असें वाटलें कीं इन्द्रकील पर्वताच्या एकाच शिखरावर बसून इतर शिखरेंहि आपल्या तेजानें देदीप्यमान करणारा अर्जुन हा चन्द्रच असावा. कारण तोहि आकाशाच्या एका प्रांतांत प्रकाशत असता सर्व आकाश धवलित करून टाकतो ! बराच काळ चाललेल्या व्रतनियमांनीं अर्जुन जरी कृश झालेला होता तरी त्याच्या शरीरांत पर्वताचा कणखरपणा दिसत होता. त्याचे ठिकाणीं जरी शमदम होते तरी तो निसर्गतःच उग्र भासे. निर्मानुष अरण्यांत तो राहात असला तरी तपःप्रभावामुळें त्याच्याभोंवतीं परिवार असल्यासारखा दिसे. आणि तो जरी एक तापस असला तरी महेन्द्राच्या ऐश्वर्यानें मंडित झाल्यासारखा वाटे. यापूर्वी सामान्य तपस्वी व दैत्य यांना मोह पाडून त्यांना तपापासून च्युत करणाऱ्या अप्सरांना आज मोठी धन्यता वाटत होती. कारण अर्जुनासारख्या असामान्य आणि जितेन्द्रिय तपस्व्याला मोह घालण्याच्या

महत्त्वाच्या कामगिरीवर महेन्द्रानें त्यांची योजना करावी ही गोष्ट, त्यांच्या दृष्टीनें, अपूर्व मानाची नव्हती काय ?

**अप्सरा निराश झाल्या.**

इन्द्रानें सांगितलेली कामगिरी बजावावी ह्या हेतूनें लटक्या प्रेमाचें नाटक करून अर्जुनास भुलविण्याचा यत्न अप्सरा जों करूं लागतात तों अर्जुनासारख्या असामान्य तेजस्वी पुरुषावर त्या स्वतःच खरोखर लोभावून गेल्या. नंतर अप्सरा आणि गन्धर्व यांनीं त्या वनांत एकदमच सहाहि ऋतु निर्माण केले. वर्षा, शरद्, हेमन्त, शिशिर, वसंत व ग्रीष्म ह्या ऋतूंतील सर्व शृंगारानुकूल उद्दीपनें एकदम प्रकटलीं. परंतु एकसमयावच्छेदेंकरून प्रकट झालेल्या त्या त्या ऋतूतील विलोभनांनीं अर्जुनाचें स्थिर मन रतिभरहि चळलें नाहीं. तरी सुद्धां त्याला मोह पाडण्याचा प्रयत्न अप्सरा करीतच होत्या. सप्रेम असें चंचल कटाक्ष टाकणाऱ्या कोणा एका नर्तकीचे विलासी नेत्र अर्जुनावरच खिळून राहिले. सर्व अप्सरानीं आपल्या भात्यांतील दूतीवाक्य, दूतीप्रेषण, प्रेमयाचना इत्यादि सर्व अस्त्रांचा प्रयोग करून अर्जुनाला घेरला. पण तो अचलच राहिल्यानें अप्सराचा नाइलाज झाला. शेवटीं त्यांनीं अर्जुनाची करुणा भाकली, स्त्रीजातीला उचित अशी लज्जाहि क्षणभर सोडली व त्याच्या समोर जाऊन अश्रूहि ढाळले. आपल्या प्रियकराला अनुकूल करून घेण्यासाठीं कोणत्याहि स्त्रीला यापेक्षां जास्त काय करता येण्याजोगें असेल ! परंतु यांपैकीं कशाचाहि अर्जुनावर परिणाम झाला नाहीं. कारण मानी पुरुषांचीं मनें सूडाच्या भावनेनें पिचत असलीं म्हणजे त्यांमध्यें विषयसुखाच्या अभिलाषाला थारा मिळणें शक्य नसतें. अर्जुनाची तीच अवस्था होती. आपले मनोरथ सफल होत नाहींत असें पाहून खट्टू झालेल्या अप्सरा इंद्रलोकाला परत फिरल्या.

**तपस्व्याजवळ शस्त्रें कशाला ?**

अर्जुन स्वभावतःच संयमी. त्यांतून शत्रुपराजयाची तीव्र इच्छा धरून तपस्या करणारा. त्यामुळें मोहांतहि त्याचें मन अचल राहिलें. ही वार्ता अप्सरांच्या तोंडून कळल्यावर इंद्राला मोठा संतोष झाला. त्यानें लागलीच एका वृद्ध तापसाचें रूप घेतलें व तो अर्जुनाच्या आश्रमाला येऊन त्याला म्हणाला—" अरे, अगदीं ऐन तारुण्यांत तूं हें उग्र तप करीत आहेस

ही फार छान गोष्ट आरंभिलीस. कारण माझ्यासारख्या म्हाताऱ्याचें सुद्धां चित्त विषय आकर्षितात. तूं जसा रूपसुंदर आहेस तसा गुणसुंदरहि दिसतोस ही संतोषाची गोष्ट आहे. कारण सौंदर्य जन्मतःच पुष्कळांना मिळणें शक्य आहे. पण स्वकष्टानें येणारी गुणसंपदा मात्र जगांत दुर्मिळ आहे. संसार विषम आहे, यौवन चंचल आहे व विषयभोग तर तात्पुरते रम्य असतात. म्हणून विचारवंत मोक्षमार्गाला लागतो. तूं तर या लहान वयांतच हा सर्व विचार केलास व तुझ्या मनांत ही वैराग्यबुद्धि उदित झाली यावरून तुझ्या संयमी व विवेकशाली मनाची साक्ष पटते. फक्त मला एकच शंका तुला विचारावयाची आहे आणि ती म्हणजे तुझ्या तपाला विरोधी असा हा क्षात्रवेष तूं कां धारण केला आहेस? तूं मुक्ति मिळवावयास निघालेला. देहावर तुझी मुळींच आसक्ति नाहीं व तुझी वृत्ति अहिंसेची. असें असून तुझ्याजवळ हे दोन बाणांचे भाते, हें भयंकर धनुष्य व मृत्यूच्या कराप्रमाणें दिसणारा हा करवाल कशाला? तुझ्या या शांतिव्रताला हें साजेसें नव्हे. मला तर असें स्वच्छ दिसत आहे कीं तुला आपल्या शत्रूंवर जय मिळवावयाचा आहे आणि त्यासाठींच तूं ही सामग्री जवळ बाळगली आहेस. पण हें तुझ्या लक्षांत येत नाहीं कीं क्रोधाचें चिन्ह असणारें शस्त्र व शमप्रधान तपस्या ह्या गोष्टी अत्यंत परस्परविरोधी आहेत. मोक्षाला साधनीभूत होणारी तपस्या शत्रुवधाच्या क्षुद्र कारणीं जो लावतो तो तृषा हरण करणाऱ्या स्वच्छ पाण्यांत चिखल कालवितो."

**मोक्ष हाच खरा पुरुषार्थ.**

"अर्थ आणि काम हे दोन पुरुषार्थ हिंसा, स्तेय इत्यादि पापांचीं मूळ कारणें आहेत. शिवाय या दोन पुरुषार्थांमुळें मोक्षमार्गाला प्रतिबंध होतो. खरें म्हटलें तर अर्थ आणि काम हे पुरुषार्थच नव्हेत. कारण यांमुळें उत्पन्न होणारी संपत्ति, प्रियसमागम, प्रियवस्तुलाभ इत्यादि सुखें अखेरीस दुःखकारकच ठरतात. म्हणून युद्धांत जय मिळवावा ही इच्छा तूं टाकून दे. उत्तम प्रकारें चाललेल्या ह्या तुझ्या तपाची हानि करूं नको, आणि जेणेंकरून तूं पुनर्जन्माच्या फेऱ्यांत फिरून सांपडणार नाहींस, म्हणजे मुक्त होऊन जाशील, असें करण्यासाठीं शांतिप्रधान

तपाचा आश्रय कर. तुला जयच मिळवावयाचा असेल तर तूं आपल्या इंद्रियरूपी शत्रूंवर जय मिळव. एकदा इंद्रियें जिंकलीं कीं सबंध त्रैलोक्य जिंकल्यासारखें आहे. मनांतील कामना हा एक आपला भयंकर शत्रु होय. तेव्हां त्याला टाकून दे. ह्या प्रशान्त आणि भागीरथीच्या जलानें पवित्र झालेल्या स्थळीं तुला मुक्ति लौकरच आपण होऊन वरील यात शंका नाहीं. म्हणून तुला सागतों हीं शस्त्रें टाकून दे."

असें बोलून महेंद्र थांबतांच अर्जुनानें त्यास पुढीलप्रमाणें उत्तर केलें:—

**मान म्हणजेच मनुष्यपण.**

"महाराज, आपला युक्तिवाद फारच ठीक. पण मी कोण, माझ्या तपस्येचें कारण काय व उद्देश कोणता यांचें ज्ञान आपल्याला नसल्याकारणानें तो युक्तिवाद अप्रस्तुत होय. आपण मला ओळखिलें नाहींसें दिसतें. मी वर्णानें क्षत्रिय असून पंडु व कुंती यांचा पुत्र अर्जुन आहें. आणि भाऊबंदांनीं राज्यांतून घालवून दिलेले माझे ज्येष्ठ बंधु धर्मराज यांच्या आज्ञेनें व व्यासमहर्षींच्या प्रोत्साहनानेंच ही तपस्या मी करीत आहे. हिचा हेतु महेंद्राला प्रसन्न करून घेणें हा आहे. महाराज, आपल्याला काय सांगूं? आमच्यावर दुर्दैवाचा घाला पडला आणि युधिष्ठिरानें राज्यासहित आम्हां सर्वांना व द्रौपदीलाहि पणास लावलें. आम्ही सर्व जिंकले गेलों. त्यानंतर आमचा व मानिनी द्रौपदीचा जो अपमान झाला तो सांगतां पुरवत नाहीं. पण अशा प्रसंगींहि क्षमेचें व अहिंसेचें व्रत पत्करणाऱ्या युधिष्ठिरापुढें आमचें काहींच चालेना. पण मानीपणा हेंच खरें मनुष्यत्व होय असें मला तरी वाटतें. मानशून्य माणूस आणि नेहमीं नमलेलें तृण हीं दोनीहि सारखींच. अंगांत स्वाभिमान शिल्लक आहे तरच यश, धनदौलत आणि राज्य. म्हणून ही तपस्या मी क्षणभंगुर अर्थकामासाठीं करीत नाहीं किंवा जगातील नश्वरतेला भिऊन शाश्वत मोक्षाची कास धरण्यासाठींहि मी ती आरंभिली नाहीं. ही करण्यांत माझा एकच हेतु आहे. आणि तो हा कीं आमच्या कपटी वैऱ्यानीं आमच्या धवलकीर्तीला जो काळिमा आणला आहे तो त्यांच्या विधवा स्त्रियांच्या अश्रुजलानें धुऊन काढावा. असें करणाऱ्या मला संतसज्जन हसोत, माझी बुद्धि वाट चुकलेली असो किंवा मला

हितोपदेश करावयास आलेल्या तुमचें मन दुखावलें जावो, माझा निर्धार असा आहे कीं वैऱ्यांचा नायनाट करून आमच्या कुलाची प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करावयाचीच. आणि जोंपर्यंत मीं हें केलें नाहीं तोंपर्यंत प्रत्यक्ष निर्वाणसुद्धां मला माझ्या जयाच्या मार्गांतील धोंडच वाटेल. आमच्या विजयाच्या बाबतींत माझ्या बंधूंची सर्व मदार माझ्यावर आहे. ह्या माझ्या गृहस्थाश्रमाच्या जबाबदाऱ्या मीं पार पाडल्या नसतां संन्यासाश्रमालाच उचित असें मुमुक्षुत्व मला कसें पत्करतां येईल ? मानी क्षत्रिय एक क्षात्रधर्मच जाणतात. आणि तो म्हणजे अपकार करणाऱ्या शत्रूंशीं हिमतीनें झुंजण्यासाठीं रणभूमीवर पाय रोंवून उभें ठाकणें. फार काय बोलूं, माझा तर असा निश्चय आहे कीं या तपस्येनें इंद्राची आराधना करून माझ्या हृदयांतील अपमानशल्य कायमचें काढून तरी एक टाकीन नाहीं तर या इंद्रकील पर्वतावर जमलेले मेघ जसे वितळून जातात तसा या पर्वताच्या माथ्यावर सुखानें पंचमहाभूतांत विरून तरी जाईन.” आपल्या पुत्राचे हे शब्द ऐकल्याबरोबर इंद्रानें आपलें रूप प्रकट केलें व अर्जुनाला पोटाशीं धरून त्याला शंकराच्या आराधनेचा उपदेश केला. आणि ‘शिव तुझ्यावर प्रसन्न झाले म्हणजे तुझे हेतु सफल होतील’ असें बोलून तो अंतर्धान पावला.

## जगाला दुःसह झालेलें तप.

यामुळें अर्जुनाला नवीन उत्साह उत्पन्न झाला आणि त्यानें इंद्राच्या सांगण्याप्रमाणें शंकराची आराधना करण्यासाठीं मोठ्या जोमानें यथाशास्त्र तप आरंभिलें कित्येक दिवस सूर्याकडे दृष्टि लावून तो एका पायावरच उभा होता. उपोषण, थंडी, वारा, उष्णता इत्यादि देहकष्ट सोसण्यात तो पर्वताइतका कणखर बनला होता. इतकेंच नव्हे तर स्थिरतेंत पर्वतापेक्षां, तेजस्वीपणांत अग्नीपेक्षां आणि गांभीर्यांत सागरापेक्षां तो श्रेष्ठ झाला होता. अत्यंत कृश झालेला अर्जुन स्नानासाठीं जलाशयाकडे जाऊं लागला कीं त्याच्या पदाघातानें हिमालय खालीं जमिनींत दडपला जाई !! जडपणा किंवा वजन गुणांनीं येतें, देहाच्या नुसत्या स्थूलतेनें नव्हे ! अर्जुनाच्या नभोगामी तेजामुळें आकाशचर मुनि आणि देव यांना अडथळा होऊं लागला. कृष्णपक्षांतहि रात्रीं प्रकाश पडूं लागला. अर्जुनाच्या तपस्येचें हें उग्र तेज तेथील

तपस्यांना सहन करता येईना, म्हणून ते सर्व शंकराला शरण गेले. अर्जुनाच्या तपामुळें निखिल जगास उपसर्ग कसा पोचत आहे हें त्यांनीं शंकराला निवेदन केलें. आणि संकटापासून तुम्हीं आमचें रक्षण करावें अशी त्यांनीं शंकरास विनंति केली. तेव्हां शंकर त्यांस म्हणाले, "तपस्या करणारा हा पुरुष दुसरा तिसरा कोणा नसून विष्णूचा अंश प्रत्यक्ष जो नरमुनि त्याचा अवतार अर्जुन आहे. आपल्या अजिंक्य शत्रूंना जिंकण्यासाठीं तो माझी आराधना करीत आहे. त्यासाठींच त्यानें हें तप आरंभिलें आहे. ब्रह्मदेवाच्याच सांगण्यावरून नर आणि नारायण यांनीं पृथ्वीवरील दुष्टाच्या संहारासाठीं अर्जुन आणि कृष्ण याचे अवतार घेतले आहेत. ब्रह्मदेवाचा हा हेतु हाणून पाडण्यासाठीं मूक नावाचा कोणी एक दानव वराहरूपानें अर्जुनाला मारण्यासाठीं त्याजकडे जात आहे. तर त्वरेनें तुम्ही तेथें या; आणि पुढें काय प्रकार होईल तो स्वतःच पाहा." अशा तऱ्हेनें त्यांना समजावून शंकरानीं स्वतः किरात राजाचा वेष धारण केला; त्यांचे गण किरात राजाचे अनुचर झाले आणि हें सर्व किरातसैन्य शिकारीसाठीं म्हणून निघालें. त्या सैन्याच्या संचलनानें हिमालयावरील अरण्यातील पशुपक्ष्यांत मोठा कोलाहल उडाला. शंकर आपल्या सैन्यासह त्या अरण्यांत घोर संक्षोभ करीत अर्जुनाच्या आश्रमाजवळ येऊन पोचले. याच वेळीं मूक दानव वराहरूप घेऊन आपल्या मुस्कटानें जमीन उकरीत अर्जुनावर हल्ला करण्यास चालला होता. त्यास शंकरानीं पाहिलें. लगेच त्यांनीं आपलें किरातसैन्य मन्दाकिनीच्या काठावर थोपवून ठेवलें, बरोबर काहीं निवडक किरात घेतले आणि झाडांझुडपाआड लपत-छपत ते त्या वराहाच्या मागून चालूं लागले.

**वराह आश्रमांत शिरल्यावर—**

तीक्ष्ण सुळे असलेल्या आपल्या मुस्कटानें पर्वतहि सहज फोडूं शकेल असा तो प्रचंड वराह आश्रमभूमींत शिरताच अर्जुनाचे लक्ष त्याजकडे गेलें. मानेवरचे केस पिंजारून आपल्यावरच चाल करून येणाऱ्या त्या वराहाकडे पाहात असतां अर्जुनाच्या मनांत पुढील तर्क भराभर येऊं लागले:— "ह्या स्वारीचा रोख माझ्यावर मारा करण्याचा स्पष्टच दिसतो. पण निर्वैर अशा या तपोवनांत प्राणिवधाची ही इच्छा यांच्या मनांत कां बरें उत्पन्न

झाली ? माझ्या तपांत कांहीं विकृति झाली असल्यास तिचा हा परिणाम म्हणावा ? का कोणी दानवच हें वराहाचें रूप घेऊन येथें आला असावा ? असेंहि असेल. जन्मान्तरींचा काहीं सूड त्याला मजवर उगवून घ्यावयाचा असेल, अथवा दुर्योधनाचें हित साधण्यासाठीं मलाँ मारावयास आलेल्या हा कोणी त्याचा वराहरूपी स्नेही असावा."

" किंवा असेंहि असणें संभवनीय दिसतें:—मीं पूर्वी खांडववन जाळलें त्या वेळीं अग्नीच्या भयानें त्यातून पळून जाणाऱ्या तक्षकाच्या पुत्त्रांना मीं अडविलें व त्यास अग्नींत होरपळून मारलें. त्यांतला एक अश्वसेन नांवाचा सर्प जिवानिशीं सुटला. तो कदाचित् आपल्या भावांच्या वधाचा सूड माझ्यावर उगवून घेण्यासाठीं वराहरूपानें आज आला असावा. तें काहीं का असेना, मला ठार मारण्याच्या इराद्यानें ज्या अर्थीं हा मजवर चाल करून येत आहे त्या अर्थीं मला त्याला ठार मारलेंच पाहिजे. माझ्या तपांत विघ्न करणाराचें शासन मीं खुशाल करावें अशी मला भगवान् व्यासांची सुद्धां आज्ञा आहेच." असें म्हणून त्यानें आपल्या गांडीव धनुष्यावर एक तीक्ष्ण बाण लावला. अर्जुनानें केलेल्या धनुष्याच्या टणत्कारानें पर्वत चळचळां कापूं लागला. शंकर हें सर्व दुरून पाहतच होते. त्या पवित्र्यांत उभ्या असलेल्या अर्जुनाला पाहून शंकरांना क्षणभर वाटलें, त्रिपुरनाशाच्या वेळीं आपणसुद्धां असेंच ठाण मांडलेलें होतें, नाहीं का!

**दोन धनुर्धरांच्या तावडींत.**

शंकरानींहि वराहावर टाकण्यासाठीं एक उग्र बाण आपल्या 'पिनाक' धनुष्याला लावला. एकीकडून अर्जुन व दुसरीकडून शंकर अशा या दोन महापराक्रमी धनुर्धरांच्या मधें नेमका तो वराह सापडला. प्रकृति आणि प्रत्यय यांच्यामध्यें सांपडलेल्या अनुबंधाचा जसा लोप होतो तसा आत्मलोप करून घेण्यासाठींच हा बिचारा वराह त्यांच्या तावडींत आला म्हणावयाचा ! विशाल मेघांच्या उदरांतून जशी वीज कोसळावी तसा शंकराच्या पिनाकांतून निघालेला तो भयंकर बाण वराहाच्या अवाढव्य कुशींत घुसला. अगदीं याच क्षणीं अर्जुनानेंहि गांडीवावरून सोडलेला असाच भयंकर बाण वराहाच्या शरीराला येऊन भिडला. परस्परांना साहायक झालेले ते दोनीहि बाण वराहाच्या शरीरांत शिरतांच तो घायाळ झाला. त्याची

गति खुंटली. त्याला भोंवळ आली व तो गरगर फिरूं लागला. आपणाला घोर निद्रा येत आहे, सूर्य पृथ्वीवर पडत आहे, आणि पृथ्वीच वृक्षशैलांसकट आपल्याभोंवतीं फिरत आहे असें त्याला वाटलें. लगेच तो जमिनीवर कोसळला. त्याच्या जखमांतून वाहणाऱ्या कढत रक्तानें त्याचें सर्व शरीर भरलें. ह्या रक्ताच्या थारोळ्यात लोळत असतां त्यानें आपले पाय झाडले व तीक्ष्ण दातानीं चावे घेतले. त्यामुळें भोंवतालच्या खडकांचासुद्धां चुराडा झाला. त्यानें अर्जुनाकडे एकवार क्रूर दृष्टि फेंकली आणि एक भयंकर किंकाळी फोडून प्राण टाकला. ज्या यशस्वी बाणानें त्या अजस्र वराहाचा प्राण हां हां म्हणता घेतला त्या आपल्या बाणाचें अर्जुनास मोठें कौतुक वाटलें व त्याच्याजवळ बाणांचा अक्षय्य भाता असून सुद्धां तोच बाण वराहाच्या पोटांतून उपटून काढून आपल्याजवळ ठेवण्यासाठीं तो वराहाजवळ आला. सकौतुक आणि साभिमान दृष्टीनें त्या बाणाकडे पाहात पाहात तो त्याला उपसून काढीत आहे तोंच तेथें आलेला एक किरात (भिल्ल) त्याला दिसला.

**शहाणा असशील तर नमतें घे.**

तो भिल्ल अर्जुनाला नम्रतापूर्वक प्रमाण करून म्हणाला:—"तुझ्या दिव्य आकृतीवरून तूं कोण्या थोर घराण्यांत जन्मला आहेस हें स्पष्ट दिसतें. तसेंच तुझ्या चर्येवरून तुझ्या ठायीं प्रशान्तता, विनय, विद्वत्ता इत्यादि गुण आहेत हें उघड आहे. तूं तापस असूनहि राजैश्वर्ययुक्त दिसतोस. तूं रज आणि तम हे गुण जिंकिले असल्यानें तुजपासून मोक्षहि दूर नाहीं. असें असतां तुझ्यासारख्या तेजस्वी, कुलवान् व संभावित पुरुषाला माझा स्वामी जो किरात राजा त्यानें या वराहाला मारलेला बाण आपला म्हणून काढून नेणें शोभतें कीं काय तें तूंच पाहा. मनूपासून चालत आलेल्या न्यायाचें उल्लंघन तुझ्यासारखे पुरुष करूं लागले तर त्या मार्गानें मग कोण जाईल ? किंवा असेंहि झालें असेल. आमच्या राजाचा हा बाण तुला आपल्या बाणासारखा वाटला असावा म्हणूनच तुझ्याकडून हें अनुचित कृत्य न कळत घडलें असावें. खरें पाहिलें तर तुझ्यासारख्याला दुसऱ्याच्या बाणाची वाञ्छाच व्हावयाला नको होती. तसेंच दुसऱ्यानें अगोदर जखमी केलेल्या शिकारीवर हात टाकण्याची लज्जाहि तुला वाटावयास पाहिजे होती. आमच्या किरात राजानें आपल्या तीक्ष्ण बाणानें

या वराहाला जर अगोदरच मारलें नसतें तर या भयंकर श्वापदानें तुझें चंदनच उडवलें असतें. पण तें न बोल्लेलेंच बरें. वज्रासारख्या कठीण देहाच्या या चपळ जनावराला मारण्याची आमच्या मालकावाचून दुसऱ्या कोणाची माय व्याली आहे? माझ्या स्वामीनें तुझे प्राण वाचविले यासाठीं कृतज्ञबुद्धीनें तूं त्याच्याशीं स्नेहच जोडावास. वैर कसलें करतोस? कोणातरी शत्रूवर जय मिळववा या हेतूनेंच तूं तप करतो आहेस हें तुझ्या शस्त्रावरून दिसतेंच आहे. नाहीं तर केवळ मोक्षाभिलाषी तपस्वी तामस शस्त्रें कशाला ठेंवील? म्हणून तुला म्हणतों कीं आमच्या मालकाशीं सख्य करशील तर तुला तपानें जें मिळावयाचें तें अनायासेच मिळेल. तुला असला उत्तम बाणच पाहिजे असेल तर आमच्या राजाकडून तूं तो मागून घे."

"तुझ्यासारखा स्नेही काहीं मागावयास आला तर आमचा राजा त्याला वाटेल तें देईल. पृथ्वी सुद्धा जिंकून देईल! ब्राह्मण तपस्व्याच्या चंचलपणानें तूं आमच्या राजाच्या मालकीच्या शिकारीवर बाण टाकलास या तुझ्या अपराधाची क्षमा तुला तो करील. कारण तूं हें अज्ञानानें केलेलें आहेस. एकदा झालें तें झालें. तुझ्या कुलाला, वेषाला आणि तपाला न साजेशी असली गोष्ट पुन्हा करूं नको. आत्मरक्षणासाठीं सुद्धा तुला या वराहाला मारणें जरूरच होतें असें नव्हे. तुला वराहाच्या मार्गांतून दूर होऊन आपले प्राण वाचविता आले असते. आमचा राजा म्हणजे केवळ पहाडातील रानटी भिल्लाचा नायक असें समजून त्याला कमी लेखूं नकोस. तो अस्त्रवेद जाणणारा महान् योद्धा आहे. इंद्रानें त्याला मुद्दाम या स्थलाच्या रक्षणासाठीं विनवून ठेवून घेतलें आहे. तें असो. 'मीं त्या तपस्व्याला एकदा क्षमा केली आहे' असें आमच्या राजानें मला तुजजवळ सांगावयास सांगितलें आहे. तेव्हा आता तूं तो त्याचा बाण दे व त्याच्या साहाय्यानें सर्व काहीं वाञ्छित मिळीव. तो पाहा आमचा पराक्रमी मालक त्या वृक्षाच्या आड आपल्या सशस्त्र सैन्यानिशीं उभा आहे. तो मोठा उग्र आहे. पण अगोदर सामोपचारानें वागावें या मर्यादेमुळें तो तुझ्या अंगावर अद्याप चालून आला नाहीं. म्हणून माझें तुला शेवटचें सांगणें असें आहे कीं त्याच्याशीं तूं समेटानेंच वाग. त्यांतच तुझें कल्याण आहे."

हा त्याच्याच मालकीचा कशावरून ?

किरातराजाचें म्हणणें अर्जुनास कळविण्यासाठीं आलेल्या त्या भिल्लाचें हें असलें दटावणारें धिटाईचें भाषण ऐकून अर्जुनास खरें म्हणजे मनांत संताप आला. पण त्यानें तो मोठ्या संयमानें गिळला व मोठ्या शान्तपणें त्यास तो म्हणाला, " जातीचा भिल्ल असून तूं मोठ्या चतुराईचें भाषण केलेंस यांत शंका नाहीं. माझ्याशीं सामोपचाराचें बोलणें काढतां काढतां हळूच तुझ्या राजाच्या मैत्रीच्या मधाचें बोट मला लाविलेंस. माझें मन कृतनिश्चयापासून फिरावें म्हणून धाकदपटशहाहि दाखविलास आणि वास्तविक हा बाण मजपासून नेण्याचीच तुझी इच्छा असतां तसें स्पष्ट न म्हणतां न्याय्य दिसतील अशीं इतर कारणें ( राजाचा आधिक्षेप होतो वगैरे ) पुढें केलींस. यावरून तूं मोठा चतुर वक्ता खासच आहेस. तुझ्या राजानें वराहावर टाकलेला बाण पर्वतांत इकडे तिकडे कोठें तरी दिसेनासा झाला असेल. तो तूं शोधणें हा सरळ मार्ग आहे. माझ्यासारख्यावर तो घेतल्याचा आरोप करणें शिष्टसंप्रदायाला सोडून आहे. मला रे तुम्हां रानटी भिल्ल लोकांचे बाण कशाला हवेत ? खांडववनदाहाचे वेळीं स्वतः अग्नीनें मला असंख्य उत्तम बाण दिले आहेत. त्यापुढें देवांचे बाणहि मला तुच्छ वाटतात. याचा कांहीं एक विचार न करतां तूं माझ्यावर एकदम दोषारोप करून माझा धिक्कार केलास हें गैर होय. 'आमच्या राजाचा हा वराह आहे' असें म्हणायास नको तूं ? पण मी तुला विचारतों, स्वतंत्र वृत्तीनें वनांत राहणारे प्राणी खरें पाहतां कोणाच्या मालकीचे समजावयाचे ? कोणाच्याच नाहीं. जो त्यांची मनगटाच्या जोरावर शिकार करील त्याच्या मालकीचे ते ! मीं या वराहाला मारिलें म्हणून तो माझा. या वराहाच्या मालकीचा वृथा भ्रम तुझ्या राजाला सोड म्हणावें ! केवळ व्यासांच्या सांगण्यावरून व माझें व्रत रक्षण करण्यासाठींच मीं यास मारिलें आहे. माझ्यावरचें वराहाचें संकट टाळून तुझ्या राजानें माझ्यावर उपकार केला असें तुझें म्हणणें. पण असें पहा, स्वतःच्या पोटासाठीं मांस हवें म्हणून शिकार करणाऱ्या तुम्हां व्याधांचा आमच्यासारख्या तपस्व्यांवर कसला आला आहे उपकार ? शिवाय माझ्यावर तो कृपाळू झाला

असें म्हणालास ना ? पण असें पहा; पण नकोच. हा शुष्क कलह हवा कशाला आतां ? आम्हीं दोघांनींहि एकदमच वधिलेल्या हा वराह आहे. तुझ्या राजानें तो प्रथम मारला याला काय प्रमाण आहे ? मला वांचवावयाला व माझ्या शत्रूला मारावयाला तुझ्या राजानें बाण टाकला असें मानूं या. मग हें फळ वराह-वधानें माझ्या व त्याच्या स्वाधीन झाल्यावर पुन्हां हा बाणाचा लोभ तुझ्या राजाला कशासाठीं ?

**गजराज काय कोल्ह्याशीं मैत्री करतो ?**

तुझ्या राजाचें साहाय्य घेऊन मीं शत्रूला जिंकावें असें तुझें मत ! परंतु तें माझ्यासारख्या मानी पुरुषाला सहन होण्यासारखें नाहीं. दुसऱ्याच्या साहाय्यानें किंवा दुसऱ्याच्या पायां पडून मिळवलेली मलिन विजयश्री मला मुळींच नको. माझ्या मार्थी खोटेपणा मारून मजजवळील अलभ्य वस्तु बळजबरीनें मिळवावी अशी तुझ्या राजाची इच्छा दिसते. माझा खड्ग, बाण, चिलखत, धनुष्य यांपैकीं काय वाटेल तें तुझ्या राजास घ्यावयास मी तयार आहें. मागणें हें अपमानास्पद वाटत असेल तर बलात्कारानें घे म्हणावें. असें करणें वीरांना भूषणच आहे. सबंध वर्णाश्रमाचें रक्षण करणारे विशुद्ध अंतःकरणाचे आम्ही राजे लोक कोणीकडे, आणि जनावरें मारून खाणारे तुम्ही जातीचे भिल्ल कोणीकडे ? तुमच्या-आमच्यांत सख्य कसलें घेऊन बसला आहेस ? गजराजाचें कोल्ह्याशीं कधीं सख्य होतें काय ? तुझ्यासारख्या लोकांचा मी तिरस्कार करण्याचें कारण हें कीं, उत्तम आणि हीन यांच्या मैत्रींत एक अडचण असते. उत्तमानें हीनांशीं दोन हात करावे तर अनाठायीं शक्ति वेंचल्याचा दोष मार्थी येतो. बरें, त्यांच्याशीं मैत्री करावी तर हीन संगतीनें त्याचे गुण दूषित होतात. ही दोन्हीकडील अडचण लक्षांत घेऊन शहाणा मनुष्य नीचांचा तिरस्कारच करीत असतो. याच कारणासाठीं किरातराजाचें उद्धट-पणाचें बोलणें मीं ऐकून घेतलें. आतां मजजवळून बळजबरीनें बाण घेण्यासाठीं तो येईल असें तूं म्हणालास. असा जर तो येत असेल तर येऊं द्यात त्याला खुशाल. नागाच्या मस्तकावरील मणि काढून घेण्यास येणाराची जी अवस्था होते तीच त्याची होईल."

## जयलक्ष्मीचा अर्जुनाकडे कल.

अर्जुनाचें हें बोलणें ऐकून किरातराजाचा सेवक त्यास म्हणाला, "कांहीं हरकत नाहीं; मग पाहूं याच तर कोण कोणाला जिंकतो तें." अशी उलट धमकावणी देऊन तो आपल्या राजाकडे निघून गेला. लगेच किरातराजाची ती भयंकर सेना एखाद्या वावटळीप्रमाणें अर्जुनावर चाल करून येऊं लागली. उन्हाळा संपल्यावर काळेभोर मेघ जसे आकाशांत येतात त्याप्रमाणें प्रमथादि गण किरातराजाचे आज्ञेवरून अर्जुनाचे अंगावर धावले. पण अर्जुनाच्या प्रभावानें ते हतबल होऊन मागें फिरले. नंतर किरातसैन्यांतून शेकडों बाण अर्जुनावर सोडण्यात आले. पण अर्जुनानें त्या सगळ्यांचा सहज प्रतिकार केला. एकटा अर्जुन सबंध सेनेशीं मोठ्या पराक्रमानें लढूं लागला. त्याचा अतुल व विस्मयकारक पराक्रम पाहून किरातसेनेंतील लोकांना वाटूं लागलें कीं, या लढवय्याच्या आड दडून कांहीं देवताच हे बाण टाकीत आहेत कीं काय! अर्जुनाच्या माऱ्यापुढें किरातसैन्याचा टिकाव लागेना. जयलक्ष्मी किरातसेनेचा पक्ष लवकरच सोडून देणार असें दिसूं लागलें.

**'अरे, असे पळतां कां म्हणून?'**

किरातसैन्य दशदिशांना पळूं लागलें. तें पाहून अर्जुनाला त्याची दया उत्पन्न झाली. त्या सेनेच्या आघाडीला असणाऱ्या कार्तिकेयाला हें पाहून प्रथम हसूं आलें. पण लगेच खिन्न होऊन तो त्यांतील वीराना उद्देशून म्हणाला—"शूरांनो, समरांगणांतून असे पळूं नका. हा मुनि कांहीं कोणी देव नव्हे कीं पर्वताकार राक्षसहि नव्हे. तो एक साधा मानव आहे. या भित्रेपणानें तुम्हीं तुमची पूर्वीची कीर्ति घालवीत आहां." नंतर स्वतः शंकरानेंसुद्धां आपल्या पळणाऱ्या सैन्याला धीर दिला व त्याला परत फिरविलें. नंतर अर्जुन आणि किरातराजवेषधारी शंकर यांचें तुमुल युद्ध झालें. कोणी कोणास हटेना. त्यांचा समरचमत्कार पाहून ऋषि व देव विस्मित झाले.

**'हा असावा तरी कोण?'**

किरातराज हा भिल्लांचा साधा म्होरक्या असावा अशी अर्जुनाची समजूत. पण त्याचें हें शौर्य पाहून हा दिसतो तसा नाहीं असें त्याला

वाटलें; व हा कोण बरें असावा याविषयीं त्याचे मनांत तर्कवितर्क येऊं लागले. "इतर मोठाल्या युद्धांप्रमाणें या किरातराजाशीं मी करीत असलेल्या युद्धांत मदोन्मत्त हत्ती संचार करत नाहीं, रथांचा धडधडाट आणि शस्त्रांचा खणखणाट नाहीं, दुंदुभीची गर्जना नाहीं कीं वाद्यांचें घोंगावणें नाहीं आणि रक्ताच्या नद्याहि नाहींत. तात्पर्य, येथें मृत्यूचा अक्राळ-विक्राळ जबडा पसरलेला दिसत नाहीं. असें असून या सामान्य तरुणाच्या युद्धांत माझी शक्ति इतकी क्षीण कां बरें होते आहे ? मी माझ्या गांडीवां-तून सोडलेल्या बाणांचा या किरातावर कांहींच परिणाम कसा होत नाहीं ? हें काय इंद्रजाल आहे ? का माझीच मति भ्रमली ? का माझें शौर्य मला सोडून गेलें ? का मी कोणी दुसराच झालों ? वेषावरून वाटतो तसा हा किरात खास नव्हे. आपला बचाव व दुसऱ्यावर चढाई करण्यांत यांचें जें कौशल्य दिसतें तसें भीष्मामध्यें किंवा खुद्द माझे गुरुजी द्रोणाचार्य यांचे ठिकाणींहि मला आढळलें नाहीं. हें कौशल्य साध्या भिल्लांत कसें असूं शकेल ? यावरून हा कोणी तरी प्रच्छन्न महापुरुष असावा. तो कोणी का असेना, शत्रूची उपेक्षा करणें गैरच होय." असा शेवटीं निश्चय करून अर्जुनानें 'प्रस्वापन' अस्त्र ( म्हणजे गाढ निद्रा आणणारें अस्त्र ) सोडलें. त्यासरशीं जिकडेतिकडे घोर अंधार पसरून किरातसेना निद्रेनें व्यापली. आणि वीरांच्या हातून आयुधें पटापट गळून पडलीं.

### शेवटीं गुद्दे लगावण्यास सुरवात !

अशा स्थितींत शंकराच्या मस्तकांतून एक पिंगट रंगाची ज्योत बाहेर पडली व तिनें अंधकाराचा नाश करून सैन्यांत पुन्हां चैतन्य निर्माण केलें. यावर अर्जुनानें भुजंगास्त्र सोडून जिकडे तिकडे शेकडों भयंकर सर्प निर्माण केले. त्यावर शंकरानें गरुडास्त्राचा मंत्र जपला. नंतर अर्जुनाच्या पावकास्त्रा-विरुद्ध मेघास्त्रहि त्यानें योजलें. याप्रमाणें प्रत्येक खेपेस अर्जुनाचा यत्न विफल होऊन तो हतबल झालेला दिसूं लागला. आपत्काळांतून आपल्यास सोडवितील असे आपले जिवलग मित्र एकदम नाहींसे झाले म्हणजे धैर्यवान् माणूस असा शेवटीं स्वपौरुषावरच अवलंबून राहातो त्याप्रमाणें आपलीं अस्त्रें फुकट गेल्यावर अर्जुनानें आपल्या धनुष्यावरच विजयाशा अवलंबून ठेविली. त्यानें अनेक उग्र बाण शंकरावर फेकले. पण त्यांचा त्याच्यावर कांहींच

परिणाम होईना. कांहीं काळ अर्जुनाचा जय, पण पुन्हां पराजय असें अनेक वेळां घडलें. अखेर शंकरानें बाण, भाते आणि कवच इत्यादि अर्जुनाचीं साधनें नाहींशीं केलीं. तथापि अर्जुनानें नुसत्या धनुष्याचेच तडाखे शंकराला दिले. तें धनुष्य व खड्गहि भंगून गेलें! नंतर अर्जुनानें वृक्ष उपटून फेकले. तेहि निरुपयोगी ठरल्यावर त्या बहाद्दरानें शंकराच्या छातीवर मुठीचे तडाखे लगावण्यास सुरवात केली. एकुलत्या एक पुत्राची हवी ती दांडगाई पिता ज्या वात्सल्यानें सहन करतो त्याच वात्सल्यानें शंकरानें अर्जुनाचे मुष्टिघात सहन केले. नंतर दोन जेठींचें आकसाचें मल्लयुद्ध व्हावें तसें अर्जुन-शंकराचें जंगी मल्लयुद्ध जुंपलें. क्षणांत अर्जुन वर तर दुसऱ्या क्षणीं शंकर वर आहे असें दिसे. अखेरीस मोठ्या हिय्यानें अर्जुनानें शंकराचे पाय पकडले व तो त्यास जमिनीवर लोळाविण्यासाठीं उचलूं लागला. हें अर्जुनाचें बल व धैर्य पाहून शंकराला पराकाष्ठेचें समाधान झालें. त्यानें लगेच अर्जुनाला मिठी मारली. अर्जुनाच्या तपापेक्षां या सामर्थ्यानेंच शंकराला अधिक आनंद वाटला.

**अखेर पाहिजे होतें तें मिळालें !**

शंकरानें आपलें खरें रूप प्रकट केलें. तें पाहतांच अर्जुनानें त्याचें पादवंदन केलें. अर्जुनाचीं शस्त्रास्त्रें पूर्ववत् त्याचेजवळ आलीं. त्या क्षणीं मेघांतून पृथ्वीवर वृष्टि झाली. आकाशांतून सुरपुष्पें उधळलीं गेलीं, आणि दुदुंभि वाजूं लागल्या. इंद्रासहवर्तमान सर्व देव तेथें येऊन पोहोंचले. अर्जुनानें मोठ्या उचित शब्दांत शिवस्तुति केली, आपल्या अज्ञानजन्य अपराधाची क्षमा मागितली व शेवटीं शंकरापाशीं हा वर याचिला कीं, "धर्मराजाच्या शत्रूवर जिच्यामुळें विजय मिळवितां येईल अशी अमोघ अस्त्रविद्या तूं मला दे." शंकरानें लागलीच अर्जुनाला पाशुपत अस्त्र असणारा धनुर्वेद दिला. कृतकृत्य झालेल्या अर्जुनानें शंकराला तीन प्रदक्षिणा घातल्या. इंद्रादि लोकपालांनींहि अर्जुनाला आशीर्वादपूर्वक दिव्य अस्त्रें दिलीं. आतां हा अर्जुन दुष्टांना मारून भूभार हलका करील या विश्वासानें देव स्वस्थानीं परत गेले. 'जा, शत्रूंना जिंक' अशा आशीर्वचनानीं शंकरानें अर्जुनाला निरोप दिला. तो मस्तकीं धारण करून

यशस्वी पार्थ वनांतील आपल्या वसतिस्थानीं परत आला व त्यानें धर्म-राजाला मोठ्या शालीनतेनें वंदन केलें.

# किरातार्जुनीय–रसग्रहण

## एकाच विषयाची वेगवेगळी सजावट.

कालिदासाच्या ललित-मधुर, खेळकर, रम्योदात्त व ध्येयवादी काव्य-कृतींनंतर कांहीं काळानें भारवीची ओजस्वी, भारदस्त, दणकट, विवेक-प्रधान व विचारदृष्ट्या वास्तववादी कृति रसिक-मान्यतेच्या क्षितिजावर चमकूं लागली. आमचीं आर्ष काव्यें व पुराणें हीं परंपरया किंवा साक्षात् महाकाव्यांच्या निर्मितीला प्रेरक असलीं तरी त्यांतील प्रसंगांपैकीं कोणता प्रसंग आपल्या महाकाव्यांसाठीं निवडावयाचा व त्याची सजावट कशी करावयाची हें सर्व बहुंशीं कवींच्या व्यक्तिमत्त्वावर व कांहीं अंशानें त्या वेळच्या परिस्थितीवरहि अवलंबून असतें. फार काय, सारख्याच प्रसंगावर दोन कवींनीं रचलेलीं दोन काव्यें व्यक्तिपरत्वें व परिस्थितिपरत्वें अगदीं निराळीं उतरतात. कालिदासाच्या 'कुमारसंभवां'तील बहुतेक भाग जुलमी व देवांगनांना छळणाऱ्या तारकासुराशीं इंद्रादि देवांनीं द्यावयाच्या सामन्याच्या तयारीनेंच व्यापला आहे. 'रघू'च्या बाराव्या सर्गांत वनवासी रामापुढें आपल्या पत्नीस पळवून नेणाऱ्या रावणासारख्या बलाढ्य शत्रूशीं संग्राम कसा करावा हाच विचार होता. आणि भारवीच्या 'किरातार्जुनीयां'-तील निर्वासित व असहाय पाण्डवसुद्धां आपल्या पत्नीची भरसभेंत विटंबना करणाऱ्या दुष्ट कौरवांच्या पारिपत्याचाच विचार करीत आहेत. या तीनहि ठिकाणीं विषय सारखाच असला तरी त्याची सजावट मात्र भिन्न झाली आहे. मुळांतल्या सारख्याच कथांतील कोणत्या भागाला आपल्या काव्यांत किती व कसें महत्त्व द्यावयाचें आणि कोणत्या मागाचा संकोच व विस्तार किंवा लोप करावयाचा, अथवा कोणता नवीन माग त्यांत कल्पनेनें निर्मून घालावयाचा हें सर्व कवीवर अवलंबून आहे. म्हणजे कवीचें व्यक्तिमत्त्व आपल्या आवडीनिवडीनुरूप व आपल्या विशिष्ट धोरणानुरूप हें घेण्या-

टाकण्याचें काम करीत असतें. म्हणूनच तर काव्योद्यानांत वैचित्र्य व भिन्न व्यक्तित्वाच्या दर्शनानें निर्माण होणारी रमणीयता आली आहे. मात्र महाकाव्य हें भावकाव्याप्रमाणें कवीच्या निव्वळ वैयक्तिक भावना रंगवीत नसून तत्कालीन समाजाच्या भावनांशीं एकरूप झालेल्याच आपल्या भावना व विचार रंगवीत असतें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

**व्यक्तिमत्त्वानुरूप निवड.**

'कुमारसंभवां'तील उग्र सामन्याच्या पूर्वतयारींत शृंगार, वत्सल, हास्य, भक्ति इत्यादि कोमल रसांनासुद्धां अवसर मिळाला आहे ! आणि 'रघूं'-तील प्रसंगप्र'स संग्रामाच्या पूर्वतयारीचें मानसिक विश्लेषण व त्याचा इतर गंभीर विस्तार यांस कालिदासानें फाटाच दिला आहे ! कारण रामायणांतील हा भाग विस्तारून सांगण्याची लहर स्वारीला आली नाहीं ! पण भारवीनें मात्र पांडवांच्या पूर्वतयारीच्या भागावरच आपली मुख्य मदार ठेवली. वास्तविक पाहिलें तर ज्या भारतांतल्या भागावर भारवीनें आपल्या महाकाव्याची उभारणी केली आहे तो भाग प्रसंगदृष्ट्या व कथानकदृष्ट्या यथातथाच आहे. म्हणजे केवळ प्रसंगाच्या वेधकपणानें व कथानकाच्या गुंफणीमुळें त्यांत विविध रसोत्पत्तीला फार कमी अवकाश आहे. महाभारताच्या वनपर्वांतील २७ ते ४० या चौदा अध्यायांत हा कथाभाग आहे. त्यांतील पहिले दहा अध्याय (२७ ते ३६) धर्म, भीम व द्रौपदी यांच्या केवळ चर्चेनेंच व्यापले आहेत. नंतर कथासूत्राला कोठें आरंभ होतो न होतो तों तें चाळिसाव्यांत संपतेंसुद्धां. द्वैतवनांतील चर्चास्थानीं व्यास येतात. त्यांच्या उपदेशानुसार अर्जुन शस्त्रप्र'तीसाठीं इंद्रकील पर्वतावर जातो. तेथें इंद्र ब्राह्मणरूपानें त्यास शिवाची आराधना करावयास सांगतो व शेवटीं अर्जुनाची तपस्या फलदायी होऊन किरात-रूपी शंकराशीं झालेल्या युद्धानंतर त्याला दिव्यास्त्रें मिळतात. येवढेच काय ते त्या कथानकाचे टप्पे आहेत. हें कथानक अगदीं सरळ, बिन-गुंतागुंतीचें व म्हणूनच सपाट ( flat ) आहे. असें असूनहि भारवीनें तें कां निवडावें हा प्रश्न विचारांत घेण्यासारखा आहे. आणि त्याचें उत्तर कवि आपल्या व्यक्तिमत्त्वानुरूप व आपल्या भोंवतालच्या परिस्थितीनुसार कथाप्रसंग निवडतो व सजवतो असेंच द्यावें लागतें.

### संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी.

'कुमारसंभवां'तील लढ्याच्या पूर्वतयारींत 'संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी' या म्हणीप्रमाणें प्रथम सेनापति जन्माला आणणें व नंतर देवसेनेची जमवाजमव करणें येवढें अवघड •व कालावधीचें काम देवांना करावयाचें होतें हें खरें. पण तेथें देवांचीं मनें युद्धाला प्रतिकूल नव्हतीं. म्हणजे तेथें इंद्रादि देव हीनबल झाले असले आणि केवळ एका योग्य नेत्याच्या अभावीं कुंठित होऊन निष्क्रिय बनले असले तरी त्यांना शत्रूशीं युद्ध करावें का करूं नये याबद्दल नैतिक संशय नव्हता. तारकाशीं युद्ध करून त्याचा वध करणें हें आपलें कर्तव्यच आहे याबद्दल त्यांचा एकमतानें निश्चय झाला होता. खोटी होती ती साधनांची. पण भारवीला पांडवांच्या लढ्यांतील पूर्वतयारीच्या या वैचारिक भागाकडेच अधिक लक्ष देणें आवश्यक होतें. इंद्रादि देवांप्रमाणेंच हतबल व निष्क्रिय झालेला धर्मराज मुळीं क्षात्रोचित उत्थानालाच नैतिकदृष्ट्या प्रतिकूल होता. व त्या प्रतिकूलतेचीं कारणें व्यावहारिकापेक्षां तत्त्वज्ञानात्मकच जास्त होतीं. सत्य, अहिंसा, क्षमा, तितिक्षा, इंद्रियनिग्रह, मोक्षप्राप्ति इत्यादि ध्येयाच्या मागें लागून एखादा लढवय्या आपली वर्णधर्मप्राप्त क्षात्रवृत्ति उपेक्षूं लागला तर त्याला समरोन्मुख करणें हें कर्म महाकठीण आहे. हीदेखील एका अर्थानें 'संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी'च आहे व ही तयारी भारवीला करावयाची होती.

वैचारिक ढालीवर वैचारिक शस्त्रांचाच प्रहार या न्यायानें त्याला आपल्या लढ्याच्या पूर्वतयारीला वैचारिक व विवेकप्रधान भागापासूनच आरंभ करावा लागला. अर्थात् यांत भावनेला अवसर कमी. पण जो कवि चिंतनशील, विवेकचतुर व तेजस्वी विचारांचा गंभीर उद्गाता असेल तोच असलें कथानक निवडील व त्याच्या सजावटींत रमेल. त्यामुळें तेजस्वी भारवीनें असल्या रूक्ष विषयाला हात घालण्यास न कचरतां तेंच केलें आहे.

### निवृत्तीची अकालीं झडप.

समरभूमीवर प्रत्यक्ष उभ्या ठाकलेल्या शत्रूंशीं युद्ध करण्याची गोष्ट तर राहूं द्याच पण ज्या सुखी व मानीपणाच्या जीवनासाठीं ही खटपट करा-

चयाची त्या ऐहिक जीवनाबद्दलहि निवृत्तिपर विचारसरणी महाभारत-कालाच्या पूर्वीपासून या देशांत सुरू होती. भगवद्गीतेंत उल्लेखिलेले सांख्य संन्यासमार्गी होते व मोक्षप्राप्तीसाठीं शक्य तेवढ्या लवकर या त्रिगुणांनीं व्यापलेल्या लोकव्यवहारांतून निर्गुण वस्तूकडे जाण्याची त्यांच्या जिवाला ओढ होती. अशांना युद्धाची काय मातब्बरी ? त्यांच्या मतें आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा त्रिविध दुःखाच्या आघातांनीं पोळलेल्या जिवाला एकच विसांवा व तो म्हणजे तत्त्वज्ञानाश्रयानें मिळणारा मोक्ष. न्यायदर्शन, योगदर्शन यांत तर सर्व सुखसाधनें दुःखोदर्क आहेत असें प्रतिपादिलें असून वासनाक्षय किंवा तृष्णाक्षय हा सुखाचा मार्ग म्हणून सांगितला आहे. यांतच बुद्धधर्माच्या दुःखमय विचारसरणीची भर पडून संसार हें केवळ दुःखाचें मूळ व क्षणाचा पसारा या मताची सर्वत्र गाढ छाप पडली. 'निर्वाण' हा मोक्षवाचक शब्द बुद्धाच्या परिभाषेंतीलच आहे ( कि. ११.६९, रघु. १२.१, कि. १२.३९ ). वैदिक आर्यांच्या प्रवृत्तिपर, आनंदमय, उत्साही विचारसरणीला व समाजव्यवस्थेला उतरती कळा येऊं लागली. चार आश्रम व चार वर्ण यांची व्यवस्था खिळखिळी होऊन क्षत्रियब्राह्मणांच्या म्हणजे निवृत्तिपर संन्याशांच्या मार्गानें जाण्याचा विचार करूं लागले. ब्रह्मचर्य, गृहस्थ व वानप्रस्थ या आश्रमांत प्रथम अर्थ, काम व धर्म या त्रिविध पुरुषार्थांचें साधन यथायोग्य करून मग मोक्षाकडे वळण्याएवजीं 'ज्या दिवशीं प्रपंचाचा वीट येईल त्याच दिवशीं संन्यास' असली मोक्षाकडील मधली वाट ( short-cut ) निघण्याचा रंग दिसूं लागला ! समाजाच्या व व्यक्तीच्या कल्याणाला पोषक असलेल्या धर्मार्थकामांना गौणपणा येऊन वैयक्तिक सुखाच्या मोक्षरूपी पुरुषार्थाचें अयोग्य बंड मातलें. नैतिक गुणागुणांची चर्चा समाजहित व मानवी स्वभावाची ठेवण या कसोट्यांनीं न होतां ती मानीव अशा मोक्षप्रद पूर्णतेच्या कसावर ठरूं लागली. म्हणजे मी माझ्या शत्रूला मारणें यांत माझें व माझ्या राष्ट्राचें हित आहे कीं नाहीं याचा विचार न होतां माझ्या आत्मिक कल्याणाला हें पोषक आहे कीं नाहीं याचाच विचार जास्त सुरू झाला. क्षमा, दया,

अहिंसा, तितिक्षा इत्यादि गुण दैवी ठरून ठोशास ठोसा ही वृत्ति हीन गणली जाऊं लागली.

**मोक्षामार्गें दडलेला भेकडपणा.**

हें सर्व खऱ्या तत्त्वज्ञानविचारानें झालें असतें तर एक वेळ परवडलें असतें. पण कांहीं दुबळ्या, कचखाऊ, भेकड व आळशी लोकांनीं या निवृत्तिपर विचारसरणीचा सोयिस्कर अवलंब करून आपली रडवी छबी तत्त्वज्ञानाच्या रंगानें खुलविण्याचा प्रयत्न केला, तेव्हां मात्र या विचारसरणीला ओंगळ स्वरूप आलें. या विचारसरणीची छाप महाभारत-पूर्वकालापासून आजतागायत आपल्या समाजावर बसली आहे. कांहीं ज्ञानमार्गी लोकांनीं अपवाद म्हणून योग्य कालीं हिचा आश्रय केला तर फारसें बिघडत नाहीं. पण सबंध राष्ट्रच जेव्हां या घातक विचारसरणीच्या आहारीं जाऊन सात्त्विक ऊर्फ निरुपद्रवी ऊर्फ दुबळें बनूं लागलें तेव्हां मात्र हिच्यावर काहीं जालीम मात्रा योजावीसें तत्कालीन विचारवंतांना वाटूं लागलें.

मोक्षशास्त्र हें एक आत्मकल्याणाचें परमोच्च शास्त्र म्हणून ठीक आहे; व त्याचा अवलंब देव, ऋषि व पितर या तीन ऋणांचें अपाकरण व ब्रह्मचर्य, गृहस्थ व वानप्रस्थ या तीन आश्रमांचें योग्य परिपालन केल्यावर अधिकारी पुरुषांनीं केला तर समाजदृष्ट्या त्यांत वावगें कांहींच नाहीं. व अशी धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांची नमुनेदार व्यवस्था ध्येयदर्शी कालिदासानें रघु व त्याचा पुत्र अज यांच्या निमित्तानें रघुवंशांत ( सर्ग ८,१५-२४ ) सुंदर तऱ्हेनें चित्रित केली आहे. पण इतर मोक्ष-विवेचनांत वाईट गोष्ट ही झाली कीं, मोक्षशास्त्राच्या कांहीं दुःखवादी प्रचारकांनीं त्याचा उपदेश अयोग्य कालीं व अनधिकारी माणसापुढें करावयास सुरुवात केली. त्यामुळें विषम परिस्थितीवर स्वपराक्रमानें मात करण्याच्या पुरुषाच्या उपजत उत्साहावर पाणी पडून, येईल ती कष्टप्रद व हीन अवस्था विनाप्रतिकार, सह्य करून घेण्याच्या घातक दुर्बलतेला तत्त्वज्ञानाचा पाठिंबा मिळूं लागला. 'अर्थ व काम हेच दोन पुरुषार्थ आहेत; धर्म, मोक्ष हे पुरुषार्थच नव्हेत' या हल्लींच्या मतार्शी भारवीचा संबंध कोणीं जोडूं नये. भारवीचा कटाक्ष मोक्षशास्त्रावर नसून त्याच्या

अयोग्य प्रचारावर आहे. जुन्या काळचा भारवी जुन्या चतुर्विध पुरुषार्थ-वादी समाजाला फक्त मोक्षाच्या मर्यादा स्पष्टपणें आंखून देत होता.

**कर्मयोगाची मात्रा.**

वनपर्वांतील धर्मराजाची विचारसरणी कांहींशी याच प्रकारची म्हणजे निवृत्तिपर आहे. हा युधिष्ठिर तर राहोंच पण त्याच्या जोडीला भीम व अर्जुन हे तेजस्वी वीरसुद्धां उद्योगपर्वांत कौरवांशीं तडजोडीची भाषा करूं लागले व अर्जुन तर युद्धापूर्वी शुद्ध 'क्लीब' बनून तत्त्वज्ञानाच्या थापा ( प्रज्ञावाद ) मारूं लागला. यावर भगवान् कृष्णाला गीतेची कर्म-योगपर मात्रा द्यावी लागली. महाराष्ट्रांतहि संतांच्या निवृत्तीला नवी कर्म-पर कलाटणी देण्याचें काम समर्थांना करावें लागलें; आणि या सर्व तेजस्वी विचाराना पुनरपि उजाळा देणें जरूर आहे असें कर्मयोगी लोकमान्य टिळकाना अगदीं आजच्या कालांत वाटलें. सहाव्या शतकांतील अशी मोक्षविचाराच्या आड दडलेली राष्ट्राची मरगळ मोडून काढणें हा भारवीचा आपलें किरातार्जुनीय लिहिण्यांतला हेतु आहे. हाच हेतु कां मानावा लागतो व तो त्यानें कसा सिद्ध केला आहे हें आतां थोडेंसें पाहिलें पाहिजे.

**भारवीचे व्यास काय सांगतात ?**

वर सांगितल्याप्रमाणें मूळ कथेंतील कविकृत संकोच, विस्तार, लोप व नवीन भर या चार प्रमाणांवरून कवीचें काव्यप्रयोजन अजमावितां येतें. विशेषतः नवीन भर हें त्यातल्या त्यांत अधिक निर्णायक प्रमाण आहे. म्हणून त्याचाच प्रथम विचार करूं. तिसऱ्या सर्गांतील व्यासांचें आगमन व त्यांचा उपदेश हें असें पहिलें स्थळ आहे. महाभारतांत व्यास धर्मभीमांच्या चर्चेच्या वेळीं येतात, पांडवांना असलेल्या प्रबल कौरवांच्या भीतीवर तोडगा म्हणून 'प्रतिस्मृति' नांवाची विद्या युधिष्ठिराला देतात, ती विद्या अर्जुनानें धर्मापासून घ्यावी व नंतर त्यानें इंद्र व शंकर यांज-कडून अस्त्रविद्या संपादावी असा उपदेश करतात, अर्जुनाची थोरवी वर्णन करतात व 'या द्वैतवनांतून आतां दुसरीकडे रहावयास जा' असें पांड-वांस सांगून गुप्त होतात. या महाभारतांतील व्यासांच्या आगमनानें तत्पूर्वी युधिष्ठिर व भीमद्रौपदी यांमध्यें चाललेल्या वादावर कांहींच निर्णा-

यक प्रकाश पडत नाहीं. आपली दुःस्थिति, कपटी शत्रूची चलती, क्षात्र-तेज, मानीपणा, वैभवाची आवड इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन कपटी कौरवांशीं कपट करून त्यांचा नाश करावा; का न्यायी, क्षमाशील, तितिक्षायुक्त व सद्गुणसंपन्न राहून भणंग भिकाऱ्याचें जिणें जगावें हा त्यांच्यामधील वादाचा मुख्य मुद्दा होता. याबद्दल एक अक्षरहि महाभारतांतले व्यास बोलत नाहींत. भीमद्रौपदीचा तेजस्वी पूर्वपक्ष व युधिष्ठिराचा क्षमायुक्त उत्तरपक्ष असेंच त्यांच्या वादाचें स्वरूप राहतें. हें जाणून भारवीनें व्यासांना या वादी मंडळीच्या पक्षप्रतिपक्षावर निर्णायक उत्तर देण्यासाठींच तेथें आणलें आहे, व त्यांच्या तोंडीं पुढील नवीन उद्गार घातले आहेत : 'कौरवांचा पक्ष अन्यायाचा आहे. धृतराष्ट्रानें केवळ राज्यलोभानें आपल्या दुर्गुणी पुत्रांना पाठीशीं घालून तुम्हां सद्गुणी पुतण्यांना दूर केलें आहे. शिवाय तो कर्ण, शकुनि आदिकरून दुष्टांच्या सल्ल्यानें वागत आहे. धर्मा, तूं क्षमाशील असूनहि तुला त्यांनीं कपटानें वंचिलें आहे. तूं विपत्तींत असूनहि क्षमा, अहिंसा, समता, इंद्रियसंयम इत्यादि गुण प्रकट करतोस हें ठीकच. पण अशानें तुमचें निभणार नाहीं. तुला आपलें राज्य पराक्रमानें मिळविलें पाहिजे. ( तें केवळ सद्गुणानीं मिळणार नाहीं ) तुमचे शत्रू शस्त्रास्त्रानीं प्रबल आहेत ( सद्गुणांनीं नसतील ). म्हणून तुला आपलें शस्त्रबल अधिक वाढविण्याचा यत्न केला पाहिजे. कारण रणांगणावरील जय अधिक प्रभावी शस्त्रांनींच मिळतो ( सद्गुणांनीं नाहीं. )'

हे व्यासांचे उद्गार युधिष्ठिराच्या विचारसरणींतील मोक्षोपयोगी सद्गुणाच्या अयोग्य प्राधान्याला विरोधी असून भीमद्रौपदीच्या धर्मार्थकाममूलक तेजस्वीपणाला पोषक आहेत. युधिष्ठिर ब्राह्मणधर्माचें मोक्षकारक आचरण करीत असून क्षत्रियधर्माला पाठमोरा होत आहे हीच भीमद्रौपदींची मुख्य तक्रार होती व व्यासांकरवीं तिचा अनुकूल निकाल 'किराता' मध्यें देवविण्यांत आला आहे. क्षमा, तितिक्षा, इंद्रियसंयम आणि सत्य हे गुण युधिष्ठिराला परमसाध्य म्हणून प्रिय होते, साधन म्हणून नव्हेत. व्या मोक्षसामग्रीच्या तत्त्वज्ञानांत सापडून तो व्यवहाराला पुरा पारखा होत होता. त्यानें आपल्या भाषणात सबुरीची, वाट पाहाण्याची, दुर्योधनाच्या संभवनीय अपकर्षाची जी राजनीति भीमास सांगितली आहे ती केवळ

त्याला अप्रिय असलेल्या युद्धाचें कालहरण करण्यासाठींच; तसें नसतें तर प्रत्यक्ष वेळ आल्यानंतरसुद्धां पांच गांवांवर कौरवांशीं तडजोड करण्याला हा गृहस्थ मुळींच तयार झाला नसता.

## पूर्वपक्षाचा डोलारा ढासळून टाकला.

आपल्या पदरची नवीन भर घातलेलें असें भारवीचें दुसरें अधिक महत्त्वाचें स्थळ म्हणजे 'किराता'च्या अकराव्या सर्गांतील ब्राह्मणवेषधारी इंद्र व अर्जुन यांचा संवाद. महाभारतांत ( अ. ३७, श्लोक ७७ ते ९४ ) हा प्रसंग अगदीं मामुली आहे. इंद्राचा प्रसाद संपादण्यासाठीं इंद्रकील पर्वतावर अर्जुन तपस्या करूं लागला असतां त्याला 'थांब' असा एक शब्द ऐकूं आला. अर्जुन इकडेतिकडे पाहतो तों त्याला एक वृद्ध ब्राह्मण दिसला. तो ब्राह्मण अर्जुनाला म्हणाला, ' हें शान्त, दान्त अशा ब्राह्मण तपस्व्यांचें ठिकाण आहे. तूं शस्त्रधारी क्षत्रिय येथें कशाला आलास ? येथें कांहीं संग्राम नाहीं. तें धनुष्य खालीं ठेव. तूं या ठिकाणीं परमगतीला ( म्हणजे मोक्ष मिळविण्यास ) आला आहेस ना ? ' हें ऐकूनसुद्धां अर्जुन निश्चल राहिला. तेव्हां ब्राह्मणानें त्याला आपण इंद्र असल्याचें सांगितलें. तेव्हां अर्जुनानें त्याजकडे अस्त्रें मागितलीं. त्यावर इंद्र म्हणाला, " अरे, तूं मोक्षाच्या ठिकाणीं आलास ( प्राप्तोऽसि परमां गतिम् । ); तेव्हां अस्त्रेंच काय मागतोस ? " तेव्हां अर्जुनानें इतर भोग, सुखें यांपेक्षां आपल्यास शत्रूचा प्रतिकारच अधिच प्रिय असल्याचें सांगितलें. मग इंद्रानें शंकराला प्रसन्न करून घेण्याचा त्याला सल्ला दिला. पण याच साध्या प्रसंगांत ब्राह्मणाच्या तोंडीं भारवीनें ( कि. ११.१०-३६ ) सर्वच्या सर्व संन्यासवादाचें तत्त्वज्ञान घातलें असून आपल्या प्रतिपाद्य धोरणाचा पूर्वपक्ष मोठ्या बहारीनें रंगविला आहे. त्यांत सुखाची दुःखरूपता, अर्थकामांचें निष्फलत्व, मोक्षाचा बडेजाव, संसाराची असारता इत्यादि सर्व कल्पना सूत्ररूपानें आणल्या असून वैदिक संन्यासमार्गांतील निवृत्ति व बौद्धांचें दुःखमय तत्त्वज्ञान ठासून भरलें आहे. व असा हा पूर्वपक्षाचा डोलारा उभा करून अर्जुनाकडून तो केवळ प्रवृत्तिपर व्यवहारवादानें आणि क्षात्रियाच्या तेजस्वीपणाची तरफ लावून उलथून टाकला आहे ( कि. ११.३८-८० ).

**मला मोक्षाची अडचणच होईल.**

मुळांतल्या केवळ अठरा साध्या श्लोकांचा भारवीनें केलेला हा एक्यांशीं श्लोकांच्या सबंध सर्गांतील विस्तार पाहिला म्हणजे भारवीच्या मुख्य प्रतिपाद्याविषयीं शंकाच उरत नाहीं. व्यासांच्या उपदेशानें ज्या तत्त्वज्ञानाचा चांगलासा समाचार भारवीला तिसऱ्या सर्गांत घेतां आला नाहीं त्याचा आतां पुरा बींमोड त्यानें येथें केला आहे. 'मला क्षत्रियाला व विशेषतः अपमानदंशानें जळफळणाऱ्या क्षत्रियाला हा उपदेश करूं नका. माझ्या शत्रूंना मारून मीं आमची वंशकीर्ति स्थिर केली नाहीं तोंपर्यंत तुझा तो मोक्ष ( निर्वाण ) मला मिळाला तरी माझ्या जयसिद्धीच्या मार्गांत त्याची मला अडचणच वाटेल. फार काय, मला तुझ्या त्या स्थिर व नित्य मोक्षाप्रमाणेंच चंचल अर्थ व काम यांचीहि पर्वा नाहीं. मला माझ्या मानी वृत्तीला खुला वाव पाहिजे. मी शस्त्रास्त्रें मिळवून शत्रूंना एक मारीन तरी, नाहीं तर याच पर्वतावर मरून तरी जाईन.' हे अर्जुनाचे तेजस्वी उद्गार या वादाचा कायमचा निकाल लावतात. आयुष्याचीं अंतिम ध्येयें (म्हणजेच पुरुषार्थ) ठरवितांना आणि त्यांमधील तारतम्य निश्चित करतांना निःश्रेयस व अभ्युदय या कल्पनांबरोबरच मानवी मनाची मूल घटनासुद्धां कशी ध्यानात घ्यावी लागते ( व ती ध्यानांत घेतली नाहीं तर मानी मन अभ्युदय-निःश्रेयसांवरहि पाणी सोडण्यास कसें तयार होतें ) याचें अत्यंत सुंदर व भिनतोड प्रतिपादन अर्जुनाच्या उत्तरपक्षांत भारवीनें केलें आहे. मानवाच्या मूळ इंद्रियप्रवृत्ति पतनशीलच आहेत, व हें जग दुःखमूल असतें असें गृहीत धरून त्या प्रवृत्तींवर ऐहिक व पारलौकिक कल्याणाच्या दृष्टीनें इतकें नियंत्रण मोक्षवाद्यांकडून कधीं कधीं आणण्यात येतें व मूळ स्वभाव इतका मारून टाकण्याचा धार्मिक व तत्त्वज्ञ आग्रह धरतात कीं मूळ स्वभाव एखाद्या सुरुंगासारखा या नियंत्रणाचीं कवचें फोडून टाकून वर निघतो.

आणि 'कोणीं आततायी क्रूरानें तुझी बायको भ्रष्टविली तरी गप्प बैस, तुझीं घरेंदारें जाळलीं तरीहि क्षमा कर व तोंडांत शेण कोंबलें तरीहि संयमच दाखीव' असा उपदेश वेळीं अवेळीं मोक्षाच्या मोठ्या नावाखालीं कोणी निवृत्तिमार्गी करूं लागला तर 'तूं एक अडाणी

किंवा हितशत्रू तरी आहेस ' असें म्हणून त्याला प्रणामपूर्वक दूर लोटण्यास अर्जुनासारखा तेजस्वी पुरुष सिद्ध होतो.

**तेजस्वितेची भडकती ज्वाला.**

अर्जुनाच्या तोंडीं यातलेल्या या परम तेजस्वी विचाराची उठावदार भूमिका म्हणून पहिल्या व दुसऱ्या सर्गांत भारवीनें द्रौपदी व भीम यांचीं जळजळीत भाषणें घातलीं आहेत. यज्ञाच्या ज्वालेंतून निर्माण झालेली याज्ञसेनी द्रौपदी तर तेजाची मूर्तिमंत ज्वालाच आहे, व तिला अधिक प्रज्वलित करण्यासाठीं भारवीनें एक नवें निमित्त प्रारंभींच मुद्दाम कल्पून घातलें आहे. ' दुर्योधन चांगलेपणानें राज्य करीत असून त्याची चलती होत आहे ' असे धर्मानें पाठविलेल्या हेराच्या तोंडचे शब्द तिनें ऐकले मात्र, तों तिच्या अंगाचा डोंब उसळला. महाभारतांतील द्रौपदीचें तेजस्वी बोलणें अशा एखाद्या आगंतुक निमित्तावांचून सहजच निघालें असल्यानें तें शिळोप्याच्या गप्पांसारखें वाटतें. म्हणून तें भारवीनें याप्रमाणें अणकुचिदार केलें आहे. त्याचप्रमाणें महाभारतांतील तिच्या बोलण्यांतील पाल्हाळ, पुनरुक्ति, खंड, भावनांचा उतार, दाखले देणें असले दोष काढून 'किरातां'त तिचें भाषण भारवीनें ठाशीव, सामिनिवेश, एकसंधी, सुसूत्र व शेवटीं एकच संस्कार उमटविणारें असें रचिलें आहे. महाभारतातील द्रौपदीच्या बोलण्यांतील एक विचार मात्र भारवीनें वगळला आहे. तो म्हणजे दुबळ्या दैववादावरील व ईश्वराच्या मानव न्यायीपणावरील तिचा रोष. द्रौपदीनें दुष्ट कौरवांचा उत्कर्ष व नीतिमान् पांडवांचा अपकर्ष करणाऱ्या ईश्वराच्या न्यायीपणाला बोल लाविला आहे व कर्मवादाच्या उपपत्तींतील दोषहि उघड केला आहे. व शेवटीं असें प्रतिपादिलें आहे कीं, ऐश्वर्याचें कारण दुसरें कोणतेंहि नसून बल हेंच आहे. आणि तें ज्या युधिष्ठिराजवळ नाहीं त्याची तिनें कींव केली आहे ( कारणं बलमेवेह जनाऽशोचामि दुर्बलान् । ) पण भारवीला कदाचित् हा नास्तिकरणा पसंत पडला नसेल. असो. भीमाचेंहि भाषण असेंच ओजस्वी आहे. हीं दोघेंहि आपापल्यापरी स्वयंसिद्ध क्षात्रतेजाची, नैसर्गिक चिडीची व न्याय्य सूडाची तडफदारी करीत आहेत. द्रौपदी ही स्त्री असल्यानें व तिचाच भयंकर अपमान झाला असल्यानें ती नागिणीसारखी फूत्कार टाकीत आहे. आपला वैभवनाश,

आपली दुःस्थिति व शत्रूची चलती यांमुळें बेभान होऊन तिनें काढलेले उद्गार व क्षात्रतेजास तिनें दिलेली चिथावणी जगाच्या वाङ्मयांत अमर होऊन राहतील. अर्जुन तपश्चर्येस निघाला असतां तिनें त्याला दिलेली आपल्या अपमानाची आठवण तर पुढील सर्व सर्गांतील अर्जुनाच्या तेजस्वी आचरणाला साक्षात् उद्दीपक झाली आहे. भीम राजनीतीची भाषा मधून मधून बोलत असला तरी त्याची मुख्य मदार स्वाभिमानरक्षणावर आहे. त्यापुढें त्याला राज्यलक्ष्मीसुद्धां आनुषंगिक फल वाटतें. तेज हा त्याच्या मतें थोराचा स्वभावधर्म असल्यानें त्याच्या आविष्कारापेक्षां दुसऱ्या फलाची त्याला अपेक्षाहि नसते.

**सुखालाहि अवसर नाहीं.**

नवीन भरींचें तिसरें मोठें ठिकाण म्हणजे अर्जुनाच्या तपस्येला विघ्न करण्यासाठीं इंद्रानें पाठविलेल्या अप्सरा. या नवीनच उपस्थित केलेल्या अप्सराप्रकरणानें किरातांचे तब्बल पांच सर्ग (६ ते १०) व्यापले आहेत. यांच्या जोडीला शरदृतुवर्णनपर व हिमालयवर्णनपर असे त्या-चेही दोन सर्ग (४ था व ५ वा) घेतले तर हे नवीन भरींचे सात सर्ग होतात. पण यांतला बराच भाग महाकाव्यांत अमुक एक गोष्टी असल्याच पाहिजेत या नियमामुळें आला आहे. सूर्योदय, सूर्यास्त, सायंकाळ, चंद्रोदय, पर्वत, नदी, ऋतु, जलक्रीडा, सुरतप्रसंग, पानगोष्ठी इत्यादि भाग मूळ कथेंतून उत्पन्न होत नसून ते तीवर लादलेले आहेत हें उघड आहे. पण विशेषतः अप्सरांचें प्रकरण लादण्यांत भारवीचा एक हेतु आहे. आणि तो म्हणजे अर्जुनाचें मन सूडाच्या कल्पनेनें पिचत असल्यामुळें त्याला जगांतल्या कसल्याहि सुखांत गोडी वाटत नव्हती, व तो कोणत्याहि मोहाला वश झाला नाहीं हें दाखविणें. आणि हा हेतु भारवीनें मानी मनाची पूर्ण ओळख ठेवून पुढीलप्रमाणें स्पष्ट शब्दांत सांगितला आहे. सूडाची भावना मानी माणसाचें हृदय जाळीत असतां त्यांत सुखाभिलाषास अवसर मिळत नाहीं (कि. १०·६२).

**तपस्व्याची जरब.**

अर्जुनाची तपस्यासुद्धां भारवीनें वर्णिली आहे ती एखाद्या हात वाळ-विणाऱ्या, उलटें टांगून घेणाऱ्या व वारुळांत स्वतांस पुरून घेणाऱ्या मुमुक्षु

ब्राह्मणाची नव्हे. ती खऱ्या क्षत्रियाची आहे. तिच्यांत एक जरब आहे, वचक आहे आणि एक उमदा दिमाख आहे. मूक दानवाच्या वधाचा प्रकार महाभारतांत आहे. तो सोडला तरी किरातदूताचें दहशत देणारें भाषण व अर्जुनाचें त्यावर उत्तर हा भाग भारवीनें नवीन घातला आहे. (सर्ग १३ व १४ वा). त्याचा उद्देश एकच. व तो म्हणजे क्षत्रिय तपस्या करीत असला तरी तो कोणाचें उणें उत्तर सहन करीत नाहीं, ईश्वरा-शिवाय कोणाच्या साहाय्याची इच्छा करीत नाहीं, कोणापुढें दैन्य भाकीत नाहीं व हलक्याशीं मैत्री करीत नाहीं; तर आपली मान सदैव ताठ ठेवून आपल्या स्वतांच्या पौरुषावरच्च अवलंबून राहतो हें दाखविणें. अर्जुनाच्या या प्रसंगींच्या उत्तरांत भीमाच्या अशाच तेजस्वी उद्गारांचा (कि.२.१३) प्रतिध्वनि निघत आहे असें भासतें. पुढें झालेलें अर्जुनाचें किरातवेषधारी शंकराशीं युद्ध महाभारतोक्त आहे. तथापि शेवटीं भारवी बजावीत आहे कीं 'अखेरीस शंकर अर्जुनावर प्रसन्न झाले ते त्याच्या नुसत्या तपस्येवर नव्हे, तर त्याच्या अंगच्या धैर्य, मानीपणा इत्यादि विपुलसत्त्वतेनें; कारण तपस्येमधल्या नुसत्या क्षमा, तितिक्षा, इंद्रियसंयम या गुणसंहतीपेक्षां माणसा-च्या अंगचें सत्त्वच मोठया लोकांना उपकारक वाटतें' (कि.१८.१४).

**उपसंहारहि योग्य.**

पाशुपतास्त्राच्या प्राप्तीनंतर अर्जुन हा इंद्राच्या रथांतून स्वर्गलोकीं जातो व तेथें बराच काल राहतो. त्याच्या विरहामुळें त्याचे बंधू व भार्या अत्यंत व्याकुळ होतात. त्यानंतर अनेक आख्यानें व उपाख्यानें सुरू होतात व अखेर यक्षप्रश्नप्रसंगापूर्वी अर्जुन केव्हां तरी हळूच परत आलेला असतो असें मूळ महाभारतांत वर्णन आहे. यावरून व्यासांना वनपर्वाच्या अखेरपर्यंत स्वर्गांत गेलेल्या अर्जुनाला परत आणण्याची स्मृतिच राहिली नाहीं कीं काय असें वाटतें ! किंवा त्यांच्यापुढें सबंध भारतकथेचा पसारा असल्यानें त्यानीं त्याला लगेच परत आणलें नसावें. पण हातांत घेतलेल्या कथानकाच्या योग्य व परिणामकारक परिपूर्तीच्या दृष्टीनें भारवीला हा प्रकार बरा वाटला नाहीं. म्हणून त्यानें भगवान् शंकराचा आशीर्वाद घेऊन अर्जुन जो तडक निघाला तो प्रथम आपल्या वनांतील आश्रमास आला

व आपल्या वडील बंधूंच्या चरणांवर त्यानें मस्तक ठेवलें (कि. १८·४८) असा आपल्या कथेचा समुचित व एकसंधी उपसंहार केला आहे.

**मानी मनाचें पेटतें अग्निकुंड.**

याप्रमाणें अव्वलपासून अखेरपर्यंत मारवीनें पराभूत झालेल्या पण पुनरुत्थानाची आकांक्षा बाळगणाऱ्या तेजस्वी क्षत्रियाच्या मनाचें अग्निकुंड एखाद्या अग्निहोत्र्याप्रमाणें सतत पेटतें ठेविलें आहे. त्यावर दैववाद, सुखलोलुपता, मय यांची बसणारी राखाडी तो उडवून लावीत आहे. मोक्षाच्या आणि शमदमादि तत्साधनसामग्रीच्या खोट्या कल्पनांकडून तें कुंड विझविण्यासाठीं त्यावर शिंपडल्या जाणाऱ्या थंड पाण्याची वाफ करून तो ती विरवून टाकीत आहे, समानधर्म्यांच्या उद्गारांनीं तें फुंकीत आहे आणि अखेरीस परमेश्वरी कृपेचा 'अग्निनारायणाचा प्रसाद' त्यांतून निष्पन्न करीत आहे. अगदीं थोड्या मूठभर ज्ञानी लोकांसाठीं, केवळ एक उच्चतम ध्येय म्हणून असणाऱ्या मोक्षाच्या मागें लागून, पराभूत क्षत्रियानें अहिंसा, क्षमा, अद्रोह, शान्ति आणि सत्य या गुणांच्या–माणसास नेमळें बनविणाऱ्या– आत्यंतिक व भ्रामक कल्पनांच्या आहारीं जाऊं नये. धटाशीं धट, कपट्याशीं कपटी आणि नंग्याशीं नंगें बनून ठोश्यास उलट ठोसा लगवावा. समाजधारणेस आवश्यक असलेल्याच धर्मांच्या नियंत्रणाखालीं अर्थकामांचा खुशाल हव्यास धरावा. वैभवाची बिनदिक्कत आकांक्षा करावी व शेवटीं कांहीं झालें तरी आपला उपजत मानीपणा, आपलें क्षात्रतेज व निसर्गसिद्ध स्वातंत्र्यप्रेम या वृत्ती कोणताहि त्याग पत्करून तरवारीसारख्या तिखट ठेवाव्या असा भारवीचा तेजस्वी आंतर अर्थ (inner meaning) आहे. भगवान् दामोदर श्रीकृष्णानें अर्जुनास निमित्त करून जसा कर्मयोगाचा गीतोपदेश अखिल प्राणिमात्राला केला त्याच-प्रमाणें त्याच अर्जुनाला निमित्त करून दामोदर भारवी आपला हा ध्वनि-रूप किरातोपदेश निखिल पराभूत व उत्थानाकांक्षी राष्ट्रांना करीत आहे.

**उचित परिस्थितीच्या कोंदणांत.**

'अवन्तिसुंदरीकथासारां'तील भारवीचा वृत्तान्त खरा असला तर असा संदेश देण्यासारखी त्या काळची परिस्थिति सुद्धां होती हें ध्यानांत येईल. मध्यप्रांतांतील चालुक्य राजा विष्णुवर्धन याच्या संनिध असणारा भारवि

कांचीचा पल्लवराजा सिंहविष्णु याच्या दरबारीं आश्रयास जातो, आणि तोहि दुर्विनीत गंगराजाच्या मध्यस्थीनें जातो, याला कांहीं ऐतिहासिक अर्थ आहे. चालुक्य व पल्लव यांचें हाडवैर असून सिंहविष्णुपूर्वी व त्याच्यानंतर चालुक्यांनीं पल्लवांच्या राजसत्तेवर अनेक वेळां घाले घातले होते. दुर्विनीत गंग याचा पल्लवराजाशीं विवाहसंबंध होता. अभक्ष्यभक्षणानें पातकी ठरलेला मारवि हा मानी ब्राह्मण गृहत्याग करून तीर्थयात्रेसाठीं हिंडत असतां नेमका दुर्विनीताकडे व तेथून पल्लवराजा सिंहविष्णु याच्याकडे जातो यांत काहींतरी धोरण आहे. व मला तरी असें वाटतें कीं विष्णुवर्धनाबरोबर सहज शिकारीस गेलेल्या या सोवळ्या मारवीला विष्णुवर्धनानें थट्टेनें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं निमित्तानें म्हणा, अभक्ष्यअन्नानें मुद्दाम बाटविलें असलें पाहिजे. त्या वेळची कडक शिस्त लक्षांत घेतां पवित्र कुलांतील हा विद्वान् ब्राह्मण अभक्ष्यभक्षणास आपण होऊन सहसा तयार होईल असें वाटत नाहीं. आणि या बाटविण्यामुळेंच चिडून हा मानी व तेजस्वी ब्राह्मण प्रथम दुर्विनीताकडे व तेथून चालुक्यांचा पराक्रमी शत्रु सिंहविष्णु यांजकडे आश्रयास गेला असावा. चालुक्य राजा विष्णुवर्धन हा दुसऱ्या पुलकेशीचा धाकटा भाऊ. यालाच 'कुब्जविष्णुवर्धन' म्हणत. याचाहि काळ भारवीच्या मानलेल्या काळाच्या जवळपास आहे. मारवि तरुण असतां विष्णुवर्धनाजवळ असावा. उत्तरेकडील गुप्त व चालुक्य आणि भोंवतालचे चोल, चेर, पांड्य इत्यादि राजे यांच्याशीं टक्कर देण्यांतच पल्लवघराण्याचा फार काळ गेला. या झटापटींत त्याला बरेच वेळां पराभूत व्हावें लागलें. सिंहविष्णूच्या वेळींच पल्लवघराण्यानें आपलें डोकें थोडेंसें वर उचललें होतें. पण पल्लवांच्या या आशानिराशांच्या आंदोलनांत त्यांतील कोणा पुरुषांना किंवा त्यांच्या प्रजेलाहि निवृत्तीचा झटका येणें अगदीं साहजिक होतें. म्हणून विजयी झालेल्या पराक्रमी सिंहविष्णूच्या राजवटींत या संबंध परिस्थितीला अत्यंत योग्य असा आपला तेजस्वी काव्यग्रंथ भारवीनें लिहिला असावा असें मानणें सयुक्तिक वाटतें. पण माझा हा एक संभवनीय तर्क आहे.

**लादलेली संघर्षकल्पना.**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं आपल्या मुंबई व उपनगर मराठी

साहित्य संमेलनांतील (१७ डिसेंबर १९४४ मधील) अध्यक्षीय भाषणांत 'किरातार्जुनीया'चें सार पुढीलप्रमाणें सांगितलें आहे:— "येथें मनुष्याचें कर्तृत्व आणि ईश्वराचें कर्तृत्व यांच्यांतील विरोध व समन्वय कवीला सुचवावयाचा आहे. अर्जुनाचा बाण आणि किरातवेषधारी शंकराचा बाण एकाच क्षणीं लक्ष्यवेध करता झाला ! मनुष्य आपल्या कृतीनें जें निर्माण करतो तेंच ईश्वर त्याला देतो, परंतु त्याकरतां ईश्वराशीं मनुष्याला झगडावें लागतें. झगडण्यांतच तो त्याच्यावर अनुग्रह करतो. ईश्वराचा अनुग्रह त्याच्याशीं झगडल्याशिवाय होत नसतो. किरातार्जुनीयाचें हेंच सार आहे असें मी समजतों. याला कोणी वीररस म्हणतील !" सदर सार किरातार्जुनीयाच्या कथेच्या व सजावटीच्या पूर्वापरसंदर्भाला धरून नाहीं. केवळ शेवटचा अर्जुनकिरातांचा झगडा जमेस धरून तें काढण्यांत आलेलें आहे. अर्जुन जो निघाला होता तो शंकराची कृपा संपादावयास; त्याच्याशीं लढण्यास नव्हे. लढा प्रसंगानें आणि त्याला नकळत करावा लागला. हा ईश्वर आहे असें अर्जुनास कळतांक्षणींच त्यानें लढा थांबवून शंकरास प्रणाम केला ( कि. १८.१५ ) व त्याची स्तुति आरंभिली. आपण शंकराशीं लढलों हा आपला अपराध झाला असेंहि तो म्हणाला ( कि. १८.४२ ). याप्रमाणें मानवानें येथील लढा लढण्याच्या जाणिवेनें व पूर्वयोजनेनें कलेला नसल्यानें त्यावर आधारलेलें हें सार अर्थात्च डळमळीत भासतें. अन्यनिमित्तानीं घडलेल्या घटनेवर लादलेली ही एक आधुनिक काळीं आकर्षक वाटणारी संघर्षक कल्पना आहे येवढेंच त्यासंबंधानें म्हणतां येईल.

## कवि आणि ऋषि.

'किरातार्जुनीया'च्या प्रत्यक्ष रचनेपूर्वीं भरवीला जें तत्कालीन सामाजिक परिस्थितीचें कलात्मक दर्शन ( Artistic Vision ) झालें त्यांतील शुद्ध विचारात्मक भाग येथवर विवेचिला. आतां त्याच्या भावनात्मक कलागाकडे वळावयाचें. कवि व तत्त्वज्ञ या दोघांनाहि भोंवतालच्या जगातील घटनांच्या रहस्याचें शुद्ध, सर्वसामान्य व अमूर्त दर्शन सारखेंच घडत असतें. पण जें दिसलें तेंच— त्याच स्वरूपांत— विचारात्मक व तार्किक पद्धतीनें तत्त्वज्ञ मांडतो, तर कवि त्याच दर्शनाला भावनांची डूब देऊन, एका विशिष्ट घटनेच्या मूर्त शरिरांत त्याला स्थापून व कलात्मक

मांडणीनें तें नटवून त्यास जिवंत, आकर्षक व आकलनसुलभ बनवितो. हा त्या दोघांमधला फरक आहे. 'दर्शन' हें कवि व ऋषि यांना समान असलें तरी त्या 'दर्शना'च्या मूर्त वर्णनानें कवि हा कवि होतो ( नानृषिः कविरित्युक्तम् । दर्शनाद् वर्णनाच्चाथ रूढा लोके कविश्रुतिः । ) असें जें भट्टतौत म्हणतो तें याच अर्थानें. भारवीनें आपलें वैचारिक व भावनात्मक दर्शन मूर्त व विशिष्ट बनविण्यासाठीं वनपर्वांतील पांडवांच्या हालचालींची कथा घेतली व तिची सविस्तर व कलात्मक मांडणी आपल्या महाकाव्याच्या अठरा सर्गांत केली. तिचाच रूपविस्तार येथें थोडा करावयाचा.

**ठळक स्वभावरेखा.**

स्वभावरेखा हें 'किराता'मधील प्रथम नजरेंत भरण्याजोगें कालांग आहे. मात्र आपल्या स्वभावरेखा स्पष्ट करण्यांत भारवीनें प्रसंगापेक्षां भाषणांचेंच साहाय्य अधिक घेतलेलें दिसतें. अर्जुन हा या महाकाव्याचा नायक आहे. म्हणून त्याच्या वर्णनावर, त्याच्या हालचालीवर व त्याच्या उच्चारविचाराचारांवरच भारवीची मुख्य मदार आहे. अर्जुनाचा प्रत्यक्ष प्रवेश या काव्याच्या तिसऱ्या सर्गाच्या मध्यावर होत असला तरी पहिल्या भागांत द्रौपदी, भीम व व्यास हे तिघे त्याच्या पराक्रमाच्या उल्लेखांनीं त्याला वाचकाच्या नजरेसमोर खडा करीत आहेतच. येथून पुढें मात्र शेवटपर्यंत भारवीनें अर्जुनावरच आपलें लक्ष केंद्रित केलें आहे. पहिल्या तीन सर्गांत अर्जुनाच्या तेजस्वी मनोभूमीची पूर्वतयारी आहे. व्यासांच्या दिव्य मंत्रानें त्याचे ज्ञानचक्षू उघडतात व द्रौपदीच्या निरोपानें तो पराकाष्ठेचा उग्र बनतो. पण त्याचें मन तपःसिद्धीकडे लागल्यामुळें तो आपल्या तोंडाची वाफ प्रथम दवडीत नाहीं. हें त्याचें मौन मोठें बोलकें आहे. संयम हेंच त्याचें पहिलें शौर्य आहे, व या शौर्यानें त्यानें अप्सरांच्या मोहाला जिंकल्यावर तो आपलें तोंड वृद्ध ब्राह्मणरूपानें आलेल्या इंद्राला तेजस्वी उत्तर देण्यासाठींच उघडतो. त्या उत्तरांत त्याच्या मानीपणाचें व वक्तृत्वाचें सारसर्वस्व सांठविलें आहे. नंतर वराहवधप्रसंगानें त्यानें किरात राजाच्या दूतास दिलेलें उत्तर वाक्चातुर्ययुक्त व सणसणीत असून अखेर किरातांशीं झालेल्या युद्धांत त्याचें शौर्य, धैर्य, साहस, भक्ति इत्यादि गुण प्रकट झाले आहेत. किरातार्जुनीयांतील अर्जुन हा संयमानें व संथपणें घुमसणाऱ्या

निगूढसामर्थ्य अग्नीसारखा वाटतो, तर द्रौपदी त्या अग्नीची ज्वाला भासते. तिची मानी, तेजस्वी पण स्नेहाळ वृत्ति भारवीनें मोठ्या कौशल्यानें चित्रित केली आहे. तिचें वाक्चातुर्य तर अमोघ आहे. भीम हा एक घाव कीं दोन तुकडे करणारा सीधा शिपाईगडी असून धर्मराज "हे शान्तिब्रह्म आहेत. थोडक्यांत, उत्तम स्वभावरेखा सहजपणें चितारण्याचें कौशल्य भारवीनें भीष्म, द्रोण व कर्ण या अतिरथी व महारथी वीरांच्या संक्षिप्त वर्णनांत दाखविलें आहे ( सर्ग ३.१८ ते २१ ). ब्रह्मनिष्ठ व्यासांची राजकारण-प्रवृत्तीहि भारवीनें त्यांना साजेल अशा उंची भूमिकेवरूनच चितारली आहे.

**तरल कल्पना.**

मूळ महाभारतांत नसलेल्या यक्ष व किरातदूत या दोन पात्रांची योजना भारवि करतो. त्याचप्रमाणें 'हा वराह मला मारून दुर्योधनाचें हित साधण्या-साठीं पशुयोनीचा आश्रय करणारा कोणी तरी असावा' ( किं. १३.१० ) हा अर्जुनाचा तर्क, अर्जुनकृत विस्तृत शिवस्तुति व अस्त्रप्राप्तीनंतर अर्जुनाचे स्वाश्रमास तडक परत येणें इत्यादि सर्व गोष्टी शिवपुराणांत ( ३. अध्याय ३७-४२ ) आहेत; त्यांचा उपयोग भारवीनें केला असावा असें वाटतें. तथापि मागें सांगितलेलें भारवीनें आपलें म्हणून प्रतिपादलेलें विशिष्ट मत केवळ त्याचेंच आहे. त्यांत तो कोणाचाच ऋणी नाहीं. भारवीची कल्पनाहि मोठी तरल होती. अर्जुन व किरात यांच्या भीषण धनुष्यांतून सुटलेल्या व वराहाच्या रोखें येणाऱ्या महाभयंकर बाणांचें वर्णन व विशेषतः त्या बाणांनीं विद्ध झालेल्या वराहाचा मृत्यु हे दोन प्रसंग भारवीच्या हुबेहूब प्रसंगचित्रें रेखाटणाऱ्या कुशल कल्पनेची साक्ष देतील ( कि. १३.१६-२१ ). वराहाला मृत्यूपूर्वी येणाऱ्या भोंवडीचें व त्याच्या मरणानंतरच्या तडफडीचें इतकें संक्षिप्त पण वास्तव वर्णन संस्कृत वाङ्मयांत क्वचितच सांपडेल (कि. १३.३०-३१). भारवीची संयोजक कल्पना ( Associative Imagination ) वस्तूंतील साम्य कशी वेधकपणें शोधते व प्रस्तुत भावना कशी तीव्र बनवते यांचीं दोनच उदाहरणें देतों. मोक्षोपदेश करणाऱ्या वृद्ध ब्राह्मणाला आपल्या मनःशल्याचें रहस्य तळमळून सांगत असतां अर्जुन म्हणतो, 'अहो, मरसभेंत आमची भार्या द्रौपदी दुःशासनानें ओढीत आणली तेव्हां ती सभेंतील लोकांना अस्ताभिमुख

सूर्यासमोर उभ्या असलेल्या वृक्षाच्या परत फिरलेल्या छायेसारखी दिसली' या उपमेंत सभेंतील तटस्थ लोकांची उदासीन वृत्ति सूर्यानें, द्रौपदीची पराङ्मुखता परत वळणाऱ्या छायेनें आणि तिला न सोडणाऱ्या दुःशासनाचा हट्ट तरूनें मारवि कसा ध्वनित करीत आहे तें रसिकांनींच पहावें (कि. ११.५१). लगेच तो एका उत्प्रेक्षेनें आपल्यासहित सर्व पांडवांचा नेमळेपणा कसा अचूक वर्णितो तो पहा. त्या वेळीं द्रौपदीच्या नयनांत अश्रू उभे राहिले व तिला जवळ उभे असलेले दुबळे पतीहि दिसतनासे झाले; जणूं काय अश्रू तिला म्हणाले, " द्रौपदी, जे तुझ्या रक्षणासाठीं विवाहवचनांनीं बद्ध झाले पण आतां नेमळेपणामुळें ते नांवाचेच पति राहिले, त्यांच्याकडे पाहून तरी काय उपयोग ? म्हणून आम्हीच तुझी त्यांजकडील दृष्टि बंद करीत आहों " (कि.११.५२).

हिमालयांतील स्थलकमालिनींच्या कमलांत भरून राहिलेले पिंवळसर पराग स्तंभासारखे वावटळीनें उंच उभविले व त्यांतील कांहीं आकाशांत मंडलाकार पिस्कारून राहिले. यांवर भारवीनें एक साम्यकल्पना प्रकट केली आहे. तो म्हणततो, "खालीं पिंवळसर कनकदंड व वर त्यांचेंच बनलेलें मंडळ यांना सोन्याच्या छत्राचें साम्य आलें." या उत्कृष्ट साम्यावरून प्राचीन रसिकांनीं खुष होऊन भारवीस 'छत्रभारवि' अशी पदवी बहाल केली (कि. ४.३९). अशाच साम्यदर्शनामुळें कालिदासाला 'दीपशिखा कालिदास' (रघु.६.३७) व माघास 'घण्टामाघ' (शि.४.२०) असें म्हणतात. असो. सर्वच दृष्टींनीं 'किराता'चे १, २, ११, १३ व १४ हे सर्ग अत्यंत वाचनीय असून त्यांतील ११ वा सर्ग तर अपूर्व आहे.

## कांहीं दोषस्थलें.

'किरातां'मधील बहुतेक दोष महाकाव्यरचनेचीं बंधनें व तत्कालीन पंडित रसिकांची अभिरुचि या दोहोंच्या पोटीं उत्पन्न झाले आहेत. ईशानसंहिता, अग्निपुराण व मामहाचा 'काव्यालंकार' हे ग्रंथ जर भारवीच्या पूर्वीचे मानले (याबद्दल मतभेद आहे) तर त्यांतील महाकाव्यलक्षणें भारवीला बंधनकारक झालीं असावीं. त्यामुळें त्याच्या पहिल्या सर्गातील प्रारंभींचीच खलाची- दुर्योधनाची- निंदा जास्त लांबली व ती निंदा न रहातां स्तुतीच झाली. अर्थात् या स्तुतीचेंहि प्रयोजन आहे. पण त्या

मानानें तिची लांबण आरंभींच कथारसविघातक वाटते. कालिदासाप्रमाणें भारवीचा कटाक्ष कथावस्तु खुलविण्याकडे नसून वर्णनें व चर्चा यांवर जास्त आहे. भारवीच्या कथेची पकड मनावर फारशी बसतच नाहीं. शृंगार किंवा इतर कोमल रस फुलविणें हें भारवीच्या वृत्तींत नाहीं. व प्रस्तुत कथानकाच्या मूळ कंदांतहि ते रस नाहींत. त्यामुळें सर्ग ७ ते १० मधील सर्व शृंगार उसना व लादलेला आहे असें वाटतें. पंधराव्या सर्गांत युद्धवर्णनाचे निमित्तानें भारवीनें कांहीं बंध व शब्दालंकार (उदाहरणार्थ एकाक्षरपाद (५), निरौष्ठ्य (६), समुद्गक (१६), गोमुत्रिकाबंध (१२), सर्वतोभद्र (२५), यमकाचे अनेक प्रकार) साधले आहेत, ते तत्कालीन पंडितांच्या अभिरुचीचे दर्शक व भारवीच्या भाषाप्रभुत्वाचे द्योतक असले तरी क्लिष्ट आहेत. 'स सासिः सासुसूः सासो', 'काकारेभरे का का' व 'चारचुञ्चुश्चिरोरची चञ्चञ्चीरुचा रुचः' असल्या ओळींत काव्य नसून शब्दांची कसरत आहे. शिवाय दुर्योधनराज्यवर्णन, भीम-धर्मांची भाषणें व इतर चर्चास्थळें यांवरहि क्वचित् पांडित्यप्रदर्शनाची अवास्तव छाप पडलेली आहे. भारवीच्या भाषेंत कालिदासाचे मानानें प्रसाद कमी. भारवीवर कालिदासीय कल्पनांची छाप पडली आहे. उदाहरणार्थ शरद्वर्णन, तपोवर्णन, सूर्योदयास्तवर्णन वगैरे (कि. ११·४४ व कु. ५·४४ यांतील कल्पनासाम्य पहा). पण बऱ्याच ठिकाणीं भारवीचीं निसर्गवर्णनें सांकेतिक व कृत्रिम वाटतात.

## अर्थगौरवयुक्त शैली.

तथापि अर्थगौरवानें युक्त अशा एका ओजस्वी संस्कृत भाषाशैलीचा प्रवर्तक म्हणून भारवीची कीर्ति चिरंतन राहील. अर्थगौरव म्हणजे खोल, भारदस्त, गंभीर अर्थ किंवा थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थ व्यक्त करण्याचा गुण. यांपैकीं कोणत्याहि किंवा दोनीहि अर्थांनीं त्याचें 'अर्थगौरव' हें नजरेंत मरण्यासारखें आहे. भारवीनें स्वतःच हा शब्द भीमाच्या वाणीचा गुण म्हणून धर्मांचे तोंडीं घातला आहे (कि.२·२७). अन्तरंगाच्या खोलींतून निघालेले त्याचे विचार तत्त्वज्ञानाची उंची गांठतात व त्यांना योग्य अशा मोजक्या शब्दांनीं व्यक्त होतात. वक्त्याच्या मूळ आशयानुरूप त्याची शब्दयोजना असते हा रीतिसिद्धान्त भारवीला

पटलेला असून त्यानें त्याचा दोनदा स्पष्ट उच्चार केला आहे. 'मीम तेजस्वीपणाचें वचन बोलला याचें कारण त्याचा अभिप्रायच मुळांत तेजस्वीपणाचा होता' ( कि. २·२८ ). 'ब्राह्मणरूपधारी इंद्र क्षमायुक्त शास्त्रप्रमाणसहित व गंभीर वचन बोलला कारण त्याचा आशयच मुळांत तसा होता' (कि. ११·४१). 'Style is the man' हें वचन भारवीस तंतोतंत लागू पडतें व केवळ शैलीवरून त्याचें व्यक्तिमत्व चट्दिशीं ओळखूं येतें. शिवाय आपल्या विशिष्ट गुणयुक्त वाणीची त्याला जाणीव असून तिचा उच्चार त्यानें अनेक वेळां केला आहे. बोलणारा सामान्य वनेचर हेर असो ( सर्ग १ ), किंवा किराताचा दूत (सर्ग १३) असो, कीं शान्तिब्रह्म धर्मराज असो, द्रौपदी असो कीं भीम असो, व अर्जुन असो कीं इंद्र असो प्रत्येकाचें भाषण रेखीव, विचारपरिप्लुत, आदि-मध्य-अन्तानें बंदिस्त व सर्मेतील तयार केलेल्या भाषणासारखें असावयाचें. त्या भाषणाचे गुण भारवीच्या शब्दांतच पुढील ठिकाणी त्यानेंच नमूद केले आहेत ( कि. १·३, २·१, २, २७, २८, ३·१०, ५५, ११·३८–४१, १४·३, ४, ५ व ६ इत्यादि). त्यांत तर्कशुद्धता, विचारांचें वैशद्य (clarity), तडफ, शास्त्रप्रामाण्य, तळमळ, शब्दसौष्ठव, निश्चितपणा, संक्षिप्तपणा किंवा मोजकेपणा, व्यापकता, प्रमाणबद्धता व समयोचितपणा हे गुण आहेत. तेजस्वी विचारांची इतकी भरीव व घोटीव मांडणी जाणिवेनें करणारा दुसरा एकहि संस्कृत कवि नाहीं. हेंच भारवीचें अनन्यसामान्य वैशिष्ट्य होय.

## किरातार्जुनीय-सुभाषितें

(१) हितं मनोहारि च दुर्लभं वचः । १–४

( वनेचर धर्माला म्हणतो—'हेरांनीं राजाला बरें वाईट काय वृत्त असेल तेंच सांगावें. ) हितकारक आणि रुचणारेंहि असें बोलणें सहसा दुर्मिळच.

(२) व्रजन्ति ते मूढधियः पराभवं भवन्ति मायाविषु ये न मायिनः। १.३०

( द्रौपदी धर्माला म्हणते—'तूं कुटिल कौरवांशीं कुटिलपणें वागला नाहींस म्हणून आपलें साम्राज्य फुकट दवडलेंस.') जे कपटाला कपट लढवीत नाहींत ते व्यवहारशून्य पढतमूर्ख नेहमीं पराभूतच होतात.

(३) अमर्षशून्येन जनस्य जन्तुना न जातहार्देन न विद्विषादरः। १.३३

( द्रौपदी पुढें म्हणते—'ज्याचा क्रोध हटकून परिणामकारक होतो अशा निग्रह व अनुग्रह करणाऱ्या तेजस्वी माणसालाच लोक आपण होऊन वश होतात.') पण ज्याला चीडच नाहीं असा मेणचट व नेभळा प्राणी आपला मित्र झाला काय किंवा शत्रु झाला काय त्या दोहोंचीहि लोकांना पर्वा नसते.

(४) व्रजन्ति शत्रूनवधूय निःस्पृहाः शमेन सिद्धिं मुनयो न भूभृतः। १.४२

( द्रौपदी पुढें म्हणते—'धर्मा, तुझी ही शान्ति, क्षमा व तितिक्षा टाकून देऊन राजाला शोभेल असें तेज पुन्हा धारण कर–') क्षमा-शान्तीच्या मार्गानें लोकांस वश करून मोक्ष मिळविणें हें निःस्पृह व निर्मम अशा ऋषिमुनींचें काम. पण राजे लोकांनीं मात्र तेजस्वीपणानेंच शत्रूंना जिंकून राज्यें कमावलीं पाहिजेत.

(५) निवसन्ति पराक्रमाश्रया न विषादेन समं समृद्धयः। २.१५

( भीम धर्मराजाला म्हणतो— 'निरुत्साह होऊन स्वस्थ बसणें आतां पुरें झालें.) राज्यवैभव पराक्रमाच्या आधारानें राहतें. औदासिन्याच्या आश्रयानें तें टिकत नाहीं.'

(६) प्रकृतिः खलु सा महीयसः सहते नान्यसमुन्नतिं यया। २.२१

( भीम धर्माला पुढें म्हणतो–) वरचढ झालेल्याचा उत्कर्ष खपूं नये हा मुळीं तेजस्वी लोकांचा स्वभावच आहे. (तेथें इतर फलाची अपेक्षाच नसते.)

(७) प्रकर्षतन्त्रा हि रणे जयश्रीः। ३.१७

( व्यास धर्माला सांगतात–) रणांगणावर जय मिळणें ही गोष्ट निव्वळ अधिक शस्त्रबल व माणूसबळ यांवरच अवलंबून आहे.

**(८) स क्षत्रियस्त्राणसहः सतां यस्तत्कार्मुकं कर्मसु यस्य शक्तिः । ३.४८**

(तपस्येसाठीं जात असलेल्या अर्जुनाला निरोप देतांना द्रौपदी म्हणते–) जो सज्जनांचें रक्षण करूं शकतो तोच क्षत्रिय, व ज्यामध्यें हें क्षात्रियकृत रक्षणकर्म घडवून आणण्याची योग्यता असते तेंच कार्मुक (धनुष्य.) (तसें नसेल तर तो क्षत्रिय व तें कार्मुक हीं नुसतीं नामधारी आहेत असें समजावें.)

**(९) रम्याणां विकृतिरपि श्रियं तनोति । ७.५**

स्वभावसुंदर वस्तूंमध्यें विकृति जरी झाली तरी तिच्यामुळेंहि त्यांचें सौंदर्य खुलूनच दिसतें.

**(१०) वसन्ति हि प्रेम्णि गुणा न वस्तुनि । ८.३७**

निर्गुण वस्तूसुद्धां प्रेमामुळें गुणवान् दिसूं लागते व द्वेषामुळें गुणवान् वस्तु सदोष दिसते. यावरून गुण प्रेमांत ( subjective ) आहेत, वस्तूंत ( objective ) नाहींत.

**(११) सुलभा रूपयता लोके दुर्लभं हि गुणार्जनम् । ११.११**

( ब्राह्मणवेषधारी इंद्र अर्जुनाला म्हणतो—'तुझ्या शरीरसौंदर्याला श्रेष्ठ गुणांची जोड मिळाली आहे हें फारच चांगलें आहे.') जगांत गोरेगोमटेपणा पुष्कळ ठिकाणीं आढळतो पण गुणवत्ता त्या मानानें कमीच. ( शरीरसौंदर्य नैसर्गिक असल्यानें सुलभ पण गुणसौंदर्य मात्र प्रयत्नसाध्य असल्यानें दुर्लभ आहे.)

**(१२) शक्तिवैकल्यनम्रस्य निःसारत्वाल्लघीयसः ।**
**जन्मिनो मानहीनस्य तृणस्य च समा गतिः । ११.५९**

( ब्राह्मणवेषधारी इंद्र अर्जुनाला मोक्षोपदेश करीत असतां क्षत्रियाच्या मानाचें वर्णन करून अर्जुन त्याला उत्तर देतो––'अपमानाची चीड हा विकार अन्तःशत्रु असल्यानें तो टाकावा असें तुम्ही म्हणतां. पण मला तरी असें वाटतें कीं– ) अंगांत ताकद नाहीं म्हणून नम्र व वैभव नाहीं म्हणून लीन झालेला मानहीन मनुष्य व दुबळें आणि खुरटलेलें गवत हीं दोन्हीहि सारखींच आहेत.'

**(१३) सहापकृष्टैर्महतां न संगतं भवन्ति गोमायुसखा न दन्तिनः । १४.२२**

( अर्जुन किरातदूताला म्हणतो-- 'कसलें आलें आहे तुमच्यासारख्या क्षुद्रांशीं सख्य ?) मोठ्या लोकाचें हलक्यांशीं सख्य होणें अशक्य आहे. हत्ती कोल्ह्यांची मैत्री करीत नाहींत.'

**(१४) महोदयानामपि संघवृत्तितां सहायसाध्याः प्रदिशन्ति सिद्धयः।**
१४.४४

( प्रबल अशा शंकराच्या गणांनीं सुद्धां एकजूट करून अर्जुनावर हल्ला केला.) सर्वांच्या साहाय्यानें ( एकजुटीनें ) मिळणारा जय असें सुचवितो कीं मोठ्यांनीं सुद्धां संघ-वृत्तीनेंच चालावें.

**(१५) प्रत्याहतौजाः कृतसत्त्वचेगः पराक्रमं ज्यायसि यस्तनोति ।**
**तेजांसि भानोरिव निष्पतन्ति यशांसि वीर्यज्वलितानि तस्य ।**
१७.१५

आपल्यापेक्षां वरचढ शत्रूंशीं लढत असतां प्रथम आपली ताकद थोडी खचली असूनहि जो हिम्मतवान् वीर दुप्पट जोरानें वरचढ शत्रूंवर उसळून उठतो त्याच्याच पराक्रमशालितेची कीर्ति सूर्यकिरणांप्रमाणें चोंहीकडे पसरते.

**(१६) दृष्टावदानाद् व्यथतेऽरिलोकः प्रध्वंसमेति व्यथिताच्च चेतः ।**
**तेजोविहीनं विजहाति दर्पः शान्तार्चिषं दीपमिव प्रकाशः ।**
१७.१६

त्याचें तें अद्‌भुत साहस पाहून शत्रूच्या उरांत धडकी भरते. शत्रू एकदां कचरला कीं त्याचें आक्रमणसामर्थ्य कमी होतें. सामर्थ्य कमी झालें कीं रणमद उतरला. आणि रणमद उतरलेला वीर ज्योत विझलेल्या दिव्यासारखा निस्तेज होतो. अशा रीतीनें त्या एकट्या हिंमतवानाला जय मिळतो. आणि केवळ आपल्या उग्र गंधानें गंधराज जसा हत्तीच्या कळपाला उधळून लावतो तसा हा एकटा वीर आपल्या कडव्या वृत्तीनें पुष्कळ शत्रूंची दाणादाण करून टाकतो.

**(१७) गुणसंहतेः समतिरिक्तमहो निजमेव सत्त्वमुपकारि सताम् ।**
१८.१४

(अर्जुनाच्या तपस्येपेक्षां त्याचें अलोट धैर्यच शंकराला अधिक आवडलें.) तप, सेवा, नम्रता इत्यादि ( मृदु ) गुणांपेक्षां पुरुषाच्या अंगचें तेजच ( हिम्मत ) मोठ्या लोकांना अत्यंत श्रेयस्कर वाटतें.

# ४

# माघाचें 'शिशुपालवध'

## कविपरिचय

### कवि सर्वाधिकाऱ्याचा नातू.

कालिदासभारवीनंतरचा महाकवि माघ. कालदृष्ट्या नंतरचा असला तरी गुणदृष्ट्या तो त्यांच्याहूनहि श्रेष्ठ आहे असें त्याच्यावर जादा खुष असणाऱ्या कांहीं पंडितांचें मत आहे. त्याचा विचार योग्य स्थलीं येईलच. पण उज्ज्वल कल्पना, दांडगें भाषाप्रभुत्व, जाडी विद्वत्ता, वृत्तालंकारयोजनेंतील अमर्याद हौस व विष्णुभक्ति यांमुळें त्याचे 'शिशुपालवध' सर्वश्रेष्ठ नसलें तरी महाकाव्य म्हणून आदरणीय वाटण्याजोगें आहे यांत संशय नाहीं. त्राटक कां होईना पण स्वदस्तुराची आपली माहिती माघानें आपल्या काव्याच्या शेवटीं 'कविवंशवर्णना'त दिली आहे. या पांच श्लोकांवरील मल्लिनाथटीका उपलब्ध नाहीं. वल्लभदेवकृत मात्र आहे. तथापि हा कविवृत्तान्त खरा धरून चालण्याशिवाय गत्यन्तर नाहीं. तो असा आहेः—

"श्रीवर्मल नांवाच्या राजाचा सुप्रभदेव म्हणून सर्वाधिकारी होता. त्याचा पुत्र दत्तक. हे दोघेहि पितापुत्र परोपकारी, उदार आणि सत्त्वशील होते. दत्तकाच्या परोपकारी वृत्तीमुळें त्याचें 'सर्वाश्रयदत्त' असें नांव पडलें होतें. या दत्तकाचा पुत्र माघ. यानें 'शिशुपालवध' काव्य रचिलें." या त्रोटक उल्लेखाला ऐतिहासिक पुराव्याचा पाठिंबा पुढीलप्रमाणें अंदाजानें देतां येतो. वर्मलात नांवाच्या एका राजाचा एक शिलालेख उपलब्ध असून तो इ. स. ६२५ चा आहे. माघाचा आजोबा सुप्रभदेव याच राजाच्या

पदरीं असेल तर माघाचा काल सातव्या शतकाचा उत्तरार्ध मानण्यास हरकत नाहीं. माघानें शिशु. २.११२ या श्लोकांत 'काशिकावृत्ति' व 'न्यास'कार यांचा सूचित उल्लेख केला आहे (अनुत्सूत्रपदन्यासा सद्वृत्तिः सन्निबंधना।) 'काशिकावृत्ति' हा व्याकरणावरील ग्रंथ जयादित्य आणि वामन या दोघांनीं लिहिला असून (इ. स. ६५० ६०) त्यावरील 'न्यास' नांवाची टीका जिनेंद्रबुद्धीनें लिहिली आहे. न्यासकार जिनेंद्र-बुद्धीचा काल सुमारें इ. स. ७०० आहे. त्यावरून माघ हा त्याच्या नंतरचा किंवा त्याचा समकालीन असावा असें ठरतें.

## महाकाव्यांतील गिरनार.

श्रीवर्मल किंवा वर्मलात या राजाची राजधानी गुजराथेंतील श्रीमाल नांवाचें नगर आहे. यावरून तो गुर्जरदेशीय पंडित दिसतो. 'भोजप्रबंधां'तहि त्याचा 'गुर्जरदेशांतून आलेला' असाच उल्लेख आहे. त्याचप्रमाणें 'शिशुपालवध' सर्ग ३ मध्यें असलेल्या द्वारकेसंनिधच्या समुद्रवर्णनाला व सर्ग ४ मध्यें असलेल्या 'रैवतक' पर्वतवर्णनाला माघाचें प्रत्यक्ष समुद्रज्ञान व 'गिरनार' पर्वताचें प्रत्यक्ष अवलोकन आधारभूत असावें असें वाटतें. माघाच्या काव्याची प्रसिद्धि फार मोठी असून अनेक दार्शनिक व साहित्यशास्त्रविषयक ग्रंथांतून 'शिशुपालवधां'तील उदाहरणें घेत-लेलीं आढळतात. सोमदेव, राजशेखर, आनंदवर्धन (९ वें शतक), भोज इत्यादिकांनीं माघकाव्याचे उल्लेख केले आहेत. माघ हा विष्णुभक्त असावासें वाटतें. व्याकरण, दण्डनीति, न्याय, वेदान्त, साहित्य (२.८७) इत्यादि शास्त्रांचा याचा अभ्यास चांगला होता. तसेंच स्वतः बुद्ध व बौद्धधर्म यांविषयीं त्याला आदर होता असें त्याच्या उपमांवरून दिसतें (२.२८, १५.५८).

माघ जसा मोठा वैयाकरण तसाच शब्दकोशज्ञहि होता. त्याच्याजवळ असणाऱ्या शब्दांचा व शब्दपर्यायांचा भरणा इतका मोठा होता कीं 'नवसर्गगते माघे नवः शब्दो न विद्यते' म्हणजे माघाच्या नऊ सर्गांत सर्व शब्दसंपदा येऊन गेल्यानें त्यांच्या अभ्यासकास नवीन किंवा अपरि-चित शब्दच उरत नाहीं अशी एक प्रायोवादात्मक अतिशयोक्ति पंडितां-मध्यें रूढ आहे.

माघाच्या काव्यावर त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या कालिदास, भट्टी व कुमारदास या कवींच्यापेक्षां भारवीचाच जास्त परिणाम झालेला दिसतो. इतकेंच नव्हे तर भारवीच्या सर्गोबरहुकूम आपल्याहि सर्गोची मांडणी करून व तेच विषय घेऊन त्यानिं भारवीशीं स्पर्धाहि केली असावीसें दिसतें.

**राजाचाहि पाहुणा नाराज.**

वरील त्रोटक माहितीनंतर माघाबद्दलच्या दंतकथांकडे वळावयाचें. पण माघ हा धारेच्या भोजराजाचा (११ वें शतक) समकालीन होता या समजानें 'प्रबंधचिन्तामणि', 'भोजप्रबंध' व 'प्रभावकचरित' इत्यादि ग्रंथांत दिलेल्या माघाच्या आख्यायिका विश्वसनीय नाहींत हें उघड आहे. कारण माघाचा उल्लेख आनंदवर्धन ( इ. स. ८४०-८७० ), राजशेखर ( दहावें शतक पूर्वार्ध ) इत्यादि भोजपूर्व लेखक करतात. तथापि माघाची इतर माहिती व त्याचे चरित्र्यादि कर्णपरंपरेनें आलेले गुण वाचकांस कळावे या दृष्टीनें पुढील आख्यायिका देत आहों. जैनमेरुतुङ्गाचार्य (इ.स.१३०४) याच्या 'प्रबंधचिन्तामणी'मध्यें पुढील आख्यायिका दिलेली आहे:— भोजराजानें माघ पंडिताची विद्वत्ता व पाविन्य यांची कीर्ति फार दिवसांपासून ऐकिली होती. म्हणून असा पुण्यवान् पुरुष एकदा पहावा या हेतूनें माघाला त्यानें आपल्या अधिकाऱ्याकरवीं श्रीमाल नगराहून धारेस मोठ्या बहुमानानें आणविलें. ते दिवस हिंवाळ्याचे होते. भोजानें आपल्या इतमामाला साजेल असें त्याचें आदरातिथ्य केलें. भोजन, आसन शयन, इत्यादि पाहुणचारांत काडीचेंहि उणें पडूं नये म्हणून तिकडे जातीनें लक्ष दिलें. थंडीचे दिवस असल्यानें शीतनिवारणाची सर्व तरतूद केली. राजाला वाटलें, पंडिताची स्वारी या आदरातिथ्यानें खूष होऊन जाईल. पण काय आश्चर्य ! राजा प्रातःकालीं जागा होतो न होतो तों माघाची हिरमुसलेली स्वारी 'मला घरीं जाण्याचा निरोप द्यावा' म्हणून उशाशीं उभी. 'आपल्या पाहुणचारांत तरी काहीं कमिजास्त झालें नाहीं ना ?' असें भोजानें विचारतांच माघ म्हणाला, 'अन्न बरेंवाईट कसें कां असेना पण थंडीनें मात्र मी रात्रभर काकडून गेलों.' हें ऐकून राजा श्रमी झाला व त्यानें माघाची स्वगृहीं रवानगी केली. जातांना माघ भोजाला म्हणाला,

'माझ्या घरीं एकदा पायधूळ झाडण्याची कृपा करून गरीबाची मीठभाकरी स्वीकारावी.'

**राजाचा पाहुणचार करणारा कवि !**

आपल्यासारख्या राजाच्या प्रासादांतील पाहुणचाराला नाकें मुरडणाऱ्या या पंडिताच्चें वैभव आहे तरी कसलें तें एकदा पहावें या इच्छेनें भोज श्रीमालनगराला माघाच्या घरीं गेला. तों माघाची श्रीमंती आणि तिला साजेल अशी राजोपचाराची सामग्री काय वर्णावी ! राजाचें सैन्य सहज मावेल एवढें विस्तीर्ण व उत्तुंग मंदिर, सोन्याच्या आणि माचूंच्या फरसबंद्या, नोकरचाकर, विविध पक्कान्नें, मंज्या, फळें, चंद्रशालेवर बिछायती, रोषणाई—कांहीं विचारूं नये. सर्व सुखें हात जोडून उभीं. तेहि दिवस कडक थंडीचेच होते. पण माघानें राजास असे उष्णोपचार करविले कीं त्याला ते दिवस उन्हाळ्याचे वाटूं लागले. आश्चर्यचकित झालेला भोज माघाच्या आग्रहावरून बरेच दिवस त्याचा बादशाही थाटाचा पाहुणचार घेऊन स्वनगराला गेला.

**धनदौलतींतून दारिद्र्यांत.**

माघाच्या बाळपणीं एका ज्योतिषानें त्याच्याबद्दल असें भविष्य वर्तविले होतें कीं 'हा मुलगा आपल्या आयुष्याचा बराच भाग वैभवात आणि अतिसमृद्धीमध्यें घालवील. पण शेवटीं तें वैभव नष्ट होऊन त्याला विपन्नावस्था येईल व पायाला सूज येऊन त्यांतच त्याचा अंत होईल.' ग्रहांना संतुष्ट करण्यासाठीं माघाच्या बापानें पुष्कळ दानें दिलीं. जप, शान्ति इत्यादिकांत अमूप पैका खर्चिला व त्यामुळें आतां आपल्या पुत्राची विपत्ति खास टळली अशा समाधानांतच तो निवर्तला. पुढें माघाचें शिक्षण झालें. नंतर त्यानें 'शिशुपालवध' नांवाचें काव्य लिहून विद्वज्जनांना आश्चर्यचकित करून टाकिलें. त्यानें वैभवाचे दिवस स्वतः उपभोगिले व याचकांनाहि दानांनीं संतोषविलें. पण भविष्य हें अटळच होतें. अखेर त्याला अठरा विश्वे दारिद्र्यानें गांठलें. आपल्या माणसांत तोंड दाखविण्याची त्याला लाज वाटूं लागली. म्हणून तो पत्नीस घेऊन धारानगरीस गेला. एके दिवशीं त्यानें आपल्या भार्येजवळ आपल्या 'शिशुपालवध' काव्याची पोथी दिली व तिला म्हणाला, " ही भोजराजास अर्पण कर व तो जें द्रव्य देईल तें

घेऊन ये.'' त्याप्रमाणें ती राजसभेंत गेली. राजानें त्या पोथींत कोठेंतरी एक शलाका घालून हातीं आलें तें पान उघडलें व पहातो तों त्यावर एक श्लोक निघाला. तें उषःकालचें वर्णन होतें. कवीश्वरानें त्यांत म्हटलें होतें, "आतां चंद्रविकासी कुमुदें मावळलीं आणि सूर्यविकासी कमळांना तजेला चढला. उलूक पक्षी हिरमुसला पण तिकडे चक्रवाक आनंदला. चंद्रमा इकडे अस्ताला गेला तर तिकडे सहस्रकराचा उदय झाला. काय पहा ! विधिविलसिताची करणी किती विचित्र असते ती ! '' (शिशु. ११.६४). हा श्लोक पाहून राजाला पराकाष्ठेचा आह्लाद झाला. (त्या श्लोकांत माघानें आपल्या पडत्या काळाचा जो सूक्ष्म ध्वनि गोवून दिला आहे तो राजाला उमगला असावा.) तो गंहिवरून उद्गारला, '' या सबंध काव्यग्रंथाची गोष्ट तर राहोच. पण या एका श्लोकाचें मूल्य ही सर्व वसुंधरा आहे ! या ठिकाणीं ' ही ' हें सखेद आश्चर्य दर्शविणारें अव्यय इतकें चपखल बसलें आहे कीं केवळ या एका अव्ययाच्या जडणीसाठीं मी पारितोषिक म्हणून कवीला एक लक्ष द्रव्य देतों. ''

**दरिद्री दात्याचा उदात्त अंत.**

माघभार्या तें द्रव्य घेऊन घरीं येत असतां वाटेंत (पूर्वीच्या) याचकांनीं तिजजवळ माघाच्या दातृत्वाची प्रशंसा करून द्रव्य मागितलें. तिच्यानें नाहीं म्हणवेना. तिनें तें सर्व द्रव्य त्यांना दिलें व आपण गेली तशी घरीं परत आली. तिनें माघाला घडलेला वृत्तान्त सांगितला. त्यालाहि मार्येच्या उदारतेचें कौतुक वाटलें. भार्या पहाते तों माघाच्या पायांला सूज आलेली ! इतक्यांत दुसरा एक याचक दारीं आला. त्याला द्यावयाला कांहीं घरांत आहे काय असें माघानें विचारतांच डोळ्यांतील अश्रूनींच तिनें 'नाहीं' असें मूक उत्तर दिलें. तें पाहून माघानें धरणीवर देह टाकला व क्षणार्धांत त्याचें प्राणोत्क्रमण झालें. सकाळीं हा वृत्तान्त भोजाला समजतांच तो म्हणाला, '' श्रीमाल नगरांत राहणारे येवढाले धनिक माघाचे प्रत्यक्ष आप्त असतां भुकेनें अशा नररत्नाला मरण यावें यापेक्षां शरमेची दुसरी गोष्ट कोणती ? येथें सुसंस्कृत लोक राहत नसून क्रूर भिल्ल राहतात असें समजून श्रीमालाला मी 'भिल्लमाल' हें नांव आजपासून

देतों ! " 'मिल्लमाल' नांवाचा हा गांव गुजराथ व मारवाड या प्रांतांच्या सरहद्दीवर आजहि या करुण कथेची साक्ष देत उभा आहे.

## माघ ब्राह्मण का वैश्य ?

'भोजप्रबंधां'त वरील कथेचा केवळ उत्तरार्धच आहे. माघ हा सुप्रभदेवा-सारख्या राजाधिकाऱ्याचा नातू असतांना त्याला दारिद्र्य कां यावें या गोष्टीचा उलगडा भोजप्रबंधांतील कथेवरून होत नाहीं. तो प्रबंधचिंतामणी-वरून होतो. म्हणून तीच गोष्ट येथें सविस्तर दिली. 'भोजप्रबंधां'तील कथेचा शेवट थोडा निराळा आहे. माघ निवर्तल्यावर भोजानेंच त्याची उत्तरक्रिया पुत्रवत् केली. माघाची पत्नी सती गेली. या दुःखानें राजा भोज बहुत श्रमी झाला. श्रीप्रभाचंद्राच्या 'प्रभावकचरिता'च्या चवदाव्या शृंगांत ( इ. स. १२७७ ) माघाबद्दल पुढील वृत्तान्त आढळतो.

" सुप्रभदेवाला मुलगे दोन. एक दत्तक व दुसरा शुभंकर. दत्त व शुभंकर हे दोघेहि अत्यंत उदार होते. त्यामुळें ते लोकांना फारच प्रिय असत. दत्तकाचा पुत्र माघ हा श्रीभोजराजाचा बालमित्र होता. माघ हा अत्यन्त उत्तम आणि कोणत्याहि कठोर कसोटीला उतरणाऱ्या शीलाचा गृहस्थ होता. तो सरस्वती देवीचा रथ आणि या युगांतील सारसर्वस्व होता. श्रीमाघाच्या काव्यगंगेंतील तुषारांनीं चित्ताचें जाड्य नाहींसें होतें. तो अत्यन्त शुद्ध बुद्धीचा कवि असल्यानें तो सर्वांना वंद्य होता. श्रीमाल हें त्याचें गांव फारच मातबर. तेथें सर्व श्रीमंतांची वस्ती. अगदीं गजान्त-लक्ष्मी तेथें वसत होती. जैनांचींहि कांहीं देवळें तेथें होतीं. शुभंकर हा 'श्रेष्ठी' होता." या हकीगतींत शुभंकर हा माघाचा चुलता होता व तो श्रेष्ठी होता. ही माहिती नवीन आहे. 'काव्यप्रकाशा'चा एक टीकाकार भीमसेनहि माघ वैश्य असल्याचें सांगतो, आणि असा तर्क काढतो कीं त्यानें दुसऱ्या कोणी ब्राह्मण पंडितानें रचलेलें काव्य त्यास पैसे देऊन विकत घेतलें व स्वकृत माघकाव्य म्हणून प्रसिद्धीस आणलें ! अर्थात् हा एक तर्क आहे. यांत सत्य किती तें ठरविणें कठीण. ब्राह्मण हा श्रेष्ठी असूं शकतो, व माघ हा वैश्य ठरला तरी वैश्यानें महाकाव्य रचलें असेल तर त्यांत बिघडलें काय !

## विनय का वस्तुस्थिति ?

वरील दन्तकथांवरून माघाचें शील, चारित्र्य, कुलपरंपरागत औदार्य इत्यादि गोष्टी कळल्या व०त्याची कवित्वप्रसिद्धीहि ध्यानीं आली. पण त्याच्या खऱ्या व्यक्तिमत्वाचा तलास त्याच्या काव्यावरूनच लावला पाहिजे. वल्लभदेव आपल्या सुभाषितावलीमध्यें 'शीलं शैलतटात्पततु' व 'नारी-नितम्बफलके' हे दोन श्लोक व क्षेमेन्द्र आपल्या 'औचित्यविचारचर्चे'त 'बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते' हें प्रसिद्ध वचन माघाचें म्हणून देतात. यावरून माघानें "शिशुपालवधा'व्यतिरिक्त इतरहि कांहीं काव्यें लिहिलीं असावीं असें अनुमान निघतें. पण तीं काव्यें कोठेंच उपलब्ध नसल्यानें तें अनुमानच ठरतें. त्यामुळें या बाबतींत 'शिशुपाला'वरच भर दिला पाहिजे. आर्ष काव्यांचा मूळ आधार घेऊन त्यांवर आपली काव्यरचना करतांना जसा कालिदास व भारवि यांचा कांहीं विशिष्ट उदात्त उद्देश होता व तो उद्देश त्यांनीं ज्या विशिष्ट कलात्मकतेनें मांडला, तसलें हेतूचें व कलेचें खास वैशिष्ट्य माघांत प्रतीत होत नाहीं. कालिदास, भट्टी, कुमारदास, भारवि इत्यादि पूर्वसूरींच्या रचनाविशेषांचें अनुकरण करून त्या त्या क्षेत्रांत त्यांच्याहि वरताण करावी ही एकच प्रबल महत्त्वाकांक्षा त्याच्या काव्यरचनेला प्रेरक झालेली दिसते. त्यानेंच आपल्या काव्याचे शेवटीं 'सुकविकीर्तिदुराशया अदः काव्यं व्यधत्त' म्हणजे मोठाल्या कवींची कीर्ति आपल्याला मिळावी या दुराभिलाषानें हें काव्य रचलें असे जे नम्र-पणाचे उद्गार काढले आहेत ते वस्तुस्थितिनिदर्शक आहेतसें वाटतें !

## उथळ शर्यतीपद्धतीची टीका.

अव्वल दर्जाच्या काव्यानिर्मितीला नुसती कोरडी अनुकरणेच्छा, स्पर्धा किंवा पोकळ कलाविषयक हौस येवढींच बाह्य कारणें पुरेशीं होत नाहींत. खुद्द आपल्याला स्वतंत्रपणें झालेलें एखादें जीवनांतील उदात्त कलात्मक दर्शनच जेव्हां कवि शब्दद्वारा तन्मयतेनें मांडूं लागतो तेव्हांच त्याच्या भाषेला खास पारदर्शकता येऊन तिच्यांत कवीच्या व्यक्तिमत्वाचें स्वच्छ प्रतिबिंब पडतें. असलें दर्शनात्मक व व्यक्तिमत्वदर्शक काव्यच श्रेष्ठ काव्य होय. माघाला असें कांहीं स्वतंत्र दर्शन घडल्याचें दिसत नसल्यानें त्याचें असें वेगळें

व्यक्तिमत्त्व त्याच्या काव्यांत कोठेंच आढळत नाहीं. त्याच्या काव्यगुणांनीं वाचकाचे डोळे दिपतात पण हृदय मात्र हलत नाहीं. 'शिशुपालवधां'तील नायक श्रीकृष्ण आहे. त्याच्या रूपानें महाविष्णूचें संकीर्तन करून आपली भक्ति प्रकट करावी हाहि एक माघाचा हेतु दिसतो. (लक्ष्मीपते-श्चरितकीर्तनमात्रचारु). पण ह्या भक्तितही पुरेशी उत्कटता नसल्यानें तिचाहि ठसा वाचकाच्या मनावर जोरदारपणें उमटत नाहीं. तथापि केवळ काव्याच्या बाह्यांगांतील शब्दार्थालंकार, वृत्तें व बंध आणि कल्पनेच्या भराऱ्या व पांडित्यप्रदर्शन यांबाबत आपल्या मनांतच कवीकवींमध्यें शर्यती लावीत बसण्याची ज्यांना आवड आहे अशा कांहीं जुन्या पांडित-प्रकाण्डांनी माघाची स्पर्धाबुद्धि पाहून व त्याचे वरील भपकेबाज काव्यगुण जमेस धरून 'माघानें शर्यत जिंकली रे जिंकली' अशी आरोळी हर्षानें ठोकलेली दिसते. त्यामुळेंच 'भारवी माघापुढें निस्तेज दिसतो', 'कालीदास, भारवि व दण्डि या कवींचें उपमाचातुर्य, अर्थगौरव व पदलालित्य हे गुण एकट्या माघांत आहेत' इत्यादि उद्गार पंडितवर्गांत रूढ झाले आहेत. पण ही शर्यती व कोटिबाज टीकापद्धति उथळ असल्यानें तिलाच प्रमाण मानून चालणें सर्वथा निर्णायक होणार नाहीं. असो. वाचकांनीं प्रथम त्याच्या काव्यकृतीच्या प्रत्यक्ष परिशीलनानेंच आपलें मत बनविण्याच्या मार्गास लागावें हें बरें.

## शिशुपालवध–कथासार[1]

### आकाशांतून खालीं उतरणारें अद्भुत तेज !

एके दिवशीं द्वारका नगरींतील लोक, आश्चर्यानें थक्क होऊन, आकाशाकडे पहात उभे होते. कारण अंबरांतून द्वारकेवर उतरणारें एक अद्भुत

---

१ चेदि देशाचा राजा शिशुपाल हा दुष्ट, जुलमी व प्रजापीडक होता. त्याचें व श्रीकृष्णाचें वैर होतें. धर्मराजाच्या राजसूययज्ञाच्या वेळीं धर्मानें श्रीकृष्णाची अग्रपूजा केली. हें शिशुपालास सहन झालें नाहीं. त्यानें श्रीकृष्ण, भीष्म व पांडव यांची अत्यंत निंदा केली व सर्वांना युद्धास आह्वान दिलें. शिशुपालाचे शंभर अपराध

तेज त्यांना त्या दिवशीं दिसत होतें. पण तें तेज नेमकें काय व कोणाचें याचा त्यांना निश्चयच करतां येईनासा झाला होता. कोणी म्हणे, 'हा सूर्य असावा' तर कोणी तर्क करी, 'हा अग्नि असला पाहिजे.' पण सूर्याचें तेज केव्हांहि झालें तरी घुमटाकार आकाशाच्या वर्तुल मार्गानें तिरपें खालीं येणार. व अग्नीच्या ज्वाला तर नेहमीं वरच उफाळतात. खालीं नाहींत येत. पण हें तेज तर वरखालीं, मागेंपुढें सर्वच बाजूला पसरलें होतें. तेव्हां तें तेज कोणाचें असावें याचा निश्चय कोणासच होईना व सर्व संभ्रान्त झाले. भगवान् श्रीकृष्णहि आपल्या वाड्यांतून हें तेज न्याहाळीत होताच. प्रथम प्रकाशाचा एक लोळ, नंतर शरीरधारी कोणी एक अस्पष्ट व्यक्ति, त्याउपर कोणी एक पुरुष व शेवटीं नारदमुनि या क्रमानें त्या खालीं खालीं येणाऱ्या तेजाचें ज्ञान श्रीकृष्णाला झालें व 'हे महर्षि नारद आपल्याकडेच स्वर्गातून येत आहेत' असा निश्चय त्यानें केला.

आकाशांतून द्वारकेंत उतरणाऱ्या नारदांच्या मस्तकावर पिंगट रंगाच्या जटा, खांद्यावर शुभ्र यज्ञोपवीत व मनोहर हरिणाजिन आणि गळ्यांत शुभ्र स्फटिकमाला, व गोड निनाद करणारी 'महती' नांवाची वीणा शोभत होती. आपल्या मागून येणाऱ्या अंबरचारी देवांना निरोप देऊन देवर्षि नारदांनीं आपलीं पावलें द्वारकेंत निवास करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाकडे वळवलीं होतीं. आपल्या प्रासादासमोरील भूमीवर नारदऋषींचे पाय लागतांक्षणींच श्रीकृष्ण आपल्या सिंहासनावरून ताडकन् उठला व त्यानें नारदांचें स्वागत करून त्यांची पूजा केली व त्यांस आसनावर बसविलें. नारद आपण होऊन आपल्याकडे आलेले पाहून श्रीकृष्णाला पराकाष्ठेचा आनंद झाला. तो आनंद त्रैलोक्य आपल्या उदरांत धारण करणाऱ्या कृष्णाच्या पोटांत मावेना. तो नारदांस उद्देशून म्हणाला, "आपल्यासारख्यांचें एखाद्या प्राण्याला झालेलें दर्शन त्याची वर्तमान, भूत व भविष्य या तीनहि

---

भरले हें जाणून श्रीकृष्णानें सुदर्शनचक्रानें त्यास ठार केलें. ही शिशुपालाच्या वधाची कथा ज्यांत आहे तें 'शिशुपालवध' काव्य. काल सातव्या शतकाचा उत्तरार्ध. सर्ग २० ( पूर्ण ). श्लोकसंख्या १६४५. सर्ग १५ मध्यें प्रक्षिप्त श्लोक ३४ व कविवंशवर्णनपर ५ मिळून १६८४.

काळीं असलेली पवित्रता व्यक्त करतें. वर्तमानकाळांत आपलें दर्शन त्याचें पाप हरण करणारें असतें, त्याच्या भविष्यकालीन कल्याणाचें तें सूचक कारण असतें व भूतकालीन शुभकर्माचा तो परिपाक असतो. आपल्या आगमनानेंच मी धन्य झालों आहें. तथापि आपल्या तोंडचे कांहीं शब्द ऐकावे याच हेतूनें आपल्याला मी आपल्या येण्याचें कारण विचारीत आहें. वास्तविक मजकडून आपल्याला कशाची अपेक्षा असणार ?"

**एकाच नटाच्या तीन भूमिका !**

यावर नारदमुनि म्हणाले, " छे ! छे ! असें कसें म्हणतोस ? तुझें दर्शन हें महायोग्यांचेसुद्धां कांक्षित असतेंच. म्हणून तुझें दर्शन हें माझेंहि तुजकडे येण्याचें कारण आहेच. तथापि आज जो मुद्दाम मी तुजकडे आलों आहें तो इंद्रलोकांतून महेंद्राचा एक निरोप घेऊनच. तो निरोप काय आहे तो ऐक:—

"फार पूर्वी हिरण्यकशिपु नांवाचा एक अत्यंत पराक्रमी, स्वर्गाचेंहि ऐश्वर्य हिरावून नेणारा आणि निर्भय असा दैत्य होऊन गेला. त्यानेंच सर्व सुखी देवांच्या उरांत भीतीचा पहिला प्रवेश करविला होता. दिक्पाल त्याचे दास बनले होते. या अत्यंत बलाढ्य राक्षसाचा वध तूं नृसिंह अवतार धारण करून केलास. पुढें हाच हिरण्यकशिपु रावणाच्या रूपानें पुन्हां अवतरला. शंकराच्या प्रसादामुळें यानें त्रैलोक्याचें अधिराज्य संपादन केलें व अमरावतीवर हल्ला कर, नंदनवनाची नासाधूस कर, रत्नेंच चोर, सुरस्त्रिया पळव, असें त्यानें देवांस सतावून सोडलें. महेंद्र तर त्याच्या भयानें गुहेंत दडूनच बसला होता. कुबेर, यम व वरुण यांचीहि त्यानें अशीच दशा करून टाकली. सर्व देवांस बंदींत टाकून त्यानें त्यांना आपल्या कामास लावलें होतें. या उन्मत्त आणि जानकीचें अपहरण करणाऱ्या रावणास रामावतारांत तूं लंकासमरावर ठार केलेंस. एखादा नट ज्याप्रमाणें आपली भूमिका पालटून रंगभूमीवर प्रवेश करतो त्याप्रमाणें हाच राक्षस आतां वेषांतर करून 'शिशुपाल' या नांवानें जन्मास आला आहे. हा शिशुपाल उपजला त्या वेळींच चतुर्भुज होता. त्याला तीन डोळेहि होते. पण पुढें हें सर्व लोपून तो आतां सूर्यासारखा तेजस्वी आणि शूर झाला आहे. त्याचें सामर्थ्य पूर्वीच्या दैत्यांहूनहि अधिक आहे. त्यालाहि सबंध जग जिंकावें

अशी लालसा उत्पन्न झाली आहे, व सर्वांना पीडा देण्याची त्याची पूर्वीची प्रवृत्ति चालू आहे. प्राण्यांचा मूळ स्वभाव अन्य जन्मांतून. सुद्धां त्याच्या सांगातीं जातच असतो असें म्हणतात तें खोटें नाहीं. तर कृपा करून या उन्मत्त शिशुपालाला तूं यमलोकाला पाठवून दे. दुष्टांचा विनाश करणें हें तुझें कामच आहे. शिशुपालाच्या नाशानें इंद्राच्या चित्ताला पुनरपि स्वास्थ्य मिळूं दे.'' नारदाच्या तोंडून ऐकलेली ही इन्द्राची विनंति श्रीकृष्णांनीं मान्य केली. आपलें काम झाल्यावर नारद-मुनि पुन्हां स्वर्गलोकीं निघून गेले आणि शिशुपालाचा तो जुलूम ऐकून श्रीकृष्णाच्या भुंवया क्रोधानें वांकड्या झालेल्या दिसूं लागल्या.

**'हें करूं कीं तें करूं !'**

शिशुपालावर ताबडतोब चाल करून जावें या विचारांत कृष्ण आहे तोंच त्याला धर्मराजाकडून राजसूययज्ञाला निघून येण्याचें निकडीचें निमंत्रण आलें. दोनीहि कामें आपापल्यापरी सारखींच महत्त्वाचीं. त्यामुळें त्यांतलें 'प्रथम हें करूं कीं तें करूं' अशी कृष्णाच्या मनाची स्थिति झाली. म्हणून वडील माणसांची सल्लामसलत घ्यावी या विचारानें त्यानें आपला चुलता उद्धव व थोरला बंधु बलराम यांस खलबतखान्यांत बोलाविलें.

जगांतील शांततेच्या संरक्षणासाठींच जमलेले हे तिघे तेजस्वी मुत्सद्दी सभास्थानीं विराजमान झाले. त्या वेळीं ते वेदींत प्रज्वलित असलेल्या अग्नी-सारखे दिसत होते. शिशुपालावर स्वारी करणें आणि पांडवांच्या यज्ञाला जाणें हीं दोन्हीहि कार्यें एकमेकांच्या आड कशीं येतात हें सांगून कृष्ण त्या दोघा वडिलांना म्हणाला, " मी या बाबतींत माझें मत प्रथम सांगत आहें, याचा हेतु आपणां दोघांना आपलीं मतें मांडण्याचें निमित्त मिळावें हाच आहे. माझें हें अगोदरचें भाषण तुमच्या मतप्रदर्शनाच्या मुख्य नाट-काची नुसती नांदीच आहे म्हणा ना ! आपल्या पराक्रमशाली बंधूंच्या बाहु-बलाच्या जोरावर युधिष्ठिराला आपला यज्ञ उत्तम तऱ्हेनें पार पाडतां येईल. आम्हीं तेथें जाण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. म्हणून तिकडे न जातां अगोदर शिशुपालावरच चाल करावी. बलिष्ठ शत्रूची व वाढत्या रोगाची उपेक्षा शहाण्यानें मुळींच करूं नये. माझा आतेभाऊ शिशुपाल ( सात्वती आतेचा मुलगा ) माझा द्रोह करतो याचें मला वाईट वाटत

नाहीं. सर्व लोकांचा छळ त्यानें मांडला आहे याचेंच मला पराकाष्ठेचें दुःख होत आहे. म्हणून माझें तर असें मत आहे कीं त्याचें पारिपत्य अगोदर करावें. आतां आपल्याला काय वाटतें तें ऐकण्याची माझी इच्छा आहे." असें बोलून कृष्ण स्वस्थ बसला.

## शत्रूचा समूळ उच्छेद म्हणजेच स्थैर्य.

यानंतर बलरामानें आपलें मत सांगितलें. तो म्हणाला, "कृष्णाचें म्हणणें अत्यंत तेजस्वीपणाचें, निर्दोष व सिद्धान्तरूपच आहे. त्याचा आतां दुसरा विचारच करण्याची आवश्यकता नाहीं. आतां केवळ हल्ला करावयासच निघावयाचें आहे. मी फक्त त्याच्या संक्षिप्त व सूत्रमय सिद्धान्तावर थोडेंसें भाष्य करणार आहें एवढेंच. शत्रूचा समूळ निःपात केल्यावांचून आपला कधींहि उदय होत नाहीं. इतकेंच काय, जोंपर्यंत एकहि शत्रु जिवंत असेल तोंपर्यंत स्वस्थता मिळणें शक्य नाहीं. त्यांतून कृष्णानें शिशुपालास व शिशुपालानें कृष्णास यापूर्वी दुखविलें आहे. त्यामुळें या दोघांमध्यें वैर धुमसत आहे. शिशुपालाला देऊं केलेल्या रुक्मिणीचें कृष्णानें हरण केल्यामुळें तो कृष्णास पाण्यांत पहातो आहे. तर कृष्ण नरकासुराला मारण्यासाठीं गेला असतां शिशुपालानें द्वारकेवर हल्ला केल्याबद्दल व एका यादवाची पत्नी पळवल्याबद्दल कृष्ण त्यावर जळफळत आहे. अगोदरच चिडलेल्या शत्रूशीं नवें वैर करून जे लोक उदासीन राहातात ते वाळलेल्या गवतांत विस्तव टाकून त्याच्याजवळच वाऱ्याच्या दिशेला निजतात. शिशुपालाला त्याच्या अपराधाची क्षमा करावी या म्हणण्यांतहि कांहींच तात्पर्य नाहीं. एखाद्यानें चुकून, अल्पसा अपराध, व तोहि एक दोन वेळां, केला तरच त्याला क्षमा करण्यांत कांहीं अर्थ आहे. पण जो जाणूनबुजून, वारंवार, मोठमोठे अपराध करतो त्याला कोण शहाणा क्षमा करील! शत्रूशीं वागण्यांत मऊपणा बिलकुल उपयोगाचा नाहीं. त्यांतून शिशुपालावर हल्ला करण्याची ही फार नामी संधि आहे. जरासंध भीमाकडून मारला गेल्यामुळें शिशुपालाचा एक मोठा आधार नाहींसा झाला आहे. आपली सेना तयार असून आपल्या हुकुमाचीच वाट पहात आहे. म्हणून मी म्हणतों कीं पांडवांच्या राजसूय यज्ञासाठीं आपण हस्तिनापुराला जाऊं नये. एकदम चेदी देशावर स्वारी करून शिशुपालाच्या माहिष्मती राज-

धानीला वेढा घालावा व पांडवांच्या यज्ञाला जाण्याचें आपण तहकूब करावें. आपण हातीं घेतलेल्या कामाकडे ज्यानें त्यानें लक्ष दिलें पाहिजे. पांडवांनीं आपला यज्ञ पार पाडावा, इन्द्रानें स्वर्गाचें रक्षण करावें, सूर्यानें प्रकाशावें व आम्हीं आमच्या शत्रूंस ठार करावें हेंच उचित."

**अजातशत्रु धर्माचा पहिला शत्रु तूंच होशील !**

असें भाषण करून बलराम थांबल्यावर सभास्थानांतून त्याच्या मेघ-गंभीर ध्वनींचे प्रतिध्वनि उमटले. यानंतर उद्धवानें आपलें मत द्यावें अशी कृष्णानें त्यास नेत्रसंकेतानेंच सूचना केली. तेव्हां उद्धव बोलला, "बलरामा-सारख्या शूरानें आपलें स्पष्ट मत सांगितल्यावर मीं कांहीं बोलावयास पाहिजे असें नाहीं. तथापि माझ्या वडीलकीबद्दलच्या तुझ्या आदरामुळेंच मला माझें मत द्यावयास तूं सांगितलेंस व म्हणूनच मी तें व्यक्त करीत आहें. शत्रूवर चाल करून जाणें व त्याला जिंकणें हें शक्य कोटींतलि असेल तरच राजानें आपली शक्ति तेथें वेंचावी. या राजनीतीच्या नियमानें पाहिलें तर शिशुपाल हा शत्रु तुम्हांस वाटतो तितका क्षुल्लक नाहीं. तो एकटा किंवा असहाय नाहीं. कालयवन, शाल्व, रुक्मि इत्यादि अनेक दुष्ट राजे त्याने पाठिराखे आहेत. शिवाय बाणासुर इत्यादि तुझे पूर्ववैरी आहेत त्यांच्यार्शी यानें तुझ्याविरुद्ध संधान बांधलें तर त्यांची मोठीच गट्टी तुझी प्रतिपक्षी होणार. एतावता तूं जर शिशुपालावर हल्ला चढविलास तर शिशुपालाचे मित्र व तुझे शत्रु शिशुपालाला मिळणार व तुझे मित्र व त्याचे शत्रु तुला मिळणार. म्हणजे होणार काय ! तर सर्वच राजे कोठल्या ना कोठल्या तरी पक्षांत सामील झाल्यानें युधिष्ठिराच्या यज्ञाला मोठेंच विघ्न येणार. आणि अजातशत्रु धर्मराजाचा पहिला शत्रु तूंच होणार ! ! तुझ्या सामर्थ्याच्या भरंवशावर धर्मराजानें यज्ञ आरंभिला आहे म्हणून त्याला प्रथम साहाय्य करणें हें तुझें कर्तव्य आहे. शत्रूवरील हल्ला उशिरां केला तरी चालेल. पण पांडवांसारखे स्नेही अवमानानें एकदां दुरावले तर त्यांची समजूत पुन्हा लवकर घडणें कठीण होईल. म्हणून पांडवांच्या यज्ञाला जावें. यज्ञ निर्विघ्न पार पडला म्हणजे देवाचेंहि हित परस्पर साधेल."

**तुझ्या क्रोधाग्नींत त्यांची आहुति पडो !**

"शिवाय, शिशुपालाची तूर्त गय करण्याचें दुसरेंहि एक कारण आहे. तुझी

अत्याबाई जी सात्वती तिला तूं असें वचन दिलें आहेस कीं, 'तुझ्या पुत्राचे शंभर अपराध मी सहन करीन.' तें वचनहि तुला पाळलें पाहिजे. शिशुपालाची वेळ भरल्यावांचून तुला त्याला मारतां येणार नाहीं. तोंपर्यंत आपले हेर त्याच्या राज्यांत पेरून त्याच्या गुप्त स्थानांचा तलास तूं घे. त्याच्याकडील राजे भेदनीतीनें फोड. तुझ्या बाजूच्या सर्व राजांना पांडवांच्या यज्ञाला बोलावून नेण्याच्या निमित्तानें हेरांकडून हस्तिनापुरीं एकत्र जमवितां येईल. आणि तेथेंच युद्धाला एक आयतेंच निमित्तहि उपस्थित होईल. तें कोणतें म्हणशील तर पांडव तुझे भक्त असल्यानें तुझी अग्रपूजा करून तुझ्या ठायींची आपली भक्ति ते सर्वांसमक्ष व्यक्त करतील. तें शिशुपालाला व तत्पक्षीयांना सहन होणार नाहीं व युद्धाची ठिणगी तेथेंच पडून तें पेट घेईल, व शत्रु व मित्र असे स्पष्ट तट पडून तुझे शत्रु तुझ्या असह्य पराक्रमाग्नींत पतंगासारखे होरपळून जातील." उद्धवाचें हें मुद्देसूद, दूरदर्शी व उलटपक्षाचें बिनतोड खंडन करणारें भाषण ऐकून कृष्णाला आनंद झाला व त्याप्रमाणेंच वागावयाचें असा निर्धार करून तो समास्थानांतील आपल्या आसनावरून उठला.

## प्रचंड सेना द्वारकेबाहेर पडली.

पांडवांच्या यज्ञासाठीं हस्तिनापुराला जाण्याकरतां यादवांची प्रचंड सेना द्वारकेबाहेर पडली. हातांमध्यें 'कौमोदकी' गदा, 'नंदक' खड्ग, 'शार्ङ्ग' धनुष्य आणि 'सुदर्शन' चक्र अशीं आयुधें धारण करणारा श्रीकृष्ण सेनेच्या मध्यभागीं रथांत बसलेला होता. त्याच्यावर छत्र धरलेलें असून चामरें ढाळलीं जात होतीं. त्याच्या कंठात मोत्यांचा हार रुळत असून कौस्तुभमण्याची शोभा विशेष दिसत होती. या निर्मल मण्यामध्यें भोंवतालचें वस्तुजात स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेलें असल्यानें श्रीकृष्णाच्या ठायीं निखिल भुवनें जणों काय प्रत्यक्षच सामावलेलीं दिसत होतीं. अत्यंत ऐश्वर्यसंपन्न, उंच तटांनीं व भोंवतालच्या समुद्रानें वेढलेली ती द्वारकापुरी आज सैन्याच्या प्रयाणानें गजबजून गेली होती. हत्ती, घोडे, रथ व पायदळ अशी श्रीकृष्णाची चतुरंग सेना या नगरीच्या मार्गांतून दाटीवाटीनें वेशीबाहेर पडली. तेथें अफाट आणि श्रीहरीच्या रूपासारखा विस्मयावह असा समुद्र पसरलेला सर्वांना दिसला! त्याच्या उरःस्थलावरून नौका

डौलानें चाललेल्या दिसत होत्या. आपलीं पिकामीं झालेलीं उदरें पाण्यानें भरून घेऊन त्याची पर्जन्यरूपानें वृष्टि करूं इच्छिणारे मोठाले मेघ, समुद्राच्या एका बाजूला हत्तीप्रमाणें जल आकर्षून घेण्यांत गर्क झालेले होते. या सागराच्या किनाऱ्यानें कांहीं काळ हें यादवसैन्य प्रवास करीत कच्छभू प्रदेशास आलें. तेथें सैनिकांना लवंगफुलांच्या माळा, नारळांतलें गोड पाणी व ओल्या सुपाऱ्या देऊन समुद्रानें त्यांची अतिथिपूजा केली.

**पर्वत तुला सामोरा येत आहे !**

पुढें श्रीकृष्णाच्या दृष्टीला रैवतक नांवाचा विशाल पर्वत पडला. या पर्वतानें आपल्या सहस्र शिखरांनीं आकाश व तितक्याच पायथ्यांनीं भूप्रदेश व्यापून टाकिला होता. त्याच्या पोटांत सोन्याच्या खाणी होत्या. आणि सूर्यचंद्र हे त्याचे नेत्र आहेत असें दिसे. त्यामुळें तो हिरण्यगर्भ सहस्रशीर्ष ब्रह्माच आहे कीं काय असें वाटे. सूर्याच्या रथाला जुंपलेल्या अश्वांचा मूळ रंग हिरवा. पण सूर्याचा सारथी जो अरुण त्याच्या तांबूस रंगानें अश्वाचा रंग तांबूसच दिसूं लागे. पण हा सूर्याचा रथ रैवतक पर्वताच्या शिखराजवळून जाऊं लागला म्हणजे तेथें असलेल्या पाचेच्या हिरव्या रंगानें त्या घोड्यांचा मूळ हिरवा रंग त्यांना पुन्हा एकदां मिळे! या पर्वताकडे जों जों अधिक पाहावें तों तों त्याचें नवीनच सौंदर्य दृष्टीला येऊन पाहाणारा विस्मित होई. श्रीकृष्णाला तर हा पर्वत पाहाण्याची फारच उत्कण्ठा दिसली. म्हणून त्याच्या दारुक नांवाच्या चाणाक्ष सारथ्यानें पर्वताचें एक एक नवें सौंदर्य त्याच्या नजरेस आणण्याचा उपक्रम सुरू केला. तो म्हणाला, " हें पाहा महाराज, या निळ्या रंगाच्या विशाल आणि उत्तुंग पर्वताच्या एका बाजूनें सूर्य उगवूं लागला व त्यानें आपलीं किरणें रज्जूंप्रमाणें याच्या पृष्ठावर फेकलीं आणि दुसऱ्या बाजूला चंद्र अस्ताला जात असतां त्याचीं किरणेंहि त्या बाजूला याच्या पृष्ठावर रेंगाळतांना दिसलीं कीं असें वाटतें, सरकार, कीं हा महापर्वत एक प्रचंड हत्ती आहे आणि याच्या पाठीवरून टाकलेल्या दोऱ्यांच्या टोकांना दोन तेजस्वी घंटा बांधल्या आहेत ! या पर्वताच्या शिखरांवर सूर्यकान्त आणि चंद्रकान्त मणी आहेत. दिवसा सूर्यकिरणस्पर्शानें अग्नि बाहेर फेकणाऱ्या सूर्यकान्त मण्यामुळें या शिखरांना अग्निसांनिध्य घडतें व रात्रीं चंद्र-

किरणांच्या संपर्कानें जलधारा स्रवणाऱ्या चंद्रकान्त मण्यामुळें त्यांना स्नान घडतें. यावरून हीं शिखरें अत्यंत उग्र असें महाव्रत करीत आहेत असें मनांत येतें !

महाराज, बळरामाच्या वस्त्राप्रमाणें निळसर, रैवतक पर्वताच्या शिखरांप्रमाणें विशाल आणि वाऱ्यानें वर उंच केले जाणारे हे मेघ पहा. त्यांच्याकडे बघतांना मला तर असें वाटतें कीं आपली स्वारी आलेली पाहातांच आपल्याला सामोरें जावें म्हणून हा पर्वतराज उठत आहे ! '' दारूकाचें हें मोठें चटकदार व यथार्थ पर्वतवर्णन ऐकून श्रीकृष्णानें तेथेंच मुक्काम करण्याचा व त्याच्या रम्य वनप्रदेशांत रमण्याचा विचार केला.

## पर्वतानें श्रीकृष्णास जाब विचारला !

मागोमाग यादवांची प्रचंड सेना रैवतकाच्या प्रदेशांत येऊन दाखल झाली. तिचा तळ तेथेंच पडला. प्रथम सिंहांना ठार मारून हत्तीच्या गंडस्थळांतून पडलेल्या मोत्यांचा जेथें खच पडला आहे अशा त्या सिंहाच्या आतां रिकाम्या झालेल्या गुहांतून कांहीं यादवराजांनीं वसति केली. कोणीं श्रीकृष्णाच्या गरुडध्वजांकित शिबिराजवळच आपलीं वसातिस्थानें बनविलीं. सामान्य जनांनीं वृक्षांखालींच मुक्काम ठोकले. राजवाड्यांतल्या शयनमंदिरांत नेहमींच पहुडणाऱ्या राजस्त्रियांना पर्वतांतील मोकळ्या जागीं साध्या कनातीच्या कापडी तंबूंत फार छान निद्रासुख मिळत होतें. तेथील सरोवरांत हत्ती मनसोक्त जलक्रीडा करूं लागले. हत्ती आणि घोडे यांचा वनांत स्वैरसंचार सुरू झाला. पुष्ट बैलांच्या डरकाळ्या ऐकूं येऊं लागल्या. उत्तुंग वृक्षांच्याहि शेंड्यांवरील पानें उंटांनीं कुरतडून खालीं. हत्ती त्या पर्वतांतील वृक्ष आपल्या सोंडांनीं कडाकड मोडत होते. त्यावरून असें वाटे कीं, या कडकडणाऱ्या वृक्षांच्या शब्दांनीं रैवतक श्रीकृष्णाला जणों काय रागानें विचारत होता, " काय हो, श्रीकृष्णजी, आपण गोवर्धनादि पर्वतांचे उद्धारक म्हणून प्रसिद्ध असतां माझाच तेवढा निःपात करण्याचें काय म्हणून योजिलें आहे तें सांगा ! "

## सहाहि ऋतूंची एकदमच सेवा.

रैवतक पर्वतांत आपल्या सैन्याची सोय उत्तम तऱ्हेनें लागलेली पाहून तेथेंच कांहीं काळ आराम घ्यावा असें श्रीकृष्णाच्या मनांत आलें. तें

जाणून सहाहि ऋतु एकदम आपापली फलपुष्पसेवा त्या पुण्यपुरुषाच्या चरणीं सादर करण्यासाठीं त्या वनांत प्रकट झाले. वसंत, ग्रीष्म, वर्षा, इत्यादि सर्व ऋतूंचीं उद्दीपनें एकदम प्रकट होऊन विलासी जनांच्या मनांत विकार उद्भवूं लागले. अशा या रमणीय प्रदेशांत विहार करून श्रीकृष्णानें या ऋतूंवर अनुग्रह करावा अशी इच्छा मयूरवाणीनें तेथें व्यक्त झाली.

**स्वैर वनविहारांतील मौजा.**

त्या इच्छेला मान देऊन श्रीकृष्ण तेथील वनश्री पाहाण्यासाठीं बाहेर पडले. अनेक रंगांच्या आणि गंधांच्या पुष्पांनीं बहरून गेलेलें तें वन पाहण्यास इतर अनेक यादव राजे आपापल्या स्त्रियांसह निघाले. असल्या अतिमनोहर वनप्रदेशांतून विहार करीत असतांना तरुणतरुणींमध्यें हास्य, विनोद, ईर्षा, मान, कलह इत्यादि सर्व प्रेमाचे प्रकार चालू होते. अखेरीस वनविहारानें श्रमलेल्या यादवस्त्रियांचीं अंगें घामानें चिंब झालीं, त्यामुळें साहजिकच त्यांना जलाशयांत उतरून स्नान करावें असें वाटूं लागलें.

**जलक्रीडेंत समुद्रमंथनाचें स्मरण.**

यादव आपल्या प्रियांसहित कमलमंडित सरोवरामध्यें जलक्रीडेसाठीं उतरले. हातांमध्यें सोनेरी पिचकाऱ्या, चन्दन व इतर सुगंधी द्रव्यें, अंगावर कुसुंबी रंगाचें स्तनावरण व उत्तम तऱ्हेचें मद्य व सर्वांत मुख्य म्हणजे आपल्या प्रियांचा सहवास इतकीं साधनें बरोबर घेऊन स्त्रिया त्या सरोवरांत रमूं लागल्या. कोणी रमण आपल्या प्रियेला भ्यालेली पाहून किंवा तिला मुद्दाम भिववून, या भीतीनें अधिक मनोवेधक झालेल्या तिच्या सौंदर्यानें संतुष्ट झाला. येथेंहि जलक्रीडेंतील विविध प्रसंगांनीं या रमणरमणींचें कामोद्दीपन झालें. देवांना सुद्धां जिच्या रूपसंपदेचा विस्मय वाटेल अशी कोणी एक लावण्यवती यादवांगना जलक्रीडा करीत असतां हातात कमळें घेऊन एकदम पाण्याबाहेर उसळी मारून वर आली. प्रत्यक्ष कमलधारिणी लक्ष्मीप्रमाणें दिसणाऱ्या त्या ललनेला पाहून श्रीकृष्णाला समुद्रमंथनांतून लक्ष्मी निघाली त्या प्रसंगाची आठवण झाली. सायंकाळ झाली. ही जलक्रीडा पाहून सूर्यालाहि जलांत उतरण्याची जणों काय इच्छा झाली व तो पश्चिमसमुद्रोदकासमीप आला.

**निर्धनाला झिडकरणारी गणिका.**

दिवसभर आपणच उत्पन्न केलेल्या उष्णतेचा ताप सहन न झाल्यामुळें आतां शीतल समुद्रांत उडी तरी घ्यावी असें सूर्याला वाटलें. व ती उडी ठोकण्यासाठीं तो अस्तगिरी शिखरावर येऊन उभा राहिला. दिवसाला जरा आल्यासारखी दिसूं लागली. दूर गेलेल्या पक्षांना वृक्ष आपल्या वायुप्रेरित शाखाहस्तांनीं परत बोलावूं लागले. सूर्याला पश्चिमदिशारूपी गणिकेनें आपल्या आकाशमंदिरांतून तिरस्कारपूर्वक घालवून दिलें होतें. वास्तविक या वेळीं त्याचें रूप नयनमनोहर होतें. त्याचें शरीर सुखस्पर्श आणि मुख प्रसन्न होतें, व तिच्याविषयीं अनुराग तर त्याला अलोट होता. पण केवळ तो आतां अपेतवसु म्हणजे निष्कांचन (निष्किरण) झाला होता ! सूर्यरूपी सिंहानें आपलेंच प्रतिबिंब समुद्राच्या पाण्यांत पडलेलें पाहून हा दुसराच कोणी प्रतिसिंह असावा या भ्रांतीनें त्याला मारण्यासाठीं उडी घातली. याप्रमाणें सिंहनाशामुळें अंधकाररूपी हत्ती निर्भय झाले व सबंध जगभर धुमाकूळ घालूं लागले. नंतर उगवणाऱ्या चंद्राचे किरण उदयागिरीच्या मागून आकाशांत दृग्गोचर होऊं लागले तेव्हां शेषाच्या सहस्र मस्तकांवरील रत्नांचा हा प्रकाश असावा असें वाटलें. त्यामागून चंद्ररूपी रामचंद्रानें आपल्याबरोबर नक्षत्ररूपी वानरांची आणि अस्वलांची सेना (ऋक्षगण) घेऊन अंधकाररूपी राक्षसांचा निःपात केला. हा चंद्र– रामचंद्रहि– समुद्र उल्लंघून आला होता व त्याचे सांगातीं लक्ष्मणहि (लक्ष्मणा + अनुगत) होता. चंद्राचा आह्लादकारक प्रकाश जिकडेतिकडे पडल्यावर त्यानें कामाला उद्दीपन मिळालें व नायक आणि नायिका दूतांच्या द्वारा एकमेकांस संदेश पाठवूं लागले. मद्य आणि चंद्रकिरण यांनीं ललनांची लज्जावृत्ति मावळून जाऊन त्या क्रीडोन्मुख झाल्या.

**रात्रीनें आपलें मुख लज्जेनें खालीं घातलें.**

नंतर रमणींचें आणि रमणांचें मदिरापान सुरू झालें. कोणीं एका रमणीनें मदिरा पिण्यासाठीं मदिरापात्र आपल्या मुखाजवळ आणल्यावर त्या मदिरेंत तिच्या नेत्रांचें प्रतिबिंब पडलें. तें कमलच आहे या भ्रांतीनें एक भ्रमर त्यावर झेपावला. यानंतर त्यांच्या रतिक्रीडा सुरू झाल्या. त्यांचें दर्शन

व्रीडाकर असल्यानें रजनीनें आपलें चंद्ररूपी मुख खालीं घातलें. (पहाटेचा समय झाला.) रात्र संपली याची जाणीव भाटांनीं प्रभातकालचीं स्तुतिगीतें सुस्वर कंठांनीं गाऊन श्रीकृष्णाला दिली. आपला रात्रीचा पहारा संपवून आतां आपण थोडी डुकली घ्यावी या इच्छेनें पहिला पहारेवाला दुसऱ्या निजलेल्या पाहारेवाल्याला 'उठलास ना रे' म्हणून म्हणत होता. तो झोपेंत असतांना 'उठलोंच' असें तोंडानें नुसतें म्हणत निजूनच राहिला होता ! हळूहळू गवळ्याच्या घरचें दधिमंथन सुरू झालें. चक्रवाकांच्या जोडप्यांची गांठ होण्याचा योग समीप आला. रमणी आपल्या रमणांच्या बाहुपाशांतून मोठ्या कष्टानें आपली मुक्तता करून घेऊं लागल्या. रात्रीं मंदिरेच्या अंमलांत आपण रमणांशीं केलेलें वर्तन आठवून किंवा सख्यांनीं सांगितलेलें ऐकून मुग्ध नायिका लज्जित होऊं लागल्या, चंद्रकमलें निस्तेज झालीं, सूर्यकमलें उमललीं व उदयगिरीच्या माथ्यावर सूर्यनारायणाची स्वारी तळपतांना दिसूं लागली.

**यादवसेना पुढें चालूं लागली.**

प्रयाणाला हा समय योग्य आहे असें जाणून यादवसेना सज्ज होऊन श्रीकृष्णाच्या निघण्याची वाट पाहूं लागली. हत्ती आपला पाय आंखडून धरून माहुताला आपल्यावर बसवून घेऊं लागले. आपल्या घोड्यांना चुचकारून स्वारांनीं त्यांच्या पाठीवर उड्या टाकल्या व उंट भराभर चालूं लागले. श्रीकृष्ण लागलीच आपल्या वेगवान् रथावर आरूढ होऊन निघाला. मागून सर्व दलभार चालला. प्रयाणकाळच्या भेरींचा आवाज सर्वत्र घुमून राहिला. सेनेचा प्रवास सुरू झाला. वाटेंत डोंगरांतून रस्ते करीत व जंगलें तोडीत ती चालली. वाटेंत लागणाऱ्या गांवांतील स्त्री-पुरुष, गौळी-गौळणी श्रीकृष्णाला पाहून आपल्या नेत्रांचें पारणें फेडून घेत होतीं. श्रीकृष्णाला मार्गांत अनेक राजे येऊन मिळत होते. कृष्णाच्या सैनिकांवर कृष्णाची इतकी करडी नजर होती कीं मार्गांत त्यांच्यापासून कोणासहि उपसर्ग पोहोंचला नाहीं. अनेक नगरें व वनें ओलांडीत ती सेना यमुनेजवळ आली व ती नदी सुखरूपपणें उतरून पुढें निघाली.

**त्या सभेची शोभा काय वर्णावी !**

श्रीकृष्ण मोठ्या यादवसेनेसहित येत आहे ही बातमी धर्मराजाला

केवळ तो यमुनापार झाला तेव्हांच कळली असें नसून तो निघाल्या-दिवसापासून त्याच्या मुक्कामाची सर्व वार्ता त्याला होती. श्रीकृष्ण आपल्या समीप आला हें ऐकून धर्माला झालेला आनंद त्याच्या पोटांत मावेना. आपल्या भीमार्जुनादि बंधूंना बरोबर घेऊन तो कृष्णाच्या स्वागताला धावला. श्रीकृष्णानें धर्माला लांबूनच पाहिलें व तो उतरण्यापूर्वीच आपण रथांतून खालीं उतरला. ज्याला सबंध जग नमस्कार करतें तो हरि पायउतारा झाला व आपल्या ज्येष्ठ आतेभावाला (धर्मराजाला) त्यानें विनयानें प्रथम नमस्कार केला. धर्मराजानें त्याला उराशीं कवटाळलें. धर्मानें इतरहि राजांचें प्रेमपूर्वक स्वागत केलें. पाडवांच्या स्त्रिया यादवस्त्रियांना मोठ्या प्रेमानें कडकडून भेटल्या. धर्मानें श्रीकृष्णाला रथांत बसावयास सांगितलें. अर्जुनाच्या खांद्यावर हात ठेवून श्रीकृष्ण रथांत बसल्यावर धर्मराज स्वतः घोडे हाकूं लागला. यादव-पांडवांचीं सैन्यें गंगायमुनांच्या प्रवाहाप्रमाणें एकमेकांत मिसळून इंद्रप्रस्थाकडे चाललीं. यज्ञ पहावयाला आलेल्या अनेक राजांसाठीं असंख्य निरनिराळीं वसतिस्थानें मोंवतालीं बांधलीं होतीं. त्यावरून असें वाटे कीं इंद्रप्रस्थाला शत्रूंचा वेढाच पडला आहे. श्रीकृष्ण नगरांतून जात असतां त्याला पहावयास आलेल्या पौरस्त्रियांची कोण धांदल उडाली म्हणून सांगावें ! कोणाचे अलंकार घालावयाचे तसेच राहिले, तर कोणी वस्त्रहि नीट नेसण्यास विसरल्या ! ज्याच्या कुक्षींत कल्पान्ताच्या वेळीं अनेक भुवनें सामावलीं त्या श्रीहरीला आपल्या नेत्रांत सामावण्याचा एका नगरस्त्रीनें प्रयत्न चालविला होता ! याप्रमाणें नगरांतून चाललेला श्रीकृष्ण शेवटीं मयासुरानें निर्माण केलेल्या अद्भुत सभेपाशीं आला. तिची शोभा काय वर्णावी ! तिच्या रुपेरी आणि स्फटिकाच्या गगनचुंबी शिखरांच्या धवलप्रभेंत आकाशांतील चंद्र रात्रीचे वेळीं बुडून जाई व असें वाटे कीं समुद्रमंथनापूर्वी जसा तो क्षीरसागराच्या उदरांत होता तसा आतांहि आहे ! तिच्यांतील सर्व दालनाची फरसबंदी पाचूचीच केलेली होती. त्या फरसबंदीवर प्रकाश पडला कीं तींतून हिरवेगार किरण– अगदीं दूर्वांकुरांसारखे– बाहेर पडत. ते पाहून तेथें हिंडणाऱ्या पाळीव हरिणशावकांना ते दूर्वांकुरच वाटत व ते आपलीं तोंडें उघडून त्यांना कुरतडूं पाहात ! लांबून हा देखावा पहाणाऱ्यांना खरोखरच असें वाटे कीं हीं पाडसें दूर्वांकुरच खात आहेत !

त्या समेंत जेथें कमलपत्रांनीं व पुष्पांनीं युक्त पुष्करिणी आहे असा भास व्हावयाचा व म्हणून जिच्यांत उतरतांना पाहाणारे लोक आपापलीं वस्त्रें गुडघ्यांच्या वर उचलून धरावयाचे तेथें खरोखरच इंद्रनील मणी व इतर रत्नें यांनीं तयार केलेली साधी फरसबंदी असावयाची ! व याचे उलट जेथें पाणी नाहीं असें वाटावयाचें तेथें खरोखरच पुष्करिणी असावयाची ! आणि अशाच एका डोळ्यांना चकवणाऱ्या पुष्करिणींत दुर्योधन पडला असतां भीम त्याला 'अंधपुत्र रे अंधपुत्र !' म्हणून हसला व हा हास्यविनोद पुढें निखिल राजांच्या कुलक्षयाला कारणीभूत झाला. श्रीकृष्णानें ही मयसभा पाहून संतोष व्यक्त केला. 'श्रीकृष्णाचा निवास या नगरांत असेपर्यंत दररोज उत्सव करावा' अशी घोषणा धर्मराजानें सर्वत्र केली. धर्मराज व कृष्ण राजसभेमध्यें मागच्यापुढच्या अनेक विषयांवर बोलत बसले. त्यांच्या बोलण्याला असा रंग व अशी लज्जत आली कीं त्यापुढें अमृतहि फिकें पडलें !

**माझ्या धर्मवृक्षाचें मूळ तूंच.**

श्रीकृष्ण आणि धर्मराज यांचा एकमेकांशीं विविध विषयांवर मोठ्या प्रेमळपणाचा आणि मनमोकळा संवाद चालू असतां धर्मराज श्रीकृष्णास म्हणाला, " कृष्णा, तुझ्याव्यतिरिक्त दुसरी कोणतीहि गुणवान् व्यक्ति घेतली आणि तिचें गुणवर्णन करूं लागलें तर असें होतें कीं आत्मस्तुति प्रत्येकाला प्रिय असल्यानें स्तुति करून घेणाऱ्या त्या व्यक्तीला संकोच वाटत नाहीं. पण तिची स्तुति करणाराला (तिच्या गुणांचें भांडवल फारच थोडें असल्यानें) मिथ्या बोलणें भाग पडतें व त्यामुळें त्यालाच संकोच होतो. पण तुझें तसें नाहीं. तुझे गुण अनंत व शक्ति अतर्क्य असल्यानें तुझें गुणगान करणाराला संकोच वाटत नाहीं. कारण मिथ्या बोलण्याचा दोष त्याचेकडून होतच नाहीं. उलट आपली स्तुति आपणच ऐकून घेण्याला अनुत्सुक असणाऱ्या तुला मात्र पराकाष्ठेचा संकोच होतो. म्हणून मी जें तुझ्याविषयीं बोलतों आहें तें खरें आहे व मी तें मनापासून बोलतों आहें असें समजून तूं तें न संकोचतां ऐकून घे. आज निखिल भारतवर्षाच्या राज्याचीं सूत्रें माझ्या हातांत आहेत याला कारण तुझ्या अतर्क्य सामर्थ्याचा

महिमा. सांप्रत मी राजसूय यज्ञ करूं इच्छितों आहें हें तूं जाणतोसच. त्याला अनुज्ञा देऊन माझा साहाय्यकर्ता हो. माझ्या धर्मवृक्षाचें खरें मूळ तूंच आहेस. तूं आमचा पाठिराखा असल्यावर आमचा यज्ञ निर्विघ्न पार पडेल यांत संशय नाहीं. धर्मशास्त्रकारांनीं सांगितल्याप्रमाणें मीं धर्ममार्गानें धन मिळविलें, धर्मानेंच तें रक्षिलें व वाढविलें. आतां त्या धनाचा मी योग्य ठिकाणीं व्यय करणार आहें; म्हणजे यज्ञकर्मांत मी तें खर्च करणार आहें. आणि यज्ञनारायणाला अर्पिलेलें तें धन अखेरीस तुझ्याप्रतच येऊन पोहोंणार. म्हणून म्हणतों कीं माझ्या वित्ताचें शेवटचें जें योग्य स्थान तें तूंच असल्यानें त्याचा स्वीकार तूं कर. किंवा तूं प्रथम यज्ञ कर. तुझा यज्ञ संपल्यावर मी करीन. तुझी जशी इच्छा असेल तसें वागावयाला मी सज्ज आहें. आज्ञा कर.''

**त्याच्या धडावर शीर राहणार नाहीं.**

यावर जवळच बसलेल्या सर्व राजे लोकांस ऐकूं जाईल अशा स्वरांत श्रीकृष्णानें धर्मराजाला उत्तर दिलें कीं '' धर्मा, माझ्या सामर्थ्यामुळें तुला पृथ्वीचें राज्य संपादितां आलें हें खरें नाहीं. तूंच आपल्या राजनीतिकौशल्यानें तें मिळविलें आहेस. अरे, केवळ पथ्य सांभाळल्यामुळें मिळणाऱ्या आरोग्याचें श्रेय वैद्याच्या पदरीं बळेंच बांधण्यांत काय हंशील आहे ? यज्ञ प्रथम तूं करावा कीं मीं करावा असा प्रश्न तूं उपस्थित केलास. पण राजसूय यज्ञ राजानेंच करावयाचा असतो. जन्मानें शुद्ध क्षत्रिय आणि कर्मानें अत्यंत योग्य राजा तूंच आहेस. म्हणून तूंच तो करावास हें अधिक उचित. पृथ्वी उचलावयाची झाली तर ती आदिवराहावांचून दुसऱ्या कोणीं बरें उचलावी ? तुझ्या यज्ञात मला वाटेल तें काम सांग. मला अर्जुनासारखाच मान. संकोच करूं नको. तुझ्या यज्ञांत विघ्न आणण्याचें तर राहोच. पण तुझा यज्ञ चालू असतांना त्यांत एखाद्या सामान्य सेवकासारखें पडेल तें काम करावयाचें जो राजा नाकारील त्याच्या धडावर हें माझें सुदर्शन चक्र त्याचें शीर राहूं देणार नाहीं ! ! ''

**यज्ञधूम गगनाला भिडला.**

श्रीकृष्णानें दिलेलें हें आश्वासन ऐकून धर्मराज म्हणाला, '' तूंच आमचा क्षेमकर असल्यावर मला काय उणें ? '' आणि मोठ्या उत्साहानें तो

यज्ञाच्या तयारीस लागला. लागलीच मीमांसाशास्त्रांत प्रवीण असलेले आणि यज्ञकर्मांत कुशल असे अनेक विद्वान् ब्राह्मण बोलावण्यांत आले व निर-निराळ्या देवतांना नामोच्चारपूर्वक त्यांच्याकडून अनेक द्रव्यांचे हवी दिले जाऊं लागले. ऋक्, यंजु आणि साम यांचें गायन सुरू झालें. जिनें आपल्या कमरेभोंवतीं दर्भांचा कमरपट्टा बांधिला आहे अशा यजमान-पत्नीकडून - द्रौपदीकडून-- अवलोकन केलीं गेलेलीं हविर्द्रव्यें मंत्रपठनपूर्वक अग्नीमध्यें मराभर अर्पिलीं जाऊं लागलीं. यज्ञकुंडांतून अग्नीच्या शेंकडों ज्वाला बाहेर पडतांना दिसूं लागल्या; आणि असें वाटलें कीं हविर्द्रव्यांनीं आनंदित झालेला अग्नि हसत हसत आपल्या शेंकडों जिभा बाहेर काढून तीं पवित्र हविर्द्रव्यें मोठ्या संतोषानें सेवीत आहे. यज्ञकुंडांतून निघणारीं धूमाचीं वलयें गगनाला जाऊन भिडलीं. जणों काय त्यांना तेथील देवांना या यज्ञाची आनंदवार्ता सांगावयाची होती ! यज्ञांत दिलेले हवि-र्भाग प्रत्यक्ष येऊन सेवन करण्यासाठीं देवसुद्धां भूलोकीं उतरले. त्यामुळें स्वर्गांत एकट्याच राहिलेल्या त्यांच्या शची आदिकरून भार्यांना आपले केस, त्यांत मंदारमाला न गुंफतां व त्यांची वेणी न घालतां, कित्येक दिवस तसेच मोकळे ठेवावे लागले ! यज्ञांत सत्पात्र ब्राह्मणांना अपार दक्षिणा दिल्या गेल्या, आणि कित्येकांना भूमि कायमच्या दान देण्यांत आल्या. राजे लोकांनीं धर्मराजाला मोठाले नजराणे दिले, आणि त्यानेंहि तें सर्व धन सर्व याचकांना देऊन टाकलें. याप्रमाणें श्रीकृष्ण विघ्नहर्ता असल्यानें धर्माचें दान, होम आणि यजन यांचें कार्य यथासांग पार पडलें. आणि 'यज्ञकर्माचा खरा साहाय्यकर्ता कोण असेल तर हा हरिच' असें यज्ञ-भूमीनेंच आपला यूपरूपी हात कृष्णाकडे करून जणों काय सांगितलें ! !

**अग्रपूजा कोणाची करावी ?**

यज्ञसमाप्तीनंतर यज्ञमंडपांत उपस्थित असलेल्यांपैकीं कोणातरी अत्यंत योग्य पुरुषाची पूजा यजमानानें करावयाची असते. ती पूजा कोणाची करावी असा प्रश्न धर्मराजानें भीष्माचार्यांस केला. त्यावर ते म्हणाले, " धर्मा, आज या यज्ञांत पूजेला योग्य कोण हें तूं जाणत नाहींस असें नव्हे. पण वडील माणसाला विचारून वागावें या नियमामुळें तूं हा प्रश्न मला केलास. त्याचें उत्तर अर्थातच मी देतों. यज्ञाच्या शेवटीं

ज्यांची पूजा करावी अशी वहिवाट आहे ते पूजनीय लोक म्हणजे स्नातक, गुरु, बांधव, ऋत्विज, जामात व राजा असे सहा. हे सर्व येथें उपस्थित आहेत. तेजस्वी ब्राह्मण आहेत आणि पराक्रमी राजेहि आहेत. यांपैकीं प्रत्येकाची वेगळाली तरी पूजा करावी किंवा या सर्वांपैकीं कोणीतरी एकच श्रेष्ठ पुरुष पाहून त्याची एकट्याची तरी अग्रपूजा करावी अशी चाल आहे. माझ्यामतें या मंडपांत भगवान् श्रीकृष्ण हा असा एकच श्रेष्ठ पुरुष आहे व तोच अग्रपूजेला सर्वतोपरी पात्र आहे. हाच हरि रजोगुणाचा अवलंब करून सृष्टि निर्माण करतो तेव्हा ब्रह्मा होतो, सत्त्वगुणाचा आश्रय करून सृष्टि चालवितो तेव्हां विष्णु होतो व शेवटीं तमोगुणाचा अंगीकार करून सृष्टीचा प्रलय करतो त्या वेळीं महेश्वर होतो. योगी योगमार्गानें व भक्त भक्तिमार्गानें यांचेंच ज्ञान करून घेतात. यानेंच वराह, नारसिंह, वामन, मोहिनी, दत्तात्रेय, परशुराम, राम इत्यादि अवतार घेऊन दुष्ट दानवांचें निर्दालन केलें आहे व तोच सांप्रत कृष्णावतार धारण करून वसुदेवाचा पुत्र झाला आहे.'' असें सांगून भीष्मानीं श्रीकृष्णाची उचित शब्दानीं स्तुति केली आणि ते धर्माला म्हणाले, '' धर्मा, तूं धन्य. म्हणून यज्ञानीं ज्याची प्राप्ति करून घेतली जाते असा श्रीहरि तुझ्या यज्ञात प्रत्यक्ष उपस्थित आहे. त्याची अग्रपूजा कर आणि त्रिभुवनाचे धन्यवाद मिळव.'' भीष्माच्या या वचनाप्रमाणें श्रीकृष्णाची अग्रपूजा सर्वांसमक्ष धर्मराजानें केली.

## शिशुपालाचा जळफळाट.

राजाच्या त्या प्रचंड समेंत एकट्या शिशुपालाला मात्र ही गोष्ट सहन झाली नाहीं. मत्सरानें त्याचा जळफळाट झाला. श्रीकृष्णाच्या या सन्मानानें कृष्णाशीं असलेल्या त्याच्या पूर्ववैरानें पेट घेतला आणि क्रोधानें लाल होऊन तुच्छतादर्शक हातवारे करीत तो धर्माला म्हणाला, '' धर्मा, कृष्णाची पूजा करताना तूं त्याच्या गुणापेक्षां त्याच्याशीं असलेल्या तुझ्या नात्याकडेच बघितलेंस ! अरे, या समेंत शेंकडों मूर्धाभिषिक्त आणि तेजस्वी राजे असतांना तूं या अनभिषिक्त गवळ्याची पूजा केलीस हें तुझें कृत्य यज्ञकुंडात पेटत असलेल्या अग्नीमध्यें हवि न देता तो एखाद्या कुत्र्याच्या तोंडांत फेंकण्यासारखें झालें ! तूं कधीं खोटें बोलत नाहींस

अशी तुझ्याबद्दल अफवा आहे. पण आज तूं प्रत्यक्ष खोटें कर्म करून तिलाहि हरताळ फासलास. भीष्माला तर म्हातारचळच लागलें आहे म्हणून त्यानें कृष्णाच्या वृथा स्तुतीची वटवट केली.” नंतर कृष्णाकडे वळून तो म्हणाला, “ अरे, लोकांनीं तुझी वृथास्तुति केली असली तरी तूं तुझी खरी किंमत ओळखायला नको होती काय ? तूं म्हणे कोणा मधु नांवाच्या राक्षसाला ठार मारलेंस म्हणून तुला ‘मधुसूदन’ म्हणतात. ही गोष्ट मला साफ खोटी वाटते. तूं पोळ्यावरील मधमाशा काठीनें उठवून त्यांतील मध (मधु) पिळून काढला असशील म्हणून तुला लोक ‘मधुसूदन’ म्हणत असावेत.”

“ नीचा, गुणविहीन अशा तुझ्यासारख्याची पूजा करणें हें केशविहीन टक्कलावर फणी फिरवण्यासारखें हास्यास्पद आहे !” नंतर तेथील राजाना उद्देशून तो म्हणाला, “ हे शूर हो, सिंहासारख्या महापराक्रमी तुम्हां राजाच्या डोळ्यादेखत या पाडवांनीं या कोल्ह्याप्रमाणें क्षुद्र कृष्णाची पूजा करावी हा तुमचा धडधडीत उपमर्द आहे. जिच्या स्तनांतील दूध हा कृष्ण प्याला त्या मातेसारख्या पूतनेला यानें कृतघ्नपणें ठार केलें आणि या नरकासूनें ज्या कंसाचीं गुरें वळलीं त्या आपल्या धन्याला मारण्याचा यानें पुरुषार्थ केला.” असें कठोर बोलून व नरकासुराच्या पुत्राच्या हातावर टाळी देऊन तो कुत्सितपणें मोठमोठ्यादा हसूं लागला.

**‘ हा पहा ! मीं त्याच्या डोक्यावर पाय दिला.’**

शिशुपालाच्या तोंडून हे निरर्गल प्रलाप निघत असतांनाच यदुराजे खवळून उठले होते. पण कृष्णानें त्यांना स्वस्थ राहण्याची खूण केल्यामुळेंच ते नाईलाजानें गप्प बसले. ‘शिशुपालाचा हा कितवा अपराध’ ? एवढीच मोजदाद श्रीकृष्णानें मनाशीं चालविली होती. कारण तो आपल्या आतेबाईशीं वचनबद्ध झाला होता. कृष्णाची ही अशी निंदा ऐकून भीष्म मात्र एखाद्या समुद्रासारखा खवळला. तो गरजला—“ या सभेत श्रीकृष्णाचा केलेला मान ज्या कोणाला सहन झाला नसेल त्यानें मजबरोबर युद्धाला सज्ज व्हावें. सर्व राजांसमक्ष त्याच्या डोक्यावर हा असा पाय देऊन मी त्याला आव्हान देतों.” हें ऐकून शिशुपालपक्षीय राजे प्रक्षुब्ध झाले. त्याना उद्देशून शिशुपाल म्हणाला, “ राजे लोक हो, हे पांच जारपुत्र पाडव

व ही वृद्ध राजकन्या (भीष्म) यांसह या कंसाच्या नोकराला (कृष्णाला) तुम्ही एकदम ठार कां करीत नाहीं ? हा मरायलाच पाहिजे. बाकी माझ्या एकट्याच्या समोरसुद्धां युद्धांत उभें राहण्याची ज्याची छाती नाहीं त्याला मारायला तुम्ही कशाला ? मीच याचें रक्त लौकरच गिधाडांसह भूमीला पाजतों.'' असें बोलून तो शिशुपाल, पांडव ' नको, नको ' म्हणत असतां, सभेंतून तावातावानें चालता झाला. ' आपला हा मावस-भाऊ व मुद्दाम या यज्ञासाठीं बोलाविलेला पाहुणा ' असा विचार करून सौजन्यशाली पांडव या शिशुपालाच्या उद्दामपणामुळें मुळींच रागावले नाहींत. शिशुपालाच्या मागोमाग तत्पक्षीय राजपुत्र यज्ञमंडपांतून उठून गेले. शिशुपालानें आपल्या शिबिराकडे येऊन आपलें सैन्य सज्ज केलें. रथ घडघडूं लागले. शिशुपालपक्षीय राजेलोकांनीं युद्धापूर्वी आपल्या बायकांचे व मुलाचे निरोप घेतले. त्या वेळीं त्यांच्या तोंडांतून येणारे उद्गार मात्र अशुभसूचक होते. त्याजवर कोसळणाऱ्या भावी अनर्थांची स्पष्ट सूचना देणारे अनेक अपशकुनहि त्यांना झाले.

**शरणागति कीं धमकी ?**

याप्रमाणें शिशुपालाच्या सैन्याची तयारी झाल्यावर प्रत्यक्ष युद्धाला तोंड लागण्यापूर्वी त्यानें एक कुशल दूत श्रीकृष्णाकडे पाठविला. ह्या दूताची शब्दयोजना मोठी चतुराईची असून तीमध्यें वरचा उघड अर्थ तहाला अनुकूल तर प्रच्छन्न अर्थ युद्धाचें आह्वान देणारा होता. तो दूत सभेंत येऊन श्रीकृष्णाला म्हणाला, " महाराज, आपल्याला भरसभेंत अपमानकारक शब्दांनीं दुखविल्याबद्दल आमचे स्वामी शिशुपाल यांस पश्चात्ताप होत आहे. त्यामुळें तुमचा राग शांत करण्यासाठीं व तुमची पूजा करण्याकरितां तुमच्याकडे येण्याची त्यांची इच्छा आहे'' (शिशुपाल तुला नुसतें अपमानकारक बोलूनच थांबला, तेथल्या तेथें त्यानें तुझें डोकें उडविलें नाहीं याबद्दल त्याला पश्चात्ताप होत आहे. म्हणून तुझें निर्दालन करण्यासाठीं तो तुझ्यावर चाल करून येऊं इच्छितो आहे. असा प्रच्छन्न अर्थ.) याप्रमाणें ' शिशुपालाला तुम्हांस दृढ अलिंगन द्यावयाचें आहे ', ' तुम्हांला नमस्कार करावयाचा आहे ', ' तुमच्यामागचें शिशुपालाचें भय कायमचें नाहींसें करावयाचें आहे' इत्यादि द्व्यर्थी वाक्यांनीं त्या वाक्पटु दूतानें एकी-

कडून शरणागति तर दुसरीकडून धमकी व्यक्त केली व तो थांबला. चतुर कृष्णानें त्या बोलण्यांतील मर्म ओळखून त्याला चोख उत्तर देण्याची खूण सात्यकीला केली. तेव्हां तो सात्यकी त्या दूताला म्हणाला, "तुझें वरून प्रिय पण आंतून अत्यंत अप्रिय असें बोलणें आम्हांला पिंगळ्याच्या गोड पण अपशकुनी शब्दाप्रमाणें त्याज्य वाटत आहे हें तूं पुरतें लक्षांत ठेव. काय रे, मी तुला असा सवाल करतों कीं युधिष्ठिरानें कृष्णाची पूजा केली म्हणून तुझा स्वामी शिशुपाल याच्या पोटांत कां दुखावें ? सुवासिक पुष्प कोणीं मस्तकावर धारण केलें तर इतरांस त्याचा मत्सर कां वाटावा ? तूं म्हणशील कीं 'क्षुद्रांना श्रीकृष्णापुढें नमणें योग्य वाटलें तरी कृष्णाच्याबरोबरीच्या शिशुपालाला त्याचें नसतें स्तोम माजाविलेलें खपलें नाहीं' तर त्यावर तुला उत्तर देतों कीं कोठें श्रीकृष्ण आणि कोठें तुझा तो शिशुपाल !"

## कोल्हेकुईला सिंह उत्तर देत नाहीं.

"सभेंतच या दोघांमधील महदंतर स्पष्ट झालें आहे. अप्रिय आणि उद्वेगजनक शब्द बोलण्याची ऊर्मि नीचांना दाबतां येत नाहीं. पण महात्मे असे शब्द काळवेळ पाहून मनांतल्या मनांत जिरवून टाकतात. सज्जन परोपकारपर असतात तर दुर्जनांना परद्रोह करण्यातच भूषण वाटतें. आपली निंदा करून शिवीगाळहि करणाऱ्या शिशुपालाला श्रीकृष्णानें सभेंतच प्रत्युत्तर दिलें नाहीं. याचें कारण त्याला तसें करतां येत नव्हतें असें नव्हे. महात्मे वल्गना करणाऱ्या क्षुद्रवृत्ती नीचांची उपेक्षाच करतात. सिंह प्रत्युत्तर देतो तो मेघाला, कोल्हेकुईला नाहीं. हलकटांशीं विरोध करण्यांत तरी काय हंशील ? आणि शिशुपालाच्या निंदेनें श्रीकृष्णाला कमीपणा येणार असें थोडेंच आहे ? शिवाय वेळ आली कीं आपल्या पराक्रमाविषयीं वृथा वटवट न करतां थोर लोक पराक्रमानें आपला क्रोध-सर्प विष व्यक्त करतो त्याप्रमाणें- प्रकट करतात. उलट केवळ शब्द उच्चारून तोंड वाजविणारे शिशुपालासारखे वाचिवीर नगाऱ्याप्रमाणें केवळ शब्दसामर्थ्यवान् असतात. तुझा शिशुपाल तह किंवा युद्ध करावयाला जो काय येणार असेल तो खुशाल येऊं दे. आमच्याकडून कसलीच खोटी नाहीं. तुझ्या मुखानें आज शिशुपालानें आपल्या शंभर अपराधांची संख्या पूर्ण केली आहे. तुझ्या तोंडाला हाडच नाहीं. त्यामुळें तूं यावरहि कांहीं

अर्वाच्यासारखें बोलशील. पण लक्षांत ठेव; विवेकानें रोधून ठेवलेल्या आमच्या संतापालाहि कांहीं मर्यादा आहे."

## कोण कोणाला क्षमा करतो ?

सात्यकीचें हें तेजस्वी भाषण ऐकून त्या धीट दूतानें न भितां त्याला उत्तर केलें— "सात्यके, बुद्धिमंदाला स्वतःचें हित कळत नाहीं. तें एक वेळ असो. पण दुसऱ्यानें स्पष्टपणें समजावून दिलेलें हितसुद्धां त्याला उमगूं नये हें मात्र मोठें आश्चर्यकारक आहे. भिंतीवर आपले डोकें आदळण्यापूर्वी भिंतीचें ज्ञान करून घेणें हें मूर्खाला जमतच नाहींस दिसतें !" नंतर कृष्णाला उद्देशून तो म्हणाला, " अरे कृष्णा, तुझ्या हिताचें जें मी सांगतों तें ऐक. दुर्जन जरी सज्जनांचा नाश करावयास प्रवृत्त झाले असले तरी त्या नाश-प्रवृत्तांनासुद्धां परोपकारी सज्जन उपदेश करीत असतात. शिशुपालाला वगळून तुझी अग्रपूजा करण्यांत युधिष्ठिरानें स्वहितापेक्षां स्वेच्छेकडे अधिक पाहिलेलें दिसतें. बाकी यानें शिशुपालाला काय कमीपणा आहे ? हत्तीचें गंडस्थळ फोडून सिंह त्यांतलें मांसच— त्याला आवडतें म्हणून- खातो व त्यांतलें मुक्ताफळ फेंकून देतो. म्हणून त्या मुक्ताफळाची किंमत कमी होत नाहीं. शिशुपालाचे शंभर अपराध आपण क्षमा केले असें तूं म्हणतोस. पण रुक्मिणीहरणाच्या तुझ्या एका अपराधाची शिशुपालानें तुला केलेली क्षमा तुझ्या अपराधशताच्या क्षमेहून मोठी आहे. तें असो. आतां शिशुपाल तुझ्यावर समुद्राप्रमाणें चाल करून येणार आहे. अशा वेळीं त्याला शरण जाऊन तूं आपला जीव वांचवावा यांतच तुझें हित आहे. तो नांवानें 'शिशुपाल' म्हणजे बालकाचें रक्षण करणारा असला तरी तुमच्यासारखे तरुण त्याला शरण गेले तर त्याचेंहि तो रक्षण खास करील. शिशुपालाशीं युद्ध करण्याचा विचार तुम्ही सोडून द्या. यादव, पांडव किंवा दुसरें कोणीहि यांचें शिशुपालाच्या शस्त्रबलापुढें कांहीं चालावयाचें नाहीं. त्यांचें शौर्य अचाट आहे व त्याच्या आसेंत असंख्य पराक्रमी राजे आहेत. म्हणून लक्षांत ठेव. तुला युद्धांत ठार करून अनाथ झालेल्या तुझ्या स्त्रियांचें शिशुपालन करून तो आपलें नांव यथार्थ करील."

**यादव खवळले.**

त्या धीट दूताचे हे संतापजनक शब्द ऐकून समेंतील यादव प्रलयकालच्या सागराप्रमाणें खवळून उठले. ते क्रोधानें लाल होऊन मुठी आवळूं लागले व दांतओठ खाऊं लागले. दक्षप्रजापतीच्या यज्ञाचा नाश करणाऱ्या रुद्राचा मूर्तिमंत ज्वरच हा शिशुपाल आहे असें त्यांना वाटलें. त्यामुळें आहुकि, पृथु, अक्रूर इत्यादि राजे रागानें वेडे झाले. उद्धवाला मात्र शत्रूंची कींव वाटली. क्रोधाविष्ट झालेल्या त्या सर्व राजांनीं त्या सभाधीट दूताला तेथून हकलून लावलें आणि त्यांनीं आपलें प्रचंड सैन्य युद्धासाठीं सज्ज केलें. रथ, गज, पायदळ इत्यादि चतुरंग सेना झपाट्यानें सिद्ध होऊं लागली. गरुड श्रीकृष्णाच्या ध्वजावर येऊन बसला. जिकडेतिकडे वीरांच्या गर्जना व समरदुंदुभि यांचे भयंकर निनाद ऐकूं येऊं लागले. सैन्याच्या हालचालीनें उडालेली धूळ आकाशापर्यंत जाऊन पोहोंचली. आतां प्रलयकाल होतो कीं काय अशी भीति लोकांना वाटूं लागली.

**दोन्हीहि सैन्यें परस्परांना भिडलीं.**

यादव-पांडवांचें सैन्य व शिशुपालाची सेना हे दोन सागर एकमेकांवर आदळल्यासारखे दिसूं लागले. किंवा पूर्वीचे पंख असलेले विंध्य आणि सह्य हे पर्वत एकाच ठिकाणीं आल्यासारखे दिसूं लागले. पायदळ पायदळाशीं, घोडेस्वार घोडेस्वारांशीं, गजांवरील वीर गजांवरील वीराशीं व रथ रथांशीं झुंजूं लागले. घोड्यांचें खिंकाळणें, हत्तींचे चीत्कार आणि रथांचे घडघडाट यांनीं दशदिशा व्यापून गेल्या. मधून मधून तरवारींचीं पातीं अग्निज्वालांप्रमाणें चमकूं लागलीं. वीर प्रतिवीरांना आह्वान देऊं लागले. स्वाभिमानी वीर आपल्या प्राणांचीं मूल्यें देऊन अजरामर कीर्ति संपादीत होते. हा युद्धचमत्कार पाहण्यासाठीं आकाशांत जमलेल्या देवांच्या विमानांनीं नभःप्रदेश भरून गेला. रणांगणावर वीर पडतो केव्हां व आपण त्याचें स्वागत करून त्यास स्वर्गांत नेतों केव्हां अशी उत्सुकता स्वर्गांगनांना लागून राहिली. कोणी एक वीर घायाळ होऊन हत्तीवरून खालीं कोसळला. त्याला वरण्यासाठीं एक देवांगना उत्सुक होऊन राहिली. परंतु तिच्या दुर्दैवानें त्याच्या अंगावर हत्तीच्या सोंडेंतील शीतल तुषार पडल्यानें तो जिवंत झाला. त्यामुळें त्या बिचारीचे मनोरथ विफल झाले ! परशुरामानें

क्षात्रियांचा एकवीस वेळां पराभव करून क्षत्रियांच्या रक्तानें फक्त पांचच डोह भरले. पण या युद्धांत एका क्षणामध्यें क्षत्रियांच्या रक्तानें अनेक नद्या वाहूं लागल्या. याप्रमाणें घनघोर तुमुल युद्ध चालू झालें.

**चक्रानें धड शिरावेगळें केलें.**

या गर्दीच्या तुमुल युद्धानंतर द्वंद्वयुद्धें चालू झालीं. बलरामानें बाणासुराचा पुत्र वेणुदारी यास घायाळ केलें. सात्यकीनें शाल्वाचा पराजय केला. कृष्णाचा पुत्र प्रद्युम्न यानें तर एकट्यानेंच– समुद्र जशा अनेक नद्या एकदम आपल्या अंगावर घेतो त्याप्रमाणें– शिशुपालाच्या अनेक सेना आपल्या अंगावर घेतल्या. अनेक धनुर्धरांचे बाण त्यानें आपल्या बाणांनीं तोडले. त्याचें रणकौशल्य पाहून देवांनाहि कौतुक वाटलें. त्याच्यापुढें शत्रूंचा निभाव लागेना हें पाहून शिशुपाल संतापला. त्यानें यादवसेनेवर चाल केली. मोठें रणकंदन माजलें. श्रीकृष्णाचेहि बाण शत्रूंना मारून परत त्याच्या भात्यांत येत. एकच कृष्ण पण शत्रूंना भीतीमुळें दुप्पट, तिप्पट, चौपट दिसे व ते पंचत्व पावत (मरत). हा श्रीकृष्णाचा पराक्रम सहन न होऊन शिशुपालानें प्रत्यक्ष कृष्णाला युद्धाचें आह्वान दिलें. दोघांचे रथ परस्परांनिकट आले. दोघांनींहि मोठ्या क्रोधानें एकमेकांवर बाणांचा वर्षाव केला. शिशुपालानें शेंकडों तीक्ष्ण बाण कृष्णावर सोडले. पण त्याच्या शेंकडों अपराधांनीं जशी कृष्णास व्यथा झाली नाहीं तशी या बाणांनींहि झाली नाहीं. यावर शिशुपालानें कृष्णावर स्वापनास्त्र (निद्रा आणणारें अस्त्र) सोडलें. त्यामुळें यादवसैन्यांत जिकडेतिकडे अंधार आणि निद्रा पसरली. एक श्रीकृष्ण तेवढा जागृत होता. त्यानें आपल्या नेत्रांतून एक दिव्य तेज निर्माण करून सर्व अंधकाराचा आणि निद्रेचा नाश केला. नंतर शिशुपालाच्या भुजंगास्त्रावर कृष्णानें आपलें गरुडास्त्र सोडलें. शिशुपालानें हरिसेना नागपाशांनीं बांधलेली पाहून आपल्या ध्वजावरील गरुडांतून शेंकडों गरुड श्रीकृष्णानें निर्माण केले. याप्रमाणें जें जें अस्त्र शिशुपाल योजील त्या त्या अस्त्रावर श्रीकृष्णानें उलट अस्त्र योजून तें निष्फळ करून टाकलें. आपल्या बाणांनीं कृष्णाचा मर्मघात होत नाहीं असें पाहून शिशुपाल कृष्णाचा मर्मभेद करणारे तीक्ष्ण शब्द उच्चारूं लागला. तेव्हां कृष्णानें ज्या सुदर्शनचक्रानें राहुकेतूंचीं शकलें केलीं होतीं त्याच, शेंकडों ज्वाला

बाहेर फेंकणाऱ्या, चक्रानें शिशुपालाचें धड शिरावेगळें केलें. त्याबरोबर शिशुपालाच्या शरीरांतून एक उग्र तेज निघालें व देव दुंदुभि वाजवीत आहेत, सुर पुष्पवृष्टि करीत आहेत, ऋषि परमेश्वरस्तुति करीत आहेत व शेंकडों राजे लोक आश्चर्यानें पाहात आहेत अशा परिस्थितींत तें तेज श्रीकृष्णाच्या शरीरांत प्रविष्ट झालें !

# शिशुपालवध—रसग्रहण

## $\frac{1}{3}$ भारत व $\frac{2}{3}$ इतर भाग.

माघनें आपल्या महाकाव्याची उभारणी मुख्यत्वेंकरून महाभारतावर केली आहे भारवीनें पांडवांचा पुढला पडता काळ तर माघानें त्यांचा पहिला चढता काळ वर्णिला आहे. ऐश्वर्यसंपन्न पांडवांच्या सुराज्यांत प्रजा सुखी झालेली असून सर्वत्र शांतता नांदत होती. अशा वेळीं ' धर्मानें राजसूय यज्ञ करावा ' अशी सूचना त्याला त्याच्या स्नेह्यांनीं केली. स्वर्गस्थ पंडूचीहि तीच इच्छा असल्याचें नारदानें धर्मास सांगितलें. पण या मोठ्या जोखमीच्या कामाला हात घालण्यापूर्वी धर्मानें कृष्णास द्वारकेहून मुद्दाम बोलावून आणून त्याचा सल्ला विचारला. श्रीकृष्णानें प्रथम जरासंधवध, नंतर दिग्विजय व मगच राजसूय यज्ञ करणें इष्ट होईल असें सांगितलें. त्याप्रमाणें कृष्णसाहाय्यानें पांडवांनीं जरासंधाला मारून दिग्विजय केला व चारी दिशांची संपत्ति हस्तिनापुरांत सांठविली. या तयारीनंतर धर्म निर्वेधपणें राजसूय यज्ञ करण्यास प्रवृत्त झाला ( सभापर्व अ. १३-३२ ). यापुढची कथा— अध्याय ३३ ते ४५— श्लोक १-३०— माघानें आधारास घेतली असून त्यांत राजसूय यज्ञाची प्रचंड तयारी, शेंकडों विद्वान् ब्राह्मण, यादव, कौरव व शिशुपालादि देशोदेशींचे राजे याचें हस्तिनापुरांत आगमन, यज्ञांत श्रीकृष्णाची अग्रपूजा, त्यामुळें शिशुपालाचा जळफळाट, भीष्म-शिशुपाल याचा वाक्कलह व अखेर उद्दाम शिशुपालाचा श्रीकृष्णाकडून वध हे विषय तींत आले आहेत. पण ही कथा माघानें 'शिशुपालवधा'च्या चौदा ते बीस सर्गांत म्हणजे $\frac{1}{3}$ उत्तरभागांत आधार म्हणून घेतली असून

पहिल्या १३ सर्गांची, म्हणजे $\frac{2}{3}$ पूर्वभागाची, सजावट स्वतंत्र तऱ्हेनें केली आहे.

## पुराणांचा आधार.

'सजावट स्वतंत्र तऱ्हेनें केली' याचा अर्थ मारताचा आधार घेतला नाहीं येवढाच समजावयाचा. माघानें या स्वतंत्र सजावटीला पहिला आधार भागवत व विष्णु या दोन पुराणांचा घेतला आहे. 'दुष्ट शिशुपालाला मारून लोकाना त्याच्या छळांतून श्रीकृष्णानें मुक्त करावें' असा इंद्राचा संदेश घेऊन नारद द्वारकेला श्रीकृष्णाकडे येतात. त्या संदेशाप्रमाणें शिशुपालवधाचा विचार श्रीकृष्ण करतो. तोंच युधिष्ठिराकडून त्याला राजसूय यज्ञाचें निमंत्रण येतें. त्यामुळें आधीं शिशुपालावर स्वारी करावी? कीं आधीं पांडवांच्या यज्ञाला जावें? असा पेंच कृष्णाला पडतो. म्हणून तो बलराम व उद्धव यांचा सल्ला घेतो; व उद्धवाच्या मताप्रमाणें राजसूय यज्ञाला जाणें व शिशुपालाचें पारिपत्य करणें या दोनहि गोष्टी एकदमच साध्य करण्याचें ठरवून इंद्रप्रस्थाला मोठ्या सेनेसह येतो. हस्तिनापुरांत आल्यावर पांडव श्रीकृष्णाचें थाटानें स्वागत करून त्यास नगरींतून मिरवीत नेतात व मयसभा दाखवतात. हा माघाचा पहिल्या तेरा सर्गांतील माग मारतांत नाहीं. अशासारखा प्रसंग केवळ शिशुपालाऐवजीं जरासंध एवढ्या फरकानें वैष्णव भागवतमहापुराणांत (दशमस्कंद—उत्तरार्ध अ. ७०-७३) वर्णिला आहे. तेथें जरासंधानें बंदींत टाकलेल्या राजातर्फेचा एक दूत एके दिवशीं श्रीकृष्णाकडे येतो व त्या राजाचे हाल वर्णन करून श्रीकृष्णानें त्यांस सोडवावें अशी विनंति करतो. हें त्याचें भाषण चाललें आहे तोंच नारद कृष्णाकडे येऊन त्यास धर्माच्या राजसूय यज्ञाचें निमंत्रण देतात. जरासंधाचें पारिपत्य? का राजसूयासाठीं गमन? असा पेंच श्रीकृष्णाला पडतो. म्हणून तो केवळ उद्धवालाच (बलरामाला नाहीं) सल्ला विचारतो. केवळ यज्ञाला जाण्यानेंच दोनहि गोष्टी साधण्यासारख्या आहेत अशा उद्धवाच्या सल्ल्याप्रमाणें राजसूय यज्ञासाठीं श्रीकृष्ण यादवसेनेसह निघतो. अनेक नद्या व पर्वत ओलांडून तो हस्तिनापुरास आल्यावर तेथें त्याचें थाटाचें स्वागत होतें. त्याची मिरवणूक पहावयास पुरस्त्रिया येतात. तेथें गेल्यावरच दिग्विजय व जरासंधवध यांचा बेत ठरतो. जरा-

संधवधानंतर राजसूय यज्ञ सुरू होतो व मग त्यांत श्रीकृष्ण उद्दाम शिशुपालाचा सभास्थानींच वध करतो (भागवत १० उत्तरार्ध प्र. ७०-७४). याप्रमाणें माघकाव्य व भागवत यांच्या कथानकांत बरेंचसें साम्य आहे.

## कोण कोणाचा आधार घेतो ?

पण माघानेंच्च भागवतपुराणाचा आधार घेतला, भागवतपुराणकारानें माघकाव्यांतील मजकूर घेतलेला नाहीं, हें सिद्ध होण्यास वरील नुसत्या कथासाम्यापेक्षां भागवताचें माघपूर्वत्व प्रथम सिद्ध झालें पाहिजे. भागवतांत असलेला कलियुगांतील भविष्यकालीन राजवंशवर्णनपर भाग अविश्वसनीय असल्यानें पार्जिटर त्याचा काळ नववें शतक मानतो. पण हा राजवंशवर्णनाचा विवाद्य भाग त्यांतून वगळल्यास इतर भागापुरतें त्याचें प्राचीनत्व मान्य होण्यासारखें आहे; व विल्सननें तें मान्य केलेंहि आहे. शिवाय, भागवतपुराणाचा उल्लेख शंकराचार्य, त्यांचे परमगुरु गौडपादाचार्य, ऋग्विधानकार व जैमिनीअश्वमेधकार ( इ. पू. १०० ), एक प्रमाणग्रंथ म्हणून, करीत असल्यानें तें निदान सातव्या शतकापूर्वी तरी विद्वन्मान्य होऊन राहिलें होतें हें निश्चित आहे ( त्र्यं. गु. काळे- पुराणनिरीक्षण पृ. ३३ व ८०-८१ ). शिवाय माघानेंच भागवताचा आधार घेतला, भागवतसंस्करणकारानें माघाचा आधार घेतला नाहीं, ही गोष्ट शिशुपालवध व भागवतांतील हा प्रसंग यातील तफावतहि जरा सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास स्वतंत्रपणें लक्षांत येण्याजोगी आहे. महापराक्रमी जरासंधाऐवजीं त्याचें सैनापत्य पत्करून राहिलेला शिशुपाल, जरासंधपीडित राजांबद्दल शिशुपालपराक्रमानें बेचैन झालेला इंद्र, साध्या राजदूताऐवजीं देवर्षि नारद, मसलतींत उद्धवाबरोबर बलराम, अग्रपूजेसाठीं श्रीकृष्णाचें नांव सुचविणाऱ्या भीष्माऐवजीं सहदेव, राजसूयार्थ कृष्ण हस्तिनापुरास थाटामाटानें गेल्यावर मग दिग्विजय व जरासंधवध या क्रमाऐवजीं प्रथम जरासंधवध व मग दिग्विजय ( शि. २.९-६० ) इतक्या महत्त्वाच्या गोष्टींत माघकथा व भागवत यांत तफावत आहे. माघावरून पुराणसंस्करणकारानें ही कथा घेतली असा आक्षेप घेणारांनीं वरील सर्व बदल करण्यांत त्याचा हेतु कोणता होता हें सांगितलें पाहिजे. आमच्या मतें इतके बदल करण्याचें संस्करणकारास कांहींच कारण नव्हतें. माघाला मात्र भागवत-

कथेंत फरक करण्यांस कांहीं कारणें होतीं. त्यांचें विवेचन पुढें येईलच. जातां जातां 'नोवाच किंचिद्भगवान् यथा सिंहः शिवारुतम् । (भाग.७४.३८) या भागवतांतील एका साध्या पौराणिक थाटाच्या मूळ श्लोकाचें माघानें केलेलें 'प्रतिवाचमदत्त केशवः शपमानाय न चेदिभूभुजे । अनुहुंकुरुते घनध्वनिं न हि गोमायुरुतानि केसरी ॥ (शि.१६.२५) हें प्रौढ व डौलदार रूपान्तर वरील आक्षेपकांच्या नजरेस आणतो. तसेंच विष्णूचे अवतार सांगताना भीष्मस्तुतींत माघानें इतर अवतारांबरोबर 'दत्तात्रेय' या अवताराचा उल्लेख केला आहे (शि. १४.७९). भागवांतहि दोन ठिकाणीं (स्कंद २.७.४ व ६.८.१६) इतर अवतार वर्णितांना दत्तात्रेयाचा स्पष्ट उल्लेख आहे. माघानें भागवताप्रमाणेंच वराहावतारापासून सुरवात केली आहे हीहि गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. माघ हा आधारभूत भारतकथेच्या जोडीला पुराणांतील कथांचा आश्रय करतो हें दाखविण्यास दुसराहि पुरावा आहे. पहिल्या सर्गांतील शिशुपालाचे भारतांत न सांगितलेले दोन पूर्वजन्म– म्हणजे प्रथम हिरण्यकशिपु व नंतर रावण– माघ विष्णुपुराणाच्या आधारें वर्णीत आहे (विष्णु. अंश ४, अध्याय १४-१५). 'हिरण्यकशिपुर्दैत्यो यां यां स्मित्वाऽप्युदैक्षत । भयभ्रान्तैः सुरैश्चक्रे तस्यै तस्यै दिशे नमः' या अग्निपुराणांतील कल्पनेवर माघानें आपल्या 'स संचरिष्णुर्भुवनत्रयेऽपि' (शि. १.४६) या श्लोकाची न ' पितामहः पितॄन्सृष्ट्वा मूर्तिं तामुत्ससर्ज ह ' या भविष्यपुराणोक्त कल्पनेवर ' विहिताञ्जलिर्जनतया दधती' (शि.९.१४) या श्लोकाची उभारणी केली आहे.

## भारवि व माघ–साम्यस्थलें.

माघाच्या या दोनतृतीयांश स्वतंत्र सजावटीला वरील पौराणिक भागांव्यतिरिक्त तिसराहि एक मोठा आधार आहे. तो म्हणजे भारवि, कालिदास इत्यादि महाकवींचीं महाकाव्यें. पण माघाचा भर त्यांतल्या त्यांत भारवीवर फारच आहे. भारवीच्या पहिल्या सर्गांत दुर्योधन या खलनायकाचें उठावदार वर्णन आहे (कि.१.७-२४). तसेंच माघाच्या पहिल्या सर्गांत खलनायक शिशुपालाचें (शि. १. ४२ ७२) त्यापेक्षां उठावदार व विस्तृत वर्णन आहे. भारवीच्या दुसऱ्या सर्गांत (व पहिल्या सर्गाच्या शेवटींहि) द्रौपदी, भीम व युधिष्ठिर यांमधील 'पुढें काय करावें' याबद्दलची राज-

कारणचर्चा आहे तशी माघाच्या दुसऱ्या सर्गांत कृष्ण, बलराम व उद्धव यांमधील 'पुढें काय करावें' याबद्दलची राजकारणचर्चा आहे. भारवीचा व्यासयुधिष्ठिरसंवाद (कि. ३. १-१३) तर माघाचा नारदकृष्णसंवाद (शि. १. २६-३३). भारवीचें षड्ऋतुवर्णन (कि. सर्ग ४ व १०) तर माघाचें षड्ऋतुवर्णन (शि. सर्ग ६). भारवीचें हिमालयवर्णन (कि. सर्ग ५) तर माघाचें रैवतकपर्वतवर्णन (शि. सर्ग ४). पुष्पावचय, जलक्रीडा, पानगोष्ठी, सुरत, सायंकाळ, अंधकार, चंद्रोदय व प्रभात यांचें भारविकृत वर्णनें (कि. सर्ग ४ ते १०) तर त्याच विषयांचीं माघकृत अधिक विस्तृत वर्णनें (शि. सर्ग ४ ते ११). भारवीचें चित्रयुद्धवर्णनप्रसंगीं निरानिराळ्या बंधाचें चित्रकाव्य (कि. सर्ग १५) तर माघाचें तेंच युद्ध वर्णितांना तसेंच पण अधिक करामतीचें चित्रकाव्य (शि. सर्ग १९). भारवीचा किरातराजा यूद्धापूर्वी आपला एक चतुर दूत अर्जुनाकडे धमकीचा समेट घडवून आणण्यासाठीं धाडतो, पण तो त्याचा प्रयत्न विफल होतो (कि. सर्ग १३-१४) तर माघहि तोच प्रकार त्याच परिणामासह शिशुपालाकडून करवितो (शि. सर्ग १६). हिमालयाचें सौंदर्य अर्जुनाच्या नजरेस जसा भारवीचा गुह्यक आणतो तसें रैवतकाचें सौंदर्य कृष्णाचे नजरेस आणणारा माघाचा दारुक कां नसावा? भारवीनें दर सर्गाचे शेवटच्या श्लोकांत 'लक्ष्मी' शब्द आणला तर माघानें 'श्री'. भारवीनें शिव मुख्य दैवत केलें तर माघानें विष्णु (कृष्ण). भारवीची अर्जुनकृत शिवस्तुति व शिवाच्या अष्टमूर्तींचें वर्णन (कि. १८. २२-४२) तर माघाची भीष्मकृत विष्णु-(कृष्ण)स्तुति व विष्णूच्या दशावतारांचें वर्णन (शि. १४. ५८-८६). शिवाय सैन्याचें प्रमाण, युद्धांतील सारखेच शस्त्रास्त्रप्रयोग इत्यादि साम्यें आहेतच. महाकाव्यरचनेच्या नियमांमुळें यांतील कांहीं विषय दोन्ही ठिकाणीं सारखे येतील हें मान्य केलें तरी वरील इतर अनेक साम्यांची वासलात या साध्या कल्पनेनें होण्यासारखी नाहीं.

**कालिदास व माघ–साम्यस्थलें.**

याशिवाय भारवि-माघांतलीं पुढील कल्पनासाम्यें पहाः—

कि. ७.३६ व शि. ५.३९, कि. ६.११ व शि. ५.४०, कि. ८.१९ व शि. ७.५७, कि. ८.३५-३६ व शि. ८.२९, कि. ९.३७

व शि. १०.३०. अशा साम्यस्थलांची मोठी यादी हर्मान् याकोबी या साक्षेपी पाश्चात्य पंडितानें 'व्हियेन्ना ओरियंट्ल् जर्नल्' भाग ३ मध्यें 'भारवि व माघ' या आपल्या व्यासंगपूर्ण लेखांत दिली आहे ती जिज्ञासूंनीं अवश्य पहावी. भारवीखालोखाल कालिदासाचीं साम्यें माघामध्यें आहेत. रावणानें केलेला देवांचा छळ वर्णितांना ( शि १.५१-६६ ) माघाच्या डोळ्यांसमोर कुमारसंभवांतील तारककृत देवांची दैना ( कु. २.३३-५० ) निश्चितपणें होती. तसेंच शिशुपालाच्या सैन्याला होणारे अपशकुन ( शि. १५.८१-९६ ). माघाला रघुवंशांतील दशरथाला होणाऱ्या अपशकुनांवरून ( रघु ११. ५८-६१ ) सुचले असल्याचा संभव दिसतो. तसेंच प्रभात व सायंकाल यांच्या वर्णनांतील पुढील साम्यें पहाण्यासारखीं आहेत– रघु. ५.७१ व शि. ११.२५, कु. ८.४४ व शि. ९.१४, रघु. ५.६७ ( खंडिता ) व शि. ११.३१-३५ इत्यादि. श्रीकृष्णाची मिरवणूक हस्तिनापुरांतून निघाली असतां त्याला पहावयास आलेल्या स्त्रियाना झालेली शृंगारबाधा माघ वर्णितो ( शि. १३.३१-४८ ). ह्या वर्णनामागें अज-इन्दुमती वा शंकर-पार्वती यांस विवाहाच्या मिरवणुकींत पहावयास आलेल्या पुरस्त्रियांच्या वर्णनाची ( रघु.७.५-१६ व कु. ७. ५६-६९ ) प्रेरणा आहे. याशिवाय भट्टी, कुमारदास, बाण वगैरेंचें कांहीं ऋण माघ लागतो कीं काय याची चर्चा स्थलसंकोचास्तव येथें करतां येत नाहीं. ज्यानें दुसऱ्या कवींच्या काव्यांतून कांहीं उचललेलें नाहीं असा कवि प्रायः नसतो ( नास्त्यचौरः कविजनः । का. मी. ) हें खरें असलें तरी माघाचें परानुकरण जास्त प्रमाणांत आहे असें दिसून येईल. नुसतें कल्पनासाम्य व विषयसाम्य तर राहोच पण माघानें भारवीच्या 'किरातार्जुनीया'ची आंखणी व मांडणी नजरेसमोर धरूनच आपल्या महाकाव्याच्या विषयाची निवड, आंखणी व मांडणी केली आहे व कालिदासाच्या कल्पना व वर्ण्यविषयहि जोडीला घेतले आहेत हें आतां वाचकांच्या ध्यानीं येईल.

**परानुकरण हाच प्रेरक हेतु.**

मूळ आधारभूत कथेंत कवीनें घातलेल्या नवीन भरीवरून त्याच्या काव्यरचनाहेतूची स्पष्ट कल्पना येते हा जो भारवीस लाविलेला नियम

तो आपण माघास लावून पाहूं. माघानें दोनतृतीयांश नवीन भाग आपल्या काव्याला कशासाठीं जोडला ? या प्रश्नाचें उत्तर, भारवि किंवा कालिदास यांचें अनुकरण करावें किंवा जमल्यास त्या त्या विषयांतच त्यांच्यावर मातहि करून दाखवावी या हेतूसाठीं, असें द्यावें लागतें. माघानें भागवतोक्त कथेची जोडलेली पुस्ती व तिच्यांत केलेले बदल वरील हेतू-साठींच आहेत. फार झालें तर माघाचा कथानायक कृष्ण असल्यानें ( व माघ स्वतां विष्णुभक्त असल्यामुळें ) श्रीकृष्णाच्या चरित्राला चांगला उठाव देणें हाहि एक माघाचा पोटहेतु मानतां येण्यासारखा आहे. भाग-वतकथेंतील जरासंधाऐवजीं त्याचा सेनापति शिशुपाल हा फरक माघानें करण्याचें संभवनीय कारण असें कीं जरासंधवधाचें सगळें श्रेय श्रीकृष्णाच्या पदरीं पडत नाहीं. कृष्ण या कामात साहाय्यक असला तरी भीमानेंच जरासंधाला ठार केलें. शिशुपालवध मात्र एकट्या कृष्णानेंच केला. श्री-कृष्णाचा पराक्रम मोठा असें दाखवावयाचें असल्यास त्याचा शत्रूहि फारच बलाढ्य होता असें दाखविणें क्रमप्राप्त आहे. म्हणून विष्णुपुराणाच्या साहाय्यानें माघ आपल्या शिशुपालाला भारतांतील व भागवतांतील शिशु-पालापेक्षां फारच मोठा करतो; शिवाय भारवीच्या खलदुर्योधनाला तोडीस तोड तो व्हावा हाहि त्याचा दुसरा हेतु होताच. आतां शिशुपालाला मोठा करावयाचा म्हणजे त्याच्या दुष्ट पराक्रमानें खुद्द इंद्राच्याहि उरांत धडकी भरून तो बेचैन झाला पाहिजे व त्यानें श्रीकृष्णाला त्याला मारण्याची विनंति केली पाहिजे, तरच श्रीकृष्णाचें माहात्म्य व शिशुपालाचा बाडिवार. आतां इंद्रानें श्रीकृष्णाला विनंति करावयाची तर देवर्षि नारदासारख्या महनीय दूताकडूनच ती केली पाहिजे. शिवाय भारवीच्या कथेंत इंद्र व व्यास आहेत. त्यांच्या तोडीस माघालाहि आपल्या कथेंत इंद्र व व्यासाच्या तोलाचे नारद आणणें क्रमप्राप्त वाटलें. श्रीकृष्णानें आपल्या राजकार-णाच्या मसलतींत उद्धवाबरोबर बलराम घेतला याचें कारण भारवीच्या चर्चेंत तीन माणसें होतीं. अग्रपूजेसाठीं श्रीकृष्णाचें नांव सहदेवानें सुच-विणें यापेक्षा तें भीष्माकडून सुचाविण्यांत कृष्णाचा मोठेपणा होता. कृष्णाचा हस्तिनापुरप्रवेश थाटामाटानें झाल्यावर लगेच राजसूयाला सुर-

वात व्हावी हें कथेच्या परिणामकारकतेच्या दृष्टीनें बरें दिसतें, म्हणून माघानें हा फरक केला. हा झाला भागवत व माघ यांच्या तफावतींतील खुलासा. आतां भागवतांतील कथा माघास कशी उपयोगी पडली तें पाहूं. भागवत-कथेमुळेंच खलनायक, राजकारणचर्चा, प्रयाणवर्णन, पुष्पावचय, जल-क्रीडा, पानगोष्ठी, सुरत इत्यादि मागें सांगितलेले अनेक विषय आपल्या कथेंत गोंवून भारवीच्या महाकाव्यास तोडीस तोड माघाला उठवितां आली. पण हा माघाचा हेतु केवळ पहिल्या तेरा सर्गांतच नसून तो पुढील भागांतहि आहे हें भारविमाघांच्या वर दाखविलेल्या साम्यस्थलांवरून नजरेस येईल. शिशुपाल कृष्णाकडे दूत पाठवितो हा माग भारतांत नसूनहि माघ तो वर्णितो याचें कारण त्याला भारवीच्या कथेशीं तोडीस तोड उभी करा-वयाची होती म्हणूनच. भीष्माच्या तोंडीं घातलेली श्रीकृष्णाची प्रदीर्घ स्तुति व तींतील दशावतारांचें वर्णन यांचा हेतु भारवीच्या अर्जुनस्तुतीला तोडीस तोड माघाला उभी करावयाची होती हाच मानावा लागतो. वास्तविक पाहिलें तर महाभारतकालीं अवतारांची केवळ अस्पष्ट कल्पना असली तरी दशावतारांचें परिगणन संपूर्ण तऱ्हेनें तयार झालें नव्हतें.

**परस्पर्धाहि जोडीला आहे.**

वरील विवेचनावरून आतां हें ध्यानीं येईल कीं माघाची महाकाव्य-रचनेची प्रेरणा भारवीच्या अनुकरणलालसेंत आहे. शिवाय हें अनुकरण त्यानें अगदीं साळस हेतूनें केलेलें आहे असें दिसत नसून भारवीवर आपण मात करून दाखवावी या स्पर्धेच्या बुद्धीनें केलेलें दिसतें. कारण वरील सर्व साम्य-स्थलांत माघानें आपली म्हणून कांही नवीन करामत करून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ही नवी करामत वर्णनाच्या विस्तारांत, उपमा-उत्प्रेक्षांच्या चढत्यावाढत्या संख्येंत, पांडित्यप्रदर्शनांत, शब्दालंकारांच्या आधिक्यांत व विशिष्ट व्याकरणप्रयोगांत आहे. भारवीनें चौदा वृत्तें वापरलीं आहेत तर माघानें तेवीस. कालिदासानें रघूच्या नवव्या सर्गांत द्रुतविलंबित वृत्त वापरून त्यांत केवळ चौथ्या चरणांत 'विरुरुचे रुरुचेष्टित-भूमिपु' (रघु. ९·५१) असें यमक साधलें आहे. पण माघानें आपल्या काव्याच्या सहाव्या सर्गांत तेंच वृत्त व तेंच यमक प्रथमच्या ६६ श्लोकांत वापरून आपली नवी करामत म्हणून पुढें प्रभा, स्वागता, उपजाति,

औपच्छंदासिक, तोटक, कुटजा, मत्तमयूर व वसंततिलका या वृत्तांत दुसऱ्या व चौथ्याहि चरणांतून यमकें बसवून दिलीं आहेत. भारवीच्या पंधराव्या सर्गांतील सर्वतोभद्र, अर्धभ्रमक, अर्थत्रयीवाची इत्यादि चित्र-काव्यांचे सर्व प्रकार माघानें आपल्या एकोणिसाव्या सर्गांत आणले असून शिवाय गतप्रत्यागत ( ८८ ), असंयोग ( ६८ ), अतालव्य ( ११० ) इत्यादि नवे चित्रबंध रचले आहेत. कालिदास-भारवी संध्याकाळ, प्रभात इत्यादींचीं वर्णनें अगदीं थोडक्यांत करतात; तर माघानें याच विषयां-साठीं बेचाळीस श्लोक व प्रभातवर्णनासाठीं सदसष्ट श्लोकांचा एक खास अकरावा सर्ग खर्ची घातला आहे. माघाच्या राजकारणचर्चेंत भारवीपेक्षां अधिक पाडित्य आहे. यावरून माघाचा परस्पर्धेचा हेतु स्पष्ट होतो.

## प्राचीन पंडितांत माघाची वाहवा.

वास्तविक महाकवि होण्याची इच्छा व त्यासाठीं परस्पर्धा हा कांहीं दोष नव्हे फक्त परस्पर्धेंत कवीला स्वत्वाचा विसर पडूं नये व परक्याच्या केवळ बाह्यांगाच्याच अनुकरणांत त्यानें स्वसामर्थ्य वेंचूं नये म्हणजे झालें. कालिदासहि 'कवियशःप्रार्थी' होता. व्हर्जिलनें आपलें 'एनीड' (Æneid) होमरच्या ईलियडशीं स्पर्धा करण्यासाठींच लिहिलें. माघानें ही आपली महत्त्वाकांक्षा मोठ्या विनयानें बोलून दाखविली आहे. तो म्हणतो, "मीं हें काव्य महाकवीची कीर्ति मिळविण्याच्या दुरभिलाषानें लिहिलें" (सुकविकीर्तिदुराशया). तसेंच तें जर कोणास आकर्षक वाटलें तर तें त्यांतील श्रीकृष्णचरित्राच्या वर्णनामुळेंच (लक्ष्मीपतेश्चरितकीर्तनमात्रचारु), त्यांतील काव्यगुणांमुळें नव्हे. यांतील विनय ठीक आहे. पण या विनयां-तील स्वसामर्थ्याच्या जाणीवेची उमदी खोंचहि ध्यानांत घेण्यासारखी आहे. आणि असें प्रचंड सामर्थ्य माघामध्यें दिसतेंहि. ज्या ज्या ठिकाणीं त्यानें कालिदास भारवींच्या स्थलांचें अनुकरण केलें आहे तेथें तेथें त्यानें आपलें म्हणून कांहीं नवें प्रकट केलेंच आहे. विशेषतः अशी उघड उघड चुरस उत्पन्न करून कवि त्याच विषयावर अधिक उठावदार वर्णनें करूं लागला म्हणजे कांहीं शर्यतप्रेमी टीकाकारांची चांगलीच करमणूक होते. व मग ते त्यांतील एखाद्याचें थोडेंसें वैशिष्ट्य पाहून 'यानें जिंकली रे जिंकली' असा जयघोष करतात. माघाच्या काव्यांतील कल्पनाप्राचुर्य, वृत्तप्रभुत्व,

पांडित्य, भाषाज्ञान हीं खरोखरच विस्मयावहच आहेत. व याच गुणांनीं दिपलेल्या कांहीं प्राचीन रसिकांनीं त्याला भारविकालिदासांहूनहि श्रेष्ठ ठरविलें आहे. पांचहि महाकाव्यांवर टीका लिहिणारा रसिक पंडित मल्लिनाथ सुद्धां 'धन्य तो माघ व धन्य आम्ही त्याच्या काव्याचे आस्वादक' असे उद्‌गार सादर कौतुकाच्या भरांत काढतो.

**माघांतला मंद रवि !**

कोणा एका कोटिप्रिय माघभक्तानें माघाच्या वरील काव्यगुणांनीं दिपून जाऊन त्याची पुढीलप्रमाणें स्तुति व भारवीची निंदाहि एकाच श्लोकांत केली आहे. 'जोंपर्यंत माघकाव्य रसिकांच्या दृष्टिक्षितिजावर उदय पावलें नाहीं तोंपर्यंतच भारवीचें तेज पडावयाचें ! एकदां का माघ दिसला कीं शिशिरऋतूंत माघमासांतील 'रवी'ची 'भा' (प्रभा) जशी फिकी पडते तशी भारवीची गत होते' ! (तावद् भा भारवेर्भाति यावन् माघस्य नोदयः । उदिते तु पुनर्माघे भारवेर्भा रवेरिव ।) 'भारवि' व 'माघ' या शब्दांवरील हाच श्लेष वापरून राजशेखर म्हणतो, 'रवीच्या (प्र)भेप्रमाणें भारवीची वाणी सर्वांना जागृत करणारी आहे. पण माघकाव्याचा प्रभाव दिसूं लागतांच शिशिर ऋतूंतील माघमासाच्या थंडीमुळें माणसांचीं शरीरें जशीं कांपूं लागतात तसें कोणा कवीला (आपल्या हीनत्वदर्शनानें) कांपरें भरणार नाहीं ?' (कृत्स्नप्रबोधकृद् वाणी भा रवेरिव भारवेः । माघेनैव च माघेन कम्पः कस्य न जायते ।). तसेंच, आणखी तोच श्लोक व तेंच अत्युक्त मत ! 'माघमासांतील थंडीमुळें हतप्रभ झालेल्या सूर्याच्या नुसत्या आठवणीनें जसे कपींचे पाय काकडूं लागतात तसे माघाच्या काव्यगुणांमुळें भग्नोत्साह झालेल्या कवींचेहि हातपाय- माघापुढें भारवीची केविलवाणी स्थिति झाली या स्मरणानेंच- कांकडतात' (माघेन विघ्नितोत्सहा नोत्सहन्ते पदक्रमे । स्मरन्तो भारवेरेव कवयः कपयो यथा ।) शिवाय 'कालिदास, भारवि व दंडी यांच्या विशिष्ट गुणाचा एकच रांधा म्हणजे माघ' ही अतिशयोक्ति प्रसिद्धच आहे.

**हृदयाचा कानोसा.**

पण वरीलसारखे अभिप्राय माघाच्या पांडित्य, बेफाट कल्पनाशक्ति, वृत्तप्रभुत्व, शब्दालंकारप्राचुर्य इत्यादि काव्याच्या बाह्य बौद्धिक अंगांवर

आधारलेले असून माघाच्या उघड स्पर्धाबुद्धीमुळेंच त्यांत इतर थोर कवींशीं अयोग्य तुलना करण्याची प्रवृत्ति पंडित टीकाकारांत उत्पन्न झाली आहे. प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं केवळ परस्पर्धा हा प्रेरक हेतु गौण आहे. आत्मनिष्ठा हा खरा प्रेरक हेतु आहे. कवीची खरी योग्यता त्याच्या केवळ बौद्धिक बाह्य गुणांवरच ठरत नसून त्याच्या भावनात्मकतेवर, त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्कारावर व त्याच्या काव्यरचनेच्या स्वनिष्ठ हेतूवर ठरत असते. म्हणून माघाच्या सहृदय वाचकांनीं आपली दिपलेली बुद्धि क्षणभर एकीकडे सारून माघकाव्याच्या रसात्मकतेचा आस्वाद घेण्यासाठीं आसुसलेल्या आपल्या हृदयाचा कानोसा घ्यावा. पूर्वग्रह बाजूस ठेवून, हा कानोसा घेतल्यानंतर व तो प्रामाणिकपणें बोलून दाखविण्याचें ठरविल्यानंतर आपल्यास हें वाचकहृदय असें सांगत असलेलें आढळून येईल कीं, " माझें समाधान झालें नाहीं. मला हलवून किंवा थरारून टाकणारे प्रसंग मला फारसे आढळले नाहींत. डोकें मात्र 'वाहवा वाहवा' असे उद्गार वरचेवर काढीत असलेलें मला दिसत होतें." रसिकांच्या हृदयाचे हे बोल जर पुरेसे प्रातिनिधिक असतील- आणि ते तसे आहेत याबद्दल संशय नाहीं- तर माघाच्या बुद्धिवैभवाबद्दल व प्राचीन पंडितांच्या माघप्रशंसेबद्दल योग्य तो आदर बाळगूनच माघाच्या खऱ्या काव्यगुणाचें थोडेंसें निर्भिड विवेचन आतां करणें अवश्य आहे. पण तें करण्यापूर्वी कवीचें व्यक्तिमत्त्व म्हणजे काय तें प्रथम थोडें पाहूं.

## कवीचें व्यक्तिमत्त्व म्हणजे काय?

'व्यक्तीं तितक्या प्रकृती', 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना', 'भिन्नरुचिर्हि लोकः' इत्यादि म्हणींनीं आपण प्रत्येक माणसाचें वेगळें स्वत्व मान्य केलें आहे. हें त्याचें 'स्वत्व' माणसाला त्याच्या विशिष्ट उपजत मनोरचनेमुळें म्हणजे त्याच्या जात्याच उत्कट किंवा अनुत्कट सहज प्रेरणांनीं ( Instincts ) व त्याच्या विशिष्ट अनुभवानें येतें. विशिष्ट परिस्थितीशीं अनुसंधान राखणाऱ्या माणसाच्या या विशिष्ट मनोरचनेला विशिष्ट अनुभवानें पक्केपणा येतो. या पक्केपणालाच ग्रह, मतें किंवा अभिनिवेश म्हणतात. हे ग्रह किंवा भावबंध ( Sentiments ) प्रायः भावनात्मक ( Affective ) असतात व या मतांप्रमाणेंच माणसाचें

वर्तन होतें व त्याचा खभावहि (Disposition) बनतो. कोणी प्रवृत्तितः शृंगारी तर कोणी विरागी, कोणी तेजस्वी, स्वाभिमानी व आक्रमक तर कोणी चेचट, मेणचट व पडखाऊ; कोणी आशावादी व आनंदी तर कोणी निराश व रड्या इत्यादि प्रकारचे लोक जगांत दिसतात. कवीच्या स्वत्वाविषयीं बोलतांना त्याच्या मनाची उत्कट भावनात्मकता व कल्पनाशक्ति या दोन गोष्टी विशेष जमेस धरल्या पाहिजेत. जगांतील विविध घटनांचा, व्यक्तींचा व प्रसंगाचा अनुभव घेत असतां कवीच्या मनाचा जो एक विशिष्ट समुच्चयात्मक बनाव होतो त्याला, त्या ठसठशीत वेगळ्या मनोरचनेला, कवीचें व्यक्तिमत्त्व ( Personality ) म्हणतात. याच व्यक्तिमत्त्वांत त्यांचीं धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक मतें, त्यांचें विद्याकलाज्ञान व त्याच्या इतर वैयक्तिक आवडीनिवडी भुरून राहिलेल्या असतात. म्हणूनच राजशेखर 'ज्या स्वभावाचा कवि तदनुरूप त्याचें काव्य' ( स यत्स्वभावः कविस्तदनुरूपं काव्यम्। का. मी. १० ) असें सांगतो.

## विचार एकरूप पण विकार भिन्न !

हेंच त्याचें व्यक्तिमत्त्व त्याच्या काव्यांत व्यक्त होतें. कारण कवि आपल्या विशिष्ट वृत्तीप्रमाणें आपल्या काव्यविषयाची निवड व सजावट करतो. त्याचे अलंकार, त्याच्या उपमा-उत्प्रेक्षा, त्याचीं पात्रें व त्याची भाषाशैली या सर्वांमध्यें त्याचें व्यक्तिमत्त्व आविष्कार पावतें. विशेषतः रसाविष्कारांत कवीचें व्यक्तिमत्त्व फारच चांगलें व्यक्त होतें. ' दोन नी दोन चार ' यासारखें केवळ बुद्धिद्वारा झालेलें ज्ञान प्रायः सर्वजनसमान आणि एकरूप असतें. पण शृंगारी किंवा विरागी भावनेनें पाहिलेला एकच सूर्यास्त पहाणाऱ्याच्या मनांत वेगवेगळे व व्यक्तिविशिष्ट भावनासंस्कार निर्माण करतो. माणसांचे विचार एकरूप असतात. पण त्यांच्या भावनात्मक प्रतिक्रिया मात्र भिन्न होतात. ( Men *think* alike but do not *feel* alike ). त्यामुळें रसाविष्कारांत कवीचें वैशिष्ट्य दिसून येतें. त्यांतून कवीनें आपला काव्यविषय आपल्या खास जिव्हाळ्याच्या व आपल्या अनुभवाचें सार व्यक्त करणारा असाच निवडला असला तर तो त्यांत जास्तींत जास्त रमतो व वाचकांस रंगवितो. यालाच रसात्मकता म्हणतात. 'शिशुपालवधां'त ही रसात्मकता जर उत्कटपणें व्यक्त

होत नसली तर माघाचें व्यक्तिमत्त्व त्यांत प्रकट झालें नाहीं, आणि आपल्या जिव्हाळ्याचा विषय केवळ स्वयंप्रेरणेनें त्यानें निवडला नाहीं असें म्हणावें लागेल. व भावनेऐवजीं त्याची पांडित्यप्रियबुद्धि व बेफाट कल्पनाच तेवढी त्यांच्या काव्यांत प्राधान्य पावली असा निकाल द्यावा लागेल.

## अंगावर उलटणारा अभिप्राय.

महाकाव्यरचनेचा हेतु, त्या हेतूशीं कवीचें तादात्म्य, त्या तादात्म्यांतून प्रतीत होणारें त्याचें व्यक्तिमत्त्व, व त्या व्यक्तिमत्त्वानुरूप त्यानें केलेली कथेची निवड व सजावट व ती करीत असतांना झालेला त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा शब्दरूप आविष्कार, इतक्या सर्व दृष्टींनीं महाकाव्याकडे पाहिलें पाहिजे. कारण हीं सर्व अंगें नेहमीं एकत्रच गुंफलेलीं असतात. त्यांतील एकच अंग घेऊन त्याची तुलना इतर कवीशीं करीत बसणें अन्यायाचें होतें. केवळ बाह्यगुणावर कवीचें काव्य श्रेष्ठ ठरत नाहीं. माघप्रशस्ति करणाऱ्यांची दृष्टि पुरेशी अंतर्भेदी नाहीं, त्यामुळें काव्याचीं भलतींच मूल्यें व कसोट्या प्रसृत झाल्या. अशी विकृत आणि उथळ अभिरुचि एकदा रूढ झाली कीं ती एखाद्या अस्त्राप्रमाणें असले अभिप्राय देणारावरच कशी उलटते याचा नमुना पहावयाचा असला तर 'नैषधीय' काव्यावरचा असलाच अभिप्राय वाचून पाहावा. माघाला भारवीपेक्षां श्रेष्ठ ठरवितांना कांहींना गोड वाटलें, पण "नैषधीय काव्याचा उदय झाल्यावर तो तुमचा माघ व तो भारवी हे दोघेहि कोठच्या कोठें लोपून जातात" (उदिते नैषधे काव्ये क्व माघः क्व च भारविः ।) हा शेरा ऐकल्यावर मात्र त्यांच्या डोळ्यापुढें काजवे चमकूं लागतील !

## महाकाव्याची स्वकालाशीं समरसता.

कवीचा हेतु, त्या हेतूला साजणारी विषयाची निवड व त्यांतून व्यक्त झालेलें त्याचें 'स्वत्व' या दृष्टीनें आपण 'शिशुपालवधा'चें थोडें परीक्षण करूं. रामायण व महाभारत हीं दोन आर्ष, सर्वजनसुलभ, प्रासादिक, व ऐतिहासिक मूळ महाकाव्यें संस्कृतांत असताना किरातशिशुपालादि नवीं, पंडितगम्य, कृत्रिम, तदुपजीवी, लौकिक महाकाव्यें (Literary Epics) पुनरपि संस्कृतातच कशासाठीं निर्माण झालीं ! त्यांचें प्रवृत्तिनिमित्त

काय ! या प्रश्नांचा विचार व्हावयास पाहिजे. रामायण महाभारतोक्त जुन्या कथाच केवळ कलात्मक पद्धतीनें सांगून जनमनोरंजन करणें, कांतासंमिततया हितोपदेश करणें, देव, देवार्षि, मुनि व धीरोदत्त स्त्रीपुरुष यांच्या वर्णनानें स्वतः पवित्र होणें व वाचकासहि पवित्र करणें, असे या नवनिर्मितीचे कलाविषयक ( Artistic ), नैतिक व धार्मिक हेतु असूं शकतात. पण या वरील हेतूंनाच खरा जिवंतपणा आणणारे याहिपेक्षां अधिक महत्त्वाचे एक दोन प्राणभूत हेतु आहेत. मूळ अस्सल आर्ष काव्यांत व या नवीन कृत्रिम महाकाव्यांत निदान दोन अडीच हजार वर्षांचे अंतर आहे. येवढ्या कालांत मानवी जीवन बदललें, विद्याकलांचा विकास झाला, नवे प्रश्न उत्पन्न झाले, पूर्वीची एकरूप संस्कृति संमिश्र झाली, मनःप्रवृत्तींचा विकास होऊन त्या सूक्ष्म बनल्या, समरांगणावरील प्रत्यक्ष शारीरिक लढ्यापेक्षां मोठाले मानसिक लढे उत्पन्न झाले, कांहीं प्रसंगीं राष्ट्र कांहीं बाबतींत पूर्वसंस्कृतीपासून च्युत झालें तर कांहीं बाबतींत उन्नत झालें.

### महाकवि पुराणिक नव्हे !

अशा परिस्थितींत रामायण-महाभारतांतील जुन्या कथा निवडतांना व त्याचें पुनः कथन करतांना खऱ्या द्रष्ट्या महाकवीला त्याच कथांतून ध्वनिरूपानें आपल्या काळचें कांहीं कमी अधिक सांगावयाचें असणें संभवनीय नाहीं काय ! तसें नसेल तर तो नुसता पुराणिक होईल. जुन्या कथा सांगताना आपल्या काळच्या घटनावर त्यानें कांहीं नवा प्रकाश पाडला नाहीं तर जुनीं आर्ष महाकाव्यें बदलत्या काळाशीं समरस झालेलीं दिसणार नाहींत. व त्यात वाचक पुरेसे रमणार नाहींत. आर्ष वाङ्मयांत सार्वकालिक असा कांहीं अंश असतो हें खरें. पण त्याच्या जोडीला जुन्या कथांची नवीन कालाशीं समरसता कवीनें राखली तरच काव्यवाचकाचा आनंद दुणावतो. कालिदासासारख्या ध्येयवादी कवीनें रघुवंशांतील राजांच्या जुन्या कथा पुनः वर्णन करीत असतां आर्य-संस्कृतीचें अत्यंत उज्ज्वल स्वरूप मांडिलें व आदर्श राजसंस्थेचें कल्पना-रम्य चित्र रंगाविलें. आणि हें करीत असतां त्यानें मुळांत नवीन भर टाकली, कांहीं गाळलें व आपल्या हेतुबरहुकूम आपली नवीन महाकाव्यरचना निर्माण केली हें आपण मागें ( पृ. ३३–३४ व ९७–१०१ ) पाहिलेंच

आहे. त्याचप्रमाणें त्यानें आपल्या रम्य महाकाव्यशिल्पांतून आपल्या ध्येयवादी, कलाप्रेमी, विलासी, प्रेमळ व संस्कृतिप्रिय व्यक्तिमत्त्वाचाहि आविष्कार केला त्याचबरोबर राष्ट्राच्या हृदयाचें स्पंदन आपल्या नाडयांच्या ठोक्यांशीं एकरूप व तालबद्ध आहे हेंहि त्यानें पाहिलें. ही उभयविध समरसता राजशेखरास मान्य आहे. ( कविः प्रथममात्मानं कल्पयेत् । कियान्मे संस्कारः, किंरुचिर्लोकः । का. मी. १० ).

## माघकाव्यांत माघच सांपडत नाहीं !

सर्वच संस्कृत कवींचीं चरित्रें व त्यांच्या वेळची परिस्थिति ही साकल्यानें व विश्वसनीयरीत्या मिळत नाहीं हें खरें. त्यामुळें अमुक एक कवि आपल्या कालाचा प्रश्न आपल्या काव्यांतून मांडीत आहे कीं नाहीं हें निश्चित करण्यास पुरेशीं साधनें नसतात. तरी जुन्या आर्ष काव्यांतील कथांचा कांहीं नवा अर्थ तो बसवीत आहे कीं नाहीं हें मात्र चटदिशीं ओळखतां येतें. भारवीचें चरित्र व त्याच्या कालची परिस्थिति आपणांस माहीत असो वा नसो, 'किरातार्जुनीया'वरून भारवीला वनवासांतील पांडवांच्या कथेचा कोणता नवीन अर्थ लागला हें आपण मागें पाहिलेंच आहे. 'अकालीं आणि अस्थानीं येणाऱ्या निवृत्तीच्या मगरमिठींतून पुनरुस्थानाकांक्षी क्षात्रवृत्तीची सुटका' हा नवीन अर्थ भारवीनें जुन्या कथेंतून काढिला आहे. व तो काढीत असतां कालिदासाप्रमाणें भारवीनेंहि आपल्या मानी, संयमी, तेजस्वी, मारदस्त व चिंतनशील व्यक्तिमत्त्वाच्या आविष्काराला विषयाच्या निवडींत व सजावटींत भरपूर वाव दिला आहे. महाकाव्यें रसपरिपूर्ण असावींत व तीं लोकरंजन व्हावींत असे जे महाकाव्यरचनेचे नियम आहेत ते अशा योजनेंतून उत्पन्न होणाऱ्या रसोत्कट लोकरंजनाशीच मुख्यत्वें संबंधित आहेत असें मानणें अधिक सयुक्तिक होईल. तात्पर्यार्थ, स्वकालीन समाजावर प्राचीन कथांतून पडणारा नवा प्रकाश व कवीच्या राष्ट्रव्यापक व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार हें काव्यरचनेच्या हेतूंचे दोन प्राणभूत हेतु होत. त्यापैकीं एकहि हेतु माघाच्या नवनिर्मितीला प्रेरक झालेला दिसत नाहीं. यामुळें सबंध माघकाव्यांत खरा माघ कोठेंच सांपडत नाहीं. माघांत जें सापडतें तें माघाचें डोकें, हृदय नव्हे. आणि माणसाचें खरें व्यक्तिमत्त्व तर त्याच्या हृदयांत दडलेलें असतें, डोक्यांत

नव्हे. (A man is hidden in his heart and not in his head.)

**मिल्टनचें उदाहरण.**

वनपर्वांतील पांडवांच्या कथेचा अर्थ मारवीला जसा लागला तसा 'शिशुपालवध' कथेचा कोणता अर्थ माघानें आपल्या मनाशीं बसविला आहे ? एका कृष्णनिंदकाचा किंवा फार झालें तर एका दुष्ट राजाचा वध. पण हा हेतु नुसत्या इतिहासकाराच्या इतिवृत्तकथनांत किंवा पुराणिकाच्या पुराणकथनांत ठीक आहे; तेथें महाकवीची आवश्यकता काय ? मिल्टननें महाकाव्यरचनेसाठीं योग्य अशा विषयांची यादी करून ठेविली होती. त्यांत पुराणप्रसिद्ध 'legendary) अर्थरच्या कथेचा विषय पहिला होता. पण पुढें अधिक विचारान्तीं सदर विषय आपल्या प्रकृतीशीं व आपण योजलेल्या हेतूशीं विसंगत आहे असें दिसून आल्यावर त्यानें बायबलांतील प्रसंगावर आपलें 'पॅरेडाइज् लॉस्ट' हें महाकाव्य रचलें. 'What was akin to his own nature he took, the rest he put aside with perfect unconcern' म्हणजे आपल्या प्रकृतिधर्माला जुळण्या-जोगा विषय निवडून इतर विसदृश विषय त्यानें खुशाल बाजूस सारले. (Dixon, P.193). तसेंच 'The artist is then most powerful when he finds himself in accord with the age he lives in. And the plenitude of art is only reached when it marches with the sentiments which possess a community.' (Mark Pattison's Milton.) म्हणजे कलावंत आपल्या काळाशीं पूर्णपणें समरस असेल तेव्हांच त्याचें खरें सामर्थ्य कलाकृतींत प्रकट होतें. व आपल्या समाजाच्या भावनांच्या सुरांत सूर मिसळून चालणाऱ्या कलाकृतीलाच परिपूर्णतेचें वैभव लाभूं शकतें हीं टीकाकारांनीं महाकवि मिल्टनबद्दल केलेलीं विधानें वरील दृष्टीनें अवश्य ध्यानांत घेण्यासारखीं आहेत.

**देवावांचून देव्हारा.**

स्वकालाशीं प्राचीन कथेची समरसता व तीमधून आपल्या व्यक्ति-मत्त्वाचा आविष्कार हे दोन हेतु काव्यरचनेला प्रेरक नसतील तर त्या जुन्या कथेच्या चर्वितचर्वणाशीं कवि कधींच तादात्म्य पावणार नाहीं. फार

झालें तर एखाद्या जुन्या घटनेची छानदार मांडणी त्याला तटस्थ वृत्तीनेंच करतां येईल. माघाचें असेंच होतें आहे. त्याला महाकाव्य लिहून महाकवीची कीर्ति मिळविण्याची जबर महत्त्वाकांक्षा आहे. त्यासाठीं त्यानें पूर्वसूरींचे नमुने नजरेसमोर ठेवले आहेत. त्याचें कविमन अत्यंत संपन्न व सर्जनसमर्थ आहे. भाषाज्ञान व शास्त्रनैपुण्य हीं तर त्याच्यापुढें हात जोडून उभीं आहेत. व्यवहाराचें थोडेंफार निरीक्षण त्यानें केलें आहे. थोडीशी विष्णुभक्तिहि त्याला आहे. सर्व कांहीं आहे. पण पाहिजे तेंच नेमकें नाहीं. त्याला व त्याच्या काळच्या वाचकांना ज्यांत रमतां आलें असतें अशा एका मूलभूत हेतूच्या अनुषंगानें जर त्यानें 'शिशुपालवध' कथेची निवड व मांडणी केली असती तर त्याच्या काव्यकलेचें बाह्यांगहि आज दिसतें त्यापेक्षां कितीतरी पटीनें परिणामकारक झालें असतें. पदलालित्य काय, उपमादि अलंकार काय किंवा अर्थगौरव काय हीं सर्व अंगें कवीच्या व्यक्तिमत्त्वाचेच आविष्कार असल्यानें, 'तें' असेल तरच तीं उजळून दिसतात; नाहीं तर नुसत्या कोरड्या पद्यपंक्तीच्या अलंकारयुक्त रचाईत काय जीव आहे? व विविध वृत्तें वापरून तरी काय मोठासा परिणाम होणार? काव्याचीं हीं बाह्यांगें किंवा फुटकळ अलंकार खरे परिणामकारक व्हावयाला तीं कवीनें निश्चित केलेल्या एखाद्या व्यापक हेतूच्या योजनेंत शिरून कवीच्या विशाल व्यक्तिमत्त्वाशीं एकजीव व्हावीं लागतात.

काव्यांतील कसल्याहि वर्णनांचें उत्थान कवीनें योजलेल्या हेतूंतून होऊन त्याचें पर्यवसानहि त्यांतच झालें पाहिजे. कालिदास शरदृतूचें वर्णन करतो. पण तें त्या ऋतूसाठीं नव्हे किंवा त्यांतील अलंकारासाठींहि नव्हे, तर वर्ण्य रघुराजाचें महिमान खऱ्या प्रेमानें गाण्यासाठीं (पहा रघु. ४.१४-२४). कालिदास प्रभात वर्णितो. पण कशासाठीं? एकदोन उत्प्रेक्षांसाठीं? का खंडिता नायिकेच्या वर्णनासाठीं? छे! तें वर्णन तो अज या भाग्यशाली राजपुत्राच्या प्रेमळपणें केलेल्या बडिवारासाठीं करीत आहे (पहा रघु. ५.६६-७४). मारवि द्रौपदी, भीम व धर्म यांची राजकारणचर्चा वर्णीत आहे (कि. १.२) आणि ब्राह्मण व अर्जुन यांचा संवाद लिहीत आहे (कि. ११) तो काय आपलें नीतिशास्त्रपांडित्य प्रकट करण्यासाठीं! का नुसतें संवादचातुर्य दाखविण्यासाठीं! छे, छे! हीं प्रकरणें

तो अयोग्य आणि अस्थानीं येणाऱ्या निवृत्तीला उखडून काढण्यासाठीं मोठ्या त्वेषानें आणि मानीपणानें लिहीत आहे. अर्थात् या सर्व प्रकरणांत अलंकार आहेत, पांडित्य आहे, भाषाशैली आहे. पण त्यांची शोभा त्या त्या कवींचा हेतु व व्यक्तिमत्त्व यांमुळें आहे. देव, देव्हारा, पूजासाहित्य व खरी भक्ति असेल तरच ती देवपूजा. माघाजवळ नक्षीदार देव्हारा व संपन्न पूजासाहित्य आहे, व पूजेचे मंत्रतंत्रहि तो जाणतो. पण हेतूचा देव व पूजकाची उत्कट भक्ति तेवढी त्याजपाशीं नाहीं. व त्यामुळें 'शिशुपालवध' हें काव्य देवावांचून देव्हारा व भक्तिविरहित पूजासाहित्य आहे असें वाटल्यावांचून रहात नाहीं.

## निसर्गवर्णनांचेंहि वृत्तीशीं तादात्म्य हवें.

परानुकरण किंवा परस्पर्धा यांच्यामागें न लागतां माघानें जर आपल्या व्यक्तिमत्त्वावर विसंबून 'शिशुपालवध' कथेचा एखादा स्वकालोचित उदात्त अर्थ नजरेसमोर ठेवला असता तर याच काव्यगुणावर त्यानें आपलें काव्य निराळ्या पद्धतीनें नटविलें असतें. त्यानें कालिदासाचें अनुकरण प्रसंगाच्या निवडींत व कांहीं कल्पना मांडण्यांतहि केलें आहे. पण माघ हें विसरला कीं कालिदासाचीं कोणतींहि वर्णनें त्याच्या हेतूंशीं निगडित असून त्याच्या खास व्यक्तिमत्त्वांतून उजळून निघालेलीं असतात. शिवाय तीं वर्ण्यप्रसंगांचीं अंगें असून फारच प्रमाणशीर असतात. 'कुमारसंभवा'च्या आठव्या सर्गांत सायंकाल, सूर्यास्त, अंधकार व चंद्रोदय यांचीं त्यानें केलेलीं वर्णनें त्या त्या विषयावरील स्वतंत्र उपमाउत्प्रेक्षांच्या नुसत्या मालिका नव्हेत. शंकर पार्वतीच्या विलासी मनोमुकुरांत पडलेलीं तीं निसर्गाचीं प्रतिबिंबें आहेत. म्हणूनच तीं प्रमाणबद्ध व विशिष्ट असा एकच परिणाम करणारीं झालीं आहेत. माघानें हेच विषय सर्ग ९.१-४२ मध्यें वर्णिले असून प्रभातवर्णनासाठीं ६७ श्लोकांचा एक खास सर्ग (१२वा) खर्ची घातला आहे. पण माघाचीं हीं वर्णनें गडकऱ्यांच्या 'अरुणा'प्रमाणें त्या त्या विषयावरील स्वतंत्र भ्रमणें आहेत. तीं केवळ कल्पनेच्या भरारींच्या दृष्टीनें उत्तम साधलीं आहेत. पण तीं 'शिशुपालवध' काव्याचीं अंगें आहेत असें म्हणवत नाहीं त्यांत प्रसंगानुसारित्व नाहीं. व्यक्तीच्या विशिष्ट मनोभावनेशीं त्यांचा संबंध नाहीं. तीं त्या स्थानांतून उचलून दुसरीकडे कोठेंहि ठेविलीं तरी

चालतील अशीं सुटीं व कोरडीं आहेत. यासाठीं काव्यात प्रसंग, प्रयोजन व प्रमाण हे तीन 'प्र'कार असावे लागतात.

**उसना शृंगार.**

नाहीं म्हणावयास या वर्णनांत व इतरत्रहि त्यांतल्या त्यांत शृंगाराचा शिडकाव जागजागीं बराच दिसता. पण त्या शृंगाराला योग्य पार्श्वभूमि कथेंत दाखविली नाहीं. अगोदर शिशुपालाचें पारिपत्य करण्याच्या हेतूनें यज्ञास निघालेल्या कृष्णाच्या या प्रयाणात शृंगाराची भावना गोवणें व तिचा कंटाळवाणा विस्तार साडेतीन सर्गांत माडून कथौघास अडथळा आणणें हेंच मुळीं अनुचित. त्यातून तो शृंगार श्रीकृष्ण व त्याच्या प्रिया यांमधला असता तर काहींतरी बरें दिसलें असतें. पण माघाची या विषयांतील सर्व मिस्त (सर्ग ७, ८, ९-४३-८७, व १०) कृष्णाच्या सैन्यांतील बाजारबुणग्या यादवाच्या शृंगारचेष्टावर आहे! असल्या मध्यम प्रकृतीच्या निनावी पात्राच्या उसन्या, रूढ नियमानीं लादलेल्या व पुस्तकी शृंगाराला खरी रंगत कशी येणार? भारवीनेंहि ही उसन्या शृंगाराच्या लाघणीची चूक केली आहे. पण कथानायक अर्जुनाला मोह पाडावयाचा असल्यानें गंधर्वाप्सरांच्या शृंगारपात्रांचें तेथें काहींतरी समर्थन देता येतें. पण माघाला कोणतें समर्थन आहे! भारवि करतो म्हणून माघ! किंवा दोघेहि का करतात! तर महाकाव्यांत हे विषय पाहिजेत म्हणून. कालिदासानें असला उसना शृंगार कोठेंच वर्णिला नाहीं. व माघानंतरच्या श्रीहर्षानेंहि ही चूक केली नाहीं. माघाला कृष्णभक्तीसाठीं सदर काव्य लिहावयाचें होतें म्हणावें तर त्यानें तरील निसर्गवर्णनात कृष्णभक्तीचा जयघोष तरी निनादूत सोडावयाचा होता. माघानें ११ व्या सर्गांत आपल्या श्रीकृष्णभक्तीच्या उत्कट भावनेंत रंगलेलें प्रभातकाळचें उदात्त चित्र काढलें असतें तर संस्कृत भूपाळ्यामध्यें या सर्गानें अग्रस्थान पटकावलें असतें. कारण विषय उदात्त व माघहि त्याला साजेसा समर्थ कवि; असा समन्वयाचा उत्तम संगम झाला असता. पण आपण शृंगारी, कीं देवभक्त, कीं त्यागी, कीं तेजस्वी कीं निराश, कीं विनोदी, का आणखी कोण हें नीट ध्यानात न घेता कोणताहि विषय व कोणतीहि भावना आपण कोठेंहि वठवूं शकूं या जबर आत्मविश्वासावर त्यानें 'सुकविकीर्तिदुराशया' प्रेरित

होऊन महाकाव्यरचनेस कंबर बांधलेली दिसते ! जो आपल्या हेतूशीं, विषयाशीं व वृत्तीशीं समरस होऊन काव्य रचीत नाहीं त्याचें महाकाव्य पांडित्यपूर्ण, कौतुकावह, नियमबद्ध व सर्ववस्तुसंग्राहक होईल कदाचित्. पण तें काव्य सूक्ष्मवृत्तीच्या रसिकांच्या हृदयाला भिडणार नाहीं. अशी महाकाव्यरचना (literary epic) सावदे, ब्लॅकमूर, ग्लोव्हर इत्यादिकांनीं केली आहे. त्यांपैकीं सावदेला तर स्पेन, हिंदुस्थान, अरेबिया किंवा अमेरिका या विषयांवरील महाकाव्यरचनाहि जमली असती असें एव्हर कौंब्री थोडाशा विनोदानें म्हणतो !

## कांहीं वेचक स्थळें.

पहिल्या तेरा सर्गांसाठीं माघानें भागवतोक्त कथेचा आधार आपल्या परानुकरणाच्या हेतुस्तव घेतला असला तरी योग्य प्रसंगीं त्यानें भारताचेंहि धोरण रसिकतेनें सांभळिलें आहे. पुढील चौदा ते वीस सर्ग कथादृष्ट्या भारतानुसारी आहेत. तथापि तेथेंहि परानुकरण किंवा परस्पर्धा अजिबात सुटलेली नाहीं. महाभारतान्तर्गत सभापर्वाचे अध्याय ३३ ते ४५ हे मुळांतच विस्तृत, काव्यमय, उदात्त आणि संक्षोभजनक आहेत. त्यामुळें त्यांच्या धोरणानें जाणाऱ्या कोणाहि चांगल्या कवीच्या काव्यांत ते ते गुण हटकून उतरावयास पाहिजेतच. आणि माघानेंहि आपली कवित्वशक्ति त्यांवर कसोशीनें वेंचून ते मोठ्या बहारीनें वठविले आहेत. इतकेंच नव्हे तर विष्णुभक्ति हा जो एक माघाचा प्रेरक हेतु मानतां येण्यासारखा आहे त्याचा परिपाक येथून पुढें जास्त दिसूं लागतो. या दृष्टीनें चौदावा सर्ग सर्वांत सरस आहे. यांत प्रारंभींच श्रीकृष्णानें धर्मास दिलेल्या उत्तरांत त्याचा प्रेमळपणा, विनम्र भाव व स्वसामर्थ्याची प्रचंड जाणीव व्यक्त झाली आहे. या दृष्टीनें हें छोटेंसें भाषण (शि. १४.१२-१६) हृदयस्पर्शी आहे. त्यांतल्या त्यात 'तूंच यज्ञ कर, मी तुला लागेल तें साहाय्य करतों. मला तूं आपल्या अर्जुनाप्रमाणें मान. तुझ्या यज्ञांत विघ्न करणाराचें शिर धडावर रहाणार नाहीं' या अर्थाचें श्रीकृष्णानें युधिष्ठिरास दिलेलें आश्वासन वाचून श्रीकृष्णाच्या महानुभावत्वचिंतनानें वाचकांचे डोळे ओले झाल्यावांचून रहात नाहींत. तसेंच यज्ञाचें पवित्र वातावरण, धर्माचें दातृत्व व विशेषतः भीष्मकृत श्रीकृष्णस्तुति हीं प्रकरणें माघानें उत्तमच वठविलीं

आहेत. भीष्माचें मूळ माषणहि चांगलेंच आहे. तरी श्रीमहाविष्णूच्या अवतारांची नवीन कल्पना त्यांत गोवून 'वराह, नृसिंह, वामन, मोहिनी इत्यादि अवतारधारी विष्णुच सांप्रत कृष्णरूपानें अवतरला आहे' असें भीष्माकडून माघानें वदविलें आहे. यानंतर कृष्णाच्या अग्रपूजेनें चवताळलेल्या शिशुपालाच्या कृष्णनिंदेंत माघानें महाभारतापेक्षां जास्त तिखटपणा मोठ्या कौशल्यानें ठासला आहे. त्यामुळें शिशुपालाची स्वभावरेषाहि चांगली स्पष्ट होण्यास मदत झाली आहे. शिशुपालाच्या कृष्णविषयक द्वेष, तिरस्कार, अवहेलना इत्यादि भावना कधीं उघड तर कधीं प्रच्छन्न आणि मर्मभेदी उपहासानें व्यक्त झाल्या आहेत. त्यांतील कित्येक उपमा साध्या, नेहमींच्या व म्हणूनच चट्दिशीं पटणाऱ्या आहेत. त्याचप्रमाणें सोळाव्या सर्गातील शिशुपालदूताच्या भाषणांत एका बाजूनें धमकी व दुसऱ्या बाजूनें समेटाचें धोरण मोठ्या खुबीदार दूयर्थी शब्दानीं व्यक्त केलें आहे. यांत माघाचें भाषाप्रभुत्व व बुद्धीची तीव्रता चांगली प्रतीत होते. युद्धाचे प्रकार ठराविक सांच्याचेच आहेत. या व यापुढील भागांत किरातार्जुनीयानुकरण आहे. शेवटच्या सहा सर्गांत वाग्युद्ध व शस्त्रयुद्ध असल्यानें येथें वीररसाची ठायीं ठायीं प्रतीति होते. पण तीहि बुद्धिप्रधानच.

**भावकवि का महाकवि ?**

साकल्यानें विचार केल्यास माघ कवीचा मनःपिंड तरल कल्पना व तीक्ष्ण बुद्धि यांनींच बनला असून त्यांत भावनेचा ओलावा एकंदरीनें कमीच. माघ हा एक चांगला कल्पक पंडित असून महत्त्वाकांक्षी दिसतो. केवळ बुद्धि व पांडित्य यांच्या जोरावर कोणाहि महाकवीच्या तोडीची किंवा त्याहूनहि कांकणभर जास्त चांगली काव्यरचना आपण करूं शकूं असें त्याला वाटत होतें ! पण त्याच्यांत भावनेचा माग कमी असून त्यानें समाजाच्या सुखदुःखांचा आत्मीयतेनें विचार केलेला दिसत नाहीं. त्याला कोठल्याहि गोष्टीबद्दल उत्कट जिव्हाळा, तीव्र द्वेष, दृढ निष्ठा किंवा गाढ ममत्व नाहीं. त्यामुळें त्याच्या भावनात्मक प्रतिक्रिया जोरदार होतच नाहींत. त्याची स्थायी अशी कोणतीच वृत्ति नाहीं. त्यामुळें सबंध प्रबंधभर टिकणाऱ्या एका वृत्तीनें व हेतूनें बांधलेलें असें एकसंधी व एकात्म काव्य त्याला पेलतां आलें नाहीं. त्याचे फुटकळ प्रसंग चांगले आहेत. छोटीं

छोटीं दृश्यें तर तो फार कौशल्यानें टिपतो. मात्र त्याची कल्पना एकंदरीनें वास्तव नाहीं. ती उत्कट व बेफाट (fantastic) आहे. हाहि त्याच्या मनाच्या बुद्धिप्राधान्याचाच परिणाम आहे. महाकवीच्या मनाला भावनादृष्ट्या व हेतुदृष्ट्या जें व्यापकत्व व जी विशालता लागते, आणि ज्या समाजव्यापक व समाजसमरस मानसिक बैठकीची आवश्यकता असते ती त्याच्यांत फार कमी आहे. त्यामुळें त्यानें जरी मोठ्या दमदारपणानें एका महाकाव्याची रचना चांगल्या सामग्रीच्या साहाय्यानें केली असली तरी त्याचें मन भावकवीचें आहे. नुसत्या बाह्यागविषयक (Form) नियमांच्या परिपालनानें महाकाव्य होत नाहीं. कवीच्या मनाची बैठक महान् पाहिजे. पण माघाला आत्मनिष्ठता फारच अल्प प्रमाणांत असल्यानें त्याचें पदलालित्य (?), त्याच्या उपमा, उत्प्रेक्षा व त्याचें अर्थगौरव (?) ही एक केवळ बौद्धिक क्रीडा किंवा कल्पनाचीं कारंजीं आहेत. त्यांत जिव्हाळा कमी. त्यामुळें कालिदास-भारवीसमोर त्याला उभा करून त्यांच्याशीं त्याची तुलना करण्याच्या मानगडींत न पडलेलें बरें. मग तो यांच्यापेक्षा श्रेष्ठ होता असें सुचविणें तर एक उपेक्षणीय अत्युक्तिच होय.

**माघ हा शास्त्रकवि.**

भारवीच्या भाषेंत जो संयम, जो ठाशीवपणा व जें ओज आहे तें माघाच्या भाषेंत दिसत नाहीं. तो आपला आशय पाल्हाळानें व्यक्त करतो. पण माघाच्या शब्दात भारवीपेक्षां गोडवा आहे. राजशेखर आपल्या काव्यमीमांसेंत ज्या कवींना शास्त्रकवि असें संबोधतो त्यांपैकीं माघ आहे असें वाटतें. कारण शास्त्रकवि शास्त्राकडील आपल्या ओढयामुळें काव्यरसाला बाध आणतो. ( शास्त्रकविः काव्ये रससंपदं विच्छिनत्ति । का. मी. ५ ) असें राजशेखराचें मत आहे. अशा स्थितींत माघाच्या नुसत्या उपमा, बंध, वृत्तें व भाषापांडित्य या बाबतींत इतर कवींशीं त्याची तुलना करण्यांत काय हंशील आहे ! अलंकारांना खरा उठाव यावयाला अलंकार्य वस्तूंतच मूळचा सकसपणा, जोम व सौंदर्य पाहिजे असतें. माघ काव्यात रसवत्ता प्रधान नाहीं याचा अर्थ अत्यंत उत्कट, परिपुष्ट व हृदयग्राही अशी कोणतीहि स्थायी भावना माघानें सलगपणें चित्रित केली नाहीं असें समजावें. अपरिपुष्ट व रसावस्थेला स्पर्श करून जाणारे उत्साह,

रति, परमेश्वरप्रेम, भय, क्रोध, द्वेष, तिरस्कार इत्यादि भाव 'शिशुपालवधां'त आहेत. त्यांच्या पूर्ण परिपोषाला माघाचें पाडित्य, अलंकारव्यसन व त्याची परानुकरणबुद्धि वेळोवेळीं अडथळा करते. अप्रतिहतपणें व प्रसादपूर्ण वाणीनें प्रकट केलेला भावच रसावस्थेला पोहोंचतो व स्थायिभाव होतो ( रसावस्थः परं भावः स्थायितां प्रतिपद्यते । ).

**एकहि प्रमुख स्त्री-पात्र नाहीं.**

'शिशुपालवधां'त श्रीकृष्ण, धर्म, भीष्म, शिशुपाल व उद्धव यांचीं स्वभावचित्रें थोड्याफार स्पष्टतेनें रेखाटलीं गेलीं असलीं तरी या कलांगांकडे मात्र विशेष कसोशीनें लक्ष देतो असें दिसत नाहीं. कथानकाच्या अडचणीमुळें म्हणा किंवा इतर कांहीं कारणांनीं म्हणा माघानें एकहि प्रमुख स्त्रीपात्राची योजना आपल्या कृतींत उठावानें केलेली नाहीं. त्याच्या मनात असतें तर द्रौपदी किंवा रुक्मिणी यापैकीं एकीस तरी त्याला या कथानकांत कोठेंतरी प्राधान्यानें आणतां आलें असतें. महानुभावकवि भास्करभट्ट बोरीकर यानें आपल्या मराठी 'शिशुपालवधां'त रुक्मिणीचें पात्र योजिलें आहे. व श्रीकृष्ण-रुक्मिणी या उत्तमप्रकृति पात्रामध्यें शृंगारगर्भ हास्यविनोद घातला आहे. निसर्गवर्णनाच्या बाबतींत सर्वच संस्कृत कवींचा भर निसर्गाच्या बाह्य रूपापेक्षां ( objective ) त्याच्या कविमनोनिष्ठ ( subjective ) रूपावरच जास्त असतो. भारवि व माघ या दोघांचेंहि वर्णन बहुंशीं बुद्धिनिष्ठ (Intellectual) आहे. माघाची शैली स्थलविशेषीं सफाईदार असली तरी व्याकरणाचीं निरनिराळीं अवघड रूपें, अपरिचित शब्द, अनुप्रास, पांडित्य व ओढूनताणून आणलेल्या कल्पना यांमुळें खडबडीत व कृत्रिम वाटते. पहिल्या सर्गांतील संबंध नारद-श्रीकृष्ण-प्रकरण, दुसऱ्या सर्गांतील बलरामाचें वर्णन व त्यांच्या भाषणातील पूर्वभाग, उद्धवाचें राजनैतिक ज्ञान, तिसऱ्या सर्गांतील कृष्णप्रयाण वगैरे प्रसंग याची साक्ष देतील.

**महाकाव्यरचनेचा अपकर्ष.**

माघापासून पुढें महाकाव्यरचना झपाट्यानें कृत्रिम होत चालल्याची साक्ष पटते. कालिदासाची भावनोत्कटता, भारवीची विचारप्रवणता,

माघाचा पांडित्यपूर्ण कल्पनाविलास व पुढील कवींचें श्लेषादि शब्दप्राधान्य अशा या उताराच्या चार पायऱ्या आहेत. माघानें जसें भारवीचें तसें माघाचेंहि पुढील कवींनीं अनुकरण केलें. 'हरविजय' महाकाव्याचा कर्ता रत्नाकर, 'कंफणाभ्युदया'चा कर्ता शिवस्वामी, 'धर्मशर्माभ्युदया'चा कर्ता हरिचंद्र इत्यादि कवी माघाचे अनुकर्ते होत. दण्डी, सुबंधु, बाण, कविराज इत्यादींनीं प्रवर्तित केलेली श्लेषमूल वक्रोक्ति पुढील महाकवींनीं उपयोजण्यास सुरवात केली. 'द्विसंधान' म्हणजे द्व्यर्थी शब्दयोजना ही एक नवी टूम निघाली. तिचा उपयोग धनंजयाचें 'राघव-पांडवीय' हरदत्तसूरीचें 'राघव-नैषधीयं' व चिदंबराचें 'राघव-पांडव-यादवीय' इत्यादि शब्द-प्रधान काव्यांत करण्यांत आला आहे. या सर्व संक्रमणांत व महाकाव्याच्या अपकर्षकालांत एकच महाकाव्य विशेष उल्लेखनीय असें झालें. व तें म्हणजे श्रीहर्षाचें 'नैषधीयचरित'. आणि आपण आता तिकडेच वळणार आहों.

## शिशुपालवध—सुभाषितें

(१) सतीव योषित् प्रकृतिः सुनिश्चला पुमांसमभ्येति भवान्तरेष्वपि ॥ १.७२

(प्रथम हिरण्यकाशिपु, नंतर रावण व मग शिशुपाल या तीनहि जन्मांत सारखाच दुष्ट स्वभाव प्रकट करणाऱ्या शिशुपालाबद्दल नारद कृष्णाला म्हणत आहेत 'तो पूर्वजन्मांतल्याप्रमाणें या जन्मींहि लोकांस छळत आहे. कारण—) व्यक्तीचा मूळस्वभाव अगदीं पक्का असतो. व एखादी पतिव्रता स्त्री ज्याप्रमाणें जन्मोजन्मीं आपल्या पतिलाच अनुसरते तसा तो त्या व्यक्तीला जन्मांतरींहि सोडीत नाहीं.

(२) ज्ञातसारोऽपि खल्वेकः संदिग्धे कार्यवस्तुनि ॥२.१२

(शिशुपालावर स्वारी करण्यासच निघावें असें आपलें मत सांगून श्रीकृष्ण म्हणाला, 'हें माझें मत झालें. आतां तुमचेंहि मला ऐकूं द्या. कारण—) अगदीं मोठा तत्त्वार्थवेत्ता किंवा शहाणा जरी झाला: तरी तो

एकाकी असेल तर, म्हणजे त्याच्या मताला कोणाचा दुजोरा नसेल तर, त्याला कार्याची निश्चित आंखणी करतांना संशय वाटूं लागतो.

**(३) अनिर्लोडितकार्यस्य वाग्जालं वाग्मिनो वृथा ॥ २.२७**

(बलराम आपल्या भाषणाची प्रस्तावना करतांना म्हणतो, 'राजकारणाचें नुसतें पुस्तकी ज्ञान कांहीं कामाचें नाहीं. तीं पोपटपंची साधा माणूसहि करील.) प्रत्यक्ष राजकारणाच्या व्यवहारांत शिरून विशिष्ट प्रसंगीं काय करावें व काय करूं नये हें ज्यानें जाणलें नाहीं त्या नुसत्या वाक्पटूचें शब्दावडंबर अगदीं फुकट आहे.

**(४) समूलघातमघ्नन्तः परान्नोद्यन्ति मानिनः ॥ २.३३**

(बलराम म्हणतो– ) शत्रूंचीं अगदीं मुळेंपाळें उखडून काढणाऱ्या तेजस्वी वीरांचाच खरा उत्कर्ष होतो.

**(५) तुङ्गत्वमितरा नाद्रौ नेदं सिंधावगाधता ।**
**अलङ्घनीयताहेतुरुभयं तन्मनस्विनि ॥ २.४८**

पर्वताचे ठाईं केवळ उंची असते, खोली नसते; तर सागराचे ठाईं नुसती खोलीच असते, उंची नसते. पण उंची व खोली हे पर्वत-सागरांच्या अजिंक्यपणाचे दोनीहि कारणभूत गुण एकट्या तेजस्वी वीराचे ठाईं असतात.

**(६) बृहत्सहायः कार्यान्तं क्षोदीयानपि गच्छति ॥ २.१००**

( उद्धव कृष्णाला म्हणतो– ) अगदीं क्षुद्र माणूस सुद्धां थोरांमोठ्यांच्या साहाय्यानें हातीं घेतलेल्या कामांत यश मिळवितो.

**(७) महात्मानोऽनुगृह्णन्ति भजमानानरिपूनपि ॥ २.१०४**

(उद्धव म्हणतो–) शरण आलेल्या शत्रूवरसुद्धां महात्मे अनुग्रह करतात. आपल्याला येऊन मिळणाऱ्या लहान डोंगरी नद्यांना, त्या सवती असूनसुद्धा, महानद्या सागराकडे नेऊन पोहोंचवितातच.

**(८) क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीतायाः ॥ ४.१७**

( रैवतक पर्वताची शोभा एकदा पाहिली तरी तो दरवेळेस नवीनच असल्यासारखा भासे व श्रीकृष्णास आश्चर्य होई.) 'प्रतिक्षणीं कांहीं नवीनता धारण करील तें रमणीय' असें रमणीय वस्तूचें लक्षण होय.

**(९) सर्वः प्रियः खलु भवत्यनुरूपचेष्टः ॥५·६**

(श्रीकृष्णाच्या सैन्यांतील घोड्यांची चंचलगति व मदोन्मत्त गजराजांची संथ चाल मोठी शोभून दिसे.) कोणीहि आपापल्या जातीला उचित (आपल्या देहाला, स्वभाववाला, पेशाला, दर्जाला इत्यादि) असा वागला तरच तो सर्वांना प्रिय होतो.

**(१०) प्रतिकूलतामुपगते हि विधौ विफलत्वमेति बहुसाधनता। ९.६**

(सूर्य नियतीला अनुसरून अस्तगिरीवर कलंडून पडूं लागला असतांना त्याच्या हजार करांना त्याला सावरून धरतां आलें नाहीं.) एकदा कां नियति– दैव– प्रतिकूल झाली कीं असंख्य साधनेंसुद्धां तिच्या फेऱ्यांतून आपल्यास बचावूं शकत नाहींत.

**(११) स्वां मदात्प्रकृतिमेति हि सर्वः ॥ १०.१८**

दारूच्या कैफात माणसाचा खरा खरा स्वभाव प्रकट होतो. इतर वेळीं सभ्यतेचीं मुद्दाम घातलेलीं नियंत्रणें दारूमुळें ढिलीं होतात.

**(१२) न क्षमं भवति तत्त्वविचारे मत्सरेण हृतसंवृति चेतः १०.३५**

(आपल्या वल्लभाचें प्रेम इतर कोणा स्त्रीवर जडलें आहे या केवळ शंकेनें मत्सरग्रस्त होऊन कोणी तरुणीनें– त्या गोष्टीचा फार विचार न करतां– आपल्या वल्लभाची कानउघाडणी केली.) एकदा मत्सरानें मनाचा पगडा घेतला कीं काय उघड बोलावें आणि काय बोलूं नये याचा तोल सुटतो व खरी स्थिति काय याचा विचार माणसाला करतांच येत नाहीं.

**(१३) नियतविषयवृत्तेरप्यनल्पप्रतापः**
**क्षतसकलविपक्षस्तेजसः स स्वभावः ॥ २१.५९**

(उगवत्या सूर्याचीं किरणें बाहेर प्रकाशत असलीं तरी त्यानीं मंदिरांच्या गर्भगृहातील अंधकाराचाहि नाश केला.) तेज जरी एका विशिष्ट स्थळींच प्रकट झालेलें असलें तरी तेथें राहूनच इतर ठिकाणच्या सर्व विरोधकांचा फडशा उडवावयाचा असा त्याचा स्वभावच आहे.

**(१४) महतां हि सर्वमथवा जनातिगम् । १३ १७**

(कृष्ण यादवसेनेसह हस्तिनापुरासमीप आला त्या वेळीं पांडव आपल्या सेनेसह त्यास सामोरे गेले. त्या वेळीं यादववीरांनीं पांडववीरांना, यादव-

स्त्रियांनीं पांडवस्त्रियांना, यादवसैनिकांनीं पांडवसैनिकांना आलिंगनें दिलीं. फक्त पांडवयादवसेनेंतील हत्तींना मात्र उभय सेनांतील हात्तिणींपासून दूर रोखून ठेवण्यांत आलें होतें. त्या यादव-पांडववीरांचा हा संयम व ही शिस्त लोकविलक्षणच.) मोठ्यांचें सर्वच लोकविलक्षण असतें.

(१५) वर्षुकस्य किमपः कृतोन्नतरम्बुदस्य परिहार्यमूषरम्। १४.४६

(यज्ञांत दानें देतांना उदार युधिष्ठिरानें निर्गुण व विद्याविहीन माणसाला सुद्धां विन्मुख परतविलें नाहीं. ) उदकाचा भरपूर वर्षाव करणारा मेघ एकदा अंबरात आपल्या जलसंपदेसह सज्ज झाला म्हणजे ही जमीन सुपीक, ही बरड किंवा खारी ( लोणा असल्यामुळें नापीक) असा विचार करीत नाहीं; सर्वत्र सारखाच वर्षतो.

(१६) स्मर्तुमधिगतगुणस्मरणा पटवो न दोषमखिलं खलूत्तमाः । १५.४२

( कृष्ण शिशुपालाचे अपराध आठवू लागला. पण त्याचे सर्व अपकार कृष्णाच्या स्मृतीला लौकर येईनात. ) दुसऱ्याचे उपकारच प्रथम स्मरावयाचे अशी ज्याच्या मनाला संवय त्या सज्जनांना अपकार आठवतच नाहींत.

(१७) अनुहुंकुरुते घनध्वनिं न हि गोमायुरुतानि केसरी। १६.१५

(आपल्यावर अपशब्दांचा भडिमार करणाऱ्या शिशुपालाला कृष्णानें प्रत्युत्तर दिलें नाहीं.) सिंह मेघगर्जनेला उलट जबाब देतो, कोल्हेकुईला नाहीं.

(१८) किमिवाखिललोककीर्तितं कथयत्यात्मगुणं महामनाः ।
वदिता न लघीयसोऽपरः स्वगुणं तेन वदत्यसौ स्वयम् ॥ १६.३१

मोठ्यांची कीर्ति सर्व लोक गात असल्यानें त्यांना स्वगुण स्वतःच वर्णावे लागत नाहींत. पण सामान्य माणसाला आपली कीर्ति गाणारे दुसरे वक्ते कोणीच मिळत नसल्यानें त्याला आत्मस्तुतीचें काम स्वतःच उरकून घेणें भाग पडतें.

# श्रीहर्षाचें[1] 'नैषधीय चरित'

## कविपरिचय

### डौलदार आत्मोल्लेख.

पंचमहाकाव्यप्रणेत्या चार महाकवींपैकीं दुसऱ्या कोणत्याहि कवीपेक्षां स्वतःचा अधिक विस्तृत वृत्तान्त जाणिवेनें देणारा, आपलें कवित्व नि पाडित्य यांवरचा जबर आत्मविश्वास निःसंकोचपणें बोलून दाखविणारा आणि क्षुद्र टीकाकारांना कस्पटाप्रमाणें तुच्छ लेखणारा श्रीहर्ष हाच पहिला कवि होय. पंडितराज आणि राजेश्वर यांच्याकडून झालेला आपला गौरव, आपण लिहिलेले ग्रंथ, आपली अभिनव रचना आणि आपले शास्त्र-काव्यांमधील साव्यसाचित्व यांबद्दलचे श्रीहर्षाचे डौलदार आत्मोल्लेख वाचले कीं दिल्लीश्वराच्या दरबारीं मान्यता पावलेल्या पंडितराज जगन्नाथाच्या सार्थ दर्पोक्तीचीच आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. हा आत्मपर वृत्तान्त

---

१. श्रीहर्ष किंवा हर्षवर्धन नांवाचा एक सम्राट् सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत (इ.स. ६०६ ते इ.स. ६४७) होऊन गेला. बाणभट्ट याच्याच आश्रयास होता. तो विद्येचा भोक्ता व कवींचा आश्रयदाता होता. त्यानेंच 'रत्नावली', 'प्रियदर्शिका' व 'नागानंद' हीं तीन नाटकें लिहिलीं असें मानण्यांत येतें. त्यामुळें या सम्राट् हर्षाचाहि 'श्रीहर्षो निपुणः कविः' असा उल्लेख येतो. पण 'नैषधीय चरिता'चा कर्ता श्रीहर्ष पंडित व वरील नाटकें रचणारा सम्राट् श्रीहर्ष यांचा नामसादृश्याव्यतिरिक्त कांहीहि संबंध नाहीं. त्यांच्यामध्यें सुमारें ५०० वर्षांचें अंतर आहे ही गोष्ट वाचकांनी मुद्दाम लक्षांत ठेवावी. तसेंच इतर एक दोन 'श्रीहर्ष' कवी म्हणून उल्लेखिले जातात. त्यांचाहि या 'नैषध'कर्त्या श्रीहर्षाशी कांहीं संबंध नाहीं.

त्यानें 'नैषधीय चरिता'च्या प्रत्येक सर्गाचे शेवटीं व ग्रंथसमाप्तीनंतर मुद्दाम रचलेल्या चार श्लोकात ग्रथित केला आहे, त्यावरून श्रीहर्षाबद्दल पुढील विश्वसनीय माहिती मिळते:--

## ऐतिहासिक स्वयंवर आणि गृहकली.

कवीश्वरांच्या मुकुटांतला हिराच असा 'हीर' नांवाचा पंडित श्रीहर्षाचा पिता व मामल्लदेवी ही त्याची माता. विशेष गौरवाचें चिन्ह म्हणून कान्यकुब्जाच्या राजाकडून त्याला दोन विड्यांचा मान व पंडितसभेंत अग्रासन मिळे. श्रीहर्षानें उल्लेखिलेला कनोजचा राजा विजयचंद्राचा पुत्र जयन्तचंद्र असावा. पाचव्या सर्गाचे शेवटीं 'विजय-प्रशस्ति' नांवाचा ग्रंथ आपण लिहिल्याचें श्रीहर्ष सागतो. ती प्रशस्ति या विजयचद्राचीच असावी. या दोनहि राजांचा काल बाराव्या शतकाचा उत्तरार्ध मानला जातो. हा जयन्तचंद्र म्हणजेच गाहडवाल रजपूत जयचंद राठोड. यानें आपला शूर आणि दिग्विजयी पिता विजयचंद्र याच्यानंतर कनोजचें राज्य चोवीस वर्षें केलें ( इ. स. ११६९-११९३ ). वाराणशी ही या गढवाल राजांची दुसरी राजधानी होती. या जयचंदाच्या दरबारात श्रीहर्ष राजपंडित होता. याच जयचंदाचें दिल्लीचा पृथ्विराज चव्हाण याच्याशीं शत्रुत्व होतें. जयचंदानें आपली कन्या संयोगिता इचें स्वयंवर केलें ( इ. स. ११८५ ). या स्वयंवरांत पृथ्वीराजाचा अपमान करण्यासाठीं त्याचा पुतळा जयचंदानें द्वारपाळासारखा मंडपाच्या प्रवेशद्वारांत ठेवविला होता. पण संयोगितेनें त्या पुतळ्यासच माळ घातली. मग पृथ्वीराज तिला घेऊन गेला. यापुढें सासऱ्याजांवयाचें वैर तसेंच धुमसत राहिलें. त्यामुळेंच जयचंदानें शाहबुद्दिनाला पृथ्वीराजावर हल्ला करण्यास पाचारिलें अशी समजूत रूढ आहे. या कलीमुळेंच पुढें दोघांचाहि अन्त झाला व यवन प्रबल झाले. याप्रमाणें श्रीहर्षानें एक ऐतिहासिक स्वयंवर व गृहकलीचा प्रताप प्रत्यक्षच पाहिला होता असें दिसतें. त्यानें आपलें नैषध काव्य इ. स. ११९३ ते ११९५ च्या सुमारास लिहिलें असावें. तो गौड नव्हे, कनोजचाच तो.

## कवींमधील एक वडें घेंड.

श्रीहर्षानें पुढील सात ग्रंथ लिहिले:—१ विजयप्रशस्ति ( उल्लेख ५. ७४ )

सर्गांतीं ) २ खण्डन-खण्डखाद्य ( ६ वा सर्ग ), ३ गौड राजाची कुलप्रशस्ति (७ वा सर्ग), ४ अर्णववर्णन (९ वा सर्ग), ५ छिंदप्रशस्ति (१७ वा सर्ग), ६ शिवशक्ति-सिद्धि ( १८ वा सर्ग ), आणि ७ नवसाहसाङ्कचरित चम्पू ( २२ वा सर्ग ). श्रीहर्षाला चिंतामणि मंत्राच्या उपासनेनें काव्यस्फूर्ति होत असे ( सर्ग १ ला ). काव्य व तर्क या दोहोंतहि त्याची बुद्धि चाले ( १० वा व २२ वा सर्ग ). तो जितेंद्रिय व अत्यन्त मातृभक्त असून मातेच्या चरणांवरील फुलें तो मस्तकीं धरी ( १२ वा सर्ग ). काश्मीर-सारख्या विद्यापीठांतील पंडित प्रकांडांनीं त्याची कसून परीक्षा घेतली व त्यांच्या कसोटीला तो पूर्णपणें उतरल्यानें त्यांच्यामध्यें त्याचा जयजयकार झाला ( १६ वा सर्ग ). श्रीहर्षानें काव्यरचनेचा एक नवीनच, पूर्वी कोणीं न चोखाळलेला, मार्ग काढला ( सर्ग ८, १९, २०, व २१ ). त्याची वाणी शरच्चंद्रासारखी विशद व रसोत्कट आहे ( सर्ग १३, १५ व १७ ). त्याचा शृंगारांत हातखंडा आहे ( सर्ग ११ ). 'नैषधीया'चा प्रत्येक सर्ग निसर्गोज्ज्वल म्हणजे स्वभावसुंदर आहे असा त्याचा विश्वास आहे. त्याला योगसमाधींत परब्रह्माचा साक्षात्कार होत असे ( सर्ग २२ ). याशिवाय 'स्थैर्यविचारणप्रकरण' व 'ईश्वराभिसंधि' हे दोन ग्रंथ त्यानें लिहिले. असो. श्रीहर्षानें ठिकठिकाणीं केलेल्या या आत्मोल्लेखांच्या फुटकळ रकमांची बेरीज केली तर श्रीहर्ष ही कविमंडळी-तील एक मातबर असामी होती ही गोष्ट तेव्हांच पटते. उज्ज्वल कवित्व ( शक्ति ) आणि गाढ पांडित्य ( व्युत्पत्ति ) यांच्या जोडीला विशाल ग्रंथकर्तृत्व, तर्क नी वेदान्त यांच्या रूक्ष घटपटादि खटपटीबरोबर मृदु मातृभक्त अन्तःकरण, मारदस्तपणाच्या शेजारीं विनोदी वृत्ति, व्यावहारिक वैमनस्यासहित ब्रह्मसाक्षात्कार, पंडितमान्यतेसांगातीं राजमान्यता, जड पढीक विद्वत्तेबरोबर 'नवें कांहीं' करूं पाहणारी तल्लख प्रज्ञा एकेक पाहावें तों अद्भुतच दिसतें या स्वारीचें !! पंडितकवींमध्यें श्रीहर्ष हें एक बडें बेंड असलें पाहिजे त्या काळीं. आणि म्हणूनच 'नैषध काव्याची प्रभा फाकल्या-बरोबर भारवि आणि माघ यांसारखे पंडितकवि चट् सारे हतप्रभ होऊन कोठच्या कोठें लोपले' ( उदिते नैषधे काव्ये क्व माघः क्व च भारविः ) असें पंडितांना वाटूं लागलें !

## जगन्नाथपंडिताची दुसरी आवृत्ति.

आपल्या काव्याचें वैशिष्ट्य, त्याच्या रचनेचा हेतु व त्यावर दुर्बोधपणाचा आक्षेप आणणारे टीकाकार यांसंबंधीं श्रीहर्षानें मोठ्या तडफदारपणाचा खुलासा काव्याच्या शेवटीं धीरोदात्त वाणीनें केला आहे. तो म्हणतो--'तरुणी तरुणाचेंच अन्तःकरण खेंचून घेते. बालांना तिचें आकर्षण कसें वाटावें ? माझी वाणीहि खऱ्या पंडित रसिकांचेंच अन्तरंग खुलवील; बालिश अरसिकांना तिचें रमणीयत्व काय होय ? थोडे पंडित माझ्यावर खुष असले म्हणजे झालें. मग असंख्य अडाण्यांनी माझा अनादर जरी केला तरी मला त्याची पर्वा नाहीं.'

"ठिकठिकाणीं आपल्यांतून पाण्याचे ओहोळ वाहूं देणारे डोंगरगोटे पुष्कळ आहेत. त्या ओहळांच्या तात्पुरत्या खळबळाटावरून त्यांची महानद्यांच्या गंभीर घोषाशीं तुलना करणारे त्या डोंगरगोट्यांचे चहाते व भगतहि काहीं कमी आहेत असेंहि नाहीं. पण खरें वैभव त्या अद्वितीय क्षीरसागराचेंच. पाहा कीं, त्याच्या मंथनांतून निर्माण होणारें अमृत मंथनाचे सर्व क्लेश दूर करून मंथनकर्त्यांला परम आनंदाची जोड करून देतें. " हीं काव्यें म्हणजे काय ! केवळ साळूसखूंचीं गाणीं ! उंः ! त्यात काय आहे ! भी तीं सहज लावीन " असे अद्गार काढणाऱ्या घमेंडानंदनांनीं माझ्या काव्याशीं तरी असा पोरखेळ मांडूं नये म्हणूनच मीं मुद्दाम ठिकठिकाणीं शब्दार्थांच्या निरगांठी मारून ठेवल्या आहेत. ज्यानें गुरुसंप्रदायानुसार अर्थविवरणपद्धतीचा अभ्यास श्रद्धापूर्वक केला आहे अशाच प्रयत्नशील व सहृदय व्युत्पन्नानें माझ्या काव्यसरोवरांत उसळणाऱ्या लाटांवर यथेच्छ पोहण्याचें सुख अनुभवावें.' वरील उद्गार वाचले कीं श्रीहर्ष ही जगन्नाथपंडिताची दुसरी आवृत्ति आहे– छे ! चुकलों. कालदृष्ट्या जगन्नाथ हीच श्रीहर्षाची दुसरी आवृत्ति आहे– असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

## विद्वानांचें टॉनिक !

श्रीहर्षाच्या काव्यांत श्लेष, यमक, अनुप्रास इत्यादि शब्दालंकार व विविध अर्थालंकार, रस, ध्वनि, वक्रोक्ति इत्यादि काव्यजीवितें; वैद्यक, कामशास्त्र, राज्यशास्त्र, धर्म, न्याय, ज्योतिष, व्याकरण, वेदान्त इत्यादि

सर्व परंपरागत शास्त्रीय ज्ञान यांचा मालमसाला इतका ठासून भरला आहे कीं या काव्याला 'शास्त्रकाव्य' म्हणण्याची प्रथा आहे. तसेंच, या काव्याच्यामुळें अभ्यासकाला हरतऱ्हेचें शास्त्रीय ज्ञान, शब्दव्युत्पत्ति, व्यवहार व सांस्कृतिक विशेष यांचें, काव्यगुणांच्या मधुर अनुपानासह, सेवन घडत असल्यामुळें व त्याची पूर्वीची दुर्बल मनःप्रकृति त्यामुळें निकोप आणि सुदृढ बनत असल्यानें नैषधीयाला ' विद्वानांचें बलवर्धक औषध ( टॉनिक ) '– नैषधं विद्वदौषधम्– असें संबोधण्यांत येतें. हें काव्यरसायन दुबळ्या पचनशक्तीच्या माणसाला मानवत नाहीं. म्हणूनच नैषधाच्या खंबीर नी चौकोदर अभ्यासकाला संस्कृतांत विशेष मान आहे. नैषध म्हणजे व्युत्पत्तीची व रसिकतेची खरी कसोटी. सदर काव्याचे बरेच श्लोक हल्लीं पाहिल्या वाचनानें कळत नाहींत. कांहीं तर खालची टीका वाचूनहि उलगडत नाहींत. भामहानें व्याख्यागम्य म्हणजे टीकेवाचून न समजणाऱ्या चित्र व कुट काव्याबद्दल असे उद्गार काढले आहेत कीं "शास्त्राप्रमाणें हीं काव्येंहि जर टीकेशिवाय समजेनाशीं झालीं तर पंडित वाचकाचीच तेवढी चांगली चंगळ होईल हें खरें. पण बिचारे अल्प बुद्धीचे अविद्वान् वाचन पारखे होतात ना या आनंदाला !" 'पांडित्याच्या भरीला पडून काव्यें फार दुर्बोध करूं नयेत' ही यांतली भामहाची खोच लक्षात घेऊन अलंकार-व्याकरणादींचीं उदाहरणें देण्यासाठीं काव्यविरचना करणारा 'रावणवधा'चा (भट्टिकाव्याचा) कर्ता भट्टी यानें भामहाला सुनावलें आहे कीं, "होय, मीं माझें हें व्याख्यागम्य शास्त्रकाव्य केवळ व्युत्पन्न लोकांच्या आनंदासाठींच रचिलें आहे. कारण मी विद्वानांच्या मताचीच कदर करतों. असें करण्यांत अव्युत्पन्न व अल्पबुद्धि वाचक या सुखाला आंचवतील तर आंचवोत बापडे." श्रीहर्षालासुद्धां याबाबत भट्टीसारखेंच उत्तर– पण निराळ्या कारणासाठीं– द्यावयाचें आहे हें स्पष्ट आहे.

### वाचकांत जेंठी आणि काडी पहिलवान !

विशेष कारण नसतां, काव्यांत केवळ क्लिष्टतेसाठीं क्लिष्टता आणून सामान्य वाचकवर्गावर त्याच्या अज्ञानाकरतां कवीनें उगीच आग पाखडण्यांत तात्पर्य नाहीं हें तत्त्व मान्य आहे. पण जेथील क्लिष्टता व पांडित्य हीं विषयाच्या गंभीरतेमुळें व विचाराच्या उंचीमुळें किंवा सूक्ष्मपणामुळें अपरिहार्य

होऊन बसतात तेथें 'प्रसाद' गुणाची अपेक्षा करून सामान्य वाचकांनेंहि काठिण्याचा बाऊ करण्यांत हंशील नाहीं हेंहि तत्त्व मान्य व्हावयास पाहिजे असें वाटतें. आबालसुबोधता हा सर्वच काव्याचा गुण असला पाहिजे असा आग्रह युक्त नव्हे. काव्याच्या कठिणपणाचा विनाकारण बाऊ करणाऱ्या मंडळींची मजल पुष्कळ वेळा प्रसाद म्हणजे प्राकृतपणा असें मानण्यापर्यंत जाते ! त्यांच्यासाठीं एवढेंच सांगणें इष्ट आहे कीं सारींच काव्यें सान्याच वाचकासाठीं नसतात. डन् (Donne), ब्राऊनिंग, 'बी' (गुसे) आणि मूढ-गुंजक ताबे यांच्या काव्यफलाची गूढस्थ माधुरी आणि टणक आवरण वाटेल त्यानें हाताळावीं अशीं नाहींतच. प्रत्येक मालाचें गिऱ्हाईक निराळें; ज्याला जें पचेल, रुचेल नि तोलेल तें त्यानें घ्यावें. पण उंची मालाची निंदा मात्र करूं नये. एखाद्या व्यायामशाळेंत पडलेल्या व्यायाम-सामग्रीमधील प्रत्येक वस्तु प्रत्येकानें उचलावयाची नसते. त्यांतील लाटणेवजा हलक्या जोडया अंगामोवतीं भोवंडीत राहणाऱ्या काडीपहिलवानानें शिशाच्या भरणीनें जड झालेल्या प्रचंड करेल्याकडे व गदांकडे नजरच न टाकावी हें बरें. तें सामान रगेल जेठींसाठीं हौद्यांत ठेवलेलें असतें. भारवि, माघ किंवा श्रीहर्ष यांच्या काव्यांतील काहीं खऱ्या क्लिष्ट भागांचें व निष्कारण केलेल्या पांडित्यप्रदर्शनाचें दोषरूपत्व मान्य करून असें म्हणावेंसें वाटतें कीं त्यानीं आपल्या नजरेसमोर एक विशिष्ट रगेल वाचकवर्ग कल्पिला आहे. कोणाला शब्दव्युत्पत्तीची तर कोणास श्लेषाची, कोणास ध्वनीची तर कोणास अथाग विस्ताराची, कोणास शास्त्रज्ञानाची तर कोणास व्यवहारनिरीक्षणाची, कोणास विशिष्ट, वेंचक आणि खोल अनुभवांची तर कोणास नुसत्या शब्दचमत्काराची रग आहे. ती ती रग शमविणें, त्या त्या अपेक्षा पुऱ्या करणें, आणि त्याना त्यांना तें तें समाधान देणें हें त्यांचें काम; व तें त्यांनीं चोख बजावलें आहे. कवि अभिरुचि बनवतात का अभिरुचीच कवीला बनवते हा वादग्रस्त मुद्दा असला तरी श्रीहर्षासारख्या उत्तरकालीन नवीन कवींना त्याच्या काळच्या विशिष्ट पंडित-वाचकांची अभिरुचीच प्रेरक झाली असें मानणें प्राप्त आहे. कालिदासासारख्या जुन्या कवींची चहा तेव्हां होत नव्हती असें नव्हे. पण नवीन काव्य नव्या रुचीचें हवें असा पंडित वाचकांचा उक्त-अनुक्त आग्रह होता. त्यामुळें

निवडक वाचकवर्ग म्हणून खास पंडितकाव्यें व खास पांडितकाव्यें म्हणून खास निवडक वाचकवर्ग असा खासा अन्योन्याश्रय त्या काळीं झाला व त्यांतून बाहेर वाट निघाली ती संस्कृत काव्याचें ग्रथन हळुहळू बंद पडूनच.

**केवढा हा कार्यविस्तार !**

श्रीहर्षानें लिहिलेल्या नऊ ग्रंथांत चार पांच राजस्तुतिपर आहेत. त्याच्या 'विजयप्रशस्ती'त जयचंद्राचा पिता राजा विजयचंद्र याची स्तुति आहे. 'छिंदप्रशस्ती'त गयेंतील छिंदराज घराण्यांतल्या छंदस राजाचें स्तवन आहे. 'गौडोर्वीशकुलप्रशस्ती'त गौड देशच्या पहिल्या महिपाल राजाचें व 'नवसाहसांकचरितचम्पू'त माळव्याच्या सिंधु राजाचें वर्णन आहे. 'अर्णववर्णन' काव्यांत समुद्राचें वर्णन असावेंसें वाटतें पण भांडारकरांच्या मतें हेंहि एक पूर्वज राजवर्णनच आहे. 'खण्डनखण्डखाद्य' हा वेदान्तावरील एक अत्यंत कठिण ग्रंथ असून त्यांत उदयनाच्या मताचें खंडन आहे, व 'शिवशक्तिसिद्धी'त शिवपूजारहस्य सांगितलें आहे. 'स्थैर्यविचारण प्रकरण' व 'ईश्वराभिसंधि' हे ग्रंथ वेदान्तपर आहेत. श्रीहर्षाच्या 'खण्डनखण्डखाद्या' खेरीज इतर ग्रंथ आतां उपलब्ध नाहींत. केवढा हा जबरदस्त उद्योग ! या ग्रंथविस्ताराला साजेल इतकाच 'नैषधीयचरिता'चाहि विस्तार आहे. बावीस सर्गांचें आणि अठ्ठावीसशें चार श्लोकांचें हें पांचांतलें पहिलेंच महाकाव्य होय. हेंहि काव्य अपूर्ण असून खऱ्या पूर्ण नैषधीयकाव्याचे साठ किंवा एकशेवीस ( अबब ! ) सर्ग होते असें सांगतात. तसें जर असेल तर विस्ताराच्या दृष्टीनें तरी जगांतील चट्टेबट्टे काव्यांत हेंच काव्य पहिलें ठरेल.

**मिस्किलपणें हसणारा गंभीर पंडित !**

या विस्तृत व भारदस्त काव्याचा आणखी एक विशेष असा आहे कीं, त्यांत दुसऱ्या कोणत्याहि महाकाव्यापेक्षां जास्त विनोद आहे. यावरून श्रीहर्षाची स्वारी चांगलीच विनोदशील दिसते. भगवद्भक्त, योगी, मन्त्राभ्यासी आणि गंभीर प्रकृतीचे हे पंडित काश्मिरी शालीचा जरीकांठी पदर तोंडाला लावून मानवस्वभावांतील गमतीदार विसंगतींना मिस्किलपणें हसत आहेत असा भास होतो. इतकेंच नव्हे, तर या रसिक शास्त्रिप्रवराला ग्राम्य विनोदाचेंहि वावडें नाहीं ! ! मोठी अजब व्यक्ति होऊन गेली

श्रीहर्ष ही ! हसणारा हा योगाभ्यासी पंडित दीर्घायुरारोग्याचा पूर्ण उपभोग घेऊन ब्रह्मस्वरूपांत मिळून गेला असला पाहिजे.

**'सत्पुत्र असशील तर सूड घे.'**

वरील साऱ्या विवेचनावरून असें ध्यानांत येईल कीं श्रीहर्षांमध्यें एका खास विशिष्ट व्यक्तिमत्त्वाची प्रतीति होते. त्या व्यक्तिमत्त्वाचा अधिक परिचय 'रसग्रहणात' नैषधातील उदाहरणानीं करून घेऊन. पण तत्पूर्वी त्यांच्याबद्दल रूढ असलेल्या एकदोन आख्यायिका पाहून त्याचें जीवन समजावून घेऊं.

श्रीहर्षांचा पिता हीरपंडित हा विजयचंद्राच्या दरबारीं कवि म्हणून होता. एकदां उदयन नांवाच्या एका कवीश्वरोत्तर काव्यरचनेची चढाओढ करीत असतां हीर पराभूत झाला. ही गोष्ट त्याच्या मनाला इतकी लागली कीं मृत्युसमयीं त्यानें आपला पुत्र श्रीहर्ष यास जवळ बोलाविलें व तो त्यास म्हणाला, "बाळा श्रीहर्षा, तूं जर सत्पुत्र असशील तर राजसभेमध्यें उदयनाचा पराभव कर." हर्षानें पित्याची ही शेवटची इच्छा मान्य केल्यावर त्या मानी पंडितानें समाधानानें प्राण सोडले. श्रीहर्ष आपल्या घराची कशीतरी व्यवस्था लावून परप्रांतीं गेला व तेथें त्यानें अनेक गुरूंपाशीं अनेक शास्त्राचें उत्तम अध्ययन केलें. गंगातीरीं एका गुरूकडून त्यानें 'चिंतामणि मंत्र' घेतला. त्रिपुरादेवीही त्याजवर प्रसन्न झाली. यानंतर त्यानें 'खंडनखंडखाद्य' नांवाचा उदयनाचीं मतें खंडन करणारा वेदान्तपर ग्रंथ लिहिला.

**'मी हरलों हें मान्य करतों.'**

याप्रमाणें कृतकृत्य होऊन तो काशीस आला व त्यानें जयंतचंद्र राजास कळविलें कीं, 'मी वादाच्या तयारीनें आलों आहें.' राजसभेंत आल्यावर त्यानें राजस्तुतिपर असा एक स्वकृत उत्तम श्लोक म्हटला व त्याच सभेंत बसलेल्या आपल्या पित्याच्या शत्रूकडे कटाक्ष टाकून दुसऱ्या एका स्वकृत श्लोकाचें त्यानें पठन केलें. तें ऐकून विस्मयस्तिमित उदयन म्हणाला, "श्रीहर्षा, तुझी वाणी खरी प्रासादिक आहे. तुझ्याइतपत कवित्व रचणारा कोणी नाहीं. मी हरलों असें मान्य करतों." यानंतर प्रसन्न झालेल्या राजानें

श्रीहर्षास एक काव्य रचावयास सांगितल्यावरून त्यानें 'नैषध' महाकाव्य रचलें व तें राजास दाखविलें. राजा म्हणाला, " हें तर उत्तमच आहे. पण तूं काश्मीरास जा आणि तेथील पंडितांस हें दाखव, व तें त्यांस कितपत मान्य होतें तें मला येऊन सांग." श्रीहर्ष काश्मीरास गेला. तेथें प्रत्यक्ष भारतीदेवीला तो ग्रंथ मान्य झाला. ही गोष्ट तेथील पंडितांस सांगून श्रीहर्षानें त्यास प्रार्थिलें कीं, " हें माझें काव्य येथील राजा माधवदेव याच्या हातीं जाईल असें करा व 'हें काव्य श्रेष्ठ आहे' असें एक प्रमाणपत्र आमच्या राजाला दाखवण्यासाठीं मजजवळ द्या." पण त्या मत्सरी पंडितांनीं यांतील एकही गोष्ट मान्य केली नाहीं. श्रीहर्ष माधवदेव राजाच्या दर्शनाची वाट पाहत तेथेंच राहिला.

**विलक्षण धारणाशक्ती.**

एके दिवशीं तेथील एका नदीतीरावरील देवालयांत श्रीहर्ष रुद्रजप करीत बसला होता. तेथें दोन दासी पाणी भरण्यासाठीं आल्या. प्रथम घागर कोणीं भरावी यावरून वाद सुरू होऊन त्यांचें भांडण हातघाईवर आलें. त्यांनीं एकीमेकींचीं डोकींहि फोडलीं. प्रकरण न्यायालयांत गेलें. " तुमच्या मारामारीच्या वेळीं कोणी साक्षीदार होता का ?" असा प्रश्न राजानें विचारतांच त्या दासी म्हणाल्या, " होय, कोणी एक भटजी तेथें जप करीत होता." राजाच्या बोलण्यावरून श्रीहर्ष न्यायसभेंत गेला. राजानें या प्रकरणाची चौकशी त्याजपाशीं करतां तो राजास संस्कृतांत म्हणाला, " महाराज, मी परप्रांतीय आहें. ह्या प्राकृत बोलणाऱ्या दोन दासी आपल्या भाषेंत काय म्हणाल्या तें मला उमगलें नाहीं. पण त्यांच्या तोंडून त्या वेळेस ध्वनी कोणते निघाले ते मात्र माझ्या लक्षांत आहेत." 'ते ध्वनि काढून दाखवा' असें राजानें म्हणतांच एकमेकींनीं परस्परांस उद्देशून उच्चारलेलीं काश्मिरी भाषेंतील अनेक वाक्यांपाठीमागें वाक्यें या विलक्षण धारणाशक्तीच्या पंडितानें घडाघड बोलून दाखवलीं. सर्व न्यायसभा या प्रकारानें आश्चर्यस्तिमित झाली. राजानें त्या दासींच्या प्रकरणीं काय द्यावयाचा तो निर्णय दिला. नंतर श्रीहर्षास आदरानें बोलावून घेऊन त्याची सर्व हकीकत राजानें त्यास विचारली. श्रीहर्षानें घडलेला सर्व वृत्तान्त राजास कळवला. तेव्हां राजाला काश्मीरस्थ पंडितांचा फार राग आला.

त्यांस आपणासमोर बोलावून तो म्हणाला, "मूर्खांनो, अशा पंडितरत्नाचा मत्सर करतां? तुम्ही सर्व मिळून या श्रीहर्षाचा घरोघरीं सत्कार करा. नंतर राजानेंहि त्याचा सत्कार करून त्यास जयचंद्राकडे पाठविलें. श्रीहर्षाकडून सर्व वृत्तान्त कळल्यावर राजालाहि फार आनंद झाला. तेव्हांपासून नैषध काव्याची कीर्ति दिशांदिशांतून पसरली.

**मामांचा तिखट विनोद.**

आणखी अशीहि एक दंतकथा काश्मिरांत प्रचलित आहे कीं 'काव्यप्रकाशा'चा कर्ता 'मम्मट' हा काश्मीरस्थ पंडित श्रीहर्षाचा मामा. श्रीहर्ष काश्मीरास गेला असतां त्यानें आपलें नैषधीय काव्य मामांस मोठ्या आदरानें आणि अभिमानानें दाखविलें. मामांनीं त्या काव्याचीं कांहीं पानें चाळून भाच्याला म्हटलें कीं, "अरे, हें काव्य मला जर अगोदर दाखवतास तर बरें झालें असतें." या वाक्यानें श्रीहर्षाच्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें झालें व आपल्या काव्याची स्तुति आपल्यास आतां ऐकावयास मिळणार या कल्पनेनें तो उतावळा होऊन म्हणाला, "कां बरें?" यावर मामा शांतपणें म्हणालें, "कांहीं नाहीं; तुझें काव्य माझ्या हातीं जरा लवकर पडतें तर माझ्या 'काव्यप्रकाशां'तील काव्यदोषांच्या सातव्या उल्लासात घालण्यासाठीं उदाहरणें शोधण्याचे जे मला आयास पडले ते पडले नसते. एका ठिकाणींच माझें काम झालें असतें!' डॉ. बुल्हर हे काश्मीरांत गेले असतां तेथील पंडितांकडून त्यांना कळलेली ही आख्यायिका विश्वसनीय नाहीं. मम्मट व श्रीहर्ष यांच्या काळांत एका शतकाचें अंतर आहे. मम्मट इ. सन १०५० च्या सुमाराचा, तर श्रीहर्ष ११५० च्या नंतरचा. पण नैषधीय काव्याच्या क्लिष्टतेवर रुसलेल्या कोणी डोकेबाज गृहस्थानें हा मामा-भाच्याचा वादरायणसंबंध जोडून ही लोणकढी थाप बनवलेली दिसते!

असो. काश्मीरच्या भारतीदेवीला मान्य व तेथीलच पंडितमम्मटाला अमान्य असें हें 'नैषधीयचरित' महाकाव्य कसलें आहे तें तरी पाहूं व मगच आपलें त्याबद्दलचें मत ठरवूं.

# नैषधीय चरित-कथासार[1]

## त्याचें सारेंच अद्भुत !

पुण्य-श्लोक नलराजाची गोड कथा कोणा मानवाला मोहिनी घालणार नाहीं ? मानवाचें तर राहोच, ह्या निषध देशाच्या महाप्रतापी अधीश्वराच्या कथेचें सेवन करणाऱ्या देवानासुद्धां तिच्यापुढें अमृत फिकें वाटते !

त्याचें एकेक ऐकावें तें अद्भुतच. विद्या तर त्याच्या जिह्वाग्रावर नाचणारी नर्तकी होती. शत्रूवर चाल करून जाणाऱ्या त्याच्या अफाट सैन्यामुळें उडालेला धुरळा क्षीरसमुद्रांवर जाऊन बसायचा. आणि मग त्याचा तेथें व्हायचा चिखल. याच क्षीरसमुद्रातून बाहेर निघणाऱ्या चद्राला या चिखलाचा जो डाग एकदा लागला तो अद्यापि त्याच्या शरीरावर दिसतच आहे. नलाची राज्यव्यवस्था उत्तम असल्यानें परचक्रें, टोळधाडी, अतिवृष्टि, अनावृष्टि इत्यादि अनर्थ प्रजेला मुळींच ठाऊक नव्हते. अतिवृष्टि कोठें होत असली तर ती नळाच्या शत्रूंच्या बायकाच्या डोळ्यांतून मात्र सतत होई ! नलाचें औदार्य तर विलक्षणच होतें. त्यानें याचकाला दिलें नाहीं अशी अपार संपदा शिल्लकच नव्हती. सोन्याच्या मेरु पर्वताचीं खाडें करून तो आपण अद्याप याचकांना वाटून दिला नाहीं आणि दानोदकाच्या सिंचनानें आपण अद्याप निर्जल मारवाडाचा समुद्र बनविला नाहीं याचीच मात्र त्याला रुखरुख लागून राहिली होती ! यामुळें त्याच्या राज्यात दारिद्र्य कोठें असलें तर तें दारिद्र्याचें होतें !!

---

१. निषध देशाचा राजा नैषध म्हणजच नल. त्याचें विदर्भ देशाची राजकन्या दमयन्ती इच्यावर प्रेम जडलें. हसाच्या मध्यस्थीनें तें वाढलें. इंद्रादि देवांना दून होऊन आलेल्या नलानें 'तूं मला न वरतां देवांनाच वर' असें परोपरीनें विनविलें असताहि दमयन्तीनें नलासच वरण्याचा आपला निश्चय मोडला नाहीं. अखेर स्वयंवरमंडपांत देवांना टाकून तिनें नलास वरलें. नळराजा दमयन्तीस घेऊन आपल्या राजधानीस आला व तेथें विविध विलासांत कालक्रमणा करू लागला. एवढाच नैषधाच्या पूर्वचरित्राचा कथाभाग ज्यांत आला आहे तें 'नैषधीयचरित.' काल बाराव्या शतकाचा उत्तरार्ध. सर्ग २२ (पूर्ण ?). श्लोकसंख्या २८०४.

'नलाचा प्रखर प्रताप आणि धवल यश पृथ्वींत विलसत असतांना मीं हे सूर्य व चंद्र निष्कारणच निर्माण केले' असा विचार मधून मधून ब्रह्मदेवाच्या मनांत येतो. जेव्हां जेव्हां त्याला असें वाटावयास लागतें तेव्हां तेव्हां– वृथा लिहिलेल्या व म्हणून गाळून टाकावयाच्या अक्षरा-भोंवतीं लेखक जसें एक वर्तुळ काढतो त्याप्रमाणें– तो त्या सूर्यचंद्रा-भोंवतीं त्यांचें वैयर्थ्यसूचक असें परिवेषरूपीं कडें घालून ठेवतो! यालाच सूर्याचें किंवा चंद्राचें खळें म्हणतात.

**कवींना विवंचना !**

नल सोळा वर्षांचा झाला नाहीं तोंच त्यानें सगळें भूमंडळ पादाक्रान्त केलें व आपलीं भांडारें विविध धनांनीं खचून टाकलीं. अशा या अखिल-गुणैश्वर्यसंपन्न नलाच्या देहांत, यौवन वसंत उपवनांत अवतरतो त्याप्रमाणें, अवतरलें. त्याच्या चरणांच्या कान्तीपुढें कमलें व हस्ताच्या शोभेपुढें पल्लव– यांची कींव यावी इतके– फिके पडले. शरदृतूंतील पौर्णिमेचा चंद्र तर त्याच्या मुखाचा चाकरहि शोभला नसता. यामुळें झालें काय? तर कमलें, पल्लव, चंद्र हीं नेहमींचीं उपमानें नलवर्णनाला निरुपयोगी झालीं, व यापेक्षां अधिक सुंदर उपमानवस्तूंची टंचाई झाल्यामुळें कवींना मोठीच विवंचना पडली!! यावरून नल नुसता सुकुमार होता असें मात्र कोणीं समजूं नये. त्याचे बाहू इतके पुष्ट, दीर्घ व कणखर होते कीं शत्रूंचे किल्ले हस्तगत करीत असतां नळाच्या बाहूंनीं हे गुण त्या किल्ल्याच्या अर्गला(अडसरां)कडून घेतले कीं काय असें वाटे! तसेंच त्या ठिकाणच्या गोपुरांच्या रुंद व बळकट दारांची रुंदी व बळकटी त्याच्या वक्षःस्थलानें उचलली कीं काय असा भास होई! अशा या शूर आणि मदनसुंदर नळाला पाहून त्रिभुवनांतील सुंदरींना त्याचा (चोरटा) अभिलाष वाटू लागला. स्वर्गांतील देवांगना, मृत्युलोकांतील मानुषी ललना व पाताळांतील नागकन्या नलाबद्दलचा आपला गूढस्थ भाव सारख्याच उत्कटतेनें व्यक्त करूं लागल्या.

**दमयंतीचें प्रेमवेड !**

एक दमयंती वगळली तर, आपल्या रूपाचा गर्व वाहणारी प्रत्येक सुंदर

स्त्री आरशामध्यें आपलें रूप रोज न्याहाळी; व हातांतील नलाच्या चित्राकडे नजर टाकून 'मी यांना साजेशी आहें काय?' असा प्रश्न आपल्या मनाला विचारी. आणि काय सांगावें? या प्रश्नाच्या नकारात्मक व निराशाजनक उत्तरानें निघालेल्या तिच्या दीर्घ सुस्कार्‍यांनीं तो आरसा धुकट होऊन जाई! हो! विदर्भाधिपति भीमराजाच्या लावण्यवती कन्येची— दमयन्तीची— गोष्ट सहज निघाली हें बरें झालें. नलाचे वाब्रतींत तिची अवस्था काय झाली होती तें आतां पाहा. तारुण्यांत पदार्पण करणार्‍या दमयन्तीनें नलराजाच्या रूपगुणांची कीर्ति ऐकलीच होती; त्यामुळें आपल्याला सर्वथैव अनुकूल हाच 'राजपुत्र' असा निश्चय करून तिनें मदनाच्या आज्ञेनें आपलें मन नलावर ठेविलें होतें. तें इतकें कीं ती आपलीं कामें-धामें टाकून देऊन पित्याच्या सेवेच्या निमित्तानें त्याच्याजवळच सारखी बसून राही. हेतु हा कीं राजसभेंत देशोदेशींच्या राजपुत्रांचे स्तुतिपाठ करणार्‍या भाट-बंदीजनांच्या तोंडून नलाची स्तुति आपल्याला ऐकायला मिळावी. आणि इतर राजपुत्रांच्या स्तुतींत नलाची प्रशंसा तिनें ऐकली कीं तिचा ऊर अभिमानानें भरून येई; व तिच्या अंगावर रोमांचादि सात्त्विक भाव दिसूं लागत. फार कशाला? तिला नलाचें इतकें वेड लागलें कीं तिच्या सख्यांनीं सहज बोलतां बोलतां 'देवनळ' नांवाच्या एका जातीच्या तृणाचा जरी उच्चार केला तरी ही हातांतलें काम टाकून आपल्या प्रिय नलाबद्दलच ह्या कांहीं तरी बोलत आहेत या समजानें कान टवकारून त्यांचें भाषण लक्षपूर्वक ऐकूं लागे! तिच्या मनांत कधीं नलाच्या लाभाबद्दल आशा तर कधीं निराशाहि डोकावूं लागे. तिला जागेपणीं आणि निद्रेंतहि नलावांचून दुसरा विषय दिसत नव्हता. एखादे वेळीं ती आपल्या चित्रकाराला म्हणे—'अरे चितार्‍या, त्रिभुवनांतल्या सौंदर्यालाहि खालीं पाहावयाला लावणारें असें एक सौंदर्यसंपन्न जोडपें काढशील, कीं त्याकडे माणसानें पाहातच राहावें.' आणि त्यानें असें जोडपें चितारलें कीं त्यांत नलाचें व आपलें रूपसाम्य पाहात ती तासन्तास बसे. पुढें पुढें तिला नलाचा विरह इतका दुःसह झाला कीं हिवाळ्यांतील दिवस व उन्हाळ्यांतील रात्री तिला दीर्घ वाटूं लागल्या!

**नलाचीहि तीच अवस्था.**

दमयन्तीची ही गाढ प्रीति एकतर्फी होती असें मात्र मानण्याचें कारण नाहीं हं !

नलाचेहि कानांवर दमयन्तीच्या असामान्य रूपगुणांची कीर्ति आली होती. त्यावरून मोत्यांच्या हाराला जसें अनुरूप सूत्र तसें आपल्या रूप-गुणांना तिचे रूपगुण साजेसे आहेत असें नलाला वाटलें. तिच्या रूपाची व गुणांची छाप नलाच्या मनावर बसते न बसते तोंच मदनानें आपल्या धनुष्यावर बाण चढवून तें नलावर रोखून धरलें. नलाचें मन दमयन्तीवर अनुरक्त झालें. आपल्या अनुरागाचीं प्रकट होणारीं लक्षणें लोकांपासून तो दिवसा कशींतरी लपवी व आपल्यावर त्याचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं असा बहाणा करी. पण स्मरव्यथेनें तो किती घायाळ झाला होता तें एक त्याचे हाल प्रत्यक्ष पाहणाऱ्या रात्रीला किंवा त्याच्या कोमल शय्येलाच ठाऊक होतें ! इतकें असूनहि मानधन नलानें आपण होऊन विदर्भराजाजवळ दमयन्तीला मागणी घातली नाहीं हें खरें पण स्नेही-मंडळींच्या संगतींत आपला दमयन्तीविषयक अभिलाष मात्र लपवून ठेवणें त्याला दिवसेंदिवस दुरापास्त होऊं लागलें. म्हणून आपण आतां उद्यान-विहाराच्या निमित्तानें एखाद्या निवान्त निर्जनस्थळीं तरी जावें असा विचार त्यानें केला. आज्ञेसरशीं सेवकांनीं आणलेल्या शुभ्र अश्वावर आरूढ होऊन व सांगातीं अश्वसैन्य घेऊन तो नगराजवळील एका क्रीडोद्यानांत शिरला व तेथील अपूर्व शोभा पाहूं लागला. तेथें त्याला अनेक फुलें, चित्रविचित्र पक्षी व लता दिसल्या. तेथील सुगंधादिकांनीं त्यांच्या बाह्येंद्रियांना संतोष होतोसें दिसत होतें. पण दमयन्तीविरहानें पीडलेल्या त्याच्या मनाला मात्र खरा आनंद वाटत नव्हता. इतक्यांत त्याच्या दृष्टीला तेथील एक सरोवर पडलें. तें इतकें अगाध, विस्तीर्ण आणि बहु-मोल वस्तूंनीं भरलेलें होतें, कीं पूर्वीपेक्षां अधिक रत्नांनीं युक्त असा हा समुद्रच मंथनाचे भयानें या गुप्त स्थळीं येऊन राहिला असावासें वाटें.

**सोन्याचा राजहंस.**

त्यांत अनेक पक्षी विहार करीत होते. त्यांमध्यें एक सोन्याचा आश्चर्य-

कारक हंस नलानें पाहिला. तो एका हंसीच्या मागें चालला होता. त्याची तांबडीलाल व कोमल चोंच आणि चरण हीं अनुरागवृक्षाच्या पानें फुटलेल्या अंकुरांसारखीं दिसलीं. त्या तसल्या अपूर्व पक्ष्याला पाहून नलाच्या विरह-पीडित मनालाहि मोठें कुतूहल वाटलें. इतक्यांत, रतिक्रीडेनें दमलेला तो हंस पंखानें आपलें शिर झाकून घेऊन व एक पाय पोटाशीं धरून आणि दुसरा लांबवून क्षणमात्र निजला. तें पाहून राजा घोड्यावरून उतरला. आणि खालीं वाकून आपल्या पायांची चाहूल लागूं न देतां गुपचूप त्या हंसाजवळ गेला. व त्यानें हात पुढें करून त्याला धरलें. कोणी तरी आपल्याला पकडलें आहे याची जाणीव होतांच हंसानें गडबडीनें उडून जाण्याची खूप धडपड केली. निराशेनें पुष्कळ चिंवचिंव केली पण काहींच यत्न चालेना. म्हणून तो नलाच्या हातावर चंचुप्रहार करूं लागला. या प्रकारानें सरोवरांतील पक्ष्यात एकच गोंधळ उडाला. विशेषतः राजहंसाचा थवा करुण चीत्कार करूं लागला. हंसाचा शब्द स्त्रियाच्या पैजणांच्या नादासारखा असल्यानें त्या वेळीं असें वाटलें कीं या सुंदर पक्ष्यांच्या वियोगानें शून्य झालेले तें सरस्थल सोडून शोभादेवी आपल्या पैंजणांचा झणत्कार करीत दूर निघून जात आहे !

**'धिक्कार असो तुला !'**

सोन्याच्या पंखाच्या त्या हंसाला आपल्या करपंजरांत हलकेंच घरून राजा त्याच्या विलक्षण रूपाचें कौतुक करीत असतां तो हंस त्याला त्वेषानें म्हणालाः—

"राजा, धिक्कार असो तुझ्या लोभी मनाला ! माझे पंख सोन्याचे आहेत याच कारणास्तव तुझ्या तोंडाला पाणी सुटलें ना ? अरे, पण सुवर्णराशींनीं भरलेल्या तुझ्या खजिन्यांत या माझ्या अंगच्या गुंजभर सोन्यानें कितीशी भर पडणार ? समुद्रांत तुषारायेवढी तरी ? शिवाय, माझा तुजकडून होणारा वध केवळ प्राणिवध नाहीं. तुझ्या भलेपणावर विश्वास ठेवून तुझ्या उद्यानांत मी विरहत असतां तूं माझा विश्वासघात केला आहेस. विश्वास ठेवून राहिलेल्या शत्रूंचाहि वध करणें निन्द्य होय असें धर्मज्ञ मानतात. मग मी तर काय एक गरीब पांखरूं ! तुला हिंसेची इतकी खुमखुमच असेल तर जागजागीं असलेल्या बाहुशाली वीरांशीं

युद्ध करून ती शमव कीं ! माझ्या गरीबाच्या मागें कां लागतोस ? एखाद्या मुनीप्रमाणें मी फळें, मुळें व जल यांवर उपजीविका करतों. अशा मजवरहि शस्त्र उचलणाऱ्या तुझ्यासारख्या स्वामीची लाज धरित्रीला खरोखर वाटेल."

**सुटकेचा आनंद.**

हें त्या हंसाचें मनुष्यवाणीनें केलेलें भाषण ऐकून नलाच्या मनांत आश्चर्य, लज्जा व कृपा या भावनांचे संमिश्र तरंग उठूं लागले.

अशा वेळीं त्याच्या चित्ताला पाझर फुटावा म्हणून हंस काकुळतीला येऊन त्याला बोलला:—" राजा, माझ्या वृद्ध मातेला मी एकुलता एक पुत्र. माझी पत्नी नुकतीच प्रसूत झालेली. या दोघींचाहि मीच काय तो आधार. असें असतां माझ्या जिवावर उठलेल्या तुझ्या चित्तांत दया कशी येत नाहीं ? आज मजवांचून घरीं परत गेलेले माझे स्नेही माझ्या उत्कंठ मातेला माझें वृत्त कोणत्या शब्दांनीं सांगतील ? तें दारुण वचन ऐकून माझ्या आईची अवस्था काय होईल ? स्वभावतःच भीरु असलेला माझ्या पत्नीला सर्व दिशा शून्य होतील आणि या दुःखानें खचून ती मेल्यावर माझी असहाय चिमणीं चिमणीं बाळें पटापट् प्राण टाकतील. म्हणजे माझें हें दुसरें मरण झालें म्हणावयाचें ! "

याप्रमाणें शोक करणाऱ्या त्या हंसाला त्या कृपाळू नलानें सोडून दिलें व त्यास तो म्हणाला, " तुझें केवळ रूप पहाण्यासाठींच तुला मीं धरलें होतें. तें मीं पाहिलें. आतां तुला वाटेल तिकडे तूं खुशाल जा. " हंसाला सोडलेला पाहून त्याच्या बंधनानें दुःखाश्रू गाळीत असलेल्या त्याच्या बांधवांना अत्यंत हर्ष झाला व ते आनंदचीत्कार करून त्याचेभोंवतीं घिरट्या घालूं लागले.

**उपकाराची फरतफेड.**

त्या पक्षिसमुदायांत सुटकेच्या सुखाचे कांहीं क्षण घालवून तो हंस पुन्हां नलाच्या हातावर आपण होऊन येऊन बसला व त्याला म्हणाला, " पशुपक्षांची शिकार करणें हें राजधर्माला विरुद्ध नाहीं. तथापि तूं मला सोडून दिलेंस यावरून तुझा धर्म दयामूल आहे यांत संशय नाहीं. तो

तुला जें थोडें कठोर बोललों त्याचें निराकरण व्हावें म्हणून मी तुझें कांहीं हित करणार आहें. आपण होऊन कोणी हित करूं लागला तर त्याला तुझ्यासारख्या सार्वभौमानेंहि नको म्हणूं नये. केल्या उपकाराची परतफेड म्हणूनच मी ही गोष्ट करीत असल्यानें तें हित लहान आहे कीं मोठें आहे हा विचार गौणच होय. ऐक तर. शत्रूंना भयप्रद वाटणारा भीम नांवाचा विदर्भदेशाचा राजा आहे. त्याला दमन नांवाच्या ऋषीच्या वरप्रसादानें एक कन्या झाली. त्रिभुवनांतील सुंदर स्त्रियांचा रूपगर्व दमन करण्यासारखें अप्रतिम लावण्य हिचें असल्यानें तिला 'दमयन्ती' असें नांव मिळालें आहे.

ती शृंगारपुतळी भैमी, हे वीरा, तुला अगदीं साजेशी आहे. निर-निराळ्या सरोवरांत अवगाहन करण्याच्या इच्छेनें मी नाना प्रदेशांतून हिंडत असतों. विदर्भांत प्रवास करीत असतां ती माझ्या दृष्टीस पडली. तिला पाहिल्यावर 'हिचा कोण भाग्यवान् पति विधात्यानें योजला असावा बरें!' असा विचार माझ्या मनांत आला. तेव्हांपासून या दृष्टीनें मी पुष्कळ तरुण न्याहाळींत आहें. त्यांत योग्य असा तूंच आहेस असा मीं आज तुला पाहिल्यावर निश्चय केला. तुझ्याचांचून तिचें व तिच्यावांचून तुझें रूपगुण विफल आहेत. पण हिची अभिलाषा देवहि स्वतः करीत असल्यानें हिचा लाभ तुला कसा व्हायचा हा मोठा प्रश्न आहे. म्हणून मी करणार आहें तें एवढेंच कीं तुझे गुण तिच्यापुढें अशा पद्धतीनें वर्णीन कीं तुझ्या ठायीं आसक्त झालेलें तिचें मन इंद्रालाहि विचलित करतां येऊं नये. खरें म्हणजे कृतीनें बोलावें, शब्दांनीं बोलूं नये, असा सज्जनांचा संप्रदाय आहे. पण तुझी या गोष्टीला केवळ संमति मिळविण्यासाठींच हे अप्रशस्त मी शब्द बोललों.

हंसाच्या या भाषणानें नलाच्या मनाला नुसत्या गुदगुल्या झाल्या व तो खुदकन् हंसला. त्यानें त्या हंसाच्या आकृतीचें व तिला साजणाऱ्या त्याच्या गुणांचें कौतुक केलें व तो त्यास म्हणाला, 'उन्हानें तापलेल्याला जसा शीतल वायु भेटावा तसा कामज्वरानें तप्त असलेल्या मला तूं भेटलास. मीं दमयन्तीबद्दल आजवर अनेकदां ऐकलें आहे; पण तुझ्या वर्णनामुळें आज ती माझ्या दृष्टीसमोर हुबेहूब उभी राहिली आहे असें मला वाटतें. आणि त्यामुळेंच मी विरहसागरांत बुडत आहें. तरी कृपा करून तूं माझी

नाव हो. पण माझ्या प्रार्थनेपूर्वीच तूं स्वतः हें काम करावयास प्रवृत्त झालाच आहेस म्हणा. तरी लौकर जा. तुझें अंगीकृत कार्य सिद्धीस जावो.'

## हंसाचें हितगुज.

हंसाला असा निरोप देऊन नल आपल्या उद्यानगृहांत शिरला. हंसाच्या भाषणाची वारंवार आठवण होऊन त्याला विस्मय होत होता. इकडे हंस त्याच दिवशीं दमयन्तीची गाठ घेण्यासाठीं कुंडिनपुराकडे उडून गेला. मार्गांत त्याला शुभशकुन झाले. भीमराजाचें कुंडिनपुर नांवाचें अतिसंपन्न, विशाल आणि सुंदर नगर हंसाच्या दृष्टीस पडलें. तेथें दमयन्तीचें एक अतिरमणीय क्रीडावन होतें. त्या वनांत तिच्याचसारख्या रूपयौवनसंपन्न सख्यांच्या परिवारात, चांदण्यांच्या परिवारांत चंद्रकोरेसारखी, चमणारी दमयन्ती हंसाच्या दृष्टीस पडली. लागलीच मंडलाकार गिरक्या घेत घेत तो दमयन्तीच्या जवळच जमिनीवर उतरला. त्या हंसाचें तें विलक्षण रूप पाहून दमयन्तीसह सर्व तरुणींना फार आश्चर्य वाटलें. दमयन्ती तर त्याला धरण्यासाठीं गुपचूप त्याचेजवळ गेली. तिचा जो हेतु जाणूनसुद्धां हंस बुद्धयाच आकाशात उंच उडाला नाहीं. कधीं तिच्या हातालगत रहा, तर कधीं किंचित् दूर जा अशा हुलकावण्या दाखवीत दाखवीत त्यानें तिला मोठ्या खुबीनें एकान्त प्रदेशांत नेलें व तेथें तिला तो म्हणालाः— " हे राजपुत्री, माझ्यासारख्या असामान्य पक्ष्याला धरण्यासाठीं तूं वृथा कां श्रमते आहेस ! साक्षात् भगवान् ब्रह्मदेवाचें वाहन असणाऱ्या हंसाच्या कुळाशीं आमचा संबंध आहे. त्याचप्रमाणें आमचें बोलणें स्वर्गवासी देवादिकांनाच ऐकावयास मिळावयाचें. मंदाकिनीमध्यें विकसणाऱ्या स्वर्णकमलातील बिसतंतु हा आमचा आहार आहे. त्यामुळें आमची तनु आहारानुरूप सोन्याची झाली आहे. नलराजाच्या सरोवरांत आम्ही हंस विरहण्यासाठीं आलों आहों मी त्यांतला एक असून पृथ्वीवरील प्रदेश पहाण्यासाठीं इकडे मजेनें आलों आहें. "

## हा लाभ तुलाच व्हावा.

" माझ्या वडिलाचे आशीर्वादामुळें मी कितीहि हिंडलों तरी मला श्रम होत नाहींत. त्यामुळें मला (एका नल नांवाच्या भाग्यवान् राजपुत्राखेरीज) कोणीहि मानव पाशादिकांनीं पकडूं शकत नाहीं. हा नल पृथ्वीवर रहात

असला तरी त्याच्या सुकृत्यांमुळें देव त्याला स्वर्गीय भोग देतात. आम्ही सोन्याचे हंस त्याची सेवा करतों पृथ्वीवरील पुण्यशीलामध्यें नलच अग्रगण्य आहे. फार कशाला ? नलाचें रूप, गानकौशल्य, औदार्य, रसिकता इत्यादि गुणामुळें स्वर्गींच्या देवदेवताहि आश्चर्यचकित होतात व त्यांचीं मनें नलाकडें आकर्षिलीं जातात. थोडक्यांत सांगावयाचें तर नलाच्या अद्भुत व असंख्य गुणांची मोजदाद होणेंच अशक्य आहे मला वाईट येवढेंच वाटतें कीं तुझ्यासारखी गुणवती जर नलाबद्दल उदासीन राहिली तर नलाला वरून एखादी सामान्य राजपुत्रीहि दिव्य भोग भोगील माझी इच्छा अशी आहे कीं हा अलभ्य लाभ तुलाच व्हावा. नलाचा आणि तुझा विवाह घडवून आणणें हें विधीलाहि इष्ट वाटण्याचा संभव पुष्कळ. कारण तुझ्यासारख्या रूपगुणयुक्त राजकन्येशीं नलाचा संबंध जर जोडावयाचा नाहीं तर तुल्यगुण वधूवर एकत्र आणण्याचा दुर्लभ योग ब्रह्मदेवानें दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं साधावयाचा बरें? बरें, तें आतां असो. मीं तुझा निष्कारणच वेळ घेतला. तुझ्या मनांत काय आहे तें सांगशील तर या संबंधांत तुला कांहीं साहाय्य करून या अपराधाचें परिमार्जन करीन म्हणतों. ”

**जरा स्पष्ट बोल.**

हंसाचें हें भाषण ऐकून दमयन्ती किंचित् काल स्तब्ध राहिली व कांहीं विचार करून म्हणाली, “ हंसा, तूं तर परोपकारशील सज्जन आहेस. तूं माझा अपराध कसला केलास? मीच तुझी अपराधी आहें. आतां माझ्या मनोरथांविषयीं म्हणशील तर तुला विचारतें, कीं जो हेतु मीं मनांत रात्रंदिवस धरून ठेविला आहे तो कोणत्या शब्दांनीं मी तुला उच्चारून दाखवूं ? मनांत धरलेली ( आकाशांतील चंद्राला धरावें अशा प्रकारची ) अति उच्च आकांक्षा बोलून दाखवतांना माझ्यासारख्या कुमारीला लज्जा वाटल्याशिवाय कशी राहील ? ” या दमयन्तीच्या अतिमधुर पण फारच अल्प व संदिग्ध बोलण्यानें हंसाला तिच्या मनोरथाचा नीटसा बोध झाला नाहीं. म्हणून स्पष्टपणें तिचा मानस समजून घेण्यासाठीं तो तिला म्हणाला, ‘ राजपुत्री, अगदीं लंकागमनासारखा अलभ्य मनोरथ जरी तूं धरलास तरी तो मी पुरवूं शकेन.’ हें आश्वासन मिळाल्यानें हर्षित झालेली दमयन्ती श्लेषानें म्हणाली,

' माझें चित्त लंकेलाहि जाऊं इच्छित नाहीं. ( चेतो न लंकामयते ) आणि त्याला दुसऱ्याहि कुठें जायचें नाहीं. (मनांतील अर्थ– चेतो नलं कामयते—म्हणजे मन नलाची इच्छा करतें. दुसऱ्या कोणाहि पुरुषाची इच्छा करीत नाहीं. )त्यावर अधिक स्पष्ट बोलण्याचा हंसानें आग्रह केल्यावर दमयन्ती म्हणाली, 'मला जर माझ्या पित्यानें नलाव्यक्तिरिक्त दुसऱ्या पुरुषाला दिली तर मी अग्नींत ही तनु जाळून जन्मांतरी तरी नल पति मिळावा म्हणून वाट पाहात राहीन. तरी आतां मला नलाची प्राप्ति करून देणें किंवा मरण देणें हें तुझ्या हातीं आहे. तरी विलंब न लावतां तूं नलाकडे जा व मजबलद्दची गोष्ट त्याचेजवळ योग्य वेळीं व योग्य पद्धतीनें काढ. '

**माझा हेतु सफल झाला.**

या तिच्या भाषणावरून तिची नलाविषयीं अत्यंत गाढ आसक्ति जाणून हंस तिला म्हणाला, " भैमी, असें जर आहे तर माझ्या खटपटीची या बाबतींत आवश्यकताच नाहीं. तुम्हां दोघानाहि सारखीच बाधा देऊन मदनानेंच ही घटना मनाशीं योजलेली आहे. नलाला सारखा तुझाच ध्यास लागला आहे. खरें सांगावयाचें तर नलानेंच मला तुजकडे पाठविलें आहे. माझ्या येण्याचा हेतु आतां सफल झाला. परस्पराचे लाभानें तुम्हा दोघांचें जीवन कृतार्थ होवो. " असें तो हंस बोलत आहे इतक्यात दमयन्तीच्या मैत्रिणी तिचा शोध करीत तेथें आल्या. तें पाहून ' बरें तर, तुझा निरोप घेतों, तुझें कल्याण असो ! ' असें बोलून हंस नलाच्या राजधानीकडे उडाला. दमयन्तीच्या मैत्रिणी ' अग खुळे पोरी, वाट चुकून रानांत चालली होतीस ना ! चल, घरीं जाऊं या ' असें तिला म्हणाल्या व तिला घरीं घेऊन गेल्या. हंस पूर्वीच्या सरोवराजवळ येऊन पाहतो तों नल तेथील एका अशोकवृक्षाच्या मुळाशीं विरहाविव्हळ होऊन बसलेला आणि " हे दमयन्ती, तूं आपण होऊन मजकडे येत नाहींस तें ठीकच; कारण तूं पराधीन आहेस. हंसा, ती तुला काय म्हणाली रे, सांग ना लौकर " असें स्वतांशींच बोलत बसलेला आढळला. हंसानें घडलेला सर्व वृत्तान्त त्याला निवेदन केला. तेव्हां नल पुढील घटनेची वाट पाहात राहिला.

## विवाह हेंच तिला औषध.

हंसाच्या मुखांतून नलाच्या रूपगुणांचें वर्णन ऐकल्यापासून दमयन्तीला पराकाष्ठेची मदनबाधा होऊं लागली. ती कृश, पांडुर आणि चिन्तामग्न दिसूं लागली. ती कधी रडे, कधीं हसे, तर कधीं भ्रमिष्टासारखी सखींना उद्देशून काव्यच बोलूं लागे. त्यांत चंद्र व मदन यांच्या छळावर तिचा विशेष कटाक्ष असे. पण या बोलण्याच्या श्रमानें तिचें पांढरें झालेलें तोंड कोरडें पडे, म्हणून ती प्रश्नांना उत्तरेंच तेवढीं देई. 'दमयन्ती, या निर्दय मदनाच्या तडाख्यांतून तूं आपले प्राण तुझ्या नैसर्गिक धैर्यानें वांचव ना! अशी हातपाय गाळतेस काय?' असें मैत्रिणींनीं म्हटल्यावर ती पुढीलप्रमाणें उत्तरच तेवढें देई, "पण तें त्या माझ्या वैऱ्याचे रक्षण, सख्यांनो, मी कशाला करूं तें मला सांगा." 'दमयन्ती, तुझ्या हृदयांतच सदोदित तुझा प्रिय असून तूं कष्टी कां?' असें म्हटलें म्हणजे तिचें असें उत्तर असें—"तें खरें ग, पण तो सारखा हृदयांतच आहे. आणि बाहेर प्रत्यक्ष दृष्टिगोचर कधींच होत नाहीं म्हणून तर मी कष्टी होतें." हें बोलत असता ती मूर्छित पडली. तिच्या सख्यांनीं तिला सावध करण्याचा प्रयत्न चालविला. तो त्याचा उडालेला गोंधळ व गलका तेथें अकस्मात् आलेल्या भीमराजानें ऐकला व तो घाबरून गेला. त्याच्यामागोमाग त्या कन्यान्तःपुरांत आलेल्या एका सचिवानें व एका वैद्यानें दमयन्तीच्या या रोगावर एकच औषध सांगितलें. श्लेषानें सचिव म्हणाला कीं, 'हिला नलराजपुत्राची प्राप्ति करून दिली पाहिजे.' वैद्य म्हणाला, 'हिला नलदाची—वाळ्याची—उटी लावली पाहिजे.' (स्यादस्या नलदं विना न दलने तापस्य कोऽपि क्षमः।) राजाला दमयन्तीच्या स्वास्थ्याची चिंता लागलेली असल्यानें त्यानें या दोघांनींहि सांगितलेला श्लिष्ट उपाय नीट ऐकला नाहीं पिता आलेला कळतांच दमयन्ती झटकन् उठली व तिनें त्याला प्रणाम केला. राजा अनुभवी असल्यानें त्यानें कन्यकेच्या चर्येवरून ताडलें कीं, हिच्या रोगावर विवाह हेंच औषध आहे! व तिला आशीर्वाद देऊन म्हणाला, "बाळे, आतां स्वयंवरांतच तुझा इष्ट वल्लभ कोण असेल तो वर!" आणि 'दमयन्तीच्या प्रकृतीला जपा' असें सांगून लज्जावनत कन्येशीं जास्त कांहींएक न बोलतां राजा

निघून गेला. सख्यांनींहि ताडलें, कीं आतां स्वयंवर लौकरच होईल व आपल्या सखीची पीडा नाहींशी होईल.

## प्रीति हाच त्यांचा पुरुषार्थ.

लागलीच भीमराजानें देशोदेशींच्या राजपुत्रांना दूतांकरवीं स्वयंवराचीं निमंत्रणें पाठविलीं आणि तो त्यांच्या आगमनाची मार्गप्रतीक्षा करीत राहिला. इकडे त्याच वेळीं देवर्षि नारद इन्द्राची भेट घेण्यास स्वर्गलोकीं आले. इंद्रानें त्यांचा आदरसत्कार केल्यानंतर एकान्तांत दोघांच्या गोष्टी सुरू झाल्या. संभाषणाच्या ओघांत इंद्रानें नारदास विचारलें, "महाराज, अलीकडे पुष्कळ वर्षें मी पाहातों आहें कीं धारातीर्थीं पतन पावून माझ्या लोकीं कोणीच शूर राजपुत्र कसे येत नाहींत ! निधड्या छातीनें समर-भूमीवर मरणान्त युद्ध करण्याची ईर्षा बाळगणाऱ्या वीरपुंगवांची निपजच, नारदा, राजवंशांत बंद पडली कीं काय ? हे वीर अतिथि मजकडे एखाद्या पापी यजमानाकडे येऊं नये तसे सांप्रत येत नाहींत, त्यामुळें मला माझें ऐश्वर्य व्यर्थ गेलेंसें वाटतें. तरी या संबंधांत माझें पातक आडवें येतें आहे कीं दुसरें कांहीं निमित्त आहे यांचें निवेदन करून माझ्या मनाची रुख-रुख आपण नाहींशी करावी." या प्रश्नांतून ध्वनित होणाऱ्या इंद्राच्या विनयाची प्रशंसा करून नारद म्हणाले, ' इन्द्रा, त्रैलोक्यांतील तरुण राजे स्वर्गीं येण्याचें पुण्यसुद्धां मोठ्या संतोषानें कां टाळीत आहेत त्याचें कारण ऐक. अरे, ती पृथ्वीला ललामभूत अशी भीमराजाची उपवर कन्या दमयन्ती आहे ना ? तिचें गाढ प्रेम म्हणे कोणा महाभाग्यवान् तरुणावर बसलें आहे. तो पूर्वपुण्याईचा धन्य युवक कोण ? असा प्रश्न तुझ्या ओठावर असलेला, इंद्रा, मला दिसतो आहे. पण मी योगी असूनहि मला तो कळलेला नाहीं. लज्जेनें त्याचें नांव ती सांगत नाहीं. त्यामुळें तिच्या पित्यानें तिच्या स्वयंवराचा निश्चय करून सर्वत्र दूत पाठविले आहेत. म्हणून आजकाल सर्व राजे केवळ दमयन्तीच्या लाभाकडे डोळे लावून बसले आहेत. त्यांना इतर कांहींच सुचत नाहीं. युद्धाला तर ते विषवत् मानतात आज राजपुत्रांचा मुख्य पुरुषार्थ म्हणजे जीं भूषणें किंवा जे गुण दमयन्तीला प्रिय असतील त्यांमध्यें आपण दुसऱ्यापेक्षां थोडें तरी श्रेष्ठ आहों असें दाखविणें व दमयन्तीच्या प्रीतीला पात्र होणें हाच झाला आहे. तिनें

तारुण्यांत पदार्पण केल्या दिवसापासून हें असें चाललें आहे. दमयन्तीच्या लाभापुढें त्यांना सर्व तुच्छ आहे. या कारणानें पृथ्वीवरील युद्धें बंद पडलीं असून माझी युद्ध पाहण्याची मोठी करमणूक नाहींशी झाली आहे. निदान स्वर्गांत तरी युद्ध पाहावयाला मिळेल का तें 'बघण्यासच मी येथें आलों आहें.''

**चौघांच्याहि तोंडाला पाणी सुटलें.**

यावर इंद्रानें स्वर्गांत युद्धाचा मुळींच संभव नाहीं असें त्यांस सांगितलें. हें ऐकून नारद म्हणाले, '' दमयन्तीच्या स्वयंवरासाठीं जमणाऱ्या राजपुत्रांत तरी कलह पेटून युद्ध सुरू होईल असें माझें अनुमान आहे. म्हणून मी आतां तिकडेच जातों.'' आणि इंद्राचा निरोप घेऊन ते पृथ्वीवर उतरले. नारदांनीं सहज सांगितलेल्या दमयन्ती स्वयंवरवार्तेंचा इंद्रावर निराळाच परिणाम झाला. तो मदनबाधित झाला. इंद्राचा हा अभिलाष इंद्राणीच्या कोपाचा, अप्सरांच्या विषादाचा व इतर परिजनांच्या उपहासाचा विषय झाला. दमयन्ती मिळवावी म्हणून यम, वरुण व अग्नि हेहि इंद्राबरोबरच पृथ्वीवर जाण्यास तयार झाले. त्यांनीं दमयन्तीचें चित्त आपल्याकडे वळवतील असे चतुर दूत ( मात्र एकमेकांस समजूं न देतां ) गुप्तपणें पुढें पाठविले. त्यांनीं भीमराजाला नजराणेहि पाठविण्यास कमी केलें नाहीं. पृथ्वीचा स्वर्गच झाला यामुळें ! कारण ज्याबद्दल उत्कट इच्छा वाटते तोच स्वर्ग म्हटला पाहिजे. हे चार देव आपापल्या वाहनांतून पृथ्वीवर उतरले असतां त्यांना नलाचा रथ पुढून येतांना दिसला. नलाचें तें तारुण्य व रूप पाहून लज्जित झालेले ते चौघे दमयन्तीलाभाबद्दल निराश झाले. काय करावें हें त्यांना कळेना. इतक्यांत इंद्रानें नलाची स्तुति करून कपटानें आपल्या कार्यास त्याचा उपयोग करून घेण्याचा घाट घातला व तो खोट्या आर्जवानें नलाला म्हणाला, ''आम्ही चार देव असून आमचें तुझ्यापाशीं एक मागणें आहे.'' नल हा जात्याच उदार, निष्कपटी व सरळ अन्तःकरणाचा असल्यानें त्याला इंद्राच्या कपटाची कल्पना प्रथम आली नाहीं. आरंभीं तो थोडा साशंक झाला. पण तें क्षणभरच. 'माझ्यासारख्या मानवाकडे देवेंद्र कांहीं वस्तु मागतो आहे' ही गोष्ट त्याला विशेष वाटली व याचकाचे मनोरथ पुरविणें हें आपलें ब्रीद आहे या कल्पनेनें त्यानें देवेन्द्राला

प्राणाधिक वस्तूहि देण्याचें वचन दिलें. तेव्हां इंद्रानें सरळच त्याला सांगितलें कीं, "आम्ही चौघे दमयन्तीच्या पाणिग्रहणाची इच्छा करून इकडे आलों आहोंत. तूं आमचा दूत म्हणून दमयन्तीकडे जा व तिचें मन वळव."

इंद्राच्या या याचनेनें आणि त्यानंतर त्यानें केलेल्या आपल्या स्तुतीनें नळाला देवांच्या कपटाची पूर्ण कल्पना आली. आणि 'जशास तसें' या न्यायानें तो इंद्राला म्हणाला, 'आपण सर्व फार थोर आहांत मीं आपल्याला फसविणें योग्य नव्हे. म्हणून सांगतों कीं, जिला वरावें म्हणून मी चाललों आहें तिच्याजवळ तुमचा दूत म्हणून मी जाणें कसें शक्य आहे? माझ्यासारख्या विरही माणसाकडून दूताला अवश्य असलेली कामगिरी योग्य तऱ्हेनें पार पाडतां येणार कशी? उलट मीच तुमच्याकडे अशी याचना करतों कीं, "दमयन्ती मला वरील असें कांहीं करा! मी तुमचा दूत होणें तुम्हांलाच गैरसोईचें आहे. तरी मला क्षमा असावी."

तो दूत झाला!

हें नळाचें भाषण ऐकून इंद्र, यम, वरुण व अग्नि यांनीं एकच गिल्ला केला. 'तूं वचन देऊन मोडतोस हें तुझ्या निर्मळ वंशकीर्तीला शोभतें का?' असें जो तो—कोणी स्तुति करून तर कोणी थोडें कठोर बोलून—त्याला टोचूं लागला. त्यांच्या माऱ्यापुढें नलाचा टिकाव लागेना. अखेर त्यानें त्याचें दूतत्व पत्करलें. तेव्हां आनंदानें इंद्र त्याला म्हणाला, "तुला इच्छेप्रमाणें गुप्त व प्रकट होण्याची शक्ति तुला प्राप्त होईल. जा, आपल्या कामात यशस्वी हो." आणि सर्व देव नलाच्या कामगिरीची वाट पाहात तेथेंच थाबले.

नल कुंडिनपुराबाहेरच्या प्रदेशांत आल्यावर रथांतून उतरला आणि गुप्तपणें नगरांतून संचार करूं लागला. तो त्याच्या दृष्टीला तेथील विस्मयकारक राजवाडा पडला. गुप्तपणें तो दमयन्तीच्या अन्तःपुरांत शिरला. तेथें त्याला स्त्रियांचे व दमयन्तीच्या सख्याचे विश्रब्ध व्यापार व आलाप पाहावयास व ऐकावयास मिळाले. एका रमणीय स्थळीं दमयन्ती सखीसह बसलेली त्याला दिसली. तिच्यावरील त्याचें अनावर प्रेम व देवांचें त्यानें पत्करलेलें दूतत्व या दोहोंच्या लढ्यानें त्याचें मन क्षणोक्षणीं व्याकुळ

होत होतें. इतक्यांत कोणी एक दूती दमयन्तीचें मन इंद्राबद्दल अनुकूल करण्याचा प्रयत्न करीत आहे असें त्यानें पाहिलें. त्या इंद्राच्या दूतीनें मोहक वचनांनीं आपलें जाळें दमयन्तीच्या भोंवतीं पसरिलें. पण दमयन्तीनें तिला स्पष्ट सांगितलें कीं, " इंद्र हा देवेंद्र म्हणून मला मानुषीला वंद्य आहे; पण मीं माझ्या मतानें एका नराला (नलाला) वरलें असल्यानें इंद्राच्या विनंतीचा विचारहि माझ्या पातिव्रत्याला सोडून आहे." हें दमयन्तीचें भाषण ऐकून नलाला पराकाष्ठेचें समाधान झालें.

**पाताळच स्वर्ग ठरला.**

इंद्राच्या दूतीच्या बोलण्याचें पूर्ण निराकरण करून दमयन्तीनें आपल्याच ठायीं असलेलें प्रेम व्यक्त केलें हें पाहून नलाला संतोष झाला. त्यांतच तिच्या अप्रतिम लावण्याच्या दर्शनानें त्याला पराकाष्ठेचा विस्मय वाटला. अशा मनःस्थितींत त्यानें दमयन्तीच्या सौंदर्याचें आपल्यापुरीच अवयवशः मनसोक्त वर्णन केलें व शेवटीं तो उद्गारला, 'अगोदरच विधात्यानें हिला त्रैलोक्यसुंदरी केलें. त्यांत यौवनानें भर टाकली व शेवटीं मदनानें तर तिला शृंगारचातुर्य शिकवून तिचें वर्णन करणें ही गोष्ट शब्दांपलीकडची करून टाकली.' याच आनंदांत त्यानें आपलें अदृश्य रूप टाकून प्रकट होण्याचा विचार केला.

नल आपल्या असामान्य सुंदर रूपानें प्रकट होतांच दमयन्तीसह सर्व तरुणी आश्चर्यानें त्याचेकडे टक लावून पाहूं लागल्या. हा नलच असावा या विचारानें क्षणभर आशा, तर या सुरक्षित स्थळीं नल कोठचा येतो ? या शंकेनें निराशा अशीं दमयन्तीच्या मनाला उलटसुलट आंदोलनें बसूं लागलीं. अखेरीस मोठ्या नम्रपणानें तिनें नलाला विचारलें, " आपण येथें येण्याचें श्रम आपल्या कोमल तनूला कां दिलें ? यापुढें आपल्याला कोठें जावयाचें आहे ? आपण इकडे आल्यानें कोणत्या देशाची वसंतश्री नष्ट झाली बरें ? आपलें नांव सांगून माझ्या कानांची तृप्ति कराल का ? या सैनिकांनीं रक्षिलेल्या अन्तःपुरांत आपण प्रवेश कसा व कां म्हणून केला ? आपण कोणत्या वंशांत उत्पन्न झाला ? " रक्षकांची नजरबंदी करून आंत शिरलेला पुरुष कोणी नलासारखा सुंदर देव असावा असें मानून तिनें आतिथ्य करण्याच्या मिषानें त्याचें रूप-

वर्णन आरंभिलें. पण वस्तुतः नलाचें रूपसौंदर्य आपण वर्णीत आहों अशीच तिची भावना होती. ( उदाहरणार्थ ) तिनें म्हटलें, " आपण मानव असाल तर मही ( पृथ्वी ) धन्य—कृतार्थ—झाली. आपण देवांपैकीं असाल तर स्वर्गलोक सर्वोत्कृष्ट ठरला आणि आपण जर पाताळांतील नाग असाल तर सर्वांच्या खालीं असलेला हा नागलोक सर्वांच्यावर चढला म्हणावयाचा ! "

## देवांचा संदेश.

दमयन्तीनें अत्यंत मधुर वचनांनीं केलेली आपली प्रश्नगर्भ स्तुति व तिचा भाव पाहून नल फार संतोषला व आपण दूत आहों हें जाणून मोठ्या संयमानेंच तिला त्यानें उत्तर दिलें— " मी इंद्र, यम, अग्नि आणि वरुण या दिक्पालांनीं तुजकडे पाठविलेला दूत आहें. माझ्या आदरातिथ्याचे श्रम तूं घेऊं नको. मी ज्यासाठीं आलों आहें तें काम तूं केलेंस म्हणजे माझें आदरातिथ्य झालें. तुझ्या गुणांची मोहिनी तूं कुमारी असल्यापासूनच दिक्पालांवर पडली आहे. तरी त्यांपैकीं कोणाहिबरोबर विवाह करून तूं त्यांचे मनोरथ पूर्ण कर. विशेषतः इंद्राची आसक्ति तुजवर असून तुझ्यावांचून त्याला अहोरात्र चैन पडत नाहींसें झालें आहे. तीच परिस्थिति इतरांचीहि आहे. तुझें स्वयंवर उद्याच होणार आहे. ही वार्ता ऐकून त्यांना हर्ष झाला आहे. आणि ते आपल्या पत्न्यांच्या रोषाला एके बाजूस सारून तुझ्या लोभानें पृथ्वीवर आले आहेत. ते तेथून जवळच उभे असून त्यांनीं माझ्या द्वारें तुला एक संदेश पाठविला आहे. तो असा—' दमयन्ती, तूं आमची कामबाणाच्या जखमा बऱ्या करणारी औषधी हो. तुझी इच्छा करणारे इतर अनेक पुरुष असोत पण आमची निष्ठा एवढी आहे कीं तुझ्या चरणांचा प्रसाद हेंच आमचें जीवन आहे. नाहीं तर आमची धडगत नाहीं हें आम्ही मदनाची शपथ घेऊन खरें सांगत आहों. यासाठीं तुला आम्ही अमरत्वहि देऊं. पण हें बोलणें आम्हालाच लज्जावह नव्हे काय ? तुझ्या चरणकृपेनें जगणाऱ्या आम्हीं उलट तुलाच अमरत्व देण्याची गोष्ट कशी बरें बोलावी.? ' अशा प्रकारचा देवांचा संदेश घेऊन मी तुजकडे आलों आहें. तरी या-

पैकीं कोणातरी एकाला वरून माझें दूतत्व सफल कर एवढीच विनंति आहे.''

**अप्रस्तुत वटवट कशाला ?**

नलानें सांगितलेला वरील सुरसंदेश जो दमयन्तीनें ऐकला तो तिला संमत होता म्हणून नव्हे, तर नलाची गोड वाणी तिला ऐकायाची होती म्हणूनच. ती त्याला लगेच म्हणाली, ' अहो दूतमहाराज, मीं तुम्हांला तुमचें नांव व कुल विचारलें होतें. तें न सांगतां तुम्ही जी ही अप्रस्तुत लांबण लाविलीत ती तुम्हास शोभत नाहीं. तुमच्या मधुर वाणीनें कानाला संतोष झाला खरा, पण तुमचें नांव ऐकण्याचें सुख त्याला मिळालें नाहीं. पाण्याची तहान दुधानें भागते का कधीं ?' यावर नल उत्तरला, '' माझें नांव व कुल हें या प्रसंगीं अप्रस्तुत असल्यानें तें सांगण्याचें मीं मुद्दामच टाळलें. माझ कुल हलकें असलें तर तें मी तुजपुढें सांगण्यांत काय शोभा ! बरें, तें थोर असलें तर मी दूत म्हणून तुजकडे आलों असल्यानें त्या कुलाची विटंबनाच व्हावयाची ! तरी भलत्या गोष्टीचा हट्ट न धरतां मीं आणलेल्या सुरसंदेशाबद्दल काय तें बोल. तथापि तुझा आग्रहच असेल तर मी चंद्रवंशातला आपला कोणीतरी एक आहें असें समज.'' हें ऐकून दमयन्ती म्हणाली, '' ही माझी अशी प्रतारणा तुम्हीं काय म्हणून चालविली आहे ? तुमच्या या उत्तरानें मला कांहींच बोध होत नाहीं. अथवा मी तुम्हांला अशी अटच घालतें. तुम्ही आपलें नांव सांगत नसाल तर मीहि तुम्हांला उत्तर देणार नाहीं. परपुरुषाशीं बोलणें आम्हां कुलकन्यकांना वर्ज्य आहे.''

**कोठें देवांगना आणि कोठें मी !**

यावर तिच्या अडवणुकीच्या भाषणचातुर्याचें मनांत कौतुक करीत नल म्हणाला, '' तूं माझ्यासारख्या परपुरुषाशीं बोलूंच नकोस. तूं आपली देवांच्या संदेशाला—देवांना उद्देशूनच—उत्तर दे बघूं. कामपीडित देवांना उद्देशून बोललीस तर त्यांचा ताप तरी शमेल. तरी विलंब करूं नको. सत्वर कार्य करणें हें दूताचें लक्षण आहे '' हें ऐकून दमयन्ती स्वगत म्हणाली, '' माझ्यासारख्या सुंदर तरुणीकडे असला मदनसुंदर तरुण दूत म्हणून पाठविणाऱ्या देवांचें दूरदर्शित्व आगळेंच म्हटलें पाहिजे !''

नंतर ती त्याला प्रकट म्हणाली, "आपल्यासारख्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्याचें नाकारणें हा आपला आपमान आहे म्हणूनच मी उत्तर देतें. माझ्यासारख्या मानुषीला वरणें हें देवांना अनुचित. आतां त्यांनीं तुमच्याद्वारें प्रत्यक्ष संदेशच तसा पाठविला आहे. याचा अर्थ माझ्या भक्तीवर प्रसन्न होऊन मजकडे त्यांनीं हीं प्रसादवचनें धाडलीं आहेत येवढाच होय. कोठें सुरांगना आणि कोठें मी मानुषी ! मानुषींमध्यें मी श्रेष्ठ असेन कदाचित्, पण देवांगनांपुढें माझा काय पाड ? पितळ दरिद्र्याचा अलंकार असला तरी श्रीमंताघरच्या सोन्यापुढें तें फिकेंच." इतकें बोलून तिनें आपल्या सखीच्या तोंडून पुढील आशय प्रकट केला : 'निषधेश्वर नलाला मीं मनानें वरिलें आहे हें सर्वसाक्षी देवांना ठाऊक आहेच. म्हणून माझ्या पातिव्रत्याचा भंग न करता देवांनीं कृपाळू होऊन मला नलाची भिक्षा घालावी. नल जर न लाभेल तर मला जिवंत राहणें अशक्य. आत्महत्येचा दोष मला नाइलाजानें पत्करावा लागेल."

**मला यापुढें छळूं नका.**

यावर नल थोडेंसें कठोर बोलला. "तुझ्यासारख्या मानुषीनें देवांची मागणी नाकारणें म्हणजे आपण होऊन मागें येणाऱ्या द्रव्यानिधीला 'तूं येऊं नको' असें दरिद्र्यानें सांगणेंच होय. इंद्राला टाकून नलाला वरणाऱ्या आणि पुन्हां वर स्वतःला मोठी शहाणी समजणाऱ्या तुला खरोखर लज्जा वाटली पाहिजे. ऊंस सोडून कांटेरी शमी खाणारा उंटसुद्धां तुझ्यापेक्षां जास्त शहाणा ठरेल ! 'नल मिळाला नाहीं तर मरण पत्करीन' म्हणतेस. पण मरून तरी शेवटीं तूं जाणार देवांच्या हातींच ना ? अग्नींत किंवा पाण्यांत उडी घेतलीस तर अग्नि आणि वरुण यांच्याच हातात पडशील. फांस लावून घेशील तर अन्तरिक्षाचा स्वामी इंद्र तुला नेईल. आणि कोणत्याहि अन्य प्रकारांनीं देहनाश करून घेतलास तरी तुला यमाच्या घरीं गेल्यावाचून गत्यंतरच नाहीं. तरी तूं शहाणी असशील तर आपण होऊन या देवांपैकीं कोणातरी एकाला वर." यावर बराच वेळ स्तब्ध राहून दमयन्ती म्हणाली, "तूं यमाच्या दूताला साजेल असे कठोर व भेदक शब्द उच्चारले आहेस. त्यांनीं मला दुःसह वेदना होत आहेत" ! असें

म्हणून तिनें आपल्या सखीला बोलण्याची खूण केली. सखी म्हणाली, " उद्यांच स्वयंवर होणार आहे. त्या वेळीं मी स्वयंवरमालेनें नलाची पूजा करणार. पण ही गोष्ट साध्य होईल कशी ? या चिंतेनें माझे प्राण इतके व्याकुल झाले आहेत कीं स्वयंवराचें प्रत्यक्ष विघ्न असलेल्या या दिवसाबरोबरच तेहि निघून जातील असें मला वाटतें. तरी तुम्ही आजचे दिवस राहा. मी तुमच्याकडे पाहात राहिलें तरच उद्यांपर्यंत जगेन. राजहंसानें आपल्या नखांनीं कमलिनीपत्रावर काढलेल्या नलाच्या आकृतीशीं तुमचें फारच साम्य असल्यानें मी हें म्हणत आहें. नल हा इतका सुंदर आहे कीं त्याला पाहून आपल्या नेत्रांचें सार्थक करण्यासाठीं तरी तुम्ही उद्यांपर्यंत राहा. नलाचा व तुमचा परिचयहि होईल. मी तुम्हांला हात जोडतें. देवाचा मजविषयींचा अभिलाष वर्णून मला क्लेश देऊं नका."

**देव मारी त्यास कोण तारी ?**

हे शब्द ऐकून नलाला आपल्या दूताच्या भूमिकेंतील दुष्टपणा पूर्णपणें जाणवला. ती आपल्यास यमदूत म्हणाली. पण आपण तर प्रत्यक्ष यमापेक्षांहि निष्ठुर आहों असें त्याला वाटलें. पण आपल्या भूमिकेला अनुसरून तो म्हणाला, " इंद्राच्या घरीं कल्पवृक्ष आहे. त्या कल्पवृक्षाकडे खुद्द इंद्रानें तुझी याचना केली तर आपल्या मालकाचे मनोरथ कल्पवृक्षाला पूर्ण करावे लागणारच. वरुणाजवळ पुष्कळ कामधेनु आहेत. त्यांतील एकीकडे त्यानें तुझी याचना केल्यास तिलाहि वरुणाचे मनोरथ पूर्ण करावे लागतील. खुद्द अग्नीनें केलेल्या वैदिक यज्ञाचें सर्वकामप्रद फळ अग्नीलाच मिळणार नाहीं हें कसें होईल ! यमाला दक्षिण दिशेस राहणाऱ्या अगस्त्य मुनीकडून तुझी प्राप्ति करून घेतां येईल. आणि तूं नीट विचार कर, स्वयंवर निर्विघ्नपणें पार पाडणारी इंद्राची पत्नी शचीच—तूं इंद्राची इच्छा मोडल्यामुळें रागावून—स्वयंवराचे वेळीं उपस्थित राहिली नाहीं तर तेथें जमलेल्या राजपुत्रांत कलह उत्पन्न होऊन स्वयंवर पार पडणार नाहीं. तसेंच अग्नि होमाचे वेळीं पेटलाच नाहीं तर तुझा नलाशीं अग्निसाक्षिक विवाह होणार कसा ? जर जलाधिपति वरुणानें उदकाला स्थिर होण्याची आज्ञा केली तर कन्यादानप्रसंगीं तुझा पिता तुला उदक सोडून नलाला कशी देईल ? यमानें तुझ्या किंवा नलाच्या नात्यांतल्या व्यक्तीस

आयत्या वेळीं ठार मारलें तरीहि विवाहाला विघ्न होणार ! तात्पर्य, अगदीं हातांतील वस्तूचाहि उपभोग देवकृपेवांचून होत नसल्यानें देवच विघ्न करूं लागले तर तुझा नलाशीं विवाह अशक्य आहे.''

**त्याचें चित्त द्रवलें.**

हे नलाचे शब्द दमयन्तीला पटले व ती अगतिक होऊन रडूं लागली व दीनपणें कामदेवाला उद्देशून म्हणाली : '' मला लवकर मारून टाक. प्राण्यांच्या मनोरथांचीं फळें मटकावून टाकणाऱ्या देवा, माझ्या निष्फळ झालेल्या जीवितानें तृप्त हो व स्त्रीवधपातकानें नरकाला जा. अरे, हृदया, इतका ताप होऊनसुद्धां तूं वितळत नाहींस, तेव्हां तूं पोलादाचें बनलें आहेस काय ?'' नंतर तिनें देवाचा धावा केला, आणि नलाला स्वप्राण-रक्षणार्थ पावारण केलें. हीं करुण वचनें ऐकून नलाचें चित्त द्रवलें व आपण देवाचे दूत आहों हें क्षणभर विसरून तो भ्रान्तपणें म्हणाला, '' दमयन्ती, ज्याकरतां तूं हा शोक चालविला आहेस तो नल तुझ्या दृष्टीपुढें उभा असलेला तुला दिसत नाहीं का ? या मंगलकालीं तुझ्या नयनांतून गळणारे अश्रू मी हातानें पुसून टाकतों. माझ्या अपराधानें तुला क्रोध आला असेल तर मी तुझी क्षमा मागतों. प्रसन्न होऊन मजकडे दृष्टि टाक.''

**प्राणत्यागाला दोघेंहि सज्ज.**

हे नलाचे शब्द ऐकून दमयन्तीला धीर आला व ती आनंदित झाली. तें पाहून नलाचा भ्रम दूर झाला व आपण दूत आहों याचें ज्ञान त्याला झालें. पण त्याला वाटलें कीं आपण उगीचच प्रकट झालों. आतां इंद्र माझ्या कर्तव्यच्युतीमुळें मजवर रागावणार अशी त्याला भीति पडली. मी दूतधर्माला कलंक लावला अशी त्याला खंत वाटली व तो म्हणाला, ' माझ्या तोंडून माझें नांव केवळ मी देहभानावर नसतांना गेलें हें देव जाणतीलच. इतर लोक मला याबद्दल नांवें ठेवतील तर ठेवोत बिचारे. जगाच्या तोंडाला आपल्याला हात लावतां येत नाहीं.'

याप्रमाणें नल आत्मनिंदा करीत आहे इतक्यांत सोन्याचा हंस तेथें आला व नलाला म्हणाला, '' आतां इतउत्तर दमयन्तीची निराशा करूं नको. तूं आपल्याकडून देवांचें हित करण्याची पराकाष्ठा केलीस. तूं त्यांच्याशीं प्रतारणा केली नाहींस हें त्यांनाहि कळेल. तुला तर आपण

निष्कपटपणें दूतत्व केलें याची जाणीव आहेच.” असें बोलून व नल-दमयन्तीचा निरोप घेऊन हंस निघून गेला. नलानें आपल्या मनांत देवाची क्षमा मागितली व तो दमयन्तीला म्हणाला, “ दमयन्ती, आतां मी देवांचा दूत या नात्यानें तुला मुळींच छळणार नाहीं. देव मजवर माझ्या प्रामाणिक वर्तनाबद्दल कृपा करोत किंवा मला अपराधी समजून दंड करोत, मला उन्माद झाला तो माझ्या लाभासाठींच झाला असें मी मानतों. कारण तेवढ्या वेळांत तुझ्या वियोगाचें दुःख तरी मला झालें नाहीं. केवळ तुझा अनुरागच प्रमाण धरून तूं देवांचा त्याग व माझा स्वीकार करीत आहेस. तेव्हां विचारपूर्वक वाग. मागून पश्चात्तापाची पाळी तुला न यावी. हें मी उदासीनतेनें किंवा देवाच्या भीतीनेंहि बोलत नाहीं. यांत माझा स्वार्थ नाहीं. माझ्या प्राणव्ययानें तुझें हित होत असलें तर तें मी साधावयास सज्ज आहें.”

## लज्जेमुळें तोंडाला कुलूप !

नलाच्या या भाषणानें दमयन्तीला परम संतोष झाला. ‘ हा नलच आहे ’ असा आतां तिचा निश्चय झाल्यानें पूर्वी धीटपणें तडातड बोलणाऱ्या तिच्या तोंडाला आतां लज्जेमुळें कुलूप लागलें. त्यामुळें तिच्या सखीनें तिचा अभिप्राय पुढीलप्रमाणें व्यक्त केला : “ देवावर माझें प्रेम बिलकुल नाहीं. तुझ्यावरील अनुरागामुळें मला मरण आलें तरी चालेल. स्वयंवरांत मी तुला आत्मप्रेरणेनें वरणार आहें. त्यामुळें देवांच्या दृष्टीनेंहि तुजकडे त्याचा कोणताच दोष नाहीं. मी स्वयंवरास आलेल्या देवांना प्रसन्न करून घेऊन तुला वरीन. तूं उद्यां देवांसहित स्वयंवरार्थ राजसभेला ये.” हें ऐकून नल देवांच्याकडे निघून गेला व त्यानें सर्वसाक्षी देवांना आपला वृत्तान्त अगदीं घडला होता तसा निवेदन केला. ती रात्र उत्कण्ठ झालेल्या दमयन्तीनें मोठ्या कष्टानें काढली.

## स्वयंवरमंडपांत पांच नल.

देशोदेशींचे सर्व रूपयौवनसंपन्न आणि सत्कुलोत्पन्न राजपुत्र आपापल्या परिवारांसह स्वयंवरासाठीं कुंडिनपुराकडे लोटूं लागले. राजपुत्रांबरोबर आलेले इतर हौशी लोक, बघे व बांजारबुणगे यांची दाटी तर विचारूं नये. कुंडिन-

पुरांत तीळ ठेवायला रीतें स्थळ उरलें नाहीं. कुबेर, हर, ब्रह्मदेव, वायु व शेष हे त्याच्या कांहीं विशेष अडचणींमुळें आले नाहींत. इन्द्र, वरुण, अग्नि व यम यांना दमयन्तीनें नकार दिला होता हें त्यांना दूतमुखानें कळलेंच होतें. म्हणून ते उदासीन व विषण्ण होऊनच तेथें आले; व नलभ्रमानें तरी दमयन्तीनें आपल्यास वरावें या हेतूनें नलाचें रूप घेऊन सभेंत बसले. निरनिराळ्या देशांचे राजे आपापल्या भिन्न भाषा टाकून देऊन सर्वांना एकमेकांचें मनोगत कळावें या हेतूनें देववाणी– संस्कृत भाषाच– बोलत होते. त्यामुळें सभेंत देव कोण आणि मनुष्य कोण हें कळेनासें झालें. इतक्यांत नलराजाची स्वारी सभेंत येऊन दाखल झाली. त्याच्या त्या मदनसुंदर तनूकडे राजपुत्रांनीं पाहिलें मात्र, तों त्यांचीं तोंडें निराशेनें काळवंडलीं. पण नलाच्यासारखे पांच पुरुष तेथें एकदम उपस्थित पाहून सर्व सभा आश्चर्यानें थक्क झाली. नलानेंसुद्धां त्यांना विचारिलें कीं, 'तुम्ही अश्विनीकुमार, पुरूरवा व मदन असेच चौघे आहांत ना ?' श्लेषानें त्यांनीं खऱ्या नलाला उत्तर दिलें कीं, "तूं म्हणतोस तसें आम्ही नव्हों. दमयन्तीनें नलभ्रमानें आम्हांला वरावें म्हणून आम्ही देवच येथें आलों आहों. धिक्कार असो आमच्या शहाणपणाला आणि देवपणाला." नलानें या त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलें. असो.

## सरस्वतीच मंडपांत अवतीर्ण झाली.

या स्वयंवराचें कौतुक पाहण्यासाठीं आकाशात विष्णु, ब्रह्मा, सूर्य, चंद्र, अप्सरा, यक्ष, किन्नर आणि महर्षि यांची दाटी झाली होती. वाल्मीकि व बृहस्पति यांनीं त्या राजसभेची प्रशंसा केली. सर्व राजेलोक आपल्या स्थानावर बसल्यावर त्यांकडे पाहून भीमराजाला असा विचार पडला कीं या सर्वांचीं नांवें, वंश व चरित्रें दमयन्तीला कोण सांगणार ? मग त्यानें महाविष्णूची प्रार्थना केल्यावर त्यानें सरस्वतीला राजगोत्रकथनाची आज्ञा केली. त्याप्रमाणें ती त्या सभेंत अवतीर्ण झाली. तिचा देह सकल वेद, वेदांगें व शास्त्रें यांनीं बनला होता. भीमकानें सरस्वतीची पूजा करून दमयन्तीला राजसभेंत बोलाविलें. ती वैभवशालिनी त्रैलोक्यसुंदरी प्रविष्ट झाल्याबरोबर ती सर्व सभा तिच्या दर्शनानें स्तिमित व संतुष्ट झाली. तरुण राजपुत्रांमध्यें शृंगारभावदर्शक अंगव्यापार सुरू झाले.

कोणी सादर कौतुकानें तिचें काव्यमय वर्णन केलें. इंद्रानेंहि तिचें अप्सरांना हिणविणारें रूप प्रशंसिलें.

**सारेच नापसंत.**

दमयन्ती पालखींत बसून सभेमध्यें आली. तिच्या उजव्या बाजूला उभी राहून सरस्वती तिला उद्देशून म्हणाली : " हे पाहा कोटि देव. यांपैकीं तुझ्या मनाला येईल त्याला वर. यांच्या पराक्रमांचें व संपदेचें वर्णन मलाहि करतां येणार नाहीं." देवांच्या म्लान तोंडांवरूनच पालखी वाहणाऱ्या सेवकांनीं दमयन्तीची नापसंती ताडली व ते पुढें चालूं लागले. राक्षस, विद्याधर, यक्ष व गंधर्व हे तर तिनें विचारांतच घेतले नाहींत; वासुकीचें निराकरण झालें. नंतर सरस्वती राजे लोकांचें नामनिर्देशपूर्वक वर्णन करूं लागली:--

" हा पाहा पुष्कर द्वीपाचा अधिपति सवनराजा. याच्यामुळें तुला जलक्रीडा, सुख व स्वर्गभोग मिळतील, तर याला वर. " दमयन्तीनें त्याला नाकारलें. यानंतर शाकद्वीपाचा राजा हव्य, क्रौंचद्वीपाचा द्युतिमान्, कुशद्वीपाचा ज्योतिष्मान्, शाल्मद्वीपाचा वपुष्मान्, प्लक्षद्वीपाचा मेधातिथि, जम्बुद्वीपाचा अवन्तिनृपति, गौडदेशाचा अधिपति, मथुरेचा पृथु, काशीचा रुद्र इत्यादि राजांचीं वर्णनें सरस्वतीनें समग्र व सुंदर केलीं. पण दमयन्तीला त्यांपैकीं कोणीच आवडला नाहीं. म्हणून तिची पालखी वाहकांनीं पुढें पुढें नेली. आपला अनादर करून दमयन्ती पुढें गेली म्हणजे प्रत्येक मानी राजपुत्राचें मुख म्लान होई. स्वयंवरास आलेल्या अनेक साभिलाष व गुणाधिक राजांना टाकून अवर्णनीय नलालाच वरूं पाहणारी दमयन्ती एक, पूर्णकाम, निर्गुण व अवाङ्मनसगोचर परब्रह्माला शोधणाऱ्या श्रुतीप्रमाणें ( उपनिषद् ) भासली.

**दासींची लुडबुड !**

स्वयंवर सुरू झाल्यावर विलंबानें कांहीं राजे आले. आपल्यापूर्वी आलेल्या कोणाहि राजाला दमयन्तीनें वरिलें नाहीं हें ऐकून त्यांना सानंद आशा वाटत होती. त्यांपैकीं अयोध्येचा ऋतुपर्ण, पांड्यदेशचा राजा, महेंद्रदेशचा राजा, काञ्चीपुरचा राजा, परंतप इत्यादींचीं वर्णनें सरस्वतीनें केलीं. पण दमयन्तीनें कोणासहि वरिलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर पाण्ड्य वगैरे राजेलोकांच्या वर्णनाचे

वेळीं दमयन्तीची दासी येऊन राजपुत्रांचें वैगुण्य तिच्या नजरेस आणीत होती. यानंतर दुसऱ्या एका दासीनें सरस्वतीला गुणहीन राजांचें विस्तृत गुणवर्णन न करण्याबद्दल सुचविलें. तेव्हां सभेंतील लोकांना क्रोध आला. मग मलयाद्रि प्रदेशाच्या राजाचें वर्णन झाल्यावर एक दासी सरस्वतीला म्हणाली, " तुझ्या तोंडचें वर्णन ऐकण्यासाठीं अद्याप पुष्कळ राजे वाट पाहत आहेत हें ध्यानांत ठेव." या उपहासपर भाषणानेंहि राजे लोकांच्या अनुयायांना राग आला व त्यानीं त्या दासीची निर्भत्सना केली. नंतर मिथिला नगरीच्या राजाचें गुणकथन झालें. पण त्याकडे दमयन्तीनें लक्षहि दिलें नाहीं. नंतर कामरूपच्या राजाचें वर्णन झालें. त्या वेळीं दमयन्तीच्या विड्याचा डबा घेणाऱ्या दासीनें ( ताम्बूलकरंडवाहिनीनें )– दमयन्तीला या वर्णनाचा कंटाळा आला आहे हें जाणून—एक विडा दमयन्तीच्या पुढें केला. नंतर उत्कलाधिपाचे वर्णनसमयीं तर दमयंतीनें डोळेच झांकून घेतले. यानंतर कीकट देशाच्या जयंतराजाचें वर्णन चालू असतां तर एका दासीनें मध्येंच सरस्वतीवर्णनाला असंमति दाखवून सभेंत हास्य निर्माण केलें.

**यांतील नल कोणता ?**

नंतर दमयन्तीनें नलाकडे कटाक्ष फेंकला. त्या वेळीं तिचे मनांत प्रेमभाव दाटलेला दिसत होता. त्या सत्यरूप नलाकडे पाहत असतां व तोहि तिच्याकडे पाहत असतां दमयन्तीला आणखी चार नला-सारखे पुरुष तेथेंच दिसले. त्यामुळें ती फारच गोंधळली. सरस्वतीनें प्रथम त्यांतील इंद्राचें अशा पद्धतीनें वर्णन केलें कीं तें इंद्राला व नलालाहि सारखेंच लागू पडावें. ती उभयपक्षीं लागू पडणारी स्तुति ऐकून व त्याचें सारखें रूप पाहून दमयन्तीला नल कोणता व इंद्र कोणता हें ओळखतां आलें नाहीं. तिचें मन याप्रमाणें हेलकावत असतांनाच सरस्वतीनें क्रमशः अग्नि, यम व वरुण यांची वरील प्रकारचीच उभयपक्षीं लागणारी स्तुति केली. तिनें दमयन्ती गोंधळली, पण फसली नाहीं. नंतर सरस्वतीनें खऱ्या नलाची स्तुति चार श्लोकांनीं केली. त्यांपैकीं पहिला नलाला लागूनहि इंद्राला, दुसरा अग्नीला, तिसरा यमाला व चौथा वरुणाला लागत होता. त्यामुळें दमयन्तीचा निश्चय होईना. नंतर सरस्वतीनें दमयन्तीला

पति निवडण्यासंबंधीं असा एक प्रश्न विचारला कीं त्यांतील विशेषणें इंद्र, अग्नि, यम, वरुण व नल यांना सारखींच लागत होतीं ( नै० १३.३४ ). सांख्यादि इतर दर्शनें मानवबुद्धिमध्यें भ्रम उत्पन्न करून सत्यरूप अद्वैतदर्शनावर श्रद्धा बसूं देत नाहींत, त्याप्रमाणें देवांचीं खोटीं रूपें नलाच्या खऱ्या रूपावर दमयन्तीचा विश्वास बसूं देईनात. अशा स्थितींत तिनें त्या सुवर्णराजहंसाचें स्मरण केलें. देवांच्या जवळ नलाची याचना करावी असाहि विचार तिच्या मनांत आला; पण त्यांनीं सांप्रत धारण केलेली निष्ठुरता ध्यानीं आणून तिनें त्याची निर्भर्त्सनाहि केली. सरस्वतीकडे स्वयंवरमाला देऊन 'जो यांतील खरा नल असेल त्याच्या गळ्यांत तूंच ती टाक' असें आपण म्हणावें, का 'जो या पांचांतला खरा नल असेल त्यानें ही माझी माला अंगीकारावी' असें बोलावें असें तिला वाटूं लागलें. पण हे विचारहि तिला पसंत पडेनात व ती संदेहांतच राहिली.

**तिला देव उमगले !**

नंतर तिनें देवांनाच प्रसन्न करून घेण्याचें ठरविलें. तिनें त्यांना प्रथम नमस्कार करून नंतर ध्यान व मानसपूजादि विधि केले. त्यामुळें अगोदरच तिच्यावर प्रसन्न असलेले देव तिच्या या भक्तीनें अधिकच प्रसन्न झाले. देवांचा प्रसाद म्हणजे सुबुद्धि. ती त्या प्रसादामुळें दमयन्तीचे ठिकाणीं जागृत झाली व तिला सरस्वतीच्या पञ्चनली-वर्णनांतील देवपर व नलपर अर्थांतील भेद प्रतीत होऊं लागला. पूर्व, दक्षिण इत्यादि दिशा ज्याप्रमाणें इंद्र, यम इत्यादि दिक्पालांशीं पातिव्रत्यानें निगडित असतात त्याप्रमाणें सरस्वतीनें म्हटलेल्या देवस्तुतिपर गाथा त्या त्या देवालाच पूर्वी लागलेल्या तिला दिसत होत्या. त्या आतां ( चारीहि दिशा चतुर्दिगीश नलाला वश असल्याकारणानें ) नलाला लागलेल्या तिला दिसूं लागल्या. शेवटीं हाच खरा नल असा तिचा निश्चय झाल्यानें तिला आनंद झाला व ती सरस्वतीच्या चातुर्याची स्तुति व आपल्या मोहाची निंदा करूं लागली. लागलीच तिला देव हे भूमीपासून उंच– म्हणजे भूमीला स्पर्श न करणारे– दिसूं लागले. जणूं काय पृथ्वी नलाची पत्नी होती म्हणून देव त्या परस्त्रीला स्पर्श करीत

नव्हते ! तसेंच देवांचे नेत्र उन्मेष-निमेष करीत नव्हते, त्यांच्या अंगाला धूळ लागत नव्हती, त्यांना घाम येत नव्हता, त्यांच्या माळा सुकत नव्हत्या व त्यांची सांवली पडत नव्हती— या गोष्टी दमयन्तीच्या नजरेस आल्या. त्यामुळें तिची पक्की खात्री झाली. आतां नलाच्या कंठांत स्वयंवरमाला घालावयाची; पण तसें करतांना तिला पराकाष्ठेची लज्जा वाटूं लागली. सरस्वतीकडे व नलाकडे ती लज्जेनें पाहूं लागली. सरस्वतीनें दमयन्तीला इष्ट वराचें नांव विचारलें. पण लज्जेमुळें केवळ ' न ' म्हणूनच ती गप्प बसली व कांहींच बोलेना. तेव्हां तिनें तिला थट्टेनें इंद्रापुढें ओढून--तर मग ' ह्याला वर ' असें म्हणतांच दमयन्तीनें सापासून मागें घ्यावा तसा इंद्रापासून आपला हात मागें घेतला.

## अखेर नळाच्या गळ्यांत माळ पडली !

नंतर सरस्वती दमयन्तीला नलापुढें आणून इंद्रादि देवांना म्हणाली, " दमयन्ती ही सती- पतिव्रता- असल्यानें तिला एकदमच तुम्हां सर्वांना वरतां येत नाहीं. तुम्हांपैकीं एकाला वरावा तर दुसऱ्याचा अपमान होणार. म्हणून तिनें पूर्वी निश्चित केलेला वर म्हणजे नलच ती आतां वरणार आहे. आपण सर्वांनीं या जोडप्याला आशीर्वाद द्यावा." असें म्हणून तिनें दमयन्तीचा माळेसहित हस्त नलाच्या कंठाजवळ आणला व सर्व सभा तटस्थ होऊन पाहत असतां दमयन्तीनें स्वयंवरमाला नलाच्या गळ्यांत घातली. त्याबरोबर सर्वांच्या तोंडून प्रशंसेचे उद्गार बाहेर पडले, नल-दमयन्तीच्या ठिकाणीं अष्ट सात्त्विक भाव दिसूं लागले. नंतर इंद्रादि देवांनीं आपापलीं रूपें धारण केलीं. सरस्वतीनेंहि आपलें वीणा-पुस्तकधारी व हंसवाहन रूप प्रकट केलें. नंतर इंद्र, अग्नि, यम व वरुण यांनीं नलाला वर दिले. सरस्वतीनेंहि नलाला एक चिंतामणिमंत्र व कवित्वस्फूर्ति दिली. वरप्रदानानंतर ते देव आकाशांत निघून गेले. जिकडेतिकडे दुंदुभींचा व वाद्यांचा गजर झाला. नल हा खरोखरच गुणांमध्यें सर्वश्रेष्ठ असल्यानें इतर राजांना त्याचा मत्सर वाटला नाहीं. यमानें नलाला घोर अस्त्रें दिलीं असल्यानें त्याच्याशीं युद्ध करून दमयन्तीला नेण्याचा विचार कोणीं मनांतसुद्धां आणला

नाहीं. सर्वत्र शांतता व आनंद नांदत होतीं. इतक्यांत नभांतून सुर-पुष्पवृष्टि झाली. भीमनृपतीच्या आनंदाला पार राहिला नाहीं.

### थाटामाटाचा लग्नसोहळा !

भीमराजानें मोठ्या आनंदानें नलाला अन्तःपुरांत आणिलें व आपल्या पत्नीकडे जाऊन तो तिला म्हणाला, " तुमच्या चतुर मुलीनं नलालाच वरलं बरं का ? हे पाहा जांवई ! तुमचे स्त्रियांचे लग्नसोहाळे व सोपस्कार काय चालावयाचे ते चालूं द्यात. आम्ही विवाहाचे श्रुति-स्मृत्युक्त विधि करावयाचा तयारीला लागतों. " नंतर योग्य मुहूर्तावर कन्यादान व्हावें म्हणून भीमानें दूतमुखानें नलाला विनंति केली कीं, " या माझ्या कन्येवर आणि माझ्या कुलावर आपण अनुग्रह करावा ! नलानें तें मान्य केल्यावर वराचें व वधूचें स्नान, केशप्रसाधान, वस्त्रा-लंकार-समर्पण वगैरे यथास्थित झालें. नंतर वर विवाहासाठीं निघाला. त्याला पाहण्यासाठीं स्त्रिया आपापलीं कामें टाकून मोठ्या उत्सुकतेनें खिडक्यांतून उभ्या होत्या. त्या आपापसांत नल, दमयन्ती व त्यांचें स्वयंवर यासंबंधींच्या गोष्टी मोठ्या कौतुकानें सांगत होत्या. नल विदर्भपतीच्या राजवाड्यासमोर येताच त्याचें दमयन्तीच्या दम नांवाच्या बंधूनें स्वागत केलें. नल दृष्टीस पडतांच भीमानें त्यास मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. त्या वेळीं सागर भागीरथीप्रवाहाला आलिंगन देत आहे असें वाटलें. नंतर विवाह, पाणिग्रहण वगैरे झालें. भीमानें जांवयाला तलवार, रथ, घोडे, गरुडमणीचें जेवण्याचें ताट इत्यादि फार मौल्यवान् वस्तु दिल्या.

### पाहुण्यांची थट्टा.

नल तेथें पांचसहा दिवस राहिला. त्या वेळीं दमाच्या प्रेरणेनें विवाहांत जमलेल्या वराकडील वऱ्हाडी मंडळींच्या भोजनाचे वेळीं निरनिराळ्या चेष्टा केल्या केल्या. खुद्द नवरदेवाची (नलाची) दासी हातांत पंखा घेऊन त्याला वारा घालीत उभी असतां दमाच्या दासीनें तिच्या पायांवर सरडा आणून हळूच सोडला. तो वर वर चढूं लागतांच पंखा टाकून देऊन ती लाजलेली नलदासी पळून गेली. नवरदेवाकडे कोणी सोंवळे शाकाहरी पाहुणे होते. त्यांच्या ताटांत मांसाहाराचा भ्रम

उत्पन्न करतील अशीं पक्कान्नें व कोशिंबिरी सुद्दाम वाढविण्यांत आल्या. नाकाला पदर लावून व तोंडें वेडींवाकडीं करून ही सात्त्विक मंडळी उठूं लागतांच त्यांना हा शाकाहार आहे असें सांगण्यांत येई व एकच हंशा पिके. पाचूच्या ताटांत सर्व अन्नें वाढून तीं ताटें वरपक्षाकडील मंडळींपुढें ठेवण्यांत येत. पण पाचूंच्या हिरव्या रंगामुळें या नुसत्या पत्रावळी आहेत किंवा फार झालें तर त्यांत नुसत्या भाज्या वाढल्या आहेत असें वाटून ही मंडळी रागावत. पण खरा प्रकार समजला कीं हंशा पिके. तरुण मंडळींच्या थट्टा तर विचारूंच नयेत. अशा जेवणावळी पुष्कळ झाल्या. नंतर नल दमयन्तीला घेऊन निषध देशाला निघाला. कन्या सासरीं चाललेली पाहून मातापित्यांना फार दुःख झालें. नल आपल्या राजधानींत आल्यावर तेथें त्याचें मोठें थाटाचें स्वागत झालें.

## कलीचें काळें सैन्य.

समुद्राच्या लाटा ( भरतीचे वेळीं ) जामिनीवर आदळून जशा निष्फळ होऊन परत फिरतात त्याप्रमाणें इंद्रादि देव पृथ्वीवर धांवपळ करण्याचे वृथाश्रम घेऊन आले तसे स्वर्गाकडे परत चालले. सरस्वतीहि त्यांचे सांगातीं होती. त्यांचे रथ ते आकाशांत दूर दूर जाऊं लागले तसे फार लहान लहान दिसत होते. इतक्यांत त्यांना एक काळसर रंगाचा व अपवित्र व्यक्तींचा मोठा जमाव समोरून येतांना दिसला. त्यांत प्रत्यक्ष कलीनें पुरस्कारिलेले काम, क्रोध, लोभ आणि मोह व इतरहि कांहीं बौद्धचार्वाकादि नास्तिक अंगावर पापरूप काळीं वस्त्रें घेऊन चाललेले होते. उसळणाऱ्या समुद्राप्रमाणें दिसणारें तें कलीचें काळें सैन्य जसजसें जवळ येऊं लागलें तसतसें देवांना चार्वाकानें उच्चारलेले पुढील कर्णकठोर शब्द ऐकूं येऊं लागले : " वेदांनीं सांगितलेलीं ज्योतिष्टोमादि यज्ञांचीं फलें दगड पाण्यांत तरतात अशा वाक्याप्रमाणेंच अप्रमाण आहेत. वंशशुद्धि शक्यच नसल्यामुळें जातीजातींतील भेद अशक्य आहेत. पाप नाहीं. इंद्रियदमन करणें ही आत्मवंचना आहे. श्रुति, स्मृति, पुराणें वगैरे खेकटीं मूर्खांना फसविण्यासाठीं धूर्तांनीं रचलेलीं बाडें आहेत. देहातिरिक्त आत्मा नाहीं. स्वर्गाचा लोभ व नरकाचें भय फोल आहे. देवपूजा त्याज्य असून वैराग्य मूर्खपणा आहे. मीमांसा, न्याय, वेदान्तादि शास्त्रें कुचकामाचीं

आहेत. दानधर्म ही उधळपट्टी आहे. आणि देव व्यभिचारी आहेत." हे भयंकर शब्द ऐकून इंद्राला पराकाष्ठेचा क्रोध येऊन ते शब्द उच्चारणाऱ्या चार्वाकाला त्यानें दरडावलें व त्याच्या बोलण्याचें यथाक्रम खंडन केलें. यमानें व वरुणानेंहि श्रुतिधर्माचें मंडन केलें. इंद्रादि देव असे कोपलेले पाहिल्याबरोबर चार्वाक हात जोडून त्यांचेपुढें उभा राहिला व म्हणाला, "महाराज, हा अपराध माझा नव्हे. मी कलीचा बंदी असल्यानें त्याला प्रिय असलेलें मला बोलावें लागलें."

**नलाचा सूड घेऊं.**

तो असें म्हणत आहे तोंच देवांना रथांत बसलेला कलि दिसला. तेथेंच द्वापर (युग)हि होता. तो अपवित्र कलि मोठ्या तोऱ्यानें व 'देव म्हणजे कोणत्या झाडाचा पाला' अशा वृत्तीनें त्यांचेपुढें आला व 'का इंद्रा, यमा, वरुणा, अग्ने, ठीक आहे ना?' असें त्यांना औपचारिक बोलून 'आम्ही दमयन्तीस्वयंवराला त्वरेनें निघालों आहों' असें म्हणाला. तें ऐकून देव त्या वृथा घमेंडखोर व ब्रह्मचर्याचें ढोंग करून पुन्हां स्वयंवराला चाललल्या कलीला हंसले व त्यानीं 'स्वयंवर उरकलें, दमयन्तीनें आम्हांस टाकून नलाला वरलें' इत्यादि वृत्तान्त त्याला सांगितला. त्यावर कलि चवताळून बोलला, "तुम्ही देव म्हणजे 'परा सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण' या प्रकाराचे व्यभिचारी आणि निर्लज्ज आहांत. दमयन्तीनें नलाला वरलें ही स्वर्गाची बेअब्रू तुम्हीं सहन कशी केलींत? त्या नलाला किंवा दमयन्तीला तुम्हीं तेथल्या तेथें उभें जाळलें कां नाहीं? तें असो. मी आतां दमयन्तीला वश करण्यास जातों. पाच पांडवांनीं जसा द्रौपदीचा तसा आपण पांचजण या दमयन्तीचा उपभोग घेऊं. मला या कामांत साहाय्य करा!" हें कलीचें दुष्ट वचन सरस्वतीला सहन झालें नाहीं. ती रागानें म्हणाली, 'धीरोदात्त नलाला सती दमयन्ती देण्यासाठीं आणि त्यांची केवळ परीक्षा पाहून त्यांना कीर्ति व वर देण्यासाठींच इंद्रादि देव स्वयंवराला गेले होते. दमयन्तीला स्वतः वरण्यासाठीं नव्हे; पण तुझ्यासारख्या मतिमंदाला थोरांच्या गूढ कृतीचें रहस्य कसें समजणार?" सरस्वतीचें हें वचन दुर्लक्षिल्यासारखें करून 'बायकांच्या

तोंडाला काय लागायचें ? ' या आविर्भावानें कलि पुन्हा देवांना म्हणाला, " आतां स्वयंवर होऊन गेल्यानें आम्हीं दमयन्तीवरील अभिलाष सोडला पण नलावर दया करण्याचें आम्हांस कांहींच कारण नाहीं. स्वयंवर फसलें तर फसूं द्या, पण त्याच्या सूड म्हणून नलाचा दमयन्तीशीं व पृथ्वीशींहि वियोग घडवून आणीन ही कलीची प्रतिज्ञा आहे. चवताळलेल्या कलीनें नलाशीं दोन हात केले अशी माझी कीर्ति भावी युगें गावोत ! " द्वापरानेंहि कलीला या कार्मी उत्तेजनच दिलें. पण इंद्र मात्र कलीचा निषेध करून त्याला म्हणाला, " नलासारख्या सुचरित पुरुषाशीं तूं केलेलें वैर तुला फलप्रद होणार नाहीं. दमयन्तीसारख्या साध्वीलाहि तूं दुःख देऊं नयेस. तुझा पाड तेथें लागणार नाहीं. उलट नलसप्रेमध्यें तू स्वतःस हास्यास्पद मात्र करून घेशील. तुझा प्रवेशच मुळीं नलराज्यात दुःशक आहे. " नंतर इंद्र, अग्नि, यम व वरुण यांनीं कलीला उद्देशून कांहीं निषेधपर वाक्यें उच्चारलीं. पण कलीनें त्याच शब्दात त्यांना प्रत्युत्तरें दिलीं.

## कलीची फटफजिती.

द्वापार व कलि या दोनहि युगांनीं नलाला छळण्याची कंबरच बांधलेली आहे असें जाणून 'आतां कांहीं का होईना ! आपण काय करणार !' असा विचार करून देव स्वर्गांत निघून गेले. इकडे खुनशी कलीनें नलाला पेचात आणण्याचा चंग बांधला व पापी राहू जसा चंद्राला ग्रासावयास यावा तसा तो नलाचा ग्रास घेण्याच्या बुद्धीनें द्वापरासह निषध राजधानीला आला. पण त्याचा नगरींत प्रवेश होण्यालाहि विघ्नें येऊं लागलीं. त्याचा पाय कोठें स्थिर होईना. वेदपठनाच्या ध्वनीपुढें त्याला भूमीवर पायहि ठेवतां येईना. यज्ञधूमामुळें त्याला घुसमटल्याप्रमाणें होऊं लागलें. अतिथि-सत्कारासाठीं सांडलेल्या उदकामुळें तेथील अंगणें ओलीं झालीं होतीं. येथें हा पाय घसरून पडूं लागला. पवित्र विप्रांनीं आपल्या अंगावर ओढलेले भस्माचे व चंदनाचे पट्टे खांजिरासारखे त्याच्या अंगांत घुसूं लागले. विप्रांनीं सूर्यमंडलातून गायत्रीचें आवाहन केलेलें पाहून ' आपण आतां मरतों ' या भयानें त्याला दूर पळावें लागूं लागलें. त्याला एकहि मित्र किंवा अनुकूल आश्रयस्थान दिसेना. स्नातक, जपी, तपी, तीर्थ-

स्नायी त्याला यमासारखे क्रूर दिसूं लागले. कोठें कुकर्माचा आभास उत्पन्न करणारें एखादें कर्म त्याच्या दृष्टीस पडून त्याला आनंद वाटलाच तर तें कर्म पुण्यकारक आहे असें त्याला आढळून येऊं लागलें. कांहीं ब्राह्मण एकाच ठिकाणीं बसून व एकमेकांना शिवून जेवत आहेत हें कुकर्म पाहून त्याला संतोष होतो न होतो तों ते यज्ञशेष सोममक्षण करीत आहेत हें जाणून त्याला विषाद वाटला. त्यानें नलदमयन्तींनाहि पाहिलें पण त्याला त्यांच्या ठायीं प्रवेश करण्याला अनुकूल असें कांहींच दिसेना. शेवटीं नलाच्या उपवनांत त्याला बिभीतक नांवाचा एकच वृक्ष सोईचा दिसला. या वृक्षाचीं पानें, फुलें देवपूजेला निषिद्ध असून त्याला 'भूतांचें झाड' म्हणतात. कलि त्यालाच कल्पवृक्ष मानून त्याच्याच आश्रयानें नलाच्या दोषाकडे डोळ्यांत तेल घालून पाहात त्याच्या वाड्याशेजारीं बहुत वर्षें राहिला. द्वापरहि नलाचा असता नसता दोष कोणी काढतो कीं काय हें पाहत चिरकाल भटकत राहिला.

**सर्व सुखें हात जोडून उभीं.**

नलाला आतां इतर प्राप्तव्य न उरल्यामुळें त्यानें दमयन्तीच्या संगतींत काम नांवाच्या तिसऱ्या पुरुषार्थाचें साधन करण्याचें ठरविलें. त्यानें आपला सर्व राज्यभार आपल्या सचिवांवर सोंपविला आणि सर्व दृष्टींनीं उपभोगक्षम अशा एका सुवर्णभूमीच्या व रत्नखचित राजवाड्यांत तो राहिला. तेथें सर्व ऋतूंतील फुलें व फळें आणि सर्व प्रकारचे पक्षी असणारीं उद्यानें होतीं. तेथें सर्व सुखें हात जोडून उभीं होतीं. अशा या अनुकूल स्थलीं रतीसारख्या रूपसंपन्न दमयन्तीसह रममाण झालेल्या नलाच्या ज्या कामक्रीडा झाल्या त्याची कल्पना महाकवींनाहि येण्यासारखीं नव्हती व प्रत्यक्ष स्वैरिणींनाहि त्या माहीत नव्हत्या. सुरतश्रमानें झोपीं गेलेल्या त्या जोडप्याला उठविण्यासाठीं वैतालिक (भाट) उषःकालीं निरनिराळीं मधुर वाद्यें घेऊन सुस्वर गाऊं लागले. त्यांनीं अत्यंत काव्यमय वाणीनें अरुण, उषा, मावळणारा चंद्र, उदयाचलावर येणारा सूर्य, कुमुदें, कमलें, चक्रवाक इत्यादींचें वर्णन केलें. त्यांतील कांहीं काव्योद्गार दमयन्तीला तर कांहीं नलाला उद्देशून होते. प्रातर्बोधाचें हें वैतालिकाचें गायन संपतांच अंतर्गृहांतील दासींनीं कांहीं उज्ज्वल अलंकार त्याचेपुढें ठेवले व त्या म्हणाल्या, 'सूतांनो, मागधांनो,

तुमच्या या प्रातर्वर्णनानें संतुष्ट झालेल्या दमयन्ती महाराणीनीं हे आपल्या अंगावरील अलंकार तुम्हांस दिले आहेत.' तें ऐकून त्यांनीं ते दारिद्र्यास दूर पळविणारे दागिने आपल्या अंगावर धारण केले. तों माटांच्या येण्यापूर्वीच आपल्या दिव्य रथांत बसून स्वर्गगंत स्नान करण्यासाठीं गेलेला नल परत येतांना त्यांना दिसला. तो आलेला दिसतांच सुस्नात व शुचिर्भूत दमयन्ती त्याला सामोरी गेली. 'आपण स्नानाहून परत येतांना स्वर्गगंतील एक सोन्याचं कमळ आणावं बरं कां!' असें दमयन्तीनें नलाला सांगून ठेविलेलें होतें. त्याप्रमाणें त्यानें तें कमळ आपल्यास सामोऱ्या आलेल्या दमयन्तीच्या हातीं दिल्यावर ती कमलहस्तलक्ष्मीप्रमाणें शोभली. नलाचें प्रातःस्नानसंध्यादि झालें असलें तरी नित्याचें होमहवन राहिलेंच होतें.

**धर्मनिष्ठ नलाचे कामविलास !**

'राणीसरकारची आज्ञा होत असेल तर तें हवन करून येतों' असें नल दमयन्तीकडे तिरपे कटाक्ष फेकीत व हंसत हंसत म्हणाला. पण दमयन्तीला हा आलिंगनात विघ्न आणणारा व विरह घडाविणारा नलाचा नित्यविधि तितकासा आवडला नाहीं. ती रागानें कांहींच बोलली नाहीं. तें पाहून वाड्याशेजारील उपवनांत बिभीतक वृक्षावर टपून बसलेला कलि मनांत म्हणाला, "वेडे दमयन्ती, तुला नलाचा येवढाहि वियोग सहन होत नाहीं काय! थांब, तुला आतां चांगलाच विरहाचा चटका देतों."

नलानें आहवनीय, गार्हपत्य आणि दक्षिण अशा तीन अग्नींची पूजा संपविली व दमयन्तीच्या मागें हळूच जाऊन तिचे डोळे त्यानें आपल्या हातानें झांकले व रागावलेल्या प्रियेचा रोष घालविण्याकरितां तिला तो म्हणाला, "दमयान्ति, ज्या तपानें मला तुझी प्राप्ति झाली तें तप टाकून मला कसें बरें चालेल?" अशा तऱ्हेनें तिची समजूत नलानें घातली व तिच्यासह वर्तमान पलंगावर बसला. नंतर त्या परस्परानुरागी दांपत्याची कला नांवाच्या दासीच्या मध्यस्थीनें हास्यविनोदपर रमणीय प्रश्नोत्तरें झालीं. संशय, मान, ईर्षा, रोष इत्यादि भावनांच्या मध्यें मध्यें होणाऱ्या आविर्भावामुळें व सखीच्या संनिधानानें त्यांच्या प्रणयकेलीला चांगला रंग चढत होता. तें पाहून सख्या तेथून उठून गेल्या. तीं दोघेंहि बराच वेळ तेथें परस्परांच्या बाहुपाशांत आहेत, लटक्या भीतीनें व लज्जेनें दमयन्ती

मंदिराबाहेर येण्याचा प्रयत्न करीत आहे तोंच दुपार ( मध्याह्न ) झाली. ' महाराजांचा जयजकार असो ' असें बंदी स्त्रियांनीं घोषित केलें व नलाची स्तुति केली. ती ऐकून मध्याह्नस्नान, शिवार्चन इत्यादि विधि करण्यासाठीं प्रियेजवळून मंचकावरून उठून तो निघाला.

**हा राजा आहे का ऋषि ?**

तो मणिसौधावरून खालीं उतरत असतां सम्राट्दर्शनाची वाट पाहात तेथें उभे असलेल्या मांडलिक राजांनीं आपली सेवा त्याच्या चरणीं निवेदिली. जिन्यावरून उतणाऱ्या चक्रवर्ती महाराजांच्या स्वारीला आपापल्या करांचा आधार देऊन त्यांनीं आपली 'करदता' (कर १ हात २ उत्पन्नाचा भाग) पुन्हां एकदा प्रकट केली. नंतर सम्राटांना नजराणे अर्पण करण्यांत आले. त्यांचें परत दान झालें. नंतर राजे लोकांना शस्त्रास्त्रांचें शिक्षण देऊन नलाची श्रमलेली स्वारी स्नानाला गेली. अनेक प्रकारच्या सुगंधि द्रव्यांनीं त्याचें अंगमर्दन करून तरुणींनीं त्याला अभ्यंग स्नान घातलें. नंतर स्वतः राजपुरोहितानें त्यांना तीर्थजलाचें स्नान घातलें. स्नानानंतर वस्त्रें परिधान करून व हातांत शुभ्र स्फटिकाची तेजस्वी माला घेऊन तो सावित्री आदिकरून श्रुतिमंत्रांचा जप करूं लागला. त्या वेळीं त्याची श्रद्धा व स्पष्ट वर्णोच्चार पाहून असें वाटलें कीं स्फटिकमालेच्या रूपानें श्रुतिमंत्रच त्याच्या हस्तगत झाले आहेत. नतर त्यानें देव, पितर यांचें अनुक्रमें यव व तिल घेऊन तर्पण केलें नंतर पवित्र ब्रह्मचारी परिचारकांना बरोबर घेऊन तो राजर्षि देवघरांत शिरला. तेथें त्यानें पंचायतनपूजा केली. प्रथम सूर्याची व नंतर शंकर आणि विष्णु यांची योग्य श्रुतिमंत्रांनीं व गन्धपुष्पादींनीं अर्चा केली. महाविष्णूनें घेतलेले दशावतार व दत्तात्रेय, त्रिविक्रम, हरिहर, बालमुकुंद यांची स्तुति अत्यंत काव्यमय वाणीनें व भक्तिभावानें त्यानें केली. यानंतर विप्रांना दानें देऊन तो भोजनगृहांत प्रविष्ट झाला व अमृततुल्य शाक, सूप, व्यंजनादि पदार्थांचें यथारुचि सेवन करून तो पुनरपि सौधशिखरावर चढून गेला. दमयन्तीहि देवतापूजा करून पतीनंतर भोजन करून नलाकडे गेली.

**दुपारची करमणूक.**

नल व दमयन्ती मंचकावर सुखासीन बसलीं असतां एका पिंजऱ्यांत एक

पोपट व दुसऱ्यात एक कोकिळा घेऊन दोन मैत्रिणी तेथें आल्या. दमयन्ती-च्या शिष्याच शोभतील अशा तिऱ्या मैत्रिणी– गंधर्वराजकन्या– हातांत वीणा घेऊन सरस्वत्याची स्तुति गाण्यासाठीं तेथें आल्या व त्यनीं भैमीनलांची स्तुति इतकी सुस्वर, सुस्पष्ट व मोहक केली कीं तेथें असलेल्या शुकानें मोठ्या आनंदानें तिचा पुनरुच्चार केला. तो ऐकून 'आतां महाराजांची सध्याकाळचे विधी करण्याची वेळ झाली' असें जाणून त्या सर्व सख्या तेथून निघून गेल्या. नंतर भैमीनें प्रासादशिखरावरून आपल्या उद्यानाची सायंशोभा निरीक्षिली. तेथें कृत्रिम नदींत चक्रवाकाचें जोडपें तिच्या दृष्टीस पडल्यावर पतिवियोगाची कल्पना तिच्या मनाला चाटून गेली. त्याचा उच्चार तिनें नलाजवळ केल्यावर त्यानेंहि तिच्या मधुर वाणीची स्तुति केली. नंतर नल भैमीला म्हणाला, 'मी आतां सायंसंध्यावंदनादि विधी आटोपून घेण्यास जातों. तूं आपल्या सख्यांसह येथेंच क्रीडा करीत राहा'. व तो राज्याबाहेर निघून गेला.

**पतिपत्नीचीं काव्यें.**

धार्मिक विधी आटोपून वाड्याच्या सातव्या मजल्यावर गच्चींत दमयन्ती होती तेथें नल गेला व दमयन्तीला आपल्याजवळ पलंगावर बसवून घेऊन त्यानें संध्याकाळची शोभा मोठ्या बहारीनें वर्णन करण्यास सुरवात केली. तो म्हणाला,

"हे प्रिये, ही पश्चिम दिशा लाल लाखेच्या रसानें किंवा कुंकुमाच्या सड्यानें सारवल्यासारखी दिसत आहे. हीं पाहा, आकाशात नक्षत्रेंहि दिसूं लागलीं. त्याचेकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं संध्याकाल हा एक मोठा शिकारी असून त्यानें दिवसरूपी हत्तीचा वध केला आहे. त्याच्या विद्ध शरीरातून सांडणारें रक्त म्हणजे ही संध्या असून त्याच्या गंडस्थलातून बाहेर पडलेलीं मोत्यें म्हणजे या तारका आहेत! किंवा दुसरी अशी एक कल्पना करतां येईल कीं सूर्यबिंब हें एक पिकलेलें डाळिंबच आहे. तें गगनवृक्षावरून तोडून कालानें खालें. संध्या ही त्याची साल व नक्षत्रें हीं त्यानें दाणे चोखून थुंकून टाकलेल्या विया!"
नलाच्या या स्तुतीनें संध्या जणों काय लाजली व हळूच निघून गेली.

क्रमाक्रमानें अंधार पसरला व त्याचा नाश करणारें चंद्रबिंब क्षितिजावर दिसूं लागलें.

**चंद्र मंगल करो !**

नुकताच उगवलेला चंद्र सिंदूराप्रमाणें तांबूस दिसत होता. त्याकडे पाहून नल म्हणाला, ' चंद्र हा ऐरावताचा थोरला बंधु. (एकाच समुद्रांतून मंथनामुळें प्रथम चंद्र व नंतर ऐरावत निघाला आहे.) तो आपल्या पूर्व-दिशेला पाहुणा म्हणून आला असतां (ऐरावत हा पूर्व दिशेचा पति जो इंद्र त्याचें वाहन असल्यानें तथेंच असतो) ऐरावतानें त्याला आपल्या सिंदूर-चर्चित मस्तकावर धरलें असावें म्हणून चंद्राचा वर्ण सिंदूराप्रमाणें दिसत आहे ! ' याप्रमाणें नलानें चंद्राचें बहुत प्रकारानीं वर्णन केलें. तें सरस वर्णन ऐकत असता दमयन्ती तल्लीन होऊन स्तब्ध बसली होती. म्हणून नल तिला म्हणाला, " प्रिये, तूं बोलत का नाहींस ? का तुझ्या वदना-प्रमाणें असणाऱ्या चंद्राची मीं थोडी जास्त स्तुति केली म्हणून रागावलीस ! तें कांहीं नाहीं. तुझ्या तोंडचें चंद्रवर्णन मला थोडें ऐकीव." तिनेंहि आढे-वेढे न घेता पुढीलप्रमाणें चंद्राची स्तुति केली. " अंधकाररूपी यमुना-प्रवाहाचा पूर वाहून गेल्यावर त्या नदीमध्यें एक श्वेतदीप दिसूं लागतें. चंद्रिका हा त्याचा वालुकामय प्रदेश असून चंद्र हा तेथील दीप आहे. चंद्राच्या मार्गावर विश्वासानें बसलेल्या सशाला खाण्यासाठीं सिंहिकेचा मुलगा ( राहु ) त्याच्यावर झडप घालतो. पण अंकसुप्त सशाला सिंहिका-सुताच्या हवालीं करून मोकळें होण्याऐवजीं चंद्र आत्मदान करतो, व म्हणूनच या त्याच्या धीरोदात्त वर्तनामुळें तो राहूच्या हातून सुटतो." अशा प्रकारच्या मधुर वाणीनें दमयन्तीनें केलेली स्तुति ऐकून नलाला हर्ष झाला. त्यानें तिच्या वदनाचें चंद्राशीं साम्य तर कधीं श्रेष्ठत्व काव्यमय वाणीनें वर्णन केलें, व शेवटीं तो म्हणाला, " प्रिये, कामोत्सवाचे प्रसंगीं सहस्र-धारांच्या सुवर्णाच्या अभिषेककलशासारखा शोभणारा हा चंद्रदेव आपल्या परम आनंदाला कारण होवो."

# नैषधीयचरित-रसग्रहण

## प्रेमाचा शाश्वत त्रिकोण.

श्रीहर्षानें आपल्या 'नैषधीय चरिता'ची उभारणी वनपर्वांतील नलोपाख्यानाच्या पूर्वभागावर केली आहे. हा भाग म्हणजे सुप्रसिद्ध नलदमयन्ती-स्वयंवराची अपूर्व व गोड कथा. आजच्या भाषेंत सांगावयाचें तर ही एक अत्यंत अद्भुतरम्य प्रेमकथा आहे. प्रथमदर्शनानें प्रेमाचा उद्भव ( love at first sight) हा एक जो अभिनव (Romantic) प्रेमप्रकार आमच्या नव्याजुन्या वाङ्मयात व पाश्चात्त्याच्या प्रेमकथातूनहि दाखविण्यांत येतो त्यापेक्षाहि या कथेंतील प्रेमोद्भव अभिनव आहे. नल व दमयन्ती यांना परस्पराकृष्ट होण्यास प्रथमदर्शनहि लागत नाहीं ! केवळ एकमेकांच्या रूपगुणांच्या श्रवणानेंच तीं अनुरक्त होतात व सोन्याच्या हंसाच्या सोन्यासारख्या मध्यस्थीनें त्यांचें प्रेम दृढ होतें. प्रेमकथेला प्रेमाच्या मार्गांत आलेल्या अडथळ्यावांचून खरी लज्जत नसते ना ? मग तोहि अडथळा येथें आहे. कारण प्रियकर, प्रेयसी व प्रियकराचा प्रतिस्पर्धी या प्रेमाच्या शाश्वत त्रिकोणातील प्रतिस्पर्ध्यांची उणीव प्रत्यक्ष इंद्रासारख्या देवाधिदेवानें या कथेंत भरून काढली आहे. पण या कथेचें खरें अपूर्वत्व इंद्राच्या विरोधांत आहे. प्रियकराशीं युद्ध करणें, प्रेयसीचा अपहार करणें, त्यापैकीं एकास किंवा दोघांसहि अटकाव करून त्याना धाकदपटशानें किंवा जबरदस्तीनें वश करूं पहाणें असला कोणताहि स्थूल, बाह्य व शारीरिक विरोध इंद्रानें येथें केलेला नाहीं.

## तीव्र अंतर्विरोध.

इंद्राचा प्रेमाविरोध सूक्ष्म, आंतर व मानसिक आहे. येथील प्रतिस्पर्धी इंद्र नेहमीचा खल नाहीं. असा दुष्ट व क्रूर विरोध शिशुपाल, शाल्व वगैरे प्रतिस्पर्धी करतात. इंद्राचा विरोध कपटीपणाचा असला तरी तो एका सुसंकृत, थोर, प्रतिष्ठित व अधिक रूपगुणसंपन्न व्यक्तीचा आहे. आणि म्हणूनच तो येथील प्रेमिकाना अधिक तापदायक झाला आहे. नलाच्या औदार्याला, त्याच्या धर्मनिष्ठेला व त्याच्या थोर कुलाभिमानाला इरेला घालून आणि त्याच्या ठिकाणच्या भक्तीचाच उपयोग करून घेऊन इंद्र त्याला मोठ्या

हिकमतीनें आपला दूत करतो. प्रथम वचनबद्ध झालेला पण मग सत्य-निष्ठेच्या इरेस पडलेला नल आपल्या प्रेयसीचें मन आपल्या प्रतिस्पर्ध्याकडे वळविण्याचें अत्यन्त निष्ठुर व्रत धर्मबुद्धीनें पत्करतो ! का ? आहे कीं नाहीं प्रेमविरोधाची ही विलक्षण योजना ? विरोधाच्या या विलक्षण योजनेनें या कथेंत नलाच्या मनात 'प्रेम का कर्तव्य ?' असा मोठा मानसिक लढा उत्पन्न झाला आहे. दमयन्तीपुढील प्रश्न सुद्धां इंद्रासारख्या अधिक संपन्न देवेंद्राकडे ओढ घेणारें आपलें मन आवरून धरणें असा सामान्य नाहीं. असला प्रश्न टेनिसनच्या काव्यातील राणी ग्विनेव्हिअर इच्यापुढें होता. कर्तव्यनिष्ठ व कठोर अर्थर राजा व मोहक लान्सलॉट यांपैकीं कोणास आपल्या खऱ्या प्रेमाचा विषय करावा याबद्दल तिचें मन द्विधा झालेलें दाखवलें आहे. पण दमयन्ती मुळीं देवेंद्राला प्रथमपासून केवळ वंद्य व आदरणीयच मानते; त्याला प्रेमविषय मानीतच नाहीं. तिच्यापुढें असामान्य पेंच आहे तो हा कीं केवळ औदार्यातिरेकानें व कठोर कर्तव्यबुद्धीनें 'देवदूत' बनलेल्या आपल्या प्रियकराला मानव कसें करावें व त्याला त्याच्या मानसिक लढ्यांतून कसें सोडवावें.

**' कथा ऐका हे मधुर सुधाधारा. '**

ग्रीकाचे ऑलिंपियन् देव केवळ आपल्या करमणुकीसाठीं मानवांमानवांत विरोध उत्पन्न करून त्यांच्या मनोविकाराची लढत पहात बसत असें ग्रीक महाकाव्यात वर्णिलें आहे. आमच्या इंद्रादि देवांनीं स्वार्थासाठीं नलदमयन्तींमध्यें असाच विरोध उत्पन्न केला असून तेहि ' आपला डाव खूपच रंगला ' या विचारानें मनांत खूष होऊन तशीच आपली कर-करून घेत होते. पण दमयन्तीच्या एकनिष्ठ व उत्कट प्रेमामुळें व तिच्या चतुराईनें हा त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. पण यानेंहि निरुत्साह न होतां त्यांनीं विरोधाची एक नवी व अद्भुत युक्ति काढली. स्वयंवरप्रसंगीं ते सगळेच नल बनले ! या त्यांच्या युक्तीनें दमयन्तीच्या मनांत पुन्हा एकदां एक निराळा अन्तर्विरोध निर्माण झाला. संशय व सत्यज्ञान यांची झोंबी सुरू झाली. शेवटीं देवांच्याच कृपेनें हाहि विरोध दूर होऊन हें प्रेमळ जोडपें विवाहबद्ध झालें व ही प्रेमकथा संपली. या कथेचें खरें सौंदर्य नलदमयन्तींच्या सूक्ष्म मानसिक हालचालींत आहे.

त्यांच्या शृंगारिक भावनांचा एकाकिडून उद्रेक होत असून त्यांवर प्रतिकूल परिस्थितीचें दुसरकिडून सारखें दडपण येत आहे. त्यामुळें या प्रकाशछायांच्या लपंडावांत वाचकांच्या मनांत शृंगार व सूक्ष्म करुणछटा यांचे कल्लोळ उठतात व अखेर गोड होतें. यासाठींच आमच्या रघुनाथ पंडितांनें मोठ्या रसिकपणानें आपल्या मराठी 'नलदमयन्तीस्वयंवरा'च्या वाचकांस ग्वाही दिली आहे कीं 'कथा ऐका हे मधुर सुधाधारा। होय शृंगारा करुणरसा थारा.'

## हीच कथा कां निवडली ?

आपल्या महाकाव्यरचनेसाठीं या अपूर्व कथेची निवड करणाऱ्या श्रीहर्षानें या कथेचें खरें सौंदर्य ओळखलें आहे व आपल्या ठिकाणचें तिला साजेल असें कवित्व मोठ्या हौसेनें, आत्मविश्वासानें, दमदारपणानें, आत्मीयतेनें व कसोशीनें त्यानें वेंचलें आहे. याच कथेची निवड करण्यांत श्रीहर्षाचा दुसराहि एक तत्कालीन हेतु असणें संभवनीय वाटतें. आपला आश्रयदाता जयचंद राठोड याची कन्या संयोगिता ( संयुक्ता ) इचें स्वयंवर श्रीहर्षानें प्रत्यक्ष पाहिलें असावें. संयुक्तेच्या पृथ्वीराजविषयक प्रेमाला दमयन्तीप्रमाणच पण थोडे निराळे अडथळे होते. पण शेवटीं स्वयंवरांत संयुक्तेनें नलाप्रमाणें पृथ्वीराजासच वरलें. शिवाय स्वयंवरामुळेंच पुढें जयचंद व पृथ्वीराज या अनंगपालाच्या नातवांत ( म्हणजे मावसभावांत ) पूर्वी धुमसत असलेलें वैर चेतलें व मूर्तिमंत गृहकलीनें दोघांच्याहि राज्यभ्रंशाची जणों काय प्रतिज्ञाच केली ! व तो राज्यभ्रंश प्रत्यक्ष घडवूनहि आणला हें इतिहासज्ञांस माहीत आहे. ही स्वकालीन गंभीर घटना नलकथेच्या आश्रयानें - पण आश्रयदात्यास न दुखवितां– श्रीहर्षानें मोठ्या खुबीनें ध्वनित केली आहे. पृथ्वीराज-संयुक्ता-स्वयंवराची कथा चंदभाट या कांहींच्या मतें समकालीन कवीनें आपल्या 'पृथ्वीराज रासा' या हिंदी काव्यांत वर्णिली आहे. शिवाय त्या काळीं स्वयंवराची चाल कायम होती असें श्रीहर्षापूर्वीच्या बिल्हणाच्या 'विक्रमाङ्कदेवचरिता'वरून दिसतें. त्यानें सदर महाकाव्याच्या नवव्या सर्गांत विक्रमादित्य चालुक्याला (इ. स. १०७६-११२७) कऱ्हाडच्या शिलाहार राजाच्या चंद्रलेखा नावाच्या कन्येनें स्वयंवरांत वरल्याचें वर्णिलें आहे.

## नैषधाचें वैशिष्ट्य.

नलकथेच्या अपूर्वतेमुळें म्हणा, तींतून निघणाऱ्या स्वकालीन सूचितार्थामुळें म्हणा किंवा स्वतःच्या कवित्वाच्या जाणिवेमुळें म्हणा आपली ही काव्यकृति इतर महाकाव्यांपेक्षां वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे असा श्रीहर्षाला विश्वास आहे. तो सांगतो कीं, 'इतर कवींना माहीत नसलेल्या वाटेनें माझें काव्य जात आहे. दुसऱ्याच्या ठराविक चाकोरींतून तें जात नाहीं. तें शृंगाररसपरिप्लुत असून त्यांतील शृंगाराची तऱ्हा वेगळी आहे. त्यांतील रसवत्तेंत तर्कच्युति नसल्यानें 'खण्डनखण्डखाद्य' ग्रंथापेक्षांहि ( खडीसाररेच्या खड्यापेक्षांहि ) तें जितकें कसून परीक्षावें ( चोखावें ) तितकें अधिक गोडच आहे ! कवीचें हें म्हणणें बरेंचसें सार्थ आहे हें त्याच्या पुढील वैशिष्ट्यांवरून ध्यानांत येईल.

## स्वतंत्र बाणा : अभिनव शृंगार.

(१) महाकाव्यासाठीं आपण निवडलेल्या कथानकांत जीं महाकाव्यलक्षणें योग्यपणें बसतील तींच लक्षणें श्रीहर्षानें 'नैषधा'त घातलीं आहेत. भारविमाघांप्रमाणें जास्तींत जास्त लक्षणें मुद्दाम बसविण्यासाठीं कथेचा ओघ त्यानें बदलून घेतला नाहीं. उदाहरणार्थ, नलकथेंत युद्ध नसल्यानें वीर, रौद्र, भयानकादि रस नाहींत. त्याचप्रमाणें मंत्र, रणप्रयाण, कुमारजन्म इत्यादि गोष्टी नाहींत पुष्पावचय, जलक्रीडा, सागरवर्णन, षड्ऋतुवर्णन, पानगोष्ठी, इत्यादि बाबी त्याला कशातरी घालता आल्या असत्या तरी त्यानें त्या घातल्या नाहींत.

(२) इतर महाकाव्यांतून वीररस प्रधान असून शृंगारादि गौण आहेत. पण श्रीहर्षानें या काव्यांत शृंगार रसच प्रधान केला. व त्याचेंहि वैशिष्ट्य हें कीं तो नायक व नायिका या विभावांनींच परिपुष्ट असून त्याचें अधिष्ठान कर्तव्यबुद्धि व धर्म हें आहे. किरात-शिशुपालांतील शृंगार या शृंगारापुढें फिके वाटतात. सोळाव्या सर्गांत नलाच्या विवाहांतील पाहुण्यांनीं पंक्तींत वाढणाऱ्या तरुणींची केलेली शृंगारिक थट्टामस्करी हा अपवाद आहे. नैषधांत विप्रलंभ शृंगारच जास्त असून संभोग कमी आहे. मात्र हे दोनीहि प्रकार वर्णन करण्याची रीत अभिनव आहे. (सर्ग २० पहा )

(३) भारवि-माघाप्रमाणें श्रीहर्ष कृत्रिम बंध वापरीत नाहीं. त्यानें श्लेष मात्र जास्त प्रमाणात आमूलाग्र वापरला आहे. इतका श्लेष भारवि-माघ योजीत नाहींत. त्यानें एकोणीसच वृत्तें वापरलीं आहेत व इतरापेक्षां जास्त विनोद घातला आहे.

(४) भारवि-माघांनीं दिली आहे त्याप्रमाणें श्रीहर्षानें आपल्या महाभारतोक्त कथानकाला आणखी इतर पुराणाची जोड दिली नाहीं. काव्याच्या सजावटींत मात्र कालिदास, बाण व माघ यांनीं योजलेले प्रसंग त्यानें आणिले आहेत. कुमार सर्ग ८ मधील पार्वतीप्रमाणें मुग्धा नायिका दमयन्ती इचें विलास रथोद्धता वृत्तातच वर्णिले आहेत ( नै. १८ ). रघु ५ प्रमाणें नलाला त्याचे भाट प्रभातकालचें वर्णन करून उठवीत आहेत. ( नै. १९ ) रघु ६ प्रमाणें दमयन्तीस्वयंवरवर्णनाचा त्याचा थाट आहे (नै. १०-१३). रघु ७ व कुमार ७ प्रमाणें पुरस्त्रिया नलाला पहावयास आल्या आहेत (नै. १५). बाणाच्या कादंबरींतील चंद्रापीडाच्या दिनचर्येप्रमाणें नलाची स्नान, देवतार्चन, व्यायाम, भोजन, इत्यादि दिनचर्या आहे. (नै. २१) चंद्रापीडाच्या अश्वाप्रमाणें नलाच्या अश्वाचें वर्णन आहे. (नै.१. ५७-६४), कादंबरीप्रमाणें शुकसारिका विनोद आहे (नै. २१) व माघाप्रमाणें दशावतारवर्णन आहे (नै. २१.५३-११८). त्रिविक्रमाचा नलचम्पू श्रीहर्षा या पूर्वीचा असला असला तरी त्यानें त्याचा उपयोग फारसा करून घेतलेला दिसत नाहीं. पण या अनुकरणांत श्रीहर्ष माघाप्रमाणें स्वत्व मात्र विसरला नाहीं.

**मनाच्या हालचालीवरच नजर.**

(५) श्रीहर्षानीं निसर्गाच्या देखाव्यांचीं व स्थलांचीं वर्णनें त्या त्या प्रसंगाला उचित व पात्राच्या मनःस्थितीला साजेशीं आहेत. उदाहरणार्थ-नलाच्या उद्यानाचें वर्णन त्याच्या विरही वृत्तीला धरून आहे. (नै. १·७८-११६), कुंडिनपुरी (नै. २.७३-१०५) व नलाचा राजवाडा (नै १८. ४-२८) यांचीं वर्णनें शृंगाररसपोषक आहेत. वैतालिकानीं वर्णिलेल्या सूर्योदयात राजाला धर्माचरणजागृतीची सूचना असून (नै. १९) नलदयमन्तीनीं वर्णिलेल्या चंद्रोदयांतील प्रधान भाग त्यांच्या विलासी कल्पनांनीं रंगला आहे (नै. २२).

(६) बहुतेक प्रसंगीं आपल्या पात्रांच्या मानसिक आंदोलनांकडे श्रीहर्षाचें लक्ष फारच आहे. इतकेंच नव्हे तर कथेंतील बाह्य घटनापेक्षां त्या घटनांमुळें आपल्या पात्रांच्या मनावर होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांचीच मातब्बरी श्रीहर्षाला विशेष वाटते. श्रीहर्ष तर्कांत प्रवीण होताच पण मनोव्यापारनिरीक्षणातहि तो तसाच तरबेज होता असें स्पष्ट दिसतें. 'उदाहरणार्थ —मदनपीडित दमयन्तीनें मदन व चंद्र याना उद्देशून काढलेले भावगीतात्मक उद्गार ( नै. ४.४७–९९ ) व सख्यांशीं तिनें केलेलीं प्रश्नोत्तरें ( नै. ४.१०१–१०९ ), सुंदर नलाला पाहून इंद्रादि देवांच्या मनात आलेले निराशेचे विचार ( नै. ५. ६०–७३ ), इंद्रादी देवांनीं आपल्यासारख्या मानवाकडे याचना केली या गोष्टीनें आनंदून गेलेल्या नलाची मनःस्थिति ( नै. ५.७९–९२ ), देवांचा दूत म्हणून गुप्तरूपानें दमयन्तीकडे चाललेल्या नलाचें विविध भावनाच्या कल्लोळानें व्याप्त झालेलें मन ( नै. ६. १०, १८, १७ ) व त्याला पडलेलें कर्तव्य व प्रेम यांचें कोडें ( सर्ग ८ व ९ ) व स्वयंवर-मंडपांत पांच नल पाहून भांबावलेल्या दमयन्तीची सशयाकुल वृत्त ( ने. १३. ३६–५५). काम, भय, महत्त्वाकांक्षा यांसारख्या प्रबळ भावनांनीं व्याप्त झालेलें 'अन्तर्मन' झोपेंत किंवा जागेपणींहि बहिर्मनाला दूर लोटून आपले व्यापार करूं लागतें. अशीं मनाची अवस्था, हल्लीं ज्याला 'मनोविश्लेषण' ( Psycho-analysis ) म्हणतात त्याचा समर्थ विषय आहे. असल्या अवस्थेचीं शब्दचित्रें श्रीहर्षानें दुसऱ्या कोणाहि कवींपेक्षां अधिक रेखीवपणें व चारंवार काढलीं आहेत. विशेषतः विरही जनांचीं पुढील वर्णनें पहा स्वप्न ( नै. १.३९ ), जागेपणींचें स्वप्न ( नै. ३.११२ ), तंद्री ( नै. ३.१३४, ६ १७ ) व भ्रम ( ९ १४० ).

**शास्त्रोल्लेख : विशिष्ट दोष.**

(७) श्रीहर्षाहनक दर्शनाचे, शास्त्रांचे व विद्याचे उल्लेख महाकाव्यांत दुसऱ्या कोणीहि केलेले नाहींत. उदाहरणार्थ न्याय-वैशेषिकदर्शन—द्व्यणुक ( नै. ३.१२५ ), वैशेषिकांचें तमावद्दल मत ( नै. २२.३६ ), नैयायिकांनी मोक्षकल्पना, ( १५.७५ ), मीमांसा देवाना प्रत्यक्ष जडशरीरें नसतात ( नै. १४.७३, व ५.३९ ), स्वतः प्रामाण्य वाद ( नै. २.६१ ),

सांख्य व योग (नै. ५.९४ व २२.७६), वेदान्त–स्वप्नस्थिति (नै. १.४०), लिंगदेह (नै. ९.९४), बुद्धमत—शून्यवाद, विज्ञान-सामस्त्य, साकारतासिद्धि (नै. १०.८७) जैनमत—रत्नत्रितय–सम्य-ग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र्य (नै. ९.७१), चार्वाकमत (नै.१७. ६९), शिवाय धर्मशास्त्र, कामशास्त्र, नृत्यगीतादिकला, ज्योतिष, शास्त्र-विहित विधि,विविध लोकाचार व रूढी, अनेक पौराणिक संदर्भ यांचे आधारें केलेलीं वर्णनें कितीतरी आहेत.

(८) गुणांप्रमाणें कांहीं दोषांतहि नैषधांचें वैशिष्ट्य आहे. हें काव्य प्रायः सर्वत्र पाल्हाळिक आहे. कथेच्या ओघापेक्षां वर्णनाकडेच दृष्टि व प्रमाणशीर-पणा व संयम यांचा अभावहि सर्वत्र जाणवतो. व कल्पनेचा स्वैर विलास, सूक्ष्म निरीक्षण, विस्तार इत्यादि बाबतींत श्रीहर्ष हा पद्यरूप बाणभट्ट आहेसें वाटतें. श्लेषप्रियता व शास्त्रोल्लेख यांमुळें येणारें काठीण्य (पाच अर्थांचें पञ्चनलीवर्णन सर्ग १३ व वर उल्लेखिलेले व इतर शास्त्र संद-र्भांचे श्लोक), पुनरुक्ति (एका दमयन्तीचें चारपांच ठिकाणीं आलेलें अक्षरशः आपादमस्तक वर्णन, नलरूपगुणवर्णन व त्याच त्या कल्पना १०.४१ ४२, १६-७८ ७९ सर्ग २१,४६ सर्ग २२-१४-१५, ४७-४८ इत्यादि), ग्राम्यत्व (सरस्वतीनें दमयन्तीस ओढीत नेणें, सरस्वतीच्या राजे-वर्णनाचे वेळीं दासींनीं मध्येंच तोंड घालणें, सर्ग १२, १३, लग्नांतील पाहुण्यांची थट्टा (स.१६), नलदमयन्तीशीं कला वगैरे सख्यानीं केलेलें फाजील धिटाईचें वर्तन (सर्ग२१) यांत अशिष्ट आचाराचें व उच्चारांचेंहि ग्राम्यत्व आहे.) व अश्लीलता (सर्ग ६.२०, ७.९१, १६.१५, २०) हे दोष नैषधांत आढळतात.

**विस्तारांत कवित्वाचीं बीजें.**

(९) या काव्याचा विस्तारहि इतर कोणत्याहि महा काव्यापेक्षां प्रचंड आहे. वनपर्वांतील अ. ५० ते ५५ (कुंभकोण प्रत) या सहा अध्यायांत व अवघ्या १८६ अनुष्टुभांत सांगितलेल्या मूळ कथेचा विस्तार श्रीहर्षानें २८०४ प्रदीर्घ वृतांत लिहिलेल्या श्लोकांत केला आहे ! प्रदीर्घ वृत्त अनुष्टुभाच्या सरासरीनें दीडपट असतें असें धरल्यास हा विस्तार मुळा-पेक्षां साडेबावीस पट आहे असें आढळेल ! या अवाढव्य विस्तारांतच

नैषधाच्या गुणदोषांचा, श्रीहर्षाच्या व्यक्तिमत्वाचा व त्याच्या कवित्वाचाहि तलास लागणार असल्यानें आपण त्यांचेंच जरा सूक्ष्म निरीक्षण करूं.

'नैषधा'तील श्रीहर्षानें केलेल्या प्रचंड विस्ताराचा सर्व भर केवळ त्याच्या कल्पनाशक्तीवर आहे. मानवी स्वभावाचें व व्यवहाराचें सूक्ष्म अवलोकन व काव्यग्रंथ, शास्त्रें व कला यांचा परिचय यांमुळें या त्याच्या कल्पनेला भरीव स्वरूप आलें आहे व तिच्या विशाल पंखाखालीं हा सारा विस्तार सामावला आहे. व्यक्तींचीं, स्थलांचीं व देखाव्यांचीं विस्तृत वर्णनें, व्यक्तींमधील संभाषणें, त्यातून प्रकट होणारे त्यांचे मनोविकार, हर्षामर्षादि भावनांचीं आंदोलनें, मानसिक लढे, कर्तव्याकर्तव्यविचार इत्यादि बाबींनीं सदर काव्य विस्तृत झालें असून त्या बाबी शब्दांत व्यक्त होत असता श्लेषादि शब्दालंकार, उपमाउत्प्रेक्षादि अर्थालंकार व शास्त्रांचे उल्लेख यांची त्यांत भर पडली आहे.

**इतिहास व महाकाव्य.**

महाभारतकाल व श्रीहर्षांचा काल यांतील नीति, धर्म, तत्त्वज्ञान, आहारविहार, रीतिभाती, रहाणी– थोडक्यांत बोलावयाचें तर अन्तर्बाह्य संस्कृति– या बाबतींत पडलेलें अन्तर श्रीहर्षाच्या या काव्यांत दिसतें. म्हणजेच नलकथा महाभारतकालीं न घडतां आपल्या कालीं घडली असती तर ती कशी दिसली असती यांचें काल्पनारम्य चित्र श्रीहर्षानें मोठ्या हौसेनें येथें रेखाटलें आहे. महाभारतरामायणांसारखीं आर्ष काव्यें केवळ इतिवृत्तकथनपर आहेत. त्या काळीं घडलेले भव्य प्रसंग सांगणें, पराक्रमी माणसांच्या कृती व त्यांच्या महत्त्वाच्या उक्ती नमूद करणें व कथानकाचे आराखडे घालून देणें हें त्यांचें मुख्य काम. आर्ष काव्यांतील व्यक्तिरेखा, प्रसंग, कथानकें व सहजस्फूर्त उद्गार हीं खाणींत सांपडलेलीं अनगड रत्नें होत. कालिदासश्रीहर्षासारखे कलावन्त या खाणींतील आपल्याजोगीं हीं अनगड रत्नें निवडून घेऊन त्यांस आपल्या प्रतिभेनें पैलू पाडतात, नको असलेला त्यांतील भाग प्रज्ञेनें कापून काढतात, हवा असलेला जोडतात, व त्यास उत्कट रसवत्तेचें पाणी देऊन स्वकालाच्या कोंदणांत बसवितात. आर्ष काव्यें व महाकाव्यें यांतील हा फरक ध्यानांत घेऊन आनंदवर्धनाचार्यांनीं कवींस असा स्पष्ट सल्ला दिला आहे कीं ' आर्ष

काव्यांत जर रसानुकूल स्थिति नसेल तर तेथील वृत्त बदलून सुद्धां रसानुकूल स्वतंत्र वृत्त किंवा तपशील खुशाल घाला. कारण महाकवीचा कटाक्ष रसोत्पत्तीवर असल्यानें नुसत्या इतिहासाशीं त्याला कर्तव्य नाही, ( इतिवृत्ते यदि रसाननुगुणां स्थितिं पश्येत् तां भङ्क्त्वापि स्वतंत्रतया रसानुगुणं कथान्तरमुत्पादयेत् । न हि कवेरितिवृत्तमात्रनिर्वहणे किंचित् प्रयोजनम् । ध्व. ३ ). संपूर्ण रसवत्ता ही स्वकालानुसारित्वानें उत्पन्न होत असल्यानें श्रीहर्षानें तोटकी भारतकथा स्वकालातील जीवनरसांनीं फुलवून काढली आहे. पण तसें करतांना मुख्य कथेंत ढवळाढवळ न करतां केवळ तपशिलांत, किरकोळ पात्रांत व प्रसंगांत व विशेषतः पात्राच्या निगूढ मानसिक हालचालींच्या चित्रणात त्यानें भर घातली आहे.

**हंस पक्ष्याचा सुसंस्कृत मानव झाला.**

रसवत्तेसाठीं केवळ तपशिलात भर घातल्याचें पहिलें उत्तम उदाहरण म्हणजे सोन्याच्या राजहंसाचें. वनपर्वकथेत सदर हंसाच्या प्रसंगाचा नुसता सांगाडा किंवा आराखडा आहे व त्यासाठीं केवळ चौदा श्लोक घातले आहेत. पण श्रीहर्षाच्या कल्पनास्पर्शानें हें 'पाखरूं' शास्त्र व सुसंस्कृत व्यवहार जाणणारें उच्च दर्जाचें मानवी पात्रच झालें आहे. परिसस्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें म्हणतात. पण येथें तर कविकल्पनास्पर्शानें सोन्याचा हंसपक्षी सुसंस्कृत मानव झाला ! यावरून कविकल्पनेची किमया परिसापेक्षांहि श्रेष्ठ ठरत नाहीं काय ? नलानें या हंसास धरल्याचा हा प्रसंग करुणरसोत्पादक करण्यास श्रीहर्षानें प्रथम या हंसाची वृद्ध माता, नुकतीच प्रसूत झालेली कान्ता, मुलेंबाळें व सगेसोयरे असा गोतावळा त्याच्याभोंवती कल्पिला आहे. हंसाच्या अंगीं चातुर्य व कर्तव्यपरता आणि तोंडीं विधिनिषेधविचार घातला आहे. महाभारतातला नल हंसास सोडतो याचें कारण 'तुला दमयंती मिळवून देईन' हें हंसाचें अभिवचन होय. पण नल-हंसामधील हा क्रयविक्रयात्मक सौदा श्रीहर्षास पसंत वाटला नाहीं. म्हणून त्यानें उपकार करून घेणाऱ्या नलाला व उपकार करणाऱ्या हंसाला किती थोर, सुसंस्कृत व किती उदात्त बनविलें आहे तें पहाण्यासारखें आहे. नलासारख्या थोर सम्राटासमोर आपण प्रत्युपकाराची भाषा कशी बोलावी हा संकोच हंसाला वाटतो. 'मी केवळ पांखरूं. मी तुझें प्रिय काय करणार !

असें मानूं नको. शिवाय मी तुला कठोर बोललों त्या पातकाचें क्षालन करण्यास मी हे तुझें प्रिय आपण होऊन करणार आहें. म्हणून तूं माझ्या विनंतीचा अव्हेर करूं नको. मी काय म्हणतों तें निदान ऐकून तरी घे' अशी अजीजीची भाषा हंस बोलतो व मोठ्या चतुराईनें दमयन्तीच रूप-गुणवर्णन करतो. अगोदरच दमयन्तीवर आसक्त असणाऱ्या नलाला हंसाचें हें भाषण फारच मधुर लागतें. तथापि त्याने हा हंसकृत प्रत्युपकार मोठ्या महानुभावतेन व आढेवेढे घेत पत्करला आहे. तो म्हणतो, 'तुझ्या-सारखे परोपकारी महात्मे आपण होऊनच परहित साधावयास तयार होतात. तेव्हां मी तुला या कामीं प्रेरणा कशाला द्यावयास हवी ? जा बापडा. मी तुझ्या या कामांत तुला यश चिंततों.' वनपर्वतील साध्या देवघेवीच्या प्रकारावर केवढी ही सुसंस्कृतीची झळाळी !

**दोघेंहि श्रेष्ठ चतुरच !**

दमयन्तीशीं झालेल्या हंसाच्या भाषणांत सुद्धां हीच उदात्तता, हेंच मनोविश्लेषणचातुर्य व हीच सुसंस्कृतता कवीनें राखली आहे. तेथें तर श्रीहर्षानें हंसाला थोर कुलाचें अधिष्ठान व अद्भुतशक्तीची जोड दिली आहे प्रत्यक्ष कमलासन ब्रह्मदेवाचें वाहन असलेल्या हंसाच्या कुलांत या हंसाचा जन्म असून मंदाकिनीतील सुवर्णकमलांचे तंतु भक्षिल्यामुळें त्याची तनु सोन्याची झाली ! या हंसाच्या वाणीचा गोडवा केवळ स्वर्गीय देवां-नांचं सुलभ असतो हा हंस विश्वसंचार करूनहि थकत नाहीं व त्याला कोणींहि जोळीं टाकून पकडूं शकत नाहीं. असा हा हंस नलाचें वर्णन चतुरपणें करून दमयन्तीचा अभिप्राय अजमावितो आहे. पण महाभारतांत पहावें तीं हा प्रसंग अगदीं उघड आहे. नलाचें वर्णन ऐकून दमयन्ती ऐकदम म्हणते, 'ठीक आहे. जा तर. नळाला सांग कीं माझी ना नाहीं म्हणून.' पण श्रीहर्षाची दमयन्ती अधिक लज्जावती, अधिक प्रच्छन्न व श्लेषात्मक बोलणारी व अधिक चतुर आहे. व हंसहि तसाच कोटिबाज, तसाच चतुर व स्त्रीहृदयज्ञ आहे. श्रीहर्षाची दमयन्ती स्वाभिप्राय प्रकट करतांना किती लाजते, किती आढेवेढे घेते, आणि किती मुरकते ! पण हंसहि तिला छेडीत आहे, चुचकारीत आहे, व 'अगदीं लंकागमना-सारखा अलभ्य तुझा मनोरथ असेल तरीहि तो तुला हस्तगत होईल'

असें म्हणत आहे. तोंच लंकागमनाचा धागा घेऊन चतुर दमयन्ती आपला नलविषयक अनुराग 'चेतो नलं कामयते मदीयं' या श्लेषानें सुचवीत आहे.

## सुसंकृत शृंगार.

महाभारताच्या मानानें येथील या शृंगारविष्कारांची ही किती हृदयंगम तऱ्हा आहे पहा. खरें सांगावयाचें तर महाभारतकालीं प्रणयभावनेचें उपजत वृत्तिस्वरूप ( Instinctual plane ) जाऊन ती जरी स्थिरवृत्तिरूप झाली होती व तिला औचित्य अनौचित्य प्राप्त झालें होतें तरी तिला उत्तरकालीन उन्नति (Sublimation), क्रीडात्मक व सौंदर्यात्म (Aesthetic) पातळी आली नसल्यामुळें ती भावना त्या काळीं उत्कटास्वादक्षम नव्हती. म्हणूनच कालिदास श्रीहर्षासारख्या कवींना शृंगार रसाची सुंदर जोड महाभारतकथानकांना द्यावी लागली. श्रीहर्षाचा बराचसा काव्यविस्तार असा शृंगाराधिष्ठानच आहे. असो. तर एवढ्या अत्यन्त चतुर दूताप्रमाणें दमयन्तीचें मन जाणून व खुलवून फुलवून हंस परत नलाकडे आला आहे. येवढ्यावरच त्याचें काम संपत नसून देवांचा दूत झालेला नल दमयन्तीचें मन वळवीत असतां त्या दोघांच्या ऐन झगड्याच्या वेळीं हंस पुन्हा प्रकट होतो ( नै. ९.१२७ ) व नलाला दमयन्ती स्वीकारावी विनंति करून निघून जातो. तात्पर्य, वनपर्वांतील चौदा श्लोकांच्या हंसप्रसंगाचा श्रीहर्षानें सबंध पाऱ्हेतीन सर्गांत व ३३१ प्रदीर्घ श्लोकांत ( सर्ग १, २ व ३ ) अत्यंत मनोहर विस्तार केला आहे. या विस्तारांत स्वभावचित्रण, मनोनिरीक्षण, शास्त्रज्ञान, व्यवहारचातुर्य, सुसंस्कृतता, सौंदर्यदृष्टि, कल्पकता व भाषाप्रभुत्व इत्यादि श्रीहर्षाचे अनेक गुण व पाल्हाळ आणि श्लेषाधिक्य हे दोष दिसत असल्यानें 'स्थालीपुलाक' न्यायानें हें एकच स्थल थोडेंसें विस्तरशः विवेचिलें.

## मूळ व कल्पित.

श्रीहर्षानें केलेल्या यापुढील विस्ताराचें स्थूल स्वरूप प्रथम देऊन नंतर त्याचे कांहीं विशेष सांगतों. हंसाच्या नलवर्णनानें दमयन्ती फारच कामाविद्ध झाली. तिचें शरीर कृश व पाडुर झालें. ही तिची स्थिति भीमाच्या कानावर गेली व त्यानें आपल्या कन्येची ही व्याधि तारुण्यमूल

आहे असें ओळखून तिचें स्वयंवर मांडलें. या आशयाच्या वनपर्वांतल्या नऊ श्लोकावर श्रीहर्षानें १२२ श्लोकांचा एक सबंध चवथा सर्ग खर्ची घातला आहे. या विस्तारात मदनबाधेच्या ज्वर, चिंता. औदासीन्य, रोदन, निःश्वास, कृशता, भ्रम व मरणोन्मुखता इत्यादि अवस्था व स्तम्भ, स्वेद, रोमाचापासून मूर्छेपर्यंतचे सर्व सात्त्विकभाव श्रीहर्षानें यथाक्रम दिले आहेत. त्यात श्लेषप्रचुर प्रश्नोत्तरें आहेत व चतुर राजसचिव आणि राजवैद्य यांचे उपाय आहेत. महाभारतकाळीं नैसर्गिक कामबाधा होती. पण त्या कामाचें शास्त्र बनलें नव्हतें. त्या काळीं कामबाधेचें उघड बोलणें होतें. पण त्या विकाराला झाकण्याची किंवा तो प्रच्छन्नपणें प्रकट करण्याची कला निर्माण झाली नव्हती. व या प्रकारचें व ह्रदयांत सुश्लिष्ट वर्णन करून त्याचा क्रीडारूप उन्नीत आस्वाद घेण्याची प्रथा तर नव्हतीच नव्हती ! पाचवा सर्ग महाभारत-कथानुसारी असला तरी श्रीहर्षानें त्यांत इंद्रनारदाची भेट आणि नल व इंद्रादि देवांची भाषणें अशा काहीं उच्च भूमिकेवरून वर्णिलीं आहेत कीं तेथें मूर्तिमंत उदात्तता नांदत आहे असा भास होतो. इंद्र दमयन्तीवर अनरक्त होऊन तिच्या प्राप्ती साठीं पृथ्वीवर जात आहे. हें कळल्यानें इंद्राणीला आलेला रागारंभ, घृताची, तिलोत्तमा इत्यादि स्वर्गांगनांना वाटलेला विषाद श्रीहर्षानें कल्पून घातला आहे. तो त्याच्या अप्रतिम कवित्वाची साक्ष देतो.

## कल्पितांचा अफाट विस्तार !

इंद्रादि देवांचें दूतत्व पत्करून दमयन्तीच्या अन्तःपुरांत गुप्तपणें प्रवेश करणाऱ्या नलाचें वर्णन करणारा साहावा सर्ग, नलानें केलेल्या दमयन्तीच्या आपादमस्तक स्वरूपाच्या वर्णनाला वाहिलेला सातवा सर्ग, दहाव्या, अकराव्या व बाराव्या सर्गांतील सरस्वतीचा प्रवेश व तिनें स्वयंवरास आलेल्या देवांचीं व राजांचीं केलेलीं वर्णनें, तेराव्यातील सरस्वतीकृत श्लिष्ट पंचनली-वर्णन, पंधराव्यातील वधूवराची वेषभूषा व मिरवणूक, सोळाव्यांतील पाहुण्यांची थट्टा, सतराव्या सर्गांतील चार्वाकाचें नास्तिक पाखंड व त्यावरील देवांनीं केलेलें खंडनपर प्रत्युत्तर, नलदमयन्तीचा राजवाडा व तेथें चाललेले त्यांचे विलास वर्णणारा अठरावा व वैतालिकांच्या स्तुतीचा एकोणीसावा सर्ग, नलदमयन्तींचे नर्मविनोद. चतुर सख्यांची व शुकसारिकाची करमणूक, नलाची दिनचर्या व चंद्रोदयाचें वर्णन यांवरील

वीस, एकवीस व बावीस हे सर्ग श्रीहर्षाच्या कल्पनेचे विलास आहेत. म्हणजे मूळाच्या विस्तारापेक्षां काल्पिताचाच विस्तार दुप्पट !

## श्रीहर्षाचा आदर्श राजा.

या पसाऱ्यात श्रीहर्षाच्या मुख्य आदराचा विषय कथानायक नल हा आहे. ' पुण्यश्लोक नलाचें नुसतें स्मरण सुद्धां कलिमलाचें नाशक आहे. मी तर माझी वाणी नलकथेच्या संकीर्तनालाच वाहिली आहे. मग ती या संकीर्तनानें पवित्र कां नाहीं होणार ? ' अशी नलाबद्दल आपली भक्ति श्रीहर्षानें प्रथमच बोलून दाखविली आहे. पहिल्या १ ते ३१ श्लोकांत नलाच्या रूपगुणांचें कल्पक वर्णन त्यानें केलें आहे. पण महाभारतातल्या नलापेक्षा आपला नल अधिक श्रेष्ठ दाखवून राजाचा आदर्श निर्माण करण्याचा आपला हेतु त्यानें जेथें स्पष्टपणें दाखविला आहे तें ठिकाण म्हणजे नववा सर्ग. त्या श्रेष्ठपणाची पार्श्वभूमि त्यानें पहिल्यापासूनच चितारली आहे. महाभारतांत नलाला दिलेल्या ' बली, रूपवान् यज्वा, दानपति, शीलपुरस्कृत, वेदविद्, सत्यवादी, ईप्सितो वरनारीणां ' इत्यादि विशेषणाचा श्रीहर्षानें मनोहर विस्तार केला आहे. पण त्यांत ' अक्षप्रिय ' ( द्यूतप्रिय ) हें विशेषण त्यानें गाळलें आहे. राजहंसाशीं त्याची वागणूक थोरपणाची व सुसंस्कृततेची दाखविली आहे. इंद्राच्या कपटाला कपट न लढविता नलानें आपलें औदार्य व सत्यनिष्ठा कसोशीनें व स्वार्थत्यागपूर्वक पाळल्याचें दाखवलें आहे (नै. ५.१३७). पण खरा कसोटीचा प्रसंग दमयन्ती जेव्हां नलावरच्या आपल्या प्रेमामुळें देवांना वरावयास तयार होईना तेव्हांचा आहे. महाभारतांतला नल प्रथम थोडे आढेवेढे घेतो. मी देवाचा दूत म्हणून तुजकडे आलों असतां माझा स्वार्थ भी साधणें चागलें नाहीं असेंहि तिला म्हणतो. (दौत्येनागत्य कल्याणि नोत्सहे स्वार्थमीप्सितम् ) पण लगेच तिला असें सांगतो कीं 'माझ्या दूतधर्माला कलंक न लागता ज्यानें माझा स्वार्थ साधेल असा कांहीं इलाज काढत असशील तर पहा. (एष धर्मो यदि स्वार्थो ममापि भविता ततः । एवं स्वार्थं करिष्यामि तथा भद्रे विधीयताम् ॥ वन ५३.१७). त्यावर तिनें केवळ आपल्या इच्छेनें 'मी तुला देवासमक्ष वरीन, तुम्ही सर्व स्वयंवराला या' असा उपाय सुचविला.

## आचरणाची कसोटी कोणती ?

पण श्रीहर्षाच्या नलाची या प्रकरणाकडे पाहण्याची दृष्टिच वेगळी आहे. तो अगदीं पहिल्यापासून सरळपणानें दूतधर्माला जागला आहे. मी नल आहें असें तो दमयंतीस सांगत नाहीं. तिनें देवांना वरावें म्हणून तिची समजावणी व मनधरणी कधीं अजीजीनें तर कधीं धाक दाखवून करतो. तिचा द्वेष पाहून खरोखरच रागावतो. पण ती जेव्हा निराशेनें व्याकुळ होते तेव्हांच तो अमावस्येंत आपलें नांव तिला सांगतो.पण अमावस्येंत कां होईना, आपल्याला नकळत दूतधर्मांत आपल्याकडून हें कपट झालें याची याला खंति वाटते. पण तो म्हणतो, 'मीं जाणूनबुजून व स्वेच्छेनें हें पातक केलें नाहीं. माझ्या चित्ताची शुद्धता सर्वसाक्षी देवांना माहीत आहे' (नै. ९. १२४–२५). यावरून हें स्पष्ट आहे कीं येथील नल आपल्या चांगल्या वाईट आचरणाची कसोटी आपली सदसद्विवेकबुद्धि मानतो. धर्महि झाला व स्वार्थहि साधला अशी वकीली करून धर्ममर्यादेंतून सुटण्याची त्याची इच्छा नाहीं. या पेचप्रसंगांत श्रीहर्षानें राजहंसाला आणला आहे व त्याकडून त्याला सांगविलें आहे कीं 'तूं आत्मप्रतारणा मुळींच केली नाहींस' (न कूटसाक्षीभवनोचितो भवान् ।). तूं थोर आहेस. थोरांच्या मनःशुद्धीला साक्षी त्यांचा आत्मा. (सतां हि चेतः शुचिताऽऽत्मसाक्षिका । नै. ९. १२९). 'जनलज्जेपेक्षा मनलज्जा श्रेष्ठ' हा वागणूक तपासून पाहण्याचा उच्च नियम नलाच्या बाबतींत श्रीहर्षानें पूर्वी एकदा उच्चारलाच आहे. (स्वतः सतां हीः परतोऽतिगुर्वी । नै. ६.२२). महाभारतांतील नलाची वागणूक व्यवहारी माणसाला शोभण्यासारखी आहे. पण ती आदर्श नाहीं हें स्पष्ट आहे.

## धीरललित नायक.

याप्रमाणें हर्षानें नलाला प्रसंग सांपडेल तेथें थोर आदर्श राजा बनवितांना विस्ताराकडे व कथाघाकडे मुद्दां लक्ष दिलें नाहीं. तो तरुण दमयंतीच्या विलासांत धर्माचरण विसरत नाहीं. त्यामुळें तिचा राग झाला तरी तिची समजूत घालतो (सर्ग २०, ६, ७, ९, १०). ही कल्पना हर्षानें 'कुमार-संभवां'तील श्रीशंकराच्या तपोनिष्ठतेवरून घेतलेली दिसते (पहा. कु.८.५०–५२). सर्ग २१ व २२ यांमध्यें नलाची दिनचर्या दिली आहे. तींत त्याची आचारतत्परता व त्याची ईश्वरभक्ति विस्तारानें वर्णून नल हा

खरा राजर्षि होता हा संस्कार शेवटीं वाचकांच्या मनावर त्यानें कोरून ठेवला आहे. केवळ शाब्दिक वर्णनांत जरी नलाच्या शौर्याबद्दल व शत्रु-निग्रहाबद्दल श्रीहर्षानें कांहीं उल्लेख केलेले आहेत तरी प्रत्यक्ष कृतीनें नलाच्या पराक्रमाचा प्रखुरपणा त्यानें कोठेंच पटविला नाहीं. अर्थात् मूळ कथेंतच या गोष्टी नाहींत. मग हा असला नायक निवडण्यांत त्याचा कांहीं हेतु असल्यास नकळे. श्रीहर्षाच्या काळीं शौर्य होतें. वाजवीपेक्षां जास्त लढाया होत होत्या . पण त्या रणपराक्रमाच्या मागें जे उदात्त हेतू लागतात ते नव्हते. त्यामुळें त्या शौर्यानें कलीच मातत होता. तेव्हां दुही, द्वेष व आपआपसांतील कलह दूर ठेवण्यास धार्मिकतेचींच जरूर जास्त होती. म्हणून श्रीहर्षानें नलाला विलासांत सुद्धां धर्माचरणाची जागृति असल्याचें मुद्दाम दाखविलें आहे. कालिदासाचे भाट अजाला निद्रेंतून जागें करीत असतां शत्रुनिर्दालनाची तेजस्वी प्रेरणा करतात (रघु ५.७१). तर नलाचे भाट अशाच प्रसंगीं नलदयन्तींना इषारा देतात कीं 'धर्माचरणाला विसरूं नका. आमचें बोलणें अप्रिय असलें तरी पथ्यकर आहे' (नै. १९.२१-२५) ही गोष्ट विशेष लक्षणीय आहे. त्यामुळें नलाच्या अंगीं कलासक्ति, कवित्व, रसिकत्व इत्यादि सर्व मृदुप्रकृती धीरललित नायकाचे गुण दाखवून त्याच्या धर्मनिष्ठेला विशेष प्राधान्य देण्यांत आलें आहे. कारण त्यांत जर चूक झाली तर झडप घालण्यासाठीं कली दाराशीं डोळ्यांत तेल घालून बसला होता! दमयन्तीहि राजर्षि नलाला साजेल अशीच चतुर, प्रेमळ, सुस्वरूप, सुसंस्कृत व रसिक धर्मपत्नी होती हेंहि विस्तारानें श्रीहर्ष दाखवितो.

## अद्वैतमतावरील श्रद्धा.

हर्षाच्या कथाविस्ताराचा दुसरा विषय त्याची धार्मिक व विशेषतः अद्वैतवेदान्तविषयक श्रद्धा. (नै. ३.३–४, ५.८, ८.१५, ११.१२९ व १३.३६). याकरतां त्यानें २२१ श्लोकांच्या सतराव्या सर्गांतील जवळ जवळ २१० श्लोक खर्ची घातले आहेत. त्यांत अधर्म, अनीति व दुर्मतें यांचा उत्तम पूर्वपक्ष करून त्यावर बिनतोड उत्तरपक्ष केला आहे. वरून दिसावयास रूक्ष असलेला हा विषय श्रीहर्षानें मोठ्या तन्मयतेनें व कलात्मक रीतीनें मांडल्यानें प्रकृत सर्गाची गणना उत्तम

सर्गांत केली पाहिजे. याप्रमाणें आदर्श राजाची कल्पना चित्रित करणें व अद्वैतवेदान्ताची थोरवी गाणें हे दोन हेतू नैषधांत दिसतात.

**श्रीहर्षांची विनोदी वृत्ति.**

सदर विस्तारांत दिसून येणारे श्रीहर्षांचें एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे त्याची जगाकडे पाहण्याची विनोदी वृत्ति. 'नैषधा'इतका विनोद पंच-महाकाव्यांपैकीं दुसऱ्या एकाहि काव्यांत नाहीं. 'रघु व कुमार' यांमध्यें त्याच्या कांहीं छटा, विशेषतः शृंगाराच्या पार्श्वभूमीवर, आढळतात. 'किरात' तर फारच गंभीर.व 'शिशुपालां'त तो आढळलाच तर शिशुपाल व त्याचा दूत यांनीं केलेल्या कृष्णनिंदेच्या अनुषंगानें तिखट उपहासाच्या रूपांतच. विषयानुरोधानें विनोद येणें व कवीच्या वृत्तीमुळें तो येणें यांमध्यें अंतर आहे. श्रीहर्षाच्या मनोरचनेंतच विनोदाचें बीज असल्यानें तो प्रसंगानुराधानें अनेक घटनांकडे तटस्थतेनें पाहून त्यांतील विसंगतिजन्य विनोदी दृश्य नेमकें हेरतो. व तें तो मौजेनें आणि मिष्किलपणें बोलून दाखवितो. असें करण्यांत त्यानें विशेषतः कोटिबाजपणा (wit) व विनोदशीलता (humour) हीं दोनीहि व्यक्त केलीं आहेत. तो पंडित असल्यानें त्याच्या श्लेषमूलक शाब्दिक कोट्या फार आहेत. नलासारख्या सुंदर व चतुर राजपुत्राला पाहून वरुण, यम, अग्नि व इंद्र हे दमयन्तीच्या स्वयंवराला नलाचे प्रतिस्पर्धी म्हणून जाणारे देव जागच्या जागीं थिजले ! वरुण जल (ड) देवता असल्यानें तो विस्मयजड झाला ! अग्नीचें अंग तापलें; पण तें तो अग्नि ( अनल ) होता म्हणून नव्हे, तर तो नलासारखा सुंदर नव्हता ( अ-नल ) म्हणून ! यम तर काळाठिक्करच पडला ! यमाला 'काल' (कृष्णवर्णाचा) अद्यापीहि त्यासाठींच म्हणतात ! इंद्रानें आपल्या सहस्रडोळ्यांनीं आपल्या तनूकडे एकदा पाहिलें व आपल्यास कौशिक ( घुबड ) कां म्हणतात तें त्याच्या ध्यानीं आलें ! यमाला वाटलें 'नलाला टाकून दमयन्तीनें अस्मादिकांस वरलें तर तिच्यासारखी मूर्ख तीच. आणि तिनें आम्हांला वरलें नाहीं तर प्रश्नच नाहीं. तिचा लाभ मला होणार नाहीं. म्हणून ती मला वरो किंवा न वरो ती मला प्रिय होणार नाहीं.' अग्नि म्हणूं लागला, 'दमयन्तीनें जर मला वरलें नाहीं तर बाहेर जनलज्जेमुळें व घरांत 'घरच्या मंडळीपुढें' तोंड दाखविण्याची मला सोय उरणार नाहीं.'' ( सर्ग ५.६१-७१ ).

## थोडी हिणकस अभिरुचि.

स्वयंवरास आलेल्या राजेलोकांच्या वर्णनांत पुढील विनोदी उद्गार आहेत. कुंडिनपुरांतील रस्त्यांत इतकी दाटी झाली होती कीं रेटारेटींतून आपला मार्ग काढणें राजपुत्रांना दुर्घट झालें होतें. त्यांतला एखादा राजपुत्र त्या गर्दीतून उसाळी मारून पुढें झालाच तर त्याला वाटायचें 'बस्स, दमयन्तीनें आपल्यालाच वरलें !' एक राजपुत्र पाट्यावरवंट्यामध्यें सांपडलेल्या मोहरी-(सिद्धार्थ)सारखा गर्दीत चेंगरला. त्याला पुढेंहि जातां येईना व मागेंहि हटता येईतां ! त्यामुळें 'दमयन्ती आपल्यास कसची वरते ?' असें वाटून तो हताश झाला. पण सिद्धार्थ (मोहरी किंवा यशस्वी) झालेल्या त्यानें आपल्यास असिद्धितार्थ ( अयशस्वी ) मानावें हें विचित्र नव्हे काय ? ( नै. १० ५-६ ). कांहीं राजेलोकांच्या सेवकांचे पोषाख इतके भपकेबाज, चाल-चालणूक इतकी रुबाबदार व वाणी अशी मिठास होती कीं कुंडिनपुरांतल्या कांहीं बायाबापड्यांना व भोळसटांना वाटलें कीं हे कोण्यातरी देशचे राजेच असावेत बरं का ? (नै. १०.३२). कांहीं देव स्वयंवराला कां आले नसावेत याचीं संभवनीय कारणें श्रीहर्ष विनोदानें देत आहेः–'कुबेरची स्वारी रूपानें आपली यथातथाच आहे. ( कु + बेर-तनु ). यामुळे त्यानें विचार केला 'आपण हे असे ! दमयन्तीची दृष्टि तर रूपावर. आणि मदनाचा असा स्वभाव आहे कीं तो कुल, शील व संपदा यांवर संतुष्ट नाहीं–' (१०-११). ब्रह्मदेव हे तर पितामहच (आजोबा) आणि आजोबा का कधीं मुंडावळ्या बांधून बोहल्यावर उभे राहणार ? ते वेळींच शहाणपणा दाखवून गेले नाहींत (१६). अशाच तऱ्हेचा विनोद दमयन्तीनें नाकारलेल्या राजेलोकांचे वर्णनांत (सर्ग ११-१३ व १४), नलाला पहावयास आलेल्या पुरस्त्रियांच्या हालचालींत (सर्ग १५), व लग्नांतील मेजवानीमध्यें उडविलेल्या पाहुणे लोकांच्या फडफजीतींत ( सर्ग १६) आहे. त्याची थोडी चुणूक कथासारांत (पृष्ठ २६६) दाखविली आहे. येथील विनोदांत प्रकट झालेली हर्षाची अभिरुचि मात्र चांगली आहे असें म्हणवत नाहीं. त्यांत ग्राम्यता, अश्लीलता व हरदासी कोटयांची ऊर्मि दिसते. विसाव्या सर्गांतील शृंगारमिश्रित विनोद खुमासदार व मर्यादशील आहे. व सतराव्या सर्गांतील चार्वाकानें केलेली देवधर्म, सदाचार, व्रतेवैकल्यें, यम-

नियम इत्यादींची उपहासगर्भ निंदा मात्र बुद्धिनिष्ठ विनोदाचें उत्तम उदाहरण आहे. ह्या प्रकरणाची कल्पना कथासारावरून (पृष्ठ२६७) येईल.

**कथानक-रचना.**

श्रीहर्षाच्या विस्तारप्रियतेंत पुढील एका दोषाचें बीज आहे. एक कालिदास सोडल्यास वर्णनाच्या विस्ताराबरोबर कथानकाच्या पद्धतशीर विकासाची गति चालू ठेवण्याचें एकाहि महाकवीला साधलेलें नाहीं. महाकाव्यांत कथेपेक्षां कथनाला अधिक महत्त्व असतें हें मान्य केलें तरी कथानकाकडे अजिबात दुर्लक्ष करणें कलादृष्ट्या क्षम्य होईल असें वाटत नाहीं. लहान कथानकाचा अतिरिक्त विस्तार हा जो 'नैषधां'चा विशेष आहे तो इतर दृष्टींनीं गुण असला तरी या दृष्टीनें दोषरूप झाला आहे. नलदमयन्तींचें परस्पराकर्षण, हंसाच्या मध्यस्थीनें त्यांच्या प्रेमाची वाढ, इंद्राच्या अभिलाषानें त्याला आलेला अनपेक्षित व मोठा अडथळा, त्यावर दमयन्तीनें काढलेली तोड, देवांनीं नलरूपें धारण केल्यानें उत्पन्न झालेली दुसरी अडचण, तिचेंहि दमयन्तीनें केलेलें निरसन व शेवटीं नलदमयन्ती-विवाह असे हे या कथानकाचे सात टप्पे आहेत. व ते नाटकाच्या कथानकाच्या आरंभ, यत्न, प्राप्त्याशा, नियतासि व फलागम या पांच विकासावस्थांत बसतात. सर्ग एक, दोन, तीन व पांच यांत वर्णनाबरोबर कथानकहि गतिमान् असल्यानें हे सर्ग प्रमाणशीर व म्हणून कलासुंदर वठले आहेत. विशेषतः पहिला (नलाचें विस्तृत वर्णन सोडल्यास) व पांचवा सर्ग अप्रतिम आहेत. या पांच सर्गांत पहिल्या तीन विकासावस्था आहेत. तिसऱ्या अवस्थेचा कांहीं भाग व उरलेल्या दोन अवस्थांसाठीं पुढील सतरा सर्ग खर्ची पडले आहेत ! सर्ग ४, ६, ७ व ८ कथौघाला अडथळा करतात. नववा सर्ग चांगला आहे. कारण तेथें कथानकाला निराळेंच अनपेक्षित वळण मिळण्याचा संभव उत्पन्न होतो. पुन्हा सर्ग १०, ११, १२ व १३ यांमधील कंटाळवाणा विस्तार कथानकाच्या गतीला फारच प्रतिरोध करतो. चवदाव्या सर्गांत पुढील दोन विकासावस्था असून कथेचा योग्य शेवट तेथेंच व्हावयास पाहिजे.

**कथेची उगीच फरपट.**

दमयन्तीची स्वयंवरमाला नलाच्या गळ्यांत पडली कीं कथाहि संपली

पाहिजे. फार झालें तर विवाहाचें थोडें वर्णन क्षम्य झालें असतें. पण श्रीहर्षानें नलकथेची अनवश्यक फरपट पुढें सात सर्गांत चालू ठेविली आहे. माघभारवींनीं ही चूक केली नाहीं. श्रीहर्षाकडून ही चूक त्याच्या संयमाभावामुळें झाली कीं तिला कांहीं इतर कारण आहे हें पाहून मगच त्याला या बाबतींत दोषी ठरविलें पाहिजे. त्याचप्रमाणें त्यानें या स्वयंपूर्ण व आनंदान्त कथेंत कलिप्रकरणाचा वैरस्योत्पादक भाग विस्तारानें घातला आहे व आपल्या काव्याला 'नैषधीयचरित' असें अतिव्याप्त नांव दिलें. खरें म्हणजे रघुनाथ पंडितप्रमाणें श्रीहर्षानें आपल्या या काव्यास 'नलदमयन्तीस्वयंवरम्' असें कथावस्तुबोधक सार्थ नांव द्यावयास पाहिजे होतें. या तीन अक्षम्य चुका तरी मानल्या पाहिजेत किंवा श्रीहर्षाला खरोखरच सबंध नलचरितावरील काव्य लिहावयाचें होतें असें तरी मानलें पाहिजे. तसें असेल तर हे दोष न होतां गुणच ठरतील. आणि या बाबतींत असे दोन पक्ष आहेतहि. हें काव्य बावीस सर्गान्तीं पूर्ण मानणारा एक पक्ष व ते पुढें साठ किंवा एकशेंवीस सर्गांचें होतें असें मानणारा दुसरा. पैकीं दुसरा पक्षच अधिक सयुक्तिक वाटतो. कसा तें पाहूं.

## कलीचा उल्लेख कशाला ?

'नैषधीयचरित' या नांवावरून तरी श्रीहर्षाला समग्र नलकथा आपल्या महाकाव्यांत गोंवावयाची होती असें वाटतें. त्याला अनुलक्षून त्यानें नलकथेच्या उत्तरभागाचें मुख्य बीज फारच व्यवस्थित रीतीनें रोवून ठेविलें आहे. हें बीज म्हणजे खलपुरुष कलि याचा नलाबद्दलचा अकारणदारुण रोष व त्याला अनुसरून त्यानें केलेली नलाच्या राज्यभ्रंशाची व नलदमयंतींच्या ताटातुटीची घोर प्रतिज्ञा. (प्रतिज्ञेयं नले विज्ञैः कलेर्विज्ञायतां मम। तेन मैमीं च भूमिं च त्याजयामि जयामि तम्। नै. १७. १३८). इतकेंच नव्हे तर, क्रूर शकार चारुदत्ताशीं आपल्या झालेल्या 'मरणान्तिक वैरा'ची जी दहशतीची भाषा बोलतो तीच भाषा कलि नलवैराबद्दल बोलत आहे (नैषधेन विरोधं मे चण्डितामण्डितौजसः। जगन्ति हन्त गायन्तु रवेः कैरववैरवत् ॥ १३९). हा कलीचा सैतानी प्रवेश स्वयंवर झाल्याबरोबर लगेच घडून आलेला असला तरी महाभारतांत त्याचें वर्णन नलदमयन्ती निषधदेशांत मुलांबाळांसह सुखानें नांदावयास लागल्याचें

सांगून व कथेच्या पूर्वभागाची योग्य परिसमाप्ति करून (अ. ५४) मग उत्पन्न झालेलें एक लचांड म्हणून स्वतंत्र अध्यायांत (५५) करण्यांत आलें आहे. पण श्रीहर्षानें मात्र कलिप्रकरण समांतरच वर्णून (सर्ग १७) मग पुढील पांच सर्गांत (१८ ते २२) नलाचे दमयन्तीसह विविध विलास वर्णिले आहेत. यावरून श्रीहर्षाला आपली कथा नलदमयन्तीच्या विलासांतच न संपवितां ती पुढें चालवावयाची होती असें निश्चित वाटतें. श्रीहर्ष कलीसाठीं २२१ श्लोकांचा सतरावा सर्ग नुसता लिहूनच स्वस्थ बसला नाहीं तर त्यानें कलीची विघ्नसंतोषी नजर त्या सुखी जोडप्यावर कशी सारखी खिळून राहिली होती याची चुणूक प्रथम नै.१३.३७ या ठिकाणीं व विसाव्या सर्गांत मोठ्या कलात्मक पद्धतीनें दिली आहे. दमयन्तीला नलाचा विरह क्षणभरहि सोसेना. धर्मकृत्यें करण्यास जरी नल निघाला तरी तिला त्याचा राग येई. अशा एका प्रसंगीं श्रीहर्षानें कलीला एखाद्या झोटिंगाप्रमाणें अचानक पुढें उभा करून नलदमयन्तीच्या भावी दारुण विरहाची सूचना या काव्याचे शेवटीं शेवटीं देऊन ठेविली आहे. नलाच्या वाड्याशेजारच्या बिभीतक वृक्षावर ब्रह्मराक्षसासारखा टपून बसलेला कलि या वेळीं दमयन्तीला उद्देशून मनांत म्हणतो, 'हा वेडे पोरी, या क्षणविरहानें अशी रंजीस होतेस काय! थांब, थोड्याच कालानंतर मी तुम्हां दोघांची दीर्घ ताटातूट करणार आहें' (नै. २०.८).

## 'नैषधीयचरित' पूर्ण कीं अपूर्ण ?

'नैषधीयचरित' बावीस सर्गांतीं पूर्ण आहे असें म्हणणारांना श्रीहर्षानें वर्णिलेला कलिप्रतिज्ञेचा प्रसंग (सर्ग १७) व विसाव्या सर्गांतील दुष्ट कलीनें दिलेला भाविविरहाचा भयंकर इषारा हे भाग श्रीहर्षानें अप्रयोजकपणानें घातले असे मान्य करावें लागेल. हे दोन उघड अप्रयोजक प्रकार श्रीहर्षासारखा कवी करील असें वाटत नाहीं. म्हणून हें महाकाव्य अपूर्ण आहे हा पक्षच जास्त सयुक्तिक दिसतो. बाविसाव्या सर्गाच्या शेवटीं असलेले श्रीहर्षाच्या आत्मप्रौढीचे चार श्लोक सर्वच हस्तलिखितांत सांपडत नाहींत. नीलकमलभट्टाचार्यांनीं सदर चार श्लोक प्रक्षिप्त ठरविले आहेत. शिवाय त्यांनीं अशीहि माहिती दिली आहे कीं पंडितलोकांमध्यें सदर काव्य साठ किंवा एकशेंवीस सर्गांचें असल्याची समजूत रूढ आहे. उरिया

भाषेंत या काव्याचा उत्तरभाग आहे व त्यांतील कांहीं श्लोक पंडितांना पाठ येतात. (पहा– कृष्णम्माचार्यकृत 'संस्कृत वाङ्मयाचा इतिहास' पृष्ठ १७९-८०). 'नैषधीयचरिता'चा एक प्राचीन टीकाकार चांडुपंडित (इ.स. १२९७) या काव्यास 'काव्यं नवं नैषधम्' म्हणतो. पण त्याचीहि टीका बावीस सर्गांपर्यंतचीच आहे. यावरून त्याच्या काळीहि बावीसापुढील सर्ग उपलब्ध नव्हते असें दिसतें. असो. नैषधाचा उत्तरभाग प्रत्यक्ष उजेडांत येऊन या बाबतींतलें प्रत्यक्ष प्रमाण उपलब्ध होईपर्यंत ही उलटसुलट अनुमानांची झोंबी चालणार व हा प्रश्न अनिर्णीतच राहणार हें उघड आहे. त्यामुळें तूर्त तरी हें काव्य बावीस सर्गांचें आहे तसें धरूनच त्याचा विचार करणें आपणांस प्राप्त आहे.

## कांहीं स्वभावरेखा.

नलदमयन्तींच्या स्वभावाबद्दल मागें लिहिलेंच आहे. आतां कांहीं इतर स्वभावरेखा पाहूं. भीमराजा वत्सल, आतिथ्यशील व कर्तव्यदक्ष असून संसारी गृहस्थाचा नमुना आहे. दमयन्तीचा भाऊ दम पितृभक्त व प्रेमळ असून त्याच्यामध्यें तारुण्यसुलभ विनोदी वृत्ति आहे. पाहुण्यांची थट्टा त्याच्याच प्रेरणेनें झाली ( नै. १६.४८ ). नारदाची कलहप्रियता थोडक्यांत पण चांगली दाखविली आहे. पण अधिक स्पष्ट स्वभावरेखा इंद्र व कलि या दोन पात्रांची आहे. इंद्र हा प्रेमप्रकरणांत कपटी व स्वार्थसाधु असला तरी एरवी उदार, सुसंस्कृत व धर्मनिष्ठ आहे. तो बोलण्यांत मोठा चतुर असून नलासारख्याला त्यानें हां हां म्हणतां आपल्या जाळ्यांत पकडलें. खुद्द बृहस्पतीचाच शिष्य तो ! शेवटीं मात्र इंद्राचें धोरण औदार्याचें आहे. कलीचें दर्शन फारच थोडा वेळ होतें. पण तेवढ्यांतच या इरसाल दुष्ट प्राण्याची झालेली ओळख कायमची रहावी अशी त्याची स्वभावरेखा श्रीहर्षानें काढली आहे. अकारण शत्रुत्व, विघ्नसंतोषीपणा, दीर्घद्वेष, बेपर्वाई, खुनशीपणा, दृढनिश्चय व कठोरता हे कलीचे भयंकर विशेष कवीनें थोडक्यांत पण फारच उठावदारपणें चित्रित केले आहेत. नलोपाख्यानाचा खरा खलनायक आहे हा.

## भाषाशैली–अमृतपाक.

'खण्डनखण्डखाद्या'सारख्या कठिन शास्त्रग्रंथाच्याकर्त्याकडून अस्सल

प्रसादगुणसंपन्न शैलीची अपेक्षा करणें व्यर्थ होय. शिवाय त्याची श्लेषप्रियताहि प्रसिद्धच आहे. यामुळें कालिदासाचें काव्य जर द्राक्षपाकाचें व भारवीचें नारिकेलफलपाकाचें मानलें तर श्रीहर्षाचें काव्य कपित्थपाकाचें किंवा औषधपाकाचें मानावें असें कोणी विनोदानें सुचवितात ! खुद्द श्रीहर्ष मात्र आपल्या काव्याला अमृतपाकाचें काव्य म्हणतो. कारण तें काव्य अमृताप्रमाणेंच मंथनश्रम केल्यावांचून उमगणारें नाहीं. पण उमगलें म्हणजे मात्र अमृतासारखें गोड आहे. या श्रीहर्षाच्या मतांत पुष्कळच तथ्य आहे. त्याचे शेंकडों श्लोक प्रासादिक असून कांहींचें सौंदर्य प्रयत्नानें प्रतीत होणारें आहे. कांहीं खरोखर कठिन व क्लिष्ट स्थळें सोडलीं तर महाकाव्यरचनेला जी एक भारदस्त शैली लागते (Epic style) ती श्रीहर्षानें वापरली आहे असेंच दिसून येईल. माघाचा जसा 'उच्चकैः' तसे श्रीहर्षाचे लाडके शब्द 'औचिती' व 'मुद्रित' हे आहेत. 'मुद्रयति' या नामधातूचीं बरींच साधितरूपें त्यानें सर्वत्र वापरलीं आहेत. अर्थालंकारांत जसा श्लेष तसे शब्दालंकारांपैकीं यमक व अनुप्रास हे दोन अलंकार श्रीहर्षानें सर्वत्र सफाईनें व अर्थहानि न करतां वापरले आहेत. उदा०— संगरं गरामिवाकलयन्ति। (नै.५.३१), नाकनायकनिकेतनमाप। (नै.५.८), चुकूजकूले कलहंसमण्डली। (नै. १.१२७), आलोकतालोकमुलूकलोकः। (नै. २२.३८).

**कल्पनाशक्ति.**

श्रीहर्षाच्या कल्पनेंत माघाप्रमाणें बेफाटपणा बरेच ठिकाणीं आढळून येतो. उदाहरणार्थ, पहिल्या सर्गांतील नलाचें अद्‌भुत व थोडेंसें कृत्रिम वर्णन व बाविसाव्या सर्गांतील चंद्रोदयाचें व स्वयंवराचें वर्णन. पण त्याची कल्पना स्थलविशेषीं वास्तवहि (Realistic) आहे. व तिचें गमक म्हणजे त्याची कल्पनावलोकनप्रवृत्ति (Visualisation). वर्ण्यविषय वाचकांसमोर जशाचा तसा खडा करणें, आपण तो प्रसंग साक्षात् पहातच आहोंत असें वाचकांना वाटावयास लावणें व यामुळें कल्पितांत वास्तवाचा आभास उत्पन्न करणें हें काम श्रीहर्ष बाणाप्रमाणें मोठ्या शिताफीनें करतो. शंकराच्या पिंडींत महाश्वेतेचें पडलेलें प्रतिबिंब दाखवून बाणानें तो प्रसंग वाचकांसमोर जसा मूर्तिमंत उभा केला तसा प्रकार श्रीहर्षानें अनेक

ठिकाणीं केला आहे दमयन्तीच्या मंदिरांत अदृश्यपणें बावरणाऱ्या नलाचीं प्रतिबिंबें तेथील स्त्रियांच्या हारांत, स्तंभांत व फरसबंदीवर पडत असलेलीं वर्णून व तेथील स्त्रियांच्या विश्वस्त हालचालींत नलाचा संबंध आणून श्रीहर्षानें तेथील वास्तपता बरोबर चित्रिली आहे.

एका पात्राच्या बोलण्याचा त्याच्यासमोरील पात्रावर होणारा परिणाम श्रीहर्षानें अनेक प्रसंगीं हुबेहूब वर्णिला आहे. इतकेंच नव्हे तर तो परिणाम ध्यानीं घेऊन तें पात्र आपलें पुढील भाषण करीत आहे असेंहि त्यानें दाखविलें आहे. याचें एकच उदाहरण देतों. इंद्राची व नलाची पूर्वी कधींच गांठभेट नाहीं. असें असता इद्र, एखाद्या पूर्वपरिचिताप्रमाणें, नलाला अचानकपणें नमस्कार करून म्हणतो, 'कां, ठीक आहे ना?' यावर नल बावरून त्याच्याकडे आश्चर्यानें पहात राहतो तें ध्यानीं घेऊन इंद्र म्हणतो, 'तुमचें नाव नलच ना?' अधिक भांबावलेल्या नलाला वाटतें कीं "या गृहस्थाला माझें नांव कसें माहीत आहे? याची माझी कुठली ओळख?" तें नेमकें हेरून इंद्र बोलतो 'अहो, तुमचे स्वर्गस्थ वडील पुण्यप्रतापी वीरसेन हे माझे स्नेही आहेत व त्याच्या चेहऱ्यासारखा तुमचा चेहरा हुबेहूब दिसतो!' (नै. ५.७४ व ५.२८ सुद्धां).

**कांहीं उपमाउत्प्रेक्षा.**

साध्या समर्पक उपमाउत्प्रेक्षा देण्यांतहि श्रीहर्षानें आपल्या कल्पनेचें हें वास्तव स्वरूप व्यक्त केलें आहे. नलानें दमयन्तीची कितीहि समजूत घातली तरी ती देवांना वरण्यास कबूल होईना; उलट तिनें त्याची विनंति धुडकावून टाकली. यामुळें नेहमींचा मधुरभाषी व गोडस्वभावी नल या तिच्या पोरकट हट्टामुळें रागावून कठोर बोलला. बालकानें एखाद्या कोकिलाला 'कूऽऽकूऽऽ' असें सारखें चेडावून दाखविलें कीं तो देखील असाच रागावून कठोर बोलूं लागतो! (नै. ९·३८). ही स्वभावोक्तिगर्भ सुंदर उपमा किती वास्तव आहे पहा. बराच काळ चित्तांत धरून ठेवलेली दमयन्ती इंद्रादि देवांनीं अखेर योग्य अशा नलाला दिली. पण ती देतांना त्यांना मुळींच खेद झाला नाहीं. कसा? तर बहुकाल मनांत धारण करून ठेवलेली विद्या सच्छिष्याला देतांना गुरूस खेद होत नाहीं तसा. या उपमेंत इंद्रादि देवांची दमयन्तीबद्दलची आतां बदललेली भावना कशी

सुंदर तऱ्हेनें सुचविली आहे पहा (नै. १७·२). सूर्य अस्ताला गेला व आकाशांत तारा उगवल्या. यावरील रम्य उत्प्रेक्षा पहा. भोळ्या आकाश-लक्ष्मीनें (द्यौ नें) आपल्याजवळील उत्तम सोन्याचा गोळा देऊन कोणा धूर्त व्यापाऱ्याकडून त्याच्या बदला ही पांढऱ्या कवड्यांची माळ घेतली! (नै. २२·१३). धूर्त भोवाऱ्याला जरीचीं पातळें देऊन त्याबदला कप-बश्या व बरण्या घेणाऱ्या व व्यवहारांत फसणाऱ्या आजच्याहि बायकांचा स्वभाव किती समर्पकपणें येथें वर्णिला आहे पहा !

## श्रीहर्ष व माघ यांत श्रेष्ठ कोण ?

असो. कविपरिचयांत दाखविल्याप्रमाणें श्रीहर्षाचें खास व्यक्तिमत्त्व व रसग्रहणांत विवेचिल्याप्रमाणें त्याचें जाडें पांडित्य व प्रतिभा या तीन गोष्टी त्याच्या काव्यांत कशा प्रकट झाल्या आहेत हें आतां वाचकांच्या ध्यानीं येईल. कांहीं प्राचीन पंडितांत माघाला जो मान आहे तो त्याच्या पांडित्या-बद्दल व त्याच्या अपार शब्दसंपदेबद्दल. उदाहरणार्थ, 'अनर्घराघवा'चा कर्ता मुरारी आपलें अवघड नाटक वाचण्यापूर्वी माघाच्या कृतीचा अभ्यास प्रथम करण्याची वाचकास शिफारस करतोः— ' मुरारिपदचिंतो चेत्तदा माघे मतिं करु।' (म्हणजे मुरारि कवीची भाषा नीट समजून घ्यावयाचा विचार असेल तर प्रथम माघकाव्य वाच. श्लेषानें दुसराहि अर्थः— श्रीकृष्णाच्या चरण-लाभाचा विचार असेल तर मन पापापासून अलिप्त ठेव. (मा + अघे – पापे – मतिं कुरु). किंवा ' माघे मेघे गतं वयः ' ( म्हणजे माघकाव्य व मेघ-दूत समजून घेतां घेतां तारुण्य संपलें !) तसेंच अनेक अलंकारग्रंथांत माघाचा उल्लेखहि येतो. पण श्रीहर्ष हा पांडित्यांत माघापेक्षांहि श्रेष्ठ असून शब्द-संपत्तीमध्यें तसाच गबर आहे. पण त्याची रसवत्ता त्याच्या पांडित्यानें बाधित झालेली नाहीं. श्रीहर्ष हा उत्तरकालीन असल्यानें तत्पूर्वग्रंथांत त्याचा उल्लेख माघाप्रमाणें येणें अशक्य आहे. तदुत्तरकालीन ग्रंथकार श्रीहर्षाचा उल्लेख करतातच.

## भवभूतीचा निर्णय.

कवित्वाचा कस विशेषतः काव्यकृतीच्या रसवत्तेवर ठरतो. पांडित्य त्याला फार तर पोषक होतें. असें असतां जे कोणी काव्याचें मूल्य त्याच्या

कर्त्याच्या पांडित्यावरच ठरवितात त्यांना भवभूतीच्या शब्दांतच समज देऊन हें प्रकरण संपवूं. 'मालतीमाधवा'च्या प्रस्तावनेंत तो म्हणतो, 'कवीनें वेदाध्ययन केलें आहे, तसेंच तो उपनिषदें, सांख्य, योग इत्यादि शास्त्रें पढला आहे असें वरचेवर सांगण्यांत काय हंशील आहे ? काव्यकृतींत या नुसत्या अध्ययनाला कांहीं किंमत नाहीं. काव्यांत प्रौढत्व, वाणीची उदारता व अर्थगौरव हे गुण पाहिजेत. त्यावरूनच पांडित्य व वैदग्ध याची प्रचीति येते (मालती० १.६). त्याचप्रमाणें कवीच्या कृतींत कोणते गुण पाहिजेत तें तो पुढीलप्रमाणें सागतो. ' रसोत्कट व वेधक असे प्रसंग, सौहार्दहृद्य कृत्यें, प्रणयप्रेरित साहसें, चतुर संभाषणें इत्यादि गोष्टी काव्याच्या प्राणभूत घटक होत ( मालती० १·४). या भवभूतीच्या कसोटीला माघ जास्त उतरतो का श्रीहर्ष हें रसिकांनींच ठरवावें. आमच्या मतें तर विदग्ध महाकाव्यांपैकीं कालदृष्ट्या शेवटचें हें काव्य गुणवत्तेनें बरेंच श्रेष्ठ आहे. कांहीं विशिष्ट उत्कट गुण व कांहीं विशिष्ट दोष याच्यामध्यें आहेत. पण या गुणदोषांचेंहि वैशिष्ट्य असें आहे कीं त्यांतील दोष गुणांच्या मानानें फार अल्प व गुणांच्या अतिरेकानेंच उत्पन्न झालेले आहेत.

## नैषधीय चरित-सुभाषितें.

(१) अधीतिबोधाचरणप्रचारणैर्दशाश्चतस्रः प्रणयन्नुपाधिभिः ।
चतुर्दशत्वं कृतवान्...१.४ ॥

चतुर्दश म्हणजे चौदा विद्या हस्तगत करण्याचे चार टप्पे किंवा दशा आहेतः— १ प्रथम स्मरणशक्तीचे जोरावर त्यांचें पाठान्तर ( अधीतिः ), २ नंतर पाठान्तराचें मार्मिक अर्थज्ञान ( बोधः ), ३ त्याउपर अर्थज्ञानानुसार प्रत्यक्ष व्यवहार ( आचरणं ), व ४ शेवटीं त्या स्वानुभवसिद्ध व परिपक्व ज्ञानाचा समाजांत प्रचार ( प्रचारणं ). या चार दशांमुळेंच चतुर्दशविद्यांचें चतुर्दशत्व खऱ्या अर्थानें सिद्ध होतें.

(२) विगर्हितं धर्मधनैर्निबर्हणं विशिष्य विश्वासजुषां द्विषामपि ।
—१.१३१ ॥

( हंस आपणांस धरणाऱ्या नलाला म्हणतो—) धर्मशील सज्जन सामान्यतः कोणाहि प्राण्याची हिंसा निंद्यच मानतात. पण त्यांतल्या त्यांत आपल्यावर विश्वासलेल्या शत्रूंचीहि हिंसा त्यांना विशेषतः गर्ह्य वाटते.

**(३) ब्रुवते हि फलेन साधवो न तु कण्ठेन निजोपयोगिताम्। २.४८**

( हंस नलाला म्हणतो—' दमयन्तीकडे जाऊन तिचें मन तुला अनुकूल करतों ' असें जें मीं तुला म्हटलें तें केवळ तुझी या गोष्टीला संमति मिळविण्यासाठींच; कामाआधीं बढाई मारण्यासाठीं नाहीं. कारण—) मोठे लोक आपली उपयुक्तता कृतीनें बोलून दाखवतात; तोंडानें नव्हे.

**(४) स्वत एव सतां परार्थता ग्रहणानां हि यथा यथार्थता ।२.६१**

( नल हंसाला म्हणतो– ' थोर लोक स्वयंप्रेरणेनेंच परकार्याला प्रवृत्त होतात.) मीमांसकमताप्रमाणें ज्ञान जसें स्वतःप्रमाण असतें किंवा वृक्षादि पदार्थांचें ( ग्रहणाना ) ज्ञान तें ते शब्द उच्चारतांच स्वतःच स्फुरतें त्याप्रमाणें मोठे लोकसुद्धां परोपकारांत स्वयंप्रेरित असतात. त्यांना दुसऱ्यांनीं सांगावें लागत नाहीं.

**(५) कार्यं निदानाद्धि गुणानधीते । ३.१७**

( हंस दमयन्तीला म्हणतो कीं आम्ही सुवर्णकमलिनीचे तंतु भक्षितों म्हणून आमची तनू सोन्याची झाली.) कार्य कारणाचे गुण घेऊनच प्रकट होतें. कारणांचे गुण कार्यांत उतरतात.

**(६) हृदे गभीरे हृदि चावगाढे शंसान्ति कार्यावतरं हि सन्तः। ३.५३**

(इतकें बोलल्यानंतर तो हंस दमयन्तीच्या मनांत काय आहे तें समजून घेण्यासाठीं थांबला.) एखाद्या खोल डोहाचा व खोल मनाच्या माणसाच्या हृदयाचाहि ठाव प्रथम घ्यावा व मगच त्या डोहांत कसें उतरावयाचें व त्या माणसाशींहि कसें वागावयाचें याचा विचार करावा असें शहाणे पुरुष सांगतात.

**(७) पित्तेन दूने रसने सितापि तिक्तायते हंसकुलावतंस ॥ ३.९४**

(दमयन्ती हंसाला सांगतें कीं, ' हे हंसश्रेष्ठा, नल ज्या वेळीं अन्यस्त्रियांच्या पाशांत गुरफटला असेल किंवा कांहीं कारणानें रागावला असेल अशा वेळीं त्याजजवळ मजबद्दल गोष्ट काढूं नको. अशा वेळीं मी चांगली

असूनहि त्याला प्रिय होईनच याचा नेम नाहीं.) पित्तामुळें माणसाचें तोंड कडवट झालें असतां त्याला चांगली गोड साखर सुद्धा कडूच लागते.

**(८) वर्त्म कर्षतु पुरः परमेकस्तद्गतानुगतिको न महार्घः । ५.५५**

(दमयन्तीच्या अभिलाषानें देवांचा अधिपति इंद्र हा पृथ्वीकडे जाण्यास निघतांच अग्नि, वरुण व यम हेहि त्याचेमागून चालले). कोणीतरी एकानें पुढारीपण घेऊन एखादा मार्ग एकदा चोखाळला कीं त्याच्यामागून जाणाऱ्या इतरांची वाण कधींच पडत नाहीं.

**(९) अर्थिने न तृणवद्धनमात्रं किंतु जीवनमपि प्रतिपाद्यम् ।**
**एवमाह कुशवज्जलदापी द्रव्यदानविधिरुक्तिविदग्धः । ५.८६**

'याचकाला द्यावयाचें द्रव्यदान दात्यानें दर्भ व उदक यांसह संकल्पपूर्वक द्यावें' (कुशवत् सलिलोपेतं दानं संकल्पपूर्वकम् ।) असा विधी सांगणारें शास्त्र मोठ्या खुबीनें जणों काय असें सुचवितें कीं:- 'दात्यानें केवळ धनच तृणवत् कल्पून तें याचकाला द्यावें इतकेंच नाहीं तर त्यानें आपले प्राणसुद्धा (जीवन = १. प्राण. २ पाणी) तृणवत् मानून ते याचकाला द्यावे.'

**(१०) आर्जवं हि कुटिलेषु न नीतिः । ५'१०३**

(नलानें इंद्राचें कपट ओळखलें व त्या कपटाला योग्य असेंच डावपेंचाचें उत्तर त्यानें इंद्राला केलें.) कपटी लोकांशीं सरळपणें वागणें हा मार्ग व्यवहारांत अयोग्यच आहे.

**(११) विवेकधाराशातधौतमन्तः सतां न कामः कलुषीकरोति । ८.५४**

( आपल्या अन्तःपुरांत आलेल्या नलाचा दमयन्तीनें योग्य तो सत्कार केला. त्याच्याशीं ती आपल्या वीणेसारख्या मधुर वाणीनें मोठ्या प्रेमानें बोलली व बोलतांना नलावर मोहक प्रेमकटाक्षहि तिनें टाकले. पण नल दूत म्हणून आला असल्यानें त्यानें त्या प्रकारानें आपलें मन ढळूं दिलें नाहीं. ) विवेकाच्या शेंकडों धारांनीं निर्मल झालेल्या संयमी सज्जनाच्या मनाला (अन्तः) कामवासना कलुष करूं शकत नाहीं.

**(१२) गरौ गिरः पल्लवनार्थलाघवे मितं च सारं च वचो हि वाग्मिता । ९.८**

( 'तुमचा वंश व तुमचें नांव तुम्ही कां सांगत नाहीं तें मला सांगा' असें दमयंन्तीनें आग्रहानें म्हटलें. त्यावर नल तिला उत्तर करतो कीं मी

दूत म्हणून तुजकडे आलों असल्यानें मी त्याला प्रस्तुत असेंच बोललों. माझा वंश व नांव या गोष्टी अप्रस्तुत आहेत. त्यांची लांबण लावणें मला नापसंत आहे.) जरूर नसतांना शब्दांचा उगीचच पसारा मांडणें ( पल्लवनं ) व जरूर असूनहि फार थोडे शब्द वापरून अर्थाचा विनाकरण संकोच करणें ( अर्थलाघवं ) हे बोलण्यांतले दोन विषतुल्य दोष आहेत. ते विषाप्रमाणें टाळलेच पाहिजेत. शब्दरचनेच्या दृष्टीनें नेमस्त पण अर्थव्यक्तीच्या दृष्टीनें भरदार असें जें बोलणें त्यालाच वक्तृत्व म्हणतात.

**(१३) जनानने कः करमर्पयिष्यति । ९.१२५**

( नल म्हणतो, ' मीं दूत या नात्यानें देवाशीं प्रतारणा केली नाहीं हें माझ्या मनालाच माहीत. सर्वसाक्षी देवहि खरेंखोटें जाणतोलच. मग लोक काय म्हणतील ते खुशाल म्हणोत.) लोकांच्या तोंडाला कुणीं हात लावावा ?

**(१४) सतां हि चेतः शुचिताऽऽत्मसाक्षिका । ९.१२९**

( हंस नलाला त्याच्या शुद्ध हेतूची ग्वाही देऊन म्हणतो कीं–) थोर लोकांची सदसद्विवेकबुद्धिच त्यांच्या अन्तःकरणाच्या पावित्र्यतेबद्दल साक्षी असते.

**(१५) उदेति दोषादपि दोषलाघवं कृशत्वमज्ञानवशादिवैनसः । ९.१३२**

( नल म्हणतो— ' मला कांहीं काळ भ्रम हा चित्तदोष झाला. पण त्या भ्रमामुळेंच मला दमयन्तीच्या विरहवेदना जाणवल्या नाहींत. ' ) एका वाईट गोष्टीनें कधीं कधीं दुसऱ्या वाईट गोष्टीची तीव्रता कमी होते. अज्ञानानें केलेल्या पापाचें पापत्वहि कमी गणलें जातें तशी ही गोष्ट आहे.

**(१६) जातौ न वित्ते न गुणे न कामः सौंदर्य एव प्रवणः स वामः । १०.१३**

मदनाची तऱ्हाच वेगळी. तो कुलशील, गुण किंवा किंवा पैसा या गोष्टी विचारीत नाहीं. त्याचा सारा ओढा केवळ रूपाकडे ।

**(१७) आत्मापकर्षे सति मत्सराणां द्विषः परस्पर्धनया समाधिः । १०.४२**

( रूपसुंदर आणि तेजस्वी नल स्वयंवरमंडपांत आल्याबरोबर मत्सरानें पछाडलेले इतर राजपुत्र त्याची निंदागर्भ स्तुति करूं लागले. ते म्हणाले,

'हा कोणी नवीनच चंद्र, दुसरा मदन व तिसरा अश्विनीकुमार आहे. म्हणजे हा मोठा विचित्रच प्राणी दिसतो!' शिवाय नलाचें रूप धारण करणाऱ्या चार देवांकडे बोट दाखवून ते म्हणाले, 'नलाचीच एवढी काय मिजास? नलासारखे येथें आणखी चौघे आहेत कीं!') आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षां आपण कमी आहोंत ही गोष्ट मनाला खाऊं लागली कीं मत्सरी लोकांना 'हा तर इतर अनेकांसारखाच आहे, याचेंच काय येवढें स्तोम?' असें म्हणण्यांतच समाधान लाभतें!

**(१८) देवा हि न्यान्यद्वितरन्ति किन्तु प्रसद्य ते साधुधियं ददन्ते ।**
१४.९

(इंद्रादि देवांनीं दमयन्तीवर कृपाप्रसाद केल्याबरोबर तिला सरस्वतीनें केलेल्या नलाच्या श्लेषयुक्त स्तुतीचा अर्थ स्पष्ट झाला.) देव प्रसन्न झाले म्हणजे भक्ताला सुविचारच देतात; दुसरें तिसरें कांहीं नाहीं.

## उपसंहार.

कालिदास, भारवि, माघ व श्रीहर्ष या चार महाकवींनीं रचिलेल्या पांच महाकाव्यांचें समीक्षण येथपावेतों केलें. त्यावरून आपल्या ध्यानीं आलें कीं महाकाव्यरचनेचा पहिला प्रवर्तक कालिदास जसा कालदृष्ट्या पहिला तसा गुणदृष्ट्याहि पहिलाच राहिला. स्वकालोचित हेतु, व्यक्तिमत्त्व, स्वभावरेखन, रसवत्ता, कथानकाची पकड, भाषाशैली, कल्पनाशक्ति, प्रज्ञा, बाह्यांगांची सजावट, संयम, प्रमाणशीरपणा, औचित्य इत्यादि कसोट्यापैकीं कोणतीहि एक कसोटी किंवा सगळ्याच एकदम लावल्या तरी 'महाकवींत श्रेष्ठ कोण?' त्याचें उत्तर एकच– 'कालिदास'! म्हणजे येथेंहि 'अनामिका सार्थवती' होते! यापैकीं एखाद्या कसोटीनें दुसरा एखादा कवि त्याच्याहून सरस वाटला तरी तो इतर दृष्टींनीं कमी ठरून कालिदासाच्या मागेंच पडतो. गुणदृष्ट्या दुसरें स्थान भारवीचें. उत्कट रसवत्ता आणि उज्ज्वल कल्पनाशक्ति या बाबतींत श्रीहर्ष कालिदासाजवळ बसण्यास योग्य आहे असेंहि वाटतें. पण भारवीचें ओज व अर्थगौरव सरस आहे व श्रीहर्षाचा संयमाभाव त्याला पदोपदीं नडतो म्हणून श्रीहर्ष

तिसरा व पंडित माघ चवथा असा क्रम लागतो. त्यांच्या या पंच-महाकाव्यांनीं व्यक्तिशः व सामुदायिक तऱ्हेनें संस्कृत काव्याचें वैशिष्ट्य स्पष्टपणें दर्शविलें आहे. कालदासापासून श्रीहर्षापर्यंत हजार वर्षांच्या दीर्घ कालांत संस्कृत कवितेला जी भव्यता, जी रमणीयता, जें वैचित्र्य व जें लालित्य लाभलें तें या पांच प्रातिनिधिक महाकाव्यामुळेंच. तिच्या अन्तर्बाह्य सौंदर्याचीं स्फूर्तिस्थानें हींच महाकाव्यें. म्हणून यांना 'संस्कृत काव्याचे पंचप्राण' म्हणणें यथार्थ ठरतें. यांत प्राचीन भारतीय जीवन व संस्कृति, भारतीय प्रज्ञा व कल्पना आणि भारतीय आकाक्षा व भावना प्रतिबिंबित झालेल्या असल्यानें हीं पंचकाव्यें म्हणजे संस्कृत सरस्वतीचें एक कलामंडित दर्पणच आहे. हें दर्पण गतकालाचें जसें एक स्मारक आहे असें तें भविष्यकालीन स्फूर्तीचें प्रेरक स्थान आहे. या पंचमहाकाव्यांच्या प्रस्तुत विवेचनानें मराठी वाचकांची जिज्ञासा जागृत होऊन अमृताच्या या जिवंत उगमस्थानाकडे स्वतःच जाण्याची कोणास इच्छा झाली तर माझा हा प्रयत्न सफल झाला असें मी समजेन. मीं मात्र या काव्यांच्या संगतींत माझ्या आयुष्यांतील पुष्कळ काळ निर्मेळ आनंदांत घालविला आहे. आणि यापुढेंहि हाच आनंद मला लाभेल हा विश्वास मला सुखद वाटतो. ज्याच्या थोर प्रतिभेमुळें हें अखंड आणि शुद्ध आनंदाचें निधान मला लाभलें त्या कालिदासप्रभृति संस्कृत महाकवींना व त्या परमपवित्र संस्कृत विद्यादेवीला वंदन करून मी वाचकांचा निरोप घेतों.

---

आद्यः प्राणो रघुः सद्रसिकहृदयगः श्रीकुमारः समानः
ओजस्वी व्यानभूतो निखिलतनुगतो भारवीयः किरातः ।
माघोऽपानेन तुल्यो निषधपतिकथोदानरूपोऽतिशेते
पञ्चप्राणैः प्रहर्तुं प्रदिशतु परमं मङ्गलं संस्कृता वाक् ॥

समाप्त.

REFBK-0006843